
शुभ दीपावली
॥ग्रंथाली॥
सप्रेम नमस्कार,
आपली प्रतिक्रिया जाणण्यास
उत्सुक आहोत.
दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छांसह!
आपले स्नेहांकित
सुदेश हिंगलासपूरकर, विश्वस्त
डॉ. वीणा सानेकर, कार्यकारी संपादक
योगिता मोरे, धनश्री धारप
अनिरुद्ध गद्रे आणि
ग्रंथाली परिवार
granthaliruchee@gmail.com

शब्द

# रुची


४२

दिवाळी विशेषांक

ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७

मूल्य १५० रु.

पृष्ठे २००





धगधगता लाव्हा
स्वराज्याचा छावा
Bigboss
संभाजी
PATANJALI
Kesh Kanti
VICCO
सोम-शनि
रात्री 9 वा.
झी मराठी HD वरही पहा
Z
मराठी
Presenting Sponsor:
Co-powered by:


Supreme®
People who know plastics best
पाईपिंगचे संपूर्ण समाधान
'सुप्रीम' परिवारा तर्फे आपणा सर्वांना
दिपावली व नूतन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा !
शुभ दीपावली
पाईपिंगच्या प्रत्येक गरजांसाठी 'सुप्रीमची'
दर्जेदार, पर्यावरण पूरक उत्पादने...
aqua Gold®
उच्च दाबाची प्लंबिंग प्रणाली
Lifeline®
गरम व थंड पाण्यासाठी अद्यावत प्लंबिंग प्रणाली
Indo green®
गरम व थंड पाण्यासाठी अद्यावत प्लंबिंग प्रणाली
S.W.R.
ड्रेनेज प्रणाली
SKYRISE®
हाय-टेक, लो नॉईज, एस.डब्ल्यू.आर. ड्रेनेज प्रणाली
Nu-Drain
भूमिगत ड्रेनेज प्रणाली
Ultra PLUS
डबल वॉल कोरोगेटेड पाईप्स्
SILTANK®
ओव्हरहेड वॉटर टँक्स् अॅण्ड लॉफ्ट टँक्स्
Amrutam
अंडरग्राउंड वॉटर टँक्स्
SAFEGARD®
सेप्टीक टँक्स्
दि सुप्रीम इंडस्ट्रीज लि. मुंबई/जळगाव
फोन : 0257- 3050541,42,43,44,49 • www.supreme.co.in
आयुष्यभराची साथ...


विमा – नाही केवळ आरोग्याचा, तर आनंदाचा पण!
आई, आजोबांना काय झालं आहे? ते असे काय पडले?
गप्प बस. बाबा डॉक्टरांना बोलावत आहेत.
कॉलिंग...
आपल्याला आजोबांना हॉस्पिटलमध्ये ॲडमिट करावे लागेल. रुग्णवाहिका बोलावा.
हॉस्पिटलमध्ये डॉक्टरः बरं झालं तुम्ही त्यांना वेळेत घेऊन आलात. आपल्याला ताबडतोब अँजियोप्लास्टी करावी लागेल.
रुग्णालय
अरे देवा, त्यासाठी खूप पैसे लागतील ना? मी माझ्या भावाशी बोलू का?
तू काही काळजी करू नकोस. मी आधीच आपल्या सर्वांसाठी दि न्यू इंडिया फ्लोटर मेडिक्लेम पॉलिसी घेतली आहे.
पण आपल्याला काही तरी पैसे भरावेच लागतील ना?
रुग्णालय
अगं नाही. त्यात कॅशलेस सुविधा आहे. दि न्यू इंडिया अ‍ॅशुरन्स कंपनी सगळी बिलं हॉस्पिटलला थेट चुकती करते.
रुग्णालय
आजोबा तुम्ही कसे आहात?
आता बरं वाटतंय. डॉक्टरांचे आभार.
हो आणि दि न्यू इंडिया अ‍ॅशुरन्स कंपनीचेही आभार.
न्यू इंडिया फ्लोटर मेडिक्लेम
धन्यवाद न्यू इंडिया!
www.newindia.co.in
online.newindia.co.in
टोल फ्री :
1800 209 1415
NEW INDIA ASSURANCE
दि न्यू इन्डिया एश्योरन्स कंपनी लिमिटेड
The New India Assurance Co. Ltd
पंजीकृत आणि मुख्य कार्यालय : न्यू इंडिया अ‍ॅश्युरन्स बिल्डिंग, 87, एम.जी.रोड, फोर्ट, मुंबई-400001, भारत
IRDA Regn. No. :190
CIN No.: U 99999 MH 1919 GOI 000526
UIN. NIAHLIP13030V011213
Advt. No.NIA/CCD/17-18/002/P



आपल्या आवडीचे
१००% नैसर्गिक
फ्रोझन पल्प
केशर, हापूस, जामुन व स्ट्रॉबेरी
Jain FarmFresh
AAMRUS
STRAWBERRY
Frozen Strawberry Pulp
JAMUN
Frozen Jamun Pulp
FRU2go
लवकरच उपलब्ध
100% FRUIT NOTHING ELSE
स्वाद रुचीचा... फळांच्या संगतीचा!
उत्पादक : जैन फार्म फ्रेश फूड्स लि., जैन फूड पार्क, जैन व्हॅली, जळगाव - ४२५ ००१
care@jainfarmfresh.com; www.jainfarmfresh.com; www.aamrus.in
टोल फ्रि नंबर: १८०० ५९९ ४०००
fb.com/aamrus.in @_aamrus /_aamrus


महाराष्ट्र शासन
प्रकाश पर्वाकडे...
दुष्काळमुक्त महाराष्ट्र
कर्जमुक्त शेतकरी
पारदर्शक आणि गतिमान प्रशासन
प्रत्येकाला स्वत:चे घर
स्वच्छ, सुंदर आणि हरित महाराष्ट्र
संकल्प ते सिद्धी
भारताचे नवनिर्माण ...महाराष्ट्राचे महायोगदान!
दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन



शुभ दिपावली
आम्ही अजून कमी केले गृह/कार कर्जावरील व्याजदर
आता तुम्हाला घेता येईल
अधिक मोठे घर आणि अधिक मोठी कार
प्रोसेसिंग शुल्क नाही
युनियन होम
कमी व्याजदर • 5 दिवसांत मंजुरी
परतफेडीची मुदत 30 वर्षांपर्यंत
युनियन माईल्स
कमी व्याजदर • 2 दिवसांत मंजुरी
परतफेडीची मुदत 7 वर्षांपर्यंत
कर्जासाठी ऑनलाईन अर्जाची सुविधा । दैनिक घटत्या शिलकीवर व्याजआकारणी
गौरवशाली भागीदार
युनियन बँक
ऑफ इंडिया
चांगले लोक, चांगली बँक
भारतीय बँकिंग कोड्स आणि स्टँडर्ड बोर्ड ऑफ इंडिया चे सदस्य
हेल्पलाईन नं.: 1800 208 2244 / 1800 22 2244 (टोल फ्री नं.) | 080 2530 0175 (सशुल्क) | +91 80 2530 2510 (एनआरआयसाठी)
www.unionbankofindia.co.in

**विवेकशील विचार, व्यापक संवाद, कलात्म जाण आणि सजग समाजभान अर्थात शब्दरुची**

ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

# शब्द रुची

दिवाळी विशेषांक
ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७, वर्ष पाचवे
अंक सहावा–सातवा, मूल्य १५० रु.

संपादक : सुदेश हिंगलासपूरकर
कार्यकारी संपादक : डॉ. वीणा सानेकर
मुखपृष्ठ : चित्रकार ग.ना. जाधव
(श्रीकांत जाधव यांच्या सौजन्याने)
आतील मांडणी : प्रदीप म्हापसेकर
आतील चित्रे : वैभव जगताप

कार्यालयीन संपर्क
कॉम्प्युटर युनिट – योगिता मोरे, अनिरुद्ध गद्रे
granthaliruchee@gmail.com
जाहिरात प्रसिद्धी – धनश्री धारप
इ प्रसिद्धी – धनंजय गांगल
वितरण – हरिप्रसाद जयस्वाल

केवळ वार्षिक वर्गणी स्वीकारली जाईल.
वार्षिक वर्गणी २५० रुपये
डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता :
ग्रंथाली, बुलन मिल म्युनिसिपल स्कूल,
तळमजला, यशवंत नाट्यमंदिराशेजारी,
जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प),
मुंबई ४०००१६ ☎ २४३०६६२४/२४२१६०५०
granthali01@gmail.com
granthali02@gmail.com
granthaliruchee@gmail.com
www.granthali.com

ऑफिस वेळ : सकाळी १२ ते सायं. ६
संपर्क/फोन/पुस्तके खरेदी करण्यासाठी

अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे मासिक व्यासपीठासमान आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र, त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था वा तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.

## अनुक्रम

**विभाग १ (कथारंग)**
१२ पाळत – **मिलिंद बोकील**
१६ तुरतुरी – **अशोक कौतिक–कोळी**
२२ बोगदा – **श्रीकांत बोजेवार**
२८ सुक्याची गाय – **ऐश्वर्य पाटेकर**

**विभाग २ (जन्मशताब्दी विशेष)**
३१ चित्रकार ग. ना. जाधव – **साधना बहुळकर**
४० दिल का दिया, जला के गया – **डॉ. मृदुला दाढे**

**विभाग ३ (मंटोनामा)**
४६ वाघ आला, वाघ आला, पळा –
मूळ कथा : **सआदत हसन मंटो**
अनुवाद व परिशिष्ट : **किरण येले**
५० सआदत हसन मंटोच्या कथा – **अपर्णा लव्हेकर**
५६ आगा हश्र काश्मिरींशी दोन भेटी –
मूळ व्यक्तिचित्र : **सआदत हसन मंटो**
अनुवाद : **डॉ. वसुधा सहस्त्रबुद्धे**

**विभाग ४ काव्यरंग**
६४ ज्याला सगळं आठवत होतं
मूळ हिंदी कविता : **के. सच्चिदानंद**
६४ दिवा – मूळ हिंदी कविता : **बालकवी बैरागी**
दोन्ही कवितांचा अनुवाद : **डॉ. प्रकाश भातम्ब्रेकर**
६५ पुस्तकं – **नीरजा**
६५ डांबराचा समुद्र – **चंद्रशेखर सानेकर**
६६ दहशतींविरुद्ध युद्ध – **श्रीपाद भालचंद्र जोशी**
६६ तुलाच फक्त सुचायची तशी कविता –
**डॉ. प्रज्ञा दया पवार**
६७ तिपेडी – **प्रमोद मनोहर कोपर्डे**
६७ देव हातात हात घालून – **डॉ. सुधीर रा. देवरे**
६७ गझल – **सदानंद डबीर**
६८ पूल – **सतीश सोळांकुरकर**
६८ चित्र – **प्रशांत असनारे**
६९ तोरण – **प्रतिभा सराफ**
६९ माती – **विलास पगार**
७० नोटिफिकेशन – **गीतेश गजानन शिंदे**
७० आभाळगाणे – **सरोज जोशी**

विभाग ५

७१ जना-मनातले अरुण साधू

विभाग ६ (अभिव्यक्ती)

११४ ऐकणे/वाचणे – **वसंत आबाजी डहाके**

११९ नेत्रा साठेची 'रंगीन' किमया – **उषा मेहता**

१२७ चित्रपटाचं एक 'गाईड' –**महेन्द्र एकनाथ तेरेदेसाई**

विभाग ७ (चर्चा)

१३२ वसंत पळशीकर समजून घेताना – **किशोर बेडकिहाळ, समीर शिपूरकर आणि इतर**

विभाग ८ (ललितरंग)

१४० विश्रामगृह नावाची बकाल झालेली संस्कृती – **प्रवीण बर्दापूरकर**

१४६ रानपाटा – **डॉ. प्रतिमा इंगोले**

१५१ 'विराटमाऊ, आम्हाला गरुडमाचीचा रस्ता सांग ना!' – **वसंत वसंत लिमये**

१५९ रूपजीविनी – **स्मिता भागवत**

विभाग ९ (परिसंवाद : समकालीन मराठी विश्व – स्थिती आणि स्थित्यंतरे)

१६५ आजचे मराठी वैचारिक विश्व आणि चळवळी – **डॉ. अशोक चौसाळकर**

१६९ कसले सत्य आणि कशाचे वास्तव! – **जयदेव डोळे**

१७३ समकालीन लेखन आजच्या जगण्याला भिडू पाहते आहे... – **प्रवीण दशरथ बांदेकर**

१७७ आहे संदर्भहीन तरीही... – **दिनकर गांगल**

विभाग १० (आगळीवेगळी माणसं)

१८४ लॉरी बेकर : वास्तुरचनाकारांमधील गांधी – **अरुण मळेकर**

१८७ क्रांतिकारक पुरुष नसबंदीचा संशोधक : डॉ. सुजय गुहा – **डॉ. अनंत पां. लाभसेटवार**

१९३ ग्रंथाली प्रकाशन वृत्तांत

१९४ ग्रंथपान – मेहता पब्लिशिंग हाऊस

१९५ 'ग्रंथाली' ग्रंथपाने – चांगदेव काळे


## संपादकीय...

कथारंग, अभिव्यक्ती, ललितरंग, आगळी-वेगळी माणसं, परिसंवाद, जन्मशताब्दी विशेष, चर्चा, कविता अशा विविध अंगांनी यंदाचा 'शब्द रुची' दिवाळी अंक सजला आहे. एका विशिष्ट विषयाला वाहिलेला हा अंक नाही पण त्याच्या खुल्या स्वरूपामुळे वाचकांना तो समाधान देईल असे वाटते. साहित्यापलीकडे चित्रकला, चित्रपट, संगीत याही कलांची परिमाणे या अंकाला लाभली आहेत. त्यामुळे वेगवेगळ्या वाचकांना त्यांच्या अभिरूचीचे, आवडीचे या अंकात काही ना काही गवसेल असे म्हणण्याला वाव आहे.

मराठी नियतकलिकांच्या, दिवाळी अंकांच्या मुखपृष्ठांचे जग दीर्घकाळ सजवणाऱ्या चित्रकार ग. ना. जाधव यांचे हे जन्मशताब्दी वर्ष. त्यांचे किर्लोस्कर मासिकाच्या मुखपृष्ठावरील दिवाळीचे प्रसन्न प्रसंगचित्र 'शब्द रुची'च्या मुखपृष्ठासाठी निवडले आहे. हे मुखपृष्ठ किर्लोस्कर दिवाळी अंक, १९५८ मधील असून तेव्हा त्या अंकाचे मूल्य १.७५ रु. होते. खेरीज त्यांच्या चित्रशैलीचा आणि कामगिरीचा वेध घेणारा मर्मग्राही लेख 'जन्मशताब्दी विशेष' या भागात समाविष्ट केला आहे. ग. ना. जाधव यांचे सुपुत्र श्रीकांत जाधव यांनी अत्यंत प्रेमाने चित्रकार जाधव यांची चित्रे आम्हाला उपलब्ध करून दिली. त्यामुळे अंकाचे सौंदर्य वृद्धिंगत झाले.

'जन्मशताब्दीविशेष' याच भागातील संगीतकार चित्रगुप्त यांच्या सांगीतिक कारकिर्दीचा आढावा घेणारा लेखही आनंददायी आहे.

'शब्द रुची' संपादनाच्या या अलीकडच्या दिवसांत सआदत हसन मंटोच्या कथांवरचा एक दीर्घ लेख हाती आला. तो वाचतानाच 'मंटोनामा' ही कल्पना सुचली आणि मंटोच्या साहित्याचा उत्तम अनुवाद करणाऱ्या लेखकसुहृदांनी ती उचलून धरल्याने या दिवाळी अंकात ती आकारालाही आली.

'शब्द रुची दिवाळीचे कथाविश्व समकालीन नागरी आणि ग्रामीण स्पंदनांची गोष्ट सांगते तर कविताविश्व नव्या-जुन्या पिढ्यांच्या स्वरमेळ साकारते. बालकवी बैरागी यांची हिंदीतील अनुवादित कविता दिवाळीची विशेष भेट ठरावी.

ज्येष्ठ विचारवंत वसंत पळशीकर यांचे गतवर्षी दिवाळीनंतर निधन झाले. त्यांचा विवेकी विचार समजून घेण्याच्या दृष्टीने एक विशेष विभाग या अंकात समाविष्ट करण्यात आला आहे. त्याकरता पळशीकरांवरील माहितीपटाच्या निमित्ताने झालेली दीर्घ चर्चा 'अवकाशनिर्मिती'चे समीर शिपूरकर आणि किशोर

बेडकिहाळ यांनी 'शब्द रुची'करता उपलब्ध करून दिली.

'अभिव्यक्ती' आणि 'ललितरंग' या दोन्ही भागांतील लेखन इंद्रियजन्य अनुभव, वास्तवदर्शी अनुभव, प्रवास, निसर्ग, चिंतन अशा विविध अंगांनी साकारले आहे. ही विविधता लक्षवेधी आहे.

'समकालीन मराठी विश्व : स्थिती आणि स्थित्यंतरे' या परिसंवादाच्या संयोजनासाठी प्रसाद हावळे या तरुण पत्रकार मित्राने मोठे सहकार्य केले; तर अंकातील रेखाटनांसाठी वैभव जगताप या कला महाविद्यालयातील विद्यार्थ्याने परिश्रम घेतले. या तरुण मित्रांची साथसोबत 'शब्द रुची'च्या वाटचालीत पुढेही राहील असा विश्वास वाटतो.

जसजसा अंकाला आकार येत गेला तसतसे जाणवले की आपापल्या क्षेत्रात काही ना काही घडवणाऱ्या माणसांच्या पावलांचा वेध हा अंक कळत-नकळत घेत जातो आहे.

कुणी आपल्यासोबत असेल-नसेल, कुणी आपल्या पाऊलखुणांचा मागोवा घेईल - न घेईल याची चिंता न करता ही माणसं चालत राहिली. साहिरचा एक सुंदर शेर आहे-

'माना कि इस जहाँको न गुलजार कर सके

कुछ खार कम तो कर सके गुजरे जहाँसे हम

जिथे जिथे ही माणसं वावरली, तिथला-तिथला भोवताल त्यांनी समृद्ध केला, सुसह्य केला. अशाच एका माणसाचा चिरविरह अनेकांना दु:ख देऊन गेला.

दिवाळी अंकाचे काम अगदी शेवटच्या टप्प्यात असताना 'ग्रंथाली' परिवारात ही अनपेक्षित दु:खद घटना घडली. 'ग्रंथाली'चा आधारवड असणाऱ्या अरुण साधूंचे दु:खद निधन झाले. साधूंवरील 'विशेष भाग' याच अंकात असायला हवा असे सुदेश हिंगलासपूरकर यांनी सुचवले आणि 'ग्रंथाली' साधूमय झाली. 'जना-मनातले साधू' हा विभाग म्हणजे साधूसरांना वाहिलेली विनम्र भावांजली आहे. दिनकर गांगल, अनुराधा गांगल, कुमार केतकर, डॉ. जब्बार पटेल, अर्जुन डांगळे, प्रवीण बर्दापूरकर, मीना गोखले, संजीवनी खेर, प्रताप थोरात, जगदीश मोरे, डॉ. रविन थत्ते या सर्वांनी अरुण साधूंवरच्या अपार प्रेमातून त्यांच्या आठवणी जागवल्या आहेत.

साधूसरांची नात तन्वी बॅनर्जी हिचे मूळ इंग्रजीतील काव्यमय पत्र तिच्या शैलीला धक्का लागू नये म्हणून आहे तसेच या विभागात समाविष्ट केले आहे.

कलावंताचे स्वातंत्र्य आणि सार्वभौमत्व हे साधूसरांना मान्यच होते पण समाजाशी बांधली गेलेली आपली नाळ त्यांनी कधीही तुटू दिली नाही. विशेषत: अस्वस्थ तरुणाईच्या मनातील अस्वस्थतेचा ते उद्गार झाले. गरिबीतही हतबल न होता चिवटपणे झगडत राहणाऱ्या अगणित मुलांची झुंज त्यांना फार मोठी वाटली. (झिपऱ्या)

निरागस मुलांचं बालपण करपून जाणं, पोटाची खळगी भरण्याकरता राबणारे बालकामगार, तरुणाईच्या स्वप्नांचे खच्चीकरण, मुलींचे कधी कोमजणे-कधी पार उध्वस्त होणे, राजकीय वातावरणातून-हस्तक्षेपातून आलेली अशांतता, मानसिक-भावनिक असुरक्षिततेतून जाणवणारे विलक्षण एकटेपण अशा अस्वस्थ कोलाहलात आपण सण-उत्सवांना सामोरे जात आहोत.

मानवी जीवन, समाज आणि अस्वस्थता यांचे एक घट्ट नाते असावे. काळाच्या वेगवेगळ्या टप्प्यावर या अस्वस्थतेचा उद्रेक झाला आणि त्यातूनच तिच्याशी टक्कर घेणारे वेगवेगळे उद्गारही उमटले.

'शब्द रुची' संपादनाच्या गेल्या दोन महिन्यांत फोनवरून बोलताना तीव्रपणे जाणवत राहिली ती साधूसरांची लेखनाविषयीची असोशी! दोनेक आठवड्यांपूर्वी दिवाळी अंकाच्या लेखाबाबत आम्ही बोललो आणि तो लिहून होत नाहीय, याबद्दल त्यांना जाणवणारी खंत मनाला स्पर्शून गेली. त्यांचा आवाज मला टक्क आठवतो आहे. मी त्यांना म्हटलं, "तुमचा आवाज मला अगदी छान वाटतोय आज..." ते उत्तरले, "माझ्या आवाजाला काय झालंय? तो तर आहेच."

किती यथार्थ होतं त्यांचं उत्तर. व्यवस्थेविरुद्ध लढण्याची, ती उलथवून द्यायची, ती बदलून टाकायची ताकद लेखकाच्या आवाजात असते म्हणून तो आवाज आहे आणि निरंतर राहील!

...'शब्द रुची' दिवाळी अंक साकार झाला तो सुहास बहुळकर, अरुण जोशी, प्रदीप म्हापसेकर, योगिता मोरे, अनिरुद्ध गद्रे, धनश्री धारप, हरिप्रसाद जयस्वाल, अभिजित शिंदे या आपल्या माणसांच्या पाठबळामुळे! हे नमूद केलेच पाहिजे. मासिके-नियतकालिके वाचकांच्या पुरेशा पाठिंब्याशिवाय निराधार होत आहेत. काळाच्या अशा टप्प्यावर 'शब्द रुची'वरचे आपले प्रेम असेच अखंड राहावे.

- डॉ. वीणा सानेकर
सी-१२, सुयोग सोसायटी,
संत ज्ञानेश्वर मार्ग, मुलुंड (पूर्व),
मुंबई-४०० ०८१
भ्रमणध्वनी : ९८१९३५८४५
veenasanekar1966@gmail.com

रौप्य महोत्सवी वर्ष

ऋतुरंग

## 'माझ्या मनातलं'

**(विशेषांक)**

वर्ष पंचविसावे । दिवाळी २०१७

**मुखपृष्ठ : गुलज़ार**

**संपादक : अरुण शेवते**




ऋतुरंग दिवाळी अंकाचे हे रौप्य महोत्सवी वर्ष आहे.
रौप्य महोत्सवी विशेषांक 'माझ्या मनातलं' हा आहे.

*आपलं मन नदीसारखं असतं.*
*ओढ्यासारखं खळखळाट करणारं असतं.*
*वाऱ्यासारखं चौफेर उधळणारं असतं.*
*आपलं मन तळ्यासारखं शांत असतं.*
*आणि वादळासारखं अशांतही असतं.*
*आपल्या मनात आपण काय साठवून ठेवलेले आहे*
*हे कधी आपलं आपल्यालाही कळत नसतं.*
*आयुष्य जगत असताना आपलं मन घडतं.*
*आणि सारं काही अनेक गोष्टी सांगूनही जातं.*
*व्यक्ती, घटना, संघर्ष, नातेसंबंध, सुखाच्या सावल्या,*
*वेदनेचे व्रण सारं काही मनात असतं.*
*मनाला हजार दरवाजे असतात.*
*कुठल्या दरवाजातून काय दिसेल*
*हे आपले आपल्यालाही उमगत नाही*
*आपलं मन, आपण उलगडायचं ठरवलं की*
*आठवणींचा पट डोळ्यासमोर येतो.*
*मन मनाला समजावताना, आधारही देत असतं.*
अनेक नामवंतांनी आपल्या मनातल्या
जगण्याचे संदर्भ पारदर्शीपणे मांडले आहेत.

या अंकात – **गुलज़ार, लता मंगेशकर, नितीन गडकरी, मनोहर पर्रीकर, संदीप वासलेकर, गिरीश कुबेर, निखिल वागळे, राजीव खांडेकर, उदय निरगुडकर, सुशीलकुमार शिंदे, बेगम परवीन सुलताना, कौशिकी चक्रवर्ती, डॉ. सदानंद मोरे, अंबरीश मिश्र, यशवंतराव गडाख, डॉ. पी. डी. पाटील, शशिकांत सावंत, श्रीकांत बोजेवार, सुदेश हिंगलासपुरकर, मुकेश माचकर, प्रशांत गडाख, मनोहर जाधव, किशोर कदम, पद्मभूषण देशपांडे, सचिन इटकर, हणमंतराव गायकवाड, अशोक कोठावळे, प्रगती बाणखेले, राजन गवस, प्रदीप म्हापसेकर, सतीश भावसार, अनिल सावळे, शुभदा चौकर, नितीन आरेकर, अंजली आंबेकर, सविता दामले, माधुरी शेवते, मनस्विनी प्रभुणे नायक, जयश्री देसाई, वसुंधरा काशीकर, किशोर मेढे आणि शुभांगी चेतन**

**मूल्य : २०० रुपये । पृष्ठसंख्या : २५०**


ऋतुरंग
प्रकाशन

संपर्क : **अरुण शेवते**
भ्रमणध्वनी : ९८९२४३८५७४ **अंक सर्व विक्रेत्यांकडे उपलब्ध.**
shevatearun@gmail.com

# पाळत

मिलिंद बोकील

**मी वाट बघत होते. सिग्नलला किंवा एरवीही सावध राहून आजूबाजूला बघत होते. पायी चालण्याचा फारसा प्रश्न नव्हता, पण कुठेही चालताना मागचा-पुढचा पूर्ण रस्ता डोळ्यांखालून घालत होते. मला माहीत होतं की त्यांना मला गाठायचं असलं तर ते पाळत ठेवून असतील.**



रविवारी सकाळी तो बाइकवाला मला पुन्हा एकदा दिसला.

खिडकीचा पडदा तसाच अर्धा ठेवून बघत राहिले. गणेश टी हाउसच्या दारात नेहमीप्रमाणे गर्दी होती. हे हॉटेल सकाळी सहालाच उघडते. तिथे गरम पोहे चांगले मिळतात. बाकी एवढ्या सगळ्या परिसरात इतक्या लवकर उघडणारे दुसरे हॉटेल नाही. ते चालवणारा आनंदा पहाटे पाचलाच येतो. शटर उघडतो आणि पहिल्यांदा पाटीत पोहे उपसून भिजायला ठेवतो. पूर्वी तो आमच्या बिल्डिंगमध्ये झाडूकाम करायला यायचा. बाबा त्याला तेव्हा म्हणायचे की हे काम करायच्याऐवजी काही तरी स्वतःचा धंदा बघ. नंतर समोर रस्त्याच्या कडेला टपऱ्या उभ्या राहिल्या तेव्हा सगळ्यात कडेची टपरी त्याने घेतली आणि चहा-पोह्यांचे हे हॉटेल सुरू केले. बाहेर तो पोह्यांची मोठी परात भरून ठेवतो. एका बाजूला चहाचे पातेले उकळत असते. आतल्या बाजूला बाकडी टाकलेली आहेत, पण बहुतेकवेळा लोक बाहेर उभे राहूनच खात असतात. कडेची जागा असल्याने गाड्या उभ्या करायला भरपूर जागा आहे. सकाळी रस्त्याला एवढी रहदारीही नसते.

ती बाइक मी ओळखली कारण तिच्या सीटला ते वाघाच्या कातड्याचं कव्हर होतं. दुसऱ्या मजल्यावरूनही ते स्पष्ट दिसलं. एरवी ती बाइक नेहमीसारखी काळ्या रंगाचीच होती. तो बाइकवाला आला तेव्हा त्याच्या डोक्याला हेल्मेट होतं. ते डोक्यावर ठेवूनच तो आत शिरला. एकदा का माणूस आत शिरला की मग तो दिसत नाही. आनंदानं बाहेर प्लॅस्टीकची निळी कनात लावलेली आहे, पण त्या कव्हरवरून मला कळलं की तो तोच होता ज्यानं कॉलेजच्या रस्त्यावर मला अडवलं होतं.

''मी येतो ग!'' बाबा बाहेर पडत दरवाजा ओढून घेत म्हणाले.

''हो.'' आई आतून म्हणाली.

बाबा शिरस्त्याप्रमाणे सकाळचे चालायला बाहेर पडले. रविवारी ते एकटेच जातात. एरवी नाथानीकाका त्यांच्या बरोबर असतात, पण रविवारी नाथानीकाकांना हॉस्पिटलमध्ये वेळी वाटायची ड्युटी असते. त्यामुळे त्या दिवशी ते येत नाहीत.

मी बाबांना फाटकातून बाहेर पडताना पाहिलं. त्यांचा रस्ता ठरलेला आहे. ते आता आमच्या कडेचा फुटपाथ न सोडता या रस्त्याने थेट प्रितम सर्कलपर्यंत जातील. नंतर तिथे उजवीकडे वळून सयाजी नाट्यगृहापर्यंत. तिथून मग नदीच्या कडेने शिवाजी पुलावर. पुलाच्या शेवटी सिद्धेश्वर मंदिराला वळसा घालून आल्या वाटेने परत. येताना मात्र दुसऱ्या फूटपाथवरून. सगळा मिळून पाच किलोमीटरचा फेरा होतो. बरोबर एका तासाचं चालणं होतं. सकाळी या रस्त्यांना रहदारी नसते आणि सबंध शहरात एवढ्याच भागात चांगले फुटपाथ बांधलेले आहेत.

खिडकीत जास्त वेळ उभं राहता आलं नाही. आईनं हाक मारली. ती आंघोळीला जात होती तेवढ्यात गॅसवर लक्ष ठेवायचं होतं, पण मी थोड्या वेळानं पुन्हा पडदा सारून पाहिलं. बाइकवाला हेल्मेट घालत गणेशमधून बाहेर आला. हेल्मेट पूर्ण डोकं झाकणारं होतं त्यामुळे चेहरा दिसला नाही, पण माझ्या लक्षात आलं की त्यानं किक मारण्यापूर्वी एकदा आमच्या खिडकीकडे पाहिलं. त्याला दिसलं काही नसणार कारण मी पडद्याच्या आड होते आणि खालून पाहिलं तर खिडकी सगळी काळोखीच दिसते.

मी नंतरच्या दोन्ही दिवशीही ती बाइक गणेशसमोर उभी असलेली पाहिली. बाइकवाला उतरताना पाहिला नाही. तो कदाचित आधीच आत जाऊन बसत असेल. नेहमीच्या वेळेला नाथानीकाका आले आणि बाबा ठरल्या वेळेला त्यांच्याबरोबर बाहेर पडले. बाबा जेव्हा दौऱ्यावर नसत तेव्हा त्यांचं हे नेहमीचं रुटिन होतं आणि दौऱ्यावरून बाबा रात्री कितीही उशिरा आले तरी सकाळी बरोबर या वेळेला बाहेर पडणार म्हणजे पडणारच. नाथानीकाकांना बाबांच्या सगळ्या दौऱ्यांची माहिती आईसारखीच असायची. त्यामुळे बाबा असले की ते अचूक हजर व्हायचेच.

त्या दोन्ही दिवशी मी पाहिलं की बाइकवाला जाताना आमच्या खिडकीकडे नजर टाकून गेला. मला वाटलं होतं की ज्याअर्थी तो मला सकाळी दिसला त्याअर्थी कॉलेजला जाताना दिसणारच. मी नेहमीप्रमाणे स्कूटी घेऊन गेले. सिग्नलला लक्ष ठेवून होते आणि नंतर कॉलेजच्या पार्कींगमध्येही आजूबाजूला पाहिलं, पण तिथे मला तो दिसला नाही. मग मी तो विचार मनातून झटकून टाकला. तशा कव्हरच्या बाइक्स तर पुष्कळांकडे असतील. तोच तो कशावरून?

छायाची ती घटना मी घरी कोणालाच सांगितली नव्हती.

छाया माझ्या वर्गात होती. कॉलेजच्या पहिल्या दिवशी आपल्या शेजारी बसलेल्या मुलीशी होते तशी तिची आणि माझी मैत्री झाली. तशी ती झाली म्हणूनच झाली, एरवी ती जमणं कठीण होतं. छायाची माझ्याशी जशी मैत्री झाली तशी सुरुवातीपासून वर्गातल्या मुलांशीही झाली. किंबहुना मुलांशीच जास्त झाली. ती वर्गात माझ्या बाकावर बसायची, पण वर्ग सुटल्यावर तिच्या मित्रांच्या घोळक्यातच असायची. राहायची लांब, शंकरनगरकडे. दोनदा बस बदलून यायची. घरची परिस्थिती साधारण. वडील एका ट्रान्सपोर्ट कंपनीत हिशेबाचे काम करायचे. आई स्वयंपाकाची कामं करायची. घरात ही सर्वात मोठी. एक लहान भाऊ आणि बहीण.

छायाचं अभ्यासात लक्ष नसायचं. तासांना दांड्या मारायची. जेवढा वेळ शक्य असेल तेवढा वेळ मित्रांसोबत कँटिनला नाही तर कॉलेजच्या आवारात बसलेली असायची. नंतर तिचं मित्रमंडळ

बदललं. ती वर्गातल्या मुलांसोबत बसेनाशी झाली. त्यांच्या निमित्ताने तिच्या इतरांशी ओळखी झाल्या होत्या. कॉलेजबाहेरच्या मुलांशी. तिच्या लक्षात आलं की वर्गातली मुलं काही कामाची नाहीत. ती लहान आणि बावळट आहेत. त्यांच्या खिशात पैसे नसतात. त्यांच्यापेक्षा ती कॉलेजबाहेरची मुलं सोईची होती. त्यांच्याकडे गाड्या होत्या, खिशात पैसे होते, मस्तवालपणा होता. ती मुलं छायासाठी कॉलेजमध्ये यायची. आवारात हसत खिदळत बसलेली असायची. छाया बहुतेकवेळा कॉलेज सुटायच्याअगोदरच त्यांच्यापैकी कोणाच्या तरी मागे बसून गायब व्हायची. मला ती त्यांच्यात बोलवायची. मी त्यांच्यात सामील व्हावं असा तिचा आग्रह असायचा. ते कॉलेजच्या आवारात बसलेले असायचे तेव्हा काही वेळा मी त्यांच्यात उभी राहिले, पण मुद्दाम जावं असं काही वाटलं नव्हतं.

पावसाळा संपत आला होता तेव्हा छाया एक दिवस मला म्हणाली की आम्ही घाटात फिरायला जाणार आहोत तर तू येतेस का? मी विचारलं, ''कोण कोण जाणार?'' तर ती म्हणाली की प्रकाश, रघू आणि राकेश. बाइकवरून जायचं. सकाळी जाऊन संध्याकाळी परत. मी काही उत्साह दाखवला नाही. ती आग्रह करायला लागली. मग म्हणाली, ''तू आलीस तरच मी जाईन. तू असलीस की मला सोबत होईल. शिवाय तू असलीस की मला सेफ वाटेल. चल तर एक दिवस.''

मी म्हटलं, ''येईन, पण कोणाच्या मागे बसणार नाही. मी माझी स्कूटी घेऊन येईन.'' ती म्हणाली, ''चालेल. मीसुद्धा तुझ्या मागे बसेन.'' तसे मग आम्ही गेलो. त्या तिघांमध्ये दोन बाइक्स होत्या. ती मुलं अगदीच अनोळखी नव्हती. कॉलेजमध्ये मी त्यांना पाहिलेलं होतं. स्वतंत्र गाड्या असल्याने वाटेत काही प्रश्न आला नाही. तिथे गेल्यावर पाचकळपणा करत होते, पण मला त्यांनी काही त्रास दिला नाही. पाऊस येत होता. त्यामुळे थोडेफार भिजलो. छायाची त्यातल्या प्रकाशबरोबर घट्ट मैत्री जमली होती बहुतेक. ते सारखे एकमेकांच्या अंगचटीला येत होते. नंतर परत येताना ती त्याच्याचमागे बसून आली.

छाया नंतरही आपल्या त्या मित्रांसोबत कुठे-कुठे जात राहिली. मला ती प्रत्येकवेळी बोलवायची, पण मी काही गेले नाही. तिचे मित्र बदलत राहायचे बहुतेक. पावसाळ्यात ज्यांच्याबरोबर गेलो, ते नंतर एकदोनदा कॉलेजमध्ये आले होते, पण त्या नंतर दिसले नाहीत. तसे ते कॉलेजमधले नव्हतेच. त्यामुळे परत भेट होण्याचा काही प्रश्न नव्हता.

नंतर सेमिस्टर परीक्षा झाली. त्या नंतर दिवाळीची सुट्टी. सुट्टीनंतर कॉलेज उघडलं. सुरुवातीला दोन दिवस छाया आली नव्हती. नंतर आली, पण आली ती तशी एकदम गप्पगप्पच. नेहमीसारखी मोकळीढाकळी, उत्साही नव्हती. कोणत्यातरी टेन्शनखाली असल्यासारखी. मी तिला विचारलं, 'काय झालं', तेव्हा ती 'काही नाही' म्हणाली, पण नंतर दुसऱ्या दिवशी म्हणाली की 'तास बुडव. मला तुला काही तरी सांगायचंय.'

मी तिच्यासाठी तास बुडवला. कॉलेजच्या आवारात कोणाला दिसणार नाही अशा बसलो. छायाने मग मला सगळी हकिकत सांगितली.

दिवाळीच्या सुट्टीत ती तिच्या मित्रांसोबत ट्रिपला गेली होती. ते ठिकाण लांब नव्हतं, पण तिथे एका हॉटेलात त्यांनी मुक्काम केला होता. ते चौघे जण होते, पण मुलगी ती एकटीच होती. ती आणि तिचा मित्र एका खोलीत राहिले. ते दुसरे दोघे मित्र दुसऱ्या खोलीत. तिला त्यावेळी काही कळलं नाही, पण त्या दुसऱ्या दोघांनी तिचं आणि तिच्या मित्राचं रात्री व्हिडिओ शूटिंग केलं. परत आल्यावर ते तिला म्हणायला लागले की ती त्यांच्या सोबत झोपली नाही तर सोशल मिडियावर त्या क्लिप्स टाकू म्हणून.

ते सांगता-सांगताच ती रडायला लागली होती. सांगून झाल्यावर म्हणाली, ''सांग, आता मी काय करू?''

मी काही वेळ विचार केला. मग तिला म्हणाले की आपण सुनंदाताईंकडे जाऊ. त्या माझ्या बाबांना तर चांगल्या ओळखतातच शिवाय त्यांचं महिला केंद्र आहे आणि अशा प्रकारच्या केसेसमध्ये त्याच मदत करू शकतील.

आधी ती नाहीच म्हणत होती, पण पुष्कळ वेळ समजावल्यावर तयार झाली.

आम्ही सुनंदाताईंकडे गेलो. त्यांना सगळी हकिकत सांगितली.

त्यांना बहुतेक अशा केसेस ऐकण्याची सवय होती. त्यांनी शांतपणे सगळं ऐकून घेतलं. मग त्या म्हणाल्या, ''काही घाबरू नकोस. मात्र आपल्याला पोलिसांत जावंच लागेल. पोलिसांनी दरडावलं की मगच ती मुलं सरळ येतील.''

छाया त्याला तयार नव्हती. ती पोलिसांत जायला तर भित होतीच पण ही गोष्ट सगळ्यांना कळेल अशीही तिला भीती वाटत होती. तेव्हा सुनंदाताई तिला म्हणाल्या की 'तू जरा नीट विचार कर आणि परत ये.'

मी निघताना त्यांना म्हणाले की 'मी बाबांना अजून काही सांगितलेलं नाही, पण आता तुम्हांला सांगितलेलं आहे तर त्यांना काही सांगत नाही कारण एरवीही त्यांनी तुम्हांलाच भेटायला सांगितलं असतं.' त्यावर त्या म्हणाल्या की 'ठीक आहे. आपण करू तिला मदत.'

मी छायाला समजावून सांगितलं की 'पोलिसांची मदत घेतल्याशिवाय अशा प्रकरणांचा बंदोबस्त होत नाही आणि सुनंदाताई आपल्यासोबत असतील तर पोलीस नीट मदत करतील', पण छायानं ते ऐकलं नाही. त्यानंतर ती एखाद दोन दिवस कॉलेजात आली आणि नंतर अचानक गायबच झाली. कित्येक दिवस तिचा काही पत्ताच नव्हता. नंतर मग मला तिचा एक एसएमएस आला की ती आमचं गाव सोडून मामाकडे गेली आहे.

मी सुनंदाताईंना जाऊन ते सांगितलं. त्या म्हणाल्या की 'ते असंच असतं. तिच्या घरच्यांनीच तिला असं लांब नेऊन ठेवलं असेल. उगाच जीव वगैरे देण्यापेक्षा हे ठीक आहे.'

काही दिवसानंतर अचानक कॉलेजच्या रस्त्यावर मला दोन मुलांनी बाइक आडवी घालून अडवलं. ''छाया कुठंय?'' ते म्हणाले. त्यातल्या एकाच्या डोक्यावर हेल्मेट होतं तर दुसऱ्यानं रुमालानं डोकं झाकलेलं होतं.

मी माहीत नाही म्हणून सांगितलं.

''दोन दिवसांत तिची माहिती काढून ठेव. नाही तर आमच्याशी गाठ आहे.'' ते म्हणाले आणि निघून गेले.

ते सगळं इतकं झटक्यात झालं की मला विचार करायला सवड मिळाली नाही. मी घरी लगेच काही बोलले नाही. सावध राहून पुढे काय होतंय ते पाहायचं ठरवलं.

दोन-चार दिवस गेल्यानंतर पुन्हा ती दोघं मला आडवी आली. तशीच. एक जण हेल्मेट घालून, एक रुमाल बांधून.

''मिळाला का पत्ता?'' हेल्मेटवाल्यानं विचारलं.

''तू कोण मला विचारणार?'' मी म्हणाले. ''ते हेल्मेट काढ डोक्यावरचं.''

''ए जास्त शाणी बनू नको हां!'' रुमालवाला म्हणाला, ''बऱ्या बोलानं तिचा पत्ता शोधून दे. नाही तर हे बघ, ॲशीड टाकीन तोंडावर'' आणि त्यानं जर्किनच्या वरच्या खिशातून एक चपटी बाटली काढून दाखवली. ती पाहताक्षणीच मी स्कूटी एकदम बाजूला घेतली. नंतर मी जोरात ओरडणार तेवढ्यात बाइकचा आवाज करत ते दोघे नाहीसे झाले.

मी काही वेळ तिथेच थरथरत उभी राहिले. मग मला त्यांची प्रचंड चीड आली. भीती वाटली नाही, हातात काही तरी घेऊन त्यांना फेकून मारावंसं वाटलं.

त्यावेळी बाबा नेमके दौऱ्यावर गेलेले होते. मी आईला काही बोलले नाही. एकदा वाटलं होतं की सुनंदाताईंना जाऊन सांगावं, पण म्हटलं की त्या पोलिसांकडेच जाऊ म्हणतील. तिथे जायला हरकत नव्हती, पण त्या पोरांना मी ओळखत नव्हते. पोलीस हेच म्हटले असते की ओळखत नाही तर काय करणार? लक्ष ठेवून राहा आणि आम्हांला सांगा. तेव्हा मला आठवलं की त्या बाइकच्या सीटला वाघाच्या कातड्याचं कव्हर होतं, हेल्मेट काळं असावं बहुतेक. डोकं पूर्ण झाकणारं होतं. त्या दोघांच्याही अंगावर तेव्हा तरी जर्किन होते. बाकी त्यांचे चेहरे काहीच दिसलेले नव्हते.

मी सावध राहायचं ठरवलं. पूर्वी मी स्कूटीवर जाताना चेहरा झाकत नसे, पण आता पूर्ण स्कार्फ बांधून घ्यायला लागले, पण नंतर पुढे काहीच झालं नाही.

मी वाट बघत होते. सिग्नलला किंवा एरवीही सावध राहून आजूबाजूला बघत होते. पायी चालण्याचा फारसा प्रश्न नव्हता, पण कुठेही चालताना मागचा-पुढचा पूर्ण रस्ता डोळ्यांखालून घालत होते. मला माहीत होतं की त्यांना मला गाठायचं असलं तर ते पाळत ठेवून असतील. कॉलेजच्या गेटजवळ घुटमळतील, पण ते पुन्हा कधी दिसले नाहीत.

बाबांचा दौरा पुष्कळ लांबला. ते चंदीगड, लुधियाना, अमृतसर असे कुठे कुठे गेले होते. तिथल्या त्या तर्कशील सोसायटीनं त्यांची भाषणं ठेवलेली होती. ते परत आले तेव्हा महिना उलटून गेला होता. नंतर त्यांचं ते अभियान सुरू झालं. ते सकाळी लवकर जायचे आणि उशिरा परत यायचे. रात्री जेवतानाही गाठ पडायची नाही. मग मी त्यांना काही बोलले नाही. माझ्या लक्षात आलं होतं की ती पोरं पोकळ धमकी देऊन गेलीत. त्यांच्याकडे लक्ष द्यायचं कारण नाही.

पुढे काहीच झालं नाही. छायाचा तर काही संपर्क नव्हताच.

आणि आता अचानक तो बाइकवाला नजरेला पडू लागला.

मला एकदा वाटलं की बाबांना सांगावं. ते नेहमी म्हणायचे की कोणतीही गोष्ट कधीही झाकून ठेवू नये. सत्य हे खुलेपणात असतं म्हणून कोणतीही गोष्ट कितीही लहान असली तरी कधी लपवून ठेवायची नाही, पण सांगायचं काय हा प्रश्न होता. तो बाइकवाला सकाळी दिसला तरी त्यानं मला वाटेत वगैरे अडवलं नव्हतं. तसं परत झालं तर बाबांना सांगायचं असं मी ठरवून ठेवलं.

रोज सकाळी हळूच पडदा सारून गणेश टी हाऊसकडे मात्र मी नजर टाकत होते.

त्या दिवशीही असंच झालं. रविवार होता. बाबा बाहेर पडल्यावर मी पाहिलं, पण मला तो बाइकवाला दिसला नाही.

मी माझं आवरायला लागले.

आई आंघोळीला जायच्या तयारीत होती. तेवढ्यात फोन वाजला.

''मी इन्स्पेक्टर माने बोलतोय.'' पलीकडचा आवाज म्हणाला. मग त्यांनी हा आमच्याच घरचा फोन नंबर आहे का ते विचारलं. मी 'हो' म्हटल्यावर त्यांनी कोण बोलतंय म्हणून विचारलं. मी माझं नाव सांगितल्यावर त्यांनी आई घरात आहे का म्हणून विचारलं. मी 'हो' म्हणाले.

''तुम्ही दोघीही जशाच्या तशा निघून शिवाजी पुलावर या.'' ते म्हणाले. ''ताबडतोब.''

''कशाला पण? काय झालंय?'' मी विचारलं.

''ते इथे आल्यावर सांगतो. ताबडतोब या.'' ते म्हणाले आणि फोन बंद झाला.

मी आणि आई रिक्षा करून धावतच तिथे पोहोचलो.

तिथे गेल्यावर माझ्या लक्षात आलं की तो बाइकवाला माझ्यासाठी येत नव्हता.

**– मिलिंद बोकील**

# तुरतुरी

**अशोक कौतिक-कोळी**

**देनेदारांची रीघ  लागलेली होती दारापुढे... सगळेच हंगामाच्या बोलीवर ताटकळत असलेले... तुरी रांगेत उभ्या केल्यापासून टोकदार झालेल्या भावना सगळ्यांच्याच...जो तो आंगावर चाल करून येत होता...नागवा, उघडा करून जात होता... सर्वांसमक्ष नागवला जात होता मुकुंदा...**



परमिलाताई यून गेली त्यादिसापासून मुकुंदा हिरमुसला होता. कशानं काय करा, काही काही उमजत नव्हतं त्याला. मुगामुगा बसला होता. कोणाशी बोलत नव्हता की हालचाल करत नव्हता. त्याच्या स्वत:च्या क्रिया मंदावल्या होत्या. कशानं काय झालं कान्नू नवऱ्याला? याबाबत सुनंदा घाबरली होती. त्याला विचारत होती,

''काय झालं तुम्हाला? बरं वाटत नही का? का कशाची काळजी करून राहाते? तुरीची चिंता लागून राहाली तुम्हाले का पोरीच्या लग्नाची?'' दोन्ही बी प्रश्न सुटणार होते त्यांचे आता थोड्याच दिवसात. तूर तर नंबरावर उभी होती. झालं, शैलाची जोडगाठ तवढारच मारल्या जाणार होती. तशानं तसा, शैलाच्या लग्नाचा प्रस्तावच घेऊन आलेली होती परमिलाताई!

वास्तविक तिने समस्या सोडवण्याच्या दृष्टीने हात पुढे केला होता. तिच्या प्रस्तावाने मुकुंदाचा मोठाच प्रश्न सुटणार होता. तरी बी काहून नाराज झाला होता मंग मुकुंदा?

त्याचं आसं व्हतं! बहिणीसमोर त्याची बेइज्जती झाली होती. बँकेवाल्यानं वसुलीसाठी जप्ती आणली होती. त्याबाबत विचारलं होतं सुनंदानं तर तो काहीही बोलत नव्हता. प्रतिसाद देत नव्हता.

परमिलाताईच बोलली होती स्वत:, ''मी कोन्हाजवळ सांगणार नही. हाटकून करतात हे मेल्हे आशे! शेतकऱ्याची अब्रू वेशीवर टांगण्याचा प्रयत्न करतात. त्यांना चांगलं माहीत राहातं. शेतकरी मान, अपमान, काबाडकष्टाले कधीही घाबरत नही!

तो घाबरतो फक्त इज्जतीला! घराच्या बाहेर आपली इज्जत जायला नको. आपला स्वाभिमान गहान पडायला नको. आपल्या इज्जतीवर कोन्ही हात टाकता कामा नये. यासाठी तो, जपत असतो. मान-अपमान सहन करत असतो. मुकुंदाचं जगनं नेमकं अशानं अशा घटनेनं हादरून गेलं होतं. कोणीतरी त्याची नेमकी दुखरी नस दाबली होती, ज्यामुळे तो हैराण झाला होता. काय करावं आन् काय करू नये, याबाबतीतलं काहीही सुचत नव्हतं त्याला. सुचनारच नव्हतं! पंचनामाच तेवढा झाला होता इज्जतीचा... ग्रामसेवकानं नळ बंद करण्याची धमकी दिली होती. पाठोपाठ बँकेवाल्यान्हं जप्ती आनली व्हती. घरातले भांडे, संसारोपयोगी वस्तू, आवडता रेडू सम्दं घराबाहेर काढलं होतं त्यांनी. गावभर शोभा वाढवत जप्ती करून नेल्या होत्या. ह्या घटनेनं मुकुंदा पुरता हादरला होता.

खरंतर तो ग्रामसेवकाला जाब विचारायला येणार होता घरी. त्याअगोदर बँकेवाल्यांनी डाव साधला होता. बँकवाल्यांच्या एकेकाच्या नरडीचा घोट घ्यावासा वाटत होता त्याला. मात्र परमिलाताई घरी येऊन पडलेली होती. ह्याबाबतीत नशीबवान निघाले होते बँकेवाले. नाहीतर एखाद्याचा मुडदाच पाडला असता मुकुंदाने. अंगार ओकला होता त्याने. स्वत:च्या हातापायांच्या मुठी वळत्या करून घ्याव्या लागल्या होत्या.

परमिलाताईमुळे वाचले होते बँकवाले. मुकुंदा मातर धुमतसच होता. काही केल्या तो शांत होत नव्हता, पण मंग करणार बी काय होता? कशानं काय होतं त्याच्या हातात? काहीही करू शकत नव्हता. सहन करून घेत होता. सहन करण्यापलीकडला होता वास्तविक सगळा प्रकार... म्हणून मुकुंदा जास्तच हिरमुसला होता. अपमानाची परिसीमा झाली होती.

इज्जतीची बेइज्जती झाली होती. साऱ्या गावात थूऽ थूऽ झाली होती. ह्या गोष्टीचा परिणाम मुकुंदाच्या मनावर खोलवर झाला होता. घाव काळजापर्यंत पोहचला होता. त्यामुळे जास्तच घायाळ, अर्धमेला झालेला होता. अंगातलं त्राण निघून गेलं होतं. जेवढा रागसंताप होता तेवढा गिळून घ्यावा लागला होता. राग, अपमान, बेइज्जतीचं विष शरीरभर पसरून गेलं होतं त्याच्या. फार मोठी हार पत्करावी लागली होती.

झालेली हार, अपमान पचवायला जड जात होता. मुकुंदा अशानं असा बसला होता. खरं तर घरच्यांनीच होता बसवला त्याला असा. कुठेही बाहेर जावू दिला नव्हता. कोणाशीही डोकं लावू नको म्हणून जतावला होता. त्यात तो जास्तच हादरून गेला होता. कशानं कसं व्यक्त व्हावं हे नव्हतं कळत त्याला. विचार करण्याची शक्तीच खुंटली होती. म्हणून मंग गुमसूम बसला होता.

बाहेर जायचं होतं त्याला, पन घरचे जाऊ देत नव्हते. विडी ओढावीशी वाटत होती किंवा शेर-पावशेर रिचवून तरी घ्यावी, पन घरात बसून यापैकी काहीही नव्हतं करता येत. बाहेर जावून भीक मागली असती पन मनाची धग थांबवली असती. निल्यागिल्या बी नि तरफडत अशा वक्तावर! तोच आपली तलफ भागवू शकतो. तहलकी कमी करू शकतो. पण तो कसा काय इन आपल्या घरी?

निलेशला गेल्या वेळेसच खडीचोट जतावलेला होता मुकुंदाच्या घरच्यांनी! मुकुंदालाही सांगितलेलं होतं त्याच्याबरोबर राहायचं नि आसं! त्यामुळे ते एकमेकाला टाळत होते. वास्तविक निलेशचा बेदरकारपणा आवडत होता मुकुंदाला. त्याच्या काही गोष्टी शिकण्यासारख्या होत्या. सरकारच्या धोरणांबाबत तो एकदम सजग राहत होता. म्हणजे घेतलेले कर्ज केव्हा फेडायचं नाही, का फेडायचं नाही, याबाबतला अंदाज घेत त्याने मुलांना स्वत:चे दुकान होते टाकून दिले.

निलेशच्या मुलांचे दुकानं पाहिल्यापासून हेवा वाटू लागला होता

मुकुंदाला. आपल्या मुलासाठीही सायकलचं दुकान टाकून द्यायचा विचार पक्का केला होता. फरक एवढाच होता निलेशने सरकारचे कर्ज फेडण्याऐवजी त्या पैशांतून मुलांना दुकान टाकून दिले होते आन् मुकुंदा तुरी विकण्याची वाट पहात होता. तुरीच्या भरवशावर त्याची अशी फसली होती.

तुरी विकल्या जात नव्हत्या हे एक आन् दुसरं म्हणजे त्या अपमानाचं कारण बनत होत्या. आत्ताचा झालेला अपमान फारच जिव्हारी लागला होता त्याच्या. एवढा की जिवाचं काही बरंवाईट करून घ्यावं, आसं वाटत होतं!

विष पिवून प्यावं घटाघटा डबं भरून किंवा गळफास तरी आवळावा... मात्र ह्यापैकी काही एक नव्हतं करता येत. घरचे मंडळी दबा धरून होते बसलेले त्याच्याभोवती. फेर धरून होते बसत. मनातलं काढण्याचा प्रयत्न होते करत त्याच्या. चहा, जेवण देत होते त्याला वेळोवेळी...मात्र त्यालाही नव्हता शिवत. बहिन परमिला होती तोपर्यंत तरी चांगला राहाला होता. मनाचा घाव दाखवला नव्हता.

परमिलाताई गेल्यापासून जास्तच अबोला धरला होता. नेमकी ह्या गोष्टीची सुनंदाला भीती वाटत होती. आपला नवरा निराशेच्या गर्तेत सापडायला नको. काही करून त्याच्या मनाची उभारी वाढवण्याच्या प्रयत्नांत होती ते. त्याला आवडीचं जेवन करून देत होती. तरी तो खात नव्हता. मनात काय सुरू आहे सांगत नव्हता. तिला माहीत होती त्याच्या मनाची उलघाल. अशावेळी एकांत हवा वाटत होता त्याला.

शेताच्या बांदावर जावून बसावंसं वाटत होतं. ही गोष्ट फक्त सुनंदाला माहीत होती, समजत होती, पण आत्ता तसं करू देणार नव्हतं त्याला कोणी. तसं म्हटलं तर घराच्या बाहेर पडायला बंदी होती त्याला. तशानं तसा एकांत घरातच अनुभवत होता. ही गोष्ट सुनंदाला समजत होती. अशावेळेला एकांत आणि एकांतात विडी ओढावीशी वाटते त्याला. जेणेकरून मनावरचा ताण कमी होण्यास मदत होते. काळजीचे ढग दूर सारण्यास मदत होते.

आपला नवरा बोलत नाही, काही सांगत नाही. त्याच्या मनातला धूर अशानं असा तरी दूर व्हावा, आसं वाटत होतं सुनंदाला. नाहीतर कोंडमारा वाढतच जाईल त्याचा. त्यातून काही बरंवाईट घडू नये. वाईट वंगाळ दिवस येवू नयेत आपल्या नशिबी. काय पाठीमागे लागला देव बी आपल्या! दोन दिवस सुखानं जगू देत नाही. सुखासमाधानाचे दिवस नसतातच का शेतकऱ्याच्या आयुष्यात? का पिकाच्या अंकुरासोबत ते बी जळून जातात?

शेतकऱ्याची स्वप्न फुलून येतच नाहीत का कधी? अशा विचारानं चिंतातुरहून जात होती सुनंदा. तिला कोणत्याही परिस्थितीत नवऱ्याला वाचवायचा होता. त्याच्या संदर्भातला कोणताही धोका पत्करायला ती तयार नव्हती. प्रसंगी त्याला विडी ओढायलाही परवानगी दिली होती तिने. निलेशसोबत जायला हरकत दर्शवली नव्हती. कसाही करून तो ह्या अवस्थेतून बाहेर निघायला हवा होता. उभा राहायला हवा होता. त्याचं मौन तोडनं महत्त्वाचं होतं तिच्यासाठी.

निदान निलेशने तरी यावं आपल्या घरी. अवचित आला तरी बोलणार नाही त्याला कोणी. असा विचार होती करत. आपल्या परीने मुकुंदाला समजवत होती. बाहेर गेल्यावर काही बरंवाईट करून घेईल जिवाचं किंवा एखाद्याचा जीवही घेऊ शकत होता तो. म्हणून बाहेर जाऊ नव्हती देत त्याला. घरातल्या घरात समजवत होती. महत् प्रयत्नांनी तो बोलू लागला होता,

''आसं कऱ्याले पायझे नव्हतं सायेब लोकांन्हं...''

''जावू दया न् तुम्ही! काय त्येस धरून बसले.''

''कसं काय जावू देती? घरी माणूस नसतांना घरात घुसलेच कशे त्ये...''

''एखटे नव्हते काही त्ये! भली गर्दी व्हती त्येंच्या सोबत. पुऱ्या गल्लीसमोर भांडे काढले त्येंन्हं...''

''हेच म्हन्याच हाये न् मंग मल्हे! काही गरज व्हती का त्येंल्हे आपल्या घरावर जप्ती आन्याची...''

''वऱ्हून आशिन त्येंल्हे काही तसं!''

''वऱ्हून तं सरकार शेतकऱ्यांसाठी आनुदान दयून राहालं... सवलती जाहीर करून राहालं... शेतकरी वाचला पाहिजे, आसं सरकारचं धोरण हाये.''

''काहून वागले आसतीन मंग बँकेवाले आसं?''

''बरं! आपल्यालाच घरावर जप्ती आनली न् त्येंन्हं! आपनच कर्जदार हायती का फक्तं?''

खरा होता मुकुंदाचा प्रश्न. बँकेवाल्यांनी घरावर जप्ती आनली ह्यामुळे मुकुंदा दुःखी होताच, त्यापेक्षा जास्त दुःख फक्त आपल्याच घरावर जप्ती आनल्याचं होतं. ह्या कारणानं जास्तीचा दुखावला गेला होता तो. साहेब लोकांना मारून उपयोग नव्हता हे त्याच्याही लक्षात आलं होतं. सल वेगळ्या ठिकाणी होती आणि ती सळसळ करत होती.

दुखनं वाढून गेलेलं होतं सद्याच्याला. ठणक सारखी वाढत चालली होती. गावातले इतर उधारीवाले बी जोरा मारायला लागले होते. वर्षानुवर्षीचे संबंध असलेले उधारीवाले बोलायला लागले होते. उतरून बोलत होते. घरापर्यंत पोहचत होते. आसं कधी नव्हतं घडलेलं आत्तापर्यंत! ह्यावर्षीचा अनुभव मात्र वेगळा येत होता. त्यामुळे मुकुंदा जास्त हैरान होता. अशानं अशा विचारात गढून गेला होता.

नवऱ्याचं दुखनं कळून आलं होतं सुनंदाला. तो जास्तच खोल डोहात उडी मारून पाहात होता. अशा डोहात की ज्याचं तळ खूप खोल होतं, शिवाय आतमध्ये चक्वा होता. एकदा आत गेलेला इसम

परत येऊ शकत नव्हता. अनेकांचे सापळे त्या डोहात गळप झालेले होते. आपल्या नवऱ्याचं आसं काही व्हायला नको, आसं तिला वाटत होतं. त्यासाठी धडपडत होती. तो, बोलता झाला हे बरं झालं होतं. निदान त्याच्या मनाचा अंदाज तरी येकून गेला होता. त्यादृष्टीनं कामाला लागली होती मंग सुनंदा. त्याला वेगळ्या विषयाकडे आकृष्ट करू लागली होती. विषयाला कलाटणी देत बोलली होती,

''काय करता मंग...''

''कशाचं?''

''शैलाच्या लग्नाचं!''

''......''

अशानं असा गप हून गेला होता पुन्हा! शैलाचं लगन हा मोठा प्रश्न होता. कसं करायचं शैलाचं लगन?

तसा तर अगदीच सोपा झाला होता आत्ता हा प्रश्न. पहिला मुद्दा, स्थळाचा प्रश्न मिटला होता. बहिणीच्याच घरचं सुस्थितीतील, व्यवस्थित नोकरीवालं स्थळ मिळालं होतं. असा योग क्वचितच जुळून येतो. तशी तर शैलाच्या लग्नाची चिंता होतीच त्यांना.

हंगाम चांगला जमून आला आहे ह्यावर्षी तर त्यात शैलाच्या लग्नाचा बार उडवून टाकायला हवा, असा एक विचारप्रवाह होताच घरातून कार्यरत. त्याला ह्यानिमित्ताने चालना मिळाली होती. परमिलाताईने स्वत:हून शैलाची मागणी घातली होती.

नोकरीवाला मुलगा तोही नात्यातला! पाहिलेला देखलेला, स्वभावाने अनुभवलेला! परस्थिती घरदार सगळं काही व्यवस्थित होतं. बहिणीच्याच घरी मुलगी नांदायला जाणार होती. एवढं सगळं असल्यावर मुकुंदा नाराज का होतो? का म्हणून गप्पगार झाला होता?

शैलाच्या लग्नाचा विषय तसा तर मुकुंदालाही आवडलेला होता. तसं जर झालं तर सोन्याहून पिवळं होणार होतं त्याच्या दृष्टीनं. मग विचारात का पडला होता तो?

त्याचं मुख्य कारण होतं, शैलाचं लगन करायच कसं? शैलाच्या लग्नाचा विषय हा नंतर उद्‌भवलेला होता त्याच्यापुढे. अगोदरचे बरेच विषय होते. देनेदारांची रीघ लागलेली होती दारापुढे... सगळेच हंगामाच्या बोलीवर ताटकळत असलेले... तुरी रांगेत उभ्या केल्यापासून टोकदार झालेल्या भावना सगळ्यांच्याच...जो तो आंगावर चाल करून येत होता...नागवा, उघडा करून जात होता... सर्वांसमक्ष नागवला जात होता मुकुंदा.

देणेदारांच्या अशानं अशा कारनाम्यांनी वैतागलेला पुरता मुकुंदा. सुखाचे दोन घास पोटात जात नव्हते त्याच्या. एक दिवस सुखाचा जात नव्हता. इकडून तिकडून तूर विक्रीचा प्रश्न सुटला होता. त्यातून पुढे मुलीच्या लग्नाचा प्रश्न उभा राहिला होता. मुलीचं लग्न करायला उत्सुक होताच तो; फक्त ते कसं करायचं हा त्याच्यापुढचा प्रश्न होता.

म्हणजे देणेदारांची देणी द्यायची का मुलीचं लग्न करायच? देणेदार टपून बसलेले होते. लचके तोडायला तय्यारच होते. तय्यार काय आत्ताशा हात टाकायला सुरुवात करून टाकलेली होती त्यांनी. भर रस्त्यात इज्जतीचा पंचनामा सुरू केलेला होता. अशा अवस्थेत मुलीचं लग्न कसं करायचं? हा प्रश्न होता. म्हणून तो शांत झाला होता.

पन त्याचं शांत बसनं परवडनारं नव्हतं. काही करून सुनंदाला त्याला बोलतं करायचं होतं. जिवघेण्या काळ्या डोहाच्या काठावरून परत आणायचं होतं. त्याला पुन्हा मागे ओढत बोलली होती,

''कसं करता मंग?''

''कशाचं?''

''शैलाच्या लग्नाचं...''

''तोच तं इच्यार करून राहालो मी...''

''इच्यार कऱ्याचं काय हाये तिच्यात! एवढा काय इच्यार करून राहाते तुम्ही...''

''काय करती मंग-इच्यार नही करती तं...''

''बहिनच्या घरी पोर दयाले एवढा इच्यार करना पडतो का?''

सुनंदाला वाटत होतं, ''याचा नकार हाये का काय परमिलाताईच्या घरी लेक द्याले. काहून मंग हा एवढा विचार करून राहाला?''

''ताईनं काही जोरा नि केल्हा आपल्यावर...''

''जोरा नि केल्हा, पन वझं तं टाकलं!''

''येल्हे वझं म्हणता कां? उलट वझं हालकं करून राहाल्या आपल्यावरचं त्या!''

त्याच्या दृष्टीनं ओझंच होत मुलीचं लग्न म्हणजे. तेही ताकदच्या मानाने न उचलता येणारं...अगोदरच्या कर्जदारांची ताकद वाढून गेलेली होती. त्यांच्याशी तोंड देता-देता त्याच्या नाकी नऊ आलेले होते. त्यात पुन्हा ही भर पडली होती. एकमेव तुरीच्या भरवशावर ह्या सगळ्या गोष्टी चालल्या होत्या. तुरी बाजारात गेल्या आणि देणेदारांची रीघ वाढली होती. एकामागून एक हल्ला चालवलेला त्यांनी मानहानीचा. त्यांच्याशी लढता-लढता मुकुंदा पूर्ण खचला, पिचला, नाडला, गाडला, नागवला जात होता. तो स्वत: खचला होता आणि संसारही उघड्यावर आला होता. त्यात पुन्हा ही नवी भर!

परमिलाताई बी तुरी बाजारात नेल्या म्हणून आली इतर देनेदारांसारखीच, अशानं असा समज होता त्याचा झाला. तो, दूर करत सुनंदा बोलली होती,

''तुरी बाजारात नेल्ह्या म्हणूनच आल्या परमिलाताई! पन एवढीच गोष्ट बरोबर नाही फक्त.''

''काय हाये तं मंग पुढचं?''

''मुलाचं लग्न कोणत्याही परिस्थितीत करायचं आहे त्यांना.

ते काही आपल्यासाठी थांबू शकत नही.''

''मंग?''

''आपन्हं नही सांगलं तं त्ये दुसरं स्थळ शोधतीन...''

''आसं व्हयाले नको! एवढं चांगलं स्थळ आपल्या हातून जायाले नको!''

''हाव रे भाऊ! बरोबर बोल्ला तू... नेंभन गोठमाठ कर भाऊ आन् हे स्थळ हातचं जावू नको देयू!''

आई यशोदाबाईनं बी हीच तळी उचलली होती. खरं तर त्यांच्या दोघा नवराबायकोमंधे नव्हती बोलणार ते, पण विषयच तसा काही होता. एकुलती एक नात होती शैला तिची. आपल्या नातीचं भलं व्हावं आसं तिला वाटत होतं. त्यासाठी चांगल्या स्थळाच्या शोधात होती. अनायासे परमिलाचा आणि तिचा विषय निघाला होता.

अगोदर नाराजी होती त्यांची, परमिलाच्या घरी शैलाला देन्याबाबत, पन आत्ता निर्णय बदलला होता. बदलणारच होता. संजय नोकरीवर जो लागला होता. नोकरीच्या अगोदर नाही म्हणत होते ते, त्याला मुलगी द्यायला. शैलाही नाही म्हणत होती लग्न करायला. पुढचं शिक्षण घ्यायचं होतं तिला. स्वत:च्या पायावर उभं राहायचं होतं.

परमिलाताई आल्यापासून तिचाही निर्णय बदलून गेला होता. नोकरीवाला नवरा मिळतोय, तो सुद्धा नात्यातला, ओळखीचा, थोडा-थोडा प्रेमाचा... हा प्रेमाचा अंकुर अजून फुलून आला होता. तसा संजय अगोदरपासून तिच्यावर मरत होता. त्यांची सगळ्यांचीच तिला सून म्हणून स्वीकारण्याची तयारी होती.

''बहीन, आपला होकार-नकार घ्याले आल्ती बरं भोऽ काय सांग्याचं ते सांगून द्या तिल्हे.'' यशोदाबाई.

''ताईनं तं पेच टाकला आपल्यापुढे...''

''कसा?''

''लगेस लग्नाचं पाहून काढलं तिन्हं; जरा थांबली असती यंदाच्या साल...''

''तिच्या हाताची गोष्ट नही भावू त्ये. तिन्हं खरी गोठ दाखाडली आपल्याले. मुलगा नोकरीवर चढला... खानावळचं जेवन पचत नही... त्यामुळे त्येल्हे कोणत्याही परिस्थितीत संजयचं लग्न करून देनं हाये. उगस मीन्हं गोठ लावून धरेल व्हती तिच्याजो म्हणून ते आपल्यालोंग आली...''

''हाव न! त्येंच्हं काय... नोकरीवाला मुलगा असल्यानं सतरा पयतीन त्येंच्या मांघी... आपन्हं नही सांगू दया फक्त.''

''महे ताईच्या घरी पोर दयाले नही नही...''

''मंग?''

''लगन कसं करा हा मह्या पुढचा पेच हाये!''

खरं होतं मुकुंदाचं म्हणणं! मोठाच पेच उभा राहाला होता त्यांच्यासमोर. परमिलाताईनं एक पेच उभा केला होता; दुसरा देणेदारांनी! अगोदरचा देणेदारांचा पेच होता. तो, सोडवायची मुकुंदाची मानसिकता होती. त्यासाठीची जुळवाजुळव त्याची चाललेली होती. वारंवार घेणारी मानहानी पचवण्यापेक्षा एकदाचा खोकला मोडून टाकायचा होता त्याला. गेल्या वर्षापासूनच अशानं अशा तयारीत होता तो. तेवढ्यासाठीच तर बंडू शेठच्या कचाट्यात सापडलेला नव्हता. बीजं, खत-मटरेल-औषधी कशानं काही नव्हतं घेतलेलं त्याच्याकडून. ना मजुरीसाठी उचल उचलली होती. म्हणून तर त्याची तूर बाजार समितीपर्यंत पोहचली होती. जर का हंगामाच्या सुरुवातीलाच बंडूशेठकडून उचल, उधारी करून ठिवली असती तर खळ्यावरूनच तूर त्याच्या काट्यावर पोहचली असती. तुरीसोबतच मुकुंदाच्या घरादाराच्या इच्छा-आकांक्षा बंडूशेठच्या काट्यावर मोजल्या जाऊन गोडाऊनमंधी सडत पडल्या असत्या. आसं होऊ द्यायचं नव्हतं त्याला. इतर शेतकऱ्यांसारखं बंडूशेठच्या कचाट्यात सापडायचं नव्हतं. म्हणून तर स्वत:चे स्वतंत्र निर्णय घेतलेले होते त्याने ह्यावर्षी.

बंडूशेठनं कोण्या जवळच्या सावकाराकडून कर्ज काढलेलं नव्हतं. त्याऐवजी शिक्षक असलेल्या सख्ख्या मावस भावाची मदत घेतलेली होती. गावातल्या विविध कार्यकारी सोसायटीच्याही पायऱ्या नव्हत्या झिजवल्या कारण की विकास सोसायटीवरही बंडूशेठचा प्रभाव होता. जवळजवळ त्याच्या इशाऱ्यावरच चालत होता तठोला कारभार! म्हणून मंग सोसायटीकडून बाकी भरून मुकुंदा बँकेकडे वळला होता. गावात राष्ट्रीयकृत बँकेची शाखा नुकतीच उघडली होती. तिकडून पिककर्ज काढून घेतलेलं होतं. अशानं आसं बंडूशेठच्या सावकारी पाशातून मुक्त व्हायचं होतं त्याला.

त्यासाठी कारणही तसं घडलेलं होतं. बंडूशेठचा आणि त्याचा वैयक्तिक काही वाद नव्हता. बंडूशेठ त्याचा व्यापार करत होता, पण तो ज्या पद्धतीने व्यापार करत होता, कुटील डाव खेळत होता ती त्याची पद्धत चुकीची होती. राक्षसी वृत्तीने तो वागत होता. शेतकऱ्यांना छळण्यात, लुबाडण्यात आनंद वाटत होता त्याला. आपल्या असुरी आनंदासाठी तो, शेतकऱ्यांच्या घरादारांवरून नांगर फिरवत होता. शेतकऱ्याच्या कोणत्याच इच्छाआकांक्षा पूर्ण होऊ नयेत. त्याने आनंदात, सुखा-समाधानात, स्वाभिमानाने जगताच कामा नये. थोडक्यात, शेतकऱ्याने स्वतंत्र होऊ नये. सदैव आपल्या गुलामीत जगावे, मरावे. शेतकऱ्याचं शेवटचं सरणसुद्धा आपल्या उपकारावरच रचल्या जावं, अशी बंडूशेठची इच्छा राहत होती.

बंडूशेठच्या इच्छेखातर अनेक शेतकरी जगत होते, मरत होते. त्याची तुच्छतादर्शक आसुरी नजर आपल्यावर पडावी म्हणून झुरत

होते. त्यांना ती कृपादृष्टीच वाटत होती जणू. अशानं असा आभास निर्माण झालेला होता. त्या आभासात सगळेच जण जगत होते. दबलेपणाची, उपकाराची, नागावलेपणाची जाणीवच नव्हती जणू. त्यात अनेकांचे संसार होरपळून रस्त्यावर आलेले होते. बऱ्यापैकी शेतकरी देशोधडीला लागलेले होते.

मुकुंदाला सुद्धा ह्या सगळ्याची झळ पोहचलेली होती. गेल्या वर्षी मरता-मरता तो वाचलेला होता. दरवर्षीप्रमाणे बंडूशेठकडून उधारीवर सामान घेतलेला होता. त्याच्या पैशावरच शेती खेळलेला होता. कापूस वगैरे भरपूर आलेला होता. मात्र आल्याआल्या कापूस मोजून घेतला होता बंडूशेठनं. अशानं आसं झालं होतं. पस्तीसश्याच्या भावाने मुकुंदाचा सगळा कापूस बंडूशेठच्या घशात गेला होता. त्यानंतर सरकारनं हमीभाव जाहीर केला होता आणि सरकारी खरेदीसुद्धा सुरू केली होती.

कशी थोबाडीत बसली होती मुकुंदाच्या! अशानं असा जेरीस आला होता. तोंडघशी पडला होता. एवढे सगळे काबाडकष्ट करून आपल्या पदरी काय आली? तर घोर निराशा! कष्टाचं चीज होऊन फळ हाती आली नव्हतं. दरवर्षीचीच पद्धत होऊन बसली होती ही. शेतकऱ्यानं काबाडकष्ट करून माल पिकवावा, त्या मालाला घरधन्याचं तोंड मात्र नव्हतं दिसत. अशानं अशा सावकारीपाशाला म्हणून कंटाळला होता मुकुंदा. आपण मालक आहोत का गुलाम हे कळत नव्हतं त्याला. आपण सावकाराकरिता राबतो का स्वत:च्या कुटुंबाकरता? जे कुटुंब सालभर काळ्या मातीत राबतं, त्यांच्या साध्यासुध्या अपेक्षा, जीवनावश्यक गरजा पूर्ण नाही करू शकत आपण. थूऽ अशा जिनगाणीवर! आसं म्हणत प्रचंड नैराश्यात, संतापाच्या खाईत ढकलल्या गेला होता मुकुंदा.

त्यातूनच गळफास जवळ केला होता. आपल्याला फाशीच्या फंदापर्यंत पोहचवणारा दुसरा तिसरा कोणी नसून आपल्याला सहकार्य करणारा बंडूशेठच आहे हे कळून चुकलं होतं त्याला. बंडूशेठ म्हणजे 'मीठी छुरीऽ!' मुंह मे राम बगल मे सुरी! तुम्हाला मदत करतो, आसं दाखवत होता शेतकऱ्यांना. प्रत्यक्षात मात्र त्यांच्या गळ्याभोवतीचे फास आवळत होता. त्याबाबतचे पुरावे मात्र उपलब्ध नव्हते. 'मी नाही त्यातली, कडी लावला आतली', असा वागत होता. करून सारून नामानिराळा हून जात होता.

कळत होतं, काहींना नव्हतं कळत! कळत असूनही बहुत्येकांना नव्हतं वळत. इच्छा असूनही बंडूशेठच्या मगरमिठीतून सुटता येत नव्हतं. उधारी, उचल, सावकरीच्या दुष्टचक्रात जे अडकलेले होते, अशानं अशा अंधारकोठडीत, अज्ञानात, अपमानात अनेकांची आयुष्यं खितपत पडलेली होती. सडून, मरून जात होते. गुलामी, गरिबी, लाचारी, कर्जाची खाई वाढतच चालली होती. अंधारकोठडीत कुटुंबाची कुटुंबं नेस्तनाबूत होत होती. कुठली आशा नाही, की आकांक्षा पूर्ण होत नव्हती.

कोणीही ह्या प्रथेला ओलांडू शकत नव्हता. हिंमत करून छेद देऊ शकत नव्हता. पहिला मुद्दा तर आपण असल्या काही दुष्टचक्रात अडकलोय, आपलं कुणी शोषण करतंय, आपल्याला कुणी नागवतंय ह्याबाबत काही एक कल्पना नसलेली अनेकांना. उठले की फक्त कष्ट आणि कष्ट! माल पिकवायचा आन् सावकाराच्या गोडाऊनपर्यंत पोहचवायचा. दुसरी कुठली वाटच माहीत नव्हती. चुकून एखादा गेलाच दुसऱ्या वाटेला तर त्याचे पाय छाटलेच समजा. असा सगळा प्रकार होता.

मुकुंदाही होता अडकलेला ह्या दुष्टचक्रात. त्यातूनच गळफास होता जवळ केलेला. गळफासाच्या फंदापासून वाचला तेव्हा बोध होता झाला मुकुंदाला. त्यादिसापासून सावध झाला होता. समजून उमजून पावलं टाकीत होता. तुरीची लागवड करण्यापासून तर तिची मशागत, मळणी, साठवण ते विक्री करण्यापातूरचा निर्णय त्यातूनच घेतला होता. कोणत्याही परिस्थितीत बंडूशेठच्या हातात हात द्यायचा नाही, आसं त्याने ठरवलं होतं.

आपल्या गळ्याभोवतीचा फाशीचा फंदा सोडवायचा असेल, आपल्या कुटुंबीयांच्या इच्छा फुलवायच्या असतील तर ही शृंखला तोडावीच लागेल आपल्याला, ह्या विचारापर्यंत पक्का पोहचलेला मुकुंदा! त्यातूनच सरकारी खरेदी केंद्राच्या उंबरठ्यापर्यंत तूर होती पोहचवलेली. अशानं अशा तुरीच्या गाड्यांवर त्याच्या आशा-आकांक्षा होत्या एकवटलेल्या... तुरीच्या दाण्यापरत इच्छा होत्या फुललेल्या...तुरीची पिवळीधम्मक फुलं घरभर पसरलेली. त्यांचाच गंधाळलेला सुगंध मनामनात दरवळून असलेला... पिढ्यापिढ्यांचा नि:श्वास दाटून असलेला...

सगळ्यांच्याच इच्छाआकांक्षा तुरीसोबत दाटून आलेल्या... कपीलच्या सायकलीची चाकं तुरींच्या हारींतून फिरून येऊ लागलेली... सुनंदाची कंबर लालेलाल तुरी वेचू लागलेली... म्हातारे आई-वडील गुडघ्यांच दुखनं विसरून केव्हाचेच तुरींच्या शेंड्यांवर जाऊन बसलेले... तुरीसोबत डोलणाऱ्या वाऱ्यासोबत तेही डोलू लागलेले... घराची पडझड तुरींनी तोलून धरलेली... तरणीबांड तूर घर उजळवायला निघालेली... त्याच उजळमाथ्याने मुकुंदा डोलून असलेला... डौलाने तुरा फडकवत तुरीच्या लग्नाच्या अक्षदा भिरकावू लागलेला...!

**- अशोक कौतिक-कोळी**
भ्रमणध्वनी : ९४२१५६८४२७
ashokkautikkoli@gmail.com

# बोगदा

श्रीकांत बोजेवार

**निलिमाचं अस्तित्व विसरून तन्वी स्वतःतच बुडालेली होती. स्वतःच्याच अंतर्मनात सूर मारून तळ शोधण्याचा प्रयत्न करत होती. आपल्या अस्वस्थ असण्याचं कारण हाती लागतं का याचा शोध घेत होती. आपल्याला राहीबद्दल तसं काही आकर्षण वाटतं का? छे! तिनं स्वतःच तो प्रश्न झटकून टाकला.**



तन्वी शॉट रेडी होण्याची वाट पाहात बसली होती. तिच्या हाती मुरलीधर खैरनारांची शोध' ही कांदबरी होती. पंधरा-वीस मिनिटं तरी किमान शॉट रेडी होऊ नये, असं तिला वाटत होतं. कादंबरीत पुढं काय होणार आहे, त्याची उत्कंठा जास्त होती. लायटिंगचे आवाज, साहाय्यक दिग्दर्शकांचा गोंगाट आणि सेटवरच्या गोंधळात वाचायची तिला आता सवय झाली होती. तिचा फोन नेहमीप्रमाणे तिची साहाय्यक निलिमा हिच्याकडे होता. कोणाचा फोन घ्यायचा, कोणाचा कटवायचा आणि तन्वीकडे कधी द्यायचा हे निलिमाला आता पाठ झालं होतं. तन्वी 'शोध'मध्ये गाढ बुडालेली असतानाच शॉट रेडी झाल्याचा निरोप आला तेव्हा ती सेकंदभर दचकलीच. मग पुस्तकात खुणेचा कागद घालून तिनं ते निलिमाकडे सोपवलं आणि निघाली, तेवढ्यात निलिमाचा मोबाईल वाजला. मोबाईलच्या स्क्रीनकडे पाहात निलिमा तिला म्हणाली... 'राही!'

दिग्दर्शक ताटकळून वाट पाहतो आहे आणि इकडे राहीचा फोन. खरं तर तिला राहीशी बोलण्यात जास्त इंटरेस्ट होता, पण ती स्वतःशीच म्हणाली, ''नको. विक्रमकाकासारखा सिनिअर आर्टिस्ट तयार होऊन बसलेला असताना आपल्यासाठी खोळंबा नको. मी करते तिला फोन हा शॉट झाल्यानंतर, सांग तिला.'' असं निलिमाकडे पाहात ती म्हणाली आणि सेटवर गेली.

सेटवर जाताच, ती स्वतःला विसरली आणि सरिता झाली. सध्या मराठी घराघरांत लोकप्रिय असलेली सरिता.

''मी कुठं असणार?'' तन्वीनं साहाय्यक दिग्दर्शकाला विचारलं. त्यानं तिची जागा दाखवली. खुर्चीत बसून असलेल्या विक्रम रानडे यांच्याकडे हसून बघत, ''गुडमॉर्निंग विक्रमकाका'' म्हणत ती तिच्या जागेवर जाऊन उभी राहिली. विक्रमनं नेहमीप्रमाणं प्रसन्न हसत तिचं गुडमार्निंग स्वीकारलं. तन्वीनं डोळे मिटले आणि स्वतःच्या संवादांची एकदा मनातल्या मनात उजळणी केली आणि म्हणाली, ''ओके. रेडी..''

विक्रम रानडे उर्फ या मालिकेतील मंदार मराठे यांनी खुर्चीवरून उठत सावकाश एक-एक पाऊल चालत तिच्या दिशेनं येत, चेहऱ्यावर कठोर भाव आणले आणि म्हणाले, ''सरिता, या घरात तू पाऊल ठेवलंस त्याच क्षणी मला कळलं होतं, इथल्या प्रथा-परंपरा तुला झेपणाऱ्या नाहीत.'' त्यांच्या नजरेला नजर भिडवीत सरितानंही चेहऱ्यावर कठोर भाव आणले आणि म्हणाली, ''हो. आणि मलाही या घरात पाऊल ठेवता क्षणी कळलं होतं, या घराला जुन्या प्रथा-परंपरांची कोळिष्टकं लागलेली आहेत,ती झटकून काढण्यात आपला बराच वेळ जाणार आहे.''

पंधरा वीस मिनिटांनी तन्वी शॉट संपवून आली. तिला येताना पाहताच निलिमानं राहीला फोन लावलाही होता. फोन हाती घेत तन्वी म्हणाली,

''बोल गं, काय झालं?''

''झालं!''

''अगं नकटे, काय झालं ते सांग ना?''

''बहिरे, तुला माझ्या आवाजावरून कळत नाही का काय झालं असावं ते?''

''माय गॉड. ठरलं?''

''हो.''

''आईशप्पथ! या शूटींगच्या आईचा घो, मला आत्ता यायचं आहे तुला भेटायला.''

''गप गं. काम संपवून ये, मग बोलू.''

''तू एवढी शांत कशी काय गं? लग्न ठरलंय तुझं आणि..''

''तने, लग्न ठरलं की बॅक ग्राऊंडला सतार वाजवायची, मुलीनं आनंदानं कोणाला तरी मिठी मारायची, माळरानावर दोन्ही हात पसरून धावत सुटायचं...हे सगळं तुमच्या सिरियल्समध्ये होतं. आमच्या आयुष्यात आम्ही आनंदी असलो तरी शांतच असतो..''

''हलकट, डुक्कर आहेस अगदी. काय काय झालं सांग ना? एखादी पप्पी वगैरे.''

''हो.''

''हो? च्यामायला खरंच?''

''काय झालं तुला तने? पप्पी काय नवीन आहे तुझ्यासाठी?'''

''अगं माझं सोड, मी कुणाचे ओठ खातेय की संत्र्याची फोड खातेय, यातला फरकही कळत नाही आता मला, पण तुझी कोणीतरी पप्पी घेतली..''

''गप ना तनू आता, फोनवर नको. संध्याकाळी बोलू. बट आय अम व्हेरी हॅपी.''

''ओके. मी येते सातपर्यंत. जीजू भेटेल का संध्याकाळी?''

''अर्थात. मी त्याला ऑलरेडी सांगितलंय, तन्वी इज द ओन्ली फ्रेंड ऑफ माईन. हिनं तुला ओके केलं म्हणूनच मी हो म्हणाले.''

''मग, काय म्हणाला?''

''तुला थँक यू म्हणणार आहे तो.''

''बस? थँक यू फक्त? एखादी पप्पी वगैरे?''

''तने, जा आता, तुझा शॉट रेडी असेल.''

''राहे, तुझा पण शॉट रेडी आहे हां...तयार राहा.''

''राहीनं फोन ठेवून दिला आणि तन्वी पुन्हा पुस्तक उघडून 'शोध'मध्ये घुसली, पण आता तिचं 'शोध'मध्येही लक्ष लागत नव्हतं. महिनाभरापूर्वीच्या राहीच्या त्या फोनपासूनच्या सगळ्या घटना तिच्या मालिकेच्या एपिसोड्ससारख्या डोळ्यांपुढे तरळू लागल्या. त्या दिवशीही ती अशीच शूटिंगमध्येच होती. पॅकअपची वेळ होत आलेली आणि राहीचा फोन आला. राहीचा फोन पाहिल्यावर तिला आठवलं, आज तिचे कांदेपोहे होते. तिला पाहायला मुलगा येणार होता. तिनं चट्कन फोन घेतला आणि विचारलं, ''काय झालं गं?''

''पहिली फेरी चांगली झाली. तुला फोटो पाठवला आहे व्हाट्सअपवर. तुझ्याकडून ओके असेल तरच दुसरी फेरी करणार, असं मी घरी सांगितलं आहे, पण दुसऱ्या फेरीला तू प्रत्यक्ष हजर असली पाहिजेस. फोटो बघ आणि ओके असेल तर तुझी डेट सांग आधी.''

''माझी डेट गेली गा च्या गां मध्ये. तुला आवडला का सांग आधी?''

''आवडला नसता तर तुला कशाला बोलावलं असतं भेटायला? बावळट!''

''मग मी आलेच. तू कधीही ठरवं. शूटींग-बिटिंग कॅन्सल करेन.''

मग ते तिघे भेटले. तन्वीला अलीकडे सवयच झालेली होती. तिला पाहिलं की आजूबाजूची माणसं सरिता-सरिता करत तिच्या भोवती गोळा व्हायची. मग तिच्यासोबत सेल्फी, ऑटोग्राफ्स..हे सगळं टाळण्यासाठी तिला कौटुंबिक भेटीगाठी फाईव्ह स्टार हॉटेलमध्ये घ्याव्या लागत. तिथंही लोक ओळखतात, परंतु तुलनेने त्रास खूपच कमी होतो. राही आणि प्रिणय येऊन बसले. दोघांची एक-एक कॉफी झाली आणि मग तन्वी अवतरली. चेहऱ्यावर, मनात उत्सुकतेचं गच्च भरलेलं आभाळ घेऊन, परंतु आल्या आल्याच तन्वीला मनातून एक बारीकसा धक्का बसला. प्रिणयच्या चेहऱ्यावर आपण तन्वीला म्हणजे सरिताला भेटत असल्याची एक्साइटमेंट वगैरे जराही नव्हती. किंबहुना अशा ओळखीचं कोणतंही चिन्ह नव्हतं. राहीनं त्याची ओळख करून दिल्या दिल्या तो पहिलंच वाक्य बोलला, ''आयम सॉरी...मी कुठलीही सिरियल बघत नाही, त्यामुळे मला काही माहिती नाही.''

त्याला मालिकांची अजिबात माहितीच नाही म्हटल्यावर तिचा झालेला विरस मळभ दाटून आल्यासारखा तिच्या मनःस्थितीवर उदासीची एक छटा पसरवून गेलाच, परंतु तिनं तो दाखवला नाही.

''काय घेणार? आमची एकेक कॉफी झालेली आहे.''

''अच्छा, आता राही आणि तू म्हणजे आम्ही झाला आहात आहात काय? आतापर्यंत आम्हीमध्ये आम्ही दोघीच होतो.'' आपल्या उदासीच्या मूडमधून बाहेर येण्याचा प्रयत्न करत तन्वीनं टोला मारला.

ती प्रिणयचं निरीक्षण करत होती. टीव्ही हे चित्रपटांसारखं 'लार्जर दॅन लाईफ' माध्यम नाही, त्यामुळं तिथं येणारे अभिनेते बुटके, दिसायला यथा-तथा आणि अभिनयातही जेमतेम असले तरी फार काही बिघडत नाही. लोकांना अभिनेत्यांच्या व्यक्तिमत्वापेक्षा एखाद्या सरिताचं किंवा सागरचं पुढं काय होतं, यात जास्त रस असतो. टीव्हीवरील नायक-नायिकांना प्रेक्षकांच्या स्वप्नात वगैरे प्रवेश नसतो. त्यांचे फोटो कोणी बेडरूममध्येही लावत नाहीत. या सगळ्या यथा-तथांच्या गर्दीतही तन्वी ग्लॅमरस म्हणून प्रसिद्ध होती आणि त्यामुळं तिनं चित्रपटांत जावं, असा सतत आग्रह होत असे. तिच्या आसपास वावरत असलेल्या कितीतरी अभिनेत्यांपेक्षा प्रिणय अधिक देखणा होता. फोटोत वाटला होता त्याहून कितीतरी अधिक आकर्षक होता. कमी वयात मोठ्या कंपनीत उच्चपदस्थ झाल्याचा एक सार्थ अभिमान त्याच्या व्यक्तिमत्त्वात, बोलण्यात, वागण्यात दरवळत होता. आता हा जर मालिकांविषयी वगैरे काही वाईटसाईट बोलला तर आपलं जाम भांडण होईल याच्याशी, असं तन्वीला वाटत होतं. इन फॅक्ट यानं टीव्ही मालिकांवर काहीतरी कॉमेन्ट करावी आणि आपलं याच्याशी भांडण व्हावं असं तिला वाटत होतं. आपल्याला असं का वाटतं, याबद्दल तिचं तिलाच आश्चर्यही वाटतं होतं परंतु प्रिणय तसं काहीच बोलला नाही. त्यानं तशी एकही संधी दिली नाही. इन फॅक्ट ग्लॅमरच्या जगाविषयी कुतूहल असणारे परंतु सर्वस्वी अनभिज्ञ असणारे लोक संधी मिळताच जे प्रश्न विचारतात, त्यातला एकही प्रश्न प्रिणयनं विचारला नाही. तिच्या आत कुठंतरी रूजलेलं चिडचिडलेपणाचं रोपटं पानापानानं वाढतच चाललं होतं आतल्या आत.

वरवर मात्र ती गप्पांमध्ये सहभागी होत होती. मोकळेपणी बोलत असल्याचा आव आणत होती. तन्वी आणि राही दोघींच्या बालपणापासूनच्या मैत्रीबद्दल बोलून झालं. राहीनं आर्किऑलॉजीची आवड जोपासली आणि ती क्युरेटर झाली, यावर चर्चा होत असतानाच, मला त्या दगडांमध्ये, जुन्या वस्तूंमध्ये रस नाही असं तन्वी म्हणाली, तेव्हा प्रिणय स्वतःकडे बोट दाखवत म्हणाला, ''पण प्लीज, हा एवढा एक दगड मात्र तुम्ही ओके करा, कारण तुमच्या ओके शिवाय ही क्युरेटर मला हात लावणार नाही.''

राही त्याला आवडली होती हे त्यानं अशा प्रकारे स्पष्टच केलं होतं. राहीचं लग्न जुळतंय याचा तन्वीला मनापासून आनंद होता,परंतु तरीही तिला मनात काहीतरी डाचत होतं. आपली चिडचिड होत असल्याची बारीकशी जाणीव तिच्या मनात हळूहळू फोफावू लागली होती कारण खरं तर तिलाही कळत नव्हतं. राही दिसायला सुंदर होती, आकर्षक होती. प्रिणय अगदी योग्य जोडीदार होता आणि राहीनं आपलं करिअर पर्स्यू करावं यासाठीही तो आग्रही होता. यात आपली

चिडचिड होण्याचा, आपण दुखावलं जाण्याचा काय संबंध आहे? केवळ प्रिणयला आपल्या मालिकेबद्दल, आपल्या लोकप्रिय व्यक्तिरेखेबद्दल काही माहिती नाही म्हणून?

अर्थात आपल्या भावना तिनं प्रयत्नपूर्वक मनातच ठेवल्या. राही-प्रिणय यांनी एकमेकांना पसंत केलं आहे, दोघांच्याही घरून ग्रीन सिग्नल आहे, पण प्रिणयचा कोणी तरी एक लाडका मामा आहे, त्याला एकदा राहीनं भेटावं, मग सगळं फायनल करू, असं प्रिणय म्हणाला. राहीनं याला फार हरकत घेतली नाही. खाणं पिणं होऊन्न ती भेट संपली होती. मालिकेचे महिनाभराचे एपिसोड इथेच संपले. साखळी तुटली.

तेव्हा ठरल्यानुसार आज राही आणि प्रिणय हे प्रिणयच्या मामांना भेटायला जाणार होते. प्रिणय-राही दिवसभर एकत्र होते आणि दिवसभराचं रिपोर्टकार्ड तन्वीला देण्यासाठी राही आतुर झाली होती. तन्वीही ते ऐकायला आतुर झालेली होती.

पॅकअप झाल्यावर तन्वी धावतच तिच्या रूममध्ये गेली. ती कपडे बदलत असतानाच कपिल तिच्या रूममध्ये आला आणि तन्वी त्याच्यावर उखडलीच, ''कपिल, मी कपडे बदलतेय, नॉक करून यायचं ना, तुला साधे मॅनर्स नाहीत का?''

कपिल चकित होऊन तिच्याकडे पाहात राहिला. तिच्या रूममध्ये येण्यासाठी कपिलला खरं तर नॉक करायची गरज नव्हती. आधीही अनेकदा तो असा आत आला होता आणि तसं काही असतं तर निलिमानं त्याला आत येऊच दिलं नसतं. ती बाहेर उभी होतीच की. कपिलनं तिच्याजवळ येत खांद्यावर हात ठेवला. ''काय गं, काय झालं? का उखडलेली आहेस?''

''कपिल प्लीज, मला काहीच झालेलं नाही, तू बाहेर जा आधी.''

''ए. च्यायला तुझ्या, चांगला प्रेमानं विचारतोय तर नखरे करतेस, सांग ना.''

तन्वीनं थेट निलिमालाच आवाज दिला. ''निलिमा... आय वॉंट टू बी अलोन..''

निलिमा आत आली आणि कपिलला म्हणाली, ''कपिल सर प्लीज..''

कपिल शिव्या पुटपुटत बाहेर पडला. निलिमा तन्वीकडे पाहात म्हणाली, ''निघायचं का?''

तन्वीनं होकारार्थी मान हलवली. तरीही निलिमा तिथंच उभी होती. तिनं थोड्या काळजीनं तन्वीकडे पाहिलं. ''ठीक आहेस ना?' तन्वीनं पुन्हा होकारार्थी मान हलवली आणि आपली पर्स निलिमाकडे दिली. राहीवर तिचा खूप जीव होता. तन्वीच्या यशाचं राहीलाही अमाप कौतुक होतं. प्रत्येक गोष्ट दोघी एकमेकींना सांगत होत्या. दोघींची अनेक गुपितं होती, जी केवळ त्यांना एकमेकींनाच ठाऊक होती. संपलेल्या दिवसाचा अगदी मिनिटा-मिनिटाचा रिपोर्ट एकमेकींना रोज रात्री देण्याचा शिरस्ता त्यांनी ठेवला होता. तोही अगदी सहजपणे. तिच्या सेटवर मात्र राही कधी फिरकत नसे. तन्वीच्या सेटवर फक्त एकदाच गेल्यानंतर राहीनं तिला सांगून टाकलं होतं, ''तुझ्या सेटवर मला कधी बोलावू नकोस, मला तिथं सफोकेट होतं.'' दोघींचे इंटरेस्ट, स्वभाव अगदी वेगळे होते, परंतु मैत्री मात्र घट्ट होती. ''मी काही एवढ्यात लग्न करणार नाही, तू मात्र वेळीच करून टाक,'' असा आग्रह तन्वीच सतत राहीकडे धरत होती आणि आता तिचं सगळं ठरतंय तर आपलं नेमकं काय बिनसलंय? काय खूपतंय आपल्याला? तन्वी तिला स्वतःलाच पडलेल्या या अनुत्तरित प्रश्नानं अस्वस्थ झालेली होती.

स्वतःशी हा विचार करतच तन्वी गाडीत बसली आणि केशवला तिनं गाडी घराकडे घ्यायला सांगितलं. निलिमानं प्रश्नार्थक चेहरा करत, आश्चर्यानं, ''घरी?'' असं विचारलं. ''हो, मला जरा बरं वाटत नाहीये.''

निलिमाला ते खरं वाटलं नाही, परंतु आपण किती बोलायचं आणि कुठं थांबायचं याच्या सीमारेषा तिला माहिती होत्या. त्यामुळं ती काही बोलली नाही. निलिमाचं अस्तित्व विसरून तन्वी स्वतःतच बुडालेली होती. स्वतःच्याच अंतर्मनात सूर मारून तळ शोधण्याचा प्रयत्न करत होती. आपल्या अस्वस्थ असण्याचं कारण हाती लागतं का याचा शोध घेत होती. आपल्याला राहीबद्दल तसं काही आकर्षण वाटतं का? छे! तिनं स्वतःच तो प्रश्न झटकून टाकला. दोघीही आपल्या शरीरात होत असलेले बदल एकमेकींना सांगत, दाखवत मोठ्या झाल्या होत्या. एकमेकींना अनेकदा वस्त्रहिन पाहिलेलं होतं. बारावीची परीक्षा झाल्यावर गंमत म्हणून पहिल्या चुंबनाचा आनंद दोघींनी एकमेकींना दिला होता, परंतु त्याला आता दहा वर्ष होत आली होती. त्यानंतर कधीही त्याची पुनरावृत्ती करण्याचं मनातसुद्धा आलं नव्हतं. मग, आणखी काय कारण असू शकतं? राहीचं विश्व आता बदलेल, तिच्या आयुष्यात प्रिणयला प्राथमिकता मिळेल, या विचाराचा आपल्याला त्रास होतो आहे का? पण आपण स्टार झाल्यावर आपलंही विश्व बदललं, मित्र वाढले, काहींशी तर अगदी सेक्स करण्यापर्यंत संबंध वाढले. हे सगळं राहीला माहिती आहे, तिनं कधी याचा बाऊ केला नाही. तिच्यावर या कशाचाही परिणाम झालेला नाही. काही केल्या तन्वीला आपल्या मनातल्या गुंत्याचा पदर हाती लागत नव्हता. कुठलंही टोक ओढलं तरी बोटांना गाठच लागत होती. ''प्रिणय आपल्याला आवडला नाही का? की प्रिणय आवडला?'' हा प्रश्न तर खूपच गोंधळात टाकणारा होता. राहीला तो आवडला आहे, त्याला ती आवडली आहे, मग आपल्या आवडण्या-नावडण्याचा प्रश्न कुठे येतो? आणि नावडावं असं तर काहीच नाही आहे त्याच्यात. पण मग तो आपल्याला आवडला आणि राहीपेक्षा आपल्याला तो जास्त योग्य आहे, असं काही वाटतं का

मनातून आपल्याला?

राहीचा फोन आला आणि निलिमानंच घेतला. तिला काहीही बोलण्याची संधी न देता राही म्हणाली, ''कुठपर्यंत पोचलात? वाट बघतायत सगळे. आजच अंगठी घालायची आहे एकमेकांना, अचानक ठरलं. लवकर या.''

निलिमानं फोन बंद केला आणि केशवला म्हणाली, ''राही मॅमच्या घराकडे चल.'' तन्वीनं डोळे रोखून तिच्याकडे पाहिलं. निलिमा समजावणीच्या स्वरांत म्हणाली, ''सगळे खोळंबलेत. वाट बघाताहेत. एंगेजमेट करताहेत आजच. गेलंच पाहिजे.''

तन्वीची गाडी पोचली. राही आणि प्रिणयच्या कुटुंबातले-नात्यातले शंभरेक लोक तरी घरी जमले असावेत. तन्वी डायरेक्ट इकडे येणारच हे गृहीत धरून तिचे आई-वडीलही येऊन पोचले होते. तन्वी गाडीतून उतरली तेव्हा सगळ्या नजरा तिच्यावर रोखल्या गेल्या होत्या. ती आपल्या सूनबाईची जिवलग मैत्रीण आहे याचं कौतुक, आश्चर्य, अभिमान प्रिणयच्या नातेवाईकांच्या चेहऱ्यांवर स्पष्ट दिसत होता. प्रिणय स्वतःच तिचं स्वागत करायला पुढे आला आणि हळूच म्हणाला, माझे नातेवाईक, आमच्या एंगेजमेंटसाठी आलेले आहेत, असा माझा गैरसमज झाला होता. खरं तर ते तुला भेटता येईल, तुझ्यासोबत सेल्फी घेता येईल म्हणून आलेले आहेत.''

प्रिणयच्या या एका वाक्यानं अचानक काय झालं ते तन्वीला कळलं नाही. क्षणात तिचा मूड बदलला, चेहरा खुलला. प्रिणयला हसरा लूक देत तिनं राहीला मिठीत घेतलं आणि म्हणाली, ''सुंदर दिसतीयेस.''

राही नेहमीच्याच स्वरांत म्हणाली, ''नकटे, अगं किती वेळ केलास, चल लवकर. तुला काय फ्रेश वगैरे व्हायची गरज नाही. यू आर एव्हरफ्रेश.''

कपडे चेंज करते फक्त, आलेच दोन मिनिटांत. म्हणत ती राहीच्या बेडरूममध्ये शिरली. दार बंद करून घेतलं आणि आरशासमोर उभी राहिली. चेहऱ्यावर हास्य, डोळ्यांत पाणी. कुणीतरी लिहून दिलेला संवाद म्हणावा तशी ती आरशातल्या तन्वीला म्हणाली, ''कलावंताला यश आणि प्रसिद्धीसोबत इगो नावाचा एक गुप्त अवयव मिळत असतो. एक वेळ मन सांभाळणं सोपं आहे, ते थोडंफार कळतं तरी, इगोचा थांग लागणं कठीण आहे. त्याला मैत्री, नातेसंबंध काहीही कळत नाहीत...''


त्यांच्या मालिकेचा शंभरावा भाग प्रसारित झाला त्या निमित्तानं सरिता फॅन क्लबची स्थापना झाली तेव्हा विक्रम रानडेंनी तिचं कौतुक करताना तिला हे वाक्य ऐकवलं होतं. प्रवास करताना एखादा मोठ्ठा बोगदा लागावा, तो संपता संपत नाही म्हणून श्वास कोंडल्यासारखं व्हावं आणि त्यानंतर काही क्षणातच बोगदा संपून स्वच्छ प्रकाश दिसावा तसं काहीसं तिला ह्या क्षणी वाटत होतं. तिनं डोळे पुसले आणि म्हणाली, ''थँक यू विक्रमकाका!''

**– श्रीकांत बोजेवार**

भ्रमणध्वनी : ९८९२४१९२६७
shrikant.bojewar@gmail.com

ग्रंथाली

## अरुण शेवते यांची तीन पुस्तके



**स्त्रीच्या वाट्याला आलेल्या सुखदुःखाचा प्रवास...**

**मूल्य १५० रुपये सवलतीत ९० रुपये**




**स्त्रीला पुरुष कसा उमगतो? यांचा सर्वांगीण वेध...**

**मूल्य १०० रुपये सवलतीत ६० रुपये**




**अरुण शेवते यांनी संपादित केलेले ५० वे पुस्तक...**

**मूल्य ३५० रुपये सवलतीत २१० रुपये**

## मेहता पब्लिशिंग हाऊस

**आमची नवीन प्रकाशित पुस्तके**





प्रशासकीय किंवा सनदी अधिकाऱ्याचा देशाच्या जडणघडणीत महत्त्वाचा सहभाग असतो. बुद्धिकौशल्य, नेतृत्वगुण, प्रसंगावधान, योग्य निर्णय घेण्याची क्षमता, सचोटी, वक्तशीरपणा, कार्यक्षमता, कोणतीही जबाबदारी स्वीकारण्याची आणि कष्ट करण्याची तयारी, सहनशीलता, बिकट परिस्थितीतही कणखर राहण्याची वृत्ती इ. गुण सनदी अधिकाऱ्याकडे असणे अपेक्षित असते. अशाच गुणांचा समुच्चय असलेले माजी सनदी अधिकारी आणि अरुणाचलचे माजी राज्यपाल राम प्रधान यांचं आत्मचरित्र आहे 'माझी वाटचाल : मेटकॉफ हाउस ते राजभवन (१९५२-१९८९)'.

### माझी वाटचाल

मेटकॉफ हाउस ते राजभवन

(१९५२-१९८९)

**राम प्रधान**




इटालियन स्थलांतरितांचा मुलगा असलेले ली आयकोका फोर्ड मोटर कंपनीमध्ये अगदी खालच्या स्तरातून देदीप्यमान प्रगती करतच अध्यक्षपदावर पोहोचले. परंतु सत्ता स्पर्धेमध्ये आठ वर्षांनी त्यांना पदच्युत करण्यात आले; त्यामुळे खरे तर ते निराश होणे अपेक्षित होते. पण ली आयकोका यांनी डोके ठिकाणावर ठेवले आणि एक प्रकारे बदलाच घेतला. क्रायस्लरला पुनरुज्जीवन देण्याच्या संघर्षाचे त्यांनी नेतृत्व केले आणि त्यांचे नाव लाखो अमेरिकनांसाठी सचोटी, तंत्रज्ञान, आणि धाडस यांचे प्रतीक झाले.

### आयकोका

**ली आयकोका**

अनुवाद - **अशोक पाथरकर**




'योशिको कावाशिमा' अर्थात मंचुरियाची 'आयसिन गिओरो' आणि राजकुमार स्यू यांची मुलगी. योशिकोचे सारे आयुष्यच जपानी पिओनी या फुलासारखे रंगीत आणि त्याच्या दुहेरी गच्च पाकळ्यांप्रमाणे साहसी आणि संकटांनी भरलेले होते. बंडखोर, संशयी वृत्तीची, स्वतंत्र (खरेतर स्वैर) विचारांची ती जपानची गुप्तहेर बनली; आपले इप्सित साध्य होण्यासाठी 'वाट्टेल ते' करण्यास ती तयार असे. दोन परस्परविरोधी देशांच्या जाळ्यात अडकली आणि तिची तुरुंगात रवानगी झाली. तिला मृत्युदंडाची शिक्षा ठोठावण्यात आली. अर्थात त्यातूनही तिने आपली सुटका करून घेतली आणि पुढे ती सुमारे ३९ वर्षे जगली; मात्र योशिकोचा तुरुंगातून पळाल्यानंतरचा जीवनप्रवास अज्ञातच राहिला.

### वादळफूल

**रेई किमुरा**

अनुवाद - **वासंती घोसपूरकर**




योजनाची कविता स्त्रीमुक्तीचं बाळकडू कोळून प्यायलेल्या समर्थ स्त्रीची कविता आहे. या कवितांमधला रोमँटिसिझम एरवीसारखा सुखासीनतेची आस दर्शवणारा तरल आणि स्वप्निल नाही तर बंडखोरीचे सूचन करणारा तल्लख आणि तिखट आहे. बंडखोरीची ही कविता स्त्रीमुक्तीचा झेंडा खांद्यावर घेऊन कंठाळी सूर लावून प्रचारकी होत नाही, तर ती काळाला अनुसरून व्यक्तिवादीच राहते; स्वत:विषयी बोलण्याच्या निमित्ताने जीवनाविषयी खोलात जाऊन बोलते.

### मरी मरी जाय सरीर

**योजना यादव**

**मेहता पब्लिशिंग हाऊस**

www.mehtapublishinghouse.com
Email: sales@mehtapublishinghouse.com

Follow us on
http://www.facebook.com/mehta.publishinghouse

**WhatsApp us on**
9420594665

700 Marathi books
Available as e-Book

E-book available : play.google.com/store/books
m.dailyhunt.in/Ebooks/marathi and www.amazon.in

# सुक्याची गाय

**ऐश्वर्य पाटेकर**

**सुक्याची गाय सगळ्या गावात प्रसिद्ध. असा एक माणूस नसेल गावात, की तो सुक्याची गाय ओळखू शकत नसेल. समजा एखाद्याला ओळखता आली नाही तर इतरांच्या दृष्टीनं ते नवल ठरायचं किंवा चेष्टेचा विषय तरी. सुक्याच्या गायीचं नावच 'सुक्याची गाय' असं पडलं होतं. स्वतः सुक्याही, तिला सुक्याची गाय म्हणून ओळखत होता.**

सुक्याला काय एकटी एकच गाय नव्हती. बायको होती. पोरं होती. म्हातारे आई-बाप होते. अन् त्याचं घर त्याच्या मजुरीवर पोट भरत होतं. मात्र सुक्याची गाय एका रात्री खुट्यावरून नाहीशी झाली. सुक्याचा जीव कासावीस झाला. सुक्याची गाय खुट्यावरून नाहीशी होणं, या घटनेनं सुक्याचं काय होऊ शकतं हे फक्त त्याच्या गावातल्यांनाच ठाऊक. सुक्यानं सकाळ उगवायची वाट पाहिली. सकाळ उगवायची वाट पाहणं ही गोष्टसुद्धा सुक्याच्या दृष्टीने अवघडच. सुक्याची गाय हरवणं हे गावासाठीसुद्धा एक दुखणंच होऊन बसलं. अन् गावही सुक्याच्या चिंतेत बुडालं. झालं ते वाईटच झालं!

सुक्याची गाय सगळ्या गावात प्रसिद्ध. असा एक माणूस नसेल गावात, की तो सुक्याची गाय ओळखू शकत नसेल. समजा एखाद्याला ओळखता आली नाही तर इतरांच्या दृष्टीनं ते नवल ठरायचं किंवा चेष्टेचा विषय तरी. सुक्याच्या गायीचं नावच 'सुक्याची गाय' असं पडलं होतं. स्वतः सुक्याही, तिला सुक्याची गाय म्हणून ओळखत होता. एकदा तर काय झालं. गावातल्या गेणू तोंडल्याच्या वावरात चरता-चरता सुक्याची गाय पाय घसरून नाडग्यात पडली. पोरांनी कालवा करत वाचवलं तिला. काही जण तवताक नाडग्यात उतरले. काही कठड्यावरून गंमत पाहायला उभे. त्यात गावचा दत्तू कानुल्या! दत्तू कानुल्या तसा हरिभक्त. चार-दोन तोडकी-मोडकी कीर्तनं त्याच्या नावावर जमा आहेत इतकंच. धोतराचा सोगा हातात धरून दत्तू कानुल्या म्हणाला.

''काय रे पोरायवोऽऽ कुनाची गाय म्हणायची?''

''काय माउली तुमालाबी का ठाव न्हायी?''

''माला कश्याला ठाव असेल पिऱ्या!''

''साऱ्या गावाच्या बातम्या घेऊन तुमी फिरता माउली. तुमच्यापून गावातली वस्तू कधी दडून ऱ्हायलीय का? अन् तुमाला ठाव न्हायी! कायच्या काय बोलून ऱ्हायल्या तुमी माउली!''

''अवो माउली सुक्याची गाय!'' दुसऱ्या एकानं सांगितलं.

''आरं तरी मला जराशीक वळख लागत व्हती माझ्या कडूळात चरली व्हती नं!''

''ये पायबिय मोडला नव्ह!'' एकानं काळजीनं विचारलं.

''शाबूतय!''

''बरं झालं न्हायी तर सुक्याचं कायी खरं नव्हतं! लई जीवंय त्याचा गायीवर!''

''बायकोलाबी यवढा जीव लावंल का न्हायी कायी सांगता यायचं न्हायी!''

''हा नं! आपल्या माउलीचाबी हरीवर यवढा जीव नसंल! काय मावली?''

तेव्हा सुक्याची गाय लोकांनी सुखरूप घरी पोचती केली होती. या वेळेलाही सुक्याला असंच काही वाटून गेलं. म्हणून त्यानं वाट

पाहिली; पण गाय काही घरी कुणी आणून दिली नाही. मग मात्र सुक्यानं अन्नपाणी बंद केलं. झुरणीला लागला. त्याला कुणी काय, कुणी काय समजावून पाहिलं. पण सुक्या कुणाचंच ऐकायला तयार नाही. त्यानं गायीसाठी खूप आकांत केला. पायाला भिंगरी बांधून, याचे-त्याचे मळेतळे धुंडाळले. सारा गाव पिंजून काढला. गायीचा काही शोध लागला नाही. तरी सुक्यानं आस काही सोडली नव्हती. रस्त्यानं चालता-चालता त्याला तात्या कोकणे भेटला.

''तात्या, माझी गाय दिसली काय रे तुला?''

''न्हायी तं बाबा!''

''लाल रंगाची व्हती बग!''

''सुक्या, तुही गाय कुनाला ठावं नसेल लेका!''

''तात्या कुडकानू गेली रे!''

''कुडं कशाला! आरं ऐतवारच्या बाजारात जाऊन पाहय. एकांद्यानं चोरली असंल तं बाजारात घावंल तुला!''

सुक्यानं रविवारचा गुरांचा अख्खा बाजार पायाखाली पालथा घातला, पण त्याला गाय काही दिसली नाही. आता तरी सुक्यानं गायीचा खेद सोडावा नं! पण तो आणखी वाढतंच गेला. रात्रीअपरात्री उठून तो गायीचा कानोसा घ्यायचा.

''काय वो!''

''मला गायीचा आवाज आल्यासारखा वाटला!''

''भ्रम झाला बायी तुमाला!''

''सुमन, कुडं गेली असंल गाय? तिनं चारापाणी केला असंल का? कुणी तिला पाणी पाजलं असंल का? गळ्याची पोळवी खाजवत, तिच्याशी कुणी बोललं असंल का?''

''बास झालं बायी गायीचं; न्हायी तं काय! जसं तुमच्या कर्माचं कातडंच गेलं!''

सुक्या अंथरुणावर बसल्या-बसल्या रडायलाच लागला. सुक्याची बायको कावरीबावरी झाली. त्याला समजावीत म्हणाली,

''अवो रडायचं काय त्यात, असं लान पोरागत?''

तो गुडघ्यात मान घालून आणखीनच रडायला लागला. त्याचे उली-उली दोन पोरं अन् म्हातारी आई त्याच्याभोवती येऊन उभी राहिली. आई पाठीवर हात फिरवत म्हणाली,

''रडायला काय झालं सुकदेवा? लेका गाय गेली; वायीटंच झालं, पण आहला कुनावर येत न्हायी? अर्धी खात व्हतो त् चोखंड खाऊ. काय करतो लेका, गेलं त्याच्या मागं तं जाता येत न्हायी; हे उली-उली लेकरं तुहये!''

''आई, काय करू माला बिलकूल गमेना गायीवाचून!''


''माला का ठाव न्हायी का लेका! लान वासरी व्हती तव्हापून तुला तिचा लळा!''

''आई, कुडं गेली असंल माझी गाय?''

''त्या देवाला ठावं बाबा!''

सुक्याचा गायीसाठीचा लाव्हो संपायलाच तयार नाही.

तो आणखीनच वाढत गेला.



गाय कुणाची हरवत नाही, पण सुक्याला कुणी सांगावं?

सुक्या दिवसेंदिवस खंगत चालला.

सुक्या आणि सुक्याची गाय हे समीकरण कुणीच सोडवू शकत नव्हतं.

जो सोडवायला जाईल तो त्या गुंतावळ्यात हरवल्याशिवाय राहणार नाही.

तेरा-चौदा वर्षांचा असेल सुक्या तेव्हा; तेव्हाची गोष्ट. झालं असं की त्याच्या बापाच्या बैलगाडीला अपघात झाला. बैलगाडीच्या चाकाखाली पाय सापडून बापाचे दोन्ही पाय नकामी झाले. साहजिकच सारी जबाबदारी एवढ्याशा सुकदेवाच्या अंगावर आली. शाळेची पाटी सुटली अन् मजुरीची पाटी त्याच्या हातात आली. डोंगराच्या पोटाशी माती खोदायला गेला तिथं ही गाय त्याला सापडली. तेव्हा ती उगा साताठ महिन्यांची असंल. एवढुशी वासरी. तिचा पाय मोडला होता. बैलगाडीत घालून घरी घेऊन आला. मोडक्या पायांवर त्यानं औषधपाणी केलं. तसंही सुक्याला बहिणभाऊ कुणी नव्हतंच. सुक्याचे सारे दिवस त्या गायीशी बांधले गेले. सुक्या जाईल तिथं त्याची गाय. गायीशिवाय सुक्या कुणाला सापडलाच नाही. सुक्या मोठा होत गेला; तशी त्याची गायही. लोक तर म्हणायचे त्याच्या आईला, ''केवळाई, सुक्याला गायीबिगर दुसरं कायी सुचत का न्हायी?''

''केवळाई, तुझ्या सुक्याचं त्या गायीसंगच लग्न लावून दे!''

''ह्या गायीच्या नादापायी तो परक्याची पोर कायी सांभाळायचा न्हायी!''

ही विनोदाची गोष्ट नव्हतीच. त्याला खरोखर बायकोच मिळंना. जिथं जमत आलं तिथं काहीतरी मोडता यायचा. मग तर केवळाईची खात्रीच झाली की गायीच्या नादापायीच आपल्या पोराचं जमत नाही. एकदा तर केवळाई त्याला म्हणाली,

''सुकदेवा, ह्या गायीमुळं तू कुवाराच ऱ्हाशील!''

''ऱ्हाईल आयी म्या कुवारा!''

''आरं सोड नाद त्या गावड्याचा!

''आई तिनं काय केलं असं?''

''आरे सौसार बिवसार करायचा हाये का न्हायी तुला? थांब, तिला बाजारंच दावते म्या तव्हा तुझं येडपण जाईल!''

सुक्या चवताळला आईवर.

''पुन्हा माझ्या गायीला इकायचं नाव काढशील तं म्या घर सोडून जाईन!''

त्याच्या आईसाठी सुक्याची गाय मोठी भानगडंच होऊन बसली होती, पण नात्यातली मुलगी मिळाली. सुक्याच्या अंगाला हळद लागली. मग काही केवळाईला सुक्याची चिंता राहिली नव्हती; पण आता दुसरीच चिंता उभी राहिली. बायकोपोरांत रमावं तर आज त्यानं गाईसाठी खूळ घेतलं होतं. कधीतरी केवळाईचा डोळा लागला असेल. अन् तिच्या सुनेच्या हाकेनं केवळाईला जाग आली. दिवस उगवला होता.

''आत्याबाईऽऽ वो आत्याबाई इकडं या.''

''काय गं म्हंते सुमन?' केवळाई बाहेर येत म्हणाली,

''तुम्चा लेक पहा!''

केवळाई डोळे विस्फारून पाहू लागली. सुक्या गायीचं दूध काढत होता; पण गाय कुठे होती? सुक्याला वेड लागलं. अन् ते इतकं की वाढतंच गेलं. तो आता गाय शोधत नव्हता, की गायीसाठी झुरतही नव्हता. त्याची गाय त्यानं कल्पनेनं खुट्याला बांधलेली होती. तो रोज तिचं चारावैरण करू लागला. गावालाही सुक्याविषयी खूप वाईट वाटत राहिलं. हे आणखी किती दिवस चालायचं? कारण त्याच्या कुटुंबावर उपासमारीची पाळी आली होती. सुक्याच्या बायकोला काय करावं कळत नव्हतं. ती बिचारी कुठून-कुठून अंगारा आणून सुक्याला लावत होती. सुक्या ज्या कशानं चांगला होईल ती गोष्ट ती करत होती, पण सुक्या काही चांगला होईना. शेवटी केवळाईनंच उपाय सांगितला म्हणून सुक्याच्या बायकोनं आपल्या भावाला बोलावून घेतलं. अन् रात्रीतून गाईचा गोठा उखडून टाकला. अन् ज्या खुट्याला गाय बांधली जायची; तो खुटाही उपटून जाळून टाकला. म्हणजे आता तरी सुक्या ताळ्यावर येईल अशी बिचारीला आशा होती.

तिच्या आशेच्या चिंध्या व्हाव्या असं घडू नये ते घडलं. सुक्या पहाटीच पसार झाला.

त्या दिवसानंतर सुक्या कुणालाच दिसला नाही.

अफवांसारख्या खबरी मात्र येत राहिल्या.

सुक्या इथं दिसला तिथं दिसला! त्याच्याबरोबर गाय होती.

एवढं मात्र झालं, की सुक्याच्या बायकोला कपाळावरचं कुंकू पुसता आलं नाही!

पोरांना बाप नसूनही तो मेला असं सांगता आलं नाही...

म्हाताऱ्या आईला; माझी म्हातारपणाची काठी हरवली आहे, हे जरी जगाला सांगता आलं असलं तरी तिला कुणीच सुक्याविषयी काहीच विचारलं नाही.

त्याच्या गायीविषयी विचारण्याचा तर प्रश्नच नव्हता...!

**– ऐश्वर्य पाटेकर**

भ्रमणध्वनी : ९८२२२९५६७२

oviaishpate@gmail.com

# चित्रकार ग.ना. जाधव


साधना बहुळकर



मासिकांची मुखपृष्ठे रंगविणाऱ्या, सजावटीसाठी कथाचित्रे काढणाऱ्या चित्रकारांची चित्रकला, महाराष्ट्रातील परिवर्तनाशी नकळत जोडली गेली आणि बदलत गेलेला महाराष्ट्र अशा चित्रकारांच्या कुंचल्यातून चित्रबद्ध झाला. ग.ना. जाधव हे त्यातील एक महत्वाचे चित्रकार. दिनांक १४ नोव्हेंबर १९१७ला जन्मलेल्या चित्रकार ग.ना. जाधवांचे जन्मशताब्दी वर्ष १४ नोव्हेंबर २०१७ पासून सुरू होत आहे.






काश्मिरी पठाण




दत्तो वामन पोतदार



कर्मवीर भाऊराव पाटील

चित्रकार ग.ना. जाधवांचे नाव प्रामुख्याने, महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहोचले ते 'किलोस्कर', 'स्त्री', 'मनोहर' या मासिकांवरील त्यांच्या आकर्षक मुखपृष्ठांमुळे. गेल्या शतकात महाराष्ट्रातील परिवर्तनात ह्या मासिकांचा महत्त्वाचा वाटा होता. साहजिकच ह्या मासिकांची मुखपृष्ठे रंगविणाऱ्या, सजावटीसाठी कथाचित्रे काढणाऱ्या चित्रकारांची चित्रकला, महाराष्ट्रातील परिवर्तनाशी नकळत जोडली गेली आणि बदलत गेलेला महाराष्ट्र अशा चित्रकारांच्या कुंचल्यातून चित्रबद्ध झाला. ग.ना. जाधव हे त्यातील एक महत्त्वाचे चित्रकार. मुखपृष्ठांवरील विविध प्रसंगचित्रातून त्यांचे सूक्ष्म निरीक्षण, दृक्‌-कल्पकता व ते चित्रातून साकार करण्याचे सामर्थ्य प्रत्ययाला येते. तत्कालीन राजकीय घडामोडी, सामाजिक घटना, उत्सवांचे सार्वजनिक व कौटुंबिक स्वरूप, प्रियकर-प्रेयसीचे स्वप्नाळू जग किंवा तरुण पती-पत्नीचे हळुवार थट्टेखोर, भावुक विश्व असे अनेक विषय साहित्य, कथाचित्रे व मुखपृष्ठातून हाताळले गेले. ते प्रभावीपणे व नेमकेपणी ग.ना. जाधवांच्या चित्रकृतीतून उमटले आणि वाचक, कलारसिक, अभिजन वर्गाच्या मनात ठसले. प्रभावी रेखाटन, मानवकृतींचा सखोल अभ्यास, हावभाव व्यक्त करण्याची हातोटी व विषयानुरूप वातावरणनिर्मिती ही त्यांच्या चित्रनिर्मितीची खास वैशिष्ट्ये आहेत कारण ग.ना. जाधव वास्तववादी शैलीत अभिजात कलेची मूल्ये जोपासत निर्मिती करणारे उत्तम चित्रकार होते. त्यांच्या वास्तववादी शैलीतील दर्जेदार चित्रनिर्मितीत

महेश्वर घाट





'क्रांतिकारकाचा विवाह'



झाडाची सावली पडलेले एकमजली घराचे चित्र (१९५५)


गोड संसारासाठी
तिखट व्हावंच लागतं
माझ्या नवऱ्याची बायको
सोम-शनि
रात्री 8 वा.
झी मराठी HD वरही पहा
Z
मराठी


बैंक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
भारत सरकार का उद्यम
एक परिवार एक बैंक
शुभ दीपावली
दीपावली निमित्त खास भेट
गृह आणि कार कर्जावर प्रक्रिया शुल्क नाही
महासुपर
गृह
कर्ज
EMI ONLY ₹784/-* प्रति लाख
महासुपर
कार
कर्ज
EMI ONLY ₹1607/-* प्रति लाख
बँक आपणास आपल्या कार्डचा तपशिल, सीव्हीव्ही नंबर आणि वैयक्तिक माहिती कधीही विचारत नाही.
कर्ज मागणी अर्जाकरीता 56161 वर SMS पाठवा :
BOM<space>HOME/CAR<space> आपल्या शहराचे नाव
अथवा नजिकच्या शाखेशी संपर्क करा
बचत बँक खात्यातील व्यवहार नियमित ठेवण्यासाठी दि 31 डिसेंबर 2017 पुर्वी आपल्या मूळ शाखेशी संपर्क साधून आपले पॅन आणि आधार कार्ड बचत खात्याशी जोडा. दि 1 जानवारी 2018 पासुन खात्याशी पॅन आणि आधार कार्ड जोडलेले नसल्यास व्यवहार शक्य होणार नाहीत.



व्यक्तिचित्रे, प्रसंगचित्रे, निसर्गचित्रे, अभ्यासचित्रे आणि मासिकांची मुखपृष्ठे व कथाचित्रे यांचा समावेश आहे.

त्यांच्या कारकिर्दीचा बहराचा काळ म्हणजे १९४५ ते ७५. या कालखंडात परतंत्र भारताची स्वातंत्र्याकडे वाटचाल होऊन स्वराज्य प्राप्त झाले होते. सुरुवातीच्या संक्रमणकाळातील राजकीय, सामाजिक परिवर्तनाचे पडसाद कला साहित्यात तसेच जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात उमटले होते. मराठी वाङ्मयातील नियतकालिके, दिवाळी अंक, पुस्तके-पाठ्यपुस्तके यांना चित्रकारांच्या चित्रांची साथ मिळून ती अधिकाधिक आकर्षक होत होती. त्यात बंगाल आणि महाराष्ट्र हे दोन प्रांत आघाडीवर होते. बंगालमध्ये भारतीयत्व व लोककलेवर आधारिक प्रयोगशीलतेला महत्त्व आले, तर महाराष्ट्रात पाश्चिमात्य कलामूल्ये, त्यानुसारचे यथार्थदर्शन व पाश्चात्य आधुनिक कलेतील प्रयोगशीलता महत्त्वाची ठरली. भिन्न विचारसरणीचे हे कलाप्रवाह आपापल्या प्रांतात सक्रीय होते. त्यांचे पडसाद पुस्तकांच्या व नियतकालिकांच्या मुखपृष्ठांवर साहजिकच उमटले. त्यातून दर्जेदार मुखपृष्ठांची परंपरा निर्माण झाली. महाराष्ट्रातील प्र.ग. सिरूर, द.ग. गोडसे, दलाल, मुळगांवकर ही नावे या संदर्भात सहज आठवतात. अर्थात त्या आधीही काही वेळा मुखपृष्ठांवर रवी वर्मा, धुरंधर, बाबुराव पेंटर, ए.एम. माळी, माधव सातवळेकर अशा अनेक चित्रकारांची उपलब्ध असलेली उत्तमोत्तम चित्रे प्रसिद्ध होत होती. हा समर्थ वारसा त्यातील वैशिष्ट्यांसह व संपादक शं.वा.कि. उर्फ शंकरराव किर्लोस्कर यांच्या प्रोत्साहनाने ग.ना. जाधवांनी अंगीकारला. आपल्या चित्र वैशिष्ट्यांनी त्यात भर घालीत स्वतःचा ठसा उमटवून, जोरदारपणे पुढे नेला.

दिनांक १४ नोव्हेंबर १९१७ला जन्मलेल्या चित्रकार ग.ना. जाधवांचे जन्म शताब्दी वर्ष १४ नोव्हेंबर २०१७ पासून सुरू होत आहे. ग.ना. जाधव हे मूळचे कोल्हापूरचे. मोठे कुटुंब व बेताची आर्थिक परिस्थिती या पार्श्वभूमीवर त्यांचे शालेय शिक्षण मराठी चौथीपर्यंतच झाले. लहानपणापासून चित्रकलेची आवड होती. त्यामुळे शाळेतील चित्रकलाशिक्षक बाबा गजबर यांचे प्रोत्साहन मिळे, पण परिस्थितीवश शिक्षण सोडावे लागले व गजाननने वडिलबंधू बंडोपंत यांच्या शिंपीकामाच्या दुकानात उमेदवारी करायला सुरुवात केली. कोल्हापूर हे कलेप्रमाणेच कुस्ती करणाऱ्या पहिलवानांसाठीही प्रसिद्ध होते व बंडोपंत पहिलवानांचे जांगे शिवत. त्यांचे जांगे विशेष असत. त्यामुळे गावोगावचे पहिलवान जांगे शिवण्यासाठी येत. इथेच गजाननची एका पहिलवानाशी, उस्तादाशी दोस्ती झाली आणि त्याने गजाननला कुस्ती शिकवली. मग तो त्यात रमला आणि कुस्तीत बक्षिसेही मिळवली, पण त्यामुळे दुकानातील शिंपीकामाकडे दुर्लक्ष होई. त्यामुळे वडील चिडले आणि त्यांनी घरच्या दुकानातून काढून त्याला एका टेलरींग फर्ममध्ये अॅप्रेंटीस म्हणून कामाला लावले. याच दरम्यान जाधवांच्या वडिलोपार्जित घराच्या वरच्या मजल्यावर १९३२ मध्ये चित्रकार गणपतराव वडणगेकरांनी क्लास सुरू केला. गजाननची चित्रकलेची आवड पुन्हा त्याला अस्वस्थ करू लागली. त्याकाळी त्या जागेचे भाडे ४ रुपये होते. वडिलांनी गजाननची चित्रकलेची आवड बघून गणपतराव वडणगेकरांना सांगितले की तुम्ही भाडे दोन रुपयेच द्या, पण गजाननला शिकवा. अशापद्धतीने गजानन पुन्हा चित्रकलेकडे वळला. गणपतराव वडणगेकरांनी त्याचे चित्रगुण हेरले व त्याला मनःपूर्वक शिकवण्यास सुरुवात केली.

गजाननने १९३४ व १९३५ मध्ये चित्रकलेच्या एलिमेंटरी व इंटरमिजिएट परीक्षा दिल्या. याच काळात केव्हातरी ज्येष्ठ चित्रकार माधवराव बागलांची भेट झाली आणि त्यांचे प्रोत्साहन व आग्रह यामुळे गजाननने वयाच्या अवघ्या सतराव्या वर्षी किर्लोस्करवाडीला जाण्याचा निर्णय घेतला. माधवराव बागलांनी शं.वा. किर्लोस्करांना तसे पत्र देखील पाठवले, पण आईला हे कळताच तिने ''नको रे बाबा... एवढ्या लांब मुलुखात नको जाऊस'' असं डोळ्यांत पाणी आणून सांगितलं. आईच्या डोळ्यांतलं पाणी बघून ते लांबणीवर पडलं.

मग माधवराव बागलांनी चिठ्ठी देऊन बाबुराव पेंटरांकडे गजाननला पाठवलं आणि त्याला या थोर कलावंताचा सहवास आणि त्यांच्याकडे शिकण्याची संधी मिळाली. त्या काळी ते त्यांची चित्रांची, पुतळ्यांची आणि सिनेमाचीही कामं कोल्हापुरात करत. तिथे श्रीकांत सुतार, जी.आर. मिस्त्री, गोपाळ मांढरे (सुप्रसिद्ध सिनेनट चंद्रकांत)



ग.ना. जाधव यांची विद्यार्थिदशेतील पेन्सिल स्केचेस

असे काहीजण येत. त्यांना बाबुराव पेंटर कधी मार्गदर्शन करीत तर कधी त्यांच्या चित्रात सुधारणाही करून दाखवत. त्याचवेळी गजाननला मॉडेलवरून चित्र कसं तयार होतं हे देखील कळलं कारण बाबुराव पेंटर त्यांच्या सिनेमात काम करणाऱ्या नट्यांना उभं करून, कधी बसवून त्यांची लक्ष्मी, राधाकृष्ण, विश्वमोहिनी (सरस्वती), वटपूजा अशी चित्र रंगवत. त्यातून नकळत खूप शिकायला मिळे.

अशातच एक दिवस माधवराव बागल जाधवांच्या गंगावेशीतल्या घरात अचानक अवतरले. किर्लोस्करचे संपादक शं.वा.कि. उर्फ शंकरराव किर्लोस्करांचं पत्र आलंय असं सांगून म्हणाले, ''त्यांनी तुला किर्लोस्करवाडीला बोलावलंय.'' बागल स्वतः चित्रकार होते. मुंबईच्या सर जे.जे. स्कूल ऑफ आर्टमध्ये शिकले होते. त्यांनी सल्ला दिला, ''शिकलास, डिप्लोमा घेतलास तरी तू नोकरीच करणार हे निश्चित. स्वतंत्रपणे चित्रकार म्हणून जगणं फार कठीण आहे रे बाबा! त्यापेक्षा किर्लोस्करवाडीला जा. किर्लोस्कर तुला पगार देऊन शिकवतील.'' अखेरीस १ ऑगस्ट १९३८ ला हा २० वर्षांचा तरुण चित्रकार किर्लोस्करवाडीत पोचला. त्याची चित्रं बघून शंकरराव किर्लोस्करांचा विश्वासच बसेना. मग गजाननने एक स्केच करून दाखवलं. 'शंवाकि' या तरुणाचं काम बघून थक्क झाले आणि त्याला नोकरी मिळाली. शंवाकिंनी अर्ज लिहून द्यायला सांगितला. पण चौथी शिकलेल्या गजाननला ते देखील येत नव्हते. मग 'शंवाकि' यांनीच त्याचा अर्ज लिहिला आणि १८ रुपये पगारावर चित्रकार म्हणून गजाननची नेमणूक झाली. किर्लोस्करवाडीत किर्लोस्करांकडे काम करणारा हा सर्वात तरुण चित्रकार होता. त्याच्या चित्रकलेला ज्येष्ठ चित्रकारांच्या व विशेषतः 'शंवाकिं'च्या मार्गदर्शनाखाली वेगळेच वळण मिळू लागले. शिवाय तिथे येणाऱ्या साहित्यिक व कलावंतांचा सहवासही मिळू लागला. समाजमंदिरात होणाऱ्या विविध कार्यक्रमात गजानन उत्साहाने भाग घेत असे. विविध खेळ, स्पर्धा यासोबतच याकाळात गजाननने नाटकात स्त्री भूमिकाही केल्या. नोकरी आणि शिक्षण दोन्ही सुरू होतं. थोडं आर्थिक स्थैर्य आलं आणि १९४२ मध्ये गजाननचा कोल्हापूरच्या इंदुमती कदम या तरुणीशी विवाह झाला, परंतु गजाननला मुंबईच्या सर जे.जे. स्कूल ऑफ आर्टमध्ये शिकण्याची फार इच्छा होती व त्या विचाराने तो अस्वस्थ असे. किर्लोस्करवाडीतील नोकरी सांभाळून ते शक्य नव्हतं. त्यातून त्यांनी मार्ग काढला. याकामी त्याला त्यांचे गुरू पंत उर्फ एस.जी. जांभळीकर यांचं मार्गदर्शन मिळालं. ते सांगलीजवळच्या माधवनगरचे, पण काही वेळा ते आपल्या या विद्यार्थ्याला किर्लोस्करवाडीस येऊन शिकवत. गजाननदेखील दर रविवारी सकाळी लवकर उठून माधवनगरला जाई. मग गजानन सर जे. जे. स्कूल ऑफ आर्टच्या परीक्षेला आपल्या चित्रांचे नमुने पाठवून बसू लागला. त्या काळी जे.जे.त प्रवेश मिळू न शकलेले किंवा मुंबईत जाऊन शिक्षण घेऊ न शकणारे अनेकजण अशा प्रकारे परीक्षा देत असत. ग.ना. जाधवांनी १९४४ ते १९५३ या काळात नोकरी सांभाळून, जांभळीकरांकडे शिक्षण घेत पेंटींगची जी. डी. आर्ट ही पदविका मिळवली. याच काळात किर्लोस्करवाडीत मासिकासाठी मुखपृष्ठ करताना त्यांनी आपल्या चित्रात वास्तवता आणण्यासाठी योग्य व्यक्तिमत्त्व शोधून त्यावरून आपली चित्रं साकारली. त्यात किर्लोस्कर कुटुंबातील अनेकांचा समावेश होता. त्यामुळे त्यांच्या अशा चित्रांनाही एक वास्तववादी दर्जा प्राप्त झाला.

१९५७ मध्ये अखिल भारतीय कृषी संघाचे पहिले अधिवेशन दिल्लीतील तालकटोरा मैदानावर भरले होते. त्यावेळी ग.ना. जाधवांनी महाराष्ट्रातील ग्रामीण जीवन व्यक्त करणाऱ्या चित्रांचे प्रदर्शन भरविले होते. ते गाजले. तत्पूर्वी १९५१ मध्ये 'स्त्री' मासिकाच्या मुखपृष्ठावर ग.ना. जाधवांचे एक चित्र छापून आले होते. ते चित्र पंडित जवाहरलाल नेहरू, इंदिरा गांधी व लहानगा राजीव यांचे होते. ते मूळ चित्र उद्घाटनप्रसंगी पंडितजींना भेट दिले. त्यांना ते अतिशय आवडले. किर्लोस्कर मासिकाच्या मुखपृष्ठावर पंतप्रधान नेहरूंनी आपली स्वाक्षरी करून त्याबद्दलचा आनंद व कौतुक व्यक्त केले. याशिवाय याच वेळी भारताचे प्रथम राष्ट्रपती राजेंद्रप्रसाद यांना महाराष्ट्राच्या इतिहासातील 'कल्याणच्या सुभेदाराची सून' या प्रसंगाचे जाधवांनी काढलेले चित्र भेट देण्यात आले. ते राष्ट्रपती भवनाच्या संग्रहात आहे.

१९६०च्या दरम्यान किर्लोस्कर प्रेस पुण्यात स्थलांतरित झाला व ग.ना. जाधवही पुणेकर झाले. सदाशिव पेठेतील नागनापाराजवळच्या दळवी वाड्यात ते राहू लागले. किर्लोस्कर-वाडीतल्या बंगलीवजा बैठ्या घराऐवजी आता ते त्यांची पत्नी आणि पाच मुलांचे कुटुंब दोन छोट्याशा खोल्यात राहू लागले. त्यांचे ते घर गंमतीदारच होते. बाहेरच्या बाजूस १२ बाय ५ फुटांची एक लांबट खोली होती. तीच त्यांची बैठकीची खोली किंवा दिवाणखाना होता. आत एक चौकोनी १२ बाय १२ फुटांची खोली म्हणजे स्वयंपाकघर कम बाथरूम होते. घरात प्रवेश करण्यासाठी बाहेरून एक गंमतीदार मार्ग होता. तो म्हणजे हमरस्त्यावर असलेली एक खिडकी. सर्वजण त्यातूनच ये-जा करत. त्यासाठी थोडी कसरतही करावी लागे. त्या खिडकीची कडी वाजताच दार आतल्या बाजूस उघडे. मग त्या दळवी वाड्याच्या दगडी जोत्यावर पाय ठेवून खिडकीच्या चौकटीत दुसरा पाय ठेवून घरात प्रवेश होई. घरात एक लाकडी पेटी होती तिचा पायरीसारखा उपयोग होई. ग.ना. जाधव व त्यांचे कुटुंबीयच नव्हे तर किर्लोस्कर मासिकाचे उंचेपुरे संपादक मुकुंदराव किर्लोस्कर किंवा लोकसाहित्याच्या अभ्यासक सरोजिनी बाबरही याच मार्गाने घरात जात.

जाधवांच्या या दिवाणखान्यात प्रवेश करताच डाव्या बाजूला एक रेफरन्सचे लाकडी कपाट व त्याच्या बाजूला गोदरेजचे कपाट होते. उजवीकडे कॉट व त्याच्या बाजूला भिंतीतील फडताळ होते. त्यात दाढीच्या सामानापासून ते रंग, ब्रशपर्यंतच्या सर्व वस्तू असत. बाजूलाच भिंतीवरच्या फळीवर मर्फीचा रेडिओ विराजमान असे.

समोरच जाधवांचा एक लाकडी स्टँड व त्यावर हाफ इंपीरियलचा बोर्ड असे. नोकरी व्यतिरिक्त बऱ्याचदा जाधव कॉटवर बसून त्या लाकडी स्टँडवरील बोर्डावरचे चित्र रंगवत बसत. याशिवाय पुण्यात आल्यावर त्यांनी पुण्यातील विविध क्षेत्रातील नावाजलेल्या मंडळींची समोर बसवून अनेक व्यक्तिचित्रे साकारली कारण व्यक्तिचित्रण हा त्यांचा अत्यंत आवडीचा विषय होता. त्यात शिक्षण तज्ज्ञांपासून ते लेखक आणि गायकापासून ते चित्रकारांपर्यंत अनेकांचा समावेश होता. अशा त्यांच्या चित्रांना महाराष्ट्र राज्य पुरस्कारासारखे प्रतिष्ठेचे पुरस्कारही मिळाले. अधूनमधून ते निसर्गचित्रणासाठीही जात. लहानपणापासून त्यांना स्केचिंगची सवय होती. कधीही बाहेर जाताना, समारंभात, गाण्याच्या मैफिलीत किंवा प्रवासातही. त्यांचे स्केचबुक कायमच त्यांच्या सोबत असे. व्यक्तिचित्रण, निसर्गचित्रण, प्रसंगचित्रण, कथाचित्रे, अर्कचित्रे असे अनेक भिन्न प्रकार त्यांनी हाताळले असले तरी ते प्रसिद्ध होते ते त्यांच्या 'किर्लोस्कर', 'स्त्री', 'मनोहर' या मासिकांवरील मुखपृष्ठांच्या चित्रांसाठीच! किंबहुना त्यातून ते महाराष्ट्राच्या घराघरांत पोचले होते.

किर्लोस्कर प्रकाशनाच्या मुखपृष्ठांवरचे काही विषय विविध प्रकारचे असत. उदा :- दिवाळी, गुढीपाडवा असे सण, त्या अनुषंगाने कौटुंबिक दृश्ये, आई व मूल, निसर्गदृश्ये, स्त्रियांची चित्रे इत्यादी, पण त्याचबरोबर किर्लोस्करांच्या ध्येयधोरणानुसार प्रगतिशील महाराष्ट्राचे बदलते स्वरूप, जाणिवा देखील त्या मुखपृष्ठांचा विषय असत. ग.ना. जाधवांच्या मुखपृष्ठातून हे सर्व कल्पकतेने व्यक्त झाले म्हणूनच या दृश्य नोंदींना दस्तऐवजाचेही महत्त्व आहे. काही विषय ठरावीक असूनही त्यातून जाधवांची तरल कल्पकता दिसून येते. 'स्त्री-१९४९' च्या मुखपृष्ठाचा विषय आहे 'स्त्रीचे सौंदर्यप्रसाधन'. विषय साधा, सनातन ठरावीकच आहे. पण तो चित्रकाराने फुलविला आहे. तरुण स्त्रीची बाहेर जाण्याची तयारी झाली असून ती आरशासमोर उभी राहून कर्णभूषणे घालीत आहे. नवरा थट्टेने तिला घड्याळाकडे बघत वेळेची जाणीव देत आहे. त्याची पोझ, चेहऱ्यावरील मिश्कील भाव दाखवण्याचे कसब प्रशंसनीय आहे. बाजूला छोट्याशा चौकोनात १९३०चे मुखपृष्ठ आहे. त्यातील स्त्री समोर त्याकाळानुसार घडीची लाकडी पेटी आहे. त्याला आरसा असे. ती पेटी, चटई, साधे लुगडे यांची जागा, १९४९ मधील चित्रात मोठ्या आरशाचे कपाट, गालिचा, सुळसुळीत साडी, पतीराजांची थट्टा, अशा उच्चभ्रू अभिरूचीपूर्ण सहजीवनाने घेतलेली आढळते.

लक्ष्मणराव व रामूअण्णा या किर्लोस्कर बंधूंनी १९१० ते ५० या चाळीस वर्षांत लक्षणीय प्रगती केली. शेतीचे आधुनिकीकरण व त्याला औद्योगिकतेची जोड ही वाटचाल एका चित्र चौकटीत जाधवांनी संवेदनशीलतेने व्यक्त केली. शरीरवैशिष्ट्ये दाखविणारी ती व्यक्तिचित्रे उत्तम आहेतच, पण पार्श्वभूमीला रामायणातील राम-लक्ष्मणाची जोडी, कुंडल येथील कारखाना, मैलांचे अंतर दाखविणारे दगड, अशा घटकातून त्यामागील व्यापक आशयही व्यक्त केला आहे. १९७५ मधील 'स्त्री' मासिकाच्या मुखपृष्ठावर 'मराठी स्त्रीच्या घडणीत 'शं.वा.किं.चा वाटा' हा विषय आहे. त्यासाठी शिल्पकार आधुनिक स्त्रीचा चेहरा घडवत आहे असे दृश्य पेश केले आहे. वरच्या बाजूस केवळ लाईन ड्रॉईंगमधून 'स्त्री आता घराबाहेर पडली आहे आणि वेगवेगळ्या क्षेत्रात वाटचाल करीत आहे' हे सूचकतेने व्यक्त केले आहे. ह्या प्रकारची कल्पकता व प्रभुत्व असलेली त्यांची शेकडो मुखपृष्ठे असून त्यातील वैविध्य चकित करते. ह्या प्रकाशनाची सुरुवातीची चित्रे कृष्ण-धवल अथवा एकरंगी होती. हळूहळू त्यात बदल होत ती अधिक आकर्षक व विविधरंगी होऊन मुद्रण तंत्रात झालेले बदल व विकासही सहजतेने लक्षात येतो.

मुखपृष्ठांखेरीज त्यांनी अनुभविलेले काही प्रसंग व काही ऐकीव घटनांतील चित्रमयतेने त्यांना साद घातली. त्याचीही अप्रतिम चित्रे निर्माण झाली. 'बुंदी पाडण्याच्या कामाचे दृश्य' विलक्षण वेगळे आहे. चुलीखालचा विस्तव, त्याची धग, क्षणात बघणाऱ्याला जाणवेल इतकी सळसळती आहे. त्या धगीतही एकाग्रतेने काम करणारा श्रमजीवी मनाला भिडतो. स्वातंत्र्य चळवळींच्या हालचाली, कट यांना निर्देश करणारी वेगळ्या आशयांचीही चित्रे त्यांनी काढली. त्यापैकी 'क्रांतिकारकाचा विवाह' हे चित्र नाना पाटीलांच्या पत्री सरकारशी संबंधित आहे. ह्या चळवळीतील लाड नावाच्या देशभक्ताने रात्री पोलिस चौकीला कुलूप लावून, पोलिसांना आतच डांबले व पेट्रोमॅक्स बत्तीच्या उजेडात सोहळा पार पाडला. वधूच्या मागे करवली ऐवजी तिरंगा धरलेला बालक आहे. नवऱ्या मुलाने न्हाव्याच्या वस्तऱ्याने आपले बोट कापून त्या रक्ताचा टिळा वधूला लागला आहे. प्रसंगातील थरार, नाट्यमयता, रात्रीचे वातावरण त्यांनी समर्थपणे व्यक्त केले आहे. विशेष म्हणजे चित्रकाराने स्वतःला तेथे स्केच करताना दाखविले आहे. ग.ना. जाधवांनी आपली नोकरी सांभाळून इतर प्रकाशनासाठीही चित्रे काढली. तसेच अर्थार्जनासाठी व्यक्तिचित्रे काढली, पण वेळ काढून सातत्याने 'स्वान्तसुखाय' अशी अभिजात निसर्गचित्रे व व्यक्तिचित्रे सातत्याने निर्माण केली हे विशेष!

निसर्गचित्रणात सुरुवातीला ठरावीक पठडीतील रंगहाताळणी करून नंतर त्यांची मुक्त अविष्काराकडे वाटचाल झाली. मंदिर परिसराचे १९३६ मधील चित्र व झाडाची सावली पडलेले लालसर रंगाचे एकमजली घराचे चित्र (१९५५) ही चित्रे त्याचे द्योतक आहेत. त्या एकमजली घराचे चित्र तसेच 'रानातून जाणारी बैलगाडी' ह्या चित्रांवर इम्प्रेशनिझमचा प्रभाव जाणवतो. काही निसर्ग चित्रांत एकाच वेळी पारदर्शक व अपारदर्शक रंग हाताळणी करून त्याला वेगळे आकर्षक परिमाण दिले आहे. उदा. 'पार असलेल्या मोठ्या वृक्षाच्या पार्श्वभूमीला गावाचे दृश्य' हे चित्र. 'पेशवेपार्क मधील तलाव' चित्राची

**टीप : 'स्त्री सौंदर्यप्रसाधन' तसेच 'क्रांतिकारकाचा विवाह' या चित्रांचा समावेश रंगीत पानांमध्ये केला आहे.**

रंगहाताळणी विशेष उल्लेखनीय आहे. आत्मविश्वासाने सोडलेले जलरंग आणि जलरंग माध्यमाच्या नितळपणाचे सौंदर्य हे त्या चित्राचे विशेष आहेत. 'काश्मीर दृश्यात' सरोवर, शिकारे, दूरवरचे बर्फाच्छादित पहाड, हे रम्य दृश्य आहे. यात ब्रशबरोबर ब्लेडचा उपयोग करून पोताचा (texture) लालित्यपूर्ण वापर केला आहे.

विविध कलाप्रकारांत त्यांनी दर्जेदार निर्मिती केली असली तरी ते जास्त रमलेले दिसतात ते व्यक्तिचित्रणात. विविध क्षेत्रांतल्या दिग्गजांपासून, सर्वसामान्यांपर्यंत आणि नवीन विधानभवन, पुणे विद्यापीठ येथील व्यावसायिक व्यक्तिचित्र ते कुटुंबातील व्यक्ती अशी अनेक चित्रे त्यांनी काढली. व्यक्तिचित्रणात सा.ल. हळदणकर व एम.आर. आचरेकर हे त्यांचे आदर्श असल्याचे जाणवते. प्रकाशन व्यवसायातील नोकरीमुळे साहित्यिक, कलावंतांशी परिचय झाला. बालगंधर्व, बाबुराव पेंटर, वि.स. खांडेकर, प्र.के. अत्रे, वि.द. घाटे, शांता शेळके, इतिहासाचार्य दत्तो वामन पोतदार अशांपैकी अनेकांना समोर बसवून त्यांनी व्यक्तिचित्रे काढली. तांबूस दाढीवाल्या काश्मिरी व्यक्तीचे चित्र, हिमाचल प्रदेशातील वेशभूषा असणारी वृद्धा, हिरव्या लुगड्यातील त्यांची पत्नी, लाल काठाच्या निळ्या लुगड्यातील त्यांची आई इत्यादी चित्रे त्यांच्या प्रभुत्वाची साक्ष देणारी आहेत. 'जलरंग' हे माध्यम हाताळण्यास कठीण. त्यात सातत्य व किमया असणारे चित्रकार कमीच, पण ग.ना. जाधव सहजतेने माध्यमाच्या संवेत्तानुसार जलरंग वापरीत. प्रसंगी ते झुगारून देत मुक्तपणे रंगलेपन करीत. पण बऱ्याचदा जलरंगाची पारदर्शकता, प्रवाहीपण, चेहऱ्याच्या घडणीनुसार एकमेकावर आच्छादलेले रंगलेपन सांभाळत त्यातून अंगभूत लय निर्माण करीत, आवेगपूर्ण अविष्कार करीत. अर्थातच त्यासाठीचे माध्यम प्रभुत्व व शरीररचनाशास्त्राचा सखोल अभ्यास त्यांच्या ठायी होता. 'आई' ह्या चित्रात वेगवेगळ्या पद्धतीने जलरंग लावण्याची किमया करीत तिच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रत्ययही दिला आहे. तो खरोखरीच अनुभवावा असाच आहे.

चित्रकार ग.ना. जाधवांच्या कारकिर्दीचा आढावा घेता लक्षात येते की स्वीकारलेल्या नोकरीत ते रमले. त्या पद्धतीच्या चित्रातही विविधता जोपासली. ब्रश प्रमाणे ब्लेड, पॅलेटनाईफ अशा साहित्याद्वारे नवनवीन तंत्रे वापरली. परिणामी कलेतील प्रभुत्वाने त्यांनी मुखपृष्ठांचा दर्जा उंचावला हे निर्विवाद! वास्तववादी शैलीतील व्यक्तिचित्रांच्या व निसर्गचित्रांच्या अभिजात निर्मितीत प्रावीण्य मिळवीत परिपूर्ण होण्याचा ध्यास त्यांना होता. सुरुवातीची, तंत्राच्या मर्यादेत असणारी अभ्यासपूर्ण चित्रकला उत्तरोत्तर स्वैर, विमुक्त होत गेली. पेन्सिल असो की पेन ॲण्ड इंक, जलरंग पेस्टल असो की तैलरंग, ही सर्वच माध्यमे ते प्रभावीपणे आवेगाने वापरीत, पण आवश्यक तेथे हळुवारही होत. वास्तववादी कलाप्रवाहात जे काही वेगळे, नवे बघत किंवा अनुभवत ते आत्मसात करून त्यावर प्रभुत्व मिळविण्याची तीव्र इच्छा त्यांच्या चित्रांतून स्पष्टपणे जाणवते. मात्र वास्तववादी कलेच्या परिघा बाहेर ते कधी गेले नाहीत. स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात येथे आलेले विरूपीकरण ते अमूर्तवादी आधुनिक कलाप्रवाहांचे भान त्यांना होते, पण त्याकडे ते कधी आकर्षित झाले नाहीत. याचे कारण कोल्हापुरातील त्यांच्या कलासंस्कारात असावे.

पंतप्रधान पंडित नेहरूंनी, राष्ट्रपती राजेंद्र प्रसादांनी त्यांचा गौरव केला होता. राज्य सरकारने त्यांना ज्येष्ठता सत्काराने सन्मानित केले होते. चित्रकार दलाल व ग.ना. जाधव समकालीन व समान क्षेत्रात काम करणारे. दलाल नेहमीच त्यांच्या चित्रांची प्रशंसा करीत. पुढील पिढीतल्या चित्रकार रवी परांजपेंना आपल्या तरुणपणी ग.ना. जाधवांच्या मुखपृष्ठ व कथा चित्रांबद्दल आदरयुक्त कुतूहल असे. स्वतःच्या कलाशिक्षणात जाधवांच्या शैलीचे संस्कार काही प्रमाणात झाल्याचे व त्यांनी मुंबईला जाण्याचा सल्ला दिल्याचे परांजपे यांनी नमूद केले आहे. परंतु इतके असले तरी म्हणावी तेवढी ग.ना. जाधवांची कदर झाली नाही हे खरेच!

इ.स. २००१ मध्ये अर्धांगवायूचा आघात होऊन, हात, शरीर दुबळे झाले. तरीही चित्र काढण्यासाठी पेन्सिल धरण्याचा शर्थीचा प्रयास करीत. ते शक्य होत नसे, पण अखेरपर्यंत त्यासाठी नेटाने प्रयत्न सुरू होता दि. ५ जानेवारी २००४ या दिवशी त्यांची प्राणज्योत मालवली. चित्रकार ग.ना. जाधव व त्या पिढीतल्या काही मातब्बर चित्रकारांनी केवळ वास्तववादी शैलीत काम केले तथापि आपल्या निष्ठेने, प्रभुत्वाने कलेचा तो प्रांत समृद्ध केला हे निश्चित. तसेच महाराष्ट्रातील परिवर्तनाची नोंद मुखपृष्ठे व कथा चित्रांद्वारे कल्पकतेने होण्यातही ग.ना. जाधवांचे महत्त्वाचे योगदान आहे.

ग.ना. जाधवांनी वयाच्या ७१व्या वर्षी आपले मनोगत लिहून ठेवले होते. त्यात ते म्हणतात, ''माझे चित्रकलेतील सात गुरू हे माझ्या कलेतील सप्तरंगी इंद्रधनुष्य होत. कला महर्षी बाबुराव पेंटर यांच्यासारखा गुरू मिळणे ही पूर्वजन्माची पुण्याई होय. कला हेच माझे परम पवित्र ईश्वरासारखे दैवत आहे. त्याची आराधना हाच माझा परमेश्वर. मी दुसरा देव मानत नाही. माझ्या इच्छेप्रमाणे मला मनसोक्त शास्त्रीय पद्धतीने कलाशिक्षण घेण्याची संधी योग्य वयात मिळाली नाही. याचे मला राहून राहून दुःख होते. तथापि मी अनेक प्रयत्न करून कष्टाने ते साध्य करण्याचा प्रयत्न केला, त्याचे मला उदंड समाधान आहे...''

ग.ना. जाधवांच्या जन्मशताब्दीनिमित्त त्यांच्या निवडक कलाकृतींचे प्रदर्शन पुण्याचे 'दर्पण कला दालन', कलाछाया कँपस, पत्रकार नगर लेन, विखे-पाटील स्कूलसमोर दि. १५ नोव्हेंबर २०१७ ते २१ नोव्हेंबर २०१७ या काळात भरत आहे.

**- साधना बहुळकर**
भ्रमणध्वनी : ९८९२९२६५८८
sadhanabahulkar@gmail.com

# ललित

## वर्गणीत वाढ

१ जानेवारी २०१८ पासून 'ललित' मासिकाच्या वर्गणीत खालीलप्रमाणे वाढ करण्यात येत आहे.

**वार्षिक वर्गणी ३८० रुपये**

**चार वर्षांची सवलतीची वर्गणी १४०० रुपये**

या वर्गणीत १८० रुपयांच्या दिवाळी अंकासह दहा अंक (यात विशेषांकांचाही समावेश आहे) देण्यात येतील.

: **सवलत** :

३० नोव्हेंबर २०१७ पर्यंत जे नवीन किंवा जुने वर्गणीदार वर्गणी भरतील त्यांना पूर्वीचे वर्गणीचे दर लावले जातील.

**वार्षिक वर्गणी ३३० रुपये,**

**चार वर्षांची सवलतीची वर्गणी १२०० रुपये.**

कागद, छपाई यांमधील दरात वाढ झाल्यामुळे नाइलाजास्तव वर्गणीत वाढ करण्यात येत आहे.

'ललित'चे वर्गणीदार नेहमीप्रमाणे सहकार्य देतील असा विश्वास आहे.

: **कार्यालयीन संपर्क** :

३०८, फिनिक्स, ४५७, एस. व्ही. पी. रोड, गिरगाव, मुंबई ४०० ००४.

दूरध्वनी २३८२ ६२२५ / २३८७ ३५०२

ashokkothawale@majesticprakashan.com

# 'दिल का दिया, जला के गया'

डॉ. मृदुला दाढे

**१६ नोव्हेंबर १९१७ हा संगीतकार चित्रगुप्त यांचा जन्मदिवस! आपल्या अनेक सुमधुर गाण्यांनी हिंदी चित्रपटसंगीत समृद्ध करणाऱ्या चित्रगुप्त यांच्या संगीताची म्हणावी तशी दखल घेतली गेली नाही आणि नेहमीच्या यशस्वी संगीतकारांच्या फळीत त्यांचं नाव घेतलं गेलं नाही, याची सल रसिकांच्या मनात आहे. त्यांच्या जन्मशताब्दीनिमित्त त्यांच्या संगीतसृजनाचा वेध घेणारा हा लेख...**

काही चाली या नाचऱ्या असल्या तरी उच्छृंखल नसतात. गंभीर असल्या तरी रडक्या नसतात. प्रणयोत्सुक असल्या तरी कामुक नसतात. लाजऱ्या असल्या तरी मुग्ध नसतात. खूप बोलतात, चमकदार डोळ्यांतून..! लहान मुलांच्या कुतूहलभरल्या डोळ्यांत असते अशी चमक. ती चमक त्यांच्यात जन्मतःच असते. सुसंस्कृतपणा, शालीनता, ग्रेस, खानदानी अदब घेऊनच, यात चिंब भिजूनच त्या येतात. अशा गाण्यात आवाजाला एक धार असतेच. पण ती धार बोचरी नसते. त्यात विलक्षण सोज्ज्वळपणा असतो. हा तोल सांभाळणारा संगीतकार म्हणजे चित्रगुप्त! भले चित्रगुप्तच्या नावाने उसासे सोडणारे चाहते नसतील, त्यांच्या चालींवर हमरीतुमरीवर येऊन पैजा लावणारे वेडे नसतील, पण जाणकारांच्या भावविश्वात चित्रगुप्तांच्या अनेक चाली फार हळव्या जागी रुतून बसल्या आहेत. सामान्यांना त्या चालींचा जन्मदाता चित्रगुप्त आहे हेही माहीत नसेल. अर्थात त्यांच्या जन्मदात्यालाही याची फारशी फिकीर नसावी कधी..

चित्रगुप्त हे नाव खरं तर प्रा. चित्रगुप्त श्रीवास्तव असं लिहायला हवं. १६ नोव्हेंबर २०१७ साली बिहारमधल्या गोपालगंज जिल्ह्यात कमरेनी नावाच्या गावी चित्रगुप्तांचा जन्म झाला. वडीलबंधू जगमोहन हे पत्रकार आणि संगीताची आवड जपणारेही. चित्रगुप्तांना सुरुवातीची प्रेरणा त्यांच्याकडूनच मिळाली आणि त्यांनी पं. शिवप्रसाद त्रिपाठी यांच्याकडून शास्त्रोक्त संगीताचं पायाभूत शिक्षणही घेतलं. पाटणा विद्यापीठातून अर्थशास्त्र घेऊन एम. ए. करणारा हा पहिलाच आणि किंबहुना एकमेव पदवीधर संगीतकार! १९४५ साली मुंबईत येऊन हळूहळू संगीत क्षेत्रात उमेदवारी करत असताना एस. एन. त्रिपाठींकडे साहाय्यक म्हणून काम मिळालं आणि १९४६ साली, 'लेडी रॉबिनहूड' या चित्रपटाला स्वतंत्रपणे संगीत देण्याची संधी सुद्धा, पण पुढे जवळ जवळ दहा वर्ष ते हाणामारीच्या, पौराणिक, भक्तिरसप्रधान अशा प्रकारच्या चित्रपटांतच अडकून पडले. यातूनच, सचिन देव बर्मन यांनी शिफारस केल्यामुळे १९५५ मध्ये 'शिवभक्त' हा चित्रपट मिळाला आणि लताबाई प्रथम त्यांच्याकडे गायल्या. आणि गाणं नव्हे, तर चक्क तिल्लाणा! 'कैलाशनाथ प्रभू अविनाशी' हा तो तिल्लाणा! पुढे सामाजिक चित्रपटांची दारं खुली झाली आणि मग 'भाभी' (१९५७) या अत्यंत सुरेख कथा आणि संगीत असलेल्या चित्रपटाने चित्रगुप्तांना एक निराळी, नवी पहचान दिली आणि मग हा प्रवास सुरूच राहिला.

'कारे कारे बादरा', 'चल उड जा रे पंछी', 'हाय रे तेरे चंचल नैनवा', 'दिल का दिया जला के गया', 'जाग दिले दिवाना' ही पाच गाणी देऊनही चित्रगुप्त स्वतःचं नाव अजरामर करू शकले

असते. काही वेळा, संगीतकाराच्या गाण्यांपेक्षा त्याच्या दुर्दैवी असण्याची निष्फळ चर्चाच जास्त केली जाते. खरं म्हणजे, यशापयश, उपेक्षा किंवा सन्मान हे कालसापेक्ष नसतात का? उरतात ती केवळ अशा संगीतकारांनी दिलेली गाणी! ती शंभर नंबरी सोन्यासारखी असली, तर त्या संगीतकाराच्या पश्चात कैक वर्ष टिकतात, गाजत राहतात. तो संगीतकार त्या यशाची चव चाखायला जिवंत नसतो, हीच एक दुखःद बाब!

लता नावाचा एकच आवाज, किती संगीतकारांच्या शैलींतून अवतरला? अनेक प्रकारच्या टोन्समुळे, हरकती, जागा घेण्याच्या शैलीमुळे, पॉझ घेण्याच्या पद्धतीमुळे, त्या हरकतींच्या कोनाकोनातून सुद्धा वैविध्य दाखवण्याच्या लोकोत्तर क्षमतेमुळे, अनेक संगीतकारांचं घराणं एकच असलं तरी ती शैली स्वतःचा वेगळेपणा दाखवू शकली. हे आपलंही भाग्यच. नाहीतर माधुर्य घराण्याचा हा संगीतकार फार दुर्लक्षित राहिला असता कारण गोडवा किंवा माधुर्य हा एकच शब्द, पण छटा हजारो! वात्सल्याची वेगळी, गोड प्रियतमेची वेगळी, प्रेमळ कर्तव्यदक्ष पत्नीची वेगळी. कित्येक वेळा या गोडव्याचा अतिरेक होऊ न देण्याची सुद्धा खबरदारी घ्यावी लागते. मग मींडेतून आलेल्या साखरपाकाची मिठी काढायला एखादी धारदार फ्रेज योजावी लागते. अन्यथा, 'हाय रे तेरे चंचल नैनवा' मधल्या 'हाय' वरच मिठी बसेल! तो गोडवा बॅलन्स करायला, पुढच्या



संगीतकार चित्रगुप्त आणि महम्मद रफी



संगीतकार चित्रगुप्त आणि लता मंगेशकर



'पतंग'



'शिवभक्त'

ओळीतल्या 'कुछ बात करे'च्या 'बात' वर एक हरकत नको का? 'कारे कारे बादरा, जारे जारे बादरा, मेरी अटरिया न शोर मचा' मधल्या 'मचा'वर काय असतं नेमकं? ठेका तिथेच कसा काय मिळतो? 'कारे कारे' म्हणत खाली यायची शैली खास चित्रगुप्ती! त्या चारही अक्षरांना आस आहे. फक्त गंमत म्हणून एक विचार करून पहा. ही चार अक्षरं ओ.पी.नी staccatto म्हणजेच तुटक पद्धतीने बांधली असती, पण चित्रगुप्त ती आस ठेवतात कारण ती आस त्या मेलडीला आणखी गोड बनवते कारण ओपींना त्यातला रिदम पकडायचा असतो आणि चित्रगुप्तांना मेलडी.

चित्रगुप्त आणि लताबाई हा एक खास वेगळाच रंग आहे. त्या गोडव्याची जात अतिशय खानदानी तर खरीच, पण यात एक वेगळाच निरागसपणा जाणवतो. 'दिल को लाख सँभाला जी', 'दगा दगा वई वई वई', 'रंग दिलकी धडकन भी लाती तो होगी'सारखी कित्येक गाणी लताबाईंच्या एकूण रत्नभांडारात महत्त्वाचं स्थान पटकावून आहेत.

'रंग दिलकी धडकन' (पतंग)चा लाडिकपणा कशामुळे काळजाला गुदगुल्या करतो? त्या 'लाता तो होगी'मधल्या 'लाती'वरचा तो हेल, त्या शब्दाला मधात चिंब भिजवतो. 'लाती', 'आती', असे शब्द त्यातला इकार लांबवल्यामुळे किती अर्थपूर्ण झाले! अशा एखाद्या जिवघेण्या आकारात सगळं गाणं सामावलं जातं. या गाण्याची हीच ओळख. असा उच्चार. असे स्वर पुन्हा कुठे

पाणीदार! आणि काय वेग, काय ठेका आहे त्या गाण्याला. हेलनच्या पावलात दडलेली लय. अंगात भिनलेला तो ठेका, ते नृत्य बघणं हा एक सुंदर अनुभव आहे! इतका चुस्त, समजून वाजवलेला ठेका ज्या वादकांच्या बोटांमधून उमटला, त्यांना लाखो सलाम!

'तडपाओगे, तडपालो! हम तडप तडप कर भी तुम्हारे गीत गायेंगे' (बरखा) हे तर वरवर पाहता एक गद्य वाक्यच वाटतं. तो 'तडप तडप' वरचा पंचम किती अनाघ्रात, किती स्वच्छ! 'तडप तडप' या शब्दांसाठीच तो स्वर जन्माला आला असेल का? या सहा अक्षरात, एकाही अक्षरावर तो स्वर, पाव मायक्रोसेंटिमीटर देखील हलत नाही की त्याचं वजन कमी होत नाही. 'तडप' हा तर एक कठोर शब्द ना? आणि 'ठोकर' हा तर अर्थानेही कठोर! पण तो सुद्धा शहाळ्यातल्या मलईसारखा, मुलायम, कानामध्ये हुळहुळेल इतका गोड. 'तडपालो'चा उच्चार कधी लटक्या रागाने, कधी प्रेमाने, कधी समजावत केलेला आणि सगळ्यात महत्वाचं म्हणजे शुभा खोटेंच्याच आवाजात ऐकतोय असा वाटण्याइतपत लताबाईंनी वेगळा आवाज लावलाय.

चित्रगुप्तांची, ती विशिष्ट आस ठेवण्याची खासियत प्रकर्षाने जाणवते ती 'दिवाने तुम दिवाने हम, किसे फिकर क्या कहेगा जमाना (बेजुबान)' या गाण्यात! अंतऱ्यात पारंपरिक ठेका आणि धृपदात वेस्टर्न ठेका असं मस्त कॉम्बिनेशन तर यात आहेच, पण अंतऱ्यातून धृपदावर येताना



'आकाशदीप'



'मैं चूप रहूंगी'



'भाभी'



बरखा

दादऱ्यातून ते गाणं हलकेच मूळ ठेक्यावर येतं तेव्हा, 'नयी मेहफिल, नयी हलचल, है कहाँ हम जाने ना' या शब्दात जी आस लताबाई देत-देत खाली उतरतात ते केवळ अप्रतिम!

'हाय रे तेरे चंचल नैनवा' (उंचे लोग) म्हणजे, पहिल्या शब्दापासूनच एक तहान वाढवणारी तृप्ती! 'हाय' या शब्दामुळे ऐकणारा पूर्णपणे ट्रान्समध्ये जाऊ शकतो, पण पुढचं गाणं ऐकायची तहान त्या तृप्तीतूनच जन्माला येते. 'हाय' शब्दातून जगला वाचलात तर पुढे 'चंचल'चं टायमिंग, त्याचा उच्चार, हे सगळं अनुभवायचं.

खुलके ये बाते काम करे,
चुपके चुपके ये सितम करे
बस डोले, न कुछ बोले,
पलकोंसे मुस्काये!

किती सुंदर शब्द! डोळ्यांतून हसणं माहीत होतं पण पापण्यांतून? क्या बात है! आणि ते शब्द पुन्हा तीच चित्रगुप्ती आस घेऊन खाली उतरतात, 'मुस्काये' आणि 'हाये' हे शब्द एकसंध होतात, तुम्ही त्या धृपदावर कसे आलात, कधी आलात हे तुमचं तुम्हालाच कळत नाही. असा न टोचणारा, न धक्के बसणारा हा प्रवास करणं फार कठीण!

तालाचा ठेका गाण्याच्या शब्दांना समांतर न जाता, त्यांच्यात स्वतःला गुंतवत ठेवण्याचं कसब चित्रगुप्त यांना होतं. म्हणजे काय? तर याच गाण्यात 'खुलके ये बातें कम करे' ही ओळ दुसऱ्या वेळी जेव्हा येते तेव्हा 'खुलके-ये-बा-ते-' असा

ठेकाही वेगळी वळणं घेतो. त्या त्या अक्षरांवर वेगळा जोर देत तो ठेका येतो. 'तडपालो'मध्ये ठेका अतिशय ठसक्यात वाजतो आणि त्या पिकअपमुळे त्या शब्दांना धार येते.

चित्रगुप्तांचं लताबाईंना दिलेलं सगळ्यात सुंदर गाणं म्हणजे 'दिलका दिया जलाके गया, ये कौन मेरी तनहाई में!' (आकाशदीप) या, अशा आवाजातील बाईंचं हे एकमेव गाणं असावं! एकदा अस्फुट आवाजात सलीलदांकडे 'मेरे मन के दिये' त्या गायल्यात, पण या गाण्याचा मूडच वेगळा. तो संपूर्णपणे आतला, खाजगी! कधी-कधी सुखाचे क्षण एकांतात स्वतःशी अनुभवतानाही भीती वाटते. ते सुख इतकं खाजगी, हळवं असतं. स्वतःचीच दृष्ट लागायची त्याला मोठ्याने व्यक्त केलं तर! नकोच त्यापेक्षा. स्वतःचं बोलणं स्वतःला ऐकू गेलं तरी मोहरून जाऊ आपण. त्यापेक्षा कुजबुजण्यातच मजा आहे. हा आवाज इतका कोवळा, अगदी केळीच्या आतल्या गाभ्याइतका अस्पर्श! या आवाजात अजून गाणी यायला हवी होती ही रुखरुख मनाला लागते.

काँपते लबोंको मै खोल रही हूँ
बोल वही जैसे के बोल रही हूँ
बोल जो डूबे से कहीं
इस दिल की गहराई में...

या शब्दांतच या आवाजाचं मर्म आहे. असा आवाज लावावा हे कसं कुणी ठरवलं असावं? अतर्क्यच आहे सगळं!

'कारे कारे बादरा, जारे जारे बादरा. मेरी अटरिया न शोर मचा' (भाभी) सारखं गाणं, मल्हाराच्या कुशीतून येतं. 'मेरी अटरिया'पासून ते 'कारे कारे बादरा'पर्यंतच्या ओळी बाई एका श्वासात गायल्या आहेत. तेही खालच्या बादराला पूर्णपणे खालच्या पंचमाकडे सुखरूप सोपवून! अंतऱ्याची, 'सीखे कहाँसे ये ढंग छलिया' ही ओळ खूप सुंदर ठेक्यात येते. 'काहेको जगाया, ओ बैरी मैं तो सोयी थी' यातला 'सोयी' शब्द कैक्दा ऐकावा. नाहीच समाधान होत. अशा वाईट सवयी कानांना लागल्या की सगळं अवघड होऊन बसतं!

लताबाईंच्या आवाजात 'चंदा लोरियाँ सुनाये' (संसार)सारखी मधाळ अंगाई चित्रगुप्तनी दिली. त्याला लोकसंगीताची एक वेगळीच खुमारी आहे. एखाद्या पारंपरिक स्त्रीगीतासारखीच त्याची बांधणी आहे.

चित्रगुप्तांची शैली खुलली ती खास लताबाईंच्या गाण्यात आणि काही अत्यंत सुंदर अशा युगुलगीतांत. किती तरी मेलोडियस गाणी आठवतात, 'दो दिल धडक रहे है' (इन्साफ : ज्यात आशाबाईंचा आवाज महा गोड लागलाय.). 'ये पर्बतोंके दायरे' (वासना), 'तेरी दुनिया से दूर' (काली टोपी लाल रुमाल), 'इक रातमें दो दो चांद खिले' (बरखा), 'कोई बतादे दिल है जहाँ' (मै चुप रहुंगी), 'चली चली रे पतंग मेरी चली रे' (भाभी) आणि कितीतरी. त्यातल्याच, 'ये पर्बतोंके दायरे, ये शामका धुँआ. ऐसे में क्यूँ न छेड दे दिलोंकी दास्ताँ' या गाण्याचा नूर काही और आहे.

एक धूसर संध्याकाळ. जाणवणारी तगमग, कुठेतरी ही तगमग संपावी अशी अनिवार ओढ, आकर्षण, एकमेकांच्या अस्तित्वाची ओढ एक धूसर सीमेरेषा ओलांडू पाहतेय. 'बिछ्डी हुई रुहोंका ये मेल सुहाना ही. इस मेल का कुछ अहसान, जिस्मोंपे भी कर जाये' अशी काहीशी भावना, पण हे प्रेम शरीरापासून सुरू होऊन शरीरात संपणारं नाही. दोन आत्म्यांचं मिलन केव्हाच झालंय, मग सर्वार्थाने का नाही एकरूप व्हायचं? अशी ती संभ्रमावस्था आहे. खूप सुंदर चाल मिळाली की शब्दातला आतला अर्थ बाहेर येतोच.

'जरासी जुल्फ खोल दो, हवामे इत्र घोल दो' काय अंदाज! साहिरच्याच 'जुल्फ शानेपे मुडी, एक खुशबू सी उडी, खुल गये राज कई' या ओळींची आठवण यावी!

ये चुप भी इक सवाल है, अजीब दिल का हाल है
हर इक खयाल खो गया बस अब यही खयाल है
के फासला न कुछ रहे हमारे दरमियाँ...

आता कुठलंच अंतर नको. या 'फासला' शब्दावरच कसा 'सा'पासून 'ध'पर्यंतचा मोठा पल्ला येतो आणि त्या अंतराचा भास केवळ त्या स्वरांतरामुळे नाही तर त्या 'फासला' शब्दाच्या उच्चारातही गाठला जातो. हे महत्त्वाचं!

ये रंग रूप ये फबन, चमकते चांदसा बदन
बुरा न मानो तुम अगर तो चूम लू किरन किरन
के आज हौसलो में है बला की गर्मियाँ

याहून सुंदर, याहून संयत, याहून ग्रेसफुल शारीर आकर्षण शब्दात उमटणं खरच कठीण आणि त्याहून ती धग स्वरात पकडणं दुरापास्तच. रफीचा आवाज काय-काय करू शकत होता! 'गर्मियाँ' शब्दाचा उच्चार खूप काही सांगून जातो. शायरीच्या पलीकडे जाऊन गायक गळ्यातून जे व्यक्त करू शकतो, ते हेच!

रफी-लताच्या, 'छुपाकर मेरी आँखोको, वो पूछे कौन है जी हम' (भाभी). या गाण्यात तर मला रोमान्सपेक्षा निरागसपणाच दिसतो. मुळात, मागून येऊन डोळे झाकून 'ओळख बघू कोण ते?' असं म्हणण्यातली निरागसताच आपण विसरलो आहोत. ही गोष्ट तर सोडाच. त्या शब्दावर मंद्रातला पंचम काय सुरेख लागलाय. हा स्वर अत्यंत गोड आणि निष्पाप. या एकाच स्वराने हे गाणं उजळून टाकलंय. अगदी सुहाग रात्रीचं गाणं. पण खूप कोवळं, निरागस! प्रेमाच्या तरी किती छटा असाव्यात!

'लागी छूटे ना अब तो सनम'(काली टोपी लाल रुमाल) या गाण्यात मला एक वेगळा भक्तिभाव जाणवतो. या गाण्याला एक दैवी छटा आहे. ही 'लागी' म्हणजे साक्षात भगवंताशी जोडलेलं नातं! गाण्याचा मूड विरहाचा, तरी त्याची लय जलद आणि माऊथ ऑर्गनचा वापर. या गाण्याला वेगळ्या उंचीवर नेतो. कबीराच्या दोह्यासारखं वाटतं हे गाणं. ही जन्मजन्मांतरीची नाती अशी क्षणिक

बादळांनी तुटत नसतात हेच खरं! याच चित्रपटातलं, 'तेरी दुनिया से दूर' हे याच गाण्याचं भावंडं वाटतं. मेलडीची भक्कम साथ चित्रगुप्तच्या गाण्यात कुठेही सुटत नाही हे महत्त्वाचं. एक अगदी नटखट, खट्याळ युगुलगीत म्हणजे 'देखो मौसम क्या बहार है'(ऑपेरा हाउस). मुकेश किती खुललाय या गाण्यात!

'चल उड जा रे पंछी' (भाभी) हे गाणं, रफीच्या कारकिर्दीत किती महत्त्वाचं! राजेंद्र कृष्णांची लेखणी एकाच वेळी खूप हळवी आणि कठोरही होते.

''जिथे जीव रमला, तिथून निघून जाणं हे वेदनादायीच. काळजाचं पाणी करून एक आशियाना निर्माण करणं, उन्हापावसाची पर्वा न करता ती बाग शिंपणं आणि एके दिवशी हे सगळं सोडून जाणं, या यातना कुणाला सांगायच्या? आणि आता इथलं काही नकोच मला. उलट काहीतरी देऊनच जाईन मी! कोण जाणे पुन्हा येईन की नाही?'' गलबलून टाकतं हे गाणं. काळजाचे धागे असे तोडून निघणं. मग ते गाव, जन्मभूमी असो, जिवलग असो, हे इथलं आयुष्यच असो. किती दाहक दुःख आहे हे? किती दिशांनी हे गाणं भिडतं. दुनिया रैन बसेराच आहे शेवटी. हे जग एके दिवशी 'बेगाना' ठरवून तुला पाय काढावाच लागणार आहे. आपणच वाढवलेला पसारा क्षणात आवरता येतच नसतो. 'रोते है ये पंख पखेरू. साथ तेरे जो खेले!' जीव लावलास, पण तो काढताही आला पाहिजे वेळ आल्यावर! मनाचं हे पाखरू. किती गुंतलं. किती दुखावलं, पण त्याला आता पुढच्या अवकाशात झेप घ्यायलाच हवी ना? चित्रगुप्तांनी फार सुंदर स्वरात या काव्याचं मर्म पकडलं आणि रफी हे गाणं अक्षरशः जगलाय. सुरुवातीचा तो 'चल' इतका खिन्न, पडलेला. त्यात पराभव आहे, इच्छेविरुद्ध निघण्याचा भाव आहे. उत्साही 'चल' वेगळा असतो. हा 'चल' खूप उदास! इथेच या गाण्याची दिशा निश्चित होते. काही गाणी छान म्हणून वारंवार ऐकतो आपण. हे गाणं तसं नाही. फार उदास करतं हे गाणं. कुठल्या कुठल्या विरहाच्या, मनाविरुद्ध घर–जन्मभूमी–कर्मभूमी सोडण्याच्या जखमांवर आता कुठे खपली धरलेली असताना अशा गाण्यांनी ती निघते आणि भळभळा रक्त वाहायला लागतं.

एखादी सकाळ उजाडते तीच एक अनामिक उत्कंठा घेऊन मनातल्या भावनांचंही ते एक उमलणं असतं. कसल्यातरी अनामिक ओढीनं, वेगळ्याच भावविश्वात जाग येते. मनात जपलेली एक अस्फुट प्रतिमा प्रत्यक्षात येण्याची, ज्याच्या भेटीसाठी अनेक युगं आस लागली, त्या जिवलगाला भेटण्याची ती वेळ! मनातली ती परी दवात चिंब भिजून प्रतीक्षा करतेय. थोडी उदास थोडी आनंदी. (एक परी, कुछ शादसी नाशादसी.) नाजूक कळीसारखी. ती भिजलेली असतानाच तिला स्पर्शावं आणि ही तगमग संपवावी. 'जाग दिले दिवाना', 'रुत जागी वस्ले यार की' (उंचे लोग), रफीचा आवाज त्या दवात भिजून, त्या अस्फुट कळीचा सुगंध घेऊनच येतो. पहिला 'जाग' हा शब्दच खूप प्रणयोत्सुक. चित्रगुप्त या गाण्यात खूप आत–आत झिरपणारी मेलडी घेऊन आले. हे गाणं इतकं हळुवार, मुलायम! कुठेही स्वरांचे, शब्दांचे कोपरे टोचत नाहीत. सगळं त्या पहाटेच्या गार झुळुके इतकंच सुखद.

चित्रगुप्त हा एक 'अनसन्ग हिरो' (Unsung Hero) राहिला. 'अनाम वीरा'सारखा, 'स्तंभ तिथे न कुणी बांधला, पेटली न वात' असं काहीसं त्यांच्या बाबतीत झालं. पौराणिक आणि हाणामारीच्या चित्रपटांपासून सुरू झालेली कारकीर्द प्रथम दर्जाच्या चित्रपटांना आणि अतिशय उत्तम काव्यमूल्य असलेल्या गाण्यांना संगीत देण्यापर्यंत नेणं ही सोपी गोष्ट नाही. चित्रगुप्तांनी ते करून दाखवलं. 'अँखियन अँखियाँ लागी आज' (बडा आदमी) सारखं, मालकंस रागावर आधारित गाणं असो की 'जोडी हमारी जमेगा कैसे जानी' (औलाद)सारखं संडे के संडे स्टाईल गाणं असो, त्यांचा दोन्ही ठिकाणी सहज वावर होता कारण मूळ मेलडी डोक्यात घट्ट होती. ती रक्तात असली की कुठल्याही प्रकारचं गाणं असलं तरी ते श्रवणीयच झालं पाहिजे हा निकष मोडला जात नाही. ओ.पी. नय्यर, शंकर जयकिशन, लक्ष्मीकांत प्यारेलाल यासारखी वादळं आली. त्यामुळे ही ज्योत किंचित थरथरली, पण विझली मात्र नाही. कारण चित्रगुप्तांची मेलडी एका रात्रीत हवा निर्माण करणारी नव्हती, तशी एका रात्रीत विसरली जाणारी सुद्धा नव्हती. काही भावना या आपल्या आयुष्यात स्थायी स्वरूपात मौजूद असतात. आपलं बालपण, त्यातल्या आठवणी आणि आपण आज जगत असलेलं आयुष्य, यात कुठे साम्य असतं? पण तो कप्पा अस्तित्वात असतोच. अनेक घटना, प्रसंग, त्यावर पडदा टाकू शकत नाहीत. तशीच काहीशी चित्रगुप्तांची गाणी! हा कप्पाच वेगळा. या परिकथेतली पात्रंच वेगळी, यातली लता वेगळी, तिचा आवाज वेगळा. त्यांचा या मदनमोहन, शंकर जयकिशन आदींनी व्यापलेल्या जगाशी काही संबंधच नाही. 'विजयासाठी माझी कविता कधीच नव्हती, म्हणून नव्हती भीती तिला पराजयाची.' असं काहीसं चित्रगुप्तांच्या बाबतीत म्हणावसं वाटतं. १४ जानेवारी १९९१ या दिवशी चित्रगुप्तांनी या जगाचा निरोप घेतला. पण आनंद मिलिंद या पुत्रद्वयाचं, 'कयामत से कयामत तक' या चित्रपटाच्या संगीताचं तुफान यश बघूनच.

एक अत्यंत शांत, सात्त्विक, स्वतःचं काम अत्यंत चोखपणे करणारा, फक्त श्रवणीयच संगीत जन्माला घालणारा हा संगीतकार, मनाचा दीप तेजाळून गेला.

सोये नग्मे जाग उठे., होठोंकी शहनाईमें
दिल का दिया जलाके गया, ये कौन मेरी तन्हाईमें..!

**– डॉ. मृदुला दाढे**
भ्रमणध्वनी : ९९२००८१०८०
mruduladj@hotmail.com

# महाराष्ट्र शासन
## मराठी भाषा विभाग
## राज्य मराठी विकास संस्था

## भारतातील पहिलं पुस्तकांचं गाव

मु. पो. भिलार, ता. महाबळेश्वर, जि. सातारा ४१२८०५ संपर्क क्र. ०२१६८-२५०१११ / pustakanchgaav.rmvs@gmail.com

स्ट्रॉबेरीसोबत पुस्तकांचा आनंद घ्या. !

पुस्तके वाचायला या / राहायला या

निवास व्यवस्था - सशुल्क असेल

२५ घरे, २५ साहित्य प्रकार,
१५,००० हून अधिक पुस्तके,
दर्जेदार पुस्तके

## राज्य मराठी विकास संस्था

एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महानगरपालिका मार्ग, धोबीतलाव, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी : (०२२) २२६३ १३ २५ / फॅक्स : २२६५ ३९ ६६ / http://rmvs.maharashttra.gov.in

### निवडक प्रकाशने

- कोश / सूची

१. मराठी ग्रंथसूची (भाग १ ते ६)
२. मराठी कोश व संदर्भ साधने यांची समग्र सूची
३. मराठी वैद्यक ग्रंथसूची
४. मराठी विज्ञानवाङ्मय सूची
५. वस्त्रनिर्मिती माहितीकोश (खंड १ ते ४)
६. यंत्रालयाचा ज्ञानकोश
७. फार्सी-मराठी व्युत्पत्तिकोश
८. दलित ग्रामीण साहित्य शब्दकोश (खंड १ ते ३)
९. विज्ञान संकल्पना कोश (इयत्ता ५ वी ते १० वी)
१०. शालेय मराठी शब्दकोश (इयत्ता ५ वी ते १२ वी)

- भाषाविषयक

१. मराठी भाषा : वाढ आणि बिघाड
२. बेलभाषा
३. भाषा - आपली सर्वांचीच
४. वृद्धिः भाषेचे व भाषाभ्यासाचे विकसन
५. शिक्षण, शिक्षक व अभ्यासक्रम
६. पालघर तालुका - बोली, समाज व संस्कृती

- चरित्रमाला

१. बालगंधर्व : व्यक्ती आणि कार्य
२. डॉ. अ. का. प्रियोळकर : व्यक्ती आणि कार्य
३. शंतनुराव किर्लोस्कर : व्यक्ती आणि कार्य
४. गंगाधर बाळकृष्ण सरदार : व्यक्ती आणि कार्य
५. व्याकरणकार मोरो केशव दामले : व्यक्ती आणि

- शालेय गट

१. वाचू आनंदे (बाल गट व कुमार गट)
२. शिक्षणाचे अंतरंग
३. मराठी लेखन मार्गदर्शिका
४. का आणि कसे ?
५. तारकांशी मैत्री

- श्राव्य पुस्तके

१. दासबोध (५ सीडीजचा संच)
२. कृष्णाकाठ

### महत्त्वाचे प्रकल्प

- दृक्श्राव्य मालिका :आकाशदीप व पिंपळपान
- दक्षिण भारतातील मराठी वाङ्मयाचा इतिहास
- आधुनिक महाराष्ट्राची जडणघडण
- महाराष्ट्राचा भाषिक नकाशा
- मोडी हस्तलिखितांचे देवनागरीकरण
- युनिकोडाधारित मराठी टंकांची निर्मिती
- मराठी संकेतस्थळांची स्पर्धा
- इ-पुस्तके (इ-) निर्मिती
- दुर्मिळ मराठी ग्रंथांचे संगणकीकरण
- एन.सी.इ.आर.टी. तसेच विज्ञान प्रसार या संस्थांच्या पुस्तकांचे भाषांतर
- मराठीचे भाषिक टप्पे: दृक्श्राव्य मालिका
- भाषाविषयक चर्चासत्रे, सर्वेक्षणे, पुस्तक प्रदर्शने इत्यादी प्रासंगिक उपक्रम

### प्रशिक्षण योजना

- अमराठी भाषकांसाठी मराठी
- संगणकावरील मराठी
- मराठी व्याकरण
- अनुवाद प्रशिक्षण
- मोडी लिपी शिक्षण

### आगामी प्रकाशने

- शालेय मराठी शब्दकोश
  तिसरी सुधारित आवृत्ती
  (इयत्ता ५ वी ते १२ वी)
- मराठी लेखन मार्गदर्शिका
  तिसरी सुधारित आवृत्ती
- दलित ग्रामीण साहित्य शब्दकोश
  (खंड ३)
- वस्त्रनिर्मिती माहितीकोश
  वस्त्र प्रावरणे फॅशन (खंड ५)

सर्व प्रकाशनांवर ४० टक्के सूट
अधिक माहितीसाठी
संकेतस्थळाला भेट द्या.

# वाघ आला, वाघ आला, पळा

**मूळ कथा : सआदत हसन मंटो**
**अनुवाद व परिशिष्ट : किरण येले**

▼

मंटोच्या बहुतांशी सगळ्याच कथांचा शेवट अत्युच्च पातळीवर होतो. या अशाच उपहासाचा फॉर्म वापरलेल्या कथांपैकी एक कथा म्हणजे 'वाघ आला, वाघ आला, पळा' मंटोची ही कथा मराठी आणि हिंदीतही दुर्लक्षित राहिल्याचे दिसते किंवा तिची फार चर्चा झाली नसल्याचे आढळते. मंटोची ही कथा आजही अनेक अर्थांनी प्रसरणशील होत आपल्या जगण्याला भिडते...



ज़माने के जिस दौर से हम गुज़र रहे हैं, अगर आप उससे वाकिफ़ नहीं हैं तो मेरे अफसाने पढ़िये और अगर आप इन अफसानों को बरदाश्त नहीं कर सकते तो इसका मतलब है कि ज़माना नाक़ाबिले-बरदाश्त है। मेरी तहरीर(लेखन) में कोई नुक़्स नहीं । जिस नुक़्स को मेरे नाम से मनसूब किया जाता है, वह दरअसल मौजूदा निज़ाम का एक नुक़्स है। मैं हंगामा-पसन्द नहीं हूं और लोगों के ख्यालात में हैज़ान पैदा करना नहीं चाहता। मैं तहज़ीब, तमद्दुन, और सोसाइटी की चोली क्या उतारुंगा, जो है ही नंगी। मैं उसे कपड़े पहनाने की कोशिश भी नहीं करता, क्योंकि यह मेरा काम नहीं, दर्ज़ियों का काम है ।

~ मंटो

उंच टेकडीवर उभा धनगराचा मुलगा, दूर जंगलांच्या दिशेने तोंड करत ओरडत होता, ''वाघ आला, वाघ आला, पळा.''

खूप वेळ तो आपला घसा फोडत राहिला. त्याचा तरुण आणि मोठ्ठा आवाज खूप वेळ वातावरणात घुमत राहिला. ओरडून ओरडून जेव्हा घशाची नळी सुकली तेव्हा वस्तीतून दोनतीन म्हातारे काठ्या टेकत वर आले आणि धनगराच्या मुलाचा कान पकडून घेऊन गेले.

पंचायत बोलवली गेली. वस्तीतले सगळे बुद्धिवान जमा झाले आणि धनगराच्या मुलावरील खटल्याला सुरवात झाली.

तरुण मुलाचा एकमेव गुन्हा हा होता की त्याने चुकीची बातमी दिली आणि वस्तीच्या शांततेत बाधा आणली.

मुलगा म्हणाला, ''माझ्या वडिलधाऱ्यांनो, ज्येष्ठांनो, तुम्ही गैरसमज करून घेत आहात. वाघ आला नाही, याचा अर्थ असा नाही की येऊ शकत नाही.''

उत्तर मिळालं, ''तो नाहीच येऊ शकत.''

मुलाने विचारलं, ''का?''

''कारण वनविभागाच्या अधिकाऱ्याने आम्हाला पत्र पाठवलं होतं की वाघ म्हातारा झाला आहे.''

''पण तुम्हाला हे माहीत नाही की त्याने काही दिवसापूर्वी कायापालट केला आहे.'' मुलगा म्हणाला.

''ही अफवा आहे. उत्तर मिळालं, आम्ही वनविभागाच्या अधिकाऱ्यांना विचारलं होतं आणि त्यांनी आम्हाला सांगितलं कायापालट करण्याऐवजी वाघाने आपले सगळे दात काढून टाकले आहेत कारण त्याला आयुष्याचे उरलेले दिवस अहिंसेने जगायचं आहे.''

''अहो माझ्या वडिलधाऱ्यांनो, पण हे उत्तर खोटं कशावरून नसेल?'' मुलाने मोठ्या आवेशाने म्हटलं.

तसं सगळ्यांनी एकमुखानं म्हटलं, ''आमचा वनविभागाच्या अधिकाऱ्यावर पूर्ण विश्वास आहे कारण त्यानं खरं बोलण्याची शपथ घेतली आहे.''

मुलाने विचारलं, ''ही शपथच खोटी नसेल कशावरून?''

उत्तर आलं, ''शक्यच नाही. कारस्थानी तू आहेस, फिफ्थ कॉलमिस्ट तू आहेस, तू कम्युनिस्ट आहेस, गद्दार आहेस, प्रगतिशील आहेस, तू सआदत हसन मंटो आहेस.''

मुलगा हसला, ''देवाची कृपा आहे की मी तो वाघ नाही, जो येणार आहे. मी वनविभागाचा तो खरं बोलणारा अधिकारीही नाही.''

पंचायतीतला एक म्हातारा माणूस मुलाचं बोलणं तोडत म्हणाला, ''तू त्याच धनगराच्या मुलाचा वंश आहेस, ज्याची गोष्ट वर्षानुवर्षे शाळेतल्या प्राथमिक वर्गात शिकवली जात आहे. तुझा शेवटही तोच होणार जो त्याचा झाला. वाघ आलाच तर तो तुझंच मटण करेल.''

धनगराच्या मुलानं स्मित केलं, ''तो आला तर मी त्याच्याशी लढेन. मला तर प्रत्येक क्षणाला त्याच्या येण्याची चिंता सतावते आहे. तुम्ही समजून का घेत नाही की, जी 'वाघ आला, वाघ आला' ही गोष्ट तुम्ही आपल्या मुलांना शिकवता, ती आजची नाही. आजच्या गोष्टीत तर 'वाघ आला, वाघ आला'चा अर्थ 'सावध रहा, सजग रहा.' हा आहे. याचीच शक्यता जास्त आहे की वाघाऐवजी एखादं गिधाडच इथे येईल आणि आपण सगळ्यांनी त्या गिधाडाला थांबवायला हवं.''

''सगळी माणसे खळखळून हसली. किती डरपोक आहेस रे! तू गिधाडाला घाबरतोस?''

धनगराचा मुलगा म्हणाला, ''मी वाघ आणि गिधाड, दोघांनाही घाबरत नाही, पण त्यांच्यातल्या पशूला मात्र नक्कीच घाबरून आहे आणि त्याच्याशी लढण्यासाठी स्वत:ला तयार ठेवत आहे. माझ्या वडिलधाऱ्यांनो, आता शाळेतून ते पुस्तक काढून टाका, ज्यात 'वाघ आला, वाघ आला'ची जुनी कथा आहे त्या जागी नवी कथा शिकवा.''

एक म्हातारा खोकरत खाकरत म्हणाला, ''या मुलाला आपली दिशाभूल करायची आहे. हा आपल्याला योग्य मार्गावरून हटवू पाहतो आहे.''

मुलगा स्मित करत म्हणाला, ''जीवन सरळमार्गी नाहीय ज्येष्ठ मंडळींनो.''

दुसरा म्हातारा भावनावेगात ओरडत म्हणाला, ''हा अधर्मी आहे. हा धर्मद्वेष्टा आहे. दंगल घडवणाऱ्यांचा दलाल आहे. याला लगेच कारागृहात टाका.''

धनगराच्या मुलाला कारागृहात टाकलं गेलं.

त्याच रात्री वस्तीत वाघ शिरला.

पळापळ झाली. काही वस्ती सोडून पळून गेले, उरलेल्यांची वाघाने शिकार केली.

मिशांवर लागलेलं रक्त चाटत वाघ जेव्हा कारागृहाजवळून जात होता तेव्हा त्याने मजबूत लोखंडी सळ्यांमागे धनगराच्या मुलाला पाहिलं आणि तो दात ओठ चावू लागला.

धनगराचा मुलगा हसत म्हणाला, ''मित्रा, ही माझ्या वडिलधाऱ्यांची चूक आहे, नाहीतर तुला माझ्या रक्ताचा आस्वादही चाखता आला असता.''

**परिशिष्ट**

फाळणीच्या कथांमध्ये धर्माचं अवडंबर आणि माणसातील विकृतीवर थेट प्रहार करणारा सआदत हसन मंटो त्याच्या 'लायसन', 'टिटवाल का कुत्ता', 'सियाह हशिये'सारख्या कथांतून कमालीचा उपहास वापरतो. फाळणीच्या कथांतून मंटो माणसातल्या राक्षसावर प्रकाश झोत टाकतो तर या कथांतून समाजाच्या सडक्या मानसिकतेवर तो प्रकाश टाकून तिचं भयानक रूप दाखवतो. हे समाजाचं किडलेलं रूप दाखवताना मंटो फाळणीतल्या कथांमध्ये वापरलेला फॉर्म बदलतो आणि फाळणीतल्या 'झटका' फॉर्म ऐवजी इथे 'हलाल' फॉर्म वापरतो. समाजाची सडलेली नजर, वृत्ती, विचार आणि आचरण दाखवताना कथेची सुरुवात मंटो साध्या सोप्या प्रसंगातून करतो आणि त्या प्रसंगात जन्म घेतलेला उपहास पुढे टप्प्याटप्प्यात वाढवत नेत शेवटी अंतिम घाव घालतो. मंटोच्या बहुतांशी सगळ्याच कथांचा शेवट अत्युच्च पातळीवर होतो. या अशाच उपहासाचा फॉर्म वापरलेल्या कथांपैकी एक कथा म्हणजे 'वाघ आला, वाघ आला, पळा' मंटोची ही कथा मराठी आणि हिंदीतही दुर्लक्षित राहिल्याचे दिसून येतं किंवा त्याची फार चर्चा झाली नसल्याचे आढळून येतं.

'वाघ आला, वाघ आला, पळा' ही कथा एका बोधकथेवर आधारित आहे. त्या बोधकथेतला मुलगा धनगराचा मुलगा असतो आणि एकदा शेळ्या मेंढ्या चरत असताना तो गंमत म्हणून ओरडतो 'वाघ आला, वाघ आला' आणि आसपासचे सगळे मेंढपाळ वाघाला पळवून लावण्यासाठी हाकारे घालत येतात आणि पाहतात तर वाघ आलेला नसतो. सगळ्यांना आपण कसं फसवलं, या विचाराने तो मेंढपाळाचा मुलगा आणखी खूश होतो आणि दुसऱ्या दिवशीही तसंच 'वाघ आला, वाघ आला' ओरडतो. पुन्हा सगळे मेंढपाळ धावत येतात आणि आपण त्यांची कशी फजिती केली हे पाहून मेंढपाळ मुलगा हसू लागतो. तिसऱ्या दिवशी मात्र खरोखरच वाघ येतो आणि तेव्हा खूप ओरडूनही मेंढपाळाच्या मुलाच्या मदतीला कुणीही येत नाही.

मंटोने लिहिलेल्या 'शेर आया, शेर आया, दौडो' या कथेचा कालावधी 'दस्तावेज' (समग्र मंटो) मध्ये नसल्याने या कथेमागील प्रेरणा समजून घेण्यास मला आधार सापडला नाही. इतर ठिकाणी या कथेचा लेखनकाल सापडला तर त्या कथेची प्रेरणा आणि कथेचं विश्लेषण अधिक चांगल्या आणि विश्वासार्ह पद्धतीने करता येईल परंतु लेखनकाल उपलब्ध नसला तरीही तत्कालीन परिस्थितीचा आढावा घेतला तर सआदत हसन मंटोला या कथेतून नेमकं कुणावर भाष्य करायचं आहे याचा अंदाज येतो.

वाघ हे भक्षकांचे प्रतीक आहे तर मेंढ्या-शेळ्या हे दीनदुबळ्या जनतेचे प्रतीक आहे. मेंढपाळ हे रक्षक आहेत मेंढ्यांचे. ही प्रतीके लक्षात घेतल्यावर सआदत हसन मंटोला तत्कालीन परिस्थितीवर काय भाष्य करायचं होतं ते लक्षात येतं. कथेची सुरवातच मंटो करतो ती अशी- 'उंच टेकडीवर उभा धनगराचा मुलगा, दूर जंगलांच्या दिशेने तोंड करत ओरडत होता, 'वाघ आला, वाघ आला, पळा.' उंच टेकडीवरला हा मुलगा नक्कीच काहीतरी अधिकार असलेला असावा. त्यात आत्मविश्वास दिसतो आणि तो जंगलाच्या दिशेने तोंड करून ओरडताना त्याला नेमक्या संकटाचे भान असलेलं जाणवतं, परंतु कथेत पुढे कथाकार लिहितो की, 'खूप वेळ तो आपला घसा फोडत राहिला. त्याचा तरुण आणि मोठ्ठा आवाज खूप वेळ वातावरणात घुमत राहिला. ओरडून-ओरडून जेव्हा घशाची नळी सुकली तेव्हा वस्तीतून दोनतीन म्हातारे काठ्या टेकत वर आले आणि धनगराच्या मुलाचा कान पकडून घेऊन गेले.'

हा मुलगा वस्तीला सूचित करण्यासाठी इतक्या उंच चढून टेकडीवर आला आहे. घसा सुकेपर्यंत तो ओरडतो आहे. त्याच्या ओरडण्याने कुणीही विचलित होत नाही तरीही तो ओरडतो आहे. कुणीही पळत नाही तरीही तो घसा सुकेपर्यंत तो ओरडतो आहे याचा अर्थ त्याला गंमत करायची नाही, त्याला कुणाचीही फजिती करायची नाही. त्याला खरंच काहीतरी अशुभाची जाणीव झालेली आहे.

या धनगराच्या मुलाचे कान पकडून नेणाऱ्या म्हाताऱ्यांनी वस्तीत गेल्यावर पंचायत बोलवली हे सांगताना मंटो लिहितो, 'पंचायत बुलायी गयी। बस्तीके सारे अक्लमंद जमा हुए और गडरिए के लडके का मुकदमा शुरु हुआ' हे वाक्य 'पंचायत बुलाई गई और गडरिए के लडके का मुकदमा शुरु हुआ' इतकं साधं सरळ न करता मंटोसारखा लेखक जेव्हा त्या वाक्यात 'बस्ती के सारे अक्लमंद जमा हुए' असे लिहितो तेव्हा त्या वाक्यातली खोच लक्षात येऊन आपण हसतो.

पंचायतीतल्या सभासदांना पंचदेव मानण्याची परंपरा असलेल्या देशात कधी कधी 'अक्लमंद' लोकही काही समित्यांवर बसतात आणि जमा होतात असं मंटो लिहितो. 'अक्लमंद' शब्दाचा अनुवाद बुद्धिवादी असा केला असला तरी अक्लमंद शब्दातली खोच शब्दांत अचूक येत नाही. 'जमा झाले' या शब्दांतून जमा होण्याची क्रिया, बघ्यांची मानसिकता किंवा विनाअभ्यास आलेल्या गर्दीकडे निर्देश करते.

पुढे कथालेखक म्हणतो की, 'तरुणाचा एकमेव गुन्हा हा होता की त्याने चुकीची बातमी दिली होती आणि वस्तीतल्या शांततेचा भंग केला होता.' हे वाक्य आल्यावर वस्तीतली शांतता कुणामुळे भंगली आहे असं 'अक्लमंद' लोकांना वाटत होतं, याचा अंदाज वाचकाला येऊ लागतो.

तरुण मुलगा म्हणतो, ''बुजुर्गों''. या 'बुजुर्गों' शब्दांतूनही उपहास जाणवतो. 'वडिलधारे आणि अनुभवी असूनही तुम्हा

म्हाताऱ्यांना संकटाची चाहूल लागत नाहीय.' असे मुलगा म्हणतो.

पुढे खटला चालतो. तरुण मुलगा परोपरीने पंचायतीतल्या माणसांना समजावण्याचा प्रयत्न करतो पण ते तरुण मुलाला वेडं ठरवतात आणि त्याला म्हणतात, ''तू कारथानी आहेस, कम्युनिस्ट आहेस, प्रगतिशील आहेस, सआदत हसन मंटो आहेस'' आणि इथे आपल्या मनातला संभ्रम दूर होत आपण ठाम होतो की ही कथा मंटोने स्वत:वर लिहिली आहे. या कथेतला तरुण मेंढपाळ ज्याला आपल्या वस्तीतल्या मेंढ्यांची म्हणजेच निष्पाप जनतेची काळजी आहे तो दुसरा तिसरा कुणी नसून स्वत: सआदत हसन मंटो आहे. तो उंच स्थानावरून ओरडत होता ते त्याला जाणवलेल्या अशुभाच्या चाहुलीने लोकांना सावध करण्यासाठी. उंच स्थानावर तो स्वत:ला संरक्षित करण्याचं सोडून तो त्या स्थानाचा वापर लोकांना वाचवण्यासाठी करत होता. कथालेखन करत होता ते समाजाला अशुभाच्या सावलीतून बाहेर काढण्यासाठी, परंतु त्याचं हे म्हणणं कुणीच ऐकलं नाही आणि त्याच्यावर अश्लीलतेचा खटला दाखल केला. कथेतल्या तरुणावरही जमा झालेले म्हातारे आरोप लावतात. तरुण सांगतो तुम्ही समजून का घेत नाही की, जी 'वाघ आला, वाघ आला' गोष्ट तुम्ही आपल्या मुलांना शिकवता, ती आजची नाही, आजच्या गोष्टीत तर 'वाघ आला, वाघ आला'चा अर्थ 'सावध रहा, सजग रहा.' हा आहे. याचीच शक्यता जास्त आहे की वाघाऐवजी एखादं गिधाडच इथे येईल आणि आपण सगळ्यांनी त्या गिधाडाला थांबवायला हवं. या वाक्यातून कळतं की कथालेखक म्हणतोय की 'वाघ आणि गिधाडांची संख्या इतकी झाली आहे की ते येण्याचीच शक्यता जात आहे म्हणून पुस्तकातली जुनी कथा काढून त्या जागी नवी कथा शिकवा कारण जीवन आता पूर्वीसारखं सरळमार्गी नाहीय ज्येष्ठ मंडळींनो.' परंतु जुनी पुस्तके धर्मग्रंथाप्रमाणे वागवणारा कुणीतरी त्या तरुणाला अधर्मी, धर्मद्रोष्टा ठरवतो, दंगल घडवणाऱ्यांचा दलाल ठरवतो आणि कारागृहात टाकण्याचे आदेश देतो.

ज्या दिवशी तरुणाला कारागृहात टाकलं जातं त्याच दिवशी संकट येतं आणि पळापळ होते. लेखक लिहितो काही वस्ती सोडून पळून गेले, उरलेल्यांची वाघाने शिकार केली पण कारागृहात असल्याने तरुण सुरक्षित राहतो आणि वाघापासून वाचतो. या कथेत दुर्दैव हे आहे की वाघ येतो आणि त्याच्या हल्ल्यात निष्पाप मेंढ्यांचा बळी जातो.

मंटोची ही कथा आजही समकालीन वाटते ते यासाठी की आजही वाघ आणि गिधाडांची आसपासची गर्दी पाहता अशुभाची सावली आपल्यावर पसरल्याचे दृश्य दिसतं. कधीही वाघ येईल याचं भय मनात असताना मंटोसारखा उंचावरून 'येणाऱ्या संकटाची सूचना देणारा' आणि बेधडकपणे स्वत:वर होणाऱ्या आरोपांना आणि खटल्यांना सामोरं जाणारा लेखक मात्र दिसत नाही.


– किरण येले

भ्रमणध्वनी : ९८६९२६०७८०

kiran.yele@gmail.com



**॥ग्रंथाली॥**

अपरांतातील प्राचीन बोलीभाषा

# वडवाळी शब्दकोश

– अशोक परशुराम सावे

संपादन – डॉ. अनंत देशमुख, चांगदेव काळे




'माझ्या पंधरा वर्षांच्या इतिहास संशोधनाच्या कार्यात मला असे जाणवले की, महाराष्ट्रातल्या बोलीभाषांमध्ये जुन्या संत वाङ्मयाचे शब्द येतात. परंतु नागरिकीकरणामुळे ते लुप्त झाले आहेत. ह्याच कारणासाठी मी शब्दकोश लिहिण्याची संकल्पना आखली. अपरांतकातील 'वाडवळी' मराठी भाषेच्या जुन्या शब्दांच्या संदर्भातून ठाणे जिल्हा (पश्चिम) विभागाच्या इतिहास आणि संस्कृतीचा संग्रह मी तुम्हाला अर्पण करतो आहे. हा उपक्रम वाडवळ समाजाच्या भाषा संवर्धनाशी संबंधित आहे. अपरांताच्या जुन्या मराठीच्या अपूर्वाईचा आणि शब्दसामर्थ्याचा एक उत्तुंग ठेवा आहे...' – अशोक सावे

मूल्य ६०० रु.

सवलतीत ४०० रु.

# सआदत हसन मंटोच्या कथा

अपर्णा लव्हेकर

'फाळणी' म्हणजे मंटोसाठी एक घटना नव्हती. त्याच्या हृदयावर झालेली ती भळभळती जखम होती. फाळणीच्या काळात तो आपल्याच मनाला सारखे प्रश्न विचारत राही. आजची वर्तमानपत्रातली हेडलाईन रक्तपाताचीच का असते? आपण मानवी रक्ताचे इतके भुकेले कधीपासून झालो? मानवता नावाची काही चीजच शिल्लक राहिली नाही काय? त्याचं मन सतत असा आक्रोश करत राही.



मंटो हा उच्च दर्जाचा कथाकार होता याबद्दल कुणाच्याच मनात शंका नाही. काळाच्या कसोटीवर त्या कथा खऱ्या उतरल्या आहेत. जगातल्या अनेक भाषांत त्या कथा भाषांतरित झाल्या आहेत. उर्दूच्या या सिद्धहस्त लेखकाच्या कथांवर जेवढी चर्चा झाली, जेवढे वाद झाले तितके क्वचितच कुणा दुसऱ्या लेखकावर झाले असतील. मंटोच्या कथांनी वाचकांच्या अंतःचेतनेला गदगदा हलवलं आहे, ती तडफडली आहे, तळमळली आहे. वाचकांची ही जिवघेणी व्याकुळता केवळ स्वतःसाठी नाही तर संपूर्ण मानव जातीबद्दलचा कळवळा तिच्यात सामावला आहे. मंटोच्या कथांमध्ये सुंदर शब्द कमी आहेत हे खरं पण कथेतील सत्त्व उकलून दाखवून वाचकाला घायाळ करण्याची अद्‌भुत शक्ती त्याच्याजवळ आहे. मंटोच्या शैलीची विशेषता ही की तो माणसाच्या आयुष्यातील पदर उलगडत जात नाही तर ते पदर फाडत जातो. सगळेच मुलामे उखडून टाकतो.

ही अशी तडफड आणि तळमळ मंटोने लहानपणी भोगली आहे. त्याच्या कथांचं मूळ त्याच्या लहानपणात दडलेलं आहे. ११ मे १९१२ या दिवशी मंटोचा जन्म अमृतसरमध्ये झाला. त्याचे वडील वकील होते मग ते सेशन जज्ज झाले. त्यांच्या पहिल्या पत्नीला एक मुलगा आणि एक मुलगी. दुसरी पत्नी सरदार हिचा मंटो हा मुलगा. सरदार बेगमला ती कमी प्रतिष्ठित म्हणून चांगली वागणूक मिळत नसे. एका मोठ्या घराच्या कोपऱ्यातल्या दोन खोलीत ती मंटो आणि नसीरासहित राहात असे. या तिघांकडे दुर्लक्ष केलं जाई, त्यांचा पदोपदी अपमान केला जाई. सगळेच त्यांच्याकडे तिरस्काराच्या नजरेने पाहात. त्याचा लहान मंटोच्या मनावर फार परिणाम झाला. त्याचे सावत्र भाऊ इंग्लंडला जाऊन इंजिनिअर, बॅरिस्टर झाले होते. आपल्या घरात सरदारला प्रतिष्ठा मिळावी म्हणून मंटोने डॉक्टर झालं पाहिजे, असं त्याच्या वडिलांना वाटत असे. या सगळ्याच गोष्टींचं ओझं मंटोच्या मनावर होतं. त्याचे वडील फार रागीट होते. तो वडिलांना इतका भित असे की एकदा गच्चीवर पतंग उडवताना वडील आले तर त्याने गच्चीवरून खाली उडी मारली. वडील त्याला सायन्सचा अभ्यास करायला सांगत. त्याला तर सायन्सचा तिटकारा होता. तो मुळी शाळेतच जात नसे. तो दिवसभर बाहेर भटकत राही. जुगारी, दारूडा, हुंदडणारा अशीच त्याची प्रतिमा होती. इतक्या सज्जन माणसाचा मुलगा असा कसा हा प्रश्न लोकांना पडत असे.

मंटोच्या भटकण्याने त्याचा सर्वसामान्य माणसाच्या आयुष्याशी सखोल परिचय झाला. हे जीवन त्याच्या साहित्याला पोषक ठरलं. त्याची बारी अलिग यांच्याशी दोस्ती झाली. भगतसिंग हे मंटो आणि त्याच्या मित्राचं दैवत होतं. बारी अलिग भगतसिंगला भेटले होते म्हणून त्यांच्याबद्दल मंटोच्या मनात आदर होता. त्यांनी मंटोला रशियन आणि फ्रेंच कथा वाचायला दिल्या. त्याच्याकडून त्या भाषांतरित करून घेतल्या. एकदा बारींना सिनेमाचे पासेस मिळाले होते. ते जाणार नव्हते म्हणून मंटोने त्यांचे पास घेतले तेव्हा त्यांनी अट घातली की दुसऱ्या दिवशी त्यांच्या पेपरात मंटोने त्या सिनेमाचं परीक्षण लिहावं. अशाप्रकारे त्याच्या लेखनाची सुरुवात झाली. बारी अलिगमुळे मंटोची राजकीय जाण प्रगल्भ झाली. रशियन राज्यक्रांती आणि कम्युनिझमचा त्याचा सखोल अभ्यास झाला. बालपणातली चीड, विद्रोह, त्याचं मुंबईतलं बेछूट आणि गरिबीचं जीवन, तळागाळातल्या लोकांशी त्याने साधलेली आत्मीयता आणि फाळणीच्या वेळी त्यानं पाहिलेलं भयानक वातावरण यामुळे त्याची कथा सशक्त झाली आहे.

मंटोने आपल्या कथांमधून वेश्या, दारूडे, बदमाश, भडवे आणि गुंड यांचं जग रंगवलं आहे. या दुनियेचा त्याने फार बारकाईने आणि गहराईने शोध घेतला आहे. त्याच्या सर्चलाईटच्या प्रकाशात या जीवनाचा कोपरा न् कोपरा उजळून निघाला आहे. या लोकांच्या मनातल्या प्रकृती आणि विकृती, त्यांचे आक्रोश, त्यांचे स्वीकार-प्रतिकार, त्यांच्या मनाचा मोठेपणा आणि कोतेपणा याचा तो सहानुभूतीने विचार करतो. त्यांच्याकडे तो कायम करूणेच्या नजरेने पाहात राहतो. त्यांच्या स्वप्नातून आणि दुःस्वप्नातून त्यांच्या जीवनाचं वस्त्र तो विणत जातो. अनैतिकतेच्या वातावरणातल्या कथा जरी तो लिहीत असला तरी तो शोध घेत असतो तो नैतिकतेचाच. त्याच्या कथांमधून या लोकांच्या आयुष्यातील विद्रुपतेचे आणि कुरूपतेचे दर्शन घडत असले तरी त्यात लपून राहिलेली मानवताच त्याच्या कथांना संजीवनी मिळवून देत असते. मंटोने व्यवसायाने वेश्या असणाऱ्या स्त्रीच्या अंतर्मनाचा ठाव घेतला आहे. तिच्या मनातली स्त्रीची एक वेगळी बाजू लोकांसमोर आणली आहे. तो म्हणतो, ''हर औरत वेश्या नही होती पर हर वेश्या एक औरत होती है।'' 'हतक' या कथेत त्याने स्त्रीत्वाचा एक अप्रतिम गोफ गुंफला आहे. सुगंधी ही एक हसरी खेळकर वेश्या आहे. आपण फार चलाख आहोत, आपल्या गिऱ्हाईकला कसं खेळवायचं हे आपल्याला चांगलं माहीत आहे असा ती दावा करत असते, पण प्रत्यक्षात ती अत्यंत भावुक आहे. तिला एक मूल झालेलं आहे. तिच्यातलं मातृत्व भुकेलं आहे. आपल्या गिऱ्हाईकाकडे ती फक्त पुरुष म्हणून पाहात नाही. तो प्रेम करणारा असावा असं तिला वाटतं. कुणा पुरुषाने तिला म्हटलं की मी तुझ्यावर प्रेम करतो, तर ते खोटं आहे हे माहीत असूनही ती विरघळून जात असे. कधी-कधी तिची प्रेम करण्याची भावना इतकी तीव्र होत असे की बाजूच्या पुरुषाचं डोकं मांडीवर

घेऊन थोपटावं असं तिला वाटे. म्हणून माधो तिच्याकडे येतो आणि 'हा धंदा सोड. मी तुला पैसे देऊन सुखात ठेवतो' असं म्हणतो तेव्हा तिला त्याची बायकोच आहोत असं वाटतं, पण पुढे तो तिला एकही पैसा देत नाही उलट सतत तिलाच लुटत राहतो. हळूहळू ती थकत जाते. तिचा दलाल तिला गिऱ्हाईकाकडे चलण्याचा आग्रह करतो. 'खूप मोठी असामी आहे तुला खूप पैसे मिळतील' असं सांगतो. मोठ्या कष्टाने तयार होऊन ती त्या गिऱ्हाईकाकडे जाते. मोटारीतला सेठ तिला पाहतो आणि नाकारून निघून जातो. आजपर्यंत तिला कोणी नाही म्हटलं नव्हतं. अगोदरच वैतागलेली सुगंधा या अपमानाने भयंकर चिडते. हा तिच्या स्त्रीत्वावर मारलेला डंख असतो. संतापाने तिचं शरीर आणि मन पेटून उठतं. ती घरी येते तेव्हा माधो आलेला असतो. तिला 'शंभर रुपये दे' म्हणतो. 'तू चिडू नकोस मी तुला खूप पैसे देणार आहे' म्हणतो. आता मात्र तिच्या सहनशक्तीचा अंत होतो. ताड-ताड बोलून ती त्याचा खोटेपणा उघडा पाडते. 'आत्ताच्या आत्ता निघून जा नाहीतर पोलिसांच्या हवाली करीन' अशी धमकी देते. तो गेल्यावर तिचे अवसान गळते. आपल्या कुत्र्याला जवळ घेऊन ती शांतपणे झोपी जाते कारण तोच असा आहे की जो तिच्याकडून कसलीही अपेक्षा करत नाही. तो फक्त प्रेम करणंच जाणतो.



'काळी सलवार' या कथेत सुलतानाला अनवरीसारखी काळी सलवार हवी असते. तिच्याकडे येणाऱ्या शंकरकडे ती काळी सलवार मागते. तिच्याकडून तिचे डूल घेऊन शंकर तिला सलवार आणून देण्याचे वचन देतो. रमजानच्या दिवशी शंकर तिला सलवार आणून देतो. तिला खूप आनंद होतो. नंतर अनवरी तिच्याकडे येते. सुलतानाला काळी सलवार मिळाली याचा अनवरीला आनंद होतो आणि 'मला हवे असलेले डूल मिळाले' असं ती सांगते. सुलताना आश्चर्याने अनवरीच्या डुलांकडे पाहतच राहते.

'मम्मी' या कथेत स्त्रीच्या मनातल्या मातृत्वाचा शोध मंटोने घेतला आहे. मम्मी त्या फिल्मी जगातल्या प्रत्येकाची मम्मी आहे. या फिल्मी जगातला हलकेपणा, हलकटपणा, स्वार्थीपणा, त्यांच्या विकृती, त्यांच्या वागण्यातली असंगती याचं स्पष्ट चित्र मंटो आपल्या डोळ्यांसमोर उभं करतो, पण ते लोक कसेही असले तरी त्यांनाही ममतेची गरज असतेच आणि मम्मी ही गरज पूर्ण करत असते. चढ्ढाला किशोरवयीन मुलीचा उपभोग घेण्यापासून मम्मीनं वाचवलं आहे. रामसिंहने खून केला होता तेव्हा 'ज्याचा खून केलास तो माणूस किती वाईट होता हे जज्जला सांग' असं तिने रामसिंहला सांगितलं होतं आणि नंतर त्याची सुटका झाली होती. प्रत्येकाच्या मनातल्या चांगुलपणाला जपणाऱ्या मम्मीलाच पोलीस शेवटी हद्दपार करतात पण जिथे जाईल तिथल्या वाईट माणसांच्या मनातल्या चांगुलपणाला ती जपेल असा साऱ्यांना विश्वास वाटतो.

मुंबईच्या फिल्मी जगातल्या पुरुषांच्या स्वभावाचे निरनिराळे पैलूही मंटोने तपासले आहेत. 'बाबू गोपीनाथ' ही कथा गाजलेली आहे. बाबू गोपीनाथ पैसेवाला माणूस आहे. जीनतवर त्याचं प्रेम आहे. तिला घर गाडी सगळं काही घेऊन द्यायला तो तयार आहे, पण ती इतकी साधी मुलगी आहे की तिला हे काही नको आहे. तो तिला धंद्याला लावून स्वतंत्र करू पाहतो पण ती त्यालाही तयार नाही. शेवटी हैद्राबादच्या एका नवाबाशी तो तिचं लग्न लावून देतो. उरलेला सगळा पैसा तिच्या लग्नात खर्च करून तो आता गावी जाणार आहे. पुरुष स्त्रियांना फसवतात या समजुतीला धक्का लावणारा हा एक निःस्वार्थी पुरुष आहे.

'खुशिया' या कथेत खुशियाच्या पुरुषत्वाचा अपमान होतो तेव्हा तो सुगंधीसारखाच पेटून उठतो. तो सगळ्या वेश्यांना गिऱ्हाईक मिळवून देत असतो. एके दिवशी तो कांताच्या घरी जातो तर ती कपडे न घालताच बाथरूममधून बाहेर येते आणि 'तेरे से क्या शरमाने का?' असं म्हणते तेव्हा खुशियाला वाटतं की मी पुरुष नाही का? ही समजते काय स्वतःला? मग खूप पैसे उधार घेऊन, टॅक्सी करून कांताला तो जुहूच्या हॉटेलमध्ये घेऊन जातो. मगच त्याचा डिवचलेला पुरुषत्वाचा अहंकार शांत होतो. मम्मदभाई या कथेतला मम्मदभाई हा गल्लीचा दादा आहे. सगळे त्याला घाबरत असतात, पण हा सगळ्यांना त्रास देणारा मम्मदभाई आजारी लोकांची फार काळजी घेतो. गल्लीतला कुणीही पैसे नाहीत म्हणून मरू नये असं त्याला वाटतं. आजारी लेखकाची तो जातीनं सेवा करून त्याला वाचवतो. कठीण वाटणाऱ्या या हृदयात कुठेतरी कोमलता वास करत आहे हे मम्मदभाई कथेत मंटोने दाखवून दिलं आहे.

'मंत्र' ही मंटोची एक वेगळीच कथा आहे. चौधरीने क्षणिक रागाच्या भरात तीनदा तलाक म्हणून बायकोला हाकलून दिले आहे, पण आता त्याला पश्चात्ताप होतो आहे. एके दिवशी एक मौलवी येतो. धर्माच्या मोठमोठ्या गोष्टी करतो. चौधरीला तो सांगतो, ''तुझ्या बायकोचं दुसऱ्या कुणाशी लग्न झाल्याशिवाय तू तिला परत आणू शकत नाहीस. तेव्हा मी तिच्याशी लग्न करतो.''

चौधरीला या धर्मात्म्याचे उपकार कसे मानावेत हेच कळत नाही. दुसऱ्या दिवशी सकाळी मौलवी दिसत नाही, हे तो बायकोला सांगायला जातो तेव्हा तिच्या अंथरूणातल्या खोट्या दाढीमिशा पाहून

चौधरी थक्क होतो.

मानवी क्रौर्याचे वर्णन करता-करता मंटो मानवी करूणेचा सखोल प्रत्यय वाचकांना आणून देतो. हा प्रत्यय कधी हळवा, कधी कोवळा तर कधी कठोर आणि वाचकाला भोवळ आणणारा असतो. तो व्यक्तीच्या आणि समष्टीच्या दुर्गुणांवर आणि सद्गुणांवर झगझगीत प्रकाश टाकतो. 'ठंडा गोश्त' आणि 'खोल दो' या कथा फारच वादग्रस्त ठरल्या. 'खोल दो' ही कथा ऑगस्ट १९४८ मध्ये प्रसिद्ध झाली. मार्च १९४९ मध्ये 'ठंडा गोश्त' प्रसिद्ध झाली. त्यानंतर एक महिना शांततेत गेला, पण नंतर मात्र 'न भूतो न भविष्यति' असा गोंधळ उडाला. 'ठंडा गोश्त' ही कथा मानवी व्यथेने गुदमरून गेलेली कथा आहे. 'ठंडा गोश्त' नावातच 'ही कथा सेक्सी नाही' हे सूचित होतं असं मंटोचं म्हणणं होतं, पण सोळा जानेवारी १९५०ला त्याला कोर्टाने गुन्हेगार ठरवलं आणि तीनशे रुपये दंड केला. तीन महिन्यांची सक्त मजुरीची शिक्षा फर्मावली, पण कोर्टातच मंटोला दिलासा देणारी गोष्ट घडली. चार तरुण वकील कोर्टातच त्याला भेटायला आले आणि 'ही केस पुढे लढवू' असा मंटोला दिलासा दिला. पुढे ॲडिशनल सेशन कोर्टाने मंटोची निर्दोष म्हणून सुटका केली. ईश्वरसिंह आणि कुलदीप कौर या दोघांच्या प्रणयाचं वर्णन खुलेपणाने मंटोने केले आहे. ईश्वरसिंह सहा दिवसांनी परत आला आहे. कुलदीप कौरचं समाधान करायला तो असमर्थ आहे. त्यावर कुलदीप कौरला शंका येते. 'कोण ती हरामजादी मला सांग' म्हणून कुलदीप मागे लागते. तो परोपरीने नाही म्हणत असतानाही ती हट्टच धरून बसते. त्याच्यावर कृपाणाने वार करते. तेव्हा तो तिला सगळी हकिगत सांगू लागतो. एका घरातल्या सहा जणांना त्यानं मारलं आणि घरातली सुंदर सून घेऊन तो घरापासून दूर आणि तिचा उपभोग घ्यायला गेला तेव्हा त्याच्या लक्षात आलं की ती मरून गेली आहे. त्या 'ठंड्या गोश्त'ने त्याच्या पुरुषत्वावरच घाला घातला होता. हे सांगता सांगताच ईश्वरसिंहाचा मृत्यू होतो. या कथेचा शेवटच इतका भयानक आहे की पहिली ती सेक्सची वर्णने वाचकाच्या लक्षातच राहत नाहीत किंबहुना त्या वर्णनांमुळे या शेवटाची भयानकता आणि परिणामकारकता वाढली आहे.

'खोल दो' या कथेचा शेवटही असाच भयानक आहे. सराजुद्दीन आपल्या मुलीच्या शोधात आहे. त्यासाठी एका नौजवान टोळक्याला तो तिचा शोध घ्यायला सांगतो. 'त्या टोळक्याला यश मिळू दे', म्हणून प्रार्थना करत राहतो, पण तेच टोळके त्या मुलीवर सामूहिक बलात्कार करते. सराजुद्दीनला एका मुलीला लोकांनी उचलून आणलेलं दिसतं. दवाखान्यात जाऊन तो तिला पाहतो तर ती त्याचीच मुलगी असते. तो डॉक्टरला घेऊन येतो. डॉक्टर त्याला 'खिडकी खोल दो' असं सांगतो. 'खोल दो' शब्द ऐकताच त्या प्रेतवत् मुलीच्या हातून एक कृती घडते. हा शब्द ऐकताच नकळत ती मुलगी आपली सलवार खाली सरकवते. मुलीची हालचाल झालेली




पाहून बापाला आनंद होतो. जवळ-जवळ प्रेतच असलेल्या मुलीने अशी हालचाल केलेली पाहून तो डॉक्टर घामाघूम होतो. ही कथा फाळणीच्या सगळ्या विकृतींवर नेमके बोट ठेवते. त्या मुलीची ती अगतिक हालचाल ही प्राण व्याकुळ करणारी हालचाल आहे. मंटोच्या मनाचा झालेला तडफडाट या कथेच्या मुळाशी आहे.

'टोबा टेकसिंह' या कथेचा विषय आहे वेड्याच्या इस्पितळातील वाटणी. ही वेड्यांची कथा सामान्य माणसाच्या संभ्रमावर बोट ठेवते. हिंदुस्थान कुठे आणि पाकिस्तान कुठे हेच त्या वेड्यांना कळत नाही. बिशनसिंगची जमीन टोबा टेकसिंहमध्ये होती. तो सारखा टोबा टेकसिंहचा जप करत असे, म्हणून लोक त्यालाच 'टोबा टेकसिंह' म्हणत असत. एक वेडा स्वतःला 'खुदा' समजत असे. बिशनसिंग त्याला विनंती करतो की 'टोबा टेकसिंहला हिंदुस्थानात टाकण्याचा हुकूम दे', पण तो 'खुदा' दुसरे हुकूम देण्यात इतका दंग असतो की, तो बिशनसिंगकडे लक्षच देत नाही. बिशनसिंग कित्येक दिवस खालीच बसत नाही. पाय सुजले तरी बिशनसिंग आपला उभाच असतो. ज्या दिवशी लॉरीमधून लोकांना घेऊन जायला सुरुवात होते तेव्हा बिशनसिंग 'नो मॅन्स लँड'वर उभा राहतो आणि कुठेच जायला तयार होत नाही. रात्रभर थंडीत कुडकुडलेला बिशनसिंग सकाळी एक किंकाळी फोडतो. जमिनीवर आडवा पडतो आणि मरून जातो. या कथेतली प्रतीकात्मकता जशी अंगावर येणारी आहे तशीच 'टिटवाल का कुत्ता' या कथेमधली प्रतीकात्मकता अंगावर येणारी आहे. तो कुत्रा कधी पाकिस्तानच्या भागात जातो तर कधी हिंदुस्थानच्या भागात जातो. दोन्ही भागातले लोक त्याला मारतात आणि खूश होतात. ते पाहून एक सैनिक अगतिकपणे म्हणतो की, 'अब कुत्तों को भी हिंदुस्थानी या पाकिस्तानी होना पडेगा' सामान्य माणसाची अवस्था या कुत्र्यासारखीच होती.

फाळणीच्या काळातल्या दहशतवादी वातावणात हिंदू काय मुस्लीम काय, दोघांच्याही भावभावनांची क्रूर चिरफाड झाली होती.

'शरीफन' या कथेच्या नावातच तीक्ष्ण निरलसपणा आहे. कासिम जेव्हा घरी येतो तेव्हा घर उद्‌ध्वस्त झालेलं असतं. बायको मरून गेलेली असते. त्यांच्या मुलीवर सामूहिक बलात्कार झालेला असतो. तिचं नग्न प्रेत बघून कासिम वेडा होतो. दिसेल त्या हिंदूला मारत सुटतो. शेवटी एका घरात शिरून त्या घरातल्या मुलीवर अत्याचार करून तिला ठार मारतो. तिचा बाप जेव्हा घरी येतो तेव्हा तिच्या नग्न प्रेताकडे बघून तो वेडा होतो आणि घराबाहेर पडतो. तो काय करणार हे स्पष्ट सांगितलं नसलं तरी तो काय करणार हे तितकंच स्पष्ट आहे.

'सहाय' या कथेचा आरंभच मंटोने खालीलप्रमाणे केला आहे. ''वे लोग वेबकूफ हैं जो समझते है की बन्दूकोंसे शिकार किए जा सकते है। मजहब ईमान, धर्म, यकीन, विश्वास ये जो कुछ भी है हमारे जिस्ममे नही, आत्मा मे होते हैं। छुरे, चाकू और गोली से ये कैसे फना हो सके है?'' 'सहाय' या कथेत हे दाखवले आहे की फाळणीनंतर चार मित्रांच्या दोस्तींतही फरक पडायला लागतो. मुसलमान लोकांच्या क्रूरतेच्या कथा ऐकून जुगल अस्वस्थ होतो. तेव्हा मित्र मुमताजच त्याला विचारतो, ''तुला मला मारावंसं वाटतंय काय?'' तेव्हा ''त्यावेळी खरंच मारावंसं वाटलं पण आता वाटत नाही'' असं जुगल म्हणतो. प्रत्यक्षात मंटोच्या आयुष्यातही असाच प्रसंग आला होता. 'सहाय' कथेत पेटलेलं विरोधी वातावरण पाहून मुमताज पाकिस्तानला जायला निघतो, पण हिंदुस्थान सोडताना त्याचा पाय जड होतो. मुमताजची कहाणी म्हणजे खरं तर मंटोचीच कहाणी आहे.

'रामखेलावन' ही एका धोब्याची कथा आहे. सईद बॅरिस्टरने फिजी आयलंडला जाताना त्याला धोती, कुर्ता, पगडी दिली होती त्याची त्याला आठवण आहे. एकदा तो आजारी पडला तेव्हा सईदच्या भावाच्या बायकोने त्याला दवाखान्यात नेऊन बरं केलं होतं ते उपकार तो विसरला नाही, पण फाळणीच्या काळात तोही इतरांच्या बरोबर मुसलमानांना मारायला निघतो. मात्र आपल्या मनातल्या क्रूरतेचं रूपांतर करुणेत कधी झालं हे त्याचं त्यालाही कळत नाही.

'गुरुमुखसिंहकी वसीहत' या कथेच्या केंद्रस्थानी देखील हिंदू-मुस्लिम दंगे हाच विषय आहे.

'फाळणी' म्हणजे मंटोसाठी एक घटना नव्हती. त्याच्या हृदयावर झालेली ती भळभळती जखम होती. फाळणीच्या काळात तो आपल्याच मनाला सारखे प्रश्न विचारत राही. आजची वर्तमानपत्रातली हेडलाईन रक्तपाताचीच का असते? आपण मानवी रक्ताचे इतके भुकेले कधीपासून झालो? मानवता नावाची काही चीजच शिल्लक राहिली नाही काय? त्याचं मन सतत असा आक्रोश करत राही. हे संकट मानवी अस्तित्वाला आणि मानवी अस्मितेला आवाहन करणारे होते. राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक संबंधांना आणि संदर्भांना उद्‌ध्वस्त करणारे होते. पहिला जबरदस्त आघात ओसरल्यावर त्याच्या लक्षात आलं की हे खुनी, दरोडेखोर स्वभावाने तसे नाहीत. त्यांनाही आयाबहिणी आहेत. देवाची भीती त्यांच्याही मनात आहे. या फाळणीच्या वादळाने त्यांचे क्रूर श्वापदात रूपांतर झाले आहे, पण आत खोल कुठेतरी माणुसकीचा झरा वाहतो आहे. इतर लेखकांनी फाळणीच्या वेळी जी भयानक परिस्थिती होती त्याचं वर्णन केलं आहे पण मंटो मात्र त्या परिस्थितीचा जो परिणाम झाला त्यावरच आपलं लक्ष केंद्रित करतो. ज्या निर्ममतेने त्याने या काळातल्या मानवी कौर्याचा शोध घेतला तितक्याच मृदुतेने त्याने हा माणुसकीचा झरा शोधला. मंटोने इतक्या कसोशीने हा शोध घेतला की पुढे इतिहासकारांनाही या शोधाची दखल घ्यावी लागली. त्याने केलेले कठोर समाज निरीक्षण आणि त्याने व्यक्त केलेला माणुसकीवरचा अगाध विश्वास यामुळे तो त्या काळातल्या संदिग्धतेवर आणि जिवघेण्या विरोधाभासावर स्वच्छ प्रकाश टाकू शकला.

– अपर्णा लव्हेकर
भ्रमणध्वनी : ९९३०५०६५९५

॥ग्रंथाली॥

रामचंद्र पु. कुलकर्णी यांची सहा पुस्तके



मूल्य १०० रु.
सवलतीत ६० रु.



मूल्य १०० रु.
सवलतीत ६० रु.


मूल्य १२५ रु.
सवलतीत ७५ रु.



मूल्य १२५ रु.
सवलतीत ७५ रु.



मूल्य १२५ रु.
सवलतीत ७५ रु.


मूल्य १२५ रु.
सवलतीत ७५ रु.

## मुंबई मराठी साहित्य संघाचे मुखपत्र

# साहित्य

त्रैमासिक

स्थापना जानेवारी १९४७

दिवाळी २०१७ : **अनुवाद विशेषांक**

पृष्ठे : १४० ● मूल्य : रु. १२०/-

संपादक : अशोक बेंडखळे (ईमेल sahityasangha@gmail.com)




### अंतरंग

■ **अनुवादा विषयी तीन सैद्धांतिक लेख**

- ❍ अनुवाद : एक अवघड प्रक्रिया - डॉ. निशिकांत मिरजकर
- ❍ अनुवाद का व कशासाठी - डॉ. सूर्यनारायण रणसुभे
- ❍ भाषांतर : भाषा आणि कवितेचे भाषांतर - डॉ. दीपक बोरगावे

■ **सात अनुवादक आणि त्यांचे अनुभव**

- ❍ अनुवाद म्हणजे अनुसृजन - डॉ. लक्ष्मीनारायण बोल्ली
- ❍ अनुवाद - एक सृजनात्मक अनुभव - डॉ. उमा कुलकर्णी
- ❍ बंगालीतून अनुवाद करताना - विलास गिते
- ❍ ललित साहित्यानुवाद - एक विश्लेषण - डॉ. कमल अभ्यंकर
- ❍ अनुवाद प्रक्रियेतील आव्हानं - मिलिंद चंपानेरकर
- ❍ इंग्रजी - मराठी - इंग्रजी अनुवादांचे अनुभव - प्रा. उषा तांबे
- ❍ गजलचा अनुवाद करताना - सदानंद डबीर

■ **पाच अनुवादित कथा**

- ❍ सदाअत हसन मंटो (उर्दू) - किरण येले
- ❍ कामतानाथ (हिंदी) - चंद्रकांत भोंजाळ
- ❍ अमृता प्रीतम (पंजाबी) - सुलभा कोरे
- ❍ मावजी महेश्वरी (गुजराती) - प्रकाश भातंब्रेकर
- ❍ मु. मेता (तमिळ) - श्रीप्रकाश अधिकारी

■ **मेहता पब्लिशिंग हाऊसचे सुनिल मेहता यांची मुलाखत आणि**

■ **दहा अनुवादित कविता: मल्याळम, बंगाली, ओडिया, तेलुगु, कन्नड, आसामी, कोकणी, नेपाळी, मणिपुरी आणि डोगरी भाषेतील कवितांचे स्वैर अनुवाद**

नॅचरल शेडच्या कागदावर उत्तम छपाई आणि पुंडलीक वझे यांचे कलात्मक मुखपृष्ठ

**संपर्क :** मुंबई मराठी साहित्य संघ, डॉ. भालेराव मार्ग, गिरगाव, मुंबई-४०० ००४. ✆ २३८५६३०३, २३८७६१५८

# आगा हश्र काश्मिरींशी दोन भेटी

मूळ व्यक्तिचित्र : सआदत हसन मंटो
अनुवाद : डॉ. वसुधा सहस्त्रबुद्धे

मंटोने कवी, कलाकार, लेखक, मित्र अशी अनेक स्मृतिचित्रे लिहिली कारण मंटोला माणसं वाचायला खूप आवडायची. तो त्यांच्या अंतरंगात डोकावून त्यांच्यातलं वेगळेपण आणि माणूस शोधायचा प्रयत्न करायचा. मंटोने सिनेसृष्टीतील कलाकार, नसीम बानो, नर्गिस, अशोक कुमार, श्याम, नूरजहाँ इत्यादींची अप्रतिम स्मृतिचित्रे लिहिली. मंटो म्हणतो, ''मला नटवणं, सजवणं ठाऊक नाही. आगा हश्रचा तिरळा डोळा मी सरळ करू शकलो नाही. त्यांच्या तोंडून शिव्यांऐवजी फुलांचा वर्षाव करू शकलो नाही.''

पारसी थिएटरचा कालखंड साधारणपणे१८७९ ते १९३५ आहे. पारसी रंगमंचाने अरबी, फारसी, हिंदू धर्मातील प्राचीन कथा, संस्कृत नाट्य परंपरेचा वारसा घेऊन, नवीन कल्पना आणि नवीन रंगात सजवून प्रेक्षकांसमोर मांडल्या. रामायण-महाभारतातील प्रसंग, पात्रं आणि अलिफ लैलाची कथा अगदी सहज, आकर्षक ढंगात साकार झाली. आगा हश्र काश्मिरी, अहसन लखनवी आणि रौनकसारख्या लेखकांनी इंग्रजी कथानकं भारतीय रंगात अशी काही रंगवली की मूळ रूप ओळखणंही कठीण व्हावं. आगा हश्रच्या लेखनावर काशीची संस्कृती व भाषेचा प्रभाव होता, तसेच राष्ट्रीय आंदोलनाचाही प्रभाव होता म्हणूनच वीर रस आणि देशप्रेमाने भारलेली ऐतिहासिक पृष्ठभूमीवर लिहिलेली त्यांची 'भारत रमणी', 'यहुदी की लडकी' आणि 'रुस्तुम सोहराब' ही नाटकं खूप गाजली. त्याचबरोबर ते विनोदी नाटकंही लिहीत होते. त्यांनी एकूण ३४ नाटकं लिहिली.



मंटोने रेखाटलेले हे आगा हश्र यांचे व्यक्तिचित्र.

आता सन आणि तारीख मला आठवत नाही, म्हणूनच हा लेख लिहिताना माझा खूप गोंधळ होतो आहे. कोणतं वर्ष होतं आणि माझं वय काय होतं देवालाच ठाऊक, परंतु मला मात्र एवढं चांगलं आठवतं आहे की खूप प्रयत्न करून मी एन्ट्रन्सची परीक्षा पास झालो आणि पुढे एम.ए.च्या परीक्षेत दोन वेळा नापास झालो. त्यानंतर अभ्यासातून माझं लक्षच उडालं. हळूहळू मला जुगार आवडू लागला. कटरा जैमल सिंहमध्ये दिनू या फजलू कुंभाराच्या दुकानात वरती एक जागा होती. तिथे रात्रंदिवस जुगार चालायचा. फ्लश खेळला जायचा. सुरुवाती-सुरुवातीला मला हा खेळ समजत नव्हता. एकदा समजल्यावर मात्र हा खेळ मला खूप आवडू लागला. रात्रीच्या वेळी झोपण्यामुळे थोडा वेळ मिळायचा. त्यातही राऊण्ड आणि ट्रेनची स्वप्नं पडायची.

एक वर्षानंतर मला जुगाराचा कंटाळा येऊ लागला. आता काहीतरी वेगळं करायची इच्छा होत होती, परंतु काय ते मला ठाऊक नव्हतं. दिनू या फजलू कुंभाराच्या बैठकीत एके दिवशी अमृतसरच्या म्युन्सिपाल्टीतील टांग्याचा फौजदार इब्राहिम आला होता. त्याने आगा हश्रबद्दल चर्चा केली आणि म्हणाला, ''ते अमृतसरला आले आहेत.'' हे ऐकल्यावर मला शाळेतले ते दिवस आठवले. त्यावेळी तीन-चार व्यावसायिक लफंग्यांबरोबर आम्ही एका ड्रॅमॅटिक क्लबची स्थापना केली आणि आगा हश्रचं नाटक करायचं ठरवलं. हा क्लब फक्त दहा-पंधरा दिवसच टिकला कारण आमच्या वडिलांनी एक दिवस आक्रमण करून आमचा तबला-पेटी सगळं काही तोडून-मोडून टाकलं आणि बजावून सांगितलं, ''असलं वाह्यात मनोरंजन मला अजिबात आवडत नाही.''

क्लबच्या त्या घटनेत आगा हश्रच्या नाटकातील काही शब्द माझ्या मनात अजूनही घर करून उभे आहेत. मला वाटतं फौजदार इब्राहिमने जेव्हा आगा हश्रचं नाव घेतलं तेव्हा त्या नाटकातील संपूर्ण पॅराग्राफ मला आठवला होता. 'आता ते अमृतसरमध्ये आले आहेत' या बातमीने माझ्या मनात थोडं अधिकच आकर्षण निर्माण झालं.

आगा हश्रचं एकही नाटक बघण्याची मला संधी मिळाली नाही कारण रात्री घराबाहेर पडण्याची मला अजिबात परवानगी नव्हती. त्यांची सगळी नाटकंसुद्धा मी वाचली नव्हती कारण मला 'मिस्ट्रीज ऑफ कोर्ट ऑफ लंडन' आणि 'तीर्थराम फिरोजपुरी'च्या अनुवादित इंग्रजी रहस्य-कादंबऱ्यांसारखी पुस्तकं वाचायला आवडत होती. तरीसुद्धा आगासाहेबांच्या अमृतसरला झालेल्या आगमनाच्या बातमीने मी प्रभावित झालो.

आगासाहेबांबद्दल भरपूर बातम्या प्रसिद्ध झाल्या होत्या. एकतर ते 'वकीलाँ' गल्लीत राहत होते. त्याच गल्लीत आमचं घर होतं. एकतर खूप मोठा माणूस होते. काश्मिरी होते, म्हणजे आमच्याच जातीचे आणि लहानपणी एके काळी ते आमच्याच गल्लीत राहिले होते. आता या सगळ्याचा माझ्या मानसिकतेवर काय परिणाम झाला असेल ते तुम्हाला नीट कळलं असेल.

मी फौजदार इब्राहिमला, ''तुला आगासाहेबांबद्दल आणखी काही माहिती आहे का?'' असं विचारलं, तेव्हा त्याने सांगितलेली माहिती यापूर्वी मी हजार जणांकडून ऐकली होती. ते एक नंबरचे विलासप्रिय, ऐषारामी आहेत. रात्रंदिवस दारूच्या नशेत धुंद असतात. बोलणं अतिशय वाईट. अशा काही शिव्या देतात की वाईट प्रकारच्या शिव्या देणाऱ्यांमध्ये त्यांच्या बरोबरीचं एखादं सुद्धा उदाहरण मिळणार नाही. मोठ्या-मोठ्या माणसांची सुद्धा ते पर्वा करीत नसत. एकदा कंपनीतील एका श्रीमंत माणसाने त्यांना नाटकाबद्दल विचारलं तर त्यांनी त्याला इतकी वाईट शिवी दिली, की ती शिवी त्याच्या मनात आगासाहेबांबद्दल तिरस्कार निर्माण करायला पुरेशी होती, परंतु आश्चर्य म्हणजे तो श्रीमंत माणूस त्याबद्दल काहीच न बोलता, उलट हात जोडून म्हणाला, ''आगासाहेब आम्ही तुमचे नोकर आहोत.''

ते शीघ्रकवी होते. एकदा काय झालं, रिहर्सल सुरू होती आणि भयंकर उन्हाळ्यामुळे एक अभिनेता कपाळावरील घाम बोटांनी पुन्हा-पुन्हा पुसत होता. आगासाहेब वैतागले आणि त्याच्यासाठी एक शेर रचला.

अब्रु न सँवारा करो कट जाएगी ऊँगली
नादान हो तलवार से खेला नहीं करते

एकदा अशीच रिहर्सल चालू होती. एका अभिनेत्रीला 'फंड' शब्द उच्चारता येत नव्हता. आगासाहेबांनी 'फंड' शब्दासारखाच एक शब्द इतक्या जोरात उच्चारला की अभिनेत्रीने 'फंड' शब्द ताबडतोब उच्चारला.

आगासाहेबांना असं कळलं की 'हासिद' असा प्रचार करतो आहे की त्यांची हिंदीतील नाटकं त्यांनी स्वत: लिहिलेली नाहीत कारण त्यांना हिंदी भाषा येत नाही. मग आगासाहेब नाटक सुरू होण्यापूर्वी स्टेजवर येऊन प्रेक्षकांना म्हणाले- ''काही उपद्रवी माणसं माझ्याबद्दल अशी अफवा पसरवत आहेत की, माझी हिंदी भाषेत लिहिलेली नाटकं मी भाड्याच्या लेखकांकडून लिहून घेतली. मी आता तुमच्यासमोर शुद्ध हिंदीत भाषण करणार आहे.'' असं म्हणून आगासाहेबांनी दोन तास हिंदीत भाषण केलं. त्यामध्ये एकही उर्दू अथवा फारसी शब्द नव्हता.

आगासाहेब ज्या अभिनेत्रीकडे बघत असत, ती ताबडतोब उठून त्यांच्याबरोबर एकांतात जात असे.

आगासाहेब लेखकांना 'तयार व्हा' असा हुकूम द्यायचे आणि

दारू पिऊन चालता-चालता एकाच वेळी कॉमेडी आणि ट्रॅजेडी लिहवून घ्यायचे.

आगासाहेबांनी कधीच कोणत्याही स्त्रीवर प्रेम केलं नाही, परंतु इब्राहिम फौजदाराकडून कळलं की हे खोटं आहे. कारण अमृतसरची प्रसिद्ध वेश्या मुख्तारवर त्यांचं प्रेम आहे. तिनेच 'औरत का प्यार' सिनेमामध्ये नायिकेची भूमिका केली होती.

'मुख्तारला' मी बघितलं होतं. 'हाल' बाजारात. अनवर पेंटरच्या दुकानात बसून आम्ही जवळ-जवळ प्रत्येक शुक्रवारी संध्याकाळी 'मुख्तार उर्फ दारीला' नवीन-नवीन फॅशनचे कपडे घालून दुसऱ्या वेश्यांबरोबर 'जाहिरा पीर' दर्ग्याकडे जाताना बघितलं आहे.

आगासाहेब कसे दिसायचे ते मला ठाऊक नव्हतं. त्यांचे काही छापलेले फोटो मी बघितले होते, परंतु ती छपाई इतकी वाईट होती की त्यांचा चेहरा ओळखता येत नव्हता. वयाच्या संदर्भात एवढं ठाऊक होतं की आता ते वृद्ध झाले आहेत. आयुष्याच्या शेवटच्या दिवसात त्यांचं मुख्तारबरोबर प्रेम जमलं याबद्दल, दिनूने फजलू कुंभाराच्या बैठकीत जुगार खेळणाऱ्या आम्हा सर्वांनाच अतिशय आश्चर्य वाटत होतं. मला आठवतं आहे, जिंकलेले पैसे बाजूला करताना दिनूने मान हलवून मोठ्या तत्त्ववेत्त्याच्या थाटात म्हटलं, ''म्हातारपणचं प्रेम मोठं निर्दयी असतं.''

बैठकीत एक दिवस आगासाहेबांबद्दल बोललं गेलं आणि मग जवळजवळ रोजच त्यांच्याबद्दल बोलणं होऊ लागलं. आमच्यापैकी इब्राहिम फौजदाराला आगासाहेबांच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल माहिती होती. एक दिवस त्याने सांगितलं, ''काल रात्री आम्ही मुख्तारच्या कोठीवर होतो. आगासाहेब लोडाला टेकून बसले होते. आमच्यापैकी प्रत्येकाने त्यांना खूप आग्रह करून म्हटलं की, त्यांनी आपलं नवीन नाटक 'रुस्तम-ओ-सोहराब'मधील एखादा किस्सा आम्हाला ऐकवावा, परंतु त्यांनी नकार दिला. आम्ही सगळेच निराश झालो. आमच्यापैकी एकाने मुख्तारकडे संकेत केला. ती आगासाहेबांच्या बाजूला जाऊन बसली आणि त्यांना म्हणाली, ''आगासाहेब आमचा हुकूम आहे. तुम्ही 'रुस्तम-ओ-सोहराब' ऐकवावं.'' आगासाहेब हसले आणि त्यांनी रुस्तमचे संवाद उत्साहाने व हावभावांसहित सुरू केले. बाप रे! आवाज कसला खणखणीत होता. असं वाटत होतं, जणू पाण्याचा जबरदस्त प्रवाह डोंगरातील दगडधोंडे वाहून नेत आहे.

एक दिवस इब्राहिमने सांगितलं की आगासाहेबांनी दारू पिणं एकदम बंद केलं आहे. आगासाहेबांना ओळखणाऱ्या लोकांना याचं खूप आश्चर्य वाटलं. इब्राहिमने सांगितलं, मुख्तारच्या प्रेमात पडल्यामुळे नुकताच त्यांनी हा निर्णय घेतला. आम्हाला कळलं नाही, हे प्रेम कसलं संकट असतं? परंतु दिनूने जिंकलेले पैसे लुंगीच्या गाठीला बांधताना पुन्हा म्हटलं, ''म्हातारपणातल्या प्रेमापासून देव रक्षण करो. फारच क्रूर गोष्ट आहे ती.''

आता मला जुगाराचा कंटाळा आला होता. म्हणून बैठकीत जाणं मी हळूहळू बंद केलं. या काळात मला बारीसाहेब आणि हाजी लक-लक भेटले. 'मसावत' दैनिकाचे एडिटर म्हणून ते अमृतसरला आले होते. जीजेच्या 'शीराज' हॉटेलमध्ये दोघेही चहा प्यायला यायचे आणि साहित्य व राजकारणावर चर्चा करायचे. त्यांच्याशी माझी भेट झाली. मला बारीसाहेब खूपच आवडले. याच वेळी जीजेने अख्तर शीरानीना बोलावलं.

रात्रंदिवस दारू पिणं चालायचं. मला साहित्य आवडायला लागलं. आधी जो वेळ फ्लश खेळण्यात जायचा तोच आता 'मसावत'च्या ऑफिसमध्ये जाऊ लागला. बारीसाहेब कधी-कधी एखादी बातमी मला अनुवादासाठी देत असत. मग मी माझ्या मोडक्या-तोडक्या उर्दूमध्ये अनुवाद करीत असे. हळूहळू मी सिनेमाच्या बातम्यांचा कॉलम सांभाळायला सुरुवात केली. काही मित्र म्हणाले ही वायफळ बडबड आहे, परंतु बारीसाहेब म्हणाले, ''तुमचे मित्र बकवास करीत आहेत. तू आता स्वतंत्र लेख लिहायला सुरुवात कर.''

त्यावेळी माझ्याकडून स्वतंत्र लेख लिहिले गेले नाहीत, परंतु माझ्या कपाटात असलेलं व्हिक्टर ह्यूगो या फ्रेंच लेखकाचं 'लास्ट डेज ऑफ कंडेम्ड' नावाचं पुस्तक बारीसाहेब घेऊन गेले. दुसऱ्या दिवशी दुपारी मी 'मसावत'च्या ऑफिसमध्ये गेलो तेव्हा कळलं की बारीसाहेबांचं डोकं फिरलंय. ते सकाळपासून एक पुस्तक जोरजोरात वाचत आहेत. थोड्या-थोड्या वेळाने इथे येतात. डोक्यावर तांब्याभर थंड पाणी घालतात आणि पुन्हा खोलीत जातात. मी तिकडे गेलो तर दरवाजा बंद आणि ते प्रवचनकाराच्या थाटात जोरजोरात काहीतरी इंग्रजी वाचत होते. मी दरवाजावर थाप मारली. दरवाजा उघडला.

बारीसाहेब झब्बा-लेंग्याशिवाय बाहेर आले. हातात व्हिक्टर-ह्यूगोचं पुस्तक होतं. ते माझ्यासमोर धरून इंग्रजीत म्हणाले, ''इट इज व्हेरी हॉट बुक.'' आणि मग पुस्तकवाचनाने आलेली धग कमी झाल्यावर, मी त्याचा अनुवाद करावा असा मला त्यांनी सल्ला दिला.

मी पुस्तक वाचलं. लेखनशैली खूपच प्रभावी होती. मग मी दारू पिऊन अनुवाद करण्याचा प्रयत्न केला, परंतु डोळ्यांसमोर अक्षरांची सरमिसळ झाली. अंगणात पलंग टाकून, तोंडात हुक्क्याची नळी घेऊन, अनुवाद लिहायला बहिणीला बसवून प्रयत्न केला, परंतु व्यर्थ. शेवटी डिक्शनरी समोर ठेवून मी एकटात बसलो आणि दहा-पंधरा दिवसांत संपूर्ण पुस्तकाचा अनुवाद केला. बारीसाहेबांना तो खूपच आवडला. त्यामध्ये सुधारणा करून मग उर्दू बुकस्टॉलचा मालक याकूब हसनला तीस रुपयाला विकत दिला. याकूब हसनने फारच थोड्या दिवसात ते पुस्तक प्रकाशित केलं. आता मी 'साहब..ए..किताब' होतो.

'मसावत' बंद झालं आणि बारीसाहेब लाहोरच्या दुसऱ्या वर्तमानपत्रासाठी तिकडे गेले. जीजेचं हॉटेल एकदम रिकामं झालं. माझं



मनोरंजन नाहीसं झालं. लिहिण्याची गोडी लागली होती, परंतु मित्रांकडून दाद मिळत नव्हती म्हणून तिकडे लक्ष दिलं नाही. आता पुन्हा दिनू या फजलू कुंभाराची बैठक होती. जुगार खेळत होतो, परंतु त्यात पहिल्यासारखी मजा नव्हती की उत्साह नव्हता.

एक दिवस इब्राहिम पोलिसाने फ्लश खेळता-खेळता सांगितलं की आगा हश्र आले आहेत आणि मुख्तारकडे उतरले आहेत. मी त्याला म्हटलं, ''कधी तरी मला त्यांच्याकडे घेऊन चला.'' इब्राहिमने वचन दिलं परंतु पूर्ण केलं नाही. मी जेव्हा त्याच्यामागे लागलो तेव्हा 'आगासाहेब लाहोरला गेले' असं त्याने सांगून टाकलं.

माझा एक मित्र होता हरिसिंग. देव त्याचं भलं करो. खूप चांगला माणूस होता. पाच घरं विकून दोन वेळा युरोपला जाऊन आला होता आणि आता सहावं आणि शेवटचं घर अतिशय सभ्यपणे हळूहळू संपवीत होता. फ्रान्समध्ये फक्त सहा महिनेच राहिला परंतु फ्रेंच भाषा नि:संकोचपणे बोलत होता. अतिशय हडकुळा, अशक्त माणूस होता परंतु जबदरस्त चपळ होता. गोडबोल्या आणि 'घासू' म्हणजे गिरमिटासारखा अगदी आतपर्यंत घुसणारा. एक दिवस मी त्याला आगा हश्रबद्दल विचारलं. तर लगेच तो म्हणाला, ''तुम्हाला त्यांना भेटायचं आहे का?'' मी म्हटलं, ''बऱ्याच दिवसांपासून त्यांना एकदा बघायची मला इच्छा आहे...'' हरिसिंग ताबडतोब म्हणाला, ''त्यात काय कठीण आहे? इथेच अमृतसरमध्ये पंडित मोहसिनकडे ते उतरले आहेत. मी त्यांना जवळजवळ रोज भेटतो.'' मी आनंदाने म्हटलं, ''हरी, मग उद्या संध्याकाळी तू मला त्यांच्याकडे घेऊन चल.'' हरीने व्हिस्कीचा ग्लास आपल्या पातळ ओठांना लावला आणि नाजूकपणे लहानसा घोट घेऊन फ्रेंच भाषेत काहीतरी म्हटलं. त्याचा अर्थ होता, ''नक्की मित्रा.''

आणि दुसऱ्या दिवशी संध्याकाळी हरी मला आगा हश्र काश्मिरींकडे घेऊन गेला. पंडित मोहसिन नावाप्रमाणे, काश्मिरी पंडित होते. त्यांचं नाव काय होतं कुणास ठाऊक. मोहसिन त्यांचं टोपण नाव होतं. मुशायऱ्यात जुन्या सनातनी कवितेचा नमुना म्हणून ते जायचे. 'कटरा धुन्निया'च्या अमृत सिनेमाशी त्यांचा व्यावसायिक संबंध होता.

आगासाहेबांची पंडितजींबरोबरची मैत्री कवितेमुळे होती की सिनेमामुळे ठाऊक नाही, की 'कटरा धन्निया' त्यांचं निमित्त होतं. तिथे 'अमृत सिनेमा' आणि मुख्तारची बैठकीची गादी अगदी समोरासमोर होते कारण काहीही असो आगासाहेब पंडित मोहसिनकडे उतरले होते आणि त्यांच्या बोलण्यातून कळलं की दोघांमधील संबंध अगदी अनौपचारिक होते.

पंडित मोहसिनची बैठक किंवा कार्यालय कटरा धुन्नियाच्या जवळ पशमवाल्या बाजारातून बाहेर पडून पुढे जिथे भाजीची दुकानं सुरू होतात तिथे एका मोठ्या ओसरीवर होतं. हरिसिंग पुढे आणि मी त्याच्या मागे. जिना चढताना छातीत धडधडत होतं. मी आज आगा हश्रला बघणार होतो.

बाहेर अंगणात खुर्च्यांवर काही माणसं बसली होती. पंडित मोहसिन एका कोपऱ्यात लाकडी पलंगावर बसून गुडगुडी ओढत होता. माझ्यासमोर सर्वात आधी एक विचित्र माणूस आला. लालभडक रंगाची चमकदार सॅटिनची घेरदार सुरवार, 'दो घोडे बोस्की' कॉलरवाला पांढरा शर्ट, कमरेला गडद निळ्या रंगाची गोंडेवाली नाडी, मोठे मोठे विचित्र डोळे... मला वाटलं 'कटरा धन्नियां'चा कोणीतरी पीर असेल, परंतु तेवढ्यात कोणीतरी त्यांना 'आगासाहेब' म्हणून हाक मारली. मला आश्चर्य वाटलं.

हरिसिंगने पुढे होऊन त्या विचित्र माणसाशी हात मिळवला आणि माझ्याकडे खूण करून त्यांना सांगितलं, ''हा माझा मित्र सआदत हसन मंटो... त्याला तुम्हाला भेटायची खूप इच्छा होती.''

आगासाहेबांनी आपले मोठे-मोठे विचित्र डोळे माझ्याकडे वळवून हसत-हसत म्हटलं, ''लॉर्ड मिंटोबरोबर तुमचं काय नातं?'' मी उत्तर देऊ शकलो नाही, परंतु हरिसिंग म्हणाला, ''हे मिंटो नव्हे, मंटो आहेत... काश्मिरी''...

आगासाहेबांनी एक मोठ्ठा 'ओ' असा उद्गार केला आणि पंडित मोहसिनबरोबर काश्मिरींच्या 'अल'बद्दल कंटाळवाणी चर्चा सुरू केली.

मी जवळच्याच बाकावर बसलो. पंडितजींना आगासाहेबांच्या बोलण्यात अजिबात रस नव्हता कारण ते त्यांना परत-परत सांगत होते, ''आगासाहेब, ते जाऊ दे ना. तुम्ही माझ्यासाठी दोन रिळांचं विनोदी नाटक कधी लिहिणार ते सांगा.''

आगासाहेबांना त्या विनोदी नाटकात अजिबात रस नव्हता. ते काश्मिरी लोकांच्या 'अल'बद्दल बोलत होते पण असं वाटत होतं की

टीप : अल - घराण्यांसंबंधी चर्चा

डोक्यात आणखी काही तरी विचार चालला होता. बोलत असताना मध्येच एक-दोन वेळा आपल्या नोकराला मोठ्या-मोठ्या शिव्या दिल्या आणि तो अजून का आला नाही म्हणून आठवण केली.

आगासाहेब गप्प झाल्यावर पंडित मोहसिन त्यांना म्हणाला, ''आगासाहेब, आत्ता तुमचा मूड चांगला आहे. मी कागद-पेन आणतो, तुम्ही ती कॉमेडी लिहायला सुरुवात करा.''

आगासाहेबांचा एक डोळा चकणा होता. त्यांनी तो फिरवून विचित्रपणे पंडितजींकडे बघितलं, ''अरे गप्प बस. आगासाहेबांचा मूड नेहमीच चांगला असतो.''

पंडितजी गप्प बसून गुडगुडी ओढू लागले. त्यावेळी मला वाटलं माझं डोकं गरगरतं आहे. खूप उग्र वास येत होता. मी बघितलं, आगासाहेबांच्या दोन्ही कानात अत्तराचे फाये होते आणि त्यांनी डोक्यावरही बहुतेक अत्तर चोपडलं होतं. मी काहीसा त्या उग्र वासात आणि काहीसा त्यांच्या वेशभूषेच्या गडद आणि चकचकीत रंगात बुडून गेलो होतो.

बाजारात अचानक आरडाओरडा झाला. एका माणसाने उठून बाहेर डोकावून पाहिलं आणि आगासाहेबांना म्हणाला, ''साहेब, इकडे या. मेंदीची मिरवणूक येते आहे.''

आगासाहेब म्हणाले, ''बकवास आहे'' आणि त्यांनी एका घटनेसंबंधी अतिशय संशोधनात्मक लेक्चर द्यायला सुरुवात केली. इतकी सूक्ष्म रहस्यं शोधून काढली की सगळे चकित झाले. शेवटी नाटकी ढंगात म्हणाले, ''नदीचं तोंड बंद होतं. नदी कोरडी झाली होती. प्यायला पाण्याचा थेंब नव्हता. मेंदी कशात भिजवली''... यापुढे बोलता बोलता आगा हश्र थांबले. एक साहेब बहुतेक शिया होते. ते मैफिलीतून उठून गेले. आगासाहेबांनी मूड बदलला.

पंडित मोहसिनला संधी मिळाली म्हणून त्यांनी पुन्हा एकदा विनंती केली, ''आगासाहेब तुम्हाला दोन रिळांची कॉमेडी लिहायला लागेल.''

आगासाहेबांनी जोरदार शिवी दिली, ''कॉमेडीची... इथे ट्रॅजेडीबद्दल बोलणं चाललं आहे आणि तुम्ही आपली कॉमेडी घेऊन आलात.'' एवढं बोलून आगासाहेबांनी पुन्हा एकदा त्या एका घटनेबद्दल विद्वान पंडिताच्या थाटात चर्चा सुरू केली कारण या घटनेबद्दल त्यांना असलेली माहिती व त्यांचे विचार त्यांना अजून पूर्णपणे मांडता आले नव्हते. परंतु अचानक त्यांच्या मनात काय आलं कोण जाणे, एकदम आपल्या नोकराला त्यांनी शिव्या द्यायला सुरुवात केली की तो अजून का आला नाही, म्हणून मग हा क्रम थांबला.

थोड्या वेळाने इकडच्या-तिकडच्या गप्पा सुरू झाल्या. कोणीतरी आगासाहेबांना मौलाना अबुल कलामच्या ज्ञानाबद्दल विचारलं. त्यावर ते म्हणाले, ''मुहीउद्दीनबद्दल विचारता का? आम्ही दोघे मिळून अमेरिकी आणि इसाई शास्त्रार्थ करणाऱ्यांशी वादविवाद करायचो. तासन्तास चर्चा करायचो. खूप वेगळे दिवस होते ते.''

असं म्हणून आगासाहेब आपल्या वेशभूषेच्या भडक रंगात आणि कानात अडकवलेल्या फाया आणि डोक्यावर चोपडलेल्या अत्तराच्या उग्र वासासहित भूतकाळातील आठवणींमध्ये काहीवेळ मग्न झाले. त्यांनी आपले मोठेमोठे डोळे बंद केले. ते वेश्यांचे पीर (गुरू) वाटावेत असा त्यांनी चेहरा त्यांनी केला होता. त्यांचा चेहरा विद्रुप होता. डोळे बंद होते. बंद पापण्यांच्या सुरकुतलेल्या पातळ त्वचेखाली जणू काचेच्या मोठ्या गोट्या हळूहळू हालचाल करीत होत्या. त्यांनी डोळे उघडले तेव्हा मला वाटलं किती वर्षांची नशा यामध्ये साठली आहे. डोळ्यांच्या नसांमध्ये केवढी लाली साचली आहे.

आगासाहेब पुन्हा एकदा म्हणाले, ''ते दिवस अद्भुत होते. आजादला शिथिल डावपेच खेळायची सवय होती आणि मला अगदी ताणलेले डावपेच खेळायला आवडायचं. एक हात मारायचा आणि नदीचा तळ गाठायचा. हरीफ तोंड उघडून बघत राहायचा. एकदा आजाद अतिशय वाईट प्रकारे अडकला. अतिशय हट्टी अशा चार ख्रिश्चन मिशनरींबरोबर सामना होता. मी तिथे पोचलो आणि आजादच्या जिवात जीव आला. त्याने मिशनरींना माझ्याकडे सोपवलं. मी दोन-तीन असे पेच टाकले की ते वैतागले. मैदान आमच्या हाती आलं, परंतु माझा घसा सुकला. भयंकर उन्हाळा होत होता. मशिदीत बसणं अशक्य झालं होतं. मी आजादला म्हटलं, ''ती बाटली कुठे आहे?'' तो म्हणाला, ''माझ्या खिशात.'' मी म्हटलं, ''कृपा करून इथून चल. माझा घसा सुकून लाकूड झाला आहे.'' दूर जाण्याएवढी अंगात शक्ती नव्हती. नाईलाजाने तिथेच मशिदीच्या एका स्नानगृहात जाऊन प्यायलो.

एवढ्यात आगासाहेबांचा नोकर आला. आगासाहेबांनी आपल्या खास शैलीत त्याला शिव्या देऊन, एवढा उशीर होण्याचं कारण विचारलं. नोकराला शिव्यांची सवय असावी. त्याने कागदाचं एक बंडल उघडून त्यांच्यासमोर धरलं, ''हे बघा, अशी वस्तू आणली आहे, की तुम्ही खूश व्हाल.''

उघडलेलं बंडल आगासाहेबांनी हातात घेतलं. त्यात भडक रंगाच्या चार नाड्या होत्या. आगासाहेबांनी त्याच्याकडे बघितलं आणि अतिशय भीती वाटावी असे मोठे डोळे करून ते नोकरावर गरजले, ''ही वस्तू घेऊन आलास तू? या अशा नाड्या आपल्याकडचे तेली-तांबोळी सुद्धा वापरीत नाहीत.'' असं म्हणून बंडल फरशीवर फेकलं. थोडा वेळ नोकरावर चिडले, बडबडले. मग खिशातून दोन-तीन हजार रुपये काढले आणि त्याला हुकूम दिला, ''जा, पान घेऊन ये.''

पंडित मोहसिनने गुडगुडी बाजूला ठेवली आणि म्हटलं, ''नाही-नाही आगासाहेब मी मागवतो ना.''

आगासाहेबांनी सगळ्या नोटा विलासी थाटात पुन्हा आपल्या खिशात ठेवल्या आणि म्हटलं, ''जा, तुझ्याकडे काही बाकी उरली आहे का?''

नोकर जाऊ लागला तर त्याला थांबवून म्हणाले, ''थांब.

तिकडे चौकशी करून ये की ती अजून का आली नाही?''

नोकर गेला आणि थोड्या वेळात जिन्याकडून मंद सुगंध आला. मग रेशमी सळसळ ऐकू आली. आगासाहेबांचा चेहरा खुलला. मुख्तार अगदी अजिबात सुंदर नव्हती. सुंदर ढगांचे कपडे घालून तिने अंगणात प्रवेश केला. आगासाहेब आणि हाजरीनला नमस्कार करून खोलीत निघून गेली. आगासाहेबांचे डोळे तिला तिथपर्यंत सोडायला गेले.

एवढ्यात वर्तमानपत्राच्या कागदात गुंडाळलेलं पान आलं. नोकर आत जाऊ लागला, त्याला आगासाहेब म्हणाले, ''कागद फेकून देऊ नको. नीट जपून ठेव.''

मी आश्चर्यानं विचारलं, ''आगासाहेब, तुम्ही त्या कागदाचं काय करणार?''

अण्णासाहेब म्हणाले, ''वाचेन. छापलेल्या कागदाचा कोणताही तुकडा मला मिळाला तर मी तो जरूर वाचतो.'' एवढं बोलून ते उठले. क्षमा करा. आतमध्ये माझी प्रेयसी वाट बघते आहे.''

पंडित मोहसिनने गुडगुडी ओढायला सुरुवात केली. थोड्या वेळाने मी आणि हरि सिंग तिथून बाहेर पडलो.

मी कितीतरी दिवस त्या भेटीबद्दल विचार करीत होतो. आगासाहेब हे हजारो पैलू असलेलं व्यक्तित्व होतं. ती त्यांची काही नाटकं वाचली. त्यात खूप चुका होत्या आणि मी अतिशय साध्या कागदावर छापली होती. जिथे कॉमेडी असेल तिथे फक्कडपणाचा अनुभव यायचा. नाटकीय वळणावर संवाद जोरदार होते. काही कविता सूफी ढंगात होत्या तर काही अतिशय लालित्यपूर्ण. सगळ्यात मजेशीर गोष्ट म्हणजे या नाटकाचा विषय कलावंतीण हा होता. समाजाच्या दृष्टीने तिचं अस्तित्व विषासमान असतं, असं आगासाहेबांनी सिद्ध केलं होतं. आणि आयुष्याच्या शेवटच्या टप्प्यावर आगासाहेब दारू सोडून एका वेश्येवर खूप उत्साहाने प्रेम करीत होते.

एकदा अशीच मोहसिनशी भेट झाली. तेव्हा ते म्हणाले, ''प्रेमाच्या बाबतीत मला माहिती नाही, परंतु दारू सोडल्यामुळे त्यांना लवकरच मरण येईल.''

त्यानंतर आगासाहेब काही दिवस तरी जगले, परंतु पंडित मोहसिन हे बोलल्यानंतर महिन्याभरातच जग सोडून गेले.

मी आता वेगवेगळ्या वर्तमानपत्रात लिहायला सुरुवात केली. काही महिने उलटले. लोकांकडून कळलं की आगा हश्र लाहोरमध्ये 'रुस्तुम-ओ-सोहराब' नावाचा सिनेमा बनवत आहेत. त्याच्यासाठी पाण्यासारखा पैसा खर्च होतो आहे. स्पष्टच होतं, त्या सिनेमाची हिरोईन मुख्तार होती.

अमृतसर-लाहोर हा फक्त एक तासाचा प्रवास आहे. आगासाहेबांना पुन्हा एकदा भेटायची खूप इच्छा होती परंतु सतत काहीतरी अडचणी येत होत्या. त्यामुळे लाहोरला जाणं झालंच नाही.

बऱ्याच दिवसांनंतर बारीसाहेबांनी बोलावलं म्हणून मी लाहोरला गेलो. तिथे पोचल्यावरसुद्धा असा काही अडकलो की आगासाहेबांना विसरून गेलो. संध्याकाळी आम्ही उर्दू बुकस्टॉलमध्ये जायचं ठरवलं म्हणून मग अरब हॉटेलमध्ये चहा पिऊन दोघे तिकडे गेलो. बुकस्टॉलमध्ये पोचल्यावर मी बघितलं, आगासाहेब याकूबच्या टेबलाजवळील खुर्चीत बसले होते.

मी बारीसाहेबांना म्हटलं, ''हे आगा हश्र आहेत.'' त्यांना न्याहाळून बघत ते म्हणाले, ''हे आहेत आगा हश्र?''

आगासाहेबांचा वेष तसाच होता. पांढरा बोस्कीचा शर्ट, गडद निळ्या रंगाची घेरदार सुरवार. ते एक पुस्तक बघत होते. जवळ पोचल्यावर माझ्या छातीत धडधडू लागलं कारण आगासाहेबांच्या हातात मी अनुवाद केलेलं पुस्तक 'सर-गुजस्त-ए-असीर' होतं.

याकूबने माझी व बारीसाहेबांची आगासाहेबांशी ओळख करून दिली आणि सांगितलं, ''तुम्ही जे पुस्तक बघत आहात, तो मंटोने केलेला अनुवाद आहे.''

आगासाहेबांनी आपल्या मोठ्या-मोठ्या डोळ्यांनी मला बघितलं. मला वाटलं होतं की ते मला ओळखतील परंतु त्यांनी माझ्याकडे बघितल्यावर पुस्तकाची काही पानं उलटली आणि म्हटलं, ''व्हिक्टर ह्यूगो कसं लिहिणारा लेखक आहे?''

बारीसाहेबांनी उत्तर दिलं, ''फ्रेंच साहित्यात व्हिक्टर ह्यूगोची प्रतिष्ठा महान आहे.''

पानं उलटत आगासाहेब म्हणाले, ''नाटककार होता का?''

पुन्हा बारीसाहेबांनीच उत्तर दिलं, ''नाटककारही होता.''

आगासाहेबांनी विचारलं, ''म्हणजे काय?''

बारीसाहेब म्हणाले, ''व्हिक्टर ह्यूगो खरंतर कवी होता. फ्रान्सच्या रोमँटिक आंदोलनाचा नेता होता. त्याने नाटकं आणि कादंबऱ्याही लिहिल्या. त्याची एक कादंबरी 'संकटग्रस्त' इतकी गाजली की नंतर लोक त्याची कविता विसरले आणि त्याला कादंबरी लेखक म्हणून ओळखू लागले.''

आगासाहेब ही माहिती मनापासून ऐकत होते. शेवटी त्यांनी याकूबला सांगितलं, ''घेतलेल्या पुस्तकात, 'सर गुजस्त-ए-असीर' सुद्धा ठेव.'' मला खूप आनंद झाला.

नंतर बारीसाहेबांशी बोलत-बोलत ते आतमध्ये शोरूममध्ये गेले. बारीसाहेबांशी चर्चा करून आगासाहेब प्रभावित झाले होते म्हणून मग बारीसाहेबांच्या पसंतीची आणखी काही पुस्तकं विकत घेतली. त्यावेळी बारीसाहेबांनी त्यांना म्हटलं, ''आगासाहेब तुम्ही हिंदुस्तानी नाटकाचा इतिहास का लिहीत नाही? अशा पुस्तकाची खूप आवश्यकता आहे.''

आगासाहेबांनी उत्तर दिलं, ''असं पुस्तक फक्त आगा हश्रच लिहू शकतो. त्याची इच्छा सुद्धा होती, परंतु हल्ली तो आपल्या कबरीत पाय लटकवून बसलेला असतो. मृत्यू त्याचा दरवाजा ठोठावतो आहे.''

मी विचारले, ''आगासाहेब बाजारात तुमची जी नाटकं विकली जातात...''

माझं वाक्य पूर्ण व्हायच्या आधीच आगासाहेब आपल्या बुलंद आवाजात म्हणाले, ''लाहौलवला! आगा हश्रची नाटकं आणि फालतू छपाई.. अनुमती न घेता... इकडून-तिकडून ऐकून-ऐकून छापतात.'' नंतर त्यांनी त्यांची नाटकं छापणाऱ्या प्रकाशकांना जोरदार शिवी हासडली.

मी त्यांना म्हटलं, ''तुम्ही त्यांच्यावर केस का करीत नाही?''

आगासाहेब हसले, ''काय वसूल करणार त्या तुटपुंज्यांकडून?''

त्यांचं खरं होतं. मी गप्प बसलो.

आगासाहेबांनी बाहेर येऊन याकूबकडून बिल बनवून घेतलं आणि खिशातून विलासी माणसासारख्या तीन-चार हजार रुपयांच्या एकदम नव्या कोऱ्या नोटा काढल्या. त्यावेळी पाच व दहा रुपयांच्या नव्या नोटा निघाल्या होत्या. पहिल्या नोटांपेक्षा त्या लहान होत्या. आगासाहेब म्हणाले, ते चेक कॅश करायला गेले तेव्हा बँकेची वेळ संपली होती. त्यांनी क्लार्कला सांगितलं, ''अजून आगा हश्रची वेळ संपली नाही. चेक लवकर कॅश करा.''

क्लार्कला जेव्हा कळलं की हे आगा हश्र आहेत, तो धावतच आपल्या मॅनेजरकडे गेला. मग मॅनेजर धावतच त्यांच्याकडे आलाआणि त्यांना आपल्या खोलीत घेऊन गेला. नव्या नोटा मागवून त्याने अतिशय आदराने आगासाहेबांना दिल्या आणि म्हणाला, ''मी आपली आणखी काही सेवा करू शकत नाही. या नवीन आलेल्या नोटा सगळ्यांच्या आधी मी तुम्हाला देतो आहे.''

बारीसाहेबांनी आगासाहेबांकडून एक नोट घेतली आणि बोटात पकडून म्हटलं, ''आगासाहेब पकड थोडीशी कमी झाली आहे, अगदी तशीच जशी सत्तेची.''

आगासाहेबांनी या उपरोधिक वाक्याला दाद दिली, ''खूप छान... पकड थोडीशी कमी झाली आहे. अगदी तशीच, जशी सत्तेची.. एखाद्या नाटकात मी याचा नक्कीच उपयोग करीन.''

बारीसाहेबांना खूप आनंद झाला. एवढ्यात तो नोकर आला. त्याच्या हातात चार कंधारी डाळिंबं होती. आगासाहेबांनी एक डाळिंब घेतलं आणि कपाळाला आठ्या घालून शिवी दिली, ''डाळिंब एकदम खराब आहे.''

नोकराने विचारले, ''परत नेऊन देऊ का?''

आगासाहेब म्हणाले, ''काही नको. तू खा.'' त्यानंतर पुन्हा एकदा शिवी दिली.

आगासाहेब जायला निघाले तेव्हा मी माझ्या स्वाक्षरी वहीत त्यांची सही घेतली.

थरथरत्या हाताने त्यांनी आपलं नाव लिहिलं. मग म्हणाले, ''किती दिवसांनंतर मी ही अक्षरं लिहिली.''


मी अमृतसरला परत आलो. काही दिवसांनंतर बातमी आली की थोड्याशा आजारानंतर आगा हश्र काश्मिरींचं लाहोरमध्ये निधन झालं. शवयात्रेला मोजून काही माणसं होती.

दिनू या फजलू कुंभाराच्या बैठकीत जेव्हा आगा हश्र काश्मिरींच्या मृत्यूबद्दल चर्चा झाली तेव्हा त्याने जिंकलेले पैसे काढून आपल्या जाळीदार टोपीत ठेवले आणि तत्त्ववेत्त्याच्या ढंगात म्हणाला, ''म्हातारपणचं प्रेम मोठं निर्दयी असतं.''

**अनुवाद : डॉ. वसुधा सहस्त्रबुद्धे**
भ्रमणध्वनी : ९८२०००९८५९
vasudhavs@yahoo.co.in

**ग्रंथाली**

## मुंबई... बंबई... बॉम्बे... – बाळासाहेब लवडे



...रंग, गंध, रुची अशा संवेदनाची प्रतिमाचित्रे, मुंबईचे अध:स्तर, उर्ध्वस्तर आणि खोल अथांगतेला स्पर्श करीत आहेत. मुंबईच्या चवचाल चाली, छंद, यतिभंग, अभंग अशा नादलयींमधून संमिश्र अस्तित्वाचे काव्यात्म अनुभव गडद झाले आहेत. शहर दळत राहते माणसांच्या धमन्या... विकले आभाळ कोणी... स्वप्ननगरीचे अश्वमेध घोडे उधळतात... हे मुंबईचे लोकसमूहमानस अक्राळविक्राळ विविधतेने नटलेले, गर्दीत चेहरा गमावलेले, सत्त्वशोधक आणि तत्त्वविसर्जकतेचे कृष्णमय संकीर्तन. महालक्ष्मी, हाजीअली, वेश्यावस्ती ते रेल्वेच्या सिग्नल स्थळांशी, भिकाऱ्यांशी, मस्तवाल हप्तेबाज दादांशी, किडनीविक्रेत्या दलालापासून ते पाईपात सरपटणाऱ्यांशी गुंजन करते गूढ-अगूढाचे. घुसमट, शोषण, श्रम, दु:ख, जल्लोष, वास-अधिवास भासमय चंगळ अशा बहुरूपी जीवनयात्रेचे दर्शन प्रशांत भावस्थितीला छिन्नमनस्क करुन सोडते. जगातल्या सगळ्या बोलींमधून होते ते भावआक्रंदन. खुद्द एक महानगरच मानवी बॉम्ब होऊन प्राणत्यागाचे, माणुसकीसंहाराचे पवित्रे घेत आहे तरीही करुणा, सहानुभूती, व्याकूळता यांनी बुद्धिभ्रंशाच्या प्रक्रियेला मानुषतेचा आधार देत तीव्र जीवनेच्छेचे नि:श्वास-भपकारे-सपकारे सोडते आहे. अंगावर येणारे महानगरी, मोहमयी, जीवनसंघर्ष नकळत नसानसात भिनत जातात या कवितांमुळे खोल...आत-आत...

– प्रा. डॉ. एकनाथ पगार

**मूल्य १६० रु.**
**सवलतीत ११० रु.**

# Well
# Wisher

From

## Sunil Vasant Bhosale

Someel Creations

Mobile : 9820833650


# काव्यरंग

## ज्याला सगळे आठवत होते
## (ली त्सेच्या कथेचं पुनर्कथन)

एकदा सुंग देशाच्या हवात्से नामक तरुणाची
स्मृती हरवली
तो आपल्या घरात बसायचे विसरला
रस्त्यावर चालायचे विसरला
वाचणे, विचार करणे, आप्तेष्टांच्या भेटीगाठी
दिवस-रात्र,
खाणे, पिणे, झोपणे, लेणे...
सगळे काही विसरला

अशा प्रकारे
हवात्से जसा होता तो
एके दिवशी होत्याचा नव्हता झाला.
तांत्रिक-मांत्रिक, हकीम-वैद्य
सर्वांनी हात टेकले
पण तो होता तसा झाला नाही.

शेवटी पंडित मेन्सियसच्या सल्ल्यावरून
त्याला कडकडीत उपवास घडवला गेला
तीन दिवस-रात्रींचा
तेव्हा कुठे त्याला अन्नाची आठवण झाली.
बर्फाच्या लादीवर झोपवलं
तेव्हा आठवले कपडेलत्ते, अंथरूण-पांघरूण
मग त्याला बसवले वर्तमानात
तेव्हा आठवला त्याला आपला भूतकाळ
जोरात किंकाळी फोडून तो पंडित मेन्सियसला म्हणाला :
''जेव्हा मी काहीच नव्हतो
तेव्हा भारहीन होतो
विस्मरण म्हणजे स्वातंत्र्य होते
माझ्यासाठी...
न बंधन होते, न प्रारब्ध
पण आता तुम्ही परत मिळवून दिलीयत मला
माझी सगळी दु:खे-गत आणि अनागत;
पण हे देवाधिदेवा,
परत घेऊन जा माझी स्मृती,
आणि देऊन टाक विस्मरण.''



मेन्सियस पुन्हा नाही देऊ शकले त्याला विस्मरण
म्हणूनच हवात्सेचे वंशज असलेले आपण
अजूनही शापितच आहोत
आठवत राहावे लागते आपल्याला
सगळे काही
काही न काही होण्यासाठी.

**मूळ हिंदी कविता : के. सच्चिदानंदन**

## दिवा म्हणे..

अंधार डोळे वटारतो आणि अमावास्या मिजास दाखवते
तेव्हा बसल्या जागी हाताची घडी घालून
उत्तर देता येत नसतं.
त्याच्या हटवादीपणाला अथवा लहरीपणाला
वेसण घालण्यासाठी
तुम्हीच सज्ज व्हा, तयार व्हा पूर्ण ताकदीनिशी
मी सिद्ध होऊन बसलोय, काडी ओढून तरी बघा
मला 'दिवा' म्हणतात सगळे
माझ्यावर हुकुमत चालवा म्हणजे समजेल...

मी दिवा आहे, मातीचं अंग माझं, तुम्हीच मला बनवलंय
आणि काळ्याकुट्ट रात्रीच्या छाताडावर बसवलंय
स्नेहानं भिजलेली वात तेवली
आणि रात्र उजळून निघाली
तुम्ही स्वत:च हे अनुभवलंय
मी नुसत्या वाफा दवडत नाही तोंडाच्या
फक्त वाफा दवडण्यानं येत नसतो उजाळा
या छोट्याशा गुरुकिल्लीला तुम्ही सतत घातला आळा


शब्द बिनदिक्कत सनातन आहे पण नव्याने आजमावून बघा
वेळोवेळी 'संघर्ष' लिहा आणि अंतर्मुख होऊन तो वाचा
इतर कुणाला विचाराल तर गोंधळून जाल पुरते
मातीच्या दिव्याला विचारलंत तर
उमज पडेल आणि ज्ञानाला येईल भरते
अंधाराशी लढणं वाटतं तितकं सोपं नाहीच नाही
त्याच्या शब्दकोशात 'आराम' शब्दच मुळी नाही.

**मूळ हिंदी कविता : बालकवी बैरागी**

**दोन्ही कवितांचा अनुवाद : प्रकाश भातम्ब्रेकर**

भ्रमणध्वनी : ९३२४४०९४९०

## पुस्तकं



पुस्तकं नसतात शोभेची वस्तू जी ठेऊन द्यावी
काचेपलिकडे मिरवण्यासाठी.
ती वाहू द्यावीत एका हातातून दुसऱ्या हातात
नदीच्या प्रवाहासारखी,
कौलावरून जसे उतरतात पावसाचे थेंब
तशी उतरू द्यावीत डोळ्यांत,
रेंगाळू द्यावीत मनाच्या अनवट वाटांवर.

मात्र कधीही हाताळू नयेत ती
धसमुसळ्या हातांनी
काढू नयेत सालटी त्यांच्या चेहऱ्यावर पसरलेल्या हास्याची
लक्तरं झालेली पुस्तकं,
दिसतात बलात्कार झालेल्या बाईसारखी उध्वस्त.

पुस्तकांना जपताना जीवापाड
शोषून घ्यावे श्वासात आरपार...
मनभर पसरत जाणारे शब्दांचे अर्थ,
दरवळत असतात पुस्तकांच्या पानांतून
त्यांना सामावून घ्यावे जगण्यात.

पुस्तकाच्या पानांवर विखुरलेली असतात
हजारो कोडी माणसाच्या मनातली
आणि त्यातील शब्दांत लपलेल्या असतात हजारो गोष्टी
न सांगितलेल्या,
त्या समजून घेतल्या तर पुस्तकं जगतात युगानुयुगे.
केवळ शब्दांचे बुडबुडे सहन नाही होत त्यांना...
अशा वेळी ती स्वतःच जातात काळाच्या पडद्याआड
मरून जातात पुस्तकं जर,
तुम्ही ओतलं नसेल
तुमचं मन
त्यात उमटलेल्या शब्दांत.

पुस्तकांना बांधू नये करकचून आशय-तंत्राच्या घाटात
आणि ढकलूही नये कोणत्यातरी उतरंडीवर.
जात, धर्म वंशभेदाचे लोण पसरलं पुस्तकांत
तर कदाचित होतील युद्ध पुस्तकांतही.
आणि
करूणेच्या अथांग आसमंतात लहरणारी पुस्तकं
तर थांबवत असतात युद्धांना,
सांगत असतात गोष्टी माणसामाणसातील ओलाव्याच्या.

पुस्तकांना जपावं
गर्भात वाढणाऱ्या लेकरासारखं
हळूवार फिरवावा हात त्यांच्या जावळावरून
आणि कुशीत घेऊन निवांत
लिहावी नव्या सूर्याची नवी भाषा
त्यांच्या भाळावर.

**– नीरजा**
भ्रमणध्वनी : ९९६९८१०८९६

## डांबराचा समुद्र



मासे जसे पाण्यात पोहतात
तशा आपल्या सर्वांच्या होड्या
गुण्यागोविंदानं या नदीत
तरलपणे चालत होत्या

एकाएकी
सगळ्यांच्या होड्या रुतून पडल्या
होड्यांच्या फळ्या फुटायला लागल्या
हातातली वल्ही तुटायला लागली
सुकाणू मोडली, पालं फाटली

या नदीतून बराच काळ
चाचे काळाबाजार करत असावेत
पण काळाबाजार पुढे
इतका फोफावला
की कधीतरी या काळाबाजारात
आपल्या होड्यांसकट आपण सगळेच
सामील झालेले असू

नदी जेव्हा पहिल्यांदा काळपट झालेली दिसली होती
तेव्हा आपण फक्त
चाच्यांवर थुंकून गप्प बसलो
तेव्हाच
नदीचं निर्मळ पाणी आपणा सर्वांना
सोडून गेलेलं होतं


आता बघा नीट!
आपण ज्यात रुतून पडलो आहोत
तो आहे एक भला मोठा मृत समुद्र

आपल्या सर्वांच्या होड्यांतून
भळाभळा वाहून तयार झालेल्या

डांबराचा...

**– चंद्रशेखर सानेकर**
भ्रमणध्वनी : ९८२०१६६२४३

## दहशतीविरुद्ध युद्ध



दहशतखोरांनी पुकारले आहे
दहशतीविरुद्ध युद्ध
त्यांना नको आहे
फक्त बुद्ध

त्याचे शील
त्याची करुणा
त्याची प्रज्ञा
विद्या त्याची

त्यांच्या अविद्येने
चालवायचे आहे त्यांना सारे जग
त्यांच्या दहशतीची धग
जाणवत ठेवायची आहे

वाढवायची आहे भागीदारी
दहशतीविरुद्धच्या अण्वस्त्र उद्योगात
त्यासाठीच्या संशोधनात भरपूर
पैसा गुंतवायचाय लोकांचा

त्यातून वाढवायचे जाळे
नको असलेल्या दहशतखोरांच्या नायनाटासाठी
आपले लाभ सोडा म्हणताहेत
ते जगभरच्या लोकांना, त्यासाठी...

प्रश्न पिण्याच्या पाण्याचा नाही
कुपोषणाचा नाही, नाही रोगराई नष्ट करण्याचा
प्रश्न नाही कर्जबाजाऱ्यांच्या
आत्महत्यांचाही...

सध्या त्याहून महत्त्वाचा आहे प्रश्न
आपापल्या सीमांच्या रक्षणाचा.

त्यांनी दिला आहे
नवा नारा
जगातला एक व्हावा
दहशतखोर सारा


नको असलेल्या दहशतीपासून
मुक्तीसाठी

पर्याय फक्त एकच आहे
आपल्या गाठी

हवी असलेली दहशत की
नको असलेली दहशत
पुढच्या वेळचा
इलेक्ट्रॉनिक शिक्का
मारावा लागणार आहे
फक्त तेवढ्याचसाठी!

**– श्रीपाद भालचंद्र जोशी**
भ्रमणध्वनी : ९९६०४९३६२२

## तुलाच फक्त सुचायची तशी कविता
**(नलेश पाटीलच्या स्मरणार्थ)**



फक्त तुलाच
तुलाच फक्त सुचायची तशी कविता
फक्त तुलाच दिसायचं
बिनवास्तवाचं लावण्य
फक्त तुलाच ऐकू यायची
ऑर्गनला फुटणाऱ्या फांद्यांची सळसळ
हो... मी अपार विश्वास ठेवते
तुझ्या डोळ्यांवर
नेपथ्याचा लवलेश नसायचा
नसायची सजावट कसलीच बरपांगी
भलत्याच झाडावर फुलणाऱ्या भलत्याच फुलांना
तुझ्या लेखी शून्य किंमत असायची
वस्तुनिष्ठतेच्या चपला
रूततात फार
आणि आता तर तू निघूनच गेलास
भर दुपारच्या प्रखर उन्हाला
तसंच सोडून
होरपळत...

**– डॉ. प्रज्ञा दया पवार**
भ्रमणध्वनी : ९८६९४८०१४१

## तिपेडी



१)
सुन्न उन्हाळी टळटळीत दुपार
सारे चिडीचूप आपापल्या घरात

मीही उतरलोय आता माझ्याआत!

२)
घरातली ही सुन्न करणारी पोकळी
मी भरून काढतोय विविध आवाजानं

स्वतःलाच फसवतोय माहित असून!

३)
त्यांनी नाकारलं जेव्हा माझं अस्तित्व
ते स्वीकारणं भल्तंच अवघड गेलं

उरलं -सुरलं असणं पणाला लागलं!

४)
फारच करतं अस्वस्थ केविलवाणं
जीवलगांच्या नजरेतून उतरणं

त्यापेक्षा अधिक स्वतःच्या नजरेतून!

५)
सांगण्यापुरती उरलेली नाती
कशासाठी मग सांगायची तरी

त्यापेक्षा आहे ही एकाकी वाट खरी!

६)
कधीतरी संपवावी लागेल औपचारिकता
आणि संबंधांना सरळ सोपं करावं लागेल

अन्यथा एकमेकांचा निरोप घ्यावा लागेल!


७)
प्रतिष्ठेच्या खोट्या कल्पना झुगारल्या
तेव्हा त्यांच्यातून बहिष्कृत होत गेलो

माझ्या एकाकी जगण्याच्या
वाटेचा झालो!

**– प्रमोद मनोहर कोपर्डे**
भ्रमणध्वनी : ९८९०१६६१२२

## देव हातात हात घालून

आधी डुक्कर मरतं
मग माणसं अथवा
आधी गाय मरते मग माणसं.
आधी भगवा जळतो मग माणसं अथवा
आधी हिरवा जळतो मग माणसं.
केव्हा हा देव हसतो केव्हा तो देव टाळ्या वाजवतो. दंगलीची मॅच संपताच दोन्ही देव खिलाडू वृत्तीने चेंडूसारखी माणसं लाथाडून हातात हात घालून निघून जातात आपापल्या पोथ्या पुराणात...
माणसं...
अशा देवांना कवटाळत
कडेकोट घरात अशी लपून बसतात, की
एका अफवेच्या काडीने
घरांतल्या जिवंत माणसांसह आख्खं गाव
जसं होतं की नव्हतंच... बेचिराख




**– डॉ. सुधीर रा. देवरे**
भ्रमणध्वनी : ७५८८६१८८५७

## गझल

हे असे जळणे मला मंजूर आता..
मी मिठीतच घेतला कापूर आता!

आपल्या भेटीत सुटल्या सर्व गाठी..
वाजले स्पर्शातुनी संतूर आता!




त्या जुन्या माझ्या व्यथांचे गीत झाले.
वेदनेला गवसलेला सूर आता!

जीवनाची मी नवी सुरुवात केली..
मी, तरंगत चाललेला धूर आता!

उजळल्या वाटेवरी या दीपमाला..
ना प्रतिक्षा..संपली हुरहूर आता!!

**– सदानंद डबीर**
भ्रमणध्वनी : ९७६९५८४६७६

## पूल



आपण बांधलेल्या पुलाजवळच्या
गुलमोहराची फांदी नेमकी काल तुटून पडली
एका बाजूने खचत चाललेल्या पुलाला
कोसळण्यासाठी हे एवढे कारणही पुरेसे होते
पूल कोसळला तेव्हा,
आपण दोघे दोन विरुद्ध बाजूला होतो
हा केवळ योगायोग नव्हता
नसावा...

हळुहळु पूल कोसळला पूर्ण
खूप पडझड झाली
माझ्या आतही कोसळत राहिले काहीतरी
डोळे भरून आले तिन्हीसांजी
पुलाच्या कोसळण्याचा एखादा कण
घुसला असावा डोळ्यांत
कदाचित

आता नव्याने करावी तजवीज
पूल बांधण्याची
असे
पलिकडच्या टोकावरून
तू मला खुणेनेच सांगितलेस
तेव्हा तू मला पाठमोरी होते आहेस असे
जाणवत राहिले होते

पूल बांधता येईल
टिकाऊपणाची हमीही घेता येईल
अवेळी तुटून पडणाऱ्या
गुलमोहरांच्या फांद्यांची समजूत काढणे
मात्र आता कदाचित शक्य होणार नाही
हे तुला माहित नाही असे नाही
पूल कोसळला तेव्हाही
आपण दोघे दोन विरुद्ध बाजूला होतो
हा केवळ योगायोग नव्हता
नसावा...

**– सतीश सोळांकुरकर**
भ्रमणध्वनी : ९३२४३६३९३४

## चित्र

कागदावर माझा मुलगा चित्र काढतो
अन् मला विचारतो,
'ओळखा, मी काय काढलंय?'
मी उत्तरतो, 'मोर'
तो म्हणतो, 'छट्!,
हा स्मशानाच्या भिंतीवर बसलेला कावळा आहे.'

तो पुन्हा चित्र काढतो
पुन्हा मला विचारतो :
'ओळखा, आता मी काय काढलंय?'
मी म्हणतो, 'मोर'
तो म्हणतो, 'चूक!,
हे तर तारेला लटकलेलं घुबड आहे.'

असं बरेच वेळा घडतं.
मला ठाऊक आहे की,
मला हवा असलेला मोर
तो कधीच काढणार नाही!

पण तरीही माझी खात्री आहे
की त्यानं काढलेल्या प्रत्येक चित्रात
मला मोरच दिसणार आहे.



**– प्रशांत असनारे**
भ्रमणध्वनी : ९७६३७१४०४

## माती


राबताना शेतामधी
बाप होतो मातीबाणी
अंगातून पडे घाम
जसे ढगातून पाणी

जीव लावतो मातीला
जशी वासराला गाय
मन उडे आभाळात
तरी मातीमधी पाय

कसे ओठात असते
सदा मातीचेच गाणे
देतो मातीला आयुष्य
मग पिकामधी दाणे

अंगोअंगी जिथे तिथे
साऱ्या मातीच्या जखमा
सारं काही तिच्यासाठी
तीच विठ्ठल रखमा.

**– विलास पगार**
भ्रमणध्वनी : ९८८११३१०८४



## तोरण

दारावर तोरणं लावली जातात
सहसा उतरवली जात नाहीत
कालांतराने पाकळ्या-पाकळ्या होऊन
गळून पडतात त्यातील फुले,
तुझ्या-माझ्या संवादादरम्यानच्या शब्दांसारखी!
फितूर होत जातो ऋतुसुद्धा
त्याचा प्रत्येक मूड सांभाळला तरीही!
मग आवळलेल्या फुलांकडून
कशी काय अपेक्षा करायची?
घुमत राहतो ओंकार ध्वनी
वाऱ्याच्या झोताने तोरणाभोवती,
मंतरलेल्या दिवसांची आठवण देत, कधीकधी!
'तो' परत तर जाणार नाही ना?
या भीतीने मी मग
प्लॅस्टिकचे तोरण दारावर लावले.
प्रहर उलटत गेले.
तोरणातील पानांचा रंग मातकट झाला
तर फुलांचा रंगहीन
पण त्याचे आकार बदलले नाहीत
कारण काही वस्तू अक्षय असतात,
नाती नसली तरीही!
आणि तरीही काही शुभ घडावे...
म्हणून लटकत राहते तोरण, दाराबाहेर
आणि मी घरात!

**– प्रतिभा सराफ**
भ्रमणध्वनी : ९८३३०५६७९५ / ९८९२५३२७९५



### नोटिफिकेशन



मरून पडला आहात अपघाती
तरी देखील
फेसबुक, वॉट्स अप,
ट्विटर, इंस्टा अकाउंट्स
अजूनही सुरूच आहेत
मोठ्ठाल्या पाईप लाईनमधील
पाण्याच्या गळतीसारखी.


मिळताहेत लाईक्स,
केले जाताहेत कमेंट्स वॉलवर
मरणापूर्वी केलेल्या पोस्टला,
पडतोय फोनमध्ये
खच मेसेजचा
पानांचा पडावा झाडाच्या मुळांशी तसा.

अजूनही आहात जिवंत
या आभासी जगासाठी,
पोहोचली नाही अद्यापी
पृथ्वीच्या वेबसाईटवरून
अकाऊंट डिॲक्टिवेट झाल्याची बातमी.

ती येतच असेल,
येईल;
तेव्हा आभासी फ्रेंडलिस्ट
नुस्ती रिप-रिपेल,
बट यू आर ऑलरेडी इन पीस...
फक्त देऊ शकणार नाही
कोणालाच रिप्लाय
ती अधीरता
मरणा सोबतच संपलीय,
उत्साहाचं दूध तरी कसं जाणार उतू
देहातली मंद आंच
तर केव्हाच विझलीय.

नसाल,
तरी व्यापून असाल
फ्रेंडलिस्टमधील एक जागा
मृत्यूला आयुष्याशी जोडणारा
केव्हाच तुटला जरी धागा.
वॉल जणू निव्वळ आता
ग्रेवयार्डमधील दगड
मृत्यूही पडतोच पचनी
नसतो इतका जड
तरीसुद्धा दरवर्षी
ऑटोजनरेटेड आठवण
प्रत्येकालाच येईल
बर्थ डे नोटिफिकेशन


**– गीतेश गजानन शिंदे**
भ्रमणध्वनी : ९८२०२७२६४६



### आभाळगाणे

सुखदु:खाला छेदून भेदून
असते एक मुक्त जगणे
अशा बंधमुक्तांच्या ओठी
असते एक शब्दातीत गाणे
त्यालाच म्हणतात आभाळगाणे!
चंद्राचा चंद्राकार लोपणे
फक्त शीतलता उरणे
कोकिळेचा फक्त पंचम घुमणे
निराकार चाफ्याचा गंध दरवळणे
सर्व संवेदनांचा अर्क उरणे
मगच रंगात येते आभाळगाणे!
कृष्णाच्या वेणूतून जे स्त्रवते
राधेच्या तनामनात जे पाझरते
यमुनेच्या डोहात जे विहरते
गोकुळात जे झरत राहते
त्यालाच म्हणतात आभाळगाणे!
आभाळगाणे नव्हे हृदयाचे गाणे
नव्हेच नव्हे होळीच्या फाका देणे
आभाळगाणे मधुर अमृतमय देणे
ज्ञानोबातुकोबाचे अलौकिक बोलणे
धरतीचे आभाळलेणे आभाळगाणे!
आभाळगाणे! आभाळगाणे! आभाळगाणे!

**– सरोज जोशी**
भ्रमणध्वनी : ९८३३०५४१५७



# जना-मनातले अरुण साधू

- तन्वी बॅनर्जी
- जगदीश मोरे
- अनुराधा गांगल
- दिनकर गांगल
- प्रताप थोरात
- प्रवीण बर्दापूरकर
- कुमार केतकर
- अर्जुन डांगळे
- संजीवनी खेर
- मीना गोखले
- डॉ. जब्बार पटेल
- डॉ. रविन थत्ते

कुटुंब, मित्र, रसिक, कार्यकर्ते, व्यासंगी...
असे अरुण साधूंचे विविध परिवार आहेत.
नवीन काही करणाऱ्याला ते आपुलकीने मार्गदर्शक झाले.
मितभाषी साधूंशी वेगवेगळ्या कारणाने समाज जोडला गेला.
त्यांच्यातील हार्दिकतेने तो जपला.
त्यांच्याशी झालेल्या भेटीतून-संवादातून-अनुबंधातून
प्रकटलेले अरुण साधू जाणून घेऊया...

# Daddy Abba - My best friend!

▶ Tanvi Banerjee


Hi Daddy Abba,
For the longest time,
I believed that you were my best friend.
You were rather cuddly, took me to libraries,
liked the books that I read and let me play
with your bald head.
It was fun, until I realised that you were much older than
I was and that you couldn't come to school
with me or be an 8 year old girl.
I was quite disheartened by the fact that you couldn't
play dress up with me.
Do you know why I loved being your best friend though?
You were so very gentle. And funny. You see, kids like
weird people, and you were positively eccentric.
"Boom-boom", "tum-tum"? Your knack for whacky
phonetics made me laugh as a young girl.
Should I reveal this to the media,
if and ever they find me for an interview on you?
I can only imagine the headlines,
"Renowned journalist-Author,
Arun Sadhu calls loved ones boom-boom,
writes about revolution and Shiv Sena".
I do a rather silly job of writing a headline, don't I?
Speaking of headlines, which Vedu refuses to read
no matter how much you pester him,
I don't think I have your journalistic abilities.
Apparently, you need to be an extremely persistent
character to be a journalist.
I don't really remember you as a persistent journalist.
However, if I were to think of your tactics to wake me up,
I would say you were a rather tenacious man.
You would often begin the process of waking me up with,
"Tanvi, your school's peon is cleaning the bell."
and continue ignoring my groans until you would say,
"Tanvi, see the peon is ringing the bell." I would often reply with,
"Daddy Abba! THERE IS AN ELECTRIC BELL IN MY SCHOOL."
In retrospect, you were right. In Standard 11 of school,
I came to know that a peon did indeed ring
my school's electric bell.
That's when I realised that you were
not only persistent but also very wise.
I was actually in awe of your wisdom. Especially,
when you handed me an Almanac from 2006 in 2007,
and taught me how to flip through it.
I had google by then and it all seemed so quaint and medieval.
But then again, you hated us spending a lot of time on
our computers and mobile phones.
Also, you always gave off a rather erudite air,
which intimidated me into being as sneaky
around the computer as I could.
This summer, you and I both shared sleepless nights.
I studied for my college course and you read your books.
And nagged me to go to bed. Truth be told,
sometimes I didn't actually study through the entire night.
I watched my beloved Korean dramas instead.
Of all the joys that you've had in your life, I wonder if you've
ever had the pleasure of watching beautiful South Korean
men and women peace around as doctors and prosecutors.
Too bad I never learned Korean... but... the subtitles are fine!
I just wish we could've watched some episodes together!
We watched a lot of funny movies together didn't we?
From Laurel and Hardy to Guru Dutt's Mr. and Mrs. 55,



our movie sessions were quite diverse.
As a pretentious adolescent,
you continued to be my best friend because
you dissed on Aaji's soap operas just as I did.
You were also v.cool.
Remember that DUBSMASH video we took?
Of you and I lip-syncing to "Washing powder Nirma,
Washing powder Nirma"! You looked adorable as you
bobbed your head along with my own animated one.
Its funny how we could be so similar,
even though my propensity towards extraversion is surely
more than yours could ever be.
You were calm, cool and collected. Sometimes,
I wondered if you practiced Shavasan while being awake.
How on earth could you be so zen? I envied your level-
headedness, I'm a mess most of the times! Also,
you taught me to make tea.
BEST THING I EVER LEARNED.
You also gave me the gift of words though,
and I loved receiving your encouraging emails and
phone calls for my poetry
(Which, I now consider quite mediocre).
I'm too far away from you right now to use
anything but words to reach out to you.
You were a huge piece of my life and
I have tried to make you proud.
You and I are too rational to believe
in the afterlife or the supernatural,
however, if there is a slight possibility that you are
upto something somewhere,
take note of my slight anger at you.
I was going to come and
visit you in December remember?
And I never got a prestigious job,
or a boyfriend or a college degree
before you decided to embark
on a rather adventurous journey.
I don't think I've even written you
a poem or a letter in ages.
I never even got to read your books in Marathi and
I'm very very sorry about that.
I know you like to reach everywhere early,
but surely this time you could've waited for a tad bit longer?
Anyways, don't worry too much about the floating world.
As Shakespeare once said, " All the world's a stage,
And all the men and women merely players;
They have their exits and their entrances".
You just delivered a very long and beautiful scene.
Take a bow daddy abba, my bestfriend.
Love, Always, Tanvi

– तन्वी बॅनर्जी
tanvi.banerjee@gmail.com

(अरुण साधू यांच्या नातीने त्यांना लिहिलेले पत्र)




# पत्रकारितेचं विद्यापीठ

▶ जगदीश मोरे

''सर्व विद्यार्थ्यांनी पुण्यात सायंकाळी ठिकठिकाणी होणाऱ्या सार्वजनिक कार्यक्रमांना जायचं. दुसऱ्या दिवशी बातमी लिहून आणायची आणि मला दाखवायची,'' साधूसरांनी पहिल्याच दिवशी बजावलं.

मी उत्साहाने सायंकाळी बालगंधर्वला गेलो. सरांकडे दुसऱ्या दिवशी सकाळी बातमी लिहून दिली. इतर विद्यार्थ्यांनी दिल्या. सरांनी सर्व बातम्या तपासल्या. प्रत्येकाच्या बातमीवर वेगवेगळे शेरे होते. माझ्या बातमीवर शेरा होता, 'थातूरमातूर'.

फार अस्वस्थ झालो. दुपारनंतर शिंदेअण्णा वर्गात आले, ''जगदीश मोरे कोण आहे?... सरांनी बोलावलंय.''

मी सरांच्या केबिनचा अर्ध्या फळ्यांचा दरवाजा भित-भित उघडला, ''सर, बोलावलंत?''

''या... बसा.'' सर शक्यतोवर सुरुवातीला एकेरी बोलत नसत.

''कुठून आलात? गाव कोणतं? आई-वडील काय करतात? पुण्यात कुठे राहता...?'' सगळी चौकशी केली. मी तपशील सांगितला.

''ठीक आहे; पण आजच 'शुद्धलेखन प्रदीप' घ्या. वारंवार वाचा. व्यवस्थित समजून घ्या. चांगल्या साहित्यिकांची सोप्या भाषेतील पुस्तकं वाचा. जमल्यास कविताही वाचा. बातमी लिहिण्याचा सातत्यानं सराव करा. बातमीलेखन हा पत्रकारितेचा पाया आहे. पहिली पायरी आहे. ही पायरी मजबूत झाली पाहिजे.'' सर सांगत होते.

मी तोपर्यंत ठरावीक विचारांचीच मोजकी पुस्तके वाचली होती. विचारांचा प्रसार आणि मारा एवढाच या पुस्तकांचा हेतू होता. भाषेची समृद्धी वाढवण्यासाठी वाचनाकडे डोळसपणाने बघण्याचा मला दृष्टिकोन नव्हता. सरांशी झालेल्या पहिल्याच वैयक्तिक भेटीत या उणिवेची जाणीव झाली. भविष्यात नाशिक 'सकाळ'मध्ये काम करताना संपादक उत्तम कांबळे यांच्यामुळे बातम्या लिहिण्याचा 'उत्तम' सराव झाला. त्यांनी बातमीचे विविधांगी धडेही दिले. दोघांमुळे 'न्यूज सेन्स' विकसित होऊ शकला.

विद्यार्थ्यांनी नेमकेपणाने कसे वाचले पाहिजे, याचे धडेही साधूसर देत असत. तिथेच वाचन लेखनाच्या कक्षा विस्तारायला सुरुवात झाली. मला तेच आज शासकीय नोकरीत आणि जनसंपर्काच्या व्यवहारात उपकारक ठरत आहे. पत्रकारिता शिकताना 'वार्तांकना'च्या विषयात प्रसिद्धिपत्रके हा घटक होताच. बातमीदार व उपसंपादक म्हणून प्रसिद्धिपत्रकांच्या बातम्या तयार करण्याचा अनुभव होता. जनसंपर्क अधिकारी या नात्याने शासकीय प्रसिद्धिपत्रके तयार करण्याची जबाबदारी आली. 'न्यूज सेन्स' विचारात घेऊन प्रसिद्धिपत्रके तयार केल्यास कर्तव्याचा कार्यभार साध्य करणे शक्य होते, हा आत्मविश्वास म्हणजे साधूसरांच्या संस्कारांची फलश्रुती आहे.

श्री. अरुण साधू यांची ओळख ज्येष्ठ पत्रकार आणि प्रख्यात साहित्यिक म्हणून होती. शिक्षक हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा आणखी एक पैलू होता. ते लौकिक अर्थाने शिक्षक नव्हतेच; पण तरीही पत्रकारांचे लोकप्रिय शिक्षक ठरले. अनेकजण विविध माध्यमांतून सरांचे साहित्य आणि पत्रकारितेविषयी स्मृती जागवत आहेत. काहीजण आपले शिक्षक अर्थात पत्रकारितेच्या प्रारंभीचे गुरू म्हणूनही सरांविषयीच्या आठवणींना उजाळा देत आहेत कारण साधूसर पुणे विद्यापीठाच्या (आताचे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ) संज्ञापन आणि वृत्तपत्रविद्या विभागाचे सन १९९५ ते २००१ पर्यंत विभागप्रमुख होते. हा विभाग 'रानडे इन्स्टिट्यूट' नावाने परिचित आहे. या रानडे इन्स्टिट्यूटला पत्रकारितेची शाळा म्हणून प्रचंड उंचीवर नेऊन ठेवण्याचे कार्य साधूसरांनी केले आहे.

साधूसर विभागप्रमुख झाल्यानंतर लगेचच रानडे इन्स्टिट्यूटमध्ये संगणककक्ष सुरू झाला. त्याच दरम्यान मी १९९६ मध्ये बीसीजेला प्रवेश घेतला होता. सर एकदा म्हणाले होते, ''संगणकाचा वाढता वापर लक्षात घेऊन तुम्ही टायपिंगचा सराव केला पाहिजे.''

मराठी वृत्तपत्रांत तोपर्यंत बहुतांश बातमीदार बातमीची हस्तलिखित प्रतच देत असत. उपसंपादकही हस्तलिखितांवरच संस्कार करत. टायपिंगबाबत दुसऱ्या एका प्राध्यापकांनी कोटी केली होती, ''तुम्हाला पत्रकार व्हायचंय की कॉम्प्युटर ऑपरेटर!''

इंग्रजी माध्यमातील काही विद्यार्थ्यांचा टायपिंगचा सराव होता. मराठी माध्यमातील जवळपास कुणालाच टायपिंगचा गंध नव्हता. मला पुढे दै.'सकाळ'मध्ये पत्रकारितेची संधी मिळाल्यावर काही कालावधीनंतर स्वत:ची बातमी स्वत: टाईप करण्याचे आणि बातम्यांचे संपादनही संगणकावरच करण्याचे फर्मान आले. नोकरीचा प्रश्न होता. काही दिवसांत टायपिंग शिकलो. साधूसरांची आठवण झाली. विद्यार्थिदशेत असताना वीस वर्षांपूर्वी संगणक, इंटरनेट, टायपिंग इत्यादींचा अंदाजही नव्हता. गावाकडून थेट पुण्यात गेल्यावर रानडे इन्स्टिट्यूटमध्ये संगणक, इंटरनेट सहज उपलब्ध झाले. आमच्या ग्रंथालयात दोन टाईपरायटर यंत्रेही होती; पण टायपिंगबाबत गांभीर्य नव्हते. आज जवळपास प्रत्येक पत्रकाराला स्वत:चे बातमीलेखन किंवा संपादन संगणकावरच करावे लागते. साधूसरांनी ते आधीच हेरले होते. त्याची जाणीवही आम्हाला करून दिली होती.

पत्रकारितेत वीस वर्षांपूर्वी इलेक्ट्रॉनिक माध्यमांचा बोलबाला नव्हता. तुरळक अस्तित्व होते. मुद्रित माध्यमांचे वर्चस्व होते. पत्रकारितेचे शिक्षणही मुद्रित माध्यमांवरच केंद्रित होते. त्यामुळे विद्यार्थ्यांना वृत्तपत्रनिर्मितीचा सर्वंकष अनुभव मिळावा यासाठी रानडे इन्स्टिट्यूटमध्ये प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली अधूनमधून 'वृत्तविद्या' नावाने चार पानांचे प्रायोगिक वृत्तपत्र प्रसिद्ध केले जात असे. साधूसर तेथे आल्यानंतर वृत्तविद्या अधूनमधूनऐवजी आठवडाभर सलग प्रसिद्ध करण्याचा प्रयोग सुरू झाला. त्या आठवड्यात लेक्चर नसत. प्रत्येक विद्यार्थ्याला दररोज नवीन जबाबदारी दिली जात असे. उदाहरणार्थ, वृत्तांकन, संपादन, अग्रलेख, स्फुट लेखन, छपाई, वितरण इत्यादी. दैनिकांच्या कार्यालयाप्रमाणे सकाळी संपादकीय विभागाची बैठक, चार पानांची संभाव्य डमी, बातम्यांचे विषय, अग्रलेखाचा विषय, लेख आदी ठरवले जात असे. पूर्वी 'वृत्तविद्या'ची मांडणी बाहेर केली जात होती. संगणककक्ष सुरू झाल्यावर विभागातच विद्यार्थी स्वत: मांडणी करू लागले. एकूण अंकाच्या निर्मितीवर साधूसरांचे लक्ष असायचे. त्यांच्यासह प्रा. प्रसन्नकुमार अकलूजकर, प्रा. किरण ठाकूर आणि उज्ज्वला बर्वे हेदेखील मार्गदर्शन करायचे.

पुण्याबाहेरील आम्ही बहुतांश विद्यार्थी विद्यापीठाच्या वसतिगृहात राहत असू. मी, संजय आवटे, दत्तात्रय गवंडी आणि अभ्युदय रेळेकर, आम्ही एके दिवशी पहाटे पहाटे 'वृत्तविद्या'चा अंक घेऊन विद्यापीठ कॅम्पसमधील सरांच्या घरी गेलो. साक्षात तिथे 'यू.आर. अनंतमूर्ती' होते. सरांनी कौतुकाने आमचा अंक त्यांना दिला. आमची सर्वांची ओळख करून दिली आणि किचनमध्ये गेले. चहा करू लागले. ''सर, तुम्ही बसा आम्ही करतो चहा.'' सरांना विनंती केली.

सरांनी आम्हाला चहा नाही करू दिला. स्वत: केला. आम्हा सर्वांना दिला. विद्यार्थिदशेतला हा अनुभव तृप्त करणारा होता. सरांकडे खूप मोठ्या माणसांचा वावर असायचा. सर विद्यार्थ्यांचा त्यांच्याशी नेहमीच संवाद घडवून आणत असत.

साधूसर अनुभवलेल्या माझ्यासारख्यांना 'साधूसर' हे शब्दच मुळात आजही जादूई वाटतात. साधूसर क्रमिक अभ्यासक्रमापलीकडचे (टेक्स्ट बुक) धडे देत. त्यांचा क्लास म्हणजे पत्रकारितेची खरी शाळा भरत असे. त्यात पत्रकारितेची प्रत्यक्ष अनुभूती मिळे. क्लासमधील सरांचे मुक्तचिंतन आम्हाला समृद्ध करणारे असे. ते अत्यंत संयमी, मुक्तचिंतक आणि तत्त्वचिंतक शिक्षक होते. ते स्वत:च पत्रकारितेचे विद्यापीठ होते. साहित्य आणि पत्रकारिता जगलेले साधूसर बातमी लेखन शिकवायचे. अलीकडे ठिकठिकाणी पत्रकारिता महाविद्यालये, विभाग आणि संस्था सुरू झाल्या आहेत. अनेक ठिकाणी पत्रकारितेशी संबंध नसलेले लोक पत्रकारिता शिकवतात. कधीच बातमी न लिहिलेले लोक बातमीलेखन शिकवतात. त्यामुळे प्रत्यक्ष साधूसरांनी बातमीलेखन शिकवणे, ही केवढी अभिमानाची गोष्ट!

प्रसिद्ध वैज्ञानिक डॉ. वसंतराव गोवारीकर पुणे विद्यापीठाचे कुलगुरू असताना साधूसर संज्ञापन आणि वृत्तपत्रविद्या विभागाचे प्रमुख झाले होते. त्याच दरम्यान पुणे विद्यापीठाच्या ललित कला केंद्राचे प्रमुख म्हणून प्रसिद्ध नाटककार सतीश आळेकर यांची नियुक्ती झाली होती. संबंधित क्षेत्रातील माणसे शिक्षक म्हणून लाभल्यास शिक्षणाचा दर्जा उंचावतो. साधूसर तर त्याचे प्रत्यक्ष अद्‌भुत उदाहरण होते.

श्री. पराग करंदीकर (संपादक, महाराष्ट्र टाइम्स, पुणे), श्री. विक्रांत पाटील (संपादक, जनशक्ती), श्री. दयानंद माने (संपादक, सकाळ, औरंगाबाद), श्री. अनिल घोडवे अशी काही मंडळी आम्हाला सिनियर होती. ज्येष्ठ पत्रकार जयदेव डोळेदेखील त्याचवेळी एमसीजे करत होते. साधूसरांच्या सुरुवातीच्या शिकवण्याबाबत आमचे काही सिनियर सांगायचे, सर नवीन आले तेव्हा सरांचे लेक्चर कंटाळवाणे वाटायचे. नंतर मात्र सरांना टॅक्ट कळली आणि आम्हालाही त्यांची लेक्चर इंटरेस्टिंग वाटू लागली.

साधूसरांच्या शिकवण्यात शब्दांचा उपचार नसायचा. शिकवणे वास्तववादी, व्यावहारिक आणि दिशादर्शक होते. सर बी.सी.जे.ला आम्हाला 'चालू घडामोडी' आणि एम.सी.जे.ला 'ॲडव्हान्स जर्नालिझम' शिकवत. सरांमुळे आमच्या वर्गात विविध

क्षेत्रांतील नामवंत लेक्चरसाठी येत असत. श्री. शरद पवार, श्री. कुमार केतकर, श्री. दया पवार, श्री. एम. जे. अकबर, श्री. विनोद दुआ, श्री. रामदास आठवले, प्रा. सुहास परांजपे, प्रा. राम बापट, श्री. विनय हर्डीकर अशी अनेक नावे सांगता येतील. त्यांना पहिल्यांदा ऐकण्याची संधी रानडे इन्स्टिट्यूटमध्ये मिळाली. केतकरसाहेब, बापटसर बऱ्याचदा शिकवायला यायचे.

साधूसरांविषयी आम्हा विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड कुतूहल असायचे. त्यांच्याशी खूप गप्पा व्हायच्या. सरांची पत्रकारिता, पुस्तके आणि सिनेमे हे गप्पांचे विषय असायचे. एकदा तर सरांच्या साहित्यावर सरांच्या उपस्थितीतच गप्पाही झाल्या होत्या. विद्यापीठतल्या वसतिगृहातही गप्पा होत असत. त्यात इतर विभागांचे विद्यार्थीही सहभागी व्हायचे. मित्र राजाराम कानतोडे गप्पांत आघाडीवर असायचा. गप्पांच्या ओघाने सरांच्या साहित्याचे वाचनही व्हायचे. या वाचनामुळे सरांविषयीचे कुतूहल आणखी वाढत गेले. या कादंबरीतील हे पात्र कोणावर असेल? ते कोणावर असेल? याची उत्सुकता वाटायची.

डॉ. जब्बार पटेल दिग्दर्शित डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवरच्या सिनेमाचे १९९७-९८ मध्ये चित्रीकरण सुरू होते. काही भागांचे चित्रीकरण विद्यापीठाच्या मुख्य इमारतीत झाले. साधूसरांनी हा सिनेमा लिहिलेला असल्याचे ऐकून चित्रीकरण बघताना स्वत:च्याच अंगावर मूठभर मांस चढल्यासारखे वाटायचे.

सरांचे लिखाण नियमितपणे सुरू असायचे. सर सांगायचे आणि लेखनिकाने ते लिहून काढायचे, असा सरांचा शिरस्ता असायचा. शुद्धलेखन चांगले असलेल्या विद्यार्थ्याला सर लेखनिकाचे काम देत असत. आमच्या बॅचचा अभय जोशी रात्री दै. 'लोकसत्ता'मध्ये मुद्रितशोधन करायचा. त्यामुळे त्याचे शुद्धलेखन चांगले होते. त्याने बरेच दिवस सरांकडे लेखनिक म्हणून काम केले होते. इतरही अनेक विद्यार्थ्यांना सरांकडे लेखनिक म्हणून काम करण्याचे भाग्य लाभले होते. सर कुठल्याही विद्यार्थ्याला कधीच गृहीत धरत नसत. ते विद्यार्थ्यांना लेखनिक म्हणून मोबदलाही देत असत.

रानडे इन्स्टिट्यूटमधील, शेवटच्या दिवसांत सरांसंदर्भात काही लोकांनी अनाठायी वाद निर्माण करून सरांवर जातीयवादाचे आरोप केले होते, ते अत्यंत दुर्दैवी होते. सरांविषयी आमच्यापैकी असे कुणालाही वाटत नव्हते. उलट ग्रामीण भागातून आलेल्या आणि बहुजन समाजातील विद्यार्थ्यांविषयी सरांना अधिक आस्था वाटायची. माझ्या मते सरांच्या संपर्कात आलेल्या कुणाचाही असल्या निराधार आरोपांवर विश्वास बसूच शकत नाही.

अलीकडेच मित्रवर्य सुनील चव्हाण आणि मी वांद्र्यातील सरांच्या घरी गेलो होतो. मीही याच परिसरात राहत असल्यामुळे यापूर्वीही सरांच्या घरी जाणे झाले होते. तत्पूर्वी पुणे, नाशिक, भुसावळ आणि मुंबईत वेगवेगळ्या कार्यक्रमांत सरांची भेट झाली होती. आता मात्र सर फार थकले होते. खोकला थांबत नव्हता. बोलताना त्रास होत असे. सरांना नमस्कार केला. मी सोबत माझ्या मुलीला (चार्वी) आवर्जून नेले होते. आजारपणामुळे सरांनी सुरुवातीला ओळखले नाही. मी रानडे इन्स्टिट्यूटमधील काही आठवणी सांगू लागलो, "माझ्या बातमीलेखनातील चुका... सर, तुम्ही दिलेला 'थातूरमातूर' शेरा... हडपसरहून ये-जा..."

माझे बोलणे संपण्यापूर्वीच श्रीमती साधूमॅडम म्हणाल्या, "सर सांगायचे, की एक मुलगा हडपसरहून सायकलीनं येतो वगैरे... तूच का?"

ऐकून मला भरून आल्यासारखे झाले. मी म्हणालो, "हो, मॅडम."

विद्यार्थी हा विषय सरांसाठी सर्वव्यापी होता. गावाकडून आलेल्या आमच्यासारख्या विद्यार्थ्यांबाबत सरांना अधिक आस्था होती. मी "हो" म्हटल्यावर सरांच्या पटकन लक्षात आले, "तू संजय आवटे, कमलेश वालावलकरच्या बॅचचा ना?"


"हो सर", मी म्हणालो.

आमची बॅच १९९६-९७ (बीसीजे) आणि १९९७-९८ (एमसीजे)ची. संजय आवटे, कमलेश वालावलकर, अभय जोशी, ऐश्वर्या माविनकुर्वे, अनिता, निशा नांबियार, अभ्युदय रेळेकर, अविनाश थोरात, श्रीकांत धिवरे, दत्तात्रय गवंडी, सुनील पाटील, सैकत दत्ता, सुधाकर आदी, ही आमची बीसीजेची बॅच. हृषीकेश देशपांडे, भक्ती चपळगावकर, ज्येष्ठ पत्रकार संजय दिनकर, आएशा खान, मृणाल सप्रे आदी एमसीजेच्या बॅचचे. सरांनी यातल्या अनेकांची चौकशी केली.

सरांचे जाणे आम्हा विद्यार्थ्यांसाठीही धक्कादायक होते. सरांचे अंत्यदर्शन घेताना पार्थिवाजवळ गणेश पुराणिक, मी आणि अजून दोघे पत्रकार बसलो होतो. मुख्यमंत्र्यांच्या जनसंपर्क अधिकारी कीर्ती मोहरीरही होत्या. आवंढा गिळत श्रीमती साधू म्हणाल्या, "तुमचे सर गेले."

मॅडमचे हे उद्‌गार, अस्वस्थतेची भयाण जाणीव करून देणारे होते. डोळे कधी पाणावले ते कळलेही नाही. सरांच्या जाण्याने केवळ साहित्यिक किंवा पत्रकारच नव्हे तर पत्रकारांचा एक तळमळीचा शिक्षकही हरपला. सरांच्या अंत्यदर्शनाच्या वेळी सरांचे बरेच विद्यार्थी उपस्थित होते. यातल्या बहुतांश जणांनी आता पत्रकारितेत आपली स्वतंत्र ओळख प्रस्थापित केली आहे. त्यात ओळखीतले नीलेश खरे, मनोज भोयर, हारिस शेख, गणेश पुराणिक असे अनेक होते. सगळ्यांच्या मनात सरांविषयी खूप आठवणी दाटून आल्या होत्या.

**– जगदीश मोरे**
भ्रमणध्वनी : ९९६७८३६६८७
jagdishmore@gmail.com




# अरुण साधू - विद्वान पण साधा माणूस

▶ अनुराधा गांगल

अरुण साधू हे एक महान विद्वान साहित्यिक होते. त्यांच्यावर तेवढेच महान साहित्यिक लिहितीलही, पण मी एक साधीसुधी गृहिणी. मी त्यांच्या कौटुंबिक अन् घरेलू गोष्टी सांगते. मी 'ग्रंथाली'च्या 'रुची' मासिकात 'आमचे नेहरूनगर' असा लेख काही वर्षांपूर्वी लिहिला होता. तो वाचल्यावर मला चक्क फोन आले, ''अहो, तुम्ही एवढ्या मोठमोठ्या लोकांबरोबर नेहरूनगरात राहात होता का? आम्ही पण तेथेच राहायला हवे होतो असे तुमचा लेख वाचून वाटू लागले.'' तेव्हा मी त्यांना सांगितले, ''अहो, आत्ता हे सगळे महान झाले आहेत. आम्ही राहात होतो तेव्हा आम्ही सगळेच जण अगदी साधीसुधी, संसारी मंडळी होतो.'' नेहरूनगरात आम्ही - अशोक जैन, अरुण साधू, दिनकर गांगल, सुधीर नांदगावकर, जगन फडणीस, अरुण घाटे, रमण माळवदे, राजा पारगावकर, प्रफुल्लकुमार मोकाशी, सुदेश हिंगलासपूरकर अशी सर्व मित्रमंडळी गुण्यागोविंदाने राहात होतो. पत्रकार मंडळींचा एक मोठा ग्रूपच होता. त्यांत आमचे तिघे म्हणजे साधू, गांगल, जैन ही त्रिमूर्ती - 'दत्तगुरू'च होते! त्या तिघांना पुस्तके वाचण्याचा खूपच मोठा छंद होता. जैन अन् साधू चौथ्या मजल्यावर राहात. आम्ही गांगल ग्राउंड फ्लोअरवर राहात होतो. त्यामुळे तिघे ऑफिसमधून आल्यावर आमच्या घरात बसत असत. तेथेच त्यांच्या 'चहा' पित प्रचंड गप्पा होत असत.

अरुण साधू विदर्भातून अन् गांगल रोह्याहून पुणे येथे आले. गांगल अन् साधू या दोघांचा नोकरी करून पुढील शिक्षण करावे असा हेतू होता. गांगल 'केसरी' वर्तमानपत्रात नोकरी करत होते. साधू तेथेच आले. गांगल काम संपवून बाहेर पडले. साधूही बाहेर आले. त्यांनी गांगलांना विचारले, ''तू कुठे राहतोस?'' गांगलांनी एक रूम घेतली होती. साधू म्हणाले, ''मी आलो तर चालेल का?'' ''हो तर, का नाही!'' या गांगलांच्या उत्तरावर दोघेही एका रूममध्ये, एकाच 'पाटणकर बोर्डिंग हाऊस'च्या डब्यामध्ये जेवू लागले. दोघेही नोकरी करायचे. त्या काळातील, पगाराचे पैसे किती असणार? पण दोघेही एकाच टेबलवर खिशातील पैसे ठेवायचे अन् मुख्य म्हणजे हिशोब न करता, ज्याला जसे वाटतील तसे खर्चही करायचे. कोणी कोणाला विचारीत नसे. अशी त्यांची तेव्हापासूनची मैत्री आजतागायत दृढ होती.

माझ्या लग्नानंतर वर्ष-दीड वर्षाने साधूंचे लग्न झाले. फार पूर्वीचा काळ असल्याने, मी माझे लग्न झाल्यावर पहिल्यावहिल्या बारा सणांना 'माहेरी' जात असे. मी माहेरी गेले, की ते वर्ष-दीड वर्षे साधू गांगलांकडे म्हणजे आमच्या घरी राहायला येत. या तिघांत साधू-गांगल शांत स्वभावाचे असले तरी आमचा अशोक जैन इतका बोलका, विनोदी होता, की एकदा मी माहेराहून आल्यावर अशोक म्हणाला, 'अगं अनुराधा, तुझ्या स्वयंपाक घरातले बल्ब लागोपाठ तीन दिवस या माणसाने (साधूने) फोडले.' इतके सांगून थांबेल तो अशोक कसला! त्याने स्वयंपाकघरात जाऊन साधू स्टूलावर कसा चढायचा, त्याचा धुतलेला बनियन कसा झटकायचा अन् वर वाळत घालताना बनियन बल्बला लागून बल्ब कसा फुटायचा याचे प्रात्यक्षिकच करून दाखवले. वर म्हणाला, ''एकदा बल्ब फुटला ना, मग दुसऱ्या दिवशी शहाणे नको का व्हायला? अगं, दुसऱ्या दिवशी तेच. परत तिसऱ्याही दिवशी तेच.'' आम्ही सगळे हसलो खरे, पण अशोकच्या अशा बोलण्यामुळे अन् प्रात्यक्षिकांमुळे तो आमच्या घराकडे येताना दिसला तरीही मला हसू यायचे. आज हा काय सांगतो आहे याचे कुतूहल जागे व्हायचे.

त्या तिघांना पुस्तके वाचण्याचे अन् तीही विकत घेऊन वाचण्याचे फार वेड होते. तिघांचे एक-एक पुस्तक वाचून झाल्यावर आमच्या घरात त्या पुस्तकावर चर्चा झडत असे. मला अगदी छान आठवते आहे, की खानोलकरांच्या 'अजगर' नावाच्या पुस्तकावर आमच्या घरात त्या तिघांची चर्चा चालू

होती. मध्ये मध्ये चहा अन् खूप मोठा 'अॅश ट्रे' सिगारेट्सच्या राखेने भरून जात होता. माझे काम एवढेच; चहा देणे अन् अॅश ट्रे रिकामा करणे. ती चर्चा रात्रीपर्यंत एवढी चालली, की मी मनात घाबरून गेले होते. मला वाटले, आता हे तिघे उद्यापासून बोलणार नाहीत, पण शक्य आहे का ते? सकाळी नऊ वाजता दोघेही घराशी हजर!



साधू आणि गांगल दोघे अनेक विषयांत, अनेक विचारांत एकरूप होते. त्यांचे एखाद्या विषयावर वादही व्हायचे आणि एकरूपताही व्हायची. ते दोघे एकत्र पुण्यात राहत होते तेव्हा त्या दोघांनी अनेक इंग्रजी आणि हिंदी चित्रपट पाहिले होते. दोघांनाही पोहण्याची खूप आवड होती. आम्ही कित्येक रविवारी पहाटे पाचला उठून जुहू बीचवर जायचो आणि पोहून ऊन वाढायच्या आत साडेआठला घरी परत यायचो. ते दोघेही इतके मोकळेढाकळे होते, की स्वतःच्या मुलींसोबत कुठल्याही विषयांवर मोकळेपणाने चर्चा करत.

आमच्या दोघी मुली अन् अरुण साधूंच्या दोन्ही मुली अगदी बरोबरीच्या होत्या. आम्हा दोन मित्रांचे दोन मुली असणे यातही साम्य होते. इतकी मैत्री दाट अन् अफाट होती. आमच्या दोन मुली साधूंकडे जात अन् साधूंच्या दोन मुली आमच्या घरी येत. अशा या चौघी एकत्रित राहत, बोलत, वाढत होत्या. त्यामुळे झालं काय, की आमच्या दोघी जणी आम्हा दोघांना आई-बाबा अन् साधू दोघांना त्यांच्या मुलींबरोबरच मम्मी-डॅडी म्हणू लागल्या. तेव्हापासून ते अगदी आजही त्या आम्हाला आई-बाबा अन् त्या दोघांना मम्मी-डॅडी म्हणत आहेत. थोड्या मोठ्या झाल्यावर एकदा माझी मुलगी तिच्या मैत्रिणीला म्हणाली, ''आज आम्हाला मम्मी-डॅडींकडे जेवायला जायचे आहे.'' ते ऐकून तिची मैत्रीण चक्रावूनच गेली. ''अगं, रोजच मम्मी-डॅडींकडे जेवतेस ना! मग असे काय म्हणत आहेस?'' असे तिने म्हटल्यावर माझ्या लेकीच्या लक्षात आले. ''अगं, मम्मी म्हणजे अरुणा साधू अन् डॅडी म्हणजे अरुण साधू.' असे आमच्या दोन्ही घरांचे एकमेकांशी लागेबांधे होते.


मुलीच नाही तर आम्ही चौघेही एकमेकांशी बांधील होतो. कितीदा तरी आम्ही रात्री एकत्र सहभोजन करीत होतो. साधू हे निगर्वी, साधे, सज्जन, शांत वृत्तीचे, मृदू, सौम्य स्वभावाचे होते. अनेक सणांना जसे आम्ही एकत्र यायचो तसेच कोणाच्याही आजारपणात आम्ही एकमेकांचे साथीदार असायचो. शरद पवार मुख्यमंत्री असताना साधूंना अन् आमच्या जगन फडणीसांना विधानसभा 'कव्हर' करण्याची कामगिरी होती. दोघे आपले काम उत्तमप्रकारे करीतच होते. आमचे घर असे होते, की बाकीच्या सर्वांना स्टेशनवर येता-जाता सहज रोजच 'हाका' मारणे सोयीचे होत असे. एक दिवस सकाळी जगन फडणीस आले अन् म्हणाले, ''गांगल, काय तुझा मित्र! मी विधानसभेत पोचायच्या अगोदरच जाऊन हा शरद पवारांजवळ बसलेला!'' फडणीसने ते वाक्य 'बातमी' कशी गॉसिप रीत्या द्यायची यासाठी म्हटले होते हे आम्हा दोघांनाही समजले कारण जगन फडणीस-शैला फडणीस ही दोघेही साधूंची अन् आमची जिवश्च-कंठश्च मित्र-मैत्रीण होते. जगन फडणीस हेही एक हुशार, कर्तबगार, उत्तम ज्येष्ठ पत्रकार होते. तेही आम्हा दोघांचेही जवळचे मित्र होते.

साधू, अशोक जैन, त्याची बहीण कमल अन् आम्ही दोघे जेवणा-खाण्यासकट सतत एकत्र असायचो. साधूचे लग्न ठरले तेव्हाची गोष्ट - अरुणा अमरावतीची होती. लग्न तिकडेच होणार होते. एकदा हे तिघे आमच्या घरात आले. अरुणासाठी साड्या घेऊन आले होते अन् त्या साड्या ते आम्हाला दाखवत होते. तिघेजण आठवले-शहाडे दुकानात गेले. साड्या घ्यायच्या आहेत असे म्हटल्यावर दुकानदारांनी ''कशा? कोणत्या प्रकारच्या हव्यात असे प्रश्न विचारले असणार.'' साधू म्हणाले, ''तुमच्याच मुलीचे लग्न आहे असे समजा अन् त्याप्रमाणे साड्या द्या.'' असे अनेक 'वृत्तांत' अगदी सगळ्या प्रात्यक्षिकांसह आम्हाला सतत नंतर ऐकायला मिळत. ''अहो, आम्हा दोघींना साड्या खरेदीला का नाही नेले'' असे विचारताच ''पगार झाला होता. दादरला उतरलो तिघे अन् घेतल्या साड्या.'' अशी समर्पक उत्तरे तिघांजवळ असायची. आणि लग्नाला म्हणाल तर साधू जरी विदर्भातील असला तरी तोच केवढा अवघडलाय. त्याच्यामुळे तुम्हाला कुठे नेणार अमरावतीला?' असे गांगल आणि अशोक म्हणाले.

लग्नासाठीसुद्धा गांगल, अशोक अमरावतीला गेले होते. तेथे कोणीतरी विचारले, ''तुम्ही दोघे यांचे मित्र का?'' लग्नात सतत

ढेमशाची भाजी होती. अशोक त्यांना म्हणाला, ''आता उद्या हीच ढेमशाची भाजी असेल तर हे दोनच मित्र, नाही तर आम्ही तीन मित्र.'' नंतर ''वर-वधूंची गाडी कशी बंद पडली. मला अन् गांगलला कसा धक्का मारावा लागला, का तर ते दोघे वधू-वर ना! काय करणार? मारले गाडीला धक्के.'' वगैरे हकिगती रंगवून रंगवून सांगितल्या गेल्या.

साधूंचे लग्न व्हायच्या अगोदर आम्ही दोघे, साधू, अशोक जैन व त्याची बहीण कमल आम्ही पाच जण सतत सारखे बरोबर असायचो. आम्ही दोघे लग्न झाल्यावर दीड वर्षांनी दोघेच सिनेमाला गेलो होतो. तेव्हा जाणीव झाली, ''अरे, आज फक्त आपण दोघेच आहोत, परंतु आपण दोघेच असायला हवे होतो अशी स्वप्नातही कधी, अगदी कधीही जाणीव झाली नव्हती.'' याला कारण आमच्या मित्रांचे स्वभाव... त्यांचा विशाल, एकरुपतेचा जिव्हाळ्याचा, ओढीचा महान स्वभाव. याच त्यांच्या स्वभावाने आम्ही प्रचंड एकरूप मित्र झालो होतो. अरुणा आली, सुनीती जैन आली, दोघीही आल्या अन् तितक्याच ताकदीने आमच्यात मिसळून गेल्या. आम्ही एकरुपतेचे, प्रेमाचे, ओढीचे, जिव्हाळ्याचे मित्र बनलो अन् यापुढे तसेच कायम राहू. पण... आधी श्रीकांत लागू गेला, मग अशोक जैन, आता अरुण साधू!




अरुण साधू यांनी पहिली-वहिली कादंबरी लिहिली ती म्हणजे 'मुंबई दिनांक'. 'मुंबई दिनांक'च्या अगोदर साधूंनी 'फिडेल, चे अन् क्रांती', 'आणि ड्रॅगन जागा झाला' अशी पुस्तके लिहिली होती. तेव्हा ते माजगावकर यांच्या 'माणूस' मासिकाशी संबंधित होते. 'आणि ड्रॅगन जागा झाला', 'फिडेल, चे अन् क्रांती' ही पुस्तकांची नावे वाचूनच मी त्यांना म्हटले होते, ''साधू, अशी काय हो, तुम्ही ही पुस्तके लिहिलीत? जरा चांगली लिहा ना!'' ते माझे हे वाक्य ऐकून गालातल्या गालात नुसते हसले होते. त्या पुस्तकांच्या मथळ्यावरून मी त्यांना तसे म्हटले होते. त्या पुस्तकांच्या आतील महानता मला कुठे माहिती होती? गांगल-साधू यांची इतकी अगाध मैत्री होती, की 'मुंबई दिनांक'चे थोडेसे लिखाण झाले तरी साधू ती पाने गांगलांना वाचायला देतच असत. 'मुंबई दिनांक' हे नावही त्यांना गांगलांनी सांगितले. साधूंची 'मुंबई दिनांक' ही कादंबरी एवढी लोकप्रिय झाली, की तिची अनेक भाषांत भाषांतरे झाली. मग मात्र या गुणी, विद्वान माणसाने मागे वळून पाहिलेच नाही. त्यांची एका पाठोपाठ एक पुस्तके येतच राहिली अन् गाजत गाजत लोकप्रियही होत राहिली. जसे साधू साधेसुधे होते तसेच त्यांची बहीण अन् भाऊही अगदी साधेसुधे, मनमिळाऊ होते. या साध्यासुध्या स्वभावाबरोबरच माणुसकी, मानवता यांचा स्रोत त्यांच्या अंगातून वाहत होता. त्यांच्या 'सिंहासन' पुस्तकाने तर उच्चांकच गाठला. 'सिंहासन' चित्रपट कोणी पाहिला नाही असे होणारच नाही.

या लागोपाठ महानता साधत जाणाऱ्या पुस्तकांबरोबरच त्यांच्या मुली मोठ्या झाल्या. त्यांची लग्ने झाली. नातवंडे झाली. साधू कंपनी सुखाच्या झोपाळ्यावर सुखाने, आनंदाने, उत्साहाने आपल्या निर्मळ वागण्याने झोके घेत होती, परंतु सगळे काही चांगले, चांगले आणि चांगलेच कसे? नाही का?

साधूंना 'हार्ट'चा त्रास सुरू झाला, पण नित्यनेमाने, आळस न करता अनेक वर्षे ते मुकाट्याने औषध-पाणी, काढा, खाणे-पिणे करीत होते. अरुणाही त्यांत कसूर करत नव्हती. मला मनातून नेहमी असे वाटत आले आहे, की परमेश्वर मनात ठरवत असावा - इतक्या चांगल्या माणसाला असे कसे न्यायचे? काहीतरी दुखणे करायलाच हवे, मग बरे. साधूंना गेले अनेक दिवस महाप्रचंड खोकला सुरू झाला. त्या खोकल्याने त्यांचे हाड अन् हाड ढिले करून टाकले. अन् तोच खोकला त्यांना नाउमेद करून त्यांना घेऊनच 'निघून' गेला. इतका मोठा विद्वान त्या खोकल्यावर काही करू शकला नाही!

**- सौ. अनुराधा गांगल**
दूरध्वनी : (०२२) २५२२१६४८




# 'ग्रंथाली'तील अरुण साधू

▶ दिनकर गांगल

अरुण साधू हा 'ग्रंथाली'चा अविभाज्य भाग होता; किंबहुना तो 'ग्रंथाली' संकल्पनेचा एक प्रेरणास्रोत होता. 'ग्रंथाली' वाचक चळवळ म्हणून औपचारिक संघटित होण्यापूर्वी मी, साधू आणि प्रकाशक ज्ञानेश्वर मुळे 'मराठी साहित्य कुंठित का,' याबद्दल वारंवार बोलत असू. त्यामधून नवनवीन कल्पना स्फुरत. त्यातील मुख्य आशय 'मराठी साहित्य विषय व लेखन या दोन्ही अंगांनी मध्यमवर्गीय समाजापुरते मर्यादित राहिले आहे. ते समाजाच्या सर्व अंगांना भिडले पाहिजे आणि ते वेधक रीत्या सादर केले गेले पाहिजे' असा असे. त्यानंतर केव्हातरी इचलकरंजीच्या साहित्यसंमेलनाला जाणे झाले आणि ''ग्रंथाली' वाचक चळवळी'ची ठिणगी पडली. तो त्यानंतर जवळजवळ दोन दशके महाराष्ट्राच्या सामाजिक-सांस्कृतिक जीवनात झंझावात होऊन गेला. अरुण साधू हा लेखक म्हणून, संपादक म्हणून आणि मित्र म्हणून त्या महाराष्ट्रभर पसरलेल्या विधायक वादळाचा एक प्रवर्तक होता. साधूच्या मृत्यूनंतर महाराष्ट्राच्या जिल्ह्याजिल्ह्यांतून फोन आले. त्यामध्ये साधूची पहिली भेट कशी व केव्हा झाली हे सांगणारे उल्लेख असत. साधूने त्या सर्वांचे जीवन उजळवून टाकले असल्याचा भाव त्यांच्या संभाषणात असे.

'ग्रंथाली' सुरू झाली तेव्हा साधूची 'मुंबई दिनांक' प्रसिद्ध होऊन तीन वर्षे उलटली होती. तिचा सर्वत्र बोलबोला होता. किंबहुना त्या कादंबरीची संहिता घेऊन साधू केशवराव कोठावळे यांना भेटला, तेव्हा मी त्याच्याबरोबर होतो. मी थोड्या आगाऊपणानेच कोठावळे यांना, 'त्या कादंबरीच्या वीस हजार प्रती छापा, त्या सहज संपून जातील' असा सल्ला दिला. कोठावळे फक्त हसले, म्हणाले, आम्ही फक्त तीन हजार प्रती छापतो. पुस्तकाचे अर्थकारण त्या काळी वेगळे होते. कागद हा मुद्रणप्रक्रियेपेक्षा अधिक खर्चिक असे. आमचे आग्रह रूढ प्रकाशकांच्या पचनी पडण्यासारखे नव्हते. परंतु नंतरच्या काळात जवळजवळ सर्व प्रकाशकांनी 'ग्रंथाली'चे दंडक अनुसरलेले आढळून येतील. पुढे 'मुंबई दिनांक'ने इतिहास घडवला. त्याने वीस हजार प्रतींची मर्यादा केव्हाच मागे टाकली! ती कादंबरी अनेक भाषांत भाषांतरित झाली.

साधू संपादक म्हणून लेखक असण्याइतकाच कुशल होता. त्यामुळे त्याच्या पुस्तकांमध्ये तो नेटकेपणा जाणवतोच. परंतु त्याने इतर लेखकांची कितीतरी पुस्तके संपादित-संस्कारित करून दिली आहेत. विश्वास पाटील यांच्या 'पांगिरा' या पहिल्या कादंबरीच्या वेळी साधू, मी व पाटील असे तिघेजण 'पांगिरा' आशयसंपन्न व शैलीदार होण्याच्या दृष्टीने काय करता येऊ शकेल याबद्दल दोन दिवस एकत्र बसून कच्च्या संहितेवर खटपट करत होतो. त्या काळात 'ग्रंथाली'तर्फे व 'साहित्य संस्कृती मंडळा'तर्फे लेखकांसाठी लेखनशिबिरे होत तेथे साधू हे आकर्षण असे. तो लेखनविषयाची महत्ता बरोबर जोखत असे, त्याची मांडणी कशी असायला हवी हे खुलासेवार सांगत असे. त्यात तो स्वत: संकोची असल्यामुळे अनाग्रही असे. साधूचे ते सर्व गुण लेखनेच्छूंना स्फुरण देणारे ठरत.

साधू स्वत:ही ती सर्व शिस्त पाळत असे. 'मुंबई दिनांक'पासूनचे त्याचे जवळजवळ सर्व लेखन आम्ही जवळून निरखत आलेलो आहोत. कधी त्याची लेखनस्वरूपात किंवा मुद्रितस्वरूपात चिकित्सादेखील केली आहे. त्याबद्दलचा त्याचा दृष्टिकोन उदार असे. त्याच्या स्वभावाचा निरिच्छता हा एक गुणविशेष होता. त्याला सोस कशाचाच नसे. परंतु लेखन करणे असो वा वाचन करणे असो, तो त्यावर मात्र तुटून पडत असे. (त्याचप्रमाणे त्याला प्रिय होता तो सिगारेटचा स्वाद! तो खुशीत असला, म्हणजे सिगारेट ओढण्याआधी नाकाशी धरून हुंगत असे. त्यावेळचा त्याचा प्रसन्न आनंदी चेहरा अजूनही डोळ्यांसमोर



तरळतो. आम्ही सगळ्यांनीच सिगारेटी खूप खूप ओढल्या. पण गेल्या वीस वर्षांत तो नाद सोडूनही दिला. साधू तंबाखू-पानसुद्धा तशाच लज्जतीने खाई. परंतु आमच्यापैकी बाकी कोणाला पान-तंबाखूमध्ये फारसा रस नव्हता).

'ग्रंथाली'ने आरंभीच्या एक-दोन वर्षांतच 'ग्रंथाली'तर्फे कोणत्या प्रकारची पुस्तके यावीत याकरता ऐंशी विषयांची यादी बनवली होती. साधूचा ती ठरवण्यातील वाटा खूप महत्त्वाचा आहे. आम्ही त्यांपैकी दहा पुस्तकेसुद्धा निर्माण करू शकलो नाही; तथापी, तशा प्रकारची पुस्तके निर्माण होत गेली. त्यातील एक प्रकार म्हणजे तरुण वयातच आत्मकथन लिहिण्याचा. विशेषत: तळच्या वर्गातील लोकांचे जीवन त्या वयातच व्यक्त होण्याला मोठे सामाजिक परिमाण आहे. मला आठवते, की साधूने तो मुद्दा ठासून त्या चर्चेत मांडला होता व नंतर जी आत्मकथने येत गेली त्यामधील त्याचा संपादकीय हस्तक्षेप महत्त्वाचा ठरला.

साधू 'ग्रंथाली'च्या बैठकांमध्येही सर्रास खूप बोलायचा नाही. परंतु त्याच्या आवडीचा विषय आला, की त्याचे बोलणे बंद व्हायचे नाही. त्याचा आवडीचा विषय म्हणजे तळच्या वर्गात पुस्तके नेऊन कशी पोचवता येतील हा. तो विशेषत: परळ-लालबाग भागातील कामगारवस्तीत पुस्तके नेण्याच्या बऱ्याच सूचना करायचा. ती गोष्ट व्यावहारिकदृष्ट्या निवडक पद्धतीने करावी लागे. त्यात आमच्याबरोबरचे जयंत खेर हे बँकर. ते फार चतुर अर्थशास्त्री. त्यांनी 'ग्रंथाली'चा प्रत्येक उपक्रम 'सेल्फ सफिशियण्ट सेंटर' म्हणून पाहिला पाहिजे अशी एक नवी व्यावहारिक दृष्टी आमच्या मनावर बिंबवली. त्यानंतरही 'ग्रंथाली'ने अनेक वेळा स्वप्नाळू वाटावी अशी झेप घेतली, परंतु स्वयंपूर्णतेचा मंत्र सहसा सोडला नाही. साधू अनेक वेळा त्या संबंधात चिकित्सक असे. परंतु त्याचा स्वभाव स्वत:चीच भूमिका हट्टीपणाने पुढे नेण्याचा नव्हताच. आम्ही सिनियर ट्रस्टींनी २००३-२००४ सालानंतर 'ग्रंथाली'मधून लक्ष काढून घेतले. नीरजा, पद्मभूषण देशपांडे, धनंजय गांगल, शिरीष बीरकर... आणि त्या सर्वांचा सूत्रधार सुदेश हिंगलासपूरकर यांनी 'ग्रंथाली'चे कार्य पुढे चालवले आहे. त्या सर्वांनी मिळून, विशेषत: सुदेशच्या प्रयत्नाने 'ग्रंथाली'ला मजबूत आर्थिक पायावर उभे करण्याचा खटाटोप चालवला आहे. साधू त्यांच्या या प्रयत्नांची प्रशंसा करत असे. किंबहुना एका गरजेच्या प्रसंगी साधूने तत्कालीन मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्याकडे शब्द टाकून मुख्यमंत्री फंडातून काही निधी मिळवून दिला. साधूच्या स्वभावात असे, out of the way जाऊन मदत करणे नव्हते, म्हणून ही नोंद महत्त्वाची.

आनंद यादव यांनी काही काळ ग्रामीण साहित्याची चळवळ चालवली, त्या प्रकारच्या लेखनास प्रोत्साहन दिले. परंतु त्यामुळे त्यांचे स्वत:चेच लेखन मागे पडत आहे असे पाहिल्यावर ते त्या चळवळीतून मागे झाले. तो साहित्यप्रवाह सशक्त असल्यामुळे तो यादवांच्या प्रोत्साहनाशिवायही पुढे विकसित होत गेला. आनंद यादव यांचा तो पेच रंगनाथ पठारे यांनी 'रथ' या कादंबरीत ललित रीत्या मांडला आहे. मला साधूची गंमत वाटते, की तो स्वत: काही काळ जोमाने व जोशाने लेखन करत होता, तरीही त्याचा 'ग्रंथाली' चळवळीतील सहभाग खूप मोठा राहिलेला आहे. तसेच, तो व्यापक समाजसाहित्यपातळीवरही वावरत राहिला आहे. त्याच्या या सार्वजनिक स्वरूपाच्या सहभागामुळे त्याच्या लेखनास बाधा आली नाही. उलट, असेही म्हणता येईल, की त्याचे लेखन त्या सामाजिक सहभागामुळे अधिकच समृद्ध झालेले जाणवते.

**– दिनकर गांगल**
भ्रमणध्वनी : ९८६७११८५१७
dinkargangal39@gmail.com

# स्थित्यंतराच्या युगाचा लेखक

▶ दिनकर गांगल

अरुण साधू स्वत:मध्ये हरवलेला असतो याबद्दल आम्हा मित्रमंडळींत कुतूहल असे. त्याविषयी गप्पागोष्टी होत- कधी गंमतदेखील केली जाई. मग त्यातून किस्से घडत. साधू ते सारे निर्लेप भावनेने, पुन्हा स्वमग्न राहातच, बहुधा 'एंजॉय' करी. आम्हाला ती आमची मैत्रीतील गोष्ट वाटे. पण ती जगजाहीर आहे असे जेव्हा दोन आठवड्यांपूर्वी ध्यानी आले तेव्हा मला आश्चर्यच वाटले, कारण साधू स्वत:चे गुणविशेष लपवण्यातही तरबेज आहे. झाले असे, की त्याला जनस्थान पुरस्कार जाहीर झाला तेव्हा आमच्या चेंबूरातील त्याच्या चाहत्या वाचक स्त्रीने माझ्या समोर त्याला फोन लावला आणि सांगितले, की तुमच्यासारखे स्वमग्न जे दोन-तीन मराठी लेखक आहेत, त्यांना एकत्र एका दालनात बसवायचे आणि आम्ही साहित्यप्रेमींनी वर गच्चीत बसून, तुमच्या गप्पा काय चालतात (किंवा तुम्ही सारे मौनातच तेथे कसे नांदता) ते पाहायचे, असा कार्यक्रम मला करायचा आहे. तशी जागा माझ्याकडे आहे. केव्हा येता ते बोला!

मीच धास्तावलो. म्हणजे तो टीव्हीवरील 'बिग बॉस'सारखा खेळ झाला की! पण साधूचे व्यक्तिमत्त्व असे जबरदस्त आहे, की तो त्याला रुचले नाही तरी आला प्रसंग पूर्ण क्षमतेने निभावून नेतो. तशी वेळ ओढवली तेव्हा त्याने कित्येक वर्षांपूर्वी आमच्या नेहरूनगरच्या गणेशोत्सवाच्या नाटकात काम केले होते व तेवढ्याच सहजतेने, वेळ आली तेव्हा त्याने काही वर्षांपूर्वी 'फ्री प्रेस जर्नल'ची एडिटरशिप पूर्ण आव्हानाने पेलली. तेवढेच कशाला, तो पत्रकार म्हणून मोठमोठ्या राजकारण्यांना, उच्चपदस्थ व्यक्तींना भेटतो, गटात चर्चा करत असतो, समुदायात वावरत असतो तेव्हा मी निरखून ठेवले आहे, की ते प्रसंग व्यवस्थित पार पडतात, परंतु तो तेथे 'असतोच' असे नाही, मात्र समोरच्या व्यक्तीतील, गटातील, समुदायातील उत्तम गुण त्याने पारखलेले असतात आणि बाकी लौकिकाचे सारे सोडून देऊन तो स्वत:च्या विचारविश्वात हरवून गेलेला असतो; त्याच्याबरोबर कुटुंबीय असोत वा आमच्यासारखे मित्र असोत तो सद्गृहस्थाप्रमाणे औपचारिकता जपतो आणि त्याच वेळी स्वत:च्या विश्वात गुंग असतो.

त्याचा अर्थ, प्रतिभावान कवी-लेखक जसे त्यांच्या स्वत:च्या कल्पनाविश्वाची मिजास मारतात व त्यांचे ते जग सर्वसामान्यांच्या कल्पनेच्या पलीकडचे आहे असे सुचवतात; तशी धारणा साधूची आहे का? तर मुळीच नाही! तो सर्वसामान्यांना अधिक धार्जिणा आहे. तेच त्याचे बलस्थान आहे. तो माणूस म्हणून सर्वसामान्य राहू पाहतो; तशी त्याची अतोनात इच्छा असते, पण तो लेखक म्हणून असाधारण ताकदीचा आहे; किंबहुना त्याच्या तोडीची वैश्विक जाणीव मराठीतील कोणा लेखकात मला आढळलेली नाही आणि त्याची स्थानिक सभोवतालाची जाणीव परिपक्व होत गेलेली आहे.

साधू या जगण्याचा, या विश्वाचा शोध घेत निघाला आहे आणि त्या ओघात, त्याने त्याच्या कथा-कादंबऱ्यांमधून जीवनाचे जसे तुकडे पकडले तसे तत्त्वज्ञानपर सखोल भाष्यही केले आहे. मनुष्यासहित प्राणिमात्राची जगण्याची जी लालसा आहे ती त्याला लेखक म्हणून मोह घालते आणि ती विविध पैलूंसह पकडण्याचा त्याचा प्रयत्न असतो. ते त्याच्या 'मुंबई दिनांक' या पहिल्या कादंबरीपासून जाणवते. वरकरणी, ती मुंबईच्या जीवनाचा काहीशा थ्रिलर पद्धतीने वेध घेते व त्यामुळे ती वाचनवेधक बनते, पण खोलवर, ती मनुष्याला, त्याच्या सभोवतालाला - त्यामधील प्रतिकूलतेला व तरीही जगत राहण्याच्या त्याच्या धडपडीला भिडते. त्याच्या विचारचिंतनाचा तोच धागा सतत घट्ट होत गेला आहे. त्याच्या त्या विचारविश्वाची सखोलता 'फोकस्ड' पद्धतीने त्याच्या अलिकडच्या, दोन वर्षांपूर्वी प्रसिद्ध झालेल्या 'नैनम् छिंदन्ति शस्त्राणि' या कथेत मार्मिक रीत्या व्यक्त झाली आहे.

कादंबरीकार साधू वाचकांच्या खूपच परिचयाचा आहे. त्याच्या कादंबऱ्यांवर आधारित 'सिंहासन'सारख्या चित्रपटाने तर त्याचा लौकिक फारच वाढवला. पुढे, त्याने जब्बार पटेलबरोबर आंबेडकर, यशवंतराव चव्हाण यांच्या जीवनावरील चित्रपटांचे लेखनकाम केले. पत्रकार तो होताच; तेथेही त्याने राजकारण, समाजकारण यांचा अचूक वेध असा घेतला की राष्ट्रीय पातळीवरील लेखक-विचारवंतांचे लक्ष त्याच्याकडे वेधले जाई. त्याच्या पहिल्या पाच-सात कादंबऱ्यांमधून त्या त्या वेळचे, विशेषत: पददलितांचे विषय आल्यामुळे त्याचे पत्रकार-लेखक हे बिरुद पक्के झाले. तो काळही सामाजिक उद्रेकाचा होता. विविध क्षेत्रांतील आंदोलने जागरूक संवेदनाशील माणसांना अस्वस्थ करत होती, परंतु साधू पत्रकाराच्या तात्कालिकतेच्या महत्त्वाच्या पार पलीकडचा असा लेखक आहे. त्याने समकाल सूक्ष्मपणे टिपता-टिपता त्यामधील चिरंतनत्व अधोरेखित केले. त्याची जीवनाची समज विश्वव्यापक व तेवढीच सखोल आहे हे त्याच्या नंतरच्या 'शोधयात्रा', 'मुखवटा' यांसारख्या कादंबऱ्यांनी पक्केपणाने दाखवून दिले. त्याच बेताला प्रसिद्ध झालेली त्याची 'तडजोड' ही कादंबरी दुर्लक्षली गेली, परंतु तीमधून मनुष्यजीवनाच्या सर्वसामान्यतेचे पण तरीही मनुष्याच्या जगत राहण्याच्या प्रेरणेचे अपूर्व दर्शन होते.

त्याच्या कादंबरीलेखनाइतक्याच उत्कटतेने त्याचे कथालेखन सुरू होते. 'झिपऱ्या', 'विप्लवा' या प्रथम कथा म्हणून अवतरल्या परंतु 'झिपऱ्या'ने कथामालिका स्वरूपात कादंबरीचा आकार घेतला. मला आठवते, आम्ही 'ग्रंथाली'तर्फे डॉ. यशवंत केवळे या, बुटपॉलिश करून शिकलेल्या व अकाली अपघाती मृत्यू पावलेल्या तरुणाची कहाणी (लेखिका - मंगला केवळे) प्रसिद्ध केली होती. तिचा बराच बोलबाला झाला तो केवळे यांच्या व्यक्तिमत्त्वातील प्रेरकतेमुळे. साधू तेव्हा स्वतंत्रपणे कुर्ला स्टेशनच्या प्लॅटफॉर्म सात-आठ-नऊवरील भटक्या मुलांचे जीवन टिपत होता. त्या मालिकेतील कथा अंतराअंतराने प्रसिद्ध होत गेल्या. गंमत अशी वाटते, की 'त्रिशंकू'मधील महत्त्वाकांक्षा जागृत झालेली दलित नायिका एका बाजूला आणि दयनीय जिणे खेळकरपणे जगणारी आणि जगण्याची जिद्द न हरवलेली रेल्वे स्टेशनातील ती अनाथ, बेवारस मुले दुसऱ्या बाजूला... साधू जग किती जाणत होता! बाप रे बाप! त्यामुळेच त्याच्या साऱ्या लेखनात मानवी करुणा ओतप्रोत भरलेली भासते. मदर तेरेसा यांचे व्यक्तिरूप मनी साकारल्याने जो भाव जागा होतो, तोच भाव! संतांची परमेश्वरचरणी एकरूपता आणि येशूची मानवाप्रती सहृदयता या दोन्हींचा अपूर्व संगम साधूच्या लेखनात दिसतो आणि महत्त्वाचे म्हणजे ते सारे अस्सल मानवी भावभावनांचे सामाजिक जग असते.


अरुण साधू याचा लेखक म्हणून विकास परिपूर्णतेच्या दिशेने आहे. त्याची 'चे गव्हेरा', '...आणि ड्रॅगन जागा झाला' यांसारखी आरंभीची पुस्तके तरुणांमध्ये नवचैतन्य जागवणारी ठरली. त्याने हंसा वाडकरच्या व्यक्तिमत्त्वातील जिव्हाळा व संवेदना कायम ठेवत तिचे आत्मकथन 'सांगत्ये ऐका' या शीर्षकाने ज्या तटस्थतेने नोंदले त्यामुळे त्याच्यातील ललित लेखनकौशल्याचे गुण प्रकट झाले आणि त्यापुढे त्याचे कादंबऱ्यांचे, कथांचे, चरित्रलेखनाचे, अनुवादाचे, वैचारिक (निश्चिततेच्या अंधारयुगाचा अंत व चीन-रशिया संबंधीची पुस्तके), नाट्य (पडघम) असे वेगवेगळ्या फॉर्ममधील लेखन प्रसिद्ध होत गेले. येथे त्याच्या लेखनशैलीचा मुद्दाम उल्लेख केला पाहिजे. त्याची शब्दयोजना समर्पक असते हे तर स्वाभाविक आहे, पण त्याच्या भाषेत संस्कृतप्रचुरतेपासून आजच्या सरमिसळ मराठीपर्यंतचे विविध आविष्कार गरजेनुसार योजले गेलेले दिसतात. विशेषत: तो पल्लेदार, अनेक वाक्यांशांची गुंतागुंत असलेली लांबलचक वाक्ये लेखनात लीलया उपयोजतो तेव्हा अचंबाच वाटतो! ती भाषाशैली तो शिकला कोठे? आणि त्याने ती कमावली केव्हा? त्याने 'सुटेबल बॉय'चे भाषांतर करताना सहजपणे पद्यरचना केली आहे!

प्रत्येक चांगल्या लेखकात असते तसे उत्तम संपादन कौशल्य त्याच्या अंगी आहे. त्यात तो पत्रकार असल्याने त्याच्या हातात व डोक्यात सतत कात्री असते. तो स्वत:ची पुस्तके संपादित करतोच, परंतु त्याने इतर अनेक लेखकांना त्या कामी मदत केलेली आहे; भले मोठमोठे मराठी-इंग्रजी ग्रंथ रात्र रात्र जागून संपादित केले आहेत. अशा वेळी त्याचा कामाचा उरक व झपाटा पाहून घ्यावा असाच असतो.

अरुण साधू स्वभावत: संकोची आहे. त्यामुळे तो त्याच्या कर्तबगारीविषयी, यशाविषयी कधीच बोलत नाही. त्यामुळेच त्याचे मराठी साहित्यातील अनन्य स्थान कधी भल्या प्रशंसेने, अधिकृतपणे, विद्यापीठीय मान्यतेने सांगितले जात नाही. मात्र तो सध्या सर्वांत वाचकप्रिय मराठी ललित लेखक असावा. तसा प्रत्यय नागपूरच्या साहित्य संमेलनावेळी आलादेखील. त्याच्या तोडीस तोड अनिल अवचट व विश्वास पाटील आणि अलिकडे, बहुधा अच्युत गोडबोले. पुन्हा साधू मुख्य प्रवाहातील लेखक असल्याने त्याच्या भोवती गट वा कोंडाळे जमा होत नाही. तो विविध स्तरांतील अनेकांचा आप्त-मित्र-स्नेही-परिचित असू शकतो, कारण त्या साऱ्यांच्या जगण्याविषयी त्याला आस्था असते. त्याला सहा वर्षांपूर्वी भारतीय साहित्यातील विशेष योगदानासाठी 'रचना सन्मान' नावाचा मोठा राष्ट्रीय पुरस्कार कोलकाता येथे दिला गेला. त्याचे त्या वेळचे पुरस्कार घेऊन येणे मराठी साहित्यात नीट नोंदलेदेखील गेले नव्हते. तो स्वत:ही कधी काही बोलला नाही. त्याच्या तोंडून त्या पुरस्कार प्रदान समारंभावेळचे भारतीय साहित्याचे वातावरण, तेथील चर्चा व त्यामधील त्याचे स्थान या गोष्टी इतक्या वर्षांनंतर, अलीकडे, पाच-सहा महिन्यांपूर्वी आम्हा मित्रांना त्याच्याकडून ओघा ओघात ऐकण्यास मिळाल्या! यास औदासीन्य म्हणायचे की अलिप्तता? पण साधू असा निरिच्छ भासतो हे खरे व त्यामुळे त्याच्या लेखनकर्तृत्वाचे मराठी भूमीत व्हावे तसे कौतुक झाले नाही, होत नाही याचे वाईट वाटते.

साधू 'जनस्थान' पुरस्काराने प्रकाशझोतात आला याचा आम्हा मित्रमंडळींना खूप आनंद वाटला. यापूर्वी तो नागपूरच्या साहित्य संमेलनाचा अध्यक्ष झाला तेव्हाही आम्ही असेच हरखून गेलो होतो व झुंडीने नागपूरला पोचलो होतो. हर्षोत्साह यासाठी की मुख्य प्रवाहातील अस्सल मराठी साहित्याचा हा सन्मान आहे. डॉ. श्रीराम लागू विजय तेंडुलकर यांच्याबाबत म्हणाले होते, की त्यांच्या नाट्यकृतींनी आमच्या पिढीच्या जीवनास अर्थ दिला. त्यांच्या नंतरच्या दोन-अडीच पिढ्यांना अरुण साधूबद्दल तेच म्हणता येईल! त्याचे लेखन म्हटले तर या काळाचा दस्तऐवज आहे, पण त्याचबरोबर ते एकूण मानवी जीवनाच्या संदर्भातही मोलाचे दिशादर्शन करते. म्हणून तो या युगाचा लेखक ठरतो. त्याने त्याच्या साहित्यातून आपला गेल्या पन्नास वर्षांचा काळ मानवी जीवनेतिहासाशी जोडला आहे.

**(अरुण साधू यांना कुसुमाग्रज प्रतिष्ठानतर्फे**
**'जनस्थान पुरस्कार' (२०१५) मिळाला**
**त्यावेळी 'महाराष्ट्र टाइम्स'मध्ये प्रसिद्ध झालेला लेख)**




# साधवो न हि सर्वत्र चंदनं न वने वने!


▶ प्रताप थोरात

अरुण साधू यांचा आणि माझा स्नेह आणीबाणी संपल्यानंतरचा. इतक्या भिडस्त अन् अंतर्मुख माणसाचा व माझा स्नेह कधी जुळावा, हे असंभवच होतं. राजकीय बातमीदारी करताना आजूबाजूला सगळे उघडेबोडके, मतलबी खडकच पसरलेले असतात आणि मला त्यांचीच अधिक सवय झालेली होती. हे दगड फोडून त्यांचे अंतरंग जाणण्यासाठी मी पहाटे साडेपाच (अनेकदा) ते अपरात्री दोन-तीन वाजेपर्यंत वेळ घालवत होतो. ते माझं व्यसनच झालं होतं. कारस्थानी राजकीय नेते, खुनी-दरोडेखोर, आवारा पत्रकार, काळाबाजारवाले व्यापारी, वेश्या व पोलीस रात्रीच कार्यरत असतात. मला काळ्याकुट्ट अंधारात माणसं वाचण्याची झिंग चढलेली! याउलट साधू हे रोज भल्या रामप्रहरी उठून लिहीत बसणारे व ग्रंथांचा अफाट व्यासंग करणारे विद्वान पत्रकार! शिवाय साधू हा असा फुटता न फुटणारा अभेद्य खडक - जरी आत खोलवर मायेचा खळाळणारा झरा होता तरी!

तेव्हा मैत्री जुळणं अशक्यच! पण तिचा चाळीसेक वर्षांत बोलता-बोलता दोस्ताना होऊन गेला होता, हे मला परवा पहिल्यांदा जाणवलं. 'टाइम्स ऑफ इंडिया'चे ज्येष्ठ पत्रकार व माझे जुने सहकारी अंबरिष मिश्र यांचा साधू गेल्याच्या दुसऱ्या दिवशी फोन आला, "सांत्वनासाठी आधी साधूंच्या घरी जाऊन येतो. नंतर तुझ्या सांत्वनासाठी येतो." आदल्या दिवशी मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष नरेंद्र वाबळे यांनी, इतरांना केला तसा एसेमेस न करता, फोन करून मला उठवलं होतं, "वाईट बातमी ऐकण्यासाठी तयार हो! साधू मघाशी गेले." झोपेतच होतो, तेव्हा मट्कन खाली बसायची गरजच नव्हती. हे पत्रकार लोक बेरकी असतात. कुठल्या-कुठल्या खिडकीत टांगलेले एकटे कंदील आता धुरकट होणार आहेत, त्यांना बरोब्बर कळतं! एकटा यासाठीदेखील, की एकाही राजकीय नेत्याला माझी पत्रकारिता आवडलेली नाही. एवढंच नव्हे, तर बहुसंख्य पत्रकारांनाही ती आवडलेली नाही. तेव्हा ती टाकाऊच होती, हे सांगायला एवढं मोठं विरोधी बहुमत लोकशाहीत पुरेसं आहे.

आणीबाणी संपल्यानंतर देशभर इंदिराद्वेषाचा उरुस सुरू झाला. आणीबाणी येणं किंवा अभिव्यक्तिस्वातंत्र्य नष्ट होणं, हे दोन्हीही वाईटच होतं, पण आंतरराष्ट्रीय सारीपाटावर सीआयएनं भारताची केलेली कोंडी व त्यातून इंदिरा गांधींना आलेली अगतिकता, डोळसपणे लक्षात घ्यायला कोणीच तयार नव्हतं. उरुसात तर ते संतुलन हरवलं जात असतंच. सत्तरच्या सुरुवातीला पूर्व पाकिस्तानातून येणारे निर्वासितांचे लोंढे काही इंदिरेनं आमंत्रित केलेले नव्हते. पाकिस्तानातल्या पंजाबी मुसलमानांना वाटणाऱ्या बंगाली मुस्लिमांच्या द्वेषातून व अत्याचारातून ते लोंढे निर्माण झाले होते. पुढेमागे सोव्हिएत युनियन तोडण्यासाठी उपयुक्त असलेली, पश्चिम पाकिस्तानच्या भू-राजकीय महत्त्वाचा विसर पडलेली मदांध सीआयए, उन्मत्त पंजाबी राज्यकर्त्यांना रोखायला काही तयार नव्हती. बांगलादेशच्या निर्मितीनंतर मात्र इंदिरा गांधींना मृत्युदंड द्यायला सीआयएचे हात १९७१ पासून १९८४ पर्यंत शिवशिवत होते. पाकिस्तान तोडला म्हणून आधी रणचंडिका वाटणारी इंदिरा, युद्धानंतर महागाई वाढल्यावर, संघाला सोयीनुसार भस्मासूर वाटू लागली. सगळेच फुकटे! युद्धानंतर नक्की येणारी महागाईची झळ आम्हाला नको. अन् राजकीय प्राणाहुती तर आम्ही नक्कीच नाही देणार. आमच्या गोजिरवाणेपणावर ओरखडा नको रे बाबा! नवनिर्माण आंदोलनात, जयप्रकाशांचं अहमदाबाद विमानतळावर स्वागत करताना, नानाजी देशमुखांनी संघ स्वयंसेवकांना गणवेषाऐवजी समाजवादी घालतात तसले चुरगळलेले रंगीत कुर्ते घालून, भोळ्या संतमहात्म्याला हातोहात बनवलं होतं. पाकिस्तान तोडणाऱ्या इंदिरेचा खून झाल्यानंतर, असे स्वयंसेवक न्यूयॉर्कच्या टाइम्स

स्क्वेअरमध्ये बेभान नाचले होते, अन् त्याची शेखी त्यांनी भारतात आल्यावर मिरवली होती. बिचारे लोहियावादी तर बिगर-काँग्रेसवादाला बांधलेलेच होते. ज्यांना जयप्रकाश कळला नाही, त्यांना इंदिरा काय कळणार? इंडियन एक्स्प्रेसच्या पेंट हाऊसमध्ये एकाकी, शरपंजरी पडलेले हताश जेपी, त्यांना अंगारे-धुपारे लावणारी भावुक बहीण चंद्रकलादेवी, पी.ए. अब्राहम यांच्याबरोबर मी



अनेकदा तासन्तास घालवलेत अन् बघितलेत, भेटीला येणाऱ्या आणि न येणाऱ्या जनता नेत्यांचे रंगढंग आणि 'संपूर्ण क्रांती'मुळे त्यांना आलेली व्यग्रता! कोंबडीनं सोन्याचं अंडं देऊन तर झालेलं होतं. आणीबाणीआधीचे अराजक सीआयएने आखलेले होते व त्या सापळ्यात भान सुटलेले सर्वच अडकले गेले. नंतरचे अराजक आणीबाणीनिर्मित होते.

पत्रकार म्हणून मला दोन्ही बाजू समजावून घेतल्यानंतर बुद्धीला रास्त वाटणारी एक भूमिका घेणं व भाऊगर्दीत सामील न होणं, अगत्याचं वाटलं. अरुण साधूंचीही तशीच भूमिका होती. कदाचित या समान धाग्यामुळे त्यांचा व माझा स्नेहबंध जुळला असू शकेल. कुमार केतकरांचीही तशीच भूमिका होती.

साधूंच्या मृदू, सौम्य व सौजन्यशील स्वभावात घरंदाजपणाचं वैभव होतं, पण तत्त्वनिष्ठेच्या बाबतीत ते खूप खमके व कधीही तडजोड न करणारे होते. त्यांच्यावर नेहरूवादाचा संपूर्ण प्रभाव होता. नेहरूंची प्रखर विज्ञाननिष्ठा, वैश्विक आवाका व भान आणि उदारमतवाद यांचं त्यांना नुसतंच आकर्षण नव्हतं, तर ही मूल्यं साधूंच्याही जीवनाचा अविभाज्य भाग होती. ब्राह्मण समाजात जरी जन्म झाला असला तरी समाजात अजून रेंगाळणाऱ्या पेशवाईवृत्तीविरोधी साधूंना सात्त्विक संताप होता. याचमुळे असेल कदाचित, बहुजनसमाजातील नेत्यांविषयी त्यांना विशेष प्रेम व आस्था होती. प्रतिकूल परिस्थितीत वाढवलेल्या सहकार चळवळीचं त्यांना खूप कौतुक होतं आणि नंतर झालेल्या तिच्या वाताहतीची खंत होती. महाराष्ट्रात यशस्वी केलेल्या या प्रयोगाची माहिती राज्याबाहेर देशाला व देशाबाहेर पोहोचणे अगत्याचं वाटल्यानं, सहकाराचा पाया रचणाऱ्या विठ्ठलराव विखे-पाटलांचं चरित्र साधूंनी स्वतःची प्रकृती साथ देत नसतानाही, केवळ मराठीत लिहून न थांबता ते इंग्रजीतही आणलं. यशवंतराव चव्हाण, वसंतराव नाईक, शंकरराव चव्हाण व वसंतदादा पाटलांच्या योगदानाचं महत्त्व ते जाणत होते. मराठा नेत्यांच्या कामगिरीचं मोल जाणत असतानाही, बॅरिस्टर अंतुल्यांना ज्या पद्धतीनं घेरलं गेलं व त्यांचा दीर्घकाळ छळ झाला, याचा विषाद त्यांना वाटत असे.

दलितांविषयी व आंबेडकर-वादी चळवळींविषयी साधूंना अतोनात प्रेम होतं. पुणे विद्यापीठाच्या वृत्तपत्रविद्या विभागाचे संचालक असताना, एका दलित विद्यार्थ्यानं साधूंविरुद्ध रचलेले कुभांड व थयथयाट त्यांना खूप जिव्हारी लागला होता. त्यावेळी त्यांचं मन शांत करताना, त्यांना मी, माझे वडील व दलितोद्धाराचे काम करणाऱ्या महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे सहकारी असलेल्या - कै. सदाशिवराव थोरात - यांनी मला सांगितलेल्या शिंद्यांना आलेल्या वाईट अनुभवाबद्दल सांगितलं. ज्यांच्यावर शतकानुशतकं घोर सामाजिक अन्याय झाला आहे अशांनाही, कधीमधी सोयीप्रमाणे मनूची री ओढावीशी वाटते, हा दैवदुर्विलास आहे. दुर्दैवानं, मनू इतका अविनाशी व चिरंजीव ठरतो, हे कटू सत्य ध्यानात घेऊनच थोरामोठ्यांनाही, होरपळ झाली तरी, लढा पुढे न्यावा लागला होता, असं मी त्यांना म्हणालो होतो.

असाच स्वप्नाळूपणा त्यांचा मुस्लिमांबद्दल होता. धार्मिक अल्पसंख्याकांबाबत बहुसंख्याकांनी अधिक उदारमतवादी व सहिष्णू असलं पाहिजे, याबाबत आमचं कायम एकमत होतं. एम.जे. अकबर हे जे काही लिहितात, त्यात मुस्लिम समाजातल्या बदलत्या मानसिकतेचं प्रतिबिंब असतं, असा दावा त्यांनी काही वेळा माझ्यापाशी केला. त्यावर माझं म्हणणं असं, "अकबर यांच्या लिखाणात फक्त भाषेचा फुलोरा व शैलीतली लाजवाब कलाकुसर असते. हा माणूस नखशिखांत ढोंगी, आयुष्यात किंवा पत्रकारिकेत कुठल्याही मूल्यांची बांधिलकी नसलेला, एकट्या स्वतःच्या स्वार्थासाठी वाटेल ते करायला सदैव तयार असलेला असा प्राणी आहे. मुस्लिम समाज इतक्या खालच्या पातळीला जाणारा नाही. मी अकबर यांच्याबरोबर चार वर्षं काम केलेलं आहे." माझं मत पायदळी तुडवायला साधू उत्सुक नसत.

कदाचित पत्रकारितेमुळे असेल, पण साधूंना राजकारणाची जाण उत्तम होती. मराठी साहित्यात राजकीय कादंबरी रुजवण्याची मोलाची कामगिरी त्यांनी केली. ज्या काळात (साठच्या दशकाचा मध्य), जग आकसून लहान झालेलं नव्हतं, इंटरनेटचा शोधही लागलेला नव्हता, चीनबद्दलची फारशी माहिती पोलादी चिनी पडद्याबाहेर उपलब्ध नव्हती, अन् दिल्ली-मुंबईसारख्या तुलनेनं माहिती अधिक मिळू शकणाऱ्या भागात राहत

नसतानादेखील, साधूंनी चीनवर मोठा प्रकाशझोत टाकणारा दोनपैकी पहिला महत्त्वाचा ग्रंथ लिहीला, हे नेहमीच मला थक्क करणारं वाटतं. चिनी आक्रमणानंतर नेहरूंवर झालेला आघात, ही नेहरूवादी साधूंची कदाचित प्रेरणा असू शकेल.

साधूंच्या मराठीतल्या शैलीपेक्षा मला त्यांची इंग्रजीमधली ओघवती व देखणी शैली खूप आवडायची. त्यांचं उत्तर होतं - ''चार्ल्स डिकन्स खूप वाचल्यानं ती निर्माण झाली.'' मातृभाषेत शिकलेल्या विद्वानाकडे कन्टेट असतंच असतं, पण परकीय भाषेवरच्या प्रभुत्व व शैलीसाठी खूप परिश्रम घ्यावे लागतात. माझा व साधूंचा सुरुवातीपासूनच संवाद कसा काय बऱ्यापैकी राहिला, याचं मला कधीकधी आश्चर्यच वाटतं - इतका हा माणूस बऱ्याच खोदकामाअखेरीसच थोडासा हाती लागणारा. स्वतःबद्दल किंवा स्वतःच्या साहित्याबद्दलही कमी बोलणारा, किंवा तो विषय टाळणारा. दिवस १९७८-७९ चे असावेत. शरद पवार मुख्यमंत्री होते. बुधवारी, मंत्रिमंडळाच्या साप्ताहिक बैठकीनंतर मुख्यमंत्री पत्रकार परिषद घेत असत. बातमीदारांत मी आणि साधूही असायचो. पवार आले. आल्या-आल्या साधूंकडे पाहात म्हणाले - ''अरुण, अरे, परवा तुझा सिंहासन पिक्चर पाहिला...'' या सात शब्दांवरची साधूंची प्रतिक्रिया एका शब्दाची - ''अच्छा...!'' उगीच बोलणं लांबायला नको. आपल्यावर फोकस नको. कुठल्याही पेपरात आपल्यावर चौकट छापून यायला नको. फोकस, प्रसिद्धीपासून दूर, पार दमछाक होईस्तोवर पळणारा हा माणूस!

साधूंचे 'स्टेट्समन'मधले दिवस मस्त होते. काम कमी होतं व साहित्यनिर्मितीसाठी बऱ्यापैकी वेळ मिळत होता. शिवाय, त्यांच्या साप्ताहिक न्यूजलेटरची दिल्लीतल्या मोठ्या राजकीय सर्कलमध्ये दखल घेतली जायची. मंत्रालयाबाहेरच्या टपऱ्यांवर आम्ही संध्याकाळचा चहा उभे राहून घेत असू. गप्पाष्टकं झडत. त्या टपऱ्यांना आम्ही 'उभेऱ्हाय' म्हणत असू. जवळच असलेलं हॉटेल ओबेराय आणखी काही जन्मं तरी आम्हाला परवडणं शक्य नव्हतं. म्हणून हा पर्याय. ते ८७ साल होतं. साधू म्हणाले - ''संपादक व्हा म्हणून फ्री प्रेसमधून मला ऑफर आलीय. तू माझ्याबरोबर यावंस, असं मला वाटतं. फ्री प्रेसला आपण महाराष्ट्राचं फ्लॅगशिप बनवू.'' मी म्हणालो- ''ही ऑफर स्वीकारण्याला अवदसा आठवणं, असं शहाणेसुरते लोक म्हणतात. शिवाय फ्री प्रेसमध्ये नोकरी मिळण्यासाठी आपली अनेक जन्मांची पापं साठलेली असावी लागतात. फ्लॅगशिप बनवणं फार अवघड नाही.'' पण साधूंचा निर्णय पक्का होता अन् आमच्या दोघांचीही पापं वारेमाप साठलेली होती. त्यांचा निचरा करण्याची नितांत गरज होती.

राजकारण, समाजकारण, संस्कृती, विज्ञान, तंत्रज्ञान यांवरची साधूंची संपादकीयं चांगलीच असायची. त्यांची जाण अष्टपैलू होती. अगदी अर्थकारणावरची संपादकीयंदेखील चांगली असायची. मात्र प्रत्यक्ष आर्थिक व्यवहाराची जाण त्यांना एकंदरीत कमीच होती. त्यांना देशाचं अर्थमंत्री केलं असतं ना, तर पार वाट लावून टाकली असती त्यांनी देशाची. माझा अंदाज आहे, की त्यांची भूमिका अशी असावी - सरस्वती आहे ना, ती आपली. महालक्ष्मीकडे आपण कधी वाकड्या नजरेनंही बघू नये. महालक्ष्मीकडे चोरटे कटाक्ष टाकणं, हादेखील त्यांना व्यभिचार वाटत असावा. असल्या साधुपुरुषानं माझ्या व त्याच्या स्वतःच्या पगाराच्या पॅकेजचं डील करण्याच्या वाटाघाटी केल्या, 'काटकसरीचे कोहिनूर' म्हणून आधीच जगन्मान्यता पावलेल्या, फ्री प्रेसच्या नवकोटनारायण करनानी सेठबरोबर! मला माहीत नाही, या वाटाघाटींच्या वेळी सेठजींच्या एका पायातल्या लाल चपलेला काळा अंगठा लावलेला होता की नाही ते! असतो आपला एकेकाचा ट्रेडमार्क. दर्यादिल सेठजींनी साधूंना शोफर-ड्रिव्हन कार दिलेली होती. आम्ही खूश! पण नंतर कळेना की ही कार शो-रूममधून आणलीय की हातगाडीवर थाटलेल्या फिरत्या भंगाराच्या दुकानातून. हा इन्व्हेस्टिगेटिव्ह जर्नालिझम करायला मजजवळ वेळ नव्हता, इतका मी कामात डुंबून गेलो होतो. सेठजींची तळागाळातल्या लोकांशी बांधिलकी काय असू नये काय? एक मात्र खरे, कारमध्ये बसण्याचा अनुभव हा हठयोग होता. हठयोग ही अंतिम अवस्था, अन् साधुपुरुषाला मोक्ष हठयोगातंच सापडतो. मी योगविद्येच्या खालच्या पातळीवर होतो, अन् साधूंनी दिलेल्या लिफ्ट्स विनम्रपणे नाकारत होतो. सरतेशेवटी महिना झाला, तेव्हा कळलं साधूंना दिलेल्या पगारातून त्यांनी आपल्या सारथ्याचा पगार भागवायचा आहे. माझ्या पॅकेजबद्दल कृपा करून विचारू नका. नंतर तुम्हीच विचाराल - ''अबे, रुलायेगा क्या?'' नागड्याजवळ उघडं गेलं, अन् रातभर थंडीनं काकडून मेलं! अशी आपल्या लाडक्या मायमराठीत एक म्हण आहे बापुडी!

फ्री प्रेस-नवशक्तीमध्ये असंख्य दीनवाणे चेहरे. सगळेच अल्लाघरच्या गरीब गाई. अनेकांच्या चेहऱ्यांवर आशेचे गुलाब फुलले. ही माणसं तर चांगली आणली आहेत, म्हणजे सेठजींना पेपर खूप वाढवायचा आहे. या वाक्यातल्या पूर्वार्धामुळे आमच्या अंगावर मूठभर मांस चढायचं, पण उत्तरार्धामुळे आणखी दुप्पट कमी व्हायचं. या लोकांना एवढं साधं कसं कळत नाही की, इथल्या काळ्या पाण्यावर एका सावरकरांना माफी देऊन सोडलं, की दुसरा सावरकर आणतात.

सहृदय साधूंनी आधीच्या स्टाफची वेदना जाणली. त्यांना खूप जिव्हाळ्यानं वागवलं. उगीच त्रागा केला नाही की, या गंजलेल्या जहाजाला पुढे दामटवून मला त्याचं फ्लॅगशिप बनवायचंय. पहिल्याच महिन्यात साधूंना निमंत्रण आलं आठवडाभर जर्मनीला भेट देण्याचं. पेपरात खूप वर्षं काम करून पिचलेल्या वृत्तसंपादकाला साधूंनी ते दिलं. कुणाच्या चेहऱ्यावर जाता-जाता समाधान फुलवणं, हाच साधूंनी बोनस मानला. फ्री

प्रेसमध्ये येऊन आम्हाला सहाच महिने झाले होते. साधू मला म्हणाले, ''दिलीप पाडगावकर आग्रही आहेत, की मी आणि तू टाइम्समध्ये यावंस.'' पण आता मला अवदसा आठवली होती. मी म्हणालो, ''आपण फ्री प्रेसला एक वर्ष द्यावं. भ्रमनिरास झाला जरी असला तरी त्याअगोदर सोडून जाण्यानं मतलबीपणाचे विनाकारण आरोप येतील.'' साधू हो म्हणाले. पुढे त्यांना काटेरी बुद्धिमत्ता असलेल्या एका अतिडाव्या मल्याळी सहसंपादकानं विनाकारण भरपूर त्रास दिला. टाइम्सची ऑफरही संपली होती. आता नोकरीच्या फंदात न पडता फक्त साहित्यनिर्मितीला वेळ द्यायचा आहे, असं त्यांनी मला सांगितलं. पुढे हृदयाचं दुखणं लागलं. कदाचित आर्थिक निकड असेल, साधूंनी वृत्तपत्रविद्या विभागाच्या संचालकपदाची वसंत गोवारीकरांची ऑफर स्वीकारली.


साधू पत्रकार म्हणून खूप चांगले होते. बातमीच्या शोधात खूप भटकंती करणारे हरहुन्नरी बातमीदार, असा त्यांचा लौकिक कधीच नव्हता. पण ताज्या घटनांचा संदर्भ मोठ्या कॅनव्हासवर विविध अंगांनी उलगडवून सांगण्यात, त्यांचा हातखंडा होता. ते नेत्यांवर व्यक्तिगत हल्ला सहसा करीत नसत. त्यांची पद्धत धूर्त उलटी होती. त्या नेत्यावरच्या सर्व आरोपांचा उल्लेख करून ते आधी रेकॉर्डवर आणायचे व नंतर असं जरी असलं तरी, त्या नेत्याच्या या या भरीव कामगिरींकडे दुर्लक्ष होणं, ठीक होणार नाही, अशी ती साळसूद मांडणी असे.

जे.जे. हॉस्पिटल औषध घोटाळा प्रकरणी न्यायमूर्ती बख्तावर लेंटिन यांच्या चौकशी आयोगाचा अहवाल आला. विधानसभा सुरू होती. तातडीनं अहवालाचा अभ्यास होणं सरकार वा आमदारांसाठीही अवघड असतं. साधूंनी त्याच दिवशी त्या अहवालाची चिरफाड करून, लोकप्रतिनिधी डेन्स-हेडेड म्हणजे मठ्ठ असतात, असले अनेक हस्तिदंती मनोऱ्यातले अभिप्राय देणाऱ्यास लेंटिन, व अहवालातील इतर दोष, यांना सोलून काढणारा लेख संपादकीय पानावर लिहिला. पट्टीबंध न्यायदेवतेला एवढा अहंकार चढावा, व तिनं कार्यपालिका व विधिमंडळाबद्दल एवढी तुच्छता ओकावी, यावर फाटक्या चौथ्या स्तंभातल्या सर्वात संयमी पत्रकारानं हल्लाबोल केला होता. एरवी, तुमचा पेपर कोण काळं कुत्रं वाचतंय, असं वेळोवेळी आम्हाला हिणवणाऱ्या, शुभ्रवस्त्रात लपेटलेल्या थोर-थोर नेत्यांमध्ये आमचा पेपर वाचून, त्यादिवशी शक्तिसंचार झाला व त्यांनी विधिमंडळ दणाणून सोडलं. साधना नीट असली, तर दर्भाच्या काडीतदेखील प्राण फुंकून तिचं ब्रह्मास्त्र बनवता येतं याचे उल्लेख, आपल्या प्राचीन ग्रंथांत आहेत. दोन-तीन जुजबी राजकीय कार्यकर्ते सोडले, तर मोठे नेते अरुण साधूंच्या अंतिमदर्शनात दिसले नाहीत, हे रितीप्रमाणे झाले. पत्रकारिता आणि समाजकार्य यात 'मी' आणि 'आभाराची फुले' कधीच शोधायची नसतात. ते अमंगळ असतं. चांगल्या, मोठ्या पत्रकारांच्या अंत्ययात्रेत एक ॲम्ब्युलन्सही पूर्ण भरत नाही. त्यामानानं साधू सुदैवी होते.

व्यक्तिगत आठवणी खूप आहेत, पण प्रत्येक मैत्रीत त्या फक्त अत्तराच्या कुप्यांगतच असतात. उघडल्या तर अत्तर उडून जातं. आपणही स्वार्थी असतो. उरलेलं आयुष्यभर त्या पुरवायच्या असतात. साधूंचे-माझे मतभेदही होत असत. तरी वारंवार भेटल्याशिवाय एकमेकांना चैन पडत नसे. मग मी निघताना, ते वहिनींना सांगत, ''अरुणा, मी प्रतापला खाली सोडून येतो. तेवढेच पाय मोकळे होतील.'' नाक्यावर एक सिगारेट घेऊन शिलगवायचे - पंचवीस वर्षांपूर्वी एक हार्ट ॲटॅक येऊन गेला होता तरीही! 'ए, माझ्या बायकोला सांगू नकोस हं हे!', ही वर तंबी. गप्पा संपत नसत. मी अनिच्छेनं काढता पाय घ्यायचो. न जाणो, दुसरी सिगारेट आली तर. आठवड्यातून एकदा तरी फोन व्हायचाच. तास-तास गप्पा. दोघांचेही मोडकळीला आलेले सेलफोन त्रास देत. मग आम्ही रिवाजाप्रमाणे दोघांनीही नवे सेलफोन घेण्याचा ठराव करायचो. गेल्या आठवड्यात असाच फोन केला. साधूंनी सेलफोन उचलला नाही. दुसऱ्या दिवशीही तेच. मग मी जयंत धर्माधिकारींना फोन केला, ''काहीतरी गडबड आहे. जरा माहिती घेतली तर बरं होईल.'' मी लॅंडलाईनवर फोन केला... साधूवहिनी म्हणाल्या - ''त्यांना ढास लागली आहे. बोलल्यानं त्रास वाढेल. जरा आराम पडला की, मीच लावून देईन फोन!'' आराम पडणं नव्हतं. आता बोलणंही होणं नव्हतं.

हा माणूस तोळामासा प्रकृतीचा. पण सतत काम करत राहणारा. कर्मयोगीच! निवृत्त कधी झालाच नाही. भेटीत नेहमी - हे करायचं राहिलं, ते करायचं राहिलं, वेळ पुरत नाही रे, अशी हमखास तक्रार करणारा. चारेक वर्षांपूर्वी म्हणाला - ''फारसं चालता येत नाही रे आता. स्टॅमिना गेलाय. डॉक्टरांनी केलेल्या ट्रीटमेंटमध्ये कोलेस्टरॉल जरा जास्तच कमी झालंय. म्हणून आता डॉक्टर म्हणताहेत तूप वगैरे भरपूर, अगदी दणकून खा.'' साधू नास्तिक जरूर होते, पण इतके चार्वाकपंथीय नव्हते की - ऋण करून तूप पीत बसावं. समजा कुणा वेड्यानं, अगदी लेखक-पत्रकारालाही, ऋण दिलं, तरी सत्तरी उलटल्यावर, अन् चालणंफिरणं बंद झाल्यावर, तूप पचवायला ताकद ती कितीशी असणार? किती वाढणार असा गुड कोलेस्टेरॉल? आपण सगळे गिनीपिग असतो, दुसरं काय? आता अरुण साधूंनी देहदान केलेलंच आहे. तेव्हा आता बसा करत संशोधन!

**- प्रताप थोरात**
भ्रमणध्वनी : ९८७०१०८३४५
prataphorat1@gmail.com




# असा 'साधू' आता होणे नाही!

▶ प्रवीण बर्दापूरकर

'अरुण साधू आता आपल्यात नाहीत' या सुदेश हिंगलासपूरकरनं पाठवलेल्या एसएमएसनं २५ सप्टेंबरची सकाळ उगवली. दिवसभरावर त्याच बातमीचं गडद मळभ दाटून राहिलं. नांदेडमधील कार्यक्रम त्याच मळभात कसेबसे आटोपून औरंगाबादच्या दिशेने प्रवास करताना अरुण साधू आठवू लागले. मी काही अरुण साधू यांच्या हाताखाली किंवा त्यांच्या सोबतही काम केलेलं नाही; त्यांच्या आणि माझ्या वयात एका पिढीचं अंतर आणि महत्वाचं म्हणजे, कर्तृत्वाच्या बाबतीत ते हिमालय तर मी त्या हिमालयाच्या पायथ्याचा एक खडाही असेन की नाही अशी स्थिती. खूप वेळानं जाणवलं, 'अरे! त्यांची जागा मेंटॉरची आहे... एक अदृश्य मेंटॉर.'

अरुण साधू यांची पहिली भेट बार्शीच्या साहित्य संमेलनात झाली. ते आणि कुमार केतकर ''ग्रंथाली'च्या स्टॉलसमोर उभे होते. अरुण साधू हे नाव तेव्हा खूप मोठं होतं. आणीबाणीचं समर्थन करतात म्हणून कुमार केतकरांबद्दल एक सूक्ष्मशी अढी माझ्या मनामध्ये होती. मात्र अरुण साधूंच्या लेखनाची भुरळ होती. तेव्हा मी 'सागर' या दैनिकासाठी काम करत असे. दोघांचीही ओळख करून घेतली. दोघांनीही आवर्जून चौकशी केली. त्या दोघांचे नंबर आणि पत्ते घेतले (तेव्हा ही पद्धत होती!) पण, गप्पा मात्र जास्त केतकरांशी झाल्या. केतकर आणि साधूंची पुस्तकं विकत घेऊन त्यावर त्या दोघांकडूनही सह्या घेतल्या.

पुढे मुंबईला गेल्यावर 'ग्रंथाली'च्या नायगावच्या कार्यालयात अरुण साधू यांना आवर्जून दोन-तीन वेळा भेटायला गेलो. अरुण साधू काहीतरी लिहीत आणि कुमार केतकर पुस्तकांची आवरासावर करत असायचे; असं त्या दोघांचं 'ग्रंथाली'साठी असणारं समर्पण थक्क करणारं होतं. (आता सांगायला हरकत नाही; आम्ही तरुण पत्रकार 'ग्रंथाली'चा उल्लेख तेव्हा 'मठ', दिनकर गांगल यांचा 'मठाधिपती', त्या मठाचे अरुण हे 'साधू' आणि केतकर म्हणजे 'महाराज' असा करायचो!) साधूंकडून मग आधी 'कोकण' आणि मी नागपूरला 'नागपूर पत्रिका 'या दैनिकात रुजू झाल्यावर विदर्भाबाबत चौकशा व्हायच्या.

''काय वाचता?'' असं एकदा अरुण साधूंनी विचारल्यावर मी पटपट मराठीतली काही नावं सांगितली तर त्यांनी विचारलं, ''इंग्रजीतलं काय?''

त्यांना इंग्रजीतली काही नावं सांगितली. त्यात जॉर्ज ऑर्वेल हेही नाव होतं. मी म्हणालो ''माझं सगळं शिक्षण जिल्हा परिषदेच्या मराठी शाळांमध्ये झालंय आणि तेही मराठवाड्याच्या अत्यंत ग्रामीण भागात. त्यामुळे इंग्रजी वाचायचा खूप कंटाळा येतो. अवघडही जातं.''

''तरीही तुम्ही ऑर्वेल वाचला?'' त्यांनी विचारलं.

''हो''. Animal Farm, १९८४ ही नावंही सांगितली. ''पण त्यासाठी डिक्शनरी खूपच फॉलो करावी लागली,'' असं मी तक्रारवजा स्वरात सांगितलं.

साधू, हलकसं हसले आणि म्हणाले ''एरिक सेगल, जेफ्री आर्चर वाचत चला. तुलनेनं इंग्रजी सोपं आणि समजायलाही सुबोध आहे. दररोज एक तरी इंग्रजी वृत्तपत्र वाचा आणि आवडीच्या बातम्यांपासून सुरुवात करत मग अग्रलेखाकडे वळा. हळूहळू सवय होईल इंग्रजीची.'' जेफ्री आर्चरची 'फर्स्ट अमंग इक्वल्स' आणि एरिक सेगलची 'मॅन वुमन अॅण्ड चाईल्ड' ही त्यांनी सांगितलेली नावं अजूनही आठवतात. त्यांच्याकडून बाहेर पडल्यावर फोर्टात जाऊन ती दोन्ही पुस्तकं लगेच विकत घेतली. नागपूरच्या परतीच्या रेल्वे प्रवासात त्यातल्या 'मॅन वुमन अॅण्ड चाईल्ड'चा फडशाही पाडला.

साधूंशी माझं आणखीन एक नातं जुळलं. १९८०-८१

च्या सुमारास राज्य विधिमंडळाचं वृत्तसंकलन करणारी जी पिढी बाजूला झाली किंवा बाजूला व्हायला सुरुवात झाली त्यात मुंबईतून अरुण साधू, विद्याधर दाते, दिनकर रायकर, मधु शेटे तर नागपुरातून दत्ता कवीश्वर, लक्ष्मण त्र्यंबक जोशी, युधिष्ठीर जोशी ही मंडळी होती. त्यांच्या जागी येणाऱ्यात मुंबईतून प्रकाश जोशी, प्रकाश अकोलकर, भरतकुमार राऊत, धनंजय कर्णिक, दिलीप चावरे तर नागपुरातून मी, सुधीर पाठक, मोरेश्वर बडगे असे काही पत्रकार होतो. बहुसंख्य नागपूरकर पत्रकारांचं विधिमंडळ वृत्तसंकलन नागपूरपुरतंच मर्यादित राहिलं. मी मात्र नागपूर आणि मुंबई असं शटल करत राहिलो. याच काळात अरुण साधूंशी ओळख वाढत गेली. विधिमंडळाचं रिपोर्टिंग कसं करायचं हे अनेकदा अरुण साधू आणि मधुकर भावे आम्हाला सांगत असत. पण, का कोण जाणे मी साधूंना जरा जास्तच प्रश्न विचारत असे, अनेकदा माझी कॉपीही दाखवत असे. माझी लिहिलेली बातमी बघून ते काही सूचना करत. याच काळात मुंबईतून 'मुंबई सकाळ'साठी राधाकृष्ण नार्वेकरांचे फोन येत असत. विधिमंडळातलं कामकाज फोनवरून सांगत असताना नार्वेकरही काही सूचना-सुधारणा करत असत. अरुण साधूंमुळे तारांकित आणि अतारांकित प्रश्न यातील भेद, लक्षवेधी सूचना, विधेयक, अध्यादेश, आदेश, निर्देश यांचे नेमके अर्थ आणि त्याचा वापर, ते केव्हा आणि कोण जारी करतं इत्यादी तपशील समजत गेले. विधेयक, कपात सूचनांवरील चर्चा ऐकण्याचं महत्त्व त्यांनीच समजावून सांगितलं.

तेव्हा नागपूरला वसंतराव लुले नावाचे एक कामगार नेते होते. बौद्ध धर्माची दीक्षा घेण्यासाठी १९५६ साली नागपूरला आल्यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर सीताबर्डीवरील ज्या हॉटेलात राहिले; त्या श्याम हॉटेलच्या मागच्या गल्लीत एका दुमजली वाड्यात पहिल्या मजल्यावरच्या दीड खोलीत वसंत लुले यांचा संसार आणि उरलेल्या अर्ध्या खोलीत त्यांचं कार्यालय होतं. ते 'चर्चा' नावाचं एक साप्ताहिक प्रकाशित करत. 'चर्चा'चा दिवाळी अंकही निघे. हा दिवाळी अंक म्हणजे चर्चा साप्ताहिकाचे वर्षभरातले काही अंक प्रकाशित करण्यासाठी आर्थिक तरतूद करण्याचा प्रयत्न असे. लुले यांचा माझ्यावर काय लोभ होता माहिती नाही पण, या दिवाळी अंकाचं म्हणजे, संपादकीय संस्कार, मुद्रित शोधन, पाने लावणे ही कामं ते माझ्यावर सोपवीत आणि त्यापोटी ५०० रुपये मानधन देत. तेव्हा ५०० रुपये ही फार मोठी रक्कम होती. हे काम सुरू केल्यावर मी पहिल्याच वर्षी अरुण साधू यांना कथा मागितली आणि त्यांनी ती दिलीही; एवढंच नाही तर मानधनही घेणार नाही असं सांगितलं आणि पुढे चार-पाच वर्षं कथा देताना मानधन न घेण्याचा शब्द पाळलाही! मदत करण्याचा साधूंचा हा निःशब्द गुण मला खूपच भावला. पुढे कळलं की, लुले त्यांचे जुने स्नेही



होते; म्हणजे एकाच दगडात दोन पक्षांना समाधान देण्याचा चाणाक्षपणा साधूंनी दाखवलेला होता!

अरुण साधूंचं मूळ विदर्भातलं; यवतमाळ जिल्ह्यातलं. दरम्यान आप्तजन चरितार्थासाठी नागपूरला स्थायिक झालेले होते. त्यामुळे वर्षातून साधूंच्या एक-दोन तरी चकरा नागपूरला होत. त्यामुळे पुढे भेटी थोड्याशा नियमित होत गेल्या; घसट थोडी वाढतच गेली; मात्र आमच्यात कौटुंबिक स्नेह निर्माण झालाच नाही. त्यांचा फोन येत असे आणि ते प्रताप नगरच्या चौकात येऊन उभे राहत. मग माझ्या कारमधून आम्ही कुठेतरी फिरत असू. ते फिरणं निरर्थक असे परंतु गप्पा होत. साधू शंभर टक्के अबोल होते असा काही माझा अनुभव नाही. ते बऱ्यापैकी मोकळे होते; छान गप्पा मारत. मात्र निर्विवाद मोठा कादंबरी-कार, इंग्रजी-मराठीत समर्थपणे लिहिणारा पत्रकार असा काही तोरा त्यांच्या बोलण्या-वागण्यात किंचितही नसे. विशेषतः राजधानीच्या ठिकाणी काम करणाऱ्या पत्रकारांत जगातली सर्व माहिती आणि शहाणपणाचं कंत्राट घेतल्याचा भाव असतो; तसं काही अरुण साधू यांच्यात नव्हतं. टोकाचा संयम बाळगत समोरच्याचं म्हणणं ऐकून घेण्याची सहिष्णुता त्यांच्यात होती. मीही अल्पशी अक्कल त्यांच्यासमोर मोठ्या धाडसाने पाजळत असे. काही वेळा ते म्हणत, ''तुमची निरीक्षणं छान आहेत. कारण तुम्ही ग्राउंड लेव्हलला काम

करता.'' मला बरं वाटत असे. कदाचित असं म्हणून ते माझ्या बडबडीला आळा तर घालत नव्हते ना, असं अशात वाटू लागे. दरम्यान साधूंचं लेखनही वाचनात येत गेलं. कादंबरी, कथा, वैचारिक लेखन, अनुवाद... असा त्यांचा आवाका थक्क करणारा होता. त्यानिमित्तानंही बोलणं व्हायला लागलं. ते फारच मोठ्या उंची आणि ताकदीचे कादंबरीकार होते; पात्र एस्टॅब्लिश करण्याची त्यांची हातोटी आचंबित करणारी होती. आठवा 'मुंबई दिनांक', 'सिंहासन' मधली पात्रांची गर्दी तरी त्या पात्रांनी घातलेली मोहिनी! साधूंच्या कमी बोलण्याचं कारण सूक्ष्म निरीक्षण शक्तीवर भर हे असावं. त्यातून ही पात्रं शब्दात उतरली आणि वाचकांना त्या पात्रांची भुरळ पडली असावीत. ''तुमची पात्र द्विधा मनस्थितीत असतात'' असं मी एकदा त्यांना म्हणालो तेव्हा त्यांनी काहीच उत्तर दिलं नाही. फक्त ते चष्म्याआडच्या डोळ्यांतून हलकेच हसल्याचा भास झाला.

संपादक म्हणून अरुण टिकेकरांचं पर्व सुरू झाल्यापासून अरुण साधू 'लोकसत्ता'त अतिशय नियमित लिहू लागले. अनेकदा ते नागपूरला येत तेव्हा त्यांचं लेखन अपूर्ण असे किंवा त्यांना पूर्णच मजकूर लिहायचा असे. त्यांचा सकाळी फोन येत असे आणि त्यांनी केलेलं लेखन मी कार्यालयात जाऊन ते ऑपरेट करून घेत असे. नंतर साधू ते लेखन घेऊन किंवा पूर्ण लेखन करण्यासाठी माझ्यासोबत कार्यालयात येऊ लागले. हस्ताक्षर हळूहळू बिघडत चाललंय, असं त्यांचं मत होतं, ते संगणकावर टंकलेखन करणाऱ्याला समजेल का नाही याविषयी शंका असल्यानं मजकूर ऑपरेट होईपर्यंत साधू थांबत, मग मुद्रितशोधन करून देत. या काळात अनेकदा साधू कार्यालयातील माझ्या टीममधल्या मुलांशी गप्पा मारत. ती मुलं इतकी लहान पण, साधू त्यांचं म्हणणं लक्ष देऊन ऐकत. एवढा मोठा माणूस आपल्या कार्यालयात येतो, रिपोर्टिंगच्या वर्क स्टेशनवर बसतो आणि काम करतो याचं मोठं अप्रूप वाटत असे.

'लोकसत्ता'च्या निवासी संपादकपदाची सूत्र मी हाती घेतल्यावर अरुण साधू नागपूरला आले. नेहेमीप्रमाणे त्यांचा सकाळी फोन आला आणि ते आवर्जून कार्यालयात आले. त्यांना मला संपादकाच्या खुर्चीत बघायचं होतं. मला ते फारच भारी वाटलं. एवढा मोठा माणूस त्यांच्या आणि माझ्या वयातलं तेरा-चौदा वर्षांचं अंतर लक्षात घेता आपल्याविषयी इतकी सद्‌भावना बाळगतो ते खूपच भरून येण्यासारखं का नसावं? अरुण साधूंना घेऊन कार्यालयात आलो. त्यांना संपादकाच्या खुर्चीत बसण्याची विनंती केली पण, त्यांनी नकार दिला. मी मुख्य वार्ताहर असताना ते कार्यालयात येत तेव्हाही बाजूच्या खुर्चीत बसत. हा असा दुसऱ्याचं स्थान मान्य करण्याचा त्यांच्यातला उमदेपणा दाद देण्यासारखा होता. अरुण साधूंमध्ये लपलेलं साधेपण आणि त्याआडचा मोठेपणा हळूहळू पण तुटक-तुटक मनावर उमटत गेला.

मुंबईतून नागपूरला वृत्तसंकलनासाठी येणाऱ्या अनेक इंग्रजी पत्रकारांकडे अरुण साधू माझ्या नावाची शिफारस करत. नागपूरला आले की हे पत्रकार आवर्जून भेटत. मग मी त्यांच्यासोबत फिरत असे. त्यांच्यासोबत फिरताना राज्याचा दृष्टिकोन, त्यांची काम करण्याची शैली, त्यांची भाषा याचं ते एक प्रकारचं शिक्षण होतं. हे तेव्हा नाही पण, सिनियर पोझिशनला गेल्यावर लक्षात आलं. पत्रकारितेचा हा संस्कार अशा अदृश्यपणे वेगवेगळ्या माध्यमातून अरुण साधूंच्यामुळे माझ्यावर होत गेला.

समोरच्याला जमिनीवर आणण्यासाठी 'पंच' मारण्याची अरुण साधूंची शैली हटके होती. माझा 'डायरी' हा स्तंभ लोकप्रिय होत गेला. त्यावर, ''चांगलं लिहिताय. आता मोठ्या लेखनाचा विचार करा'', असं ते म्हणाल्यावर मी म्हणालो, ''मी स्वतःला लेखक-बिखक समजत नाहीये. हे लेखन काही तुमच्यासारखं सर्जन नाहीये. पत्रकारितेतले अनुभव ललित शैलीत आजवर कोणी लिहिले नाहीत. मी लिहितोय म्हणून त्याचं कौतुक आहे, बस्स इतकंच.''

तेव्हा साधू त्यांच्या परिचित शैलीत मंदसे हसले आणि त्यांनी शालजोडीतून हाणताना म्हटलं, ''तुमचं म्हणणं बरोबर आहे; महत्त्वाचं म्हणजे ते तुम्हाला समजलंय हे जास्त महत्त्वाचं आहे. पण हे लेखन सुरू ठेवा. हेही लेखन आवश्यक आहे. ते साहित्य आहे का नाही? हे नंतर ठरेल.'' 'ग्रंथाली'ने प्रकाशित केलेल्या माझ्या 'नोंदी डायरीनंतरच्या' पुस्तकाला लिहिलेल्या प्रस्तावनेतही त्यांनी अनेक 'पंच' मारले आहेत.

माझ्या मनात एका स्त्रीप्रधान राजकीय कादंबरीचा विषय अनेक वर्षांपासून घोळतो आहे. तीन-चार वेळा लिहिण्याचा प्रयत्नही केला पण अरुण साधूंचा प्रभाव जाईचना. हे प्रभाव-प्रकरण एकदा मी साधूंना सांगितलं, ''अजून मराठी राजकीय कादंबरी तुमच्यापुढे सरकलेलीच नाहीये.'' तर ते म्हणाले, ''जागतिकीकरण, खुली अर्थव्यवस्था, निवडणुकांची इव्हेंट झालीये. तेव्हा आणि आताच्या राजकारणाचे सगळेच संदर्भ बदलले आहेत, निवडणुकीचा बाज पूर्ण बदलला आहे.'' मग खास साधू शैलीतला पंच आला, ''प्रयत्न करा पुन्हा, पुन्हा.'' मग हसत पुढे म्हणाले, ''माझ्या कादंबरी लेखनाबद्दल तुम्हाला वाटतं तसं मराठी साहित्य जगताला मात्र वाटत नाही.'' त्या हसण्यात सल जाणवली. 'जनस्थान' सन्मान प्राप्त झाल्यावर त्यांच्या मनातली ही सल दूर झाली असावी.

अरुण साधू ठाम असत. एक प्रसंग आठवतो - अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे वारे नागपुरात वाहू लागले होते. एक दिवस भास्कर लक्ष्मण भोळे आणि मी बोलत असताना अरुण साधूंना अध्यक्ष करु या, असं आमच्या बोलण्यात आलं. मग तिथूनच मी अरुण साधूंना फोन केला.




भोळेही बोलले. अरुण साधूंनी थेट नकार दिला नाही पण, 'थोडंस थांबा' असं ते म्हणाले. मग आम्ही विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष मनोहर म्हैसाळकरांना हे सांगितलं. म्हैसाळकर नेहेमीप्रमाणे गूढ हसले आणि म्हणाले, ''साधूंच्या नावाला विदर्भातून एकमुखी पाठिंबा मिळणार नाही.'' ते स्वाभाविक होतं. साधूंचा स्वतंत्र विदर्भाला असलेला विरोध जगजाहीर असल्यानं विदर्भवादी मंडळी त्यांना मतदान करतील याची खात्री नव्हती. पण मनोहर म्हैसाळकरांनी पाठिंबा देण्याचं कबूल केलं. काही दिवसांनी पुन्हा साधूंना फोन केला. या काळात ते बहुधा महाराष्ट्रातल्या त्यांच्या काही मित्रांशी बोलले असावेत. अरुण साधू जरा दरडावणीच्या अपरिचित स्वरात म्हणाले, ''हे बघा बर्दापूरकर, माझी पहिली अट अशी की, निवडणुकीसाठी मी प्रचार करणार नाही. प्रचाराचं पत्रकसुद्धा काढणार नाही. महत्त्वाचं म्हणजे माझी संयुक्त महाराष्ट्राची भूमिका मुळीच सोडणार नाही.'' त्यांच्या म्हणण्याचा संदर्भ माझ्या लगेच लक्षात आला. मी त्यांना म्हणालो की, 'पत्रकारांना यासंदर्भात कायमचं गप्प करता येणार नाही पण, शक्यतो तुम्ही स्वतःहून बोलू नका. हा विषय ताणला जाऊ नये असं मला वाटतं.'' ते अखेर साधूंनी मान्य केलं. मग भास्कर भोळेही त्यांच्याशी सविस्तर बोलले. यथावकाश अरुण साधूंचं संमतीपत्र आलं.

भास्कर लक्ष्मण भोळे सूचक आणि मी अनुमोदक असा अरुण साधूंचा उमेदवारी अर्ज रीतसर दाखल झाल्यावर दोन-तीन दिवसांनी मुंबई आणि औरंगाबादहूनही अरुण साधू यांच्या उमेदवारीचे अर्ज दाखल झाले. मराठवाडा साहित्य परिषदेत दाखल झालेल्या अर्जावर दिग्गज समीक्षक डॉ. सुधीर रसाळ यांची सही होती. साधूंच्या उमेदवारीला यामुळे बळच मिळालं. साधू प्रचारासाठी फिरले पण त्यांनी प्रचार केलाच नाही. त्यांच्यासोबत असलेलं कुणीतरी अरुण साधू निवडणुकीला उभे आहेत तुम्ही मतदान करा असं सांगत असे. अध्यक्षपदाचे उमेदवार म्हणून मतदारांच्या गाठीभेटीसाठी अरुण साधू नागपूरला आल्यावर प्रथेप्रमाणे पत्रकार परिषद झाली. पत्रकारांना आधीच मिन्नतवाऱ्या करून कृपा करुन स्वतंत्र विदर्भाच्या संदर्भातील प्रश्न विचारू नका असं तयार केलेलं होतं. बऱ्याच वर्षांनंतर पत्रकार परिषद मी मागच्या बाकावर बसून अनुभवली. पत्रकार परिषद संपली आणि मी आणि भोळेंनी सुस्कारा सोडला.

पण, हे इथे संपायचं नव्हतं.

अरुण साधू प्रचारासाठी येऊन गेले आणि विदर्भाचा मुद्दा निघाला नाही हे काही विदर्भवाद्यांना रुचलं नाही. मग त्यासंदर्भात नेहमीप्रमाणे बरीच वृत्तपत्रीय वादावादी सुरू झाली. त्या काळात बहुतेक दररोज सकाळी मी प्रकाशित बातम्यांची माहिती साधूंना देत असे. त्यावर फारशी काही प्रतिक्रिया ते व्यक्त करत नसत. हळूहळू स्वतंत्र विदर्भ आणि अरुण साधू विरोध वृत्तपत्रातून बराच वाढतोय असं लक्षात आलं. तेव्हा एकदा भास्कर लक्ष्मण भोळे, मनोहर म्हैसाळकर आणि मी भेटलो. पण मनोहर म्हैसाळकरांनी आश्वस्त केलं की, विदर्भाची कमीत कमी पासष्ट ते सत्तर टक्के मतं अरुण साधूंनाच मिळतील. मराठवाडा अरुण साधूंच्या बाजूने होता. मुंबई आणि पुण्यातूनही अरुण साधूंना भरघोस पाठिंबा होता. त्यामुळे अरुण साधू यांच्या

विजयाबद्दल दुमत होण्यात काहीच कारण नव्हतं. सांगितल्याप्रमाणे खरंच अरुण साधूंनी पत्रक काही काढलं नाही. मीच एक मसुदा तयार करून दिनकर गांगल यांच्याकडे पाठवला. बहुधा गांगलांनीच प्रचाराचा अंतिम मसुदा तयार केला.

अपेक्षेप्रमाणे अरुण साधू यांचा दणदणीत विजय झाला. संमेलनासाठी अध्यक्ष म्हणून साधू नागपूरला आले. साधूंचा साधेपणा असा की, ते ना हॉटेलमध्ये उतरले ना त्यांनी महामंडळाचं वाहन घेतलं. दुसऱ्या दिवशी सकाळी संमेलनस्थळाला नियोजित अध्यक्षांनी भेट दिली. तिथे अर्थातच पत्रकार जमलेले होते. व्यासपीठाचं अवलोकन करून अरुण साधू खाली आले. पत्रकार परिषदेची तयारी होती. विदर्भाचा मुद्दा न निघता पत्रकार परिषदही जवळजवळ पार पडली. सगळेजण खुर्चीतून उठण्याच्या तयारीत होते आणि तेवढ्यात तो स्वतंत्र विदर्भाचा मुद्दा आलाच! उठण्याच्या तयारीत असलेले अरुण साधू पट्कन खाली बसले. मृदू आवाजात पण अत्यंत ठाम स्वरात त्यांनी संयुक्त महाराष्ट्राची भूमिका मांडली. स्वतंत्र विदर्भाला असलेला विरोध स्पष्ट केला आणि 'संमेलन नागपूरला होत असलं तरी माझ्या या भूमिकेत कोणताही बदल होणार नाही' हेही जाहीर करून टाकलं! मग पत्रकार परिषदेमध्ये बरीच खडाजंगी झाली. मी मागे बसून गपगार होऊन हे पाहत होतो. कुणालाही न बधता सस्मित अरुण साधू त्यांच्या भूमिकेवर ठाम होते.

संमेलन सुरू झालं. स्वतंत्र विदर्भाचा पुरस्कार करणारी मंडळी काही शांत बसली नव्हती. खुल्या संमेलनात एक स्वतंत्र विदर्भाच्या मागणीचा ठराव असावा अशा हालचाली सुरू झाल्या. पत्रकारांनी पुन्हा अरुण साधूंना गाठलं. अरुण साधूंनी अतिशय परखडपणानं सांगितलं की, स्वतंत्र विदर्भाचा ठराव खुल्या संमेलनात संमत होणार असेल तर मी खुलं संमेलन सोडून निघून जाईन आणि एकदम शांतता पसरली. पुढे काही लोकांच्या मध्यस्थीने (त्यात मनोहर म्हैसाळकरांचा विशेष पुढाकार होता) स्वतंत्र विदर्भाचा ठराव काही खुल्या संमेलनात चर्चेला आला नाही आणि संभाव्य रणकंदन टाळलं.

नंतरचं हे साहित्य संमेलन सांगलीला झालं. तिथे उद्घाटनासाठी तेव्हा राष्ट्रपती असलेल्या प्रतिभा पाटील येणार होत्या. प्रतिभा पाटील राष्ट्रपतीपदी होत्या त्यामुळे त्यांच्याबद्दल नकारात्मक काही बोलणं अशिष्ट ठरेल, पण त्यांच्या शिष्टाचाराचा जो अतिरेक आला तो काही कुणाही सुसंस्कृत माणसाला रुचणारा नव्हता. खरं तरं, प्रतिभाताईंनी स्वतःच पुढाकार घेऊन प्रशासनाला सांगायला हवं होतं, पोलिसांना सूचना द्यायला हव्या होत्या की, साहित्य संमेलनाचे विद्यमान आणि माजी अध्यक्ष तसंच ज्येष्ठ सारस्वतांना सुरक्षेच्या कडेकोट अटींचा त्रास होऊ देऊ नका परंतु, प्रतिभाताईंनी काही असं सौजन्य दाखवलं नाही. पोलिसांनी नियमानुसार कठोर भूमिका घेऊन राष्ट्रपती ज्या व्यासपीठावर येणार आहेत आहे तेथपासून ३०० का ४०० मीटर पलीकडे सर्वांची वाहनं उभी करावीत आणि तेथून पायी चालत यावं आणि राष्ट्रपती येण्याच्या पंधरा मिनिटं आधी सर्वजण व्यासपीठावर हजर असलेच पाहिजेत अशा अटी टाकल्या. राष्ट्रपतींच्या शिष्टाचारानुसार ते योग्य असलं तरी त्यामुळे, सारस्वतांचा मान राखला जात नव्हता. साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावर सारस्वत स्वभाविकपणानं कुठल्याही सरकारी पदापेक्षा मोठे होते. मराठी सारस्वतांना प्रशासनाकडून घातलेल्या अटी अत्यंत जाचक आणि अपमानास्पद वाटल्या. त्या विरुद्ध एकटे उभे राहिले ते अरुण साधू. त्यांनी त्या अटी स्वीकारण्यास स्पष्ट नकार दिला आणि साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाची सूत्रं देण्यासाठी ते संमेलनस्थळी आलेच नाहीत. मावळत्या अध्यक्षांकडून सूत्रे स्वीकारली न जाण्याची अभूतपूर्व घटना सांगलीत घडली. संमेलनस्थळी तर सोडाच, सांगलीकडे त्यांनी वळूनही बघितलं नाही. साधू अनाग्रही होते असं नेहमीच म्हटलं गेलं पण त्याच वेळी ते भूमिकांबाबत कसे ठाम होते याचंही हे उदाहरण आहे. तरी 'सिंहासन' या कादंबरीला पुरस्कार देण्याची शिफारस सरकारने नाकारली तेव्हा साधू गप्प का राहिले, हे कधी कळलं नाही.


तत्कालीन पुणे विद्यापीठात शिकवत असताना जातीच्या नावाखाली जे काही घडलं तेव्हा पुण्यातील तथाकथित पुरोगामी आणि सर्व सहकारी एकदिलाने आणि ठामपणे पाठिशी उभे राहिले नाहीत, हीदेखील खंत ती सर्व हकीकत सांगताना अरुण साधू यांनी व्यक्त केली होती.

अशात, म्हणजे २०१४ नंतर आमची भेट झाली नाही, केवळ फोनवर बोलणं व्हायचं. 'बब्रुवान रुद्रकंठावार'च्या पुस्तकाला अरुण साधू यांनी लिहिलेली प्रस्तावना अप्रतिम आहे, त्यावरून पाच-सहा महिन्यांपूर्वी फोनवर आमचं सविस्तर बोलणं झालं होतं. नयन बाराहाते आणि संदीप काळे संपादित करत असलेल्या 'संपादकांची आई' या प्रकल्पासाठी लिहावं ही विनंती करण्यासाठी अशात आमचं बोलणं झालं, ते शेवटचं. लिहिण्याचं साधूंनी मान्य केलं होतं. ते लिहिलं का नाही, हे कळलं नाहीये.

किती लिहावं? अरुण साधू यांची अशी अनेक स्मरणं मनात बसलेली आहेत.

– असा 'साधू' आता होणे नाही!

**– प्रवीण बर्दापूरकर**
भ्रमणध्वनी : ९८२२०५५७९९
praveen.bardapurkar@gmail.com




# परग्रहावरचा माणूस

▶ कुमार केतकर

वरवर वरवर शांत, वा स्थितप्रज्ञ, वा आत्ममग्न भासणारे वा दिसणारे अरुण साधू कट्टर नास्तिक होते, कठोर बंडखोर होते आणि कमालीचे निग्रही होते. पण यांपैकी काहीच त्यांच्या चेहऱ्यावर, सभ्य वागणुकीत आणि हळू वा अस्पष्ट संवादातून जाणवत नसे. असे असूनही त्यांना विनोदाचे, विडंबनाचे, छद्मीपणाचे विलक्षण आकर्षण होते, पण त्यांच्या विनोद-विडंबनात विखार नसे. त्यांच्या या वेगळ्याच शैलीच्या छटा प्रकर्षाने 'पडघम' नाटकात आढळतात आणि बारकाईने त्यांच्या कथा-कादंबऱ्या आणि प्रस्तावना वा परीक्षणे वाचल्यास आपल्याला जाणवतात. बहुतेक पत्रकारांमध्ये असलेला शंकाखोरपणा, सौम्य पदर असलेला सिनिसिझम आणि आजूबाजूच्या वास्तवाकडे पाहून येणारा नैतिक प्रक्षोभ हे सर्व त्यांच्या लिखाणामध्ये आणि वागण्यामध्ये, गप्पा-चर्चांमध्ये आणि भाषणांमध्ये अभिव्यक्त होत असे.

खरे म्हणजे अरुण साधूला वरीलप्रमाणे 'बहुमानार्थी' पद्धतीने संबोधणे हे बरेच औपचारिक आणि काहीसे अस्वाभाविक आहे. त्यामुळे त्याला 'एकारार्थी'त आणल्याशिवाय मला सहजपणे लिहिता येणार नाही.

माझी आणि त्याची ओळख झाली १९७३-७४ मध्ये. तेव्हा सुरुवातीस मी 'टाइम्स ऑफ इंडिया' ग्रूपच्या संदर्भ/संशोधन विभागात रुजू झालो होतो आणि त्यानंतर वर्ष-दोन वर्षांत मी 'इकॉनॉमिक टाइम्स'चा वार्ताहर म्हणून काम करू लागलो. साधू 'टाइम्स'चा वार्ताहर. आम्ही एकाच मजल्यावर पण वेगवेगळ्या हॉल्समध्ये. साधूचे सहकारी म्हणजे विद्याधर दाते आणि भा.म. पुरंदरे. आम्ही तिसऱ्या मजल्यावर आणि दिनकर गांगल, अशोक जैन 'महाराष्ट्र टाइम्स'मध्ये दुसऱ्या मजल्यावर. गांगल, जैन हे दोघेही साधूचे जुने मित्र/सहकारी. ते तिघेही पुण्यात असतानाचे.

मी आणि साधू अनेक वेळा 'रिपोर्टिंग असाईनमेण्ट्स'वर एकत्र जात असू. खूपवेळा मंत्रालयात. मंत्रालयापासून टाइम्सपर्यंत संध्याकाळी चालत, गप्पा मारत, फुटपाथवरील पुस्तके पाहात आणि कधी 'न्यू एम्पायर'मध्ये चहा पिऊन आपापल्या कचेरीत येत असू. साधू टाईपरायटरवर बसला की जॉन वेन वा यूल ब्रायनरच्या घोडदौडीपणे बातमी टाईप करत असे. न्यूजप्रिंट-कार्बनच्या त्या टाईपरायटर काळात आणि डगमगणाऱ्या वेताच्या खुर्चीत बसून तो त्याची बातमी धाडधाड टाईप करीत असे. तरीही त्या वेगात त्याची शैली व आशयावरची पकड सुटत नसे. साडेसात-आठपर्यंत बातमीचे पत्रकार्य संपवून मी, गांगल आणि साधू न्यू एम्पायर या इराणी रेस्टॉरंटच्या 'ओपन स्पेस' भागात चहा आणि खारी आणि विल्स सिगारेटबरोबर गप्पांमध्ये एक-दोन तास सहज निघून जात. अनेक वेळा आमच्याबरोबर के.डी. नाईक असे. तो टाइम्स ऑफ इंडियातला 'काळपुरुष' म्हणता येईल. साधारणपणे १९६१-६२ पासून ते १९९८-९९ पर्यंत तो 'न्यूज स्टोर्स' विभागात होता. 'ओल्ड लेडी ऑफ बोरीबंदर' बरोबर युनियनचा कॉम्रेड-कार्यकर्ता म्हणून तो सर्व आतल्या बातम्या घेऊन येत असे. उत्तम वाचक आणि बहुश्रुत कार्यकर्ता या त्याच्या वैशिष्ट्यांवर साधू फिदा असे.

त्यावेळी मी, के.डी. नाईक, आमचे मित्र सुरेश लोटलीकर, वसईचे जयसेन पाटील, राजा पटवर्धन असे काही जण 'सत्यचित्र' नावाचे पाक्षिक-लघुनियतकालिक चालवीत असू. त्यामुळे गंगाधर गाडगीळांपासून नारायण सुर्वेपर्यंत आणि ज्ञानेश्वर नाडकर्णींपासून अशोक रानडेंपर्यंत अनेक मराठी साहित्यिक सेलेब्रिटींना भेटत असू. 'मुंबई दिनांक' कादंबरी ७३-७४ चीच. 'सत्यचित्र' पाक्षिकात छाया दातारांनी साधूच्या पुस्तकाचे परीक्षण केले होते. ते के.डी. नाईकांनी साधूला नेऊन दिले आणि त्या परीक्षणाची व कादंबरीचीही सविस्तर समीक्षाही केली! साधू

चांगलेच प्रभावित झाले होते कारण 'मुंबई दिनांक' मधील कामगार चळवळ, जॉर्ज फर्नांडिस उर्फ डीकास्टा हे सर्व केडीच्या कामगार चळवळीतील आयुष्याचा भाग होते.

साधूंचे नाव साहित्यिक वर्तुळात जरी तेव्हा गाजू लागले असले तरी वाचक, तरुण कार्यकर्ते पत्रकार यांच्यात त्याचे नाव अगोदरपासून प्रचलित होते. मुख्यतः 'माणूस' साप्ताहिकामुळे आणि श्री.ग. माजगावकर यांच्या सर्जनशील संपादत्वामुळे. गावोगावचे तरुण साधूच्या 'चे फीडेल आणि क्रांती'चे सामूहिक वाचन करीत असत. 'ड्रॅगन जागा झाला' या माओप्रणित क्रांतीचा इतिहासही या तरुणांमध्ये चर्चिला जात असे. बहुतेकांनी साधूला पाहिलेले नव्हते, पण त्या तरुणांच्या दृष्टिकोनातून अरुण साधू हाच चे, फीडेल आणि माओचा प्रतिनिधी होता.

माझी आणि साधूची ओळख झाली तेव्हा त्याच्या नावाला हे क्रांतीचे, बंडखोरीचे, डावेपणाचे वलय होते. 'सत्यचित्र'ची भूमिका त्या 'मूड'शी जुळणारी होती. त्यामुळे आमचे सूर लगेचच जुळले. त्या काळी 'सेलेब्रिटी' नावाची आजची संकल्पना नव्हती. पण आमच्याबरोबर 'न्यू एम्पायर'मध्ये असणारे साधू आणि गांगल हेच तसे वलयांकित! गांगल रविवार महाराष्ट्र टाइम्सचे काम पाहत असल्यामुळे त्यांनाही सेलेब्रिटीसदृश स्टेटस होते. सरोजिनी वैद्य, विजया राजाध्यक्षांपासून ते विजय तेंडुलकर, सत्यदेव दुबे, जब्बार पटेल असे दिग्गज कलाक्षेत्रातले नामवंत आणि पुष्पा भावे, ज्ञानेश्वर नाडकर्णी, सदानंद रेगे अशी मंडळी गांगलांच्या दरबारात असत. जरी गोविंद तळवलकर हे 'लेजंडरी' संपादक होते तरी गांगलांचा दरबार हा समांतर आणि तितकाच 'पॉवरबाज' होता. 'मटा'मध्ये आणखी एक संस्थान होते ते अशोक जैनचे. तमाम लेखक, कवी आणि होतकरू वा प्रथितयश मंडळी अशोक जैनांची 'अंकित' होती. अशोकचे जिवलग मित्र श्रीकांत लागू. त्यांना 'मोतीवाले' या बिरुदापेक्षा कलासक्त नाटकवाले म्हणूनच अधिक लोक ओळखत असत. अशोकची बायको सुनीती हिचेही एक 'मिनी संस्थान' मंत्रालयात होते.

मराठी साहित्यविश्वाचे व्हॅटिकन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या 'सत्यकथा'चा (म्हणजे 'मौज' समूहाचा खटाववाडीतील) दबदबा जेव्हा सर्वदूर व्यापून होता तेव्हाच 'मटा'चे एक स्वतंत्र, सार्वभौम साम्राज्य होते. 'मटा'ला टाइम्स ऑफ इंडिया ग्रूपचा बॅनर असल्यामुळे गांगल-जैनांच्या उपसंस्थानांना विशेष झळाळी होती. साधू 'टाइम्स'मध्ये आणि मी 'इकॉनॉमिक टाइम्स'मध्ये त्यामुळे त्या दृष्टीने आम्ही या साम्राज्यातील सामान्य घटक, पण साधू साहित्यिक-पत्रकार म्हणून नावारूपाला आल्यावरसुद्धा (म्हणजे १९७७ मध्ये 'सिंहासन' प्रसिद्ध झाल्यावर आणि त्या कादंबरीचा प्रचंड गाजावाजा झाल्यावरही) प्रस्थापित साहित्यिकांच्या बैठकींमध्ये, गॉसिप-गप्पांमध्ये वा वर्तुळांमध्ये साधू कधीच नसत.

आपण एक प्रथितयश लेखक आहोत आणि हजारो तरुणांचे 'आयकॉन' आहोत याचे साधूला भानच नसे. म्हणून लाल डब्यांच्या एसटीमधून आम्ही अनेकदा एकत्र प्रवास केला, 'ग्रंथाली'च्या पुस्तकांचे गठ्ठे खांद्यावरून वाहून स्टॉलवर आणले, वाचकदिनाच्या दिवशी खुर्च्या लावल्या वा सतरंज्या हंतरल्या. बाहेरूनच काय मुंबईतील कित्येकांना 'हे साधूच आहेत' हे माहीत नसे. ते त्यांना भेटायला/बघायला/त्यांची सही घ्यायला आलेले असत. ते आम्हाला विचारीत की 'साधूंना कुठे भेटता येईल? ते कधी येणार आहेत?' आम्ही त्या साधू अनुयायांना सांगत असू की स्टेजवर खुर्च्या लावत आहेत तेच अरुण साधू! साधूचा हा साधेपणा त्याच्या देखाव्याचा वा मुद्दाम दूर राहण्याचा भाग नव्हता. तोच त्याचा स्वभाव होता. शरद पवार असो वा सुशीलकुमार वा एसेम वा बाळासाहेब ठाकरे- सर्वजण या साधेपणाकडे पाहून दिङ्मूढ होत असत!

'ग्रंथाली'च्या अगदी सुरुवातीच्या वर्षात आमच्या अगदी शेकडो नाही पण कित्येक बैठका महाराष्ट्रात अनेक ठिकाणी होत असत. धुळे-नंदूरबारपासून ते नाशिक, कोल्हापूर-चिपळूणपर्यंत. गांगल, साधू आणि मी (कधी कधी फक्त मी आणि गांगल तर कधी फक्त मी आणि साधू) आमच्याबरोबर अनेक वेळा सुदेश हिंगलासपूरकर. सुदेशचे कुटुंबच 'ग्रंथाली' परिवाराचा भाग होते.

साधूचा दादरचा अड्डा डॉ. अनिल वाकणकरच्या पॅथॉलॉजी लॅबमध्ये. तेथे प्रा. साखळकरांपासून सुनील दिघेंपर्यंत, वि.वि. करमकरांपासून सुरेश लोटलीकरपर्यंत अनेक जण साधूला गाठत असत. अशा अनौपचारिक ठिकाणी साधू दिलखुलास गप्पा मारत आणि अगदी किस्सेही सांगत. (त्याला अबोल व बुजरा म्हणून ओळखणाऱ्यांना हा साधू अनोखा वाटे. प्रत्यक्षात तो मितभाषी व बुजरा होता हे खरेच!)

एकदा खंडाळा-लोणावळ्याला 'ट्रीप' वजा मिटींगला आम्ही बरेच जण गेलो होतो. १९७६ किंवा १९७७ मध्ये. शेफाली आणि सुवर्णा अगदी लहान होत्या. शेफाली तर शारदाच्या कडेवर बसूनच असे. सुवर्णा (मना) इतकेच काय अरुणाही स्त्री-मुक्ती संघटनेत सामील झाली होती. अरुणाने तर ज्योती म्हापसेकरच्या 'मुलगी झाली हो' नाटकातही काम केले. अरुण आणि अरुणा दोघेही स्त्रीमुक्ती यात्रेत सामील झाले होते.

प्रतिष्ठित साहित्यिक शिवाजी पार्क, हिंदू कॉलनी, माटुंगा, विलेपार्ले अशा विभागात राहत असत. 'साहित्य सहवास' नावाची या मंडळींची बांद्रा येथील 'वसाहत' तयार झाल्यावर या वर्तुळांना एक 'वर्गीय आणि वर्णीय' परिमाण लाभले होते. मटा, सत्यकथा, ललित ही त्यांची मुखपत्रे. त्यांपैकी काहींचा अड्डा म्हणजे एशियाटिक. एशियाटिकमधील संस्थानाच्या सम्राज्ञी म्हणजे दुर्गा भागवत. त्या 'भागवती' परिवारात अशोक शहाणे, प्रतिभा रानडे, संजीवनी खेर इत्यादी. एशियाटिकमध्ये इतर



उपसंस्थानेही होती (पण इथे तो विषय नाही.) साधू आणि मी एकाच दिवशी (१९७९ मध्ये बहुतेक) एशियाटिकचे आजन्म सदस्य झालो, पण आम्ही त्या संस्थानांमध्ये कधीच सामील झालो नाही. तसे आम्ही उपरेच होतो तेथेही!

साधू, गांगल, अशोक जैन, जगन फडणीस, अरुण घाटे ही सर्व मंडळी नेहरू नगरातली-कुर्ल्यातली! कुर्ल्याला पार्ले, शिवाजी पार्क वलय कसे येणार? साधूची बायको अरुणा किंवा गांगलांची बायको अनुराधा या मध्यमवर्गीय (कनिष्ठ मध्यमवर्ग!) जीवनशैली असलेल्या. साध्या, सरळ आणि अजिबात प्रतिष्ठितपणाचा आब आणि आव नसणाऱ्या. कुर्ला येथे नेहरू नगरात हे गांगल-साधू-जैनांचे नवे सांस्कृतिक साम्राज्य उभे राहत होते हे अधिकृत अभिजन साहित्य-संस्थानिकांना मानवणारे नव्हते. पण गांगल 'मटा'चे रविवार संपादक, जैन मटाचे लोकप्रिय वार्ताहर आणि साधू लेखक! त्यामुळे उच्चभ्रूंना 'नेहरू नगर'च्या समांतर संस्थानाची दखल घ्यावी लागत असे. पण एक प्रकारचा सांस्कृतिक वर्गसंघर्षच उभा राहत होता! असेही म्हणता येईल की साधू काहीसे या उच्चवर्गीय वर्तुळांशी फटकूनच असत. त्याचा जीव आणि मन त्या 'इलिट' अभिजन प्रस्थापितांमध्ये रमत नसे. त्याच्या त्या फटकून राहण्यामुळे (नफरतीमुळे?) साधूबद्दल काही गैरसमजही प्रचलित होते.

मुळातच स्वभाव भिडस्त, बुजरा आणि स्वतःला अजिबात पुढे पुढे न करणारा. खाजगी गप्पांमध्ये मी, गांगल, जैन (कधी कधी प्र.ना. परांजपे) साधू खूप मोकळा होत असे- अगदी कठोर टीकाटिप्पणीही करीत असे. त्यामुळे त्याचे बुजरेपण 'सिलेक्टीव' होते. पण इतके सिलेक्टीव की त्याच्या स्वभावाचे ते व्यवच्छेदक लक्षण झाले होते.

गांगल, जैन, मी आणि साधू चौघांनी इतके पुणे-मुंबई दौरे केले आहेत की त्या धमाल प्रवासांची गणती वा नोंदही करणे शक्य नाही. त्यावेळेस साधूच्या विनोदबुद्धीची चमक आम्हाला अनेक वेळा दिसली. हळूहळू गांगल आमच्या ग्रूपचे 'नायक' झाले. बर ज्या १९७३-७४ च्या 'मूड'चा आणि 'माहोला'चा उल्लेख केला त्या 'मूड'ला 'ग्रंथाली' नावाच्या संघटनेत/ चळवळीत रूपांतर झाले ते गांगलांच्या घरात झालेल्या पहिल्या बैठकीत. 'ग्रंथाली' हे नाव अशोक जैनने दिले होतेच (त्यांच्या नेहरू नगरमधील साहित्यरसिकांच्या गटाला) 'ग्रं'चा पहिला लोगो अशोक शहाणेंनी बनविलेला. या 'संस्थापनेच्या' बैठकीला 'सत्यचित्र' गटातले जयसेन पाटील, केडी, मी असे होतो आणि अरुण टिकेकर, प्र.ना. परांजपे, जैन वगैरे मंडळी त्याचप्रमाणे वा.वि. भट, प्र.श्री. नेरूरकर आदी 'प्रगत साहित्य सभा'वाली मंडळी. वा.बि. भटांच्या अभिनव प्रकाशन कचेरीत (दादरला) जमणारे पुरोगामी लेखकही 'ग्रंथाली' बरोबर होते. इतक्या विविध प्रकृतीच्या लोकांना एकत्र जुंपण्याचे/गोफण्याचे कसब गांगलांचे. त्या विलक्षण कौशल्याशिवाय 'ग्रंथाली' उभीच राहू शकली नसती. आज त्या 'ग्रंथाली' संस्थानाची धुरा वाहणारे सुदेश हिंगलासपूरकर याच नेहरू नगरच्या तालमीत तयार झाले.

'ग्रंथाली'ची पहिली तीन (प्रत्यक्षात चार) पुस्तके कोणती असावी आणि पुढे कोणती/कशा प्रकारची पुस्तके 'ग्रंथाली वाचक चळवळी'ने प्रसिद्ध करावी यासाठी आम्ही अनेक ठिकाणी बैठका घेतल्या होत्या. नवे विषय, नवे लेखक, नवे लेखक शोधायचे आणि थेट वाचकांपर्यंत पोचायचे ही संकल्पना. नरेन्द्र आपटे,रामचंद्र वझे, ज.रां. आपटे ते अगदी संजीव खांडेकर, श्रीकांत लागू, अशोक दातार, अनंत भावे असे सर्वजण या कारवाँत सामील झाले होते. शिवाजी पार्कचे अभिजन वासंती आणि अरुण मुजुमदार, शशी आणि उषा मेहता इतकेच काय तर शेखर साठे, दिलीप महाजन, चिंतामणी देशमुख यांच्यासारखे कट्टर विज्ञानवादी 'विज्ञान ग्रंथाली'च्या माध्यमातून 'ग्रंथाली'च्या वारीत होते.

या सर्व मंडळींचा अर्थातच साधूशी अगदीजवळचा संबंध ग्रंथयात्रांच्या माध्यमातून आला असला तरी त्यांच्यात राहूनही साधू बऱ्याच अंशी अलिप्त असे. या सर्वांना साधूबद्दल कुतूहल, थोडीशी अनाकलनीय धास्ती, आदर आणि आश्चर्य अशा विविध भावना असत. एव्हाना म्हणजे १९७८-७९ मध्ये अशोक जैन 'मटा'चा दिल्ली प्रतिनिधी म्हणून आणि अरुण साधू स्टेट्समन दैनिकाचा 'वेस्टर्न इंडिया ब्यूरो चीफ' म्हणून मुंबईच्या टाइम्स ग्रूपमधून दूर गेले होते. आमचे 'न्यू एम्पायर'चे 'कॉकस' असे विस्कटले असले तरी 'ग्रंथाली'च्या बैठकांमुळे आणि उपक्रमांमुळे 'बॉन्डिंग आणि बाईंडिंग' टिकून होते. परंतु आता

साधू (सिंहासन चित्रपटानंतर) जब्बार पटेल - सतीश आळेकर यांच्या पुण्याच्या 'थिएटर अॅकॅडमी'च्या संस्थानातही सामील झाले होते. 'पडघम' हे नाटक त्याच संस्थानाचे आणि १९७९ नंतर साधूची लेखणी अधिकच विस्ताराने फुलू लागली होती.

साधूची नास्तिकता आणि वैज्ञानिकता त्यांच्या तत्त्वचिंतनातून आली होती- त्या चिंतनाचे विचारस्तंभ होते पंडित नेहरू आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पण त्याच्या साध्या जीवनशैलीत आणि कठोर व्यक्तिगत नैतिकतेत होता गांधीजींचा संस्कार, त्याच्या सर्व साहित्यात स्त्रिया, दलित, आदिवासी, शहरातील उपेक्षित, अनाथ-उफराटे जीवन जगणारी मुले (झिपऱ्या) यांच्याबद्दल केवळ करूणा नाही तर तसे जीवन जगताना त्यांना करावा लागणारा संघर्ष आणि आशावाद आहे. अर्थातच राजकारण हे हवेच्या दाबाप्रमाणे सर्वत्र व्यापलेले असते तसे साधूच्या कथा-कादंबऱ्यातही. अगदी 'तडजोड'सारखी कादंबरी असो वा 'त्रिशंकू'- सर्वत्र राजकारण, सत्तासंघर्ष आहेच.

त्याला मार्क्सवाद व क्रांती या विषयांबद्दल असलेले आकर्षणसुद्धा क्यूबा, चीन, रशिया येथील राजकारणातून निर्माण झाले होते. सामाजिक न्याय आणि दारिद्र्यनिर्मूलन यांना जोडणारा दुवा म्हणजे राजकारण असे मानूनच त्याने चे, फिडेल, माओ, लेनिन ते गोर्बाचेव (तिसरी क्रांती) हे सर्व लेखन केले होते, परंतु साधूने त्याच्या विचारसरणीचा डिंडिम कधीही पिटला नाही. 'सिंहासन'चे भाषांतर युक्रेनियन भाषेत होऊन ५०,००० प्रती संपल्या पण त्याचाही साधूने गाजावाजा केला नाही.

त्याच्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणातील 'मराठीवादा'वरून बरीच चर्चा झाली. अगदी विजय तेंडुलकरांनी सुद्धा आक्षेप घेतला. पण तो एका अर्थाने घरातलाच 'आक्षेप'! कित्येक जण साधूला तेंडुलकरांचा वारस मानत असत, पण ते तितकेसे खरे नव्हते. 'मुंबई दिनांक' आणि 'सिंहासन'वर बेतलेल्या चित्रकटाचे पटकथालेखन विजय तेंडुलकरांचे होते, तेव्हापासून तो समज रूढ झाला. पण साधूला विजय तेंडुलकरांच्या बऱ्याच वैचारिक-राजकीय भूमिका मान्य नसत. (आम्ही दोघांनी संयुक्तपणे लिहिलेले 'प्रिय तेंडुलकर' हे जाहीर पत्र त्यामुळे खूपच वादग्रस्त ठरले. तेंडुलकरही बरेच संतापले होते.)

साधू नेहरू नगर सोडून बांद्र्याच्या 'पत्रकार' सोसायटीत आला, म्हणजे साहित्य सहवासच्या बसाहतीजवळ- पण तो त्या वातावरणातही एकरूप झाला नाही. सर्वांशी सौहार्दाचे संबंध राखूनही तो स्वयंनिर्मित बेटावर राहिल्यासारखा असे. साहित्य सहवासाच्या इतक्या जवळ राहणारा हा साहित्यिक-पत्रकार, पण गांगल नेहरू नगरात राहूनही ज्या पद्धतीने साहित्य-कला वर्तुळात मिळसत, तसे साधूचे नव्हते. (खरे म्हणजे गांगल सुद्धा त्या अर्थाने प्रतिष्ठित, उच्चभ्रू, अभिजन साहित्य-कला विश्वात रमत नाहीत. पण त्यांचे सामाजिक-संस्कृतिकारणाचे व्रत असल्याने ते सर्वांशी संबंध ठेवून असतात. पण गांगल कधीही 'एलिटिझम'ने भारून गेले नाहीत वा त्यांच्या कळपात सामील झाले नाहीत.)

कदाचित असेही म्हणता येईल की त्या दोघांनी (वा आम्ही कुणीच!) आमचा 'वर्ग' सोडला नाही. आम्ही आमची पायरी सोडली पण वर्ग नाही, आमचे सामाजिक स्थान (स्टेटस या अर्थाने) बदलत गेले, पण आमची जीवनशैली बदलली नाही, चंगळवादी वा चैनवादी जीवन आम्हाला वा आमच्या बायकांना (!) आकर्षक वाटले नाही. याचे एक महत्त्वाचे कारण, निदान साधूच्या बाबतीत तर अधिक खरे, हे की आपण इतक्या प्रथितयश लेखकाची पत्नी आहोत याचा 'गर्व' वा अवास्तव अभिमान अरुणाला वाटला नाही. तीच गोष्ट अनुराधाची. साधूच्या मुली (सुवर्णा आणि शेफाली) स्वयंभू प्रज्ञेने आपापल्या करिअरच्या मार्गाने गेल्या पण वडिलांच्या कीर्तीच्या प्रकाशात राहायचा प्रयत्न त्यांनी केला नाही.

साधूच्या कुटुंबवत्सलपणाचे दर्शन जरी कुणाला झाले नाही तरी तन्वी ही त्याची नात मात्र त्याच्या गेल्या वीस वर्षांत त्याचे सर्वस्व झाली होती. तन्वीची अफाट सर्जनशील व्याप्ती, तिच्या कविता, तिचे प्रबंध, तिचा स्वभाव हे व सर्व काही साधूच्या मनोव्यापाराचा अविभाज्य घटक झाले होते.

गेल्या तीन-चार वर्षांत देशातील राजकारण ज्या झपाट्याने उग्र धर्मांधतेकडे, अराजकाकडे आणि नेहरू-गांधींच्या विचाराला व आदर्शांना फेकून देण्याच्या दिशेने चालले होते ते पाहून साधू विलक्षण खिन्न होत असे. तरीही जेव्हा केव्हा भाषण करायची वा लेख लिहायची संधी येई तेव्हा तो त्याच्या बंडखोरी शैलीत त्या प्रवृत्तींचा सामना करत असे, पण त्याची प्रकृती हळूहळू खचायला लागली ती नेमक्या याच काळात.

परिस्थिती हाताबाहेर जात आहे आणि आपण हतबल तर होत नाही ना या चिंतेनेही काही प्रमाणात त्याला ग्रासले होते. अरुणा, शेफाली, सुवर्णा आणि त्याचे दोन्ही जावई हा परिवार त्याचा मुख्य मानसिक-भावनिक आधार होता, पण तन्वी ही मात्र त्याच्या जीवनाचा स्त्रोत होती. अगदी फोनवर तिचा विषय काढला, नाव काढले तरी त्याचा मूड एकदम उत्साही, आनंदी होत असे. त्याच्या उदंड आशावादाचे आणि जॉर्ज बर्नाड शॉच्या संकल्पनेतले 'लाईफफोर्स'चे सर्व सामर्थ्य आणि काव्य तन्वीच्या रूपाने त्याच्या जीवनाला अर्थ प्राप्त करून देत होते. त्याने देहदान केले आहे पण तन्वीच्या रूपाने त्याचा जीवनस्त्रोत आपल्यातच आहे.

**- कुमार केतकर**
भ्रमणध्वनी : ९८२१५२४१३१
ketkarkumar@gmail.com




# परिवर्तनवादी चळवळींचा सहप्रवासी

▶ अर्जुन डांगळे

अरुण साधू हे मराठी मातीचा सत्त्वांश घेऊन साकारलेलं बहुआयामी असं व्यक्तिमत्त्व होते. तळागाळातील प्रश्नापासून ते अंतराळात वैचारिक झेप घेण्याची त्याच्यात ताकद होती. थोडक्यात सम्यक् दृष्टी घेऊन नुसताच लिहिणारा नाही तर जगणारा असा तो लेखक होता. लेखक, विचारवंत, कलावंत याला आवश्यक असतो ते गुण त्याच्याजवळ होतेचे पण समाजातील दलित, शोषित, पिडित आणि सर्वसामान्य जनतेप्रती असलेली सहृदयता आणि सहसंवेदना ही घट्ट होती. एक परिवर्तनवादी विचारधारा घेऊन लिहिणारा-जगणारा तो समर्थ कलावंत होता. याचा अनुभव मी स्वतः घेतला आहे.

साधारणतः १९६५-७० च्या दरम्यान मी लेखनाला सुरुवात केली. आंबेडकरी चळवळीत - डाव्या चळवळीत विद्यार्थीदशेपासूनच सक्रिय होतो. पुढे दलित साहित्य आणि दलित पँथरच्या चळवळीच्या रूपाने महाराष्ट्रात एक झंझावात उभा राहिला. त्या झंझावातात आमच्या पाठीशी जे अनेक पत्रकार उभे राहिले त्यामध्ये अरुण साधू, दिनकर गांगल, अशोक जैन, विद्याधर दाते, नारायण पेडणेकर, प्रदीप वर्मा, दिनू रणदिवे, प्रकाश बाळ जोशी आणि 'नवाकाळ'चे संपादक निळूभाऊ खाडिलकर हे होत. अजूनही कितीतरी पत्रकार, लेखक, विचारवंतांची नावे घेता येतील, पण शोकांतिका ही की आंबेडकरी चळवळीत जो एकारलेपणा वाढीस लागला त्या प्रवृत्तीमुळे आपले शत्रू कोण आणि मित्र कोण यातील भेदरेषा अधोरेखित करता आली नाही. हे सांगण्याचे प्रयोजन हे की पुणे विद्यापीठात अरुण साधू पत्रकारिता या विभागात अध्यापन करीत असताना काही हितसंबंधी चळवळ्यांनी अरुण साधू हे 'जातीय पक्षपात' करतात अशी आवई उठविली होती. असो.

अरुण साधू, दिनकर गांगल, अशोक जैन हे कुर्ल्याला नेहरूनगर येथे राहत तर मी पंधराएक मिनिटांच्या अंतरावर असलेल्या चेंबूरच्या शेल कॉलनीत राहायचो. अरुण साधू 'टाइम्स ऑफ इंडिया'त वार्ताहर होता. १९७४ ला वरळीत लोकसभा पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बी.डी.डी. चाळ परिसरात 'सवर्ण-दलित' दंगल पेटविण्यात आली. 'दलित पँथर'च्या सभेची पार्श्वभूमी या दंगलीला होती. दंगल बरेच दिवस धुमसत होती. या काळात अरुणचा निरोप आला, ''विजय तेंडुलकरांना बी.डी.डी. चाळीत दंगलीचा शोध घ्यायचा आहे. तू सोबत करशील का?'' मी ''हो'' म्हटलं. बी.डी.डी. चाळीत तेंडुलकरांना घेऊन फिरलो, पण पुढे मुंबईतील अनेक शूटर्स, गँगस्टर्सच्या आणि सामाजिक आंदोलनात सक्रिय असलेल्या कार्यकर्त्यांच्या गाठी-भेटी घालून दिल्या. 'हिंसाचार' या विषयावर संशोधन करण्यासाठी त्यांना माझ्या माहितीप्रमाणे 'नेहरू स्कॉलरशिप' मिळाली होती. त्यावेळी विजय तेंडुलकरांजवळ चांगला कॅमेरा असायचा. त्याने ते लिलया चेहरे टिपायचे. कार्यकर्त्यांच्या बैठकीत अचानक आडवे-तिडवे होऊन ते फोटो काढायचे. तेंडुलकरांचे प्रयोगशील, सामाजिक-साहित्यिक, बंडखोर प्रवृत्तीच्या व्यक्तीवर विशेष प्रेम असायचे. अरुण साधू हा त्यातला एक.

अरुणजवळ हाच प्रेमळपणा असायचा. मित्रांशी दिलखुलास अघळपघळ गप्पा मारणं, चांगल्या गोष्टीचं कौतुक करणं हा अरुणचा स्वभाव होता. माझ्याही वाट्याला तो आला आहे, पण सगळ्यात जास्त जीव होता तो दया पवारवर. दयाचं तो भारी कौतुक करायचा. विशेष म्हणजे दया पवारच्या 'बलुतं'चं पहिलं वाचन हे अरुण साधूच्या पत्रकार कॉलनीतल्या वांद्र्याच्या घरात झालं. दिनकर गांगल, अरुण साधू, आकाशवाणीचे खाडे असे आम्ही सात-आठ होतो. विशेष योगायोग म्हणजे 'बलुतं'च्या वाचनाच्या प्रसंगी दलित साहित्य चळवळीचे एक प्रणेते आणि दलित साहित्यिकांनी निग्रो लेखकासारखे बंडखोर होऊन साहित्यनिर्मिती करावी असे सांगणारे डॉ. म.ना. वानखेडे यांचे

अमेरिकेत उपचारादरम्यान निधन झाले अशी बातमी आली होती.

'बलुतं'नंतर लक्ष्मण मानेचं 'उपरा' हे 'ग्रंथाली'ने प्रकाशित केलं. दोन्ही पुस्तकं गाजली. 'फोर्ड फाउंडेशन' मिळालं. या निमित्ताने हे दोघे म्हणजे दया आणि लक्ष्मण परदेशात गेल्यावर कसे 'इंग्रजी' बोलतील यावर एक विनोद खूप प्रसिद्ध पावला होता. एकूणच त्या काळात 'ग्रंथाली'च्या चर्चा, गप्पा एका निर्मळ, निकोप वातावरणात व्हायच्या. दिनकर गांगल, अरुण साधू, अशोक जैन, कुमार केतकर ही परिवर्तनवादी संवेदनशीलता जपणारी मंडळी हे 'ग्रंथाली'चे कारभारी होते. 'ग्रंथाली'ने प्रकाशित केलेलं पहिलंच पुस्तक 'उद्ध्वस्त क्षितिज' हे याचं प्रत्यंतर होय. स्त्रियांवरील अत्याचाराच्या सत्यकथा ह्यात सांगितल्या आहेत. माझी 'ही बांधावरची माणसं' ही कथा याच पुस्तकात प्रकाशित झाली होती. सांगायचा मुद्दा हा की 'ग्रंथाली वाचक चळवळी'ने साहित्याला आणि समाजाला सामाजिक भान दिलं त्यात अरुणचे मोठे योगदान आहे. हे लिहीत असताना मला अशोक जैन याची आठवण सतावते आहे. अरुणच्या जाण्याने अनेक मित्रांच्या भावविश्वात पोकळी निर्माण झाली आहे, हे खरं असलं तरी अरुणच्या जाण्यानं दिनकर गांगल यांच्या मनात काय घालमेल असेल याची कल्पना करवत नाही. दिनकर गांगल आणि अरुण साधू यांचं प्रदीर्घ मैत्र आणि कौटुंबिक सख्य हे ज्यांना माहीत आहे त्यांना माझ्या विधानाची तीव्रता कळेल. मी चेंबूरला राहात असताना कधीतरी दिनकर गांगल आणि अरुण माझ्या घरी जेवून गेले होते. परवा अरुण गेल्यानंतर वैनींना भेटायला गेलो. बोलता बोलता त्या म्हणाल्या, ''तुमच्याकडच्या जेवणाचे ते अनेकदा कौतुकाने सांगायचे.'' हे ऐकल्यावर मला गदगदून आलं.


सामाजिक-राजकीय-सांस्कृतिक स्थित्यंतरातील वैचारिक स्पंदनं टिपण्याची आणि त्याचा कार्यकरणभाव निवेदन करण्याची क्षमता ही अरुणजवळ होती. मधु मंगेश कर्णिक अध्यक्ष असताना अरुण 'महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळा'त होता. त्यावेळी त्याने यासंबंधी जे प्रदीर्घ टिपण मंडळाला सादर केले होते ते एकूणच महाराष्ट्राच्या वैचारिक भावविश्वात अरुण किती खोलवर जाऊन ते उलगडून दाखवू शकतो याचे निदर्शक होते. तो प्रत्यक्ष कुठल्या चळवळीत नसला तरी परिवर्तनवादी चळवळींचा तो सहप्रवासी होता. विशेषतः दलित-आंबेडकरी चळवळींचा तो एक सच्चा मित्र होता. पत्रकारिता ही जरी नोकरी असली तरी तिच्यात विश्वसार्हता आणि प्रतिष्ठा मिळवणे ही साधी गोष्ट नाही. अरुणबद्दल राजकीय वर्तुळात आदराची भावना होती. परवा त्याच्या 'स्मरणसभे'त शरदजी पवार यांनी विद्यापीठ नामांतर चळवळीत कशी सकारात्मक सक्रियता दाखविली हे सांगितले. पण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समग्र साहित्यातील चौथ्या खंडातील 'रिडल्स इन हिंदुइझम' या लेखावर जे वैचारिक रणकंदन झाले त्यावर सन्माननीय तोडगा काढून ते शमविण्यामध्ये अरुण साधूचे मोठे योगदान आहे. त्याचे असे झाले की, या लेखाच्या निमित्ताने हिंदू अस्मितेच्या मुद्द्यावर शिवसेना आक्रमक झाली होती कारण त्याचवेळी पार्ल्यात विधानसभेची पोटनिवडणूक होती. आम्ही स्थापन केलेल्या 'फुले-आंबेडकर विचार संवर्धन समिती' जिचा मी अध्यक्ष होतो तिच्यात आणि शिवसेनेत टकराव होण्याची चिन्हे होती. निवडणूक संपली होती. शिवसेना जिंकली होती. अरुणचा मला निरोप आला, ''आपण या विषयावर बसूया.'' तो रविवारचा दिवस होता. बोरीबंदरला दुपारी टाइम्सच्या ऑफिसमध्ये मी, प्रकाश आंबेडकर, कुमार केतकर आणि अरुण साधू बसलो आणि चर्चेअंती लेखाच्या प्रारंभी 'तळटीप' टाकण्याचा पर्याय ठरविला. अरुण आणि कुमार मुख्यमंत्री शंकररावांशी बोलले आणि रात्री उशिरा 'वर्षा'वर बैठक होऊन दोन्ही बाजूंनी 'तळटीपे'ला मान्यता दिली.

पंचवीस वर्षांपूर्वी ओरिएंट लाँगमनने प्रकाशित केलेला 'पॉयझन्ड ब्रेड' (Poisioned Bread) हा माझा दलित साहित्यावरील संपादित इंग्रजी ग्रंथ जगभर मान्यता पावलेला आहे. भारतीय व परदेशी विद्यापीठात त्याचा संदर्भ ग्रंथ म्हणून वापर होतोच. इतकेच काय मी साऊथ आफ्रिकेला एका शिष्टमंडळात गेलो असताना माझ्या ह्या ग्रंथाची महत्ता कानावर गेलेल्या मानवमुक्तीच्या लढ्यातील नेते डॉ. नेल्सन मंडेला यांनी मला 'Long walk to Freedom' हा आत्मचरित्रपर ग्रंथ देऊन गौरव केला. शुभेच्छा दिल्या. हा माझ्या आयुष्यातील मोठा सन्मान होय. ह्या सन्मानाला माझा दलित साहित्याचा व्यासंग आणि परिश्रम जरी कारणीभूत असले तरी त्याचे श्रेय अरुणकडे जाते. त्याचे झाले असे, ओरिएंट लाँगमनच्या प्रिया आडारकर यांच्या मनात अनेक दिवस हा प्रकल्प घोळत होता. त्यांनी डॉ. भालचंद्र फडके यांना पहिल्यांदा सांगितले. काहीच हालचाल दिसली नाही म्हणून अरुण साधूला सांगितले. तेव्हा त्याने प्रियामॅडमना सांगितले, ''माझ्यापेक्षा अर्जुन डांगळे हे चांगले संपादन करू शकतील'' आणि मग ते माझ्याकडे आले.

अरुणला दांभिकपणा किंवा दाखवेगिरी पसंत नव्हती. किंबहुना यांचा तो तिटकारा करायचा. पत्रकार म्हणून किंवा अनेक कारणानी त्याला उच्चभ्रू आणि प्रतिष्ठित लोकांच्या कार्यक्रमाला हजर राहावे लागत असे. तिथल्या गंमतीजमती सांगत-सांगत तो 'वऱ्हाडी' वळणावर यायचा. त्याच्या साहित्याबद्दल खूप लिहिले गेले आहे. तो ज्यावेळी लिहिता झाला त्यावेळी साहित्यात प्रमुख्याने तीन ठळक प्रवाह होते. मार्क्सवादी विचारधारेचे साहित्य, दलित साहित्य - ग्रामीण साहित्य आणि लिटल मॅगझीनची चळवळ हे होत. अरुण साधू साहित्यात आमच्यासारखा 'प्रवाह पतित' झाला नाही. तरीही अरुण साधूने आपल्या साहित्यात परिवर्तनवादी सर्जनशीलता 'नाही रे' वर्गाशी बांधिलकी जपत आपले स्थान निर्माण केले आहे.

**- अर्जुन डांगळे**

भ्रमणध्वनी : ९८२०५०३१५४




# शब्दांच्या पेटत्या मशाली!

▶ संजीवनी खेर

**वा**गायला सौम्य, पण शब्द मात्र तीक्ष्ण नि जहाल, नेमके नि मर्मावर बोट ठेवणारे. लिखाणाचा झपाटा प्रचंड. स्वभावाने आत्मकेंद्री, अबोल पत्रकार असून प्रतिष्ठितांच्या, प्रभावी राजकारण्यांच्या वर्तुळात न वावरणारे असे एक व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड गेले. त्यांचे शब्द इतके शक्तिशाली आहेत की जे त्यांच्या दैहिक अस्तित्वाला छेद देत चिरंतर राहणार आहेत. असे मी कसे म्हणू शकते? कारण त्यांच्यासारखे ललितलेखन करणाऱ्यांचा शब्द हा कालातीत राहतो. हिंदीत जो शब्द अशा वेळी वापरतात तो वापरला तर म्हणणे स्पष्ट होईल. साधूंचे लेखन हे कालजयी आहे. कारण ते आजचे असले, विशिष्ट काळातले असले तरीही ते त्या काळाच्या सीमा ओलांडत मानवी जीवनातले चिरंतर सत्य मांडत असते. काळ बदलेल, त्याचा वेग बदलेल, पण त्यातील जे मानवी वर्तनाचे सत्य आहे ते बदलणार नाही कारण जे माणसाच्या डिएनएत रुतलेले असते. ते बदलत नाही.

स्वभावाने, वर्तनाने अत्यंत ऋजू, लोकांत असून स्वतःच मग्न, तरीही लोकांचे बोलणे, म्हणणे टिपणारा असा हा लेखक होता. आजच्या पत्रकारांना आदर्शवत पण आचरणात आणायला अवघड पत्रकार-लेखक आपली जबरदस्त साहित्यसंपदा मागे ठेवून गेला आहे. त्याचा शब्द जो त्याने कागदावर लिहून दशके लोटली तरीही आजचा नि ताजातवाना वाटतो. हेच त्याच्या कादंबऱ्यांच्या प्रभावाचे नि कालजयी असल्याचे लक्षण आहे.

राजकारण, समाजकारण, सांस्कृतिक वातावरण, परंपरा, त्यांची उपयुक्तता नि जोखड यांची नेमकी जाण असलेला लेखक वाचकासाठी काय ठेवून गेलाय हे आता अभ्यासणे अत्यावश्यक आहे. त्याची नॅरेटिव्हज अस्सल मातीतील आहेत. माणसे केवळ काल्पनिक नाहीत, उपरी नाहीत, त्यांचा संघर्ष हा लेखक फार बारकाईने पाहत, जणू अनुभव टिपतोय असे वाटत राहते. त्याच्या कादंबऱ्याचा जॉनर न लपवता साम्यवादी आहे. पोथीनिष्ठांप्रमाणे तो त्या तत्त्वज्ञानाकडे पाहत नाही. तर मानवाच्या वेदनेचा वेदच त्याच्या लेखणीतून उतरत असतो. वेदनेत वेद आहे हे आपण विसरतो. लेखक अरुण साधू आपल्या अनेक भल्यामोठ्या (पानांच्या बाबत त्यांनी अमेरिकन पॅटर्न बिग फॅट नॉव्हेल) कादंबऱ्यांतून भारतीय समाज जीवनातील उतरंड दाखवत वाचकाला गुंगवतात. एकदा वाचन सुरू केले की पुस्तक खाली ठेवायचे जिवावर येते. असे काय गारुड त्यातील शब्द करतात? वास्तविक असा परिणाम रहस्यकथा, युद्धकथा वा खास करून रोमान्स ज्यात ठासून भरलेला अशा कादंबऱ्या वाचकावर करतात. ह्यातील कुठल्याही पठडीत अरुण साधूच्या कादंबऱ्या बसत नाहीत. मग? 'सिंहासन', 'मुंबई दिनांक', 'बहिष्कृत', 'शोधयात्रा', 'मुखवटा' अशांसारख्या कादंबऱ्यांतून वाचकाला काय मिळते? निखळ वाचनानंद? मनाला उन्नत करणारा भावनाविष्कार? समाजभान? की बदलाला कदाचित निदान त्या दिशेने अनुकूलता? असे काही मिळत असावे. वास्तविक हा प्रश्न नि उत्तर हे व्यक्तिगणिक बदलू शकते नि कारणेही बदलतात, पण त्यांचे लेखन वाचकाला विचार करायला, राजकारण, समाजकारण यांचे भान यायला नक्कीच मदत करते. तरीही ते कंठाळी नाही, उगाचच हातात झेंडा घेऊन लेखन केलेय नि कथानक हे चवीपुरते आहे असे कधी होत नाही.

त्यांच्या कादंबऱ्यांचे जॉनरच सांगायचे तर ते राजकीय आणि सामाजिक असे भाग करता येतील. ते स्वतः अनेक वर्षे पत्रकार म्हणून कार्यरत असल्याने राजकारणी लोकांशी त्यांचा बातम्यांकरता खूप जवळून संबंध आला. त्यांच्या बातम्यांतही भडकपणे ती देण्याचा बाज नव्हता किंवा काही अंतस्थ हेतूने ती दिली असल्याचे दिसत नसे. बहुतेक बाबतीत ते पूर्णतः तटस्थ असत. त्यांच्यावर हेत्वारोप करणे शक्य नव्हते. प्रेस




कॉन्फरन्समध्ये दिल्या जाणाऱ्या गुडविल गिफ्टसाठी एरवी बहुतेक पत्रकारांची अहमहमिका असे. हा माणूस आपले काम करून नोट्स लिहून शांतपणे बाहेर पडत असे. त्याचा परिणाम होण्याइतकेही इतर पत्रकार संवेदनशील नसत!! पण त्यांच्याशी वाद घालत वा कंपनीच्या ह्या पद्धतीबद्दल हुज्जत न घालता आपल्यापुरता तुकारामी पवित्रा घेऊन ते चालू पडत असत. त्यांच्या गिफ्ट न घेण्याचा लिखाणावर काहीही परिणाम नसे. त्यांची लेखनावर अव्यभिचारी निष्ठा होती. ती त्यांची प्रेरणा होती. सामान्यांशी बांधिलकी होती. लोकांचे अभावासकट जगणे, लढणे त्यांना अचंबित करत असे. ह्या समाजव्यूहात शोषितांच्या मुक्ततेचा मार्ग निघावा हे त्यांचे स्वप्न होते.

राजकारण हा साधूंचा आवडता विषय होता. राजकारण्यांविषयी कुत्सित बोलणे, त्यांची कुलंगडी चर्चणे तरीही त्यांचे बगलबच्चे होण्यात इतिकर्तव्यता मानणारे ते नव्हते. लोकांनी निवडून दिलेल्या ह्या राजकारण्यांत संघटन, जनसंपर्क, जबरदस्त उरक असल्याचे त्यांना जाणवले होते. म्हणूनच त्यांच्याविषयी तुच्छता न बाळगताही त्यांच्या वागण्यातील विसंगती, अपरिहार्यता, कटकारस्थाने, शह-प्रतिशह, रागलोभ यांचे मनोहारी दर्शन त्यांच्या 'सिंहासन'मध्ये दिसते. राजकीय नेत्यांबद्दल सामान्यांच्या मनात प्रचंड राग असतो, पण राजकीय, सामाजिक निर्णय, लोकशाहीचे रक्षण, शासनव्यवस्थेचे गाडे त्यांच्याशिवाय अडते म्हणून सामान्यांचा संबंध नेत्यांशी येतोच. नेत्यांचे तुसडे वागणे, ज्यांच्या मतांच्या जोरावर ते जिंकून येतात त्यांचाच अवमान करणे हे सारे आपण म्हणजेच जनता अनुभवत असते. साधूंच्या लेखनात सामान्य माणूस हा नेहमीच अग्रस्थानी राहिलेला आहे. त्याच्या जगण्याचे, संघर्षाचे चित्रण त्यांच्या कादंबऱ्यांत प्रकर्षाने येते. एखादी विचारसरणी पटते याचा अर्थ लेखकाच्या लेखनावर त्याचे दडपण असते असे नाही. तर ती जर अजूनही अन्यायाच्या विरुद्ध लढ्यासाठी गरजेची आहे म्हणूनच ती लेखकाने वापरली आहे. झंझावाती म्हणावे असे ललित लेखन करणारा साहित्यिक, भाष्यकार, सतत खऱ्या अर्थाने समाजाच्या दुखऱ्या नसेवर बोटे ठेवणारा लेखक म्हणजे अरुण साधू.

त्यांची 'सिंहासन' ही गाजलेली कादंबरी. राजकारण्यांच्या प्रतिस्पर्ध्यावर मात करायच्या खेळावर बेतलेली. साधूंच्या लेखनात त्या तुफान बदलत्या काळाचे प्रतिबिंब आहेच. तो काळ (१९६० नंतरचे दशक) कामगार चळवळीचा. ग्रामीण नेतृत्वाच्या उदयाचा, स्त्रीमुक्ती चळवळीचा, दलितांच्या अस्मिताजागृतीचा, नक्षलवादी चळवळ, भारतीय नव्हे तर जागतिक स्तरावरही अनेक तुफानी नि मूलभूत बदलांचा होता. त्याचे प्रतिबिंब साहजिकच साधूंच्या ललित आणि ललितेतर लिखाणात स्पष्टपणे पडलेले आहे. महाराष्ट्राच्या राजकारणावरची ही कादंबरी. बुद्धिबळाच्या खेळागत शहप्रतिशह देत चाललेले राजकारण. विक्रमादित्याचे सिंहासन बत्तिशीतील आसन सत्य बोलायला भाग पाडे, पण आजच्या सत्तेच्या सिंहासनाची बत्तिशी ही काही वेगळेच रसायन आहे. लेखकाने ही बत्तिशी सत्याच्या दर्शनासाठी वापरली आहे. राजकारणी कसे एकमेकांना, परिस्थितीला वापरतात, एकमेकांच्या विरुद्ध छुप्या कारवाया करताना, कसे सौजन्याचे मुखवटे वापरतात. कादंबरीतील अर्थमंत्री नि मुख्यमंत्री यांच्यातील हे द्वंद्व वेधक आहे.

आज सारे बदलले आहे, पण सत्तांतराचा खेळ अधिकच तीव्र होताना दिसतोय. प्रसिद्धीमाध्यमांमुळे सामान्यजन तो जवळून अनुभवू शकत आहेत, पण कादंबरी लिहिली गेली तेव्हा त्यातील अर्थमंत्री दाभाडे नि सीएम यांमधील सत्तासंघर्ष आजही वेगळ्या नावांनी आणि अधिक पात्रांच्या आगमनाने तीव्रतेने जाणवतो. म्हणूनच ही कादंबरी आजही तितकीच ताजी वाटते. संघर्ष रंगवण्यात, अनेक पात्रांचे स्वभावविशेष टिपण्यात लेखकाचे कौशल्य वादातीत आहे. ग्रामीण नेतृत्व, शहरी ब्राह्मणी नेतृत्व यांच्या वागण्यातील, बोलीतील सूक्ष्म फरक लेखकाने मार्मिकपणे रंगवलाय. या सर्वांमध्ये वावरणारा, तरीही तटस्थ वार्ताहर दिगू टिपणीस लेखकाने खुबीने रेखला आहे. सगळ्यांच्या कुलंगड्या, शह-काटशह यांचा साक्षीदार आणि आपले साधे

जीवन जगू पाहणारा पत्रकार हे एक सशक्त पात्र आहे.

यातील प्रत्येकच पात्र सच्चे आहे. त्यांची पार्श्वभूमी, मतदार संघ, खासकरून राजघराण्यातल्या दत्ताजी जाधवांचे पात्र, त्यांचे अफाट वाचन, विचक्षण बुद्धिमत्ता, समजुतदार विदेशी पत्नी आणि राजकारणाची उत्तम जाण, असे केलेले आहे. अपवादाने का होईना आजच्या राजकारणातही असे लोक दिसतात. त्यांच्या अनेक पात्रांतील प्रत्येक पात्र हे आपापल्या भूमिका लेखकाच्या तालावर निमूटपणे बजावताना दिसतात. त्यांचे मुख्यमंत्री, इतर मंत्री, आमदार, त्यांची नाजूक प्रकरणे, सेक्रेटरी, मंत्र्यांच्या महत्त्वाकांक्षी बायका, त्यांची अंतर्गत धुसफूस नि राजकारण कादंबरी रंजक करते.

त्यांच्या कादंबऱ्यांचे वैशिष्ट्य त्यांच्या सहजसुंदर भाषेत आहे. आजच्या शहरी बोलण्यातून नाहीसे झालेले, तरी ज्येष्ठ वाचकांच्या वापरात असलेले, अनेक समृद्ध शब्द त्यांच्या कादंबऱ्यांतील पात्रे बोलत असतात. बोली ही प्रादेशिकता दर्शवणारी असते. त्यातूनच त्यांच्या कथानकाचा नायक-नायिकांचा परिवेश, सामाजिक, आर्थिक दर्जा लगेच ध्यानात येतो. शहरी नेता गाव सोडून आलेला असला तरी त्याच्या भाषेच्या ढंगातून, शब्दांच्या हेलातून त्याचा परिसर चटकन ओळखता येतो. दुसरे वैशिष्ट्य ठळकपणे मनाला भिडतं ते म्हणजे त्यांच्या कथानकातील जबरदस्त नाट्य. कथानकात अफलातून परिसर वा काही भव्यदिव्य वर्णने, शब्दांचे फुलोरे नसतात, पण नेमक्या शब्दांत ते व्यक्ती आणि वातावरण पकडतात नि वाचकांच्या नजरेसमोर निमिषार्धात उभे करतात. महानगरे, ग्रामीण विदर्भ, शहरी एलिटचे वागणे, बोलणे, पेहेराव, वावरण्याचा ढंग (शोधयात्रा, मुखवटा, झिपऱ्या) ते नेमकेपणाने पकडतात. साध्यासाध्या वाक्यातून नाट्य उभे करणे, स्वभाववैशिष्ट्ये टिपण्याची कला ह्या लेखकाला वश होती.

माणसाला पडलेल्या सनातन प्रश्नाभोवती त्यांची शोधयात्रा फिरते. आपण कोण, कुठून आलो, कुठे जाणार, आपल्या अस्तित्वाचे प्रयोजन काय, याचा धांडोळा घेणारा अत्याधुनिक जगात, स्पर्धेच्या जगात कार्पोरेट जगाच्या जिवघेण्या धावपळीत अग्रेसर राहणारा श्रीधर एक दिवस अचानक हे सारे सोडून बाहेर पडतो. थेट हिमालयातील गोसाव्यांत सामील होतो. तेथे जाऊन त्यांच्यासारखे जगून तो जगण्यातले श्रेय-प्रेय मिळवण्याची मनापासून धडपडतो. सर्वसंगपरित्याग आणि सर्वस्वाचा घास घेऊ पाहणारी आधुनिक जीवनशैली दोन्हींतून कशानेच मनाचे पूर्ण समाधान होत नाही. आपल्याला नक्की काय हवेय, ह्या गहन प्रश्नाचा शोध घेता घेता तो थकतोय. लेखकाने संस्कृतीच्या नावाने जे काही आहे त्याचा तिरस्कार केलेला नाही वा तिला कमीही समजलेले नाही. ती समजून घ्यायचा सतत प्रयत्न केलाय. ह्या कादंबरीत आजच्या रँटरेसमधील महत्त्वाकांक्षी तरुणाची तडफड नि शोध बारकाईने टिपलाय. ह्यात लेखक जणू मानसोपचारतज्ज्ञ झालाय. ही शोधयात्रा प्रत्येकाला आपलीशी वाटू शकते. कथानकातला जोम, नाट्य हे आपल्याभोवती घडणाऱ्या गोष्टीतूनच उमलते. ते मनाला, विचारांना जखडून ठेवते. पिच्छा सोडत नाही. ही त्यांची आधुनिक, महत्त्वाकांक्षी, तरुण माणसाच्या स्वशोधाची चक्रावून टाकणारी 'शोधयात्रा'!

त्यांच्या आकाराने छोट्या तरीही आशयाने महत्त्वाच्या नि प्रभावी कादंबऱ्या आहेत- 'झिपऱ्या', 'विप्लवा', 'बहिष्कृत.' प्रत्येकीचा परिवेश वेगळा आहे. एक विज्ञान कादंबरी 'विप्लवा' आहे, दुसरी शहरी बकाल वस्तीतील झुंजार, चिवट आशावादी १२-१३ वर्षांच्या मुलाची 'झिपऱ्या', आणि तिसरी 'बहिष्कृत' ही स्वातंत्र्यानंतरच्या प्रचंड वेगाने बदललेल्या सामाजिक अवकाशात अजूनही साध्या माणुसकीच्या वागणुकीला पारख्या झालेल्या समाजाच्या आक्रोशाची अस्वस्थ करणारी कादंबरी. पानांच्या दृष्टीने आवाका कमी असला तरी प्रत्येकात माणसाच्या मूलभूत सामर्थ्याबरोबरच त्याचे स्व-नाशकारी दर्शनही होते. खासकरून विज्ञानिकेत अफाट प्रगतीच्या धुंदीत आपले स्वत्व गमावून बसलेल्या संस्कृतीचा, परग्रहावरील मानवाने अज्ञात यानगोलाने पृथ्वीवर येऊन आपल्यासारखीच माणसे इथे आहेत हे पाहून घेतलेला वेध, ह्या गूढ यानाकडे पाहून लोकांची उडालेली गाळण, सत्ताधाऱ्यांनी त्यांच्यावर सोडलेली अण्वस्त्रे, याचे वर्णन वेधक आहे. अण्वस्त्रांच्या सर्वनाशी शक्तीबरोबर जोडलेले नाते पाहून; प्रेम आणि बुद्धीवर पोसलेल्या परग्रहवासी विप्लव संस्कृतीतील हेमकेतू पृथ्वीवासीयांचा पाणउतारा करतो, धमकावतो. इथल्या अण्वस्त्रांची इत्थंभूत माहिती त्याला आहे. त्याच्यामुळेच त्याला पृथ्वीवरील माणसांचा संताप आलाय. हे विप्लववासी आपल्या नव्या नातेवाईकांची काळजी म्हणून सारी अण्वस्त्रे नष्ट करीत नि पुन्हा असे न करायचा सल्ला देत परततात. ही विज्ञानिका प्रसन्न भाषेमुळे नि आशावादाने वेगळ्याच शब्दलेण्याने वाचनीय झाली आहे. विज्ञानाला मानवाच्या कल्याणासाठी न वापरता परस्परांच्या राजकीय स्वार्थासाठी वापरून साम्यवादी आणि भांडवलशाही देश सामान्यांच्या जीवनाशी भीषण खेळ करताना आपण पाहत आहोत. त्यावर ललित अंगाने नेम साधून एक सुरेख कादंबरी लिहिली गेलीय. आधुनिकता, व्यक्त करण्यातील मोकळेपणा, वर्णनासाठी संवादासाठीची वापरलेले भाषेतील वेगळेपण वाचकाला आधुनिक जगाचे वर्तन नेमकेपणाने उभे ठाकते.

'झिपऱ्या' हे महानगरीतील हजारो-लाखो पौगंडावस्थेतील तरुण मुलांच्या संघर्षाला शब्दरूप देणारे चित्रण आहे. त्याची भाषा साहजिकच स्वत:चे गाव, प्रदेश सोडून आलेल्यांची, सरमिसळ शब्दांची, पण थेट परिणाम साधणारी. अनेकांसह झगडणाऱ्या तरीही पैशांच्या या महानगरीच्या 'चकाचौंध'ला बळी न जाता तगून राहण्याचे तंत्र आत्मसात केलेल्या मुलांच्या प्रचंड इच्छाशक्तीचे अचंबित करणारे रूप वाचायला मिळते.

शहरवासी रोजच ह्या बूटपॉलिशावाल्या मुलांना वा कष्टाची रोटी कमावणाऱ्यांना पाहत असतो. त्यांचा दुर्दम्य आशावाद, दारिद्र्यातही न हरलेली ही मुले लेखकाने किती हळुवारपणे टिपली आहेत हे वाचताना कळते. सर्वस्व हरवूनही स्वप्न पाहणारी ही फलाटावर जीवन कंठणारी मुले ही केवळ दयेचा विषय नाही तर ती कौतुकाला पात्र आहेत, हे लेखक दाखवून देतोय. फलाटावरच्या मुलांतील मैत्रभाव, संकटे, दादा होण्याची प्रबळ इच्छा, वेगवेगळ्या व्यवसायातील कौशल्य, स्पर्धा, जबाबदारीची, नैतिक-अनैतिकतेची जाण, अपरिहार्य यश-अपयश, बेदरकारपणा कसा येत जातो याचे मर्मग्राही चित्रण आहे. ह्या कादंबरीवरील चित्रपट आता पूर्ण झालाय. तो वास्तववादी असावा, गरिबीचे ग्लॅमरयुक्त चित्रण नसावे असे लेखकाचे म्हणणे होते. कोलाज स्वरूपाचे चित्रण येत राहते. परिस्थितीने चेपलेल्या ह्या पोरांची स्वप्ने पाहण्याची ताकद थक्क करणारी आहे.


'बहिष्कृत' म्हणजे पाण्यासाठी सत्याग्रह कराव्या लागणाऱ्या लोकांच्या अवस्थेवर हल्ला आहे. 'माणूस म्हणून नव्हे तर निदान तुमच्या दारचे जनावर म्हणून तरी वागवा, पाणी द्या' असे म्हणायची पाळी ह्या समुदायावर आपल्या समाजाने का आणलीय? अशोक सोकाजी इंगळे म्हणतो, 'पाण्यासाठी सत्याग्रह करायला लागणे ही शरमेची गोष्ट आहे.' मनूला उद्देशून तो म्हणतो, '२-३-४ हजार वर्षांपूर्वी तू बोललास ते भूत अजूनही लोकांच्या मानगुटीवर आहे. सतरा कोटी लोकांच्या माणूसपणावर खिळा ठोकणाऱ्या तुला नमस्कार! जात वास्तव ह्या देशातून कमी होण्यावजी उलट अधिकाधिक ठळक होत चाललेले दिसत आहे. कुठलाही सरकारी, बिनसरकारी आधार मिळत नसताना नुसता संताप येऊन काय होणार?' विहिरीचे पाणी हे आजही पेटते ह्याहून शब्दांचे चिरंजीवित्व काय असणार? दुःखद असले तरी हे ह्या देशातले सत्य आहे. साधूंची सामाजिक वास्तवाशी असलेली नाळ तुटली नाही, ती अशा छोटेखानी कादंबरीतून व्यक्त होत राहिली.

अरुण साधूंची साडेपाचशे पानांची कादंबरी 'मुखवटा.' प्राचीन ते अर्वाचीन असा समाजजीवनाचा पट ह्यात रंगवलेला आहे. वामनराव ह्या कुटुंबप्रमुखाचा मुखवटा केंद्रस्थानी आहे. तसेच भारतीय गृहजीवनात केंद्रस्थानी असलेल्या श्रद्धा, जीवनमूल्ये, यात कालक्रमात होत जाणारे बदल वाचकाला भोवंडून टाकतात. अक्षीकर-देशमुखांच्या घराण्याच्या निमित्ताने अनेक कोनांतून आपल्या समाजजीवनाचे चित्रण ह्यात दृग्गोचर होते. भारदस्त भाषा, वैदर्भीय शैली, चाळीस-पन्नास व्यक्तिरेखा, सातशे वर्षांच्या कालखंडातून आपल्यापुढे उभ्या राहतात. या साऱ्यांची स्वभाववैशिष्ट्ये, अनेकानेक घटनांतून आपल्याला समजू लागतात. वाड्यावर वामनमहाराज उत्सवाच्या घट्ट परंपरा आहेत. त्यानिमित्ताने सर्व जाती-धर्माचे लोक वाड्यात येजा करत असतात.

कथानकाच्या केंद्रस्थानी आहे ती कर्ती विकेशा नानी. भव्य वाडा, त्यातील जुने उत्सव, रीती-रिवाज, माणसे सांभाळणे हा तिच्या आयुष्याचा परीघ. आपल्या घराण्याचा अमेरिकेत स्थिरावू पाहत असलेला वारस, पुतण्या प्रकाश ह्याला आपल्या वंशावळीचा शोध घ्यायचाय. काळ, बद्द परंपरांचे ओझे नि गूढ, कथनातील भाषा किती सहजपणे बदलते याचा अभ्यास शैलीच्या दृष्टीनेही करण्यासारखा आहे. काळाचा विशाल पट त्यावरील सारी माणसे सांभाळणे हे लेखक म्हणून मोठे आव्हानच होते जे साधूंनी लीलया पेलले आहे. कालपट सांभाळणे, घटनांचे, व्यक्तिविशेषांचे पदर उकलणे यात वाचकाला धरून ठेवणारी रसायने आहेत. त्यांच्या वेगवेगळ्या स्तरातील लोकांवरील कहाण्यांतील भाषेची नि नाट्यमयतेची कमाल वाचकाला मंत्रमुग्ध करत पुस्तकात रमवते. नाट्य निर्माण करण्याचे कौशल्य पाहता आता जाणवते की त्यांनी अधिक नाटके (पडघम) लिहिली असती तर मजा आली असती. मुखवटामधील शेवटी उकललेले गूढ वाचकाला स्तिमित करते. आपल्या घराण्याची पहिली स्त्री कोण होती हे पचवणे अवघड जाते. परंपरांचा पगडा असलेल्यांचा भ्रमनिरास वाचकाला सुस्कारा सोडायला लावतो, तसेच पोकळी निर्माण झाल्याची भावना जागी करतो. अनेक निर्णय सामान्य माणूस पटो न पटो घेऊ शकत नाही. कारण संस्कारांचा भावनिक दबाव त्याच्यावर असतो. सद्सदविवेक जागा असला तरी ते घडत नाही. थक्क करणारं स्वभाव चित्रण, बदलाचे पडलेले स्वच्छ प्रतिबिंब, जुन्यात अडकलेल्या मनोवृत्ती यांनी ही बृहद कादंबरी मनाचा ठाव घेते. त्यांनी निर्मिलेली स्त्रीपात्रे आणि पुरुषपात्रेही समर्थ आहेत. स्त्रिया घर, माणसे यांना धरून ठेवत जतन करतात तर पुरुष बदलांना सामोरे जात कधी कुणी झगडतात तर काही शरणागती पत्करतात. जे आहेत ते अस्सल आहेत.

अरुण साधूंच्या इतर कादंबऱ्यांत जसे 'मुंबई दिनांक' (त्यांची पहिली कादंबरी पत्रकाराच्या एका दिवसाचे मुंबईचे चित्रण १९७३), 'तडजोड', 'त्रिशंकू', 'मंत्रजागर', 'शापित', 'स्फोट' इत्यादी. किंवा 'ड्रॅगन जागा झाला, 'फिडेल, चे आणि क्रांती', 'काकासाहेब गाडगीळ', 'ग्लानिर्भवती भारत', 'तिसरी क्रांती', 'शुभमंगल' (अनुवाद) 'हंसा वाडकर' (शब्दांकन) अशी अनेक अभ्यासपूर्ण नि जगाचे भान देणारी पुस्तके आहेत. बृहद, मानवतावादी दृष्टिकोन असलेल्या, विचारांचा पक्का असलेल्या, मानवी वेदनेबद्दल अपार आस्था असलेल्या, वैश्विक नजर असलेल्या लेखकाने आपला शब्द पुढील पिढ्यांकरता मागे ठेवला आहे.

**– संजीवनी खेर**
भ्रमणध्वनी : ९८२१४११४७२
sanjeevanikher@gmail.com




# ऋणभावना

▶ मीना गोखले

**प**त्रकार व लेखक अरुण साधू यांचा प्रत्यक्ष परिचय बराच उशिरा झाला, पण त्यांची वाङ्‌मयीन ओळख मात्र 'मुंबई दिनांक' (१९७२) आणि 'सिंहासन' (१९७७) या कादंबऱ्यां-पासूनच झाली होती. 'बहिष्कृत' (१९७८) या, ग्रामीण भागातील दलित जीवनातील स्थित्यंतराचा वेध घेणाऱ्या कादंबरीचे मी आकाशवाणीवर परीक्षण केल्याचेही आठवते. जब्बार पटेल दिग्दर्शित 'सिंहासन' या चित्रपटाने व 'पडघम' (१९८५) या प्रस्थापित व्यवस्थेविरुद्धचा संघर्ष हे विचारसूत्र असणाऱ्या नाटकाने मला विलक्षण प्रभावित केले होते. तत्कालीन परिवर्तनवादी युवक संघटना व चळवळी यांमध्ये माझा प्रत्यक्ष सहभाग नव्हता पण त्यांतील मित्रमंडळी, अभ्यासवर्ग, चर्चा, एकूण चैतन्यपूर्ण वातावरण यामुळे विवेकवादी, सेक्युलर असे आधुनिक मूल्यभान येऊ लागले होते. 'आणि ड्रॅगन जागा झाला' व 'फिडेल, चे आणि क्रांती' या १९७२ मध्येच प्रकाशित झालेल्या पुस्तकांच्या वाचनाने साधूंच्या वैचारिक लेखनाची ताकद लक्षात आली.

'ग्रंथाली' या १९७५ मध्ये सुरू झालेल्या 'अभिनव वाचक चळवळी'च्या स्थापनेमध्ये दिनकर गांगल, कुमार केतकर, अशोक जैन यांच्याबरोबर अरुण साधूही होते. 'डूब' (१९७५) हा दुर्गा भागवत यांचा लेखसंग्रह हे 'ग्रंथाली'चे पहिले प्रकाशन. कऱ्हाड येथील साहित्य संमेलनाच्या आठवडाभर आधी हे पुस्तक प्रसिद्ध झाले. त्याचेही, 'महाराष्ट्र टाइम्स'मध्ये मी परीक्षण केले होते. तसेच सरोजिनी वैद्य यांच्या 'पहाटपाणी' (१९७५) या ललितलेखसंग्रहावर 'ग्रंथाली'ने आयोजित केलेल्या चर्चेत मी निबंध वाचला होता, अध्यक्षस्थानी बा.ल. कुळकर्णी होते आणि नंतर 'पहाटपाणी'च्या निमित्ताने हा माझा लेख, सत्यकथेत (ऑक्टोबर १९७७) प्रकाशित झाला. 'ग्रंथाली'शी संबंध आल्यामुळे काही कार्यक्रमांना, विशेषतः दरवर्षी २५ डिसेंबरला साजऱ्या होणाऱ्या 'वाचकदिना'ला अनेक लेखक, विचारवंत व कलावंत पाहायला, ऐकायला मिळत होते. त्यांत अरुण साधूही होते.

साधूंशी प्रत्यक्ष परिचय होण्याची संधी मला पुष्कळ उशिरा म्हणजे जानेवारी २००० मध्ये मिळाली. निमित्त होते 'विष्णुशास्त्री चिपळूणकर स्मारक व्याख्यानमाले'तील साधूंचे व्याख्यान. रुईया महाविद्यालयात १९७३ पासून मी मराठीचे अध्यापन करीत होते. 'निबंधमाले'च्या शताब्दीच्या निमित्ताने प्रा. बसंत बापट यांच्या पुढाकाराने १९७४ पासून रुईयात ही व्याख्यानमाला सुरू झाली. १९९५ पासून तिच्या आयोजनाची जबाबदारी माझ्यावर होती. एका व्याख्यानासाठी साधूंना निमंत्रित केले. 'आचार्य अत्रे आणि महाराष्ट्रातील पत्रकारिता' या विषयावर बोलताना, अत्र्यांचे व्यक्तित्व, त्यांची पत्रकारिता व साहित्य, सामर्थ्य व मर्यादा यांचे साधूंनी जे विश्लेषण केले ते मर्मदृष्टी देणार होते. 'संभाषिते' या ग्रंथात (२००५) ते समाविष्ट आहे. या व्याख्यानाच्या निमित्ताने साधूंना भेटण्याची, त्यांच्याशी बोलण्याची संधी मिळाली.

२००७ मध्ये, नागपूरला होणाऱ्या ८०व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाचा बहुमान साधूंना मिळाला तेव्हा 'मुंबई मराठी साहित्य संघा'ने त्यांचे अभिनंदन व सत्कार करण्यासाठी कार्यक्रम आयोजित केला होता. कार्याध्यक्ष प्रा. उषा तांबे यांनी मला साधूंच्या साहित्याविषयी बोलायला सांगितले होते. माझे भाषण साधूंना व दिनकर गांगल यांनाही आवडले. साधूंनी कौतुकही केले, ते माझ्या अभ्यासाचे होते असेच मी समजते. संमेलनात, शैक्षणिक माध्यमाविषयीच्या परिसंवादात माझा सहभाग होता तेव्हा साधू उपस्थित होते आणि आपल्या अध्यक्षीय भाषणाची प्रत त्यांनी मला आवर्जून पाठवली या दोन्ही गोष्टींचे मला अप्रूप होते!

एप्रिल २०१२ मध्ये, साधूंच्या निवडक कथांचे पुस्तक मी

संपादित करावे अशी इच्छा त्यांनी फोनवरून व्यक्त केली तेव्हा मला साश्चर्य आनंद झाला. त्यानंतर त्यांनी पत्रही पाठवले, 'पुस्तके पाठवीत आहे. कथा आपणच निवडा... आपण यथायोग्य प्रस्तावना लिहालच. कल्पना लगेच स्वीकारली याबद्दल ऋणी आहे.' साधूंच्या पत्रातील विनम्रतेच्या सुराने मला फारच संकोचल्यासारखे झाले. काही वैयक्तिक अडचणींमुळे आणि लेखन ही गोष्ट माझ्यासाठी कष्टसाध्य असल्यामुळे या पुस्तकाच्या कामाला माझ्याकडून विलंब झाला तेव्हा मला अस्वस्थ व अपराधी वाटू लागले, पण साधूंनी जराही नाराजी व्यक्त केली नाही. त्यांच्या सौजन्याचा, साधुत्वाचा जो प्रत्यय आला तो विलक्षण होता. प्रत्यक्ष भेटी कमी झाल्या पण फोनवर जास्त बोलणे झाले. या कामात मला पूर्ण स्वातंत्र्य होते, माझ्या अभ्यासाबद्दल एक प्रकारचा विश्वासही साधूंच्या बोलण्यातून सूचित होत होता. कथांच्या निवडीबाबत आमचे एकमत झाले याचे मला समाधान वाटले. साधूंच्या कथांबरोबर त्यांचे इतर साहित्यही पुन्हा वाचले आणि त्याचे कथांशी असलेले नातेही लक्षात आले. ('कथा युगभानाची' या पुस्तकाच्या प्रस्तावनेत त्याचा समावेश आहे.)

'बेचका' या कथासंग्रहाची पहिली आवृत्ती १९९२ मध्ये प्रकाशित झाली होती आणि 'बेचका आणि आकाशाशी स्पर्धा करणाऱ्या इमारती' या नावाने दुसरी आवृत्ती २००८ मध्ये प्रकाशित झाली ही माहिती साधूंनाही नव्याने समजली. निवडक किंवा वेचक कथा अशा ठराविक स्वरूपाचे शीर्षक आम्हाला दोघांनाही योग्य वाटत नव्हते. साधूंच्या साहित्यिक व्यक्तित्वाचे मर्म सुचवणारे 'कथा युगभानाची' असे शीर्षक अगदी शेवटी मला सुचले, ते साधूंना व इतरही अनेकांना आवडले, समर्पक वाटले. मुख्य म्हणजे मी लिहिलेल्या प्रस्तावनेचे त्यांनी, नाशिकला झालेल्या पुस्तक प्रकाशनाच्या कार्यक्रमात (जानेवारी २०१५) कौतुक केले असे मला सुदेश हिंगलासपूरकर यांच्याकडून समजले तेव्हा आपण केलेल्या अभ्यासाचे सार्थक झाल्यासारखे वाटले. हे पुस्तक 'ग्रंथाली'ने प्रकाशित करणे साधूंच्या बाबतीत औचित्यपूर्ण होते. तसेच माझ्या, 'ग्रंथाली'शी असणाऱ्या नात्यामुळे मलाही आनंददायक होते.

नंतरच्या काळात, काही कार्यक्रमांच्या निमित्ताने साधूंना भेटता आले, पण त्यांची प्रकृती तेवढी बरी नव्हती. त्यामुळे, त्यांच्या साहित्याच्या संदर्भात तसेच अनेक वैचारिक व सांस्कृतिक प्रश्नांच्या बाबतीत त्यांच्याशी चर्चा करण्याची, त्यांची प्रदीर्घ मुलाखत घेण्याची इच्छा असूनही, त्यांना वारंवार भेटण्याचा मोह मी टाळला. आता साधू नसताना मात्र त्याबद्दल खंत व हळहळ वाटते. मला लिहिलेल्या पत्रात, काही कथांवर वाचकांच्या बऱ्यापैकी प्रतिक्रिया आल्यात असा उल्लेख होता. त्या कुठे आहेत, मला मिळतील का असे विचारल्यावर, ''एका बाहेरगावच्या अभ्यासकाने, झेरॉक्स करून मूळ पत्रे आणून देतो असे सांगून ती नेली आणि परतच केली नाहीत'' असे साधूंनी शांतपणे सांगितले! मला मात्र अस्वस्थ वाटले, रागही आला. त्या प्रतिक्रिया हे समाजाचे सांस्कृतिक धन होते, ते नाहीसे झाले. या लेखाच्या निमित्ताने त्या अभ्यासकाला ते धन परत करण्याचे मनापासून, कळकळीचे आवाहन करावेसे वाटते!

'जनस्थान पुरस्कार' काय किंवा 'महाराष्ट्र फाउंडेशनचा जीवनगौरव पुरस्कार' काय, आपली सांस्कृतिक समृद्धी वृद्धिंगत करणाऱ्या कलावंताचा कृतज्ञतापूर्वक केलेला तो सन्मानच असतो. पत्रकार व लेखक म्हणून अरुण साधूंचे असाधारण कर्तृत्व बहुमान्यच आहे, पण एक माणूस म्हणून त्यांचा साधेपणा, विरक्त अलिप्तता, आपली मते परखडपणे मांडतानाही दुसऱ्याची प्रतिष्ठा जपण्याची सहजवृत्ती, स्वतःचे कोणतेही दडपड येऊ न देण्याचा स्वभाव यांचा मला आलेला अनुभव सुंदर आहे, अविस्मरणीय आहे. युगभान असणाऱ्या या मोठ्या लेखनाने केलेल्या कौतुकामुळे माझा आत्मविश्वास वाढला, अभ्यासाचा नवा हुरूप आला हे निश्चित. लेखकाच्या निर्मितीबरोबर रसिकाचा आत्मप्रत्ययही महत्त्वाचा असतो हे साधूंनी माझ्यासाठी पुन्हा अधोरेखित केले याविषयीची ऋणभावना व्यक्त करून मी थांबते.

## 'कथा युगभानाची'

पत्रकार व लेखक असणाऱ्या अरुण साधू यांनी (मागच्या अर्धशतकात) वैचारिक व ललित या दोन्ही स्वरूपाचे महत्त्वपूर्ण लेखन केलेले असले तरी मराठी वाचक त्यांना मुख्यतः (दहा कादंबऱ्यांची निर्मिती करणारा) एक समर्थ कादंबरीकार आणि विशेषतः 'मुंबई दिनांक' (१९७२) व 'सिंहासन' (१९७७) या (राजकीय कादंबरीचा मानदंड निर्माण करणाऱ्या) कादंबऱ्यांचा कर्ता म्हणून ओळखतो. कादंबरीबरोबरच कथा, नाटक, एकांकिका, नियतकालिकांतील स्तंभ, चरित्र, अनुवाद, पटकथा अशा विविध रचनाप्रकारांतील लेखन आणि चीन, क्यूबा व रशिया या देशांतील क्रांती व ती घडवणारे क्रांतिकारक यांच्याविषयीचे इतिहासग्रंथ अशा विपुल निर्मितीतून साधूंचे साहित्यिक कर्तृत्व सिद्ध झाले आहे.

कादंबरीकार या नात्याने साधूंच्या योगदानाची जेवढी चर्चा झाली आहे तिच्या मानाने, सहा कथासंग्रह नावावर असूनही, कथालेखक म्हणून साधूंची पुरेशी दखल घेतली गेलेली नाही. १९८३ ते २००६ या कालावधीत हे सहा कथासंग्रह प्रकाशित झाले आहेत : १) 'बिनपावसाचा दिवस' (१९८३), २) 'एक माणूस उडतो त्याची गोष्ट' (१९८४), ३) 'मुक्ती' (१९८७), ४) 'बेचका' (१९९२) 'बेचका आणि आकाशाशी स्पर्धा करणाऱ्या इमारती' या नावाने दुसरी आवृत्ती (२००८), ५) 'मंत्रजागर' (१९९३) आणि ६) 'ग्लानिर्भवति भारत...' (२००६). याशिवाय 'झिपऱ्या' (१९९०) ही पंधरा कथांची मालिकाही वैशिष्ट्यपूर्ण आहे.

या 'सहा' संग्रहांत मिळून, साधूंच्या साठ कथा सामावलेल्या आहेत. 'बिनपावसाचा दिवस' या पहिल्या संग्रहात, कथेच्या पूर्वप्रसिद्धीचे संदर्भ दिलेले नाहीत, पण इतर संग्रहांमधील संदर्भांवरून, दोन-तीन कथा वगळता, बाकीच्या सर्व कथा, वेगवेगळ्या दिवाळीअंकांमधून प्रसिद्ध झाल्या आहेत हे लक्षात येते. (मराठीत, १९७५ नंतर वाङ्मयीन नियतकालिकांची उणीव तर दिवळीअंकांच्या संख्येत वाढ आढळते. तेव्हापासून बहुतेक महत्त्वाचे कथाकार दिवाळी अंकांसाठीच कथालेखन करीत असल्याचे दिसून येते.)

१९६२ मध्ये (म्हणजे वयाच्या एकविसाव्या वर्षी) अरुण साधू यांनी पत्रकारितेच्या जगात प्रवेश केला. 'माणूस' या नियतकालिकामुळे लेखक म्हणून त्यांच्याकडे वाचकांचे लक्ष प्रथम वेधले गेले. १९६६ मधील 'माणूस'च्या दिवाळी अंकातील, हंसा वाडकरांच्या 'सांगत्ये ऐका' या आत्मचरित्राचे साधूंनी केलेले शब्दांकन; १९६६-६७ मध्ये 'आणि ड्रॅगन जागा झाला' आणि १९७१-७२ मधील 'फिडेल, चे आणि क्रांती' अशा दोन अभ्यासपूर्ण मालिका, तसेच व्हिएतनामच्या लढ्यावरील लेखन, वाचकप्रिय ठरले. १९७२ मध्ये 'आणि ड्रॅगन जागा झाला' हे साधूंचे पहिले पुस्तक प्रकाशित झाले आणि त्याला वाचकांचा, विशेषतः सर्व स्तरांतील तरुणांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला. त्या संदर्भात साधूंनी ('ड्रॅगन जागा झाल्यावर' १९९५) या त्यांच्या नंतरच्या पुस्तकाच्या, २००५ मधील दुसऱ्या आवृत्तीच्या 'मनोगता'त) लिहिले आहे, ''...तरुणांच्या विविध चळवळींच्या माहोलाचे ते दिवस होते. केवळ भारतातच नव्हे, तर जगभर तरुणांच्या चळवळींनी वातावरणात विद्युन्मय जोष आला होत....पृथ्वीच्या पाठीवरील विषमता व दारिद्र्य नष्ट करण्याची, समतेवर आधारलेले न्यायी जग प्रस्थापित करण्याची स्वप्ने जगातील सर्व संवेदनाशील तरुणांना भारावून टाकत होती.'' त्या काळात, स्वतः अरुण साधूही परिवर्तनवादी युवकांचे प्रतिनिधी होते - पत्रकार, लेखक व व्यक्ती म्हणूनही, हे लक्षात घेतले पाहिजे. जगात चालू असलेल्या घडामोडींविषयी जबर काहीतरी वाटल्यानंतर त्याला वाट मोकळी करून देण्यासाठी साधूंनी क्रांती व क्रांतिकारक यांच्या इतिहासाचे कथन केले.

'मुंबई दिनांक' ही साधूंची पहिली कादंबरीही १९७२ मधलीच आहे. मुंबई हे अवाढव्य महानगरच सबंध कादंबरीचा केंद्रबिंदू आहे. विविध व्यक्तिरेखांच्या अनुरोधाने राजकारण, संघटना, सत्तास्पर्धा, स्मगलिंग, मध्यमवर्गीयांचे जीवन आणि त्यांचा हव्यास, कामगारांचे बकाल जीवन अशा अनेक गोष्टींचा वेध घेतला जातो. अशा प्रकारे, सुरुवातीपासूनच साधूंच्या निर्मितीला 'लोकल' आणि 'ग्लोबल' अशी दोन्ही परिमाणे लाभलेली दिसतात. साधूंच्या कथेची वाटचालही, 'लोकल' संदर्भांकडून 'ग्लोबल' संदर्भांकडे झेपावणारी आहे असा प्रत्यय येतो.

'कालदर्शी' (२००७) (संकल्पना-संयोजन - कमलेश वालावलकर, संपादन - शंकर सरडा) या, साधूंच्या वाङ्मयीन कामगिरीचा आलेख रेखाटणाऱ्या ग्रंथात, साधूंच्या तीन पूर्वप्रसिद्ध मुलाखती समाविष्ट केलेल्या आहेत. प्र.श्री. नेरुरकर ('ज्वाला', दिवाळी अंक, १९७९), नारायण बांदेकर ('ललित', एप्रिल १९८८) आणि पद्मभूषण देशपांडे ('ऋतुरंग', दिवाळी अंक १९९७) यांनी या मुलाखती घेतलेल्या आहेत. त्यातून, साधू यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण, त्यांची वैचारिक भूमिका व वाङ्मयीन वाटचाल याची कल्पना येते.

साधूंनी त्यांच्यावरील मार्क्सवादाच्या प्रभावाचे स्वरूप स्पष्ट केले आहेः 'मार्क्सवादी मला मार्क्सवादी मानत नाहीत. पण मी मला स्वतःला मार्क्सच्या तत्त्वज्ञानावर श्रद्धा ठेवणारा असा मानतो... मार्क्सवाद हा तुम्हाला बऱ्याच प्रश्नांची दृष्टी देणारा आहे. तसेच 'लेखक जर प्रामाणिकपणे लिहीत असेल तर त्याची मानसिकता, त्याची सामाजिक विचारसरणी आपोआप उमटतेच' अशी धारणा व्यक्त केली आहे.' साहित्य व समाज यांच्या परस्परसंबंधाबद्दल साधूंची भूमिका अशी आहे : संस्कृतीकारण आणि साहित्यकारण हे राजकारण, अर्थकारण व समाजकारण यांपासून वेगळे राहू शकत नाही. कलेचे स्वातंत्र्य व सार्वभौमत्व कोणीच नाकारू शकत नाही, पण तिचे पोषण समाजाला जोडलेल्या नाळेतून होते हेही खरे. (साहित्यसंमेलन अध्यक्षीय भाषण, २००७) त्याचबरोबर, 'लेखन कशासाठी' या प्रश्नाला 'जगणे समजावून घेण्यासाठी' असेच साधूंचे उत्तर आहे हेही लक्षात घेतले पाहिजे.

साधूंच्या कथालेखनाला, १९६७ पासून सुरुवात झालेली आहे. लोकसंख्याविस्तार हे त्यांच्या ('महाराष्ट्र टाइम्स'मध्ये प्रकाशित झालेल्या) पहिल्या कथेचे आशयसूत्र होते. तत्कालीन कथेविषयी साधू समाधानी नव्हते, ठराविक चाकोरीतल्या म्हणजे मध्यमवर्गीयांच्या काही समस्या, प्रेमामधल्या समस्या मांडणाऱ्या कथांना (त्यांच्यातले मनोविश्लेषण आवडले तरी) फारच मर्यादा असल्याचे त्यांना जाणवत होते. साधूंची कथेची कल्पना, कथेविषयीचा दृष्टिकोन वेगळा होता. लेखकाला जे जगाविषयी जाणवते त्याचा आवाका कथेत यायला पाहिजे, ती सर्वसमावेशक असायला पाहिजे असे सांगताना, त्यांनी ओ. हेन्री व मोंपासाँ यांच्या 'पॉइंटेड' कथांचा निर्देश केला आहे : 'खरोखर त्यात बारीकसा पॉईंट असतो. विस्तार होऊ शकत नाही फारसा. सगळे जग त्याच्यामध्ये येते. तशी जर कथा लिहिता आली तर कथा लिहावी' असे साधूंनी नमूद केले आहे.

साधूंच्या पहिल्या कथेला बाविसाव्या शतकाचा संदर्भ होता. लोकसंख्येच्या वाढीच्या धोक्याचे गांभीर्य जाणवल्यावर, जगातील सर्व राष्ट्रे कठोर उपाययोजना तयार करतात. माणसांची प्रतवारी करून, उपयुक्तता ठरवून, विशिष्ट वयाच्या टप्प्यावर प्रत्येकाचे आयुष्य इलेक्ट्रिक खुर्चीवर संपवण्याची एक यंत्रणा

उभारली जाते. पासष्ट वर्षांच्या एका महाराष्ट्रीयन गृहस्थाची बायको, कौटुंबिक समस्यांमुळे अगदी शेवटच्या क्षणी सहगमनाला नकार देते आणि तो एकटा मृत्यूला सामोरा जातो असे या कथेचे स्वरूप होते. या पहिल्याच कथेत, जागतिक संदर्भात मानवजातीच्या भवितव्याचा व गुंतागुंतीच्या मानवी संबंधांचा वेध, हे साधूंच्या कथाविश्वाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य दिसून येते. (१९७८ मधील 'स्फोट' या साधूंच्या कादंबरिकेतही लोकसंख्येचा विस्फोट हे सूत्र निराळ्या रीतीने आलेले आहे.)

'दंगा' (महाराष्ट्र टाइम्स, मार्च १९७३) ही साधूंच्या सुरुवातीच्या कथांमधील एक महत्त्वाची कथा आहे. कथानक, व्यक्तिरेखा, वातावरण, निवेदन, भाषा, रचना आणि या सर्वांतून सुचवला जाणारा कथेचा आशय - अशा सर्व दृष्टींनी. वांद्र्याच्या भटार चाळीतील, चार वर्षांचा हर्षद मेहता आणि पाच वर्षांची झुबेदा यांच्या मोटर-मोटर खेळात, जिन्याच्या चार पायऱ्या गडगडत गेल्यामुळे हर्षदच्या हनुवटीला लहानशी खोक पडते आणि त्यानंतर दोन्ही मुलांचे आईवडील, इतर चाळकरी यांचा प्रक्षोभ, पोलिस-चौकी, वर्तमानपत्रातली मीठमसाला टाकून दिलेली बातमी, जातीयवादी संघटना, मंत्री, कमिशनर, जमावाच्या झुंडी, अफवा, अश्रुधूर व गोळीबार, दिल्ली व इतर शहरांत स्फोट, भारतात आणीबाणी, पाकिस्तान रेडिओवरील बातम्या, संयुक्त राष्ट्रसंघाकडे तक्रार, अशा घटनांच्या मालिका वेगाने घडतात; शेवटी शांतता व वाटाघाटी मान्य होतात. दंगलीतले वैय्यर्थ सुचवतानाच, तर्कातीत समूहमन, समाजातील अंतःप्रवाह यांचाही वेध घेतला गेला आहे. मेहता, सिद्दीकी यांचा रमीचा डाव आणि दोन्ही मुलांचा लोकलचा खेळ यापाशी कथेचा शेवट होतो. सामान्य माणसांची जगण्यातली सहजता आणि मुलांची निरागस मैत्री, मानवी समाजासाठी आश्वासक व प्रेरक आहे हे त्यातून सूचित होते.

साधूंच्या कथेचे संदर्भविश्व विस्तृत आहे आणि सुरुवातीच्या कथांना मुख्यतः मुंबईची पार्श्वभूमी आहे. 'एक माणूस उडतो त्याची गोष्ट' या संग्रहातील, 'त्रिशंकू', 'ठिणगी' यांसारख्या कथांतून, कामगार संघटनांतही वर्ग, जात यांच्या आधारे होणारा सूक्ष्म भेदभाव सूचित झाला आहे. 'सायेब'मध्ये लरींरिश्रीं ुरीव मध्येही चालणाऱ्या भ्रष्टाचाराचे चित्रण आहे. 'सनसनाटी' या अर्थपूर्ण शीर्षक असलेल्या कथेतून, पत्रकारितेच्या क्षेत्रातील अपप्रवृत्ती उघडकीला आणल्या आहेत. 'निर्णय', 'संभ्रम' या कथा मंत्रालयातील राजकीय डावपेचांचे दर्शन घडवतात. सर्वसामान्य माणसाच्या सुखदुःखातली आस्थापूर्ण गुंतवणूक अनेक कथांत जाणवते. 'उभा' या कथेत सामान्य राजकीय कार्यकर्त्यांची उपेक्षा व्यक्त झाली आहे. 'कांबीकरची आनंदयात्रा'मध्ये त्याचा एकटेपणा सुचवत दुःखद शेवट झाला आहे. 'खिंडार'सारख्या कथेत समूहाच्या हिंसक, विकृत प्रवृत्तीचे दर्शन आहे. ('बसस्टॉप' या साधूंच्या एकांकिकेतही.) 'वसंत बिरेवारचा एक दिवस' या कथेत, संघपरिवारातल्या एका निष्ठावान कार्यकर्त्याचा भ्रमनिरास व कुचंबणा आलेली आहे. त्याच्या विचार-आचारातील बंदिस्तता साधू मांडतात पण कार्यकर्त्यांच्या घुसमटीविषयी खंत सूचित होते. 'एक माणूस उडतो त्याची गोष्ट' या प्रतीकात्मक कथेलाही सामान्य माणसाचे स्वप्न, महत्त्वाकांक्षा, आत्मविश्वास, यश, घेतलेली झेप या गोष्टींचा संदर्भ आहे. या गोष्टी जगाला मानवणाऱ्या नाहीत, लोकांना सुपरमॅनचे आकर्षण आहे पण सामान्याने उडण्याचा प्रयत्न करणे हा जणू गुन्हा आहे. साधूंच्या, नंतर लिहिलेल्या, अद्भुताच्या अंगाने जाणाऱ्या कथांचे बीज येथे आढळते.

'बंडखोर'मध्ये गणकयंत्राचा बळी होणारा माणूस आहे तर 'अजेंडा'मध्ये, 'यंत्रमानवाला प्राप्त झालेले पूर्ण स्वावलंबन, त्यामुळे मानवी जमातीच्या अस्तित्वाची अनावश्यकता आणि ती समूळ नष्ट करण्यासाठी योजण्याचे उपाय असा कार्यक्रमपत्रिकेवरील विषय आहे. नंतरच्या, कल्पिताच्या अंगाने जाणाऱ्या (विज्ञान) कथांची येथे चाहूल लागते.

साधूंच्या सुरुवातीच्या अनेक कथांमध्ये 'नाही रे' वर्गाविषयीची त्यांची आस्था व आदर ठळकपणे लक्षात येतो. आपल्या कादंबरीला अथवा कथासंग्रहाला अर्पणपत्रिका, प्रस्तावना वा मनोगत लिहावेसे साधूंना वाटलेले नाही. याला अपवाद 'झिपऱ्या' (१९९०) या कथामालिकेचा आहे.

'जे या अफाट महानगराच्या रेल्वे फलाटांवर, रस्त्यारस्त्यांवर आणि झोपड्या-झोपड्यांमध्ये होरपळून काढणाऱ्या दारिद्र्याशी मोठ्या धैर्याने एकाकी आणि शूर झुंज देत आपल्याला जीवनाचे स्फूर्तिदायक धडे देत असतात; ज्यांच्यासाठी आजवर आपण काहीही केले नाही, अशा हजारो अनाथ किशोरांना-'

ही अर्पणपत्रिका बोलकी आहे! १९७७ ते १९८७ या काळात या पंधरा कथा लिहिलेल्या आहेत. मुंबईच्या उपनगरी गाड्यांमध्ये वेगाने वाढणारी गर्दी आणि मुंबईच्या मध्यमवर्गीयांच्या राहणीमानाचा झपाट्याने वाढणारा दर्जा या दोन्ही गोष्टी गाड्यांमध्ये बूटपॉलिश करणाऱ्या मुलांच्या पोटावर पाय आणणाऱ्या. या कथांमध्ये या बदलाची पार्श्वभूमी आहे. पण साधू प्रस्तावनेत म्हणतात, ''मुख्य पार्श्वभूमी आहे ती या मुलांच्या खडतर लढाईची, त्यांच्या नैसर्गिक आशावादाची आणि त्यांच्या उत्कट नीतिमूल्यांची. ही मुलं सहज भीक मागून अधिक कमावू शकली असती. पण हे त्यांच्या नीतिमूल्यांमध्ये बसत नव्हते. त्यामुळे घाम गाळून, कष्ट करून प्रामाणिक उपजीविकेचा मार्ग त्यांनी पसंत केला. त्यांचा हा अपरंपार जीवनवाद आणि त्यांची आपल्या मूल्यांवरील निष्ठा - अशी निष्ठा की जी कुठल्याही परिस्थितीच्या रेट्याखाली दबू शकलेली नाही - या नतमस्तक करणाऱ्या गोष्टी आहेत असे मी मानतो.'' झिपऱ्या, त्याची बहीण लीला, त्याची माय, तिची शेजारीण सकीना, पिंगळ्या हा (दादागिरी करणारा) दादा, झिपऱ्याचे बूटपॉलिशवाले मित्र -

नाऱ्या, असलम, पोंब्या, दाम्या, गंजू - या प्रत्येकाचे स्वतंत्र अस्तित्व व व्यक्तित्व साधूंनी रेखाटले आहे.

'बिनपावसाचा दिवस' (१९८३) मध्ये (पाय) रिक्षावाल्यांचे जग उभे केले आहे. हमद्या, संपत, पंट्या, नाम्या, उस्ताद, हमद्याची म्हातारी आई या व्यक्तिरेखांचे प्रत्ययकारी चित्रण आहे. सेठकडून होणारे शोषण, टी.बी. सारखा आजार, 'माजलेत साले!' असा गिऱ्हाईकांचा दृष्टिकोन अशी परिस्थिती असूनही आयुष्यावर गाढ श्रद्धा असणारे, जगाविषयी कृतज्ञ असणारे असे हे कष्टकरी आहेत. ऑटोरिक्षावाल्यांचे आगमन हे आक्रमण ठरून पायरिक्षावाल्यांना बरबाद करणार आहे ही भीती व्यक्त झाली आहे : 'काळ्या आणि पिवळ्या रंगातल्या क्रूर हिंस्र श्वापदांसारख्या वाटणाऱ्या चौदा ऑटोरिक्षा गावावर चाल करून येत होत्या.' कथेची अखेर हमद्याच्या अपघाती मृत्यूने होते!

'बेचका आणि आकाशाशी स्पर्धा करणाऱ्या इमारती' (१९८७) हे शीर्षकच विरोधात्मक मांडणी सुचवणारे आहे, आणि साधूंनी, पहिल्याच वाक्यात व परिच्छेदात अतिशय परिणामकारक वर्णन केलेले आहे : 'चारही बाजूंनी गगनचुंबी इमारतींनी वेढलेल्या जमिनीच्या एका लहानशा बेचक्यातील ती गलिच्छ झोपडपट्टी, हिरेमाणकांनी जडवलेल्या हाराच्या मधोमध विष्ठेचा पोवटा पडावा, तशी दिसत होती. अशी ही दोन भिन्न जगे. उच्चभ्रू मंडळींना या झोपडपट्टीचा, त्यातल्या बांधकाम मजुरांचा तिटकारा. साधूंनी, त्यात राहणाऱ्या रंगी, तिचे आईवडील, नवरा बेक्या, सासू-सासरे यांचे जगणे पिढ्यानपिढ्या कसे अर्थपूर्ण व निर्माणक आहे ते सुचवले आहे, श्रमप्रतिष्ठा हे मूल्य अधोरेखित केले आहे. बेक्याच्या मृत्यूनंतर रंगीचा सासरा म्हणतो, 'आता तर तू धीर धरायला हवा, कारण तुझ्या पोटी बेक्याचा लेक आहे. मला पाय नसले तरी माझे हे हात समर्थ आहेत. अर्धं आयुष्य या हातांनी दगड फोडले आहेत. म्हणून हे लोखंडासारखे टणक आहेत...माझ्या बापानंही आपल्या हातांनी बड्याबड्या हवेल्यांच्या शिखरावरचे दगड ठेवले आहेत. माझ्या आजोबाच्या पणजोबांनी राजगडाच्या किल्ल्यासाठी दगड फोडले आहेत, त्यांच्या पणजोबांनी ताजमहालच्या पायाचे दगड बसविले आहेत आणि त्यांच्या आजोबांनीदेखील देवगिरीच्या मिनाराचा घुमट बसवला आहे. आपलं दिल्लीचं राष्ट्रपती भवन आणि संसद भवन आहे ना, त्यावरही आपल्या काका-मामांनीच कामं केली आहेत. हे सगळं आपलंच आहे. आपल्या घामापासून आणि रक्तमांसातून हे बनलं आहे... हे रस्ते, ही उपहारगृहे, या कचेऱ्या, हे इस्पितळ, हे कारखाने, हा समुद्र, हे आकाश, हे वारे, हे पर्वत....' अभिमान व दुःखावेग यांतून हे उद्गार निघाले आहेत.

'मान्सूनस्य प्रथम दिवसे' (१९९०) हे कथेचे शीर्षक व कथेची रचना वैशिष्ट्यपूर्ण आहे. 'आषाढस्य प्रथम दिवसे' ही कालिदासाच्या 'मेघदूता'ची सुरुवात आठवते पण त्या रोमॅन्टिक प्रवृत्तीला छेद देणारी अशी ही कथा आहे. विभिन्न अशा नऊ संदर्भांतून 'मान्सून'कडे पाहण्याचे वेगवेगळे दृष्टिकोन, प्रतिक्रिया व परिणाम मांडले आहेत. त्यातून कथेला आर्थिक, सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक अशी परिमाणे प्राप्त होतात.

'लक्ष्मीची निष्ठाविहीन सून' व 'वासांसि जीर्णानि' या कथांमध्ये, झोपडपट्टीत राहून मध्यमवर्गीय व उच्चवर्गीय घरांमध्ये प्रामाणिकपणे काम करणाऱ्या मोलकरणींचे वर्णन साधूंनी व्रतस्थ/व्रती असे केले आहे. बाबूला त्याची माय, मालकिणीला निरोप द्यायला सांगते, 'म्हना, माज्या मायला लेकरू झालं हाय, नं ती दोन दिवस नय येनार कामाला...' 'मध्यंतर'मधील उच्चभ्रू गृहिणीला मोलकरणींच्या जबरदस्त जीवनसंघर्षाची जाणीव होते; कष्टाळूपणा, जगण्याची जिद्द, चिकाटी, धाडस, मनाचा कणखरपणा आणि सुप्त आशावाद या त्यांच्या गुणांची थोरवी लक्षात येते आणि तिची आयुष्याकडे पाहण्याची दृष्टीच बदलून जाते. मग झोपडपट्टीत काम करायला लागल्यावर ती मैत्रिणीला सांगते, 'जगात आपल्याशिवाय इतरत्र काळजी करण्यासारख्या खूप आणि प्रचंड गोष्टी आहेत. या काळज्या करायला तू शिक. मग स्वत:च्या काळज्या नगण्य वाटून विसरायला होतील. जगण्यालाही काही अर्थ प्राप्त होईल.' सहानुभाव/सहभाव (एंपथि) या मूल्याचे महत्त्व सहजपणे सुचवले गेले आहे.

'त्यांच्या प्रखर सामाजिक जाणिवांचे निखारे' या कथेत, सामाजिक जाणीव कशी बोथट होत जाते व हळूहळू अपराधीपणाची भावनाही पार लयाला कशी जाते याचे, प्रल्हाद पात्रीकर या मुळात, डावी विचारसरणी असलेल्या पात्राकरवी, तीव्र तिखट उपरोधातून चित्रण केले आहे. कथेच्या ओघात, भांडवलशाही, नक्षलवाद, मध्यमवर्गीय कुटुंब, 'जात'विषयक जाणिवा, 'डिक्लास' व 'डिकास्ट' होणे, दत्ता सामंत यांच्या नेतृत्वाखाली होणारा गिरणी कामगार संप, स्त्रीमुक्ती, कष्टकऱ्यांच्या संघटना यांविषयी संभाषण व युक्तिवाद होऊन कथेला चांगली 'चर्चाकथा' असे रूप प्राप्त होते.

साधूंच्या 'पडघम' (१९८५) या नाटकातही प्रस्थापित व्यवस्थेविरुद्धचा संघर्ष ही अखंड चालणारी प्रक्रिया आहे हे सुचवले जाते. त्यांच्या 'शोधयात्रा' (१९८९) या कादंबरीतही समाजपरिवर्तनवादी नायकाची वाटचाल आहे. 'चुकवाचुकवी' या कथेतही ध्येयवादी तरुणाची अस्वस्थ करणारी कहाणी येते.

'मंत्रजागर' (१९९३) आणि 'ग्लानिर्भवति भारत...' (२००६) या दोन संग्रहातील कथांचा वेगळेपणा, संग्रहांच्या शीर्षकांपासूनच लक्षात येणारा आहे. यांतील काही कथांतून समकालीन सामाजिक व राजकीय परिस्थितीचे चित्रण केलेले आहे तर काही कथांतून, मानवी संस्कृतीची अवनती व मूल्यहीन होत जाणाऱ्या मानवजातीचे भवितव्य अशा व्यापक संदर्भातील प्रगल्भ चिंतन व्यक्त झाले आहे. मानवजातीच्या भवितव्याविषयीच्या साधूंच्या कथेतील जाणिवा, कवी मर्ढेकरांची आठवण जागी करणाऱ्या आहेत. माणसाचे स्वत्व आणि

मनुष्यबळ नाहीसे करून संज्ञेला बधिरता आणणाऱ्या वैज्ञानिक संस्कृतीविषयीची मर्ढेकरांना वाटलेली खंत त्यांच्या कवितेतून व्यक्त झाली. ज्ञानविज्ञानाच्या महत्त्वाबरोबर त्याच्या मर्यादा, अंतर्विरोध मर्ढेकरांना जाणवले. मर्ढेकरोत्तर काळातील विज्ञानाची प्रगती, तंत्रवैज्ञानिक संस्कृती, बाजारीकरण, कॉर्पोरेट अर्थकारण इत्यादींचे होणारे दुष्परिणाम, धोके व विरोधाभास यांविषयीचा इशारा साधूंची कथा देत आहे. 'वेळ फार थोडा उरला आहे' (१९८४) या कथेत, (अतिप्रगत संस्कृती असलेल्या) परग्रहावरचा रहिवासी १९०८ पासून पृथ्वीवर राहात आहे. अफाट सर्जनशीलतेतून माणसाने निर्माण केलेल्या विविध संस्कृती, कला, संगीत, शिल्पकला, स्थापत्य या सर्वांतील सौंदर्य, वेड लावणारा निसर्ग यांमुळे त्याला पृथ्वीविषयी प्रेम वाटत आहे. पण माणसाचा मूर्ख लोभीपणा, निसर्गाची बेसुमार लूटमार करण्याचा करंटेपणा, अफाट रक्तपिपासा, भयानक शोषणाची प्रवृत्ती, आत्मघाताची विकृत ऊर्मी या अपप्रवृत्तीही लक्षात आल्यामुळे तो इशारा देत आहे, 'वेळ फार थोडा उरला आहे, अणुयुद्धाचा टाइमबॉम्ब टिकटिक करतो आहे. हा आत्मनाश तुम्ही थांबवू शकता.' 'मंत्रजागर' (१९८४) या दीर्घकथेतही, सर्जन विरुद्ध संहार हेच केंद्रवर्ती आशयसूत्र आहे. भयंकर अण्वस्त्रस्फोटांतून स्वतःला वाचूव शकलेली परंतु त्यांचे भीषण परिणाम भोगीत माणसे, दूर पर्वतपायथ्याशी असलेल्या गुंफांमध्ये कशीबशी जगत आहेत, आणि तिसऱ्या पिढीनंतर तरी नवी निरोगी सशक्त पिढी निर्माण होईल अशी आशा करीत आहेत. या कथेतील पात्रांची नावे (कांगा, लुंगी, पोगा, बिंदू इत्यादी) व निराळी भाषा यामुळे प्रभावी वातावरणनिर्मिती साधली आहे, उदाहरणार्थ वार्षिक मंत्रजागराची भाषा- 'हल्... हलल्... हल्लो.. ... येकाल्ल हल्लो ऽऽ दोनाल्ल हल्लो... तितिनाल्ल हल्लो... अक्ष-अक्ष अंशातल्लो... आधार हल्लो... हल्ल रिखाशल्लो.... पोंगा.... विंदू... ऽऽ हल्लो... फांगा... पोंगा... विंदू. हल्लो ऽऽऽ हल् हललल् हल्लोऽऽ-'

'विप्लवा' (१९७८) ही साधूंची कादंबरीही, नव्या जगाची वाढती युद्धपिपासू वृत्ती आणि अण्वस्त्रस्पर्धा यांच्याकडे लक्ष वेधणारी होती. कादंबरीच्या सुरुवातीचे पान विलक्षण अर्थसूचक आहे.

सहा ऑगस्ट, एकोणिसशे पंचेचाळीस,
सकाळी आठ वाजून पंधरा मिनिटे
– हिरोशिमा

ही, दुसऱ्या महायुद्धात, हिरोशिमावर बॉम्ब टाकल्याची तारीख आहे) आणि त्याखाली एका चिनी शास्त्रज्ञाचे विधान उद्धृत केले आहे :

''अरेरे! ही शोकांतिका आहे. पण ही विज्ञानाची शोकांतिका नसून मानवी समाजाची शोकांतिका होय.''
– सिओ झिलार्ड

'प्रारंभ, बसस्टॉप व इतर तीन एकांकिका' (१९९८) या संग्रहातही दुष्काळ, दारिद्र्य, शोषण, युद्ध व हिंसक प्रवृत्ती यांवर भेदक व औपरोधिक प्रहार केला आहे.

'फुलपाखराच्या स्वप्नातील माणूस' (१९९९) या कथेत, विश्वास काळीकर या प्रमुख व्यक्तिरेखेला, 'अॅम आय अ हिपोक्रॅट?' असा मूलभूत प्रश्न सतावतो आहे. उच्चभ्रू कॉर्पोरेट जग, स्वयंसेवी संस्था, विविध व्यवस्था (उदाहरणार्थ पत्रकारिता, शिक्षण, न्याय), कौटुंबिक नाती यांतील भ्रष्टाचार, स्वार्थीपणा, संधीसाधू वृत्ती, दांभिकता, वाढती अमानुषता यांचे दर्शन साधू घडवतात. स्वतःचे दुहेरी, दुटप्पी आयुष्य जाणवून, विश्वासला एका चिनी तत्त्ववेत्त्याची गोष्ट आठवते- स्वप्नात त्याला आपण फुलपाखरू असल्याचे दिसले होते. जाग आल्यावर त्याला प्रश्न पडला, माणूस म्हणून आपण स्वप्नात फुलपाखरू असल्याचे पाहिले, ते वास्तव – की याक्षणी आपण खरे फुलपाखरू असून, त्या फुलपाखराच्या स्वप्नात माणूस म्हणून स्वतःला पाहतो आहोत? पूर्ण विजनावस्थेत जाण्याचा विचार विश्वासच्या मनात येतो.

'ग्लानिर्भवति भारत...'मध्ये अशोक नेने हा प्रामाणिक, बुद्धिमान संशोधक एका भ्रष्ट, मुजोर अधिकाऱ्यापुढे विजयी ठरूनही, सत्य दडपले गेल्यामुळे पराभूत कसा होतो याचे अस्वस्थ करणारे, विदारक चित्रण केले आहे. दिल्लीतील 'पॉवरमॅनिया' त्यातून लक्षात येतो. 'धिस सोसायटी हॅज बिकम सिक' हे या कथेचे आशयकेंद्र आहे. 'आपली जर ही अवस्था, तर या देशातील सामान्य लोकांची स्थिती काय असेल' असा प्रश्न अशोकच्या मनात येतो. 'आपण फाइट करत राहायचं' असा निग्रहही मॅथ्यू हा संपादक बोलून दाखवतो.

'प्रस्तावनाः इ.स. २०३५' या प्रदीर्घ कथेचा घाट व बाज, (ग्रंथ) प्रस्तावनेचा आहे. अमेरिकन परंतु भारतीय वंशाच्या एका तरुण लेखकाने २०३५ साली 'हिंदी उपखंडाचे' एकसष्ट घटकराज्यांमध्ये विघटन झाले त्याची कारणमीमांसा करणारा जो ग्रंथ लिहिला, त्याला ऐंशी वर्षांच्या एका भारतीयाने लिहिलेली ही प्रस्तावना. भारताच्या १९९४ पर्यंतच्या स्थितीचा सर्वांगीण वेध घेत उद्याच्या स्थितीचे चित्र रंगवणारी. जात, धर्म, भाषा, प्रदेश, संस्कृती यांच्या आधारे उत्पन्न होणारे भेदभाव, आर्थिक विषमता, भ्रष्टाचार, आत्मकेंद्री चंगळवाद, हिंसाचार, नैतिक व बौद्धिक दिवाळखोरी, मूल्यहीनता अशा अनेक अपप्रवृत्तींचे विश्लेषण करणारी कथा, साधूंचे भारतीय व जागतिक समाजकारणाविषयीचे चौफेर आकलन व्यक्त करणारी आहे.

सांस्कृतिक अवनतीचे एक गंभीर लक्षण म्हणजे मानवी संवेदनशीलता व सर्जनशीलता यांवरच होणारे आक्रमण होय, ही जाणीव 'आनंदयात्रा' या कथेत दाहकपणे आली आहे. 'ओसामा : एक हॉलीवूड फॅन्टसी' हे शीर्षकच बोलके आहे. विकृत करमणुकीचे व्यसन समाजाला लावणे व लागणे या प्रवृत्तींवर येथे

भाष्य आहे. प्रत्येक गोष्ट एनकॅश करण्याचा हव्यासही सुचवला आहे. 'प्रत्येक गोष्ट... वास्तवापेक्षा अधिक रंगतदारपणे, अधिक नाट्यमय करता येईल... आणि रिअल लाईफ शॉट्स काय केव्हाही घेता येतील' हे सवंग करमणुकीच्या जगाचे ब्रीद वाक्य आहे. ('गिधाड, विमान आणि ठंडक-ठणका' या साधूंच्या एकांकिकेतही 'आपलं मार्केट हाच खरा आपला स्वर्ग!', 'दुष्काळावर मात करण्याचा एकच उपायऽऽऽ / ठंडक ठणका-ठंडक ठणका' अशा औपरोधिक जाणिवा आहेत.)

साधूंची कथा आशयघन कथा आहे. ती वाचताना, भाषाशैलीची वेगळी अशी जाणीव होत नाही. पण आशयानुसार नर्म विनोदी, उपरोधात्मक, गंभीर, काव्यात्म असे वळण ती कशी घेते याची काही उदाहरणे विवेचनाच्या


ओघात आली आहेतच. 'बेचका'मधील बांधकामाचे संगीत व 'कांबीकरची आनंदयात्रा'मधील लोकलचे संगीत ही वर्णने; तसेच 'एक संभाषण'मधील 'त्यांचे संभाषण कसे असावे? ढगांनी ढगांना भिडून गडगडावे तसे... वाऱ्याने वाऱ्यात मिसळावे किंवा समुद्राने स्वत:शीच हितगुज करावे तसे. पर्वतशिखरांनी एकमेकांसमोर डोळे मिटून ध्यानस्थ बसले की भव्य पाषाणांची टक्कर होऊन त्यातून तेजस्वी ठिणग्या बाहेर पडाव्यात', यांसारखे वर्णन साधूंच्या भाषेतील काव्यात्मतेचा प्रत्यय देतात. ('मुखवटा' या साधूंच्या कादंबरीतील कविताही या संदर्भात लक्षणीय आहेत.) तीन-चार कथा वगळता, सर्व कथा, तृतीय पुरुषी निवेदनपद्धतीचा अवलंब करणाऱ्या आहेत. त्यामुळे वस्तुनिष्ठता, त्रयस्थता प्राप्त व्हायला साहाय्य होत असावे. निवेदन प्रमाण मराठी भाषेत आणि संवाद पात्रानुसार बोलीत अशी साधूंची भूमिकाच आहे. दैनंदिन वापरातले अनेक इंग्रजी शब्द तसेच योजलेले आहेत, प्रतिशब्दांची कृत्रिमता नाही. हिंदी, गुजराती, इंग्रजी यांसारख्या भाषांचाही संवाद, संभाषणासाठी सहज उपयोग करून घेतलेला दिसून येतो. भाषिक किंवा कुठल्याच प्रकारच्या सजावटीचा भाग या कथेत (किंबहुना साधूंच्या एकूण निर्मितीत) आढळत नाही. एखाद्याच कथेला 'किल्ला' ही समर्पक प्रतिमा असणारे शीर्षक दिलेले आहे.

अरुण साधू यांच्या कथाविश्वातून प्रत्ययाला येणाऱ्या त्यांच्या व्यक्तित्वाचा विचार करताना, वसंत आबाजी डहाके यांनी योजलेल्या 'आत्मभान' व 'विश्वभान' या संज्ञांची आठवण होते. डहाक्यांचे विधान असे आहे : 'आत्मभान टिकवून ठेवायचं आणि विश्वभानही राखायचं, या दोन्ही गोष्टींमध्ये योग्य ते संतुलन कसं ठेवायचं हा वर्तमानकाळातला पेच आहे.' (संक्षिप्त मराठी वाङ्मयकोश, २००४. 'आमुख' ही प्रस्तावना.) साधूंना हे संतुलन साधले आहे असे दिसून येते. मराठी माणूस तसेच भाषा, समाज, संस्कृती व मूल्यव्यवस्था यांविषयी साधूंनी, वृत्तपत्रीय स्तंभ, लेख, भाषणे यांतून विलक्षण आस्थापूर्वक सातत्याने महत्त्वाची मांडणी केली आहे, भूमिका घेतली आहे. 'रमण दिवेकरची अफलातून मराठी अस्मिता', व 'प्युअर मराठीच्या शोधात शास्त्रीबुवा' व 'प्रस्तावना : इ.स. २०३५' या कथांनाही हा संदर्भ आहे आणि त्याला नर्मविनोद, उपरोध, सांस्कृतिक इतिहास अशी विविध अंगे आहेत. 'सत्यच पण..'मध्ये जोतिबा, आगरकर व आंबेडकर यांच्या कल्पित संभाषणातून समाजसुधारणेविषयी (भूत-वर्तमान-भविष्य अशी काळांची गुंफण करीत) भाष्य केले आहे. समकालीन सामाजिक व राजकीय जीवनाचा वेध हे तर साधूंचे मोठेच बलस्थान आहे. पात्रांच्या व्यक्तिगत जीवनाचे चित्रण करीत असतानाच प्रवाही सामाजिक वास्तवाची जाणीव करून देणारी अशी साधूंची कथा आहे. या समग्र आत्मभानासह परिवर्तनशील युगजाणिवेपर्यंत ते झेपावले आहेत. त्यांच्या आत्मभानाला व विश्वभानाला मूल्यनिष्ठेचे अधिष्ठान आहे, साहित्यकृती जीवनाला जितक्या जास्त गंभीरपणे सामोरी जाते तितकी तिच्यातली नैतिक बाजू महत्त्वाची होत जाते हे साधूंच्या कथानिर्मितीतून प्रत्ययाला येते.

'ग्लानिर्भवति भारत' या संग्रहानंतर साधूंनी फारशा कथा लिहिलेल्या दिसत नाहीत. 'शब्दरुची'मधील अरुण मार्तंड (साधू) यांची 'इनोसंट गेम' ही कथा तंत्रज्ञानाचे थरारक वास्तव मांडणारी आहे आणि ते खरे तर 'इनोसंट' नाही, असा इशारा देणारेच आहे! 'पद्मगंधा'मधील 'नैनं छिन्दन्ति शस्त्राणि' या कथेचे शीर्षक 'मंत्रजागर' व 'ग्लानिर्भवति भारत' या संग्रहशीर्षकांशी नाते सांगणारे आहे. मेघश्याम हा कृत्रिम मानवी मेंदू तयार करण्याविषयी संशोधन करणारा असाधारण शास्त्रज्ञ आणि त्याचा मेहुणा हा पौर्वात्य संस्कृतीचा जगप्रसिद्ध प्राध्यापक या दोन व्यक्तिरेखांच्या चर्चांतून होणारा विज्ञान व अध्यात्म या संदर्भातील विचारविनिमय अनोखा आहे. बेफाम प्रगतीच्या परिणामी अधोगती होऊन 'मानवी संस्कृतीच्या शेवटाची सुरुवात' अशा अवस्थेकडे आपण येत आहोत की काय अशी भीती वाटल्यावर, आधुनिक ज्ञानपिपासा व संचय आणि निसर्गातील आनंद; तसेच सामाजिक, सांस्कृतिक व मानसिकदृष्ट्या शांत, समाधानी व समृद्ध जीवन यांमध्ये समतोल साधला पाहिजे या निष्कर्षाला मेघश्याम येतो; इतकेच नव्हे तर हे संतुलन कसे साधता येईल त्या प्रयत्नांसाठी पुढील आयुष्य वाहण्याचा निर्णय घेतो. साधूंच्या परिपक्व व सकारात्मक जीवनदृष्टीचा प्रत्यय देणारी अशी ही आशयसंपन्न कथा आहे. साधूंचा कथेविषयी जो दृष्टिकोन आहे, 'लेखकाला जे जगाविषयी जाणवते, त्याचा आवाका कथेत यायला पाहिजे, ती सर्वसमावेशक असायला पाहिजे;' ती कथा साधूंना खऱ्या अर्थाने सापडली आहे.

**– मीना गोखले**

भ्रमणध्वनी : ७०४५३७९०५२




# द्रष्टा सुहृद

▶ डॉ. जब्बार पटेल

आत्ताही त्या काळाचा तुकडा लख्खपणं आठवतो आहे... तो काळ चळवळींचा होता. नाट्य, साहित्य, दलित आदी अनेक चळवळी चालू होत्या. 'ग्रंथाली' ही फारच वेगळी अशी साहित्यिक चळवळ त्या काळात चालली होती. अनुभवी लेखकांसह नवीन कवी, लेखक लिहीत होते. वैविध्यपूर्ण साहित्य प्रकार निर्माण होत होते. या सगळ्या उलथापालथीतून काही नवीन गोष्टी, नवे विचार निर्माण होत होते. स्वातंत्र्य मिळून साधारण वीसेक वर्षं होऊन गेली होती. या काळात राजकारण, समाजकारण बदलत चालले होते. याच काळात माझी भेट विजय तेंडुलकर, अरुण साधू, दिनकर गांगल, कुमार केतकर या मंडळींशी झाली. सुरेख असा वैचारिक संक्रमणाचा काळ होता तो...

अरुण साधूंकडे असणाऱ्या विद्वत्तेचं त्यांनी कधीच प्रदर्शन केलं नाही. फार कमी वेळा असं घडतं. जगातल्या डाव्या चळवळी, क्रांतिकारी चळवळी असतील, लॅटिन अमेरिकन चळवळी असतील किंवा क्युबा असेल, हे सगळं पचवून पुन्हा भारतीय तत्त्वज्ञानामध्ये काय-काय झालं, असा अत्यंत व्यापक अभ्यास त्यांनी केला आणि तो वेळोवेळी मांडलादेखील. त्यांचे विचार अत्यंत फिलॉसॉफिकल, वैचारिक, सामाजिक होते. या सगळ्यात महत्त्वाची गोष्ट अशी की, ते पत्रकार होते. त्यामुळं सभोवताली चाललेल्या या सगळ्या घडामोडी सजगतेने टिपून आणि या सगळ्या गोष्टी त्यांनी सामान्य माणूस केंद्रिभूत धरून मांडल्या. त्यातला मानवतेचा पाया त्यांनी कधीही ढळू दिला नाही.

'सिंहासन' कादंबरी माझ्या वाचनात आली, त्या सुमारास मी 'सामना' आणि 'जैत रे जैत' हे चित्रपट केलेले होते. तेंडुलकरांची पटकथा असणारा 'सामना' हा पहिला राजकीयपट म्हणून खूप गाजला होता. 'सिंहासन' आणि 'मुंबई दिनांक' या दोन्ही कादंबऱ्या पुन्हा वाचल्यावर लक्षात आले की बरीचशी पात्रं एकमेकांशी संबंधित आहेत. दोन्हीकडे मुख्यमंत्री, कामगार नेते, पत्रकार आहेत. 'सिंहासन'मध्ये एक व्यापक जग आहे. ती परिस्थितीची जाणीव करून देते. राजकीय प्रवाहाबद्दल, व्यक्तिरेखांच्या माध्यमांतून बोलते. तर 'मुंबई दिनांक'मध्ये अंतःप्रवाह हा 'सिंहासन'पेक्षा जास्त भिडणारा आहे. तेव्हा वाटलं हे एक धाडसच होईल, पण ते करायला हवं. मग साधूंना भेटलो आणि या दोन्ही कादंबऱ्यांवर एक चित्रपट करायचा आहे असे सांगितले. नेहमीप्रमाणे ते म्हणाले की, ''तू गंमत करतो आहेस, मला माहिती आहे, पण हे शक्य नाही. तरी विचार करतो.'' नंतर पुन्हा भेटल्यावर त्यांनी सांगितलं की, ''या दोन्ही कादंबऱ्या, माझीच अपत्य. त्या एकत्र करायच्या म्हणजे फार अवघड आहे. तू ही पटकथा लिहायला तेंडुलकरांना सांगावंस. कारण ते त्यांना योग्य न्याय देऊ शकतील.''

मग तेंडुलकरांकडे गेलो. त्यांना हा सगळा विषय सांगितला. ते म्हणाले की, ''सिंहासनच्या कॅन्व्हासवर 'मुंबई दिनांक'मधील पात्र दिसत आहेत. त्यांचा कोलाज आहे.'' पाच-सहा दिवसांनी पुन्हा भेटल्यावर तेंडुलकर म्हणाले की, ''या चित्रपटाचा जॉनर पॉलिटिकल थ्रिलर असेल. तुला आवडेल का करायला?'' मी लगेच होकार दिला. या दोन कादंबऱ्यांत लपलेली एक गोष्ट त्यांनी पहिल्यांदा सांगितली ती म्हणजे - चित्रपटाच्या सुरुवातीला मुख्यमंत्र्यांना फोन येतो - ''तुमच्या राज्याला धोका आहे...'' त्या एका ठिणगीवर अख्खा अडीच तासांचा सिनेमा उभा राहिला. मुख्यमंत्री आणि अर्थमंत्री यांच्यातला हा सत्तेचा लढा आहे. त्यानंतर तेंडुलकरांनी 'सिंहासन'चे पटकथा लेखन केले. उत्कृष्ट संवाद लिहिले. ती पटकथा साधूंकडून तपासून घेतली. त्यावर साधू म्हणाले की, ''आता ही कथा माझी नाही. माझं फक्त कथाबीज आहे. हा तेंडुलकरांचा विचार आहे. दोन कादंबऱ्यांच्यावरून त्यांनी घेतलेला हा टेक ऑफ आहे.'' त्यानंतर आम्ही तिघे भेटलो. आमची चर्चा झाली. कथेत

जवळपास ४० मुख्य पात्र आहेत. त्या काळात (१९७९) सिनेमाचं बजेट साडेचार लाख होतं. 'कलाकार तुम्ही ठरवा,' असे साधूंनी सांगितले होते. मुख्यमंत्री आणि अर्थमंत्री कोण कलाकार असतील, याविषयी त्यांना उत्सुकता होती. निळूभाऊ फुले यांची निवड पत्रकार म्हणून केली. एका पत्रकाराच्या नजरेतून केलेले मुख्यमंत्रीपदासारख्या राजकीय सत्तापदासाठी चालणारे राजकारण, यात भरडली जाणारी प्रजा आणि कायम अनुत्तरित राहणारे सामाजिक प्रश्न याचे यथार्थ चित्रण यात येते. तेंडुलकरांच्या लेखणीतून त्या पत्रकराची चित्रपटाच्या शेवटी असणारी भ्रमित अवस्था चित्रित झाली. दिगूच्या पात्राचा संवादांपेक्षा देहबोली आणि चेहऱ्यावरच्या भावभावनांतून भोवतालचा कोलाहल आणि त्यावरची प्रतिक्रिया दाखवावी, अशी कल्पना होती. तेंडुलकरांना 'मुख्यमंत्री' या पात्रासाठी अरुण सरनाईक यांचं नाव सुचलं आणि ते पक्कं झालं. पाठोपाठ डॉ. श्रीराम लागू, दत्ता भट, सतीश दुभाषी, डॉ. मोहन आगाशे, जयराम हर्डीकर, नाना पाटेकर आदी एकाहून एक दिग्गज कलावंतांची निवड झाली. सूर्यकांत लवंदे हे अनुभवी छायाचित्रकार लाभले. संगीत हृदयनाथ मंगेशकर यांचं लाभलं. शीर्षकगीतासाठी कविवर्य सुरेश भट यांच्या 'उषःकाल होता होता' या गीताला रवींद्र साठे आणि आशा भोसले यांचे स्वर लाभले.

चित्रीकरणासाठी माझ्याकडं फक्त महिना होता. त्यासाठी जागेचा विचार सुरू झाला. तेव्हा राज्याच्या मुख्यमंत्रीपदी शरद पवार होते. मंत्रालय परिसर आणि बंगल्यांचा सेट उभारायला अवधी नव्हता. मग थेट मंत्रालयातच चित्रिकरण करायची परवानगी मागितली. हा विषय शरद पवार यांना कळल्यावर त्यांनी मुख्य सचिवांसोबत बैठक बोलावली. सचिव चित्रीकरण करता येणार नाही, असं परोपरीने सांगत होते. शरद पवार यांनी विचारपूर्वक सगळे ऐकून घेतले आणि ते शांतपणे म्हणाले की, "शुक्रवार, शनिवार आणि रविवार या तीन दिवशी चित्रीकरण करून देण्यास काय हरकत आहे?" फक्त दैनंदिन कामकाजात बाधा येऊ नये, असं सांगून त्यांनी परवानगी दिली. पवार यांच्याकडील बैठक संपल्यावर तत्कालीन उपपंतप्रधान यशवंतराव चव्हाण त्याच वेळी मुंबईत आले होते. त्यावेळी चित्रीकरणाविषयीची ही गोष्ट यशवंतरावांच्याही कानी घाला, असे मला पवार यांनी सुचवले. त्यानुसार मी यशवंतरावांना सविस्तर माहिती दिली. यशवंतराव यांनी "या चित्रपटाच्या कामात साधू तुमच्यासोबत आहेत ना," हे आस्थेने विचारून घेतले. "त्यांचे मार्गदर्शन जरूर घ्या, कारण हे जग त्यांनी जवळून पाहिले आहे. ते किती खरं आणि किती खोटं याची कल्पना त्यांना आहे," असे सांगून त्यांनी मला "चित्रपटामुळे लोकशाहीवर गदा येईल, असे काही करू नका," असा सल्ला दिला. 'सिंहासन'च्या चित्रीकरणादरम्यान साधू बहुतांशी वेळा हजर असायचे. माझा मोठा आधारच होता तो... चित्रपट प्रसिद्ध झाल्यानंतरच्या सुवर्णक्षणांचा इतिहास सगळ्यांना माहिती आहेच. 'सिंहासन' ५० आठवडे चालला आहे, ही गोष्ट साधू यांना अचंबित करणारी ठरली. त्यांनी कधी याचं श्रेय स्वतःकडे घेतले नाही. "चित्रपट हे दिग्दर्शक आणि पटकथाकाराचे माध्यम आहे," असे ते कायम म्हणायचे.


'पडघम' हे नाटक साधू यांनी लिहिले होते १९८०-८१मध्ये. मी दिग्दर्शित केलेले हे नाटक रंगमंचावर आले ते १९८३मध्ये. नाटक लिहिले, तेव्हा आणीबाणी संपून जनता सरकारची इतिश्री झाली होती. इंदिरा गांधी पुन्हा सत्तेवर आल्या. वातावरण थिजल्यासारखे झाले. एक प्रकारची मरगळ आसमंतात भिनू लागली होती. भूतकाळापासून ब्रेक घेऊन नवे युग अवतरण्याची, उत्साहाची नवी ऊर्जा देऊ शकेल अशा नव्या नेत्याच्या उदयाची अपेक्षा लोकांना होती. नाटकाचा फॉर्म होता पथनाट्याचा. पथनाट्याच्या प्रसंगांची साखळी या नाटकात गुंफली गेली होती. जुन्या-नव्या पिढीचा वैचारिक, सत्तेसाठी संघर्ष यात चित्रित केला आहे. दुर्दैवाने ही परिस्थिती आजही बदलेली नाही. नंतरच्या काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावरील चित्रपट आम्ही केला. चित्रपटाचे लेखन सूनी तारापोरवाला, अरुण साधू, दया पवार यांनी केले आहे. साधू वेळोवेळी सूचना करायचे, मार्गदर्शन करायचे. 'यशवंतराव चव्हाण - बखर एका वादळाची' या चित्रपटाच्या वेळीही साधू यांची अभ्यासू, संशोधक वृत्ती दिसून आली. त्यात यशवंतरावांशी जोडल्या गेलेल्या इतिहासाचे विश्लेषण होते, आजच्या राजकीय संस्कृतीवरचे भाष्यही होते...

अरुण साधू आणि माझी घट्ट मैत्री होती. अपार कौटुंबिक स्नेह होता. येणं-जाणं कायम असायचं. ते माझे हक्काचे घर. साधू माझा मित्र, मार्गदर्शक आणि तत्त्वज्ञ होते तर तेंडुलकर माझे गुरू होते. ते मला वडिलांसमान होते. साधू आणि केतकर या दोघांनी मला कायमच वैचारिक भान दिलं. वेळोवेळी अचूक सल्ला दिला. त्यांची तर्कसुसंगत विचार करण्याची वृत्ती पदोपदी जाणवली... साधू कायम सावध चित्त असायचे. त्यांचं हसणं मिश्किल होतं. नातीने केलेल्या कवितेचं कौतुक करत छोटंसं पुस्तकही काढलं त्यांनी. पत्नी, मुली, जावई आणि नातवंडांत ते रममाण असायचे. त्यांच्या समृद्ध साहित्यिक आताशा मोजकेच उरले आहेत. आम्ही काही गोष्टी एकत्र येऊन करायच्या ठरवल्या होत्या. आता त्या अपूर्ण राहिल्या... पण त्या पूर्णत्वास न्यायचा मी प्रयत्न करणार आहे. आज साधू नसल्याने अपूर्णत्वाची भावना डसते आहे... माझ्या या द्रष्ट्या सुहृदाची सतत आठवण येते आहे...

**- डॉ. जब्बार पटेल**

भ्रमणध्वनी : ८८८८८४७९७७

jabbarpatel@gmail.com




# साधूपण

डॉ. रविन थत्ते

**मा**झी अरुण साधूंशी झालेली जवळीक जेमतेम पाच वर्षांची. ओळख कशी झाली हे आठवत नाही, परंतु पहिल्या एक-दोन भेटीतच तो माणूस माझ्या मनात घट्ट बसून गेला. आमची क्षेत्र वेगळी. त्यांच्या कार्याचा आवाका विस्तृत होता. त्यांचे व्यक्तिमत्त्व जनमान्य होते. परंतु ज्याला दरारा म्हणतात त्याचा स्पर्शही त्या माणसाला नव्हता. त्यांचे बोलणे मोठे स्पष्ट, मुद्देसूद, मार्मिक आणि माफकही असायचे. त्यांच्या चेहऱ्यात मला अभिजातता आणि औदार्य जाणवायचे. पत्रकारितेत माणूस पिचतो कारण त्याला मानवी जीवनाचे एक ओंगळ स्वरूप सतत भिडत राहते. मी-मी म्हणणारे अनेक आयुष्याच्या अंती त्या व्यवसायामुळे कटुता आणि नैराश्याने संपूर्णपणे घेरले जातात असे एक निरीक्षण आहे. हे व्हायचे नसेल तर माणसाची आध्यात्मिक बैठक पक्की हवी. आध्यात्मिक म्हणजे धार्मिक नव्हे. कारण निधर्मी आणि निरीश्वरवादी माणसांनाही आध्यात्मिक बैठक असू शकते आणि त्यात माणसाचे नैसर्गिक स्पंदन आणि विश्वात उमटणाऱ्या आणि उपटणाऱ्या उपाधींमध्ये असणारे अंतर ह्याची जाणीव असते. ही जाणीव साधूंना होती म्हणूनच ते खऱ्या अर्थाने साधू होते. हा 'साधू' माझ्या परिचयाचा होता हे माझे सुदैव.

हे साधूपण जे मी हेरले होते ते सुधीर महाबळ ह्याने लिहिलेल्या 'परतवारी' ह्या पुस्तकाला त्यांनी लिहिलेल्या प्रस्तावनेत मला प्रकर्षाने परत एकदा जाणवले. पंढरपूरला सगळ्यांच्या साथीने थोड्याफार सुविधांचा लाभ घेत जी वारी होते त्याला ऐश्वर्यवारी म्हणतात. मग सगळे आपापल्या घरी गेल्यावर एकटेपणाने त्याच मार्गाने परत येणे ह्याला वैराग्यवारी म्हणण्याची प्रथा आहे. सुधीरचे हे पहिले पुस्तक. ते साधूंनी परिश्रमपूर्वक वाचावे आणि मग त्याला प्रस्तावना लिहावी हे औदार्याचे लक्षणच. त्यांनी लिहिलेली ही शेवटची प्रस्तावना असावी. सुधीरच्या मनात परतवारीच्या वेळेला उमटलेल्या ऊर्मींना त्यांनी प्रांजळ आणि प्रामाणिकपणे दाद द्यावी ह्यात साधू नावाच्या परखड गद्य लेखकाच्या मनातला कवी दिसला. वारीचे त्यांनी केलेले समर्थनात्मक विश्लेषण ह्यात त्यांची बुद्धी जाणवली आणि प्रस्तावनेच्या अंताला त्यांनी केलेले निरीश्वरवादी आणि वारी याविषयी लिहिलेले विवेचन, परखड आणि स्पष्ट कबुली म्हणजे मूर्तिमंत अरुण साधूच. साधूंच्या शब्दांतला या प्रस्तावनेतला हा संक्षिप्त अंश :

''सुधीरने कायमवारी करण्याच्या आश्चर्यकारक प्रथेबद्दल लिहिले आहे. त्यालाही आधी हे माहिती नव्हते. कायमवारी करणे म्हणजे कुटुंब, संसार, प्रपंच सारे-सारे त्यागून त्यांचे काहीही बंधन न मानता फक्त आळंदी-पंढरपूर व पंढरपूर-आळंदी वाऱ्या तिथीनुरूप करीत राहाणे. (असेच देहू - पंढरपूर ही कायमवारी करणारेही आहेत.) शिवाय वारकऱ्यांची पथ्ये पाळताना (भिक्षा मागायची नाही वगैरे) गळ्यात कायम तुळशीमाळ ठेवायची. या गळ्यातील तुळशीमाळेला कायम वारकऱ्यांच्या दृष्टीने एक विशेष सांकेतिक अर्थ आहे. मृत व्यक्तीच्या देहावर तुळशीपत्र ठेवतात. त्याचप्रमाणे संपत्तीचे दान करताना 'इदं न मम' (हे माझे नाही) असे म्हणत त्यावरही तुळशीपत्र ठेवून पाणी सोडतात. असे हे कायम वारकऱ्याने आपल्या संसारावर व देहावर तुलसीपत्र ठेवलेले असते. शरीराच्या घामाने त्यावर पाणी सोडण्याचा सोपस्कार पूर्ण होतो. असा हा आयुष्यात आता काहीच ईप्सित वा इच्छा न ठेवणारा विलक्षण कायम-वारकरी. देहत्याग वर्ज्य असल्याने शून्यवत जगणारा. लंबकासारखा निरुद्देश फेऱ्या मारणारा. तो तर आधीच मनाने त्या विश्वदेवाशी विलीन झालेला आहे. सुधीरने ह्या कायम वारकऱ्यांचे मोठे भेदक वर्णन केले आहे.

वारकरी संप्रदायाच्या काही तात्त्विक धारणा व त्याचे मूर्तीरूपी परमेश्वराविषयीचे औदासिन्य, तसेच निराकार, निर्गुण अशा परमेश्वराची आधुनिक भौतिकशास्त्रालाही पचू शकेल अशी

संप्रदायाने अव्यक्त ठेवलेली संकल्पना यासंबंधी काही निष्कर्ष वर काढले आहेत. ते सुधीरला न विचारता स्वतंत्रपणे त्याच्या या अनुभवकथनातून काढता येतात. आत्मकथन इतके प्रांजळ आणि मनाच्या तळातल्या निष्कलंक घुसळणीतून आले आहे की, वाचकाच्या निष्कर्षाला लेखकाच्या पुष्टीची गरज नाही. एखाद्या चांगल्या कवितेचा संवेदनशील वाचकाला मनःपूर्वक भावतो तोच खरा अर्थ. कवीने नाकारला तरी. असो. ना.ग. गोरे हे तर्ककठोर निरीश्वरवादी. मित्राबरोबर पंढरीला गेले असताना, विठोबापुढे माथा टेकताना डोळ्यांतून अश्रू पाझरू लागले. मित्राने छेडले तेव्हा त्यांनी दिलेले उत्तर त्यांच्या एका लेखात पुष्कळ वर्षांपूर्वी वाचलेले आठवते. त्याचा मथितार्थ असा की, हजार वर्षांत कोट्यवधी वारकऱ्यांनी तीन-चारशे मैलांची पायपीट केली, ती या दगडाच्या मूर्तीसमोर क्षणभर माथा टेकवण्यासाठी. त्या अफाट श्रद्धेचा हा मूलस्त्रोत, त्यासमोर नतमस्तक होताना कोणीही हेलावून जाणे हे माणूसपणाचे लक्षण नव्हे काय? त्याचाच विस्तार करून असेही म्हणता येईल की, या अब्जावधी भक्तांनी विठोबाच्या पायाशी वाहिलेल्या ऊर्जेचे तरंग इथे येणाऱ्या कोणासही - ज्याला वारी संस्कृतीची आणि तिच्या केंद्रस्थानी असलेल्या विठ्ठल ह्या संकल्पनेची अंतस्थ जाण आहे व जो या संस्कृतीशी सन्मुख अथवा अनुरूप किंवा कंपॅटिबल (compatible) आहे, त्याला भारावून टाकल्याशिवाय राहणार नाही. कदाचित प्रस्तावनेत हे निरीक्षण कोणाला अप्रस्तुत वाटेल; पण सुधीर पंढरीच्या या ऊर्जा-वलयातून शक्ती घेऊन भारावलेला माणूस असल्याने हे लिहिण्यास प्रत्यवाय नसावा.

प्रस्तावनेचा उद्देश पुस्तक परीक्षणाचा नसतो. तरी देखील पुस्तकातील सुधीरच्या विचक्षक बुद्धीने टिपलेली काही सौंदर्यस्थळे नोंदवल्याशिवाय राहावत नाही. त्यातून त्याची सौंदर्यदृष्टी तसेच ज्ञानेश्वरीचा अभ्यास दृग्गोचर होतो. ''पाण्याने गच्च भरलेल्या ढगाआड जाणारा चंद्र, या ढगाच्या कडेकडेने जाणारा आणि थोड्याशा अंतरावर असणारा चंद्र आणि या तिन्ही अवस्थांमध्ये पाझरणारा चंद्रप्रकाश विलक्षण सुंदर दिसतो. कमीअधिक, धुवट, ओलसर, पारदर्शी असा इंग्रजीत ज्याला ट्रान्सल्युसंट असा शब्द आहे.'' तो लिहितो- या खेळाचं शब्दात वर्णन करता येत नाही, असा माझा समज आणि त्यामुळे उद्विग्न करणारी हतबलता; पण ज्ञानेश्वरीतील एक ओवी आठवली आणि खूप आनंद झाला. नेमकी आणि अचूक वर्णाची ती ओवी अशी :

जैसे चंद्राआड आभाळ । सदट दाटे सजळ ।
मग गडद ना उजाळ । ऐसे झांबळे होय ।।

आकाश आणि आभाळ हे दोन शब्द; पण पावसाळातल्या आकाशाला आभाळ हा शब्द चपखल बसतो. हे आभाळ कसे? चंद्राआड जाणारे आणि सदट दाटे सजळ... फक्त तीन शब्द; पण त्यातला अनुप्रास आणि न्यास मापून घ्यावा असा. यातून झिरपणारा प्रकाश ना गडद ना उजळ. त्याला जवळ जाणारा माहितीतला (तोच) शब्द ट्रान्सल्यूसंट; पण तरीही त्याला ज्ञानेश्वरांनी अस्सल देशीकार लेणे बनवून एक शब्द दिला - 'झांबळे'... काय प्रतिभेचा अविष्कार... हा झांबळा मनोहारी खेळ बघण्यात किती अंतर चालून गेलो त्याचा अंदाजही लागत नव्हता.''

लेखकाचे पारदर्शी मन या विस्तृत उधृतामधून स्पष्ट दिसते. जिथे संभ्रम आहे तिथे तोही कबूल आणि जिथे निखालस खात्री आहे तिथेही ठाम. भारतातील पुष्कळ विज्ञाननिष्ठांची अशीच द्विधा मनःस्थिती असावी आणि तेही फार आश्चर्याचे नाही. भारताबाहेर देखील असेच दिसले. अणुऊर्जा आयोगातील कित्येक शास्त्रज्ञ घरी पूजा आटोपून कपाळावर भस्माचे पट्टे ओढून आपल्या प्रयोगशाळेत जातात हे सर्वज्ञात आहे. घरी नवी कार किंवा स्कूटर आणली की, तिला आधी हार, उदबत्ती वाहून नारळ फोडल्याशिवाय भारतीय माणूस तिला वापरात काढत नाही. नव्या फॅक्टरीची यंत्रणा सुरू करण्यापूर्वीही हाच प्रकार. छोटे-मोठे चमत्कार तर आपण रोज ऐकतो. या विश्वाचा निर्माता म्हणून कोणती तरी परमेश्वरासारखी अंतिम शक्ती असणारच, यावर पुष्कळांचा विश्वास असतो. अवघ्या विश्वाला एकाच सोप्या समीकरणाच्या कवेत घेण्याची आकांक्षा धरणारे आइनस्टाइनदेखील थोडेसे ह्याच वर्गातले; पण एवढ्या दूर जायला नको. आपला लेखकही त्यांच्याच वर्गातला असे म्हणावयास काय हरकत आहे? तो अंधश्रद्ध नाही हे नक्की. ज्ञानेश्वरांनी ज्याचा पाया घातला आहे अशा, ज्ञानाचे महत्त्व कमी न करता निखळ कामनाविरहित डोळस श्रद्धेला (भक्तीला) आपल्या जीवनात स्थान देणाऱ्या संप्रदायाचा तो आधुनिक पाईक आहे असे हे पुस्तक वाचल्यानंतर म्हणायला काही हरकत नाही. कठोर तर्कवादासह कडवा निरीश्वरवाद एका बाजूला व दुसऱ्या बाजूला अंधश्रद्धा व अंधभक्ती यांच्या मधला मार्ग काढणारा डिजिटल पिढीचा तो विज्ञाननिष्ठ प्रतिनिधी आहे असेही म्हणता येईल.

महाराष्ट्रातील पुष्कळ विद्वान (त्यात काही सश्रद्ध धर्माभिमानीही आहेत) वारीच्या प्रथेवर सडकून टीका करतात. शेतीच्या ऐन मोसमात घरदार सोडून रिकामटेकड्यांसारखे टाळ कुटत जत्रा करणारे, समाजाला भार ठरणारे निरुद्योगी, बेजबाबदार लोक अशी त्यांची संभावना करतात. प्रस्तुत पुस्तक वाचल्यावर निदान आमच्यासारख्या फुटकळ; पण कडव्या नास्तिकांची तरी पुन्हा असे म्हणण्यास जीभ धजावणार नाही. या वारीतही विश्वरूप दर्शनासारखे अगम्य, अतर्क्य, अदृश्य असे काहीतरी मिळते की, ज्यामुळे तुम्हां-आम्हांलाही त्यापुढे नतमस्तक व्हावेसे वाटेल.''

- डॉ. रविन थत्ते
भ्रमणध्वनी : ९८२०५२३६१६

# ऐकणे/वाचणे

वसंत आबाजी डहाके

**सर्वंकष सत्तांना लेखकांपेक्षा, कलावंतांपेक्षा वाचकांची रसिकांची अधिक भीती वाटते. आज ही वाचक-जनता साहित्यकृती-कलाकृती वाचते, उद्या ती समाजव्यवहार, धर्मव्यवहार, राज्यव्यवहार वाचू लागेल अशी ती भीती असते.**

ऐकणे आणि वाचणे हे दोन साधे शब्द आहेत. ते उच्चारले की आपल्याला मौखिक साहित्य आणि लिखित (नंतर मुद्रित) साहित्य आठवते. मौखिकशी ऐकणे आणि लिखित-मुद्रितशी वाचणे ही क्रिया आपण जोडलेली आहे. 'ऐकणे' ही गोष्ट आधी आली आणि नंतर 'वाचणे' ही गोष्ट आली असे आपण समजतो. वाचणे ही क्रिया लिहिणे या क्रियेशी निगडित आहे. आधी बोलणे होते, नंतर लिहिणे आले अशीच आपली समजूत आहे. लहान मूल ऐकायला-बोलायला शिकते. नंतर लिहिणे शिकवावे लागते. हे जसे, तसेच मानवजातीच्या बालपणीही असावे, असे आपण म्हणतो. ऐकणे ही निसर्गदत्त गोष्ट आहे, तशा लिहिणे आणि वाचणे या क्रिया नाहीत. लिहायला शिकवावे लागते, वाचायलाही शिकवावे लागते. आपण या ठिकाणी 'ऐकणे' हा शब्दही वेगळ्या अर्थाने वापरतो आहोत. कानांनी ऐकू येणे वेगळे. अनेक ध्वनी, आवाज ऐकू येतात. बोलणे, ऐकणे हे वेगळे आहे. तेथे बोललेले समजणे असा 'ऐकणे' या शब्दाचा अर्थ आहे. विशेष काही बोलले जात असेल तर लक्षपूर्वक ऐकणे, अवधान देणे असे शब्द आपण वापरतो. एखाद्याचे बोलणे आपण ऐकतो आणि ते आपल्याला समजते. कारण ज्या ध्वनींचा उच्चार केला जातो ते अर्थपूर्ण असतात. त्या ध्वनींशी, ध्वनिरचनांशी आपला आधी परिचय असतो. सोप्या भाषेत सांगायचे तर मराठी भाषा अवगत असणाऱ्याला मराठी भाषेत बोललेले ऐकू येते, समजते. कन्नड भाषेतील बोलणे ऐकू येते, पण समजत नाही, अर्थबोध होत नाही. त्यावेळी ज्या ध्वनींचा उच्चार केला जातो, त्यांतून कोणताही अर्थ आपल्या मनापर्यंत पोचत नाही. नुसते ध्वनी जाणवतात. भाषेच्या बाबतीत ऐकणे व समजणे या दोन्ही गोष्टी एकमेकींशी जखडलेल्या आहेत.

बोलणे अजून आकाराला आलेले नव्हते, तेव्हा ध्वनी होते, खाणाखुणा होत्या. त्याचबरोबर जमिनीवर, गुहेच्या भिंतीवर रेघा ओढणे होते. या ज्या रेघा असत त्या पाहणाऱ्यांना समजत, त्यांचा अर्थबोध त्यांना होत असे. त्या रेघा ते नुसते पाहात नसत, तर वाचत असत. रेघा ओढणे म्हणजे लिहिणे होते, ते लिहिलेले वाचले जात होते. तात्पर्य, प्रागैतिहासिक काळापासून वाचन ही क्रिया अस्तित्वात आहे. वाचन ही गोष्ट केवळ डोळ्यांनी पाहण्यापुरती मर्यादित नाही. तिचा आपल्या मनाशी, बुद्धीशी संबंध आहे. पाहतो, वाचतो, समजून घेतो. लिहिलेली, छापलेली अक्षरे दिसतात, वाचली जातात. त्या आकृती असतात, खुणा असतात, चिन्हे असतात. सरावाने आपल्यासाठी त्यांचे शब्दांत रूपांतर झालेले असते. ते वाचले की अर्थबोध होतो. वाचन ही अर्थ समजून घेण्यासाठी प्रतीके उलगडण्याची एक जटिल ज्ञानात्मक प्रक्रिया आहे. Reading is a complex cognitive process of decoding symbols in order to construct or derive meaning.


आता परत 'ऐकणे' या क्रियेकडे वळू. अनेक ध्वनी आपल्याला ऐकू येतात. पक्ष्यांची किलबिल, गाईचे हंबर, बैलांचे डुरकणे इथपासून गर्दीचा गोंगाट, निदर्शकांनी फोडलेल्या काचांचा खळखळाट, कोलाहल, फटाक्यांचे आवाज- असे अनेक आवाज. आणखीही काही ध्वनी आहेत. ते वाद्यांतून निघतात, मानवी कंठांतून निघतात. त्या ध्वनींची रचना असते. ते संगीत होय. लोकसंगीत, शास्त्रीय संगीत, नाटक-

चित्रपटांतले संगीत, वगैरे. वेगवेगळी वाद्ये असतात. चर्मवाद्ये, सुषीर वाद्ये, तंतुवाद्ये वगैरे. येथे नुसते ऐकू येणे नसते. आपल्या कानांना ते ध्वनी गोड लागतात, एवढेच नसते. ध्वनींच्या त्या रचना ऐकत असताना आपण त्या लक्षपूर्वक ऐकतो, म्हणजे वाचतो. त्या ध्वनिरचनांचा अर्थबोध होतो. रागाची आकृत्ती असा शब्दप्रयोग केला जातो. स्वरांना शब्दांची जोड असते, तेव्हा शब्दांतील ध्वनित अर्थाचा बोध होतो. कन्नड भाषेतल्या गाण्याचा अर्थ आपल्याला कळत नाही. पण त्या गाण्याची चाल, त्याला दिलेले संगीत कर्णमधुर असू शकते, ते आपल्या मनालाही मोहक वाटू शकते. जेव्हा शब्द नसतात, नुसताच नाद किंवा ध्वनी असतो, त्याचाही अर्थबोध होतो. शब्दांत तो अर्थ सांगता येणार नाही. पण आपल्या मनात तो जाणवतो. आपली भावस्थिती तयार होते, वर्णन करता येणार नाही असा आनंद होतो. गाणे आपण नुसते ऐकत नाही, वाचतो.

ऐकू येणे हे जसे निसर्गदत्त आहे, तसेच पाहाणे, पाहता येणे हेही निसर्गदत्तच आहे. जे जे डोळ्यांसमोर येते ते आपण पाहतो किंवा आपल्याला दिसते. काही गोष्टी लक्षपूर्वक पाहतो. काहींवर नजर फिरते. काही सरावाच्या होऊन जातात. दरवेळी त्या जाणवतातच असे नाही. ऐकणे या क्रियेशी निगडित जसा ध्वनींचा पसारा आहे, तसाच पाहणे या क्रियेशी निगडित दृश्यांचा पसारा आहे. दृष्टिसुख देणाऱ्या गोष्टी आहेत, दृष्टीला खुपणाऱ्या गोष्टी आहेत.

आपण चित्र पाहतो, नाटक पाहतो, चित्रपट पाहतो असे शब्दप्रयोग करतो. आपण पाहतो याचा अर्थ आपल्या डोळ्यांना त्या दिसतात. आपण त्या केवळ पाहत नाही. पाहणे हे कधीही नुसते पाहणे नसते. पाहताना जे पाहिले जाते त्यातून पाहणाऱ्याच्या मनात विचार-भावतरंग निर्माण होतात. पाहताना मनात काहीही निर्माण न होणे हादेखील पाहण्याच्या कृतीचा परिणाम असतो. डोळ्यांना दिसू शकतात अशा सर्वच गोष्टी पाहिल्या जातात आणि त्यांच्या प्रतिक्रिया मनात उमटतात. त्या सुखद आणि/ किंवा दु:खद असतात, अनुकूल वा प्रतिकूल असतात. मन शांत होते, किंवा त्रस्त होते. आल्हाद निर्माण होतो किंवा किळस वाटते. पाहणे या क्रियेमधून विविध प्रतिक्रिया निर्माण होतात. पाहण्यातून जगाचे रंगरेषाआकारात्म रूप जाणवते. विविध गती, हालचाली दिसतात. व्यक्तींच्या, व्यक्तिसमूहांच्या शारीरिक गतिविधी दिसतात. पशू, पक्षी, कीटक आणि मानवाने निर्माण केलेल्या हजारो गोष्टी दिसतात. दिसणे आणि पाहणे या दोन गोष्टी आहेत. जे जे दिसते ते ते आपण पाहतोच असे नाही. पाहण्यात मन गुंतलेले असते. भावना आणि बुद्धी कार्यरत असते. बाकी दिसते, पण पाहत नाही.

चित्र, नाटक, चित्रपट पाहतो तेव्हा आपण दृश्यांच्या रचना पाहतो. म्हणजे खरे पाहणे हे वाचणेच असते. वाचणे ही क्रिया केवळ लिखित, मुद्रित अक्षरांशी निगडित राहत नाही. लिखित, मुद्रित अक्षरांना आकार असतो. ते आकार पाहतो आणि त्या आकारांनी तयार झालेले शब्द वाचतो. आकारांचे रूपांतर अर्थपूर्ण शब्दांत झालेले असते. तसेच चित्र, रंगनाटक (रंगभूमीवरील नाट्यप्रयोग), चित्रपट यांच्या बाबतीतही घडत असते. उदाहरणार्थ, आपण रंगनाटक पाहायला जातो, तेव्हा केवळ लेखकाने लिहिलेले संवाद ऐकायला जात नाही. रंगनाटकाचे कोणकोणते घटक असतात? अभिनय, वेषभूषा, नेपथ्य, पार्श्वसंगीत, प्रकाशयोजना हे महत्त्वाचे घटक होत. नाट्यप्रयोगात हा प्रत्येक घटक महत्त्वाचा असतो. एखाद्या पेंटिंगमध्ये छायाप्रकाशाची योजना असते तशी नाट्यप्रयोगात अभिप्रेत असते. नाटकाच्या आशयानुरूप नेपथ्य असावे. ते वास्तवदर्शी असू शकते अथवा प्रतीकात्मक असू शकते. नट ज्या पात्राची भूमिका करतो ते पात्र सर्वार्थाने साकार झाले पाहिजे अशी त्याची वेषभूषा, रंगभूषा असावी अशी अपेक्षा असते. रंगनाटकामध्ये नट केंद्रस्थानी असतो. मुख्य म्हणजे नटाचे शरीर फार महत्त्वाचे मानले जाते. भरतमुनीने अभिनयाचे आंगिक, वाचिक, आहार्य आणि सात्त्विक असे चार प्रकार सांगितलेले आहेत. त्यांत नटाचे शरीर गृहीत धरलेले आहे. ग्रोटोवस्कीच्या मते रंगभूमीवरच्या नाट्यप्रयोगाचा






मूलस्रोत आणि माध्यम नटाचे शरीर हेच असते. नट आपल्या शरीर या माध्यमातून नाट्यकाव्याची निर्मिती करतो. ती आपण वाचतो. केवळ संवाद ऐकत नाही, केवळ नाटक पाहत नाही, प्रत्येक कृती, उक्ती, दृश्य आपण वाचतो.

भाषेतील शब्दांच्या बाबतीत चिन्ह ही संकल्पना वापरली जाते. चिन्हाचे दोन पैलू असतात. चिन्हक आणि चिन्हार्थ. शब्दाचा उच्चार हे चिन्हक आणि त्याचा अर्थबोध हा चिन्हार्थ. रंगभूमीच्या संदर्भातही चिन्ह ही संकल्पना वापरली जाते. विविध चिन्हांनी रंगभूमीवरील प्रयोगाची रचना झालेली असते. ती चिन्हे आपण वाचतो. चित्रपटाच्या संदर्भातही चिन्ह ही संकल्पना वापरली जाते. चित्रपटाची भाषा असा शब्दप्रयोग केला जातो. तेथे मराठी, हिंदी, इंग्रजी असा भाषासंदर्भ नसतो. चित्रपटात संवाद वा निवेदन यांसाठी यांपैकी एखादी भाषा वापरली जाते. चित्रपटाची भाषा दृश्यांनी तयार केलेली असते. ती अशाब्द भाषा असते. चित्रपटात अनेक दृश्ये असतात. एक दृश्य म्हणजे एक वाक्य. एकेका दृश्यात स्थल, काल, स्थिती, भावस्थिती अशा विविध गोष्टी असू शकतात. एखादे चित्र पाहातो तेव्हाही हीच प्रक्रिया घडत असते. रंग, रेषा, आकार, परिप्रेक्ष्य, स्थिती या घटकांनी त्या चित्रकृतीची रचना झालेली असते.

शब्द हेच अभिव्यक्तीचे माध्यम असलेल्या ललित साहित्यात प्रतिमा असतात. प्रतिमा, प्रतीक, रूपक, मिथक, आदिबंध हे काव्यातील, कथा-कादंबरीतील अर्थ निर्माण करणारे घटक असतात. शब्दांमधूनच या घटकांची निर्मिती झालेली असते. ही साहित्यातील चिन्हसृष्टी असते. चित्रांतही हे सारे घटक असतात. तेथे रंग, रेषा, आकृती या घटकांतून त्यांची निर्मिती झालेली असते. एखाद्या चित्रातील झाड हे केवळ झाडाचे चित्र असत नाही. इंप्रेशनिस्ट आणि एक्स्प्रेशनिस्ट चित्रकारांनी त्यांतून आपल्या संयत अथवा प्रमाथी भावना व्यक्त केलेल्या आहेत. चित्रामध्ये रेखाटलेल्या आकृती हीच अक्षरे असतात.

गुलाम मोहमद शेख यांच्या 'माणूस' नावाच्या चित्राचे वाचन मी पुढीलप्रमाणे केलेले आहे : चित्र पाहताना आपली नजर खिळून राहते ती दोराने बांधलेल्या नग्न पुरुष आकृतीवर. त्याला दोराने जखडलेले आहे. गळ्याभोवती दोर आहे आणि त्याचे टोक कुणाच्या तरी हातात आहे. दुसरी व्यक्ती काळ्या रंगात आहे. चेहरा स्पष्ट दिसत नाही. धूसर आहे आणि तो निर्विकार असावा असे वाटते. जिथे या व्यक्ती आहेत ते एक मोठे मैदान असावे. मागे काही लोक आहेत. ते नुसतेच बघताहेत. त्यांची सुबक, नीटनेटकी दुमजली-तिमजली घरे आहेत. तिकडे एखाददुसरी व्यक्ती आहे. त्या व्यक्ती इकडे पाहाताहेत किंवा पाहत नाही आहेत. या घरांच्या पलीकडे हिरवा पट्टा आहे, त्यापलीकडे शहर आहे. दुपार संपून संध्याकाळ होऊ लागलेली असावी. दूरची घरे पिवळसर-लालसर रंगाने झळझळताहेत. दोराने जखडलेल्या माणसाने डोळे मिटलेले नाहीत. तिथे खाचा आहेत, बुबुळे नाहीत. ती व्यक्ती कोण आहे, त्या व्यक्तीला दोरखंडाने असे का जखडले आहे, जनावराच्या गळ्यात दोरी बांधून ओढत न्यावे तसे याचे का केलेले आहे हे आपल्याला ठाऊक नाही. दोर हातात असलेली व्यक्ती कोण आहे तेही माहीत नाही. लोक नुसते पाहाताहेत. ते बघे आहेत. कुठलाही हस्तक्षेप करावा अशी त्यांची इच्छा दिसत



टीप : या लेखातील रेखाटने वसंत आबाजी डहाके यांची आहेत.



**गुलाम मोहमद शेख यांचे 'माणूस' हे चित्र**

नाही. काळ्या छायेत असल्यासारखी जी व्यक्ती आहे तिचा चेहरा आपल्याला दिसण्याची गरज नाही. त्या व्यक्तीच्या उभे राहण्यात, दोरी पकडलेल्या हाताच्या स्थिरतेत अधिकार दिसतो. त्या व्यक्तीची उंची लक्षात घेण्यासारखी आहे. दोन व्यक्तींमधला विरोध तीव्रतेने अधोरेखित होतो. काळ्या व्यक्तीने कांबळे पांघरलेले असावे आणि जखडलेल्या व्यक्तीने निर्वस्त्र असावे, मागे पांढऱ्या कपड्यातल्या पांढरपेशा व्यक्तींनी तटस्थ असावे अशी एक स्थिती या चित्रात आहे.

सुबक घरांसमोरच्या स्वच्छ मोकळ्या मैदानात काहीतरी अमानुष घडते आहे आणि आपण ते नुसते पाहातो आहोत याची जाणीव आपल्याला होते. कुतूहल, धाक, दरारा, असहायता, तटस्थता असे अनेक भाव आपल्या मनात निर्माण होतात. हाच या चित्राचा अर्थ आहे. सूक्ष्मपणे या चित्राकडे पाहिल्यास ते समाजचित्र आहे असे आपल्याला वाटायला लागते.

भारतीय लघुचित्रे, आदिवासींची- गोंड, प्रधान, वारली यांची चित्रे, आधुनिक काळातली वास्तववादी, अतिवास्तववादी, छायाचित्रसदृश अशी विविध प्रकारांतली चित्रे असतात. त्या चित्रांमधली चिन्हे आपण वाचतो, समजून घेतो, मग आपल्याला अर्थाचा प्रत्यय येतो.

आपण वाचतो असे मी म्हटलेले आहे. मात्र कुठलेही वाचन हे निरंग, एकायामी, एकेरी नसते. आपल्या भाषेचा, साहित्यपरंपरेचा, साहित्यविषयक संकल्पनेचा, संस्कृतीचा संदर्भ आपल्या मनात असतो. आपल्या भाषेबाहेरचे साहित्य वाचतानाही केवळ एक साहित्यकृती एवढेच आपल्या मनात नसते. लेखक-कलावंतांच्या चरित्राचा, वर्गीय पार्श्वभूमीचा, काळाचा संदर्भही असतो. साहित्यकृती-कलाकृतीच्या संदर्भात, साहित्यिक-कलावंताप्रमाणे वाचकाचीही, सांस्कृतिक, राजकीय, सामाजिक भूमिका असते. थोडक्यात कोणतीही साहित्यकृती-कलाकृती विविध संदर्भांचा पुंज असते आणि वाचकदेखील अशा भूमिकांनी युक्त असतो. वाचक आपल्या भूमिकेतून कलाकृती-साहित्यकृती वाचतो.

हा साहित्य-कलाव्यवहार नेहमीच सुरळीत चालतो असे नाही. आपल्या कलाकृती-साहित्यकृतीविषयीच्या संकल्पनांना धक्का देणारी कलाकृती-साहित्यकृती समोर आली की वाचक-रसिक गोंधळतो, चिडतो. कलाकृतीच्या रूपबंधाच्या संदर्भात, तिच्यातील श्लील-अश्लील कल्पनांच्या संदर्भात, राजकीय विचारसरणीच्या संदर्भात, वास्तव-अवास्तवाच्या संदर्भात वाचकासमोर प्रश्न उपस्थित झाले की तो शांत राहत नाही. साहित्यकृती, चित्र, नाटक, चित्रपट या कलाक्षेत्रातल्या काही कलाकृतींच्या वाट्याला रोष आलेला आहे. सामाजिक आणि शासकीय निर्बंधांना सामोरे जावे लागलेले आहे. भावना दुखावल्या गेल्याचा आरोप होत असतो. लेखकाला-कलावंताला आपली साहित्यकृती-कलाकृती काढून घ्यावी लागते. हेही काही समाजगटांतील लोकांचे वाचनच असते. सर्वंकष सत्ता असलेल्या देशांमध्ये कलावंतांच्या अभिव्यक्तीच्या स्वातंत्र्याचा संकोच केला जातो, समाजातील काही गटांचे वर्चस्व असलेल्या भागांत त्यांनी कोणतीही सर्जनशील निर्मिती करू नये असे वातावरण निर्माण केले जाते. कधी धर्मसत्तेने, तर कधी राजसत्तेने कलाकृतींवर सेन्सॉरशिप लादल्याची अनेक उदाहरणे आहेत. याचा अर्थ हा की त्या साहित्यकृतींचे, कलाकृतींचे वाचन सर्वसाधारण वाचकांनी, रसिकांनी करू नये. खरे तर वाचकांच्या वाचनस्वातंत्र्याचा हा अधिक्षेप असतो. लहान मुलांनी, त्यांच्या वाढण्याच्या वयात, काय वाचावे, काय वाचू नये, काय पाहावे, काय पाहू नये असे पालकांचे धोरण असू शकते. समाजसत्ता, धर्मसत्ता, राज्यसत्ता आपल्या नागरिकांकडे याच भूमिकेतून पाहतात असे मात्र म्हणता येत नाही. सर्वंकष सत्तांना लेखकांपेक्षा, कलावंतांपेक्षा वाचकांची रसिकांची अधिक भीती वाटते. आज ही वाचक-जनता साहित्यकृती-कलाकृती वाचते, उद्या ती समाजव्यवहार, धर्मव्यवहार, राज्यव्यवहार वाचू लागेल अशी ती भीती असते. एकदा का लोकांच्या मनात प्रतीके, चिन्हे उलगडण्याची ज्ञानात्मक प्रक्रिया सुरू झाली की मग तिला काही मर्यादा असेल असे नाही.

**- वसंत आबाजी डहाके**
भ्रमणध्वनी : ९८९०३६२७०३
vasantdahake@gmail.com

The Right Chemistry for a Brighter Tomorrow

*With Best Compliments From*

# AARTI INDUSTRIES LIMITED

Manufactures and Exporters of
Benzene based intermediates, Bulk Pharmaceuticals; Agrochemicals;
Speciality Chemicals and Sulphuric Acid & Allied Products

**Head Office :** 'Udyog Kshetra', 2nd floor, Mulund-Goregaon Link Road,
Off. L.B.S.Marg, Mulund (W), Mumbai-400 080
Phone : 6797 6666 / 2591 8195 • Fax : 2590 4806

**Factory & Regd. Office :** Plot No. 801, 801/23, GIDC Estate, Phase-III,
Vapi-396 195, Dist. Valsad
Phone : 0260 2400059 / 2431306
Fax : 0260 2401322

# नेत्रा साठेची 'रंगीन' किमया

उषा मेहता



**रंगसौंदर्य आणि भावसौंदर्य अधिक तरल आणि पारदर्शी करण्यासाठी नेत्रानं जे अगदी नवीन 'कोल्ड सिरॅमिक्स' हे माध्यम शोधून काढलं ते तिच्या या चित्रशैलीचं सामर्थ्य आहे. या रंगांची खासियत अशी की एकदा रंग कॅन्व्हासवर उतरला तो जणू वज्रलेपच...**



नेत्रा साठे. एक प्रयोगशील चित्रकार. आपल्या कुंचल्यामधून सुंदरतेचं आणि गुणीजनांचं पूजन करीत राहणारी नेत्रा. तिच्या चित्रनिर्मितीचं प्रयोजन तिनं, सौंदर्याचा आविष्कार हे मानलं होतं. तिला वेगवेगळ्या वेळी आणि वेगवेगळ्या स्थळी होत राहणारा सौंदर्याचा साक्षात्कार ती स्वत:च्या प्रतिभेनं उठावदारपणे चित्रफलकावर दृश्यमान करीत असे.

श्रीगणेश, विद्या आणि कलांचा अधिष्ठाता. अनेक चित्रकारांप्रमाणे नेत्रानंही गणेशाची विविध रंगरूपांची चित्रं रंगवली. तिचा एखादा गणेश शेंदूर वर्णाचा असेल तर दुसरा श्यामवर्ण किंवा नीलवर्णही. त्यातही अनेक छटा उमटलेल्या. त्या-त्या रंगांवर खुलणाऱ्या रंगांच्या आभूषणांनी श्रीगणेश सुशोभित, प्रसन्नवदन झालेले दिसतात. शेंदूरवर्णी गणेश पाहताना त्याचं ते स्थाणूरूप शिल्पबद्ध झाल्यासारखं वाटतं.

नेत्राची प्रसिद्ध चित्रमालिका म्हणजे गुजराथ, माळवा, आणि राजस्थानच्या पार्श्वभूमीवरची स्त्रीपुरुषांची चित्रं, त्यातही जास्त स्त्रियांचीच. कचेरी वाटतील अशा चमकदार रंगांनी लक्ष वेधून घेणारी. या प्रदेशातील स्त्रीपुरुष, केशभूषा, वेषभूषा आणि अलंकार या सर्वच दृष्टींनी तिला इतके आकर्षक वाटले की ती या प्रदेशांमधे वारंवार जाऊ लागली. नेत्रा या प्रदेशाच्या प्रेमातच पडली होती. त्याबद्दल तिनं एका लेखात लिहिलंय, ''राजस्थानचं नजर व्यापून टाकणारं वाळवंट, मैलोगणती एकच रंग, वाळूचा रंग, हजारो छटा पण एकाच रंगाच्या,




उंटांचा समूह



पाण्याला निघालेल्या तिघी



गॉसिपिंग करणाऱ्या दोघी




न्हाणपट्ट करणारी तरुणी



राजस्थानी कुटुंब




दळण दळणारी बाई



कृष्णराव केतकर




पं. भास्करबुवा बखले



शिल्पकार सदाशिव साठे



माधव आचवल




श्रीरंग साठे



बाबूजी अर्थात सुधीर फडके




डॉ. श्रीराम लागू



न्यायमूर्ती नागेंद्र सिंग


प्रेमाच्या वाटा सगळ्या
लग्नानंतर वेगळ्या वेगळ्या
कॉटनकिंग
MACHO
तुझं माझं ब्रेकअप
सोम-शनि
रात्री 8.30 वा.
झी मराठी HD वरही पहा
Z
मराठी
कॉटनकिंग
MACHO


प्रकाशाच्या ज्योतींनी
आसमंत उजळणाऱ्या दीपावलीचा
तेजोमय प्रकाश आणि समृद्धी
आपणास सदैव लाभो
टीजेएसबी बँक परिवाराकडून आपणास
दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा
टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड.
tjsbonline
tjsbbank
tjsbbank
tjsb-sahakari-bank-ltd
मुख्य कार्यालय: टीजेएसबी हाऊस, प्लॉट नं. ५ बी, रोड नं २, वागळे इस्टेट, ठाणे (प)-400604
टेली.: 022 2587 8500 फॅक्स: 022 2587 8504 ई-मेल: response@tjsb.co.in

त्या मोनोक्रोम लँडस्केपला छेदण्यासाठी उभे ठाकलेले भडक लाल काळ्या रंगांचे ग्रुप्स, त्या वाळवंटाच्या वळणदार लाटांना भेदणारी नक्षीदार कलाकुसर. इथली मंडळी जन्मजात कलासक्तच. स्त्री असो, पुरुष असो नखशिखान्त नटलेली घरं असो वा अंगण, गाडी असो वा उंट, कलाकुसरीनं लगडलेल्या गाडीच्या चाकाची खिट्टीसुद्धा रंगीबेरंगी, सुंदर आकाराची. शेणाच्या टोपलीखालची डोक्यावरची चुंबळसुद्धा मण्यांचे राघूमैना मिरवणारी. चालताना उडणाऱ्या ५०-५० मीटर कापडाच्या घागऱ्याला आवर घालायला कमरेला लटकलेले जड मण्यांचे गोंडे बघून घ्या. मालकिणीच्या मिजासी चालीला लयबद्ध ताल देणाऱ्या त्या गोंड्यांच्या नखरेल हालचाली टिपायला कॅमेरा अपुराच पडतो.

हा प्रदेश, तिथली माणसं तिथलं लोकजीवन, नेत्राला प्रेरणा देणारं ठरलं. काही वर्षं, साठे कुटुंबाचं वास्तव्य दिल्लीत होतं. त्या काळात जयपूर, उदयपूर, बडोदा आणि आणखीही कुठे-कुठे, काही वेळा काही कारणांनी तर काही वेळा मुद्दामच या प्रदेशात तिच्या वाऱ्या सुरू असायच्या. या भागातल्या स्त्रीपुरुषांच्या जीवनशैलीचं तिनं आत्मीयतेनं निरीक्षण केलं. त्यातूनच तिच्या विविध विभ्रमांमधल्या चित्रांचा पिसारा उलगडत राहिला.

नेत्राने चित्रांकित केलेला उंटांचा समूह, ही एक वेगळीच चित्ररचना. हे उंटदेखील नटवलेले तर आहेतच, पण विशेष म्हणजे या समूहातून एक एकात्मतेची विलक्षण लय जाणवते. शिवाय, नेत्रा या चित्रातून या प्रदेशाचा फीलही देते.

नेत्राची चित्रं ही नुसतीच गोठलेली स्थिरचित्रं म्हणता येत नाहीत, ती काहीतरी बोलतही असतात, चित्रविषयातलं नाट्य अभिव्यक्त करीत असतात. दळण करणाऱ्या या बाईचं जातं, तेदेखील किती सुंदर, कलाकुसरीचं. पण ती बाजूची चिमणी पाहिलीत? ती म्हणते आहे, ''अगऽऽ एवढे दाणे दळते आहेस, तर प्लीज्ज मलाही दे नं चार सहा'' तर बाई तिला सांगते आहे, ''थांब ग बाई जरा, आधी माझं काम तर पुरं होऊ देत ना!'' हे सांगताना तिचा तो मागे गेलेला हात, ती देहबोली तिच्या बोलीभाषेशी अगदी सुसंगतच!

पाण्याला निघालेल्या तिघींचे चित्र म्हणजे जरा दीर्घीकरण (elongated figures) केलेल्या आकृती आहेत. काय सुरेख लय पकडलीय नेत्रानं त्यांच्याही चालण्याची! डोईवरच्या घड्यांना तोलत दिमाखात चालताचालता थोड्या गुजगोष्टीही करताहेत त्या तिघी.

गॉसिपिंग कुणाला आवडत नाही? कबूल करत नाहीत, पण बहुतेकांना थोडंफार गॉसिप आवडतंच. जगण्यामधली लज्जत वाढवणारा मसाला असतो तो. नक्षीदार छत्रीचा आडोसा घेऊन दोघी काय बोलत असतील? निवांत बसल्या आहेत, चढाव बाजूला काढून ठेवलेत. ती वयानं जरा लहान भासणारी तरुणी हातात पिशवी आहे तिच्या. कुठेतरी जाताना अवचित भेट झाली असणार. सासूनणंदा, दीर-सासरा यांची गाऱ्हाणी ती सांगत असेल का? की आत्ताच समजलेल्या एखाद्या थरारक घटनेबद्दल बोलत असेल? काहीही असो, ते शांतपणे ऐकून ती दुसरी मैत्रीण, आता लवकरच काहीतरी सल्ला देईल बहुतेक!

नट्टापट्टा करण्यात मशगुल असलेल्या तरुणीच्या चित्रात आपण सुंदर आहोत याचं भान तिच्या देहबोलीतूनच सूचित होतं आणि तिचे वस्त्रालंकार तर सज्जच आहेत ते सौंदर्य खुलवायला.

असं हे रंगसौंदर्य आणि भावसौंदर्य अधिक तरल आणि पारदर्शी करण्यासाठी नेत्रानं जे अगदी नवीन 'कोल्ड सिरॅमिक्स' हे माध्यम शोधून काढलं ते तिच्या या चित्रशैलीचं सामर्थ्य आहे. ती म्हणते, ''अचानक हा कोल्ड सिरॅमिक्सचा शोध मला लागला. शिल्पासाठी किंवा फर्निचरसाठी वापरलं जाणारं हे माध्यम मी पारदर्शक करून कॅनव्हासवर वापरलं. वास्तविक पॉलिएस्टर रेझिन हे कमर्शियल प्रॉडक्टसाठी वापरलं जातं. मुळात ते पारदर्शक असलं तरी त्यात वापरायचे रंग मात्र ओपेक, अपारदर्शक. या रंगांनासुद्धा पारदर्शक बनवण्याची कल्पना माझी. ७२ साली या माध्यमामधे मी यशस्वी झाले. या माध्यमात चित्र साकार करणं खरंच धाडसाचं होतं. मुळात या रेझिनचा सेटिंग पिरीयड (थिजण्याची प्रक्रिया) फक्त तीनसाडेतीन मिनिटांचा. त्या अवधीत आवश्यक त्या ठिकाणी भराभर थर देणं महाजिकिरीचं. त्यामुळे चित्राची रंगयोजना मनात पक्की असावी लागते. विचार करायला वेळच नसतो. प्रतिभासंपन्न गायक जशी एखादी मुश्किल जागा आश्चर्यकारकपणे घेऊन जातो तशीच काही क्षणात इथेही समस्यापूर्ती होऊन जाते! त्यातून या रंगाची खासियत अशी की एकदा रंग कॅनव्हासवर उतरला की तो जणू वज्रलेपच. तैलरंगाप्रमाणे तो पुसून टाकताही येत नाही किंवा दुसऱ्या रंगाच्या लेपनाने झाकताही येत नाही कारण तो पारदर्शी आहे. मात्र एकावर एक चढणारे रंग अशी काही कल्पनातीत किमया करून टाकतात की अजूनही माझी मीच चकित होते. अजूनही कुठला रंग कशावर चढला, तर कुठला इफेक्ट मिळेल याचं गणित मला सुटलेलं नाही. चुकल्यावर सुधारणा करणे शक्यच नाही. जो ब्रश लावीन तो पक्का आणि वेळेच्या बंधनामुळे स्ट्रोक्सना द्यावी लागणारी गती.''

तरुण शिल्पकार सिद्धार्थ साठे, यांनी आपल्या चित्रकार काकूची ही जलदगती रंगकिमया अगदी जवळून पाहिली आहे. ते म्हणतात, ''तिचे झरझर चालणारे हात, बोटं पाहून विस्मित व्हायला व्हायचं. मधेच ती चट्कन ब्रश उलटा करायची आणि ब्रशच्या टोकाने आरेखन करून रंगांना विलग करायची. त्यातून चित्राकार स्पष्ट यायचा. या ब्रशच्या उलट्या टोकानंच काहीवेळा तिचं दागिन्यांचं वगैरे डिटेलिंगही होत असे. तिचे सर्व रंग ताजे, टवटवीत वाटतात आणि

**टीप : लेखात ज्या चित्रांचे उल्लेख केले आहेत त्यांचा समावेश रंगीत पानांमध्ये केला आहे.**

एकूण चित्रात हालचाल, गती, भासमान होते, चित्र जिवंत वाटतं!''

नेत्राच्या या माध्यमामधल्या चित्रांचं पहिलं प्रदर्शन लंडनमधे झालं आणि मग एकापाठोपाठ एक अशी जगभर प्रदर्शनं झाली. देशात तर होतंच पण आता परदेशातही नेत्रा साठेचं नाव झालं. १९८६ मधे नेत्राला वर्ल्ड ट्रेड सेंटरतर्फे प्रदर्शनासाठी खास आमंत्रण होतं आणि भारत-रशिया कल्चरल एक्स्चेंज कार्यक्रमात मॉस्कोला जाणाऱ्या शिष्टमंडळात तिचा समावेश होता.

कलासमीक्षक ज्ञानेश्वर नाडकर्णी यांनी तिच्या या चित्रांबद्दल लिहिताना म्हटंटलं आहे, "It must be called a virtue of Netra Sathe that she never poses to be preoccupied with any profound philosophy. The entire Rajasthani ambience has a unique sensuousness about it. Every painting therefore comes alive. It is clear to us that Netra has viewed these Rajasthani people with immense affection so much so that there is something other worldly about the atmosphere here and the people breathing it."

एका छोट्याशा राजस्थानी कुटुंबाचे चित्र नेत्राने रेखाटले आहे. त्याच्या जगण्यातले हे निवांत क्षण. राजस्थानी पुरुषाची पहुडण्यातली ऐट, तो रुबाब पाहात राहावासा. एक चढाव बाजूला पडला आहे, त्याच्या खांद्यावरची ती शालवजा गोधडी तर बघा, काय अप्रतिम कलाकुसर रंगवलीय नेत्रानं त्यावर. प्रत्येक चौकटीत वेगळा पॅटर्न! एका हातात एक खेळण्यातली चिमणी धरून तो बाळाला रिझवतोय. गोडुलं बाळ त्याच हाताचा आधार घेऊन ती चिमणी पकडू बघतंय. दुसऱ्या हातातली बासरी त्याची सुरांबद्दलची आवड व्यक्त करते आहे. आणि हे सारं कौतुकानं पाहणारी स्त्री, त्याची बायको, उभं मनगट करून पदर पकडण्याची तिची लकब, ती मनगटभर नक्षीदार कांकणं आणि दंडातल्या हस्तिदंती बांगड्या! आणि झबलं टोपडं घातलेल्या गोजिरवाण्या बाळाचे डोळे पाहिलेत? मोठ्या व्यक्तिरेखांचे डोळे नेत्रा काळ्या गडद रंगात असे काही रेखते की फार डिटेलिंग नसूनही ते नेमका भाव व्यक्त करतात. कमीत कमी रेषांतूनही ते बोलतात, पण इथे बाळाचे डोळे मात्र नेत्रानं जरा वेगळे, गोलसर असे केलेत. ती बाळाची निरागस नजर तिनं बरोब्बर चित्रित केली आहे!

सिरॅमिक रंगातलं आणखी एक चित्र. ज्याचं शीर्षक आहे 'यशोदा'! चित्राला हे शीर्षक नेत्रानं दिलेलं नाही. सुप्रसिद्ध कादंबरीकार श्री. ना. पेंडसे ह्यांनी हे चित्र पाहिलं आणि ते आश्चर्यानं उद्गारले, 'अरे, ही तर माझी 'यशोदा'!' कादंबरीतील व्यक्तिरेखांवरून चित्रकार चित्र रेखाटतात, पण इथे चित्रातून श्रीनांच्या डोळ्यांसमोर त्यांच्या कादंबरीमधली 'यशोदा' पुन्हा आली! मलाही एकदा हा असाच साक्षात्कार बडोद्याला झाला होता. प्रसिद्ध वास्तुशिल्पी माधव आचवलांच्या माडीवरच्या दिवाणखान्यातून खाली



जिन्यानं उतरताना जिन्याच्या वळणावरच्या थांब्यावरच्या भिंतीवर ते चित्र नजरेस पडलं आणि मी स्तिमित झाले. इतकं सुंदर चित्र, पायऱ्या उतरताना नजर खिळवून ठेवणारं, आचवलांनी इतक्या योग्य जागी त्याची योजना केली होती! ते हरीणशावकासारखे काळेभोर डोळे, चेहऱ्यावरचा तो संभ्रमित असा भाव! खरोखरीच ती मुग्धा श्री.नांची 'यशोदा'च होती!

नेत्राची दुसरी खासियत म्हणजे पोर्ट्रेट्स. कधीकधी लेखनातील किंवा कवितेतील शब्दांमधून शब्दांच्या पलीकडचं जाणवतं ना तसंच काहीसं उत्तम व्यक्तिचित्रणामधून अभिप्रेत असतं. त्या व्यक्तीचा नुसता चेहरामोहराच नाही तर संपूर्ण व्यक्तिमत्त्व जाणवतं. नेत्रानं काढलेल्या पोर्ट्रेट्समधनं अशी त्या-त्या व्यक्तीची नेमकी ओळख पटते. नेत्रानं तिच्या वडिलांचं पोर्ट्रेट केलंय. तिचे वडील म्हणजे आर्टिस्ट कृष्णराव केतकर, कलाशिक्षक. त्यांना 'गुरुंचे गुरू' म्हंटलं जायचं कारण एम्. आर. आचरेकर, गोपाळराव देऊसकर, आरा, माळी, दलाल असे कितीतरी ख्यातनाम कलावंत हे या गुरुजींपुढे आदराने वाकणारे विद्यार्थी. याशिवाय अभिनय, गाणं, लेखन हेही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे पैलू. ७०-७५ वर्षांपूर्वीच्या अत्रे-वरेरकरांच्या 'पुण्यावर हल्ला' या मूकपटाचे नायक शिवाजी म्हणजे आर्टिस्ट केतकर. नेत्रानेही लहानपणापासून त्यांची किती रूपं साठवली असतील. मात्र त्यांच्या साध्या वाटणाऱ्या या पोर्ट्रेटमध्ये नेत्रानं त्यांची जी भावपूर्ण आणि कुशाग्र बुद्धीची द्योतक असलेली नजर टिपली आहे, त्यातून त्यांच्या परिपूर्ण व्यक्तिमत्वाची ओळख पटते.

संगीतसूर्य भास्करबुवा बखल्यांचं नेत्रानं केलेलं भव्य तैलचित्र कल्याणच्या 'गायनसमाज'मध्ये विराजमान आहे. हे पोर्ट्रेट इतकं अप्रतिम साधलंय की प्रख्यात चित्रकार रेनॉ (Renoir)ची आठवण यावी. त्यांचं भारदस्त असणं, ज्ञानवंत असणं, करारीपण तिच्या रंगशैलीतून आणि तिला जाणवलेल्या देहबोलीतून साकार केलं आहे. चित्राची फ्रेमही त्यांच्या उत्तुंग व्यक्तिमत्वाला साजेशीच.

नेत्रानं प्रख्यात शिल्पकार सदाशिव साठ्यांचंही एक पोर्ट्रेट केलंय. 'Artist at work' साठे, नेत्राचे जीवनसाथी, ज्यांच्या साथीनं तिचंही कलाजीवन फुललं, बहरलं. शिल्पकाराची एकाग्रता, विचारात बुडून जाऊन संगीताच्या तंद्रीत काम करणारा कलावंत. नेत्रानं तिच्या नेहमीपेक्षा जरा वेगळ्या शैलीतल्या या पोर्ट्रेटमधे कैदच करून ठेवलंय त्यांना!

प्रसिद्ध वास्तुशिल्पी, लेखक, समीक्षक माधव आचवल, साठ्यांचे फार पूर्वीपासूनचे मित्र, नुसते साठ्यांचेच मित्र नाहीत तर एकूणच साठे कुटुंबियांबद्दल जिव्हाळा असलेले. त्यांच्या पोर्ट्रेटमधलं

त्यांचं दिलखुलास हास्य म्हणजेच जणू स्वत: माधव आचवल. व्यक्तिचित्रात त्या व्यक्तीच्या त्वचारंगाचाही नीट विचार करावा लागतो. नेत्रानं त्यांचा नेमका स्किन टोन (skin tone) तर या पोट्रेटमधे पकडलेला आहेच, पण गालांवरच्या रंगलेपनामधून त्यांच्या त्या दिलखुलास हास्यामधली हालचालही प्रतीत व्हावी अशी जादू घडली आहे.

व्यक्तिचित्र उठावदार होण्यासाठी पार्श्वभूमीचाही विचार आवश्यक. त्यात फार तपशीलाचा भाग, डिटेलिंग (detailing) टाळावंच लागतं आणि छायाप्रकाशाचाही तोल राखावा लागतो. नेत्रानं केलेल्या सर्वच पोट्रेट्समधे याबाबतचा तिचा विवेक जाणवतो.

एका लहान मुलाचे चित्र... हा मुलगा लहान असला तरी गंभीरपणे निरीक्षण करणारा आहे. इथेही नेत्राने लहान मुलाच्या त्वचेमधला कोमलपणा अगदी छान आणला आहे, परफेक्ट स्किन टोन (perfect skin tone). खरं तर ऑईलपेंटमधे हे साधणं म्हणजे कठीणच, पण पेंट योग्य प्रमाणात पातळ करून नेत्रानं ते साधलेलं दिसतं. हा लहान मुलगा आहे तरी कोण? हे आहेत सध्याचे 'सदाशिव साठे शिल्पप्रतिष्ठान'चे श्रीरंग साठे. श्रीरंग साठे म्हणजे आत्ता इलेक्ट्रिकल इंजिनियर असलेला नेत्राचा लाडका लेक रंगा. या पोट्रेटमधे नेत्रानं त्याचं बालपण जपून ठेवलंय.

बाबूजी म्हणजे सुधीर फडके. प्रख्यात गायक, संगीत दिग्दर्शक आणि शिवाय बरेच काही. आपल्याला नेहमी गातानाचे बाबूजी आठवतातच, पण या पोट्रेटमधे नेत्रानं मित्रांबरोबर गप्पा मारणारे, मिस्किल टिप्पणी करणारे बाबूजी चितारले आहेत. शिवाय या चित्रात वापरलेल्या रंगांचं टेक्श्चरही वेगळंच वाटतं. प्रथमदर्शनी मला हे चित्र जलरंगात केलंय की काय असा भास झाला होता!

डॉ. लागू, म्हणजे नेत्राला पोट्रेट करण्यासाठी आव्हान होतं. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात तिला त्यांच्या डोळ्यांना प्राधान्य द्यावंसं वाटणं स्वाभाविकच होतं. त्यांच्या अमृतमहोत्सवानिमित्त नेत्रानं त्यांच्यावर लेख लिहिला होता आणि त्याला शीर्षक दिलं होतं 'प्रिझम'. त्यात त्यांच्या डोळ्यांचं वर्णन करताना ती म्हणते, ''मला दिसणारे डॉक्टर म्हणजे फक्त त्यांची नजर... स्फटिकासारख्या लखलखणाऱ्या हिरकणीवरचे पाचूचे तितकेच लखलखीत गोल मोठ्ठे मणी. या खजिन्यावरचा त्यांचा ताबाही विलक्षण. त्यांच्या नजरेच्या शरसंधानातून साधलेला! 'पिंजरा' चित्रपटामधला भाबडेपणा, 'सिंहासन' मधला बेरकीपणा, 'हिमालयाची सावली', 'नटसम्राट' अशा नाटकांमधला प्रगल्भपणा, 'सूर्य पाहिलेल्या माणसा'ची तडफड आणि 'काचेचा चंद्र', 'गिधाडे'मधला खुनशीपणा, अगदी सहजगत्या त्यांना हे भाव प्रकट करता आले आणि तरीसुद्धा 'गिधाडे' आणि 'काचेचा चंद्र'मधील हीच नजर, त्यांना शोभून दिसली. कारण 'याच तेजस्वी डोळ्यांत प्रगल्भतेची एक खलनायकी बोच आहे आणि तीच आम्हाला प्रिय आहे.' नेत्राचे हे म्हणणं किती सार्थ आहे आणि लागूंच्या व्यक्तिचित्र साकारण्यातलं आव्हान तिनं किती यशस्वीपण पेललं आहे हे या व्यक्तिचित्रातून जाणवतं.

नेत्रानं अनेक उत्कृष्ट पोट्रेट्स केली. जवाहरलालजी, बिर्ला, मफतलाल, चिदंबरम, भंवरलाल जैन, श्रीमती धर्माधिकारी अशा अनेक नामवंतांची. तसंच तिच्या जिव्हाळ्याच्या आणखी काही व्यक्तींची. ही सर्व पोर्टेट्स योग्य त्या त्या जागांवर विराजमान आहेत, पण आणखी एक उल्लेख केलाच पाहिजे असं पोट्रेट म्हणजे आंतरराष्ट्रीय न्यायालयाचे चीफ जस्टिस नागेंद्र सिंग यांचं. आज ते हेग येथील आंतरराष्ट्रीय न्यायालयात विराजमान आहे!

नेत्रा नुसती चित्रकार नव्हती तर आणखी बरंच काही होती. ती एक चांगली अभिनेत्री होती. थोडंसं लेखनही तिनं केलं होतं आणि मनात आणलं असतं तर ती एक शास्त्रीय रागसंगीत गाणारी गायिका होऊ शकली असती. लग्नापूर्वी दाजी भाटवडेकरांनी दिग्दर्शित केलेल्या संस्कृत नाटकांमधे म्हणजे 'शाकुंतलम्' व 'मृच्छकटिकम्'मध्ये तिनं लक्षवेधी भूमिका केल्या होत्या. तिचे बोलके डोळे आणि रेखीव चेहरा व एकूण त्यावेळचं व्यक्तिमत्त्व तिला रंगभूमीवर यशस्वी करण्यास कारणीभूत होतंच. पुढे लग्नानंतर दिल्लीतही महाराष्ट्र मंडळातर्फे झालेल्या 'घेतलं शिंगावर', 'संभूसाची चाळ', 'दिनूच्या सासूबाई राधाबाई', 'धुम्मस' अशा अनेक नाटकांमधून तिने भूमिका केल्या होत्या. महाराष्ट्र शासकीय स्पर्धेत 'अंधायुग'मधील 'गांधारी'च्या भूमिकेसाठी तिला पुरस्कार मिळाला होता.

दिल्लीत गांधर्व महाविद्यालयाचे स्व. विनयचंद्रजी मुद्‌गल तिनं संगीताचीच आराधना करावी म्हणून आग्रह करीत होते आणि तिचे काही लेख वाचून मुंबईहून श्री.ना. पेंडसे तिनं लेखनाला वाहून घ्यावं असं म्हणत होते.

दिल्लीतून कल्याणला आल्यानंतर तिनं, 'दिनकर संगीत विद्यालया'ची प्रमुख म्हणून जबाबदारी स्वीकारली व इथे ती नृत्य-नाट्य, वगनाट्य असे अनेक प्रयोग करीत या बहुतेक सगळ्या कलाप्रकारांशी मनसोक्त खेळली! या अवधीत तिनं 'नियती', 'एक बिचारी व्यथा', 'सौभद्रकल्लोळ' या एकांकिका लिहिल्या आणि 'राणी रुसली राजावर', 'लग्नाला चला तुम्ही' ही वगनाट्ये, तसेच 'कांचनमृग', 'वसुंधरा' ही नृत्यनाट्ये स्वत: लिहून सादर केली.

आणखी एक मोठं आव्हान नेत्रासमोर उभं राहिलं. डॉ. श्रीराम लागूंच्या 'रूपवेध'तर्फे वामनराव देशपांडे यांचं 'विष्णुगुप्त चाणक्य' हे नाटक होणार होतं आणि त्याच्या कॉस्च्युम डिझायनिंगची जबाबदारी त्यांनी नेत्रावर सोपवली. डॉ. लागूंनी दाखवलेल्या विश्वासामुळे नेत्राला ती स्वीकारावीच लागली. त्यासाठी तिनं चाणक्य काळातील १०-१२ पुस्तकांचा अभ्यास केला. म्युझियममधली शिल्पं, चित्रं पाहून त्यांची स्केचेस तयार केली. फोटो घेतले आणि मग प्रत्येक पात्राची संपूर्ण रंगीत स्केचेस पगडीपासून चपलेपर्यंत किंवा केसांपासून, दागिन्यांपर्यंत अशी तयार करून ती लागूंना

दाखवली. चर्चा केली. नेपथ्य कशाप्रकारचं असेल ते जाणून घेतलं. त्या नाटकातला अमात्यराक्षस हा ब्राह्मण तर प्रतिहारी तृतीयपंथी. त्यानुसार वेषभूषेत काही बदलही केले आणि पुढे तर मग कष्ट, कष्ट आणि कष्ट! कापडखरेदी, प्रत्यक्ष कपडे शिवून घेणं, तयार कपड्यांच्या पेट्या हरवणं, अरे बापरे! बापरे!... पण सगळ्या अडचणींवर मात करून ती यशस्वी झालीच!

'वसुंधरा' हे नृत्यनाट्य म्हणजे नेत्राच्या प्रतिभेचा महत्त्वपूर्ण आविष्कार. कुसुमाग्रजांच्या 'पृथ्वीच्या प्रेमगीता'नं तरुण वयातच तिच्या मनात घर केलं होतं. 'तुझ्या लाल ओठातली आग घ्यावी, मिठीने तुझ्या तीव्र व्हाव्या कळा' किंवा 'नको क्षुद्र शृंगार तो दुर्बळांचा, तुझी दूरता त्याहुनी साहवे' अशासारख्या ओळी तिच्या मनात सदैव घोळत असायच्या. पृथ्वीच्या नशिबी आलेली विरहव्यथा नेत्रालाही अस्वस्थ करून जायची आणि आश्चर्य म्हणजे ही सारी अस्वस्थता नेत्राच्या उत्तर आयुष्यात, तिच्या लेखणीतून 'वसुंधरा' या विरहगाथेच्या काव्यमय शब्दांतून व्यक्त झाली. नेत्राला मनोमन जाणवलं, आपल्याकडून हे काही तरी वेगळंच घडून गेलं आहे! केदार पंडित यांनी ते रंगमंचावरच्या सादरीकरणासाठी अतिशय सुंदर, श्रवणीय असं संगीतबद्ध केलं. पुढे हे ध्वनिमुद्रण डॉ. मीना नेरुरकरच्या हाती दिलं. मीनानं त्याचं अक्षरश: सोनं केलं. एक विलक्षण नेत्रदीपक असा नृत्यनाट्यप्रयोग बॉस्टनच्या बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अधिवेशनात सादर झाला. तो अक्षरश: गाजला. पुढे त्याचे कितीतरी प्रयोग भारतात व परदेशात मराठीत व हिंदीतूनही सादर झाले. दिवंगत अश्विनी एकबोटेनेही 'वसुंधरा' अतिशय प्रभावीपणे सादर केली होती. हा इथपर्यंतच्या प्रवास अभूतपूर्वच झाला, पण कुसुमाग्रजांच्या 'पृथ्वीचे प्रेमगीत' या कवितेचा विस्तारित काव्याविष्कार व नंतरच त्याला दिलेला संगीतसाज तिनं कुसुमाग्रजांनाच आधी दाखवला होता, ऐकवला होता आणि त्यांच्याकडून या 'वसुंधरे'ला भरघोस आशीर्वाद मिळाले होते.

नेत्राने लेखनप्रपंच आणि रंगभूमीवरचे प्रयोगही केले तरी तिच्या आयुष्यात अग्रक्रम होता तो चित्रकलेलाच. तिने तिच्या ललित गद्यसंग्रहालाही 'पॅलेट' हेच नाव दिले. तिच्या अनेक चित्रांसाठी तिने जे कोल्ड सिरॅमिक हे माध्यम वापरले, त्या माध्यमाच्या पटकन् थिजण्याच्या मर्यादांमुळे इतर चित्रकारांनी ते वापरण्याची हिंमत केली नसावी. पण नेत्राने मात्र जी सुंदर चित्रं या माध्यमातून साकारली, ती अनेक रसिकांच्या भिंतींवर आणि मनात झळाळत आहेत अर्थात खऱ्या चित्रांची सुंदरता त्यांच्या प्रतिकृतींतून तितकीशी कळणार नाही. त्याकरता ती मुळातूनच पाहायला हवीत.

**– उषा मेहता**
भ्रमणध्वनी : ९८३३०८४२८३
ushasmehta@gmail.com

*With Best Complimenst From*

**Granthali's leading paper supplier**

# Mayur Paper Corporation

**STATIONERS & PAPER MERCHANTS**

***We are paper suppliers of reputed publishers like Granthali***

23-B, Podar Chambers, S.A. Brelvi Road, Fort, Mumbai-400 001.
e-mail : mayurpapercorp@gmail.com

# चित्रपटाचं एक 'गाईड'

महेन्द्र एकनाथ तेरेदेसाई

**विजय आनंद आपली गाणी स्वतःच कोरिओग्राफ करायचा. त्यातले काही शॉट्स बघून आपल्याला प्रश्न पडतो की (आजच्या मानाने) अत्यंत तुटपुंज्या तंत्राच्या साहाय्याने तेव्हा ते त्याने घेतले कसे असतील? त्याच्याबरोबरचे किंवा त्यानंतर गाजलेले राज खोसला, मनमोहन देसाई, प्रकाश मेहरा, शक्ती सामंत, यश चोप्राही त्यांचा एखाद दुसरा सिनेमा वगळता रिलेव्हंट वाटत नाहीत. मग विजय आनंद आजही का बघावासा वाटतो?**

नॉस्टॅल्जिया चांगला की वाईट माहीत नाही, पण रेलेव्हंस नसतानाही एखाद्या गोष्टीची आठवण काढणं म्हणजे नॉस्टॅलेजिया असं मला वाटतं.

विजय आनंदची आठवण आत्ता का यावी? तो जाऊनही एक तप लोटलं. त्याआधी त्याचा शेवटचा सिनेमा (मैंने तेरे लिये) प्रदर्शित होऊनही आज वीस वर्ष होत आली. आजच्या तरुणांना तो माहीत तरी असेल का? नक्कीच नाही. की जुनं ते सोनं म्हणून आपणच त्याला कवटाळत बसलोय?

'रात अकेली है, बुझ गये दिये....', 'पलभर के लिये कोई हमे प्यार कर ले....', 'खोया खोया चांद...', 'आज फिर जिने की तमन्ना है...', 'हम है राही प्यारके...', 'आजा आजा मै हूँ प्यार तेरा...', 'ओ हसीना जुल्फोवाली....', 'मैं जिंदगीका साथ निभाता चला गया', 'हर फिक्र को धुएँ मे उडाता चला गया...' आजच्या तरुणांच्या तोंडी ही गाणी ऐकतो तेव्हा खात्री पटते, Vijay Anand is still Relevant.

कसा? निव्वळ त्याच्या चित्रपटातली गाणी आज तरुणांच्या तोंडी आहेत म्हणून? अशा तर कित्येक जुन्या गाण्यांचे रिमेक होताना आज ऐकतोय आपण. छचोर म्हणून त्यावेळी अव्हेरलेल्या 'लैला ओ



लैला' ह्या गाण्याचा रिमेकही आज लोकप्रिय झाला, पण विजय आनंदनंतर आणि तुलनेनं आताचा म्हणावा असा फिरोजखानही आता रिलेव्हंट राहिलेला नाही. तेवढच नाही तर त्याच्याबरोबरचे किंवा त्यानंतर गाजलेले राज खोसला, मनमोहन देसाई, प्रकाश मेहरा, शक्ती सामंत, यश चोप्राही त्यांचा एखाद दुसरा सिनेमा वगळता

रिलेव्हंट वाटत नाहीत. मग विजय आनंद आजही का बघावासा वाटतो?

विजय आनंदच्या आधी बिमल रॉय, अमिया चक्रवर्ती, हृषिकेश मुखर्जीसारखे चित्रकर्ते आशयघन विषय साध्या पद्धतीने मांडत होते तर दुसऱ्या बाजूला मेहबूब खान आणि के. असिफ सारखी मंडळी मोठ्या पडद्याचं नाट्य चित्रित करीत होती. त्याच्या मोठ्या भावाचा मित्र आणि संवेदनशील दिग्दर्शक गुरुदत्त याने सुद्धा 'कागज के फूल' नावाचा एक भव्य पण तितकाच संवेदनशील चित्रपट निर्माण केला होता. साधारण त्याच स्कूलचा म्हणावा असा विजय आनंद.

जागतिक सिनेमातून (अजूनही आपल्याकडे हॉलिवूडच जागतिक सिनेमा म्हणून मानला जातो) आल्फ्रेड हिचकॉक नावाचं गारुड जगभर पसरत होतं. ज्याचा 'सिनेमा हे दृश्य माध्यमच आहे' ह्यावर ठाम विश्वास होता. त्यावेळच्या अनेक चित्रकर्त्यांवर त्याचा प्रभाव न पडला तरच नवल होतं. विजय आनंदच्या अनेक मुलाखती वाचून, पाहून किंवा ऐकून तसं कुठे त्याने कबूल केल्याचं दिसत नाही, पण ते जाणवतं त्याच्या चित्रभाषेच्या शैलीतून. त्यासाठी त्याने रचलेल्या पटकथेतून. इतकच नव्हे तर त्या चित्रभाषेला शोभतील, योग्य वाटतील अशा सहज सोप्या पण मर्मग्रही संवादातूनही.

चित्रकर्ता एखादी गोष्ट आपण का केली हे सांगताना जाणिवेच्या पातळीवरचंच सांगू शकतो. नेणिवेतील अनेक गोष्टींचं पृथक्करण तो नाही करू शकत. त्या कलाकृतीकडे ऑब्जेक्टिव्हली (objectively) बघताना बघणारा त्याच्या अकलेप्रमाणे त्याचा अर्थ लावत असतो. हे करत असताना तो कदाचित त्या चित्रकर्त्याच्या नेणिवांपर्यंत जाण्याची शक्यता असते. तर कधी कधी असं करताना तो त्या चित्रकर्त्याला अभिप्रेत नसणारेही बघत असेल. ज्याला आपण 'Reading too much between the lines' असं म्हणतो. हे टाळलेलं बरं. हे टाळून विजय आनंदच्या चित्रपटांकडे बघायचं असेल तर त्याच्या एकंदर विचारांच्या प्रक्रियेकडे, ते अंमलात आणताना त्याच्यासमोर असलेल्या













आव्हानांकडे, अडथळ्यांकडे आपण नीट बघणं गरजेचं होतं.

विजय आनंदने सुरुवातीला फक्त 'नवकेतन'मधूनच सिनेमे केले. त्यामुळे त्याला काही फायदे झाले तर काही मर्यादाही आल्या. सगळ्यात मोठी मर्यादा म्हणजे 'नवकेतन'ची फिल्म म्हटले की त्यात हिरो म्हणून फक्त देव आनंदच असायचा. ह्यातही पुन्हा फायदा आणि मर्यादा असायच्या. फायदा हा की देखणा देव आनंद हा त्यावेळचा स्टार होता पण त्याच्या अभिनयाला खूप मर्यादा होत्या. अनेकदा त्याचे देखणेपणच त्याच्याविरुद्ध जायचं (असं कधी बलराज सहानी बाबत झालं नाही.) पण त्यामुळे कथा निवडताना विजय आनंदला खूप अडचणी येत असाव्यात. ही अडचण म्हणा किंवा अट म्हणा ती आधीच माहित असल्याने कथेचा विचारच सुरुवातीपासून तो तसा करत असावा. नीट पाहिलंत तर विजय आनंदचा पिंड हा सामान्य माणसाची गोष्ट सांगण्याचा वाटतो आणि देव आनंदचं व्यक्तिमत्त्व तर भूतलावरचा गंधर्व असं होतं. ह्या सगळ्या गोष्टींचा विचार करून त्याने ज्या कथा निवडल्या त्या पाहता त्या-त्या कथेत तुम्ही देव आनंदशिवाय कोणाचाच विचार करू शकत नाही इतक्या त्या चपखल होत्या. त्याच्या पहिल्याच चित्रपटातला, 'नौ दो ग्यारह'मधला उधारीवर जगणारा तो गुलछबू, बेफिकीर मदन गोपाल. आपण गरीब आहोत म्हणून आपल्यावर अन्याय होतोय असं वाटून काळा बाजार करणारा पण एका मुलीच्या प्रेमामुळे लगेच स्वतःला सावरू पहाणारा रघू, दिखाऊपणाचे प्रदर्शन करणारा राजू गाईड (नंतर तोच राजू संत होताना दाखवताना विजय आनंदला खूप कष्ट करावे लागलेले दिसतात.), शहरातून खेड्यात सेवा करायला आलेला पण नंतर भरकटलेला डॉ. आनंदकुमार.... वगैरे. ऐन बहरात असताना नवकेतन आणि देव आनंद व्यतिरिक्त त्याने 'तिसरी मंझिल' (१९६६) हा सस्पेन्स ड्रामा केला ज्यात त्याने रॉक स्टार शम्मी कपूरचा उत्तम वापर करून घेतला.

पटकथेतून कथेतलं वेगळेपण अधोरेखित










करायचं आणि आपल्या वैशिष्ट्यपूर्ण दृश्यभाषेतून ते मांडायचं. यामुळेच विजय आनंद या चित्रकर्त्याकडे रसिक आकर्षित होत होता.

त्याच्या पदार्पणात त्याने लिहिलेल्या 'टॅक्सी ड्रायव्हर' ह्या सिनेमाने यश पाहिलं होतं आणि ह्या आधी फ्रांक काप्राचा 'It Happened One Night' आणि विलियम वायलरचा 'रोमन हॉलिडे' हे दोन रोड सिनेमे भारतातही खूप गाजले होते. दिग्दर्शक म्हणून त्याचा पहिला 'नौ दो ग्यारह' हा साधारण त्याच जोनरचा सिनेमा, पण तो बेमालूमपणे इथल्या मातीत रंगवलेला आणि त्याला कारण त्याचं ह्याच मातीतलं संगीत. 'हम है राही प्यारके, हमसे कुछ ना बोलिये, जो भी प्यारसे मिला हम उसीके हो लिये.' हे त्या सिनेमातलं पहिलंच गाणं प्रेक्षकांचं लक्ष वेधून घेतं. त्यानंतर कथेच्या ओघात येत असलेली 'आँखों में क्या जी? रुपहला बादल' आणि 'आजा पंछी अकेला है'... ही गाणी निव्वळ तुमचं मनोरंजनच नाही करत तर सिनेमाची कथाही प्रवाही करतात आणि हाच महत्त्वाचा फरक राहिला त्याच्यामध्ये व त्यावेळच्या इतर चित्रकर्त्यांमध्ये. आपण भविष्याची स्वप्न नेहमी सोनेरी पहातो. म्हणून मजरूह यांनी लिहिताना 'आँखों में क्या जी.. सुनहरा बादल..' असं लिहिलं होतं, पण विजय आनंदला हे गाणं रात्रीच्या सत्रात घडताना दाखवायचं होतं म्हणून त्याने त्यात 'रुपहला बादल' असा बदल करून घेतला म्हणे! दृश्य परिणामांचा सतत विचार करणारा विजय आनंद फक्त ह्या एकाच कारणाने हा बदल करेल असं मला वाटत नाही. रुपहला' ह्या शब्दात दडलेल्या 'रूप' (कल्पना कार्तिकचं) आणि 'रुपया' (त्याची आर्थिक परिस्थिती) ह्या अर्थांचाही त्याने विचार केला असावा अशी शंका नक्की येते कारण तो निव्वळ दृश्यात्मक विचार करणारा चित्रकर्ता नव्हता. कुठलंही दृश्य हे निव्वळ सुंदर वा भव्य असून भागत नाही तर ते अर्थवाही नसेल तर त्याचा बघणाऱ्याच्या मनावर काहीच परिणाम होणार नाही. (संजय लीला भन्साळीच्या चित्रपटातली एक तरी भव्य फ्रेम तुम्हाला आज आठवतेय का?) दुसरं कारण गुळगुळीत रूपकांचा वापर टाळणे हेही असू शकतं, पण ह्या सगळ्यातून एक महत्त्वाची गोष्ट आपल्याला उमगते ती ही की देव आनंदला घेऊन गोष्ट सांगताना विजय आनंद गाण्यांचा वापर जास्त करतो. (पुढे तो अनेक दिग्दर्शकांनी केला. नायकाला गाणी नाहीत म्हणून देव आनंदने 'जंजीर' नाकारला असं म्हणतात.) मग ते कथा नायकाचं व्यक्तिमत्त्व रंगवण्यासाठी असो... ('हम है राही प्यारके हमसे कुछ ना बोलिये') किंवा ('मैं जिंदगी का साथ निभाता चलाता गया, हर फिक्र को धुएँमें मी उडाता चला गया') तर कधी नायिकेशी छेडछाड असो ('पलभर के लिये कोई हमें प्यार करले') कधी तिच्यावरचा राग असो.... ('क्यासे क्या हो गया... तेरे प्यार में') किंवा विफल प्रेम असो ('हम बेखुदी में तुमको भुलाते चले गये') देव आनंद आपल्या व्यक्तिचित्रणातल्या संवेदना गाण्यातूनच व्यक्त करत असे, खरं तर विजय आनंद ती कथाच तशी गुफंत असे. गाण्याविना असलेला इंग्लिश 'गाईड' (जो अर्थात विजय आनंदने केला नव्हता) म्हणूनच पूर्ण फसला असावा.

गाणी हा जुन्या चित्रपटातला USP असायचा. आज निव्वळ त्याचा प्रोमो आणि पब्लिसिटीकरता वापर केला जातो. त्यामुळे गाणी चांगली असणं ह्यात काही विजय आनंदची खासियत म्हणता येणार नाही. त्याची खासियत गाण्याच्या चित्रीकरणात दिसते. आठवा त्याची पडद्यावरची गाणी. (किंवा यूट्यूबवर जाऊन पहा) जवळ-जवळ त्याच्या सगळ्या गाण्याच्या चित्रीकरणात काही ना काही वैशिष्ट्य आहे. तेव्हाच्या 'नौ दो ग्यारह' ह्या 'रोड मुव्ही'मधल्या बऱ्याच गाण्यांचं टेकिंग आपल्याला आजच्या इम्तियाज अलीच्या चित्रपटात पहायला मिळेल. तुलनेने आज आपल्याकडे खूपच अद्ययावत अशी Camera gadgets उपलब्ध आहेत, पण जर मंत्र माहित असेल तर तंत्र अवगत करता येतं आणि तुम्हाला जो इफेक्ट पाहिजे तो साधता येतो हे विजय आनंद ह्यांच्या टेकिंगमध्ये तुम्हाला दिसेल. 'तेरे घर के

सामने' चित्रपटातलं 'दिल का भँवर करे पुकार' हे गाणं त्याने कुतुबमिनारच्या आत चित्रित करायचं ठरवलं. तिथली अरुंद जागा बघता तिथे चित्रीकरण करणं शक्यही नव्हतं व तशी परवानगीही मिळण कठीण असतं. विजय आनंद हा स्वतः उत्तम संकलक होता. त्याला ते गाणं व्हिज्युलाइज करणं सोप्पं होतं. त्याने कुतुबमिनारच्या आतील जिन्याचे दोन कट आउट सेट बनवले. एक डावीकडून उजवीकडे वर जाणारा तर दुसरा उजवीकडून डावीकडे वर जाणारा. आणि त्या दोन कट आउटमध्ये त्याने आख्खं गाणं शूट केलं व ती दोघं (देव आनंद आणि नूतन) कुतुबमिनार उतरतानाचा फील त्याने दिला.

समूहनृत्य ('होठों पे ऐसी बात', 'चूप चूप मीरा रोये') किंवा पार्टी साँग ('तिसरी मंझिल'मधील कॅबरे वगैरे) ह्या गाण्यांची टेकिंग्ज तर अभ्यासण्याजोगीच आहेत. खास करून वर उल्लेख केलेली 'ज्वेलथिफ'मधलं 'होठोंपे ऐसी बात', 'जॉनी मेरा नाम'मधलं 'चुप चुप चुप मीरा रोये' आणि 'तिसरी मंझिल'मधलं 'तुमने मुझे देखा' ही गाणी. ह्या गाण्यातच त्याने घटना गुंफल्या आहेत. शेवटी काय होणार ह्याची उत्कंठा वाढवणारा सस्पेन्स ही ह्या गाण्यांची खासियत आहे. विजय आनंद आपली गाणी स्वतःच कोरिओग्राफ करायचा. म्हणजे डान्स डिरेक्टर फक्त नाच बसवायचे पण तो शूट कसा होणार हे विजय आनंदच ठरवायचा आणि त्यातले काही शॉट्स बघून आपल्याला आजही प्रश्न पडतो की (आजच्या मानाने) अत्यंत तुटपुंज्या तंत्राच्या साहाय्याने तेव्हा ते त्याने घेतले कसे असतील? 'गाईड'मधील 'आज फिर जिने की तमन्ना है' मधला वहिदाचा उंटावरचा प्रवास, 'रुलाके गया सपना' (ज्वेलथिफ)मधली बोट. झूम लेन्सचा वापर न करता निव्वळ ट्रॉलीचा वापर करून विविध अँग्लस व मॅग्निफिकेशन्स देऊन शॉट कोरिओग्राफ करण्यात विजय आनंद तरबेज होता. (त्याच्या बऱ्याच चित्रपटाचे कॅमेरामन व्ही. रात्रा होते.) आणि तो स्वतः उत्तम संकलक असल्याने शॉट कधी बदलला हेच कळत नसे. ह्याने थेट तुमच्या नेणिवेत एक दृश्य परिणाम साधला जातो म्हणूनच तुम्हाला आजही ती गाणी पाहताना अचंबित करतात.

अर्थवाही गाणी व त्याचा परिणाम साधण्यासाठी त्याची पटकथा प्रभावी असणं गरजेच असतं आणि विजय आनंद ह्या चित्रकर्त्याची ताकदच 'पटकथा' होती. त्याची दोनच उदाहरणं इथे देतो. मी म्हणजे 'ज्वेलथिफ' आणि 'जॉनी मेरा नाम'. निव्वळ पटकथेच्याच जोरावर 'ज्वेलथिफ'सारखा सस्पेन्स सिनेमा तुम्हाला आजही खिळवून ठेवतो, तो त्यात नसलेल्या 'अमर' ह्या व्यक्तिरेखेमुळे. हे पात्र पटकथाकाराने अशा पद्धतीने गुंफलंय की त्याने त्यातली पात्रच नाही, तर तुम्हीसुद्धा इतके चक्रावून जाता की सस्पेन्स उघड झाल्यावरही त्याने हे कसं साधलं असेल ह्याचा विचार करत तो चित्रपट दुसऱ्यांदा पहाण्यास प्रवृत्त होता. विद्या बालन अभिनित 'कहानी' या चित्रपटात 'अर्णब बागची' या व्यक्तिरेखेचा वापर असाच केलेला आहे. कुठलाही सिनेमा हा रिपिट ऑडिअन्समुळेच चालतो आणि सस्पेन्स सिनेमाला रिपिट ऑडिअन्स कसा मिळणार? त्यासाठी एक क्लृप्ती वापरली जायची ती म्हणजे त्यातली गाणी! 'महल'पासून ते 'वो कौन थी?', 'मेरा साया', 'गुमनाम'पर्यंत ह्या चित्रपटांची गाणी पहायला प्रेक्षक परत-परत जायचा. पण 'ज्वेलथिफ' (त्यातली एकूण एक गाणी हिट होतीच) तेव्हा गाजला किंवा आजही पाहिला जातो तो 'अमर' ह्या व्यक्तिरेखेच्या कुतूहलामुळेच. हे यश त्याच्या पटकथेचं आहे.

'जॉनी मेरा नाम'च्या पटकथेचं वैशिष्ट्य तिच्या पात्रयोजनेत आहे. एखाद्या कथेत एखादे पात्र त्याच्या उपकथानकासकट येतं. ते जर तसं नाही आलं तर ते उपरं वाटतं. 'जॉनी मेरा नाम'मधील खूप पात्रांमुळे त्यांची उपकथानकेही खूप निर्माण होतात, पण ती उपकथानकं त्या पटकथेला अडसर निर्माण न करता उलट वेगवान बनवतात. हे कसब विजय आनंदचं आहे. कुठल्याही कथेला सुरुवात, मध्य आणि शेवट असतो. तसाच तो काही प्रमाणात उपकथानकालाही अभिप्रेत असतो. त्यामुळे ती जितकी जास्त तितका गोंधळ जास्त होण्याची शक्यता असते पण तो होऊ न दिला तर मात्र तुम्ही प्रेक्षक काबीज करण्यात यशस्वी होऊ शकता आणि 'जॉनी मेरा नाम'मध्ये विजय आनंदने नेमकं हेच साधलंय. ह्या दोन चित्रपटाच्या पटकथेतील अनेक वळणं आणि सौंदर्यस्थळं त्यानंतर व आजही अनेक चित्रपटामध्ये वापरली गेलीत व आजही ती वापरली जातात.

चित्रपट हे दृश्य माध्यम आहे ह्यावर ठाम असणाऱ्या विजय आनंद याचे संवादही तितकेच प्रभावी असायचे. संवाद लिहिताना ते कोणाच्या तोंडी (पात्र वा कलाकार) असणार आहेत ह्याचं भान असणं फार गरजेचं असतं. विजय आनंदच्या बाबतीत ते बऱ्याच वेळा देव आनंदच्या वाटेला आलेले आहेत, पण विजय आनंदने लिहिलेले संवाद हे देव आनंदच्या लिरिकल संवादफेकीला साजेसे असूनही अत्यंत परिणामकारक असायचे. ह्याच्या उदाहरणादाखल 'काला बाजार'चे काही संवाद इथे देण्याचा मला मोह आवरत नाही. जेव्हा रघूला 'काळा बाजारा'व्यतिरिक्त चरितार्थासाठी पर्याय सापडतो तेव्हा तो आपल्या सहकाऱ्यांना पटवून देताना म्हणतो, ''अभी तक मैं यह समझता रहा, के हम बुरे कामोंमे इसलिये पडे है, क्योंकि हमारे सामने दुसरा कोई रास्ता नही है। लेकिन अब दुसरा रास्ता होते हुए भी अगर हम बुरा काम करना चाहते है, तो इसका मतलब यह हुआ कि हम है ही बुरे।'' असे वाचताना हा संवाद आपल्याला खूपच ओढूनताणून लिहिलेला वाटेल. दिलीपकुमारसारखा नट अशा संवादाला हातही लावणार नाही, पण जेव्हा तुम्ही हा संवाद देव आनंदच्या शैलीत म्हणू लागता तेव्हा त्याची परिणामकारकता आपल्याला लगेच जाणवते. (असं म्हणत की देव आनंदने संवादाची

ही शैली ग्रेगरी पेक ह्या हॉलिवूड नटाची उचलली होती, पण माझ्या मते ती कुठल्याही पाश्चिमात्त्य शैलीशी मिळतीजुळती असावी. त्याच्याच जवळपास कारकीर्द असलेल्या हॉल हॉलब्रूक या नटाची संवाद वा अभिनयशैलीही बघा, तीही तशीच होती.

जेव्हा एखादा वास्तववादी प्रसंग नाट्यमयरित्या उभा करायचा असतो तेव्हा विजय आनंदमधील संवाद लेखकाचा पूर्ण कस लागताना दिसतो. इथेही संवादाचे दुसरं उदाहरण म्हणून 'काला बाजार'मधील शेवटचा प्रसंग आठवा. खरं तर 'काला बाजार'ची पटकथा लिहून झाल्यावर विजय आनंदला त्याचा शेवट काही केल्या आवडत नव्हता. क्लायमेक्स ज्या टिपेला जायला हवा तिथे तो पोहोचत होता पण काहीतरी राहिल्यासारखं वाटत होतं आणि म्हणून कोर्टाच्या निकालानंतर आलेला तो प्रसंग चिकटवल्यासारखा वाटण्याची शक्यता होती, पण तो गरजेचा तर होता कारण कोर्टाने हिरोला शिक्षा फर्मावली होती आणि हिरो कधी हरू शकत नाही हे आपलं तत्त्व. म्हणून हरलेल्या हिरोला पुन्हा त्या पदाला नेण्यासाठी उभारलेला तो नाट्यमय संवादी प्रसंग. शाहरुखच्या 'चक दे!'मधील 'वो सत्तर मिनिट' ह्या संवादाची आपण आज खूप तारीफ करतो कारण त्याच पठडीतला हा संवाद आपल्याला माहीत नसतो. इथे मी तो मुद्दामहून देतोय.

''क्या इस उम्मीद के साथ आये थे तुम कटहरेमें, कि कानून तुम्हें सचाई का किताब देगा? शहीद बनने आये थे तुम? क्या सच बोल देनेसे तुम्हारे गुनाह मिट गये? क्या छिपे रहनेसे, कानूनसे बचे रहते तुम जिंदगीभर? जिस कानूनने मुझे आज पकडा है, क्या वो तुम्हें नहीं पकड लेता? आखिर बुलाया किसने था तुम्हे कचहरी में?''

''हम तुम्हे बचाने आये थे.''

''मै फांसीपर चढा जा रहा था जो मुझे बचाने की जरुरत थी? अपने आपको फरिश्ता समज लिया था तुम लोगोंने, जो मुझे बचाने की ताकद आ गयी थी तुममे?..... नही मेरे दोस्त... कोई औरही बात थी जो तुम्हे वहां तक खींच लायी। तुम्हारे दिलों मे आत्मा कि वो चिंगारी पैदा हो चुकी थी, जिसने तुम्हे सच बोलने पर मजबूर किया। जिसने तुमसे काला बजार छुडवाया। जिसने तुमसे सफेद बाजार खुलवाया और मै तो कहता हूँ कि सफेद बाजार कि भी जरुरत नहीं, उससे आनेवाले पैसे की भी जरुरत नही। ऐसे हजारो सफेद बाजार फूंक जाये मुझे परवाह नहीं।

जरूरत है उस चिंगारीकी, जो धीरे धीरे उस ज्वाला का रूप धारण करनेवाली थी। जिसकी लौ मे अपनी जिंदगी के बाकी दिन जगमगा उठते। इस जेल के अंधेरे में... अपने घुस्से कि जोश में मत बुझने दो इस चिंगारी को मेरे दोस्त.... मत बनने दो रुकावट इस छोटीसी कैद को हमारे बुलंद रास्ते की... ये सजा हमें बुजदील बनाने के लिये नहीं और ठोस बनाने के लिये है... मर्द की तरह आये थे तुम अपना गुनाह कबुल करने... दिखादो, के सजा खतम होने पर तुम मर्द कि तरह वापिस जाओगे...''

एखाद्या संवाद शैलीतील लय कायम ठेवून एक वास्तवदर्शी संवाद लिहायला ताकद लागते. ती विजय आनंदमध्ये होती, हे त्याने 'जॉनी मेरा नाम' किंवा त्यानंतरच्या 'तेरे मेरे सपने' ह्या त्याच्या सर्व चित्रपटापर्यंत सिद्ध केलय. त्याच्या संवादांतून तुम्हाला आणखी एक बाब निदर्शनास येते ती म्हणजे त्याच्या संवादातून दिसणारं जगण्याचं तत्त्वज्ञान व अध्यात्माची ओढ. अगदी 'काला बाजार'पासून ते 'तेरे मेरे सपने'पर्यंत. गाईडने तर त्यात कळस गाठला. चित्रपटाच्या शेवटाला असलेला राजू गाईड आणि चमत्कारी बाबा यांच्यातला तो गाजलेला द्वैती संवाद. हे आणि असे संवाद तोच लिहू शकतो जो कळत-नकळत जगण्यातलं तत्त्वज्ञान शोधत असतो. त्या शोधातच त्याची सृजनशीलता जास्तीत जास्त बहरत असते आणि ज्यावेळेस त्याला त्याचा स्पर्श होतो, त्यावेळेस त्याच्यासाठी बाकी सर्व निरर्थक ठरतं.

अर्थाचा शोध घेणं आयुष्य असतं, पण ज्यावेळेस तो तुम्हाला सापडतो त्यावेळेस तुम्हाला त्यातली निरर्थकता कळते, आणि तेव्हा...? उदाहरणादाखल मी फक्त त्याच्या 'तेरे मेरे सपने' ह्या चित्रपटापर्यंतच मर्यादित रहातो कारण त्याचे त्या पुढील चित्रपट त्याच्या लौकिकाला साजेसे झाले नाहीत. तुम्हाला 'राजपूत', 'राम बलराम' पाहताना हा प्रश्न पडतो की हाच का तो विजय आनंद ज्याने ह्या आधी 'ज्वेलथिफ' वा 'तिसरी मंझिल'सारखे चित्रपट दिले. नेमकं काय बिनसलय त्याचं? ती जादू गेली कुठे? त्याच्यातला तो कलावंत विझला कसा? सृजनशील कलावंत आपल्या कलाकृतीतून सतत काहीतरी शोधण्याचा... त्यातून सतत काहीतरी मांडण्याचा प्रयत्न करत असतो. काही शोधून थकतात आणि विझून जातात तर काहींना ते सापडतं म्हणून त्यांचा सगळ्यातला रसच निघून जातो.


विजय आनंदला त्याच्या ह्या शोधात कधीतरी ओशो आणि नंतर जे. कृष्णमूर्ती सापडले आणि त्याला अर्थातली निरर्थकता जाणवू लागली. आपण स्वतःला तत्त्वज्ञानी, आध्यात्मिक, अज्ञाताचा शोध घेणारे समजत असतो. जेव्हा आपल्याला हे कळतं की '-All knowledge is garbage. All thoughts are garbage.' त्याक्षणी आपल्या ह्या सर्व जाणिवा गळून पडतात आणि तुम्हाला जग व जगाला तुम्ही गार्बेज वाटू लागता. विजय आनंद चित्रकर्ता म्हणून नंतर-नंतर का ढासळत गेला त्याचं उत्तर कदाचित ह्या त्याच्या अवस्थेतच असेल.

**- महेन्द्र एकनाथ तेरेदेसाई**
भ्रमणध्वनी : ९८२०४२१७१०
mahendrateredesai@gmail.com

# वसंत पळशीकर समजूत घेताना....

## चर्चा

**महाराष्ट्रातील ज्येष्ठ विचारवंत सामाजिक-राजकीय भाष्यकार वसंत पळशीकर यांचे २९ ऑक्टोबर २०१६ रोजी निधन झाले. आपल्या वैशिष्ट्यपूर्ण भूमिकांसह पळशीकरांनी मराठी विचारविश्वात जवळपास चाळीस वर्षांहून अधिक काळ लेखन केले व आपला स्वतंत्र ठसा उमटवला. पळशीकरांची जीवनदृष्टी समाजापर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न म्हणून 'अवकाशनिर्मिती' या गटाने 'डॉक्युमेंट्री फिल्म'ची निर्मिती केली आहे. या फिल्मच्या निमित्ताने पळशीकरांच्या वाङ्मयाचे विशेष अभ्यासक किशोर बेडकिहाळ यांच्याशी या गटाने सखोल चर्चा केली. या चर्चेत त्यांच्यासोबत डॉ. मेदिनी डिंगरे, अंजली चिपलकट्टी, डॉ. जयंत गाडगीळ आणि समीर शिपूरकर सहभागी झाले होते. शब्द रुचीच्या वाचकांसाठी या मुलाखतवजा प्रदीर्घ चर्चेचा संपादित अंश...**



**प्रश्न** : सर, विचारवंत म्हणून पळशीकरांचे वर्णन तुम्ही कसे कराल?

**उत्तर** : एका वाक्यात जर पळशीकरांचं वर्णन करायचं तर जीवनदृष्टी आणि स्वतःचं जीवन याच्यामध्ये अत्यंत कमीतकमी अंतर ठेवून जगणारा ज्ञानोपासक असं त्यांचं खरंतर वर्णन करता येईल. १९५० नंतर विशेषतः सबंध भारताच्या आधुनिकतेच्या प्रकल्पाला जेव्हा सुरुवात झाली आणि आधुनिक विचारांनी सगळं विचारवंतांचं विश्व भारलेलं होतं अशा काळामध्ये प्रचलित असणाऱ्या युगधारणांच्या-पेक्षा वेगळी धारणा बाळगून धैर्यानं लेखन करणारा आणि दीर्घकाळ सातत्याने लिहिणारा असं त्यांचं

एक वेगळं वैशिष्ट्य पळशीकरांचं म्हणून सांगता येईल. आधुनिकतेच्या अंगाने जाणारे, समाजवादाचे, गांधीवादाचे, मार्क्सवादाचे असतील, दलित चळवळीच्या निमित्ताने फुले-आंबेडकरीवादाचे असतील या सगळ्यांची अत्यंत कठोर चिकित्सा करणं ही गोष्टच ५०-६० नंतर या महाराष्ट्राला तुलनेनं नवीन होती कारण या सगळ्या युगधारणा आहेत आणि पुढचा काळ यांचा आहे असं धरूनच एकप्रकारचं भाष्य करणारं लेखन हे महाराष्ट्रामध्ये जास्तीत जास्त झालेलं दिसतं. अशा वेळेला निव्वळ भाष्य करून न थांबता त्याची एक मूलगामी चिकित्सा होणं गरजेचं होतं, ती चिकित्सा करण्याचं काम पळशीकरांनी दीर्घकाळ आपल्या लेखणीद्वारे केले. आणि अत्यंत व्रतस्थ पद्धतीनं, कुठलाही हेत्वारोप न करता, कुठलाही शत्रूभावी दृष्टिकोन न ठेवता केलं.

**प्रश्न** : त्यांची ही तुम्ही जी वेगळी धाटणी सांगितली तिची मुळं त्यांच्या जडणघडणीत कशी दिसतात?

**उत्तर** : पळशीकरांच्या एकूण जीवनपटाकडे पाहिलं तर फार मोठा एखादा प्रेरणास्रोत त्यांच्यासमोर होता आणि त्याच्यावरून प्रेरणा घेऊन त्यांचं आयुष्य बदललं वगैरे असं काही फार सांगता येणार नाही आपल्याला. शिक्षण अर्धवट सुटल्यानंतर स्वतःचा शोध घेत आणि जगण्याचा शोध घेत ते हळूहळू काही कामांकडे वळले. बाबा आमटे असतील, पुढे चालून ओरिसामधलं काम असेल त्यांचं, कोराकुटला त्यांनी बराच काळ वास्तव्य केले आणि त्याच्यानंतर ते जे १९५९ सालापासून महाराष्ट्रात आले तिथून ते महाराष्ट्राच्या एकूण विचारविश्वाशी समरस झालेले आहेत, लिहायला लागलेत. मराठी विचारविश्वातल्या काही जबाबदाऱ्याही संपादकाच्या रूपाने त्यांनी स्वीकारलेल्या आपल्याला दिसतात. त्यांची घडण जर पाहिली तर ती स्वतःची स्वतः केलेली घडण आहे असं मला वाटतं.

**प्रश्न** : हे फारच वेगळं आहे......

**उत्तर** : होय. त्यांच्यावर गांधीजींचा प्रभाव आहे. विनोबांचा त्यांच्यावर संस्कार आहे. साने गुरुजींचा काही काळ सहवास त्यांना मिळालेला आहे. याचा परिणाम त्यांच्यावर नक्कीच झाला, पण कुठलीही एक स्थिर दृष्टी घेऊन किंवा स्थिर विचारप्रणाली डोळ्यांसमोर ठेवून तिच्या चष्म्यातून जगाकडं बघणं हे त्यांनी नेहमीच नाकारलेलं आहे. आणि मला वाटतं अलीकडच्या ५०-६० वर्षांच्या महाराष्ट्राच्या बौद्धिक इतिहासामध्ये ही खूप वेगळी गोष्ट आहे, याचं कारण प्रत्येक विचारवंत लिहिताना त्यानी जी काही विचारप्रणाली स्वीकारलेली आहे त्या चष्म्यातून तो जगाकडे पाहतो आणि भाष्य करतो. पळशीकर असा कुठलाही चष्मा वापरत नाहीत. ते वस्तुस्थिती आणि त्यातून निघणारे निष्कर्ष आणि मग या विचारप्रवाहांचा तिच्याशी असलेला संबंध या अंगाने सतत तिचा विचार करतात. म्हणून ते वेगळेपण उठूनही दिसतं त्या अर्थानं.

**प्रश्न** : सर तुम्ही छान सांगितलं की त्यांच्यावर कुठलाच एकचएक प्रभाव नाही म्हणजे आपण असं म्हणू शकतो का की पळशीकरांची जीवनदृष्टी ही अतिशय समग्र व व्यापक अशी आहे?

**उत्तर** : समग्रता हा एक पळशीकरांच्या सबंध लेखनाचा आणखी एक वेगळा पैलू आहे. तो त्यांच्या व्यक्तिमत्त्वामध्येही आहे आणि त्यांच्या लेखनामध्येही आहे. पळशीकरांच्या बाबतीत एक गोष्ट लक्षात ठेवायला पाहिजे की त्यांची जी सबंध लेखनशैली आहे ती कुठल्याही वाङ्मयीन गुणापेक्षा त्यांच्या स्वभावगुणांनी बद्ध झालेली आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वामध्ये जो संवादीपणा आहे, तो त्यांच्या लेखनामध्येही आहे. दुसरं महत्त्वाचं वैशिष्ट्य म्हणजे समग्रतेनं गोष्टींकडे पाहणं ही जी साठोत्तर काळामध्ये तुटलेली वैचारिक परंपरा आहे ती त्यांनी पुन्हा उजेडात आणलेली आहे.

**प्रश्न** : या समग्रतेचे काही उदाहरण सांगता येईल का? समग्रता असल्याने अशी टीका पण झालेली आहे की ते कुठलं तत्त्वज्ञान पुढे करताहेत. म्हणजे एकदम समजत नाही वाचणाऱ्याला. काही लोकांना वाटतं ते गांधीवादी आहेत, काही लोकांना वाटतं समाजवादी आहेत. ही समग्रता जी आहे ती एखाद्या उदाहरणाने स्पष्ट करता येईल का?

**उत्तर** : माझ्या डोळ्यांसमोर तीन लेख पटकन आले, पळशीकरांची दृष्टी आणि ते ज्याप्रकारच्या श्रेयसाचा विचार करतात त्याच्या आधारे या तीन लेखांची नावं सांगायची झाली तर 'इंदिरा गांधींनी उपस्थित केलेली आव्हाने' अशा टायटलचा निबंध आहे. दुसरा निबंध आहे तो 'मार्क्सचा मानवकेंद्री समाजवाद' म्हणून. त्यांनी तो खूप वर्षांपूर्वी लिहिलेला आहे पण तरी अजूनही तो प्रस्तुत आहे असं मला वाटतं. आणि तिसऱ्या बाजूला 'मार्क्स आणि गांधींची पर्यायी विकास-नीतीबद्दलची पायाभूत भूमिका' याच्याबद्दल लिहिलेला जो सविस्तर निबंध आहे तो. हे तीन निबंध मला फार महत्त्वाचे वाटतात. त्याची कारणं काय आहेत हे जर पाहिलं तर सबंध इंदिरा गांधींनी उपस्थित केलेल्या प्रश्नांच्या संदर्भात भारतीय लोकशाहीची जडणघडण कशा कशा टप्प्यातून होत गेली याचा एक सबंध ऐतिहासिक आढावा आणि चिकित्साही आहे त्यात. कोणत्या समाजगटांना ही लोकशाही पूरक ठरली, कोणत्या समाजगटांनी लोकशाहीची कल्पना पेलेल तोपर्यंत खांद्यावर घेतली आणि नंतर सोडून दिली आणि या प्रकारे समाजाची जडणघडण झाली तर कोणत्या प्रकारच्या शक्ती राज्यसत्तेमध्ये शिरतील आणि या समाजाचे सबंध नियंत्रण करायला लागतील याचं सूचनही त्या लेखामध्ये आहे.

ज्या दुसऱ्या निबंधाचा मी उल्लेख केला 'मार्क्सचा मानवकेंद्री समाजवाद' तो लेख मला यासाठी महत्त्वाचा वाटतो की मार्क्सवादाचं सबंध चर्चाविश्व भारतामधलं, विशेषतः मार्क्सनं समाजाकडे कोणत्या ऐतिहासिक दृष्टीनं पाहिलं, ऐतिहासिक विकासाचे कोणते टप्पे त्यांनी सांगितले, त्याचबरोबर वर्गसंघर्षाचा लढा याबाबत मार्क्स

आपल्याकडे जास्त ओळखला जातो आणि त्यामुळे सबंध समाजाची पुनर्रचना जर करायची असेल तर उत्पादनाची साधनं बदलणं, त्याच्या अनुषंगाने उत्पादनाचे संबंध बदलणं आणि त्यावर आधारित एक परिवर्तनाचा विचारव्यूह मांडणं. प्रत्यक्षात चित्र असं दिसलं की मार्क्सवाद्यांच्या तत्त्वज्ञानामधून निर्माण झालेले जे जे लढे मार्क्सवाद्यांनी केले, ते स्वातंत्र्याच्या नावे केले पण प्रत्यक्षामध्ये ते लढे काही ना काही सुरक्षिततेचा प्रस्थापित चौकटीतला लाभ मिळवून घेण्यापुरते मर्यादित होते. एक चित्र असं दिसलं की मग मार्क्सवाद्यांच्या मते संप हे राजकारणाचं हत्यार आहे पण ते संप राजकारणाच्या हत्यारापेक्षा सुद्धा जास्तीत जास्त पातळीवर व्यक्तिगत पगारवाढी असतील वा कामाच्या ठिकाणच्या सवलती असतील याच्याशीच जास्त केंद्रित राहिले आणि त्यामुळे मार्क्सचा विचार हा प्रामुख्याने आर्थिक विचार आहे याच्या अनुषंगानं त्याची चर्चा आपल्याकडे जास्त होत राहिली.

पळशीकरांनी या मार्क्सच्या मानवकेंद्री समाजवादात दोन वेगळ्या मुद्यांकडे आपलं लक्ष वेधलं आहे असं वाटतं. अर्थात परात्मतेचा मुद्दा आहे त्याकडे लक्ष वेधणारे पळशीकर हे काही पहिले विचारवंत नाहीत, अनेकांनी ते वेधलेलं आहे. पण तो मार्क्सच्या तत्त्वज्ञानाचा गाभा आहे आणि तो समोर ठेवून विचार केला पाहिजे हे अधोरेखित करणाऱ्यांमध्ये पळशीकरांचा उल्लेख आवर्जून केला पाहिजे. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे मार्क्सच्या काही वाक्यांचा त्यांनी जो उल्लेख केला आहे की माणसांना स्वतंत्र व्हायचं आहे आणि स्वतंत्र माणसांचा समाज अशा प्रकारची रचना जर त्याला अभिप्रेत असेल तर मार्क्स हा प्रामुख्यानं माणसाच्या स्वातंत्र्याविषयी बोलतो आणि स्वातंत्र्याची संकल्पना ही मुळामध्येच एक नैतिक संकल्पना आहे. ती आर्थिक किंवा धार्मिक पातळीवरची संकल्पना नाही. या स्वातंत्र्यावर आधारलेला जर समाज उभा करायचा असेल तर मग तुम्हाला सगळ्या रचना ज्या आहेत, ज्या ज्या तुम्ही दर्शनातून निर्माण झाल्या असं मानता त्या रचनांचा फेरविचार केला पाहिजे. उदाहरणार्थ मार्क्सवादामध्ये एका टप्प्यावर श्रमिकांच्या हुकूमशाहीचा एक संदर्भ आणि उल्लेख आहे. ही हुकूमशाही किती काळ! याचं काहीच उत्तर मार्क्सकडे नव्हतं आणि असणारही नव्हतं त्या अर्थानं. त्यामुळे कदाचित मार्क्सवादातून डाव्या प्रकारच्या हुकूमशाहीच्या राजवटी पण निर्माण झाल्या आणि अजूनही आम्हाला भांडवलशाहीचा धोका आहे. आमची सगळी आजूबाजूची राष्ट्र भांडवलशाहीने घेरलेली आहेत त्यामुळे या हुकूमशाही शिवाय पर्याय नाही असं म्हणत ७०-८० वर्ष सोविएत रशियासारखा देश चालला. शेजारच्या चीनमध्येही आपण हे पाहतो. त्यामुळे यातून हुकूमशाहीचा धोका निर्माण होतो. मार्क्सला या प्रकारची हुकूमशाही बिलकूल अभिप्रेत नाही. माणूस स्वतंत्र असण्याची जी मार्क्सची कल्पना आहे ती पळशीकरांना जास्त भावते असं मला वाटतं मार्क्सवादापेक्षा. आणि त्याचं गांधींशी असलेलं साम्यही ते दाखवून देतात. मार्क्सच्या स्वातंत्र्याच्या संकल्पनेमध्ये मी स्वतंत्र असल्याची जाणीव असणं आणि मी इतरांशी स्वतंत्रतेच्या मुद्यातून जोडलं जाणं आणि हे जोडताना कामाच्या ठिकाणच्या रचना, माणसा-माणसातल्या संबंधांत परात्मभाव निर्माण करतील अशा पद्धतीच्या होणार नाहीत याची काळजी घ्यायला पाहिजे. या मुद्यावर पळशीकर भर देतात.

तिसरा, ज्या निबंधाचा मी उल्लेख केला 'मार्क्स आणि गांधींची पर्यायी विकासनीतीबद्दलची पायाभूत भूमिका' या नावाचा निबंध त्यांनी विस्तारानं लिहिला आहे. सबंध जगभर आज विकासाच्या मुद्याची ज्या प्रकारची चर्चा सुरू आहे, त्याच्यापेक्षा वेगळं विकासाचं प्रारूप या दोघांनाही कसं हवं होतं आणि दोघांच्याही मूलभूत भूमिका त्या ठिकाणी एकाच मुद्याकडे कसा निर्देश करतात, हे मुख्यतः प्रकाशमान करण्याचं काम त्यांनी जास्त सखोलपणे व तर्कशुद्धपणे केलं आहे असं वाटतं. एकतर पूर्ण गांधीवाद स्वीकारा किंवा एकतर पूर्ण मार्क्सवाद स्वीकारा अशा जंजाळात न पडता सुद्धा दोन्हीही विचारवंतांच्या गाभ्याशी असणारी जी जीवनदृष्टी आहे ती लक्षात घेऊन माणसं, त्यांच्या आजूबाजूला असणारं चराचर विश्व आणि पुन्हा माणसामाणसांच्यामध्ये असणारे संबंध हे अधिकाधिक मानवी व सहृदय होण्याच्या दृष्टीने कोणत्या रचना करायला पाहिजेत या पर्यायाचं त्याच्यामध्ये जास्त सूचन आहे. पळशीकरांचा सगळा जो मानवी संबंधांविषयीचा जो दृष्टिकोन आहे तो माणसांच्या सहजसंबंधावर आधारलेला आहे असं मला वाटतं. एका लेखामध्ये 'महानगरांच्या विसर्जनांची मोहीम' या नावाचा त्यांचा लेख होता. त्याच्यामध्ये शहर किंवा गाव कसं असावं याचं वर्णन करताना त्यांनी असं म्हटलं आहे की घराच्या उंबरठ्यावर बसून माणसांना गप्पा मारता याव्यात, प्रसंगी कचाकचा भांडता यावं. असं एक वाक्य त्यांनी त्याच्यामध्ये टाकलेलं आहे. म्हणजे इतक्या सहजपणे माणसं जी जगतात तो सहजभाव जर त्यांच्या जगण्याचा कायम रहायचा असेल तर तुमच्या उत्पादनसंबंधाच्या रचना त्या सहजभावाला पोषक व्हायला पाहिजेत. तुम्ही उत्पादनसंबंधाच्या आधारे निर्माण झालेल्या रचना इतक्या गुंतागुंतीच्या करता, मग त्या गुंतागुंतीत माणसाच्या संबंधांना कोंबायचा प्रयत्न करता त्याच्यातून ते संबंध सहज तर होतच नाहीत पण कृत्रिम होत जातात आणि कोणताही कृत्रिम संबंध हा परात्मता वाढवणाराच संबंध असतो. सबंध जीवनाची पुनर्रचना करत असताना माणसांच्या सहजभावावरील आधारलेल्या संबंधांना पूरक असणाऱ्या रचना पाहिजेत, रचनांना पूरक असे संबंध निर्माण करावेत असं पळशीकर कुठेही सुचवत नाहीत हे त्यांचं वेगळेपण आहे असं मला वाटतं.

**प्रश्न :** फारच सुंदर सांगितलं तुम्ही. तीन लेखांच्या निमित्तानं जी काही दृष्टी उलगडली आता मला हेच पुढे नेऊन जावं वाटतय की ते तीन

लेख होते त्या तीन लेखांचा आपण घेर जर मोठा केला तर पळशीकरांनी ६५०च्या आसपास लेख लिहिलेत आणि कित्येक लेख त्यातले दृष्टी बदलणारे असे आहेत. पर्यावरणीय दृष्टी मांडणारे लेख आहेत, शिक्षणाची दृष्टी मांडणारे लेख आहेत. त्या सगळ्यातून पळशीकरांची दृष्टी कशी उभी राहते?

**उत्तर :** पळशीकरीय दृष्टी जर सांगायची झाली तर पहिलं तुम्हाला हे सांगावं लागेल की माणूस आणि त्याच्या भोवती असणारं सबंध चराचर विश्व आणि त्याच्यातलं सगळं चेतन-अचेतन भाग जे आहेत ते सगळे मुळात एकात्म आहेत या गोष्टीवर तुमची श्रद्धा हवी, आणि त्या एकात्मतेचा मी एक भाग आहे आणि त्याची अनुभूती मला येत राहाते, ती ऐंद्रिय आहे की अतिंद्रिय हा भाग सोडून द्या पण ती अनुभूती मला असणं आणि त्यांच्या चौकटीमध्ये मी माझा विचार करणं. इथं मूलभूत आधुनिकतेच्या भूमिकेपासूनची एक फारकत आहे की इथे मी स्वतःला विश्वाचा मानदंड समजत नाही तर माझ्या स्वतःसह, आजूबाजूला असणारी जी सगळी चराचर सृष्टी आहे त्याच्यासकट मी विचार करतो, हा पहिला भाग. म्हणून या अर्थानं जीवनाचं निसर्गाशी असणारं, निसर्गातल्या व्यवस्थांशी असणारं जे एकत्व आहे हा पळशीकरीय दृष्टीचा पहिला भाग आहे. संतांच्या साहित्यात हे होतं की नाही? तर होतं. चराचर विश्वाशी एकरूप होण्याची पारंपरिक भावना भारतीयांच्यामध्ये त्या अर्थानं रुजलेली आहे. आज आपण कितीही कृत्रिम पद्धतीनं धर्मभावना आणि त्यांचे उत्सव करीत असलो तरीसुद्धा कुठेतरी आजच्या आधुनिक माणसाची सुद्धा आंतरिक पोकळी जी आहे ती या एकत्वाच्या अभावानेच ग्रासलेली आहे एका अर्थानं, हे पहिलं वैशिष्ट्य. दुसरं वैशिष्ट्य, माणसाच्या स्वातंत्र्याचा विचार कशा पद्धतीनं करायचा याचं केवळ दुसऱ्याचं स्वातंत्र्य धोक्यात येणार नाही असे ढोबळ उत्तर देऊन चालणार नाही हे पळशीकरीय दृष्टीत मोठ्या प्रमाणावर अधोरेखित झालं आहे. हे का महत्त्वाचं आहे तर मी दुसऱ्याला कुठे आडवा आलो असं तुम्ही म्हणणं सोपं आहे पण जोपर्यंत समूह म्हणून माणसं कार्यरत असतात, गट म्हणून एकत्र येतात, वर्ग म्हणून एकत्र येतात त्यावेळेला एक वर्ग दुसऱ्या वर्गाविरुद्ध, एक गट दुसऱ्या गटाविरुद्ध या पद्धतीनं त्या संघर्षाचं रूपांतर होणं शक्य असतं.

**प्रश्न :** आता आपण जे बोललो त्यातून पळशीकर जगाकडे नेमकं कसं बघतात, मानवी समाजाकडे सं बघतात, चराचराकडे कसे बघतात याची काही ना काही दृष्टी उभी राहत जाते. तसंच त्यांच्या सगळ्या सहाशे-साडेसहाशे लेखांतून विविध गोष्टी ते सतत बोलत राहतात आणि ते लेख प्रासंगिक राहात नाही तर ते एक व्यापक दृष्टी मांडण्यासाठी आपल्याला सतत मदत करतात. या पळशीकरी दृष्टीचे वैशिष्ट्य कोणते सांगाल?

**उत्तर :** ज्यावेळेला विचारप्रवाह धारदार आणि अस्मिताजन्य बनतात त्यावेळेला माणसं दुसऱ्यांच्या विचाराकडे बघताना एका शत्रूभावी दृष्टीतून पाहतात आणि तो त्या दृष्टीचा दोष असतो. पळशीकरांच्या लेखनामध्ये तो शत्रूभाव कुठेच दिसणार नाही. शत्रूभाव तर सोडाच पण उद्धटपणा, औद्धत्य, उपहास यासारखा एकही शब्द त्यांच्या साहित्यामध्ये दिसणार नाही. त्यांच्या शैलीचा एक मोठा विशेष असा आहे की ते वाचकाला बोट धरून खूप खोलवर नेतात. ज्या प्रश्नावर लिहितात त्या प्रश्नाच्या इतिहासापर्यंत, परंपरेपर्यंत नेतात एका बाजूला, दुसऱ्या बाजूला त्या कालखंडामध्ये ज्या प्रकारच्या धारणा, संकल्पना आहेत त्या संकल्पना त्या त्या ऐतिहासिक चौकटीमध्ये ते समजावून सांगतात. त्या त्या कालखंडातल्या संकल्पना कोणत्या, त्यांची ऐतिहासिक कोंदणं किंवा चौकटी काय होत्या आणि मग त्याच्या प्रस्तुतता काय आहेत त्यामुळे त्यांच्या लेखनशैलीमध्ये त्यांच्याबरोबर जर आपण संवादी पद्धतीनं उतरलो आणि खोलात गेलो तर निश्चितच वाचक म्हणून आपलीसुद्धा संकल्पनांची समज नक्कीच वाढलेली असते आणि त्याला वाव त्यांचं लेखन ठेवतं.

**प्रश्न :** विचारवंत म्हणून पळशीकरांचे वेगळेपण काय?

**उत्तर :** महाराष्ट्रीय विचारवंतांमध्ये दोन-तीन फळ्या आहेत हे आपण लक्षात घ्यायला पाहिजे. एक गंभीरपणे वैचारिक लेखन करणं ही एक जबाबदारी, निष्ठा आणि बांधिलकी आहे आणि ती करत असताना प्रसंगी स्वतःला खरवडण्याची भूमिका ठेवायला हवी. स्वतःवरची असणारी सगळी पुटं बाजूला काढून आपल्याला पाहाता यायला हवं तर आपण दुसऱ्याशी संवाद करू शकतो ही धाटणी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची आहे. त्यांच्या समकालीन विचारवंतांच्याकडे नजर टाकली तर, उदाहरण... म्हणून अर्थात कुणाला हिणवायचं म्हणून नव्हे, नरहर कुरुंदकरांची शैली जर आपण पाहिली तर ती वाचकाला अनेक प्रश्नांची जाणीव करून देते. प्रश्नाला किती बाजू असतात हे कुरुंदकरांच्या लेखनात उत्तमपणे सांगितलेलं असतं, पण त्याचबरोबर ते सांगताना तो जो मुद्दा असतो तो त्यातला अंतिम आहे आणि तिथे ते वाचकाला निरुत्तर करतात. वाचल्यानंतर वाचकाला असं वाटतं याच्या पलीकडे आता काही नाही.

पळशीकरांच्या लेखनशैलीमध्ये त्याच्यापलीकडे काही नाही ही भूमिका कधीच तुम्हाला डोकावताना दिसणार नाही. त्यामुळे वाचकाला जो एक मोकळा अवकाश राहतो या सगळ्या संकल्पनांच्या आधारे स्वतःला काही घडवण्याचा! तो अवकाश इतर विचारवंतांच्या लेखनामध्ये राहतोच असं नाही. दुसरं आपण कित्येकदा हे लक्षात घेत नाही की महाराष्ट्रामध्ये चमकदार वक्तृत्व ही जशी एक परंपरा आहे तशी चमकदार विचारवंत ही अलीकडच्या काळात निर्माण होत चाललेली दुसरी परंपरा आहे. चमकदार विचारवंतांच्या यादीमध्ये बसणं किंवा त्याचे काही फायदे असणं, घेणं हे पळशीकरांच्या जीवननिष्ठेत कधीच बसणारं नव्हतं. याचा अर्थ इतर जे विचारवंत

त्यांनी मुद्दाम काही चमकदारपणे केलं आणि त्याच्यासाठी ते करताहेत असा काही आरोप करायचं कारण नाही, पण दिसते ते असं की ज्यांच्याकडे चांगलं वक्तृत्व आहे आणि ज्यांच्याकडे उपहासात्मक, उपरोध करणारी वा नर्मविनोदाच्या अंगाने पण व्यंगात्मक जाणारी अशाप्रकारची शैली आहे अशा विचारवंताचं लेखन सामान्यतः आपल्याला भावतं किंवा आपल्याकडे त्याचा उदोउदो, वाह्वा होते. हे कशाचं लक्षण आहे? तर तुमच्या जगण्याला आणि समग्र जगण्याला सुद्धा एका गंभीर गोष्टीची किंवा तत्त्वांची बैठक असावी लागते ही धारणा जर क्षीण असेल तर मग उपहासात्मक पद्धतीचं लेखन वाढणार आणि गंभीर प्रवृत्तीचं लेखन कमीच राहणार हे आपल्याला सहज दिसतं. पळशीकर याच्यामध्ये गंभीरतेच्या बाजूने उभे असल्यामुळे त्यांच्या लिखाणाला, जगण्याला सगळीकडेच एक गांभीर्याची किनार आलेली दिसेल.

**प्रश्न** : पळशीकरांच्या विचारांची वैशिष्ट्यं आणखी उलगडून सांगाल का?

**उत्तर** : लेखन करण्याची गोष्ट आणि काम करण्याची गोष्ट आणि खरंतर पुढे जाऊन जगण्याची गोष्ट या तिन्ही गोष्टी ते मुळात एकात्म पद्धतीनेच पाहतात, मानतात. पण दुसरं एक असं लक्षात येतं की त्यांच्या तिन्हीत काही फरक आहे असं वाटत नाही, कोणत्या एका टप्प्यावर लेखन करायचं, कोणत्या टप्प्यावर काम करायचं. लेखन करणाऱ्या माणसाने, या प्रकारचं गंभीर लेखन करणारा माणूस ज्या वेळेला ज्ञानोपासकाचं व्रत घेऊन लिहायचं ठरवतो त्यावेळेला समाजजीवनातला जेवढा अनुभव गोळा करता येईल तेवढा गोळा करणं आणि त्याची स्वतःशी चिकित्सा करत राहणं आणि मग ते लेखनात उतरवणं याची एक गरज असते ती पळशीकरांनी नेहमीच मानली. सुदैवाने त्यांना गांधी परिवारातल्या काही व्यक्तींचा सहवास मिळाला. काही ठिकाणी काम करण्याची संधी मिळाली आणि त्याही पलीकडे जाऊन भारतामध्ये जेवढे विविध प्रकारचे परिवर्तनवादी गट आहेत ज्याला आपण अगदी सौम्य प्रकृतीच्या डाव्या माणसांपासून अति डाव्या विचारांपर्यंतचे जे गट आहेत अशा सगळ्या गटांशी त्यांचा संवाद आहे. म्हणजे ही माणसं आपल्यापेक्षा वेगळ्या भूमिका राखून आहेत मग यांच्याशी कशाला संवाद करा? असा मुद्दा त्यांना कधीच भेडसावला नाही. हे सगळं समजून घेऊन मग आपली भूमिका कशी ठरवता येईल या अंगाने ते नेहमीच विचार करत आले. म्हणून कोणीही सामाजिक कार्य करणारी व्यक्ती ती डाव्या परिघातली असो की डाव्या परिघाबाहेरची असो त्यांचं काम समजून घेणं, त्यांच्या प्रेरणा समजून घेणं आणि मगच आपल्या भूमिकांच्या आधारे आपलं काही लिहिणं हे त्यांचं सततचं मिशन राहिल्यामुळे सामाजिक कार्याबद्दलचा एक अतोनात आदरभाव हा त्यांच्या लेखनामध्ये दिसतो. व्यक्तिमत्त्वामध्ये आपणाला पाहायला मिळतो. दुसरं म्हणजे या सगळ्या सामाजिक कार्यकर्त्यांशी त्यांचे जे जोडलेपण आहे ते जोडलेपण केवळ भूमिका भिन्न आहेत किंवा भूमिकांमध्ये साम्य आहे या कारणाने झालेले नाही, तर माणसं समजून घेण्याची मूलभूत प्रेरणाही त्याच्याशी जोडलेली आहे असं मला वाटतं. ही मूलभूत प्रेरणा जर नसेल तुमच्याकडे तर सामाजिक कार्य सामाजिक कार्याच्या जागी व लेखन लेखनाच्या जागी आणि जगणं जगण्याच्या जागी अशा प्रकारची त्रिधा अवस्था निर्माण होऊ शकते. ती पळशीकरांनी त्यांच्या आयुष्यामध्ये कायम टाळलेली आहे. म्हणून एक सामाजिक कार्यकर्ता म्हणून त्यांनी एका संस्थेच्या कुठल्या जबाबदारीशी स्वतःला कायम बांधून घेतलं असं नाही दिसत. पण समाज प्रबोधन संस्थेसारखी संस्था घेतली तर तिथे ते दीर्घकाळ काम करत होते. 'समाज प्रबोधन पत्रिके'चं संपादन त्यानी जवळपास ७-८ वर्षे केले. 'नवभारत' आणि 'प्राज्ञ पाठशाळा' या दोन संस्थांशी त्यांनी जोडून घेतलं. 'नवभारत'चं जवळपास १९९५ ते २००४ असं ९-१० वर्षे त्यांनी संपादनही केलं. प्राज्ञ पाठशाळेच्यावतीने त्यांनी अनेक बौद्धिक शिबिरेही घेतली आणि शिबिरे घेऊन कार्यकर्त्यांना निरनिराळ्या विचारसंकल्पना समजावून देणं, त्यांची इंटरॲक्शन घडवून आणणं, एकमेकांत संवाद घडवून आणणं या प्रकारचं कार्य हे दिसायला सामाजिक असलं तरी मुळात बौद्धिक कार्याचा भाग म्हणून त्यांनी केलं आहे. म्हणून ज्याला तुम्ही प्रचलित अर्थानं सामाजिक कार्य म्हणता की एखाद्या संस्थेला जोडून घेऊन तिथे जन्मभर राबणं अशा प्रकारात ते फारसे गुंतून पडलेले दिसत नाहीत, पण असं काम करणाऱ्या सगळ्या माणसांशी मात्र त्यांचं जोडलेपण कायम राहिलं आहे हे त्यांचं वेगळेपण आहे.

**प्रश्न** : एकदमच हे छान सांगितलंत तुम्ही.

**उत्तर** : तुम्ही ठामपणे एखाद्या विचारप्रणालीचा आग्रह धरणं आणि अस्मिताजन्य पद्धतीनं त्याचा पाठपुरावा करणं आणि त्या चौकटीत लेखन करणं ही आधुनिक महाराष्ट्रातली एक शिष्टमान्य परंपरा आहे. आणि त्या परंपरेमध्ये जे बसणार नाहीत ते सामान्यतः याच्या बाहेर जातात. पण मग दखल कोणाची घेतली जाईल तर महाराष्ट्राचं उदाहरण घेतलं तर महाराष्ट्रामध्ये विद्यापीठीय विचारवंतांची एक परंपरा आधुनिक काळामध्ये निर्माण झाली आहे हे आपल्याला माहिती आहे. पण विद्यापीठाच्या बाहेर अत्यंत गंभीरपणे ज्ञान ही एक सामाजिक शक्ती आहे असं समजून तिचा विचार करणं याच्यात काही नावं अशी सांगता येतात, ज्यांची दखल त्यांच्या व्यासंगामुळे व ज्ञाननिष्ठेमुळेच घ्यावी लागली. महाराष्ट्रातील दोन प्रसिद्ध उदाहरणांमध्ये एक पळशीकरांचं आहे, दुसरं शरद पाटलांचं आहे. ही दोन्ही नाव त्या अर्थानं विद्यापीठीय वर्तुळाच्या बाहेरची आहेत. विद्यापीठीय विद्वत्तेचं कोणतंही कोंदण त्यांना लागलेलं नाही आहे. पण व्यासंग आणि निष्ठा या बाबतीत कदाचित विद्यापीठीय विचारवंत

कमी पडतील इतक्या पातळीवर त्यांनी काम केलं म्हणून त्यांची दखल घेतली गेली. पण दुर्दैवाने काय आहे की दखल घेण्याची सुद्धा जी पद्धत आहे महाराष्ट्रातील बौद्धिक परंपरेची आहे, ज्या शिष्टमान्य परंपरेवर मी मघाशी जे बोललो, त्याचा पगडा असल्यामुळे हे कोणत्याच विचारप्रणालीचे नसतील तर मग कशाला यांचं वाचा, कशाला यांचा विचार करा किंवा हे जर सतत चिकित्सा करून आपल्याच लोकांच्या विचारांची चिकित्सा करून अडचणीत आणणार असतील तर कशाला त्यांचं वाचत बसा अशा प्रकारचा समज त्यांच्याविषयी झालेला आहे. जसं शरद पाटलांविषयी आपण म्हणतो की त्यांनी अतिशय ताकदीनं आणि गांभीर्यानं सबंध भारतीय इतिहासाचा उलगडा करण्याचा एक नवा प्रयत्न केला, नवदर्शन निर्माण करण्याचा प्रयत्न केला पण ते नवदर्शन चिकित्सेच्या पातळीवर न जाता काही मंडळींना त्याचा पुढे हत्यार म्हणून वापर करण्याचा मोह झाला. ज्या दिवशी तुम्ही विचारप्रणालीचं हत्यार कराल त्या दिवशी हत्यार कधी ना कधी बोथट होणारच असतं. त्यामुळे विचारप्रणालीचं हत्यार जर तुम्ही केलंत तर प्रणाली पुढे जात नाही हत्यारच कदाचित जास्त प्रमाणावर लोकांच्या समोर नेलं जातं. पळशीकर या प्रकारचे विचारवंत नसल्यामुळे आपल्या विचारप्रणालीचं हत्यारात रूपांतर व्हावं असं कितीही त्यांना वाटलं तरी त्यांचा पिंड अशा प्रकारच्या हत्यारी विचारांना अनुकूलच नाही मुळामध्ये.

**प्रश्न :** पळशीकरीय दृष्टीमध्ये चिकित्सेला महत्त्वाचं स्थान आहे तर याविषयी काही सांगाल का?

**उत्तर :** चिकित्सा ही अप्रिय असणारी गोष्ट असली तरी केली पाहिजे. प्रभावशाली मूल्यं असतील किंवा प्रभावशाली व्यक्ती असतील त्यांच्या लिहिण्याची, बोलण्याची, वर्तनाची चिकित्सा ही निर्भीडपणे सतत केली जायला पाहिजे. हे निर्भीडपणे करण्याची जी किंमत आहे ती पण मोजली पाहिजे. तर आपल्या लक्षात येईल, की तो व्यवस्थेत आहे, व्यवस्थेतल्या हितसंबंधांमध्ये नाही पण व्यवस्थेविषयीची परखड चिकित्सा करतो, निर्भीडपणे चिकित्सा करतो. आणि हे करत असताना जे स्नेहबंध निर्माण झालेले आहेत ते एका बाजूला चिकित्सेच्या आडही येऊ देत नाही पण चिकित्सा केल्यामुळे त्या स्नेहबंधांची जोपासना करायची नाही असंही मानत नाही. म्हणून स्नेहबंधाच्या आड न येणारी चिकित्सा आणि चिकित्सा करूनही स्नेहबंध जपणं हे त्यांच्या दृष्टीनं एका वैश्विक मानवी संबंधांकडे जाणाऱ्या प्रक्रियेचा भाग म्हणून ते पाहतात आणि मला वाटतं ही त्यांची दृष्टी आजच्या काळामध्ये विशेषतः मोलाची मानली पाहिजे. याचं कारण आजच्या काळामध्ये चिकित्सा बंद झाली आहे आणि जी चिकित्सा होते ती बहुतांशी चिकित्सा सापेक्ष पद्धतीनं होते. म्हणजे माझ्याच विचारसरणीच्या लोकांच्या पुस्तकावर मी लिहिणं, माझ्या विरोधी जाणाऱ्या प्रतिगामी असणाऱ्या विचारसरणींवर मी हल्ला चढवत लिहिणं, या सगळ्या गोष्टी तुम्हाला टाळता यायला पाहिजेत आणि मग तुमच्या लक्षात येईल की खरी चिकित्सा करणे हे फार कठीण गोष्ट असते. सापेक्ष चिकित्सा करणं ही फार सोपी गोष्ट असते. खऱ्या चिकित्सेला सामोरं जायचं तर तुमच्यामध्ये ही मूल्यं मुळात रुजलेली पाहिजेत आणि हे खऱ्या ज्ञानोपासकाचं, विचारवंताचं कर्तव्य आहे, ती त्याची जबाबदारी पण आहे. या अंगाने पळशीकरांचं लेखन आणि जगणं झालं याची सगळ्यांनाच आपल्या कल्पना आहे.

**प्रश्न :** पुरोगामी चळवळींची महाराष्ट्रपुरतं बोलायचं झालं तरी चळवळींच्या विचारांची मांडणीची काही वैशिष्ट्ये आहेत. त्यांची चिकित्सा पळशीकरांनी केलेली आहे. त्याविषयी काय सांगाल?

**उत्तर :** एकतर त्यांनी ज्या सगळ्या पुरोगामी चळवळींची चिकित्सा केली त्याच्यामध्ये एका बाजूला विचारप्रणालींची चिकित्सा आणि दुसऱ्या बाजूला ज्या पुरोगामी संघटना होत्या त्यांचे जे कार्यक्रम असत म्हणजे त्यांच्या घोषणापत्रामध्ये आलेले, त्यांच्या भूमिका, त्याची दखल सुद्धा पळशीकरांनी अत्यंत बारकाईने घेतली आहे असं माझं निरीक्षण आहे. युक्रांद असेल, मागोवा असेल, आमच्यासारखा छोटा गट असेल की बाबा या सगळया मंडळींची एकूण परिवर्तनाबद्दलची संकल्पना काय आहे, मार्ग कोणते आहेत किंवा हे जे प्रासंगिक कार्यक्रम करतात, ज्या प्रकारचे मोर्चे काढतात, ज्या प्रकारच्या मागण्या करतात त्याची सुद्धा त्यांनी खरपूस चिकित्सा केलेली आहे असं मला दिसतं. या चिकित्सेचा केंद्रबिंदू कोणता असा जर प्रश्न केला तर मी उत्तर देईन की तुम्ही मांडत असलेली परिवर्तनाची संकल्पना आणि तुम्ही राबवत असलेले कार्यक्रम याचा मेळ बसतो का हे पहिल्यांदा पाहा. मग ते श्रेयस आहे का, श्रेयस नाही हा पुन्हा दुसरा प्रश्न आहे. पण पळशीकरांना काय श्रेयस वाटतं हा मुद्दा जरी बाजूला ठेवला तरी तुम्ही ज्या प्रकारच्या शोषणमुक्त समाजाची कल्पना करताय त्या प्रकारचा जीवनव्यवहार कार्यकर्ता म्हणून तुम्ही स्वतःत भिनवला आहे का? तुम्ही उभ्या करत असलेल्या संघटनांमध्ये या प्रकारच्या संबंधांची तुम्ही निर्मिती केलेली आहे का? या दोन गोष्टी त्यांनी पुरोगामी चळवळीच्या चिकित्सेमध्ये नेहमी महत्त्वाच्या मानल्या असं मला वाटतं.

चळवळींनी काय केलं? तर चळवळींनी कोणता वारसा माझा, कोणता माझा नाही या पद्धतीचा तरतम करण्याचा प्रयत्न केला. जो आमच्या भूमिकेला योग्य नाही तो वारसा आमचा नाही अशा प्रकारच्या भूमिका घेतल्या. आता तो वारसा माझा नाही हे म्हणणं एकवेळ सोपं आहे पण जो वारसा माझा नाही त्या वारशाशी संबंधित असणारे असंख्य लोक माझ्याबरोबर याच समाजात राहतात त्यांच्याबद्दल मी काय भूमिका घ्यायची? वारसा माझा नाही म्हटल्यावर लोकही माझे नाहीत अशी भूमिका घ्यायची का? आणि लोक माझे आहेत अशी भूमिका

स्वीकारल्यानंतर वारसा काही अंशी माझाच आहे, माझ्या इतिहासातला तो लाजिरवाणा भाग आहे अशी भूमिका तुम्हाला घेता येते. ही भूमिका न घेता वारसाच नाही ही भूमिका तुम्ही नाकारत गेलात तर तुम्ही नकाराचे एक लॉजिक उभं कराल पण त्यानं तुम्ही एकात्म समाजाच्या दिशेनं जाणार नाही आणि मला सतत पुरोगामी चळवळींच्या पळशीकरांनी केलेल्या चिकित्सेमध्ये एकात्म समाजाच्या मुद्यावर जास्त भर दिलेला दिसतो. दुसऱ्या बाजूला तुम्ही मानत असलेलं परिवर्तनाचं जे प्रारूप आहे ते प्रारूप आणि तुमचं स्वतःचं जीवन, संघटनात्मक पातळीवर तुम्ही उभ्या केलेल्या यंत्रणा याचा मेळ बसतो का हे ते सतत तपासून पाहायला सांगत होते.

१९७० नंतर 'एक गाव एक पाणवठा, एक गाव एक मसणवटा' या चळवळीचं एक मोठं लोण महाराष्ट्रामध्ये आलेले होतं. बाबा आढावांनी गावोगाव जाऊन, जागृती करून अनेक महाविद्यालयं, ग्रामीण भाग पिंजून काढून पाणवठ्याचा प्रश्न ऐरणीवर आणला. त्यावेळेला डॉ. नरेंद्र दाभोलकर, मी स्वतः, आमचे प्रमोद कोपर्डे, दिनकर झिंब्रे वगैरे मित्र, लक्ष्मण माने असे सगळेच जण त्या चळवळीमध्ये सामील होतो. पाणवठ्याच्या चळवळीला आम्ही जेव्हा हात घातला तेव्हा हे केलं पाहिजे असं पळशीकर त्यावेळेला सांगत होते. ते असे म्हणत होते की शासनाच्या कायद्यांचा वापर करून तुम्ही कदाचित सक्तीने पाणी भरायला लावाल, सवर्णांवर खटले घालाल. हे न्याय्य रास्त, व घटनेच्या चौकटीत असेलही पण तुम्ही जरी हे केलंत तरी दोन्ही वस्त्यांमधली जी दरी आहे ती त्याने काही दूर होणार नाही. तुम्ही जर पाणवठ्याच्या निमित्ताने जाणार असाल तर सगळ्या गावाचे प्रश्न, त्या प्रश्नाच्या सोडवणुकीची एक दिशा असणं, सातत्याने त्या गावाशी संपर्क ठेवणं असं जर चित्र निर्माण झालं असतं तर कदाचित ग्रामस्थांना तुम्हाला सहकार्य करावंसं वाटलं असतं. पण त्या गावाच्या प्रश्नांशी जोडून घेणं हा जो भाग होता तो आमच्या चळवळीतून पुढे रेटला गेला नाही. त्याऐवजी आम्ही फक्त पाणवठा या मुद्यावरच लक्ष केंद्रित केलं. सरकार किंवा प्रस्थापित अशा चळवळी मोडण्यामध्ये हुशार असतं हे आमच्या लक्षात आलं नाही. पळशीकर सांगत होते की तुम्ही कोणत्याही प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी जेव्हा ग्रामीण भागाकडे वळता त्यावेळी तुम्ही ग्रामीण होणं ही पहिली अभिप्रेत असणारी गोष्ट आणि दुसऱ्या बाजूला त्या प्रश्नाशी तुमचं देणं-घेणं निर्माण करणं. हे जर तुमच्याकडून झालं नाही तर तुम्हाला मिळणारा प्रतिसाद उलटा असेल.

**प्रश्न :** हे फार छान सांगितलंत. तुम्ही तुमच्या आणि पळशीकरांच्या ऋणानुबंधाबद्दल सांगाल का?

**उत्तर :** पळशीकरांचा आणि माझा परिचय जवळपास १९७३पासून झाला असं मी मानतो. खरोखर ७३ साली आमची गाठ डॉ. नरेंद्र दाभोलकरांच्या घरी पडली. त्यावेळी ते वास्तव्याला काही काळ सातारला होते. त्यांच्या पत्नींची बदली साताऱ्याहून श्रीरामपूरला व्हायची होती. त्या काळात जी गाठ पडली ती प्राधान्याने शिबिरांच्या संदर्भात पडली. मी ज्या 'समाजवादी युवक दल' म्हणून संघटनेत काम करीत होतो त्या संघटनेत वर्षातून चांगली सकस २-३ अशी बौद्धिक शिबिरं व्हायची. त्या शिबिरांना नरहर कुरुंदकर, वसंतराव पळशीकर, अण्णासाहेब सहस्रबुद्धे, मे.पुं. रेगे, गं.बा. सरदार अशी सगळी दिग्गज मंडळी येऊन आम्हाला मार्गदर्शन करीत असत. त्या चौकटीत आमच्या अभ्यासाला सुरुवातही झाली. लक्षात असं आलं की कुरुंदकरांची मांडणी, सरदारांची मांडणी यांच्यापेक्षा हा माणूस काहीतरी वेगळं मांडू पाहतो आहे. त्यांच्या सहवासाच्या ४० वर्षांचा प्रचंड फायदा मला किंवा माझ्यासारख्या संघटनेत असलेल्या अनेक मित्रांनासुद्धा झालेला आहे. म्हणून मग प्रत्येक प्रश्नावर इतकं सगळं वाचलं आपण तरी सुद्धा पळशीकर काय म्हणतात हा एक सततचा प्रश्न आमच्या सगळ्यांच्या मनोविश्वात असायचा आणि त्यांचं म्हणणं विचारात घेतल्याशिवाय आपलं मत पक्कं करायचं नाही अशा तऱ्हेचा तो प्रभाव माझ्यावर व्यक्तिशः पडलेला आहे. माझ्या काही मित्रांवरही पडला असं दिसतं. त्यामुळे त्यांच्या सहवासामध्ये जसं भालचंद्र नेमाडे एका मुलाखतीत म्हणाले होते ना की 'या माणसाच्या जवळ तुम्ही एक तास जरी व्यतीत केला तरी तुम्हाला जगण्याची वेगळी दिशा प्रतीत होते' पळशीकरांबद्दल त्यांनी जे म्हटलं आहे, ते अगदी तंतोतंत खरं आहे. जगण्यातली सहजता तरी किती असू शकते आणि साधेपणाला सुद्धा किती मूल्य असू शकतं हे त्यांच्या सहवासात आल्याशिवाय नाही कळणार, पण पुन्हा त्या साधेपणाचं कुठेही अवडंबर नाही आहे. आपल्या पोषाखाबद्दल ते कधीच फारसे जागरूक नव्हते. त्यांच्या सहवासात येणाऱ्या कुठल्याही माणसावर कोणतंही वैचारिक दडपण येतं असा माझातरी अनुभव नाही. आणि आमच्या संघटनेमधल्या अनेकांना याची खात्री पटलेली आहे त्यावेळेला, प्रचीती आलेली आहे असं म्हणू खात्री म्हणण्यापेक्षा. कधी दडपण आलं नाही त्यांच्याशी बोलताना. उलट आपली भूमिका अत्यंत आस्थेनं आणि मनःपूर्वक कुणीतरी ऐकते आहे आणि मग त्याच्याशी आपल्याला संवाद करायला मिळतो आहे याचाच एक प्रकारचा आनंद त्यांच्या सहवासात भरपूर मिळाला. त्यामुळे घडणीमध्ये सुद्धा माझ्या स्वतःच्या, एखाद्या निष्कर्षाला येण्यासाठी किती पद्धतीनं आपण विचार करून पाहिला पाहिजे आणि कोणत्या कोणत्या गोष्टी तपासल्या पाहिजेत ही जी एक सवय लागते ती माझ्यात किती उतरली हे मी म्हणून सांगू शकत नाही ते इतरांनी ठरवायचे आहे. पण मला असं वाटतं की त्या पद्धतीनं विषयांचा विचार करणं, प्रश्नांचा विचार करणं ही सवय पळशीकरांच्यामुळे मला लागली हे ऋण मला मान्यच केलं पाहिजे.

**प्रश्न :** नव्या पिढीला पळशीकर समजून घ्यायचे तर काय करता येईल?

**उत्तर :** या पिढीच्या माईंडसेटचा एक भाग असा आहे की आम्हाला कोणत्याही प्रकारचं इतिहासाचं ओझं आमच्या डोक्यावर नको आहे. ते असं म्हणताहेत की आम्हाला इतिहासापासून अंतर हवं आहे आणि इतिहासाला आम्ही बांधील नाही. आम्ही जे करू तिथून इतिहासाची सुरुवात हाईल आणि आमच्या हातून जे होईल ती इतिहासातील आमची कारकीर्द असेल. या प्रकारची भूमिका जर तुम्ही घेतलीत तर मग कोणत्याही प्रश्नांची सांगोपांग चर्चा करणं याला अर्थ उरत नाही. नव्या पिढीला पहिल्यांदा हा विवेक करता यायला हवा की आपण कोणत्या प्रकारच्या इतिहासाला बांधील आहोत आणि कोणत्या प्रकारच्या प्रणालीतून इतिहासाकडे बघणार आहोत. म्हणून भारतीय इतिहासाकडे जे लेखन आहे त्याच्यातले प्रवाह, प्रभाव कुणीतरी त्यांनी नीटपणे समजावून सांगायला हवे. आतापर्यंत भारतीय समाजाबद्दल केली गेलेली भाष्यं नीट तपासून घेण्याची प्रेरणा त्यांना द्यायला हवी. आपला समाज आपल्याला जर अजून समजला नाही तर मग परकीय विद्वान किंवा पंडित जे सांगतील त्याच्यावर आधारितच कल्पना आपल्याला मांडाव्या लागतील आणि ते इतिहासालाही धरून होणार नाही. पुढे जाण्याच्या दृष्टीनेही त्याचा उपयोग नाही. त्यामुळे आपली परंपरा आतून पाहाणं म्हणजे काय? परंपरेतला सत्त्वांश कसा ओळखायचा? परंपरा पुढे नेण्यासाठी त्यातल्या कुठल्या उचित भागाच्या आधारे काही नव्या संस्थांची तयारी केली पाहिजे, ह्या पद्धतीने काम करायचं तर पळशीकरी विचारविश्वातून नव्या पिढीला पुष्कळ नव्या इनसाइट्स मिळतील.

**- किशोर बेडकिहाळ**
भ्रमणध्वनी : ९४२३०१२८७७
kishorbedkihal@gmail.com

**(वरील प्रश्न 'अवकाशनिर्मिती' गटाच्या प्रतिनिधींनी विचारलेले असून उत्तरे ज्येष्ठ अभ्यासक किशोर बेडकिहाळ यांनी दिलेली आहेत.)**

पळशीकरांची जीवनदृष्टी लोकांपर्यंत पोचवण्याचा प्रयत्न 'अवकाश निर्मिती'ने केला आहे. ही मांडणी ३ पद्धतींनी केली आहे.

**१. पळशीकरांच्या निमित्ताने... एक टीजर**

ह्या डॉक्युमेंटरी फिल्ममधे **'पळशीकरांनी केलेली आधुनिकतेची चिकित्सा'** हा मुद्दा सोप्या पद्धतीने मांडलेला आहे.
पळशीकरांचे विचार समाजातल्या विविध स्तरांपर्यंत पोचावेत, ते ठराविक वैचारिक वर्तुळामधे अडकून राहू नयेत ह्यासाठीचा हा प्रयत्न आहे. पळशीकरीय दृष्टी लोकांपर्यंत पोचवणे हे आजच्या परिस्थितीत जास्त निकडीचे बनले आहे.
राष्ट्रवाद, अर्थकारण, विकासाचं प्रारूप, तंत्रज्ञान, निसर्गकेंद्री व्यवस्था, परंपरा आणि आधुनिकता, धर्माचं स्थान, शहरीकरण, वसाहतवादानं घडवलेलं भारतीय मानस असे गुंतागुंतीचे विषय 'खेळकर', 'सोप्या' पद्धतीनं मांडून विचारांची प्रक्रिया सुरू करणं हा ह्या फिल्मचा उद्देश आहे.
**मराठी/इंग्रजी/हिंदी आवृत्त्या - कालावधी ८५ मिनिटे**

**२. 'पळशीकरांविषयी' - व्हिडिओ मालिका**

विविध मान्यवरांच्या मुलाखतींच्या आधारे पळशीकरांच्या विचारांचा खोलात जाऊन घेतलेला हा वेध आहे. वसंत पळशीकर यांच्या विचारातले आणि स्वभावातले वेगळेपण उलगडून दाखवणारी ही मालिका आहे. अभ्यासक, संशोधक, विद्यार्थी, चळवळीतले कार्यकर्ते आणि सजग नागरिक ह्या सर्वांना हा ठेवा महत्त्वाचा वाटेल.
**मराठी- विविध पैलूंवरच्या स्वतंत्र व्हिडिओची मालिका**

**३. पळशीकरांचे मूळ लेख**

वसंत पळशीकर यांनी साधारण ६५० लेख लिहिले आहेत. ह्या लेखांची पूर्ण सूची आणि महत्वाचे लेख अभ्यासक आणि संशोधकांना उपलब्ध करून दिले जात आहेत. ह्या लेखनामधून गेल्या ५-६ दशकांमधली सामाजिक, राजकीय परिस्थिती आणि पळशीकरांनी केलेले तिचे मूलगामी विश्लेषण अभ्यासकांना उपलब्ध होईल. ह्यातले काही लेख arvindguptatoys.com ह्या वेबसाईटवर उपलब्ध आहेत.

संपर्क
**समीर शिपूरकर**
९४२२०८९३१०
avakashnirmitee@gmail.com

# विश्रामगृह नावाची बकाल झालेली संस्कृती...

**प्रवीण बर्दापूरकर**

**विश्रामगृहाचा आनंद घ्यायचा झाला तर सर्व काही शांतपणे घ्यायची सवय करून घ्यावी लागते. साधा चहा जरी सांगितला तरी तातडीने मिळणार नाही अशी परिस्थिती पूर्वी होती आणि आजही आहे. गेल्या १५-२० वर्षांत मात्र 'विश्रामगृहांची संस्कृती' धोक्यात आलेली आहे.**

**शा**सकीय विश्रामगृहांचं लहानपणापासूनच एक सुप्त असं आकर्षण मनात होतं. आई आणि वडील दोघेही शासकीय नोकरीत असल्यानं त्यांचे वरिष्ठ गावी आल्यावर विश्रामगृहावरच उतरत असत. विश्रामगृहाचं वातावरण कसं एकदम ॲरिस्टोक्रॅटीक, कव्हर घातलेले शिस्तबद्ध सोफे, खानसामा आणि अन्य कर्मचारी युनिफॉर्ममध्ये, जेवणाच्या टेबलवर आकर्षकपणे मांडून ठेवलेला संरजाम मनात खोलवर तेव्हापासूनच रुतून बसला. तो बडेजाव बघून आपणही शासकीय नोकरीत अधिकारी व्हावं असंच वाटायचं.

पुढे तरुण वयात युवक चळवळीत आणि युवक केंद्राचं काम करताना छोट्यामोठ्या नेत्यांसोबत विश्रामगृहांशी जवळीक वाढली; पत्रकारितेत आल्यावर तर गेल्या चार दशकात वर्षात पक्की नाळ जुळली गेली. विश्रामगृह म्हणजे केवळ इमारती नाही तर तो निवास आणि खाद्य संस्कृतीचा एक वारकरी आहे असं लक्षात येत गेलं. या इमारती म्हणजे केवळ दगड-माती, सिमेंट-विटा यांचा समुच्चय नाही तर अनेक विश्रामगृहांची नाळ त्या-त्या भागातील सांस्कृतिक, राजकीय आणि सामाजिक घटनांशी तसंच मोठमोठ्या व्यक्तींशी जोडली गेलेली आहे, असं लक्षात येत गेलं.

गेस्ट हाऊस, रेस्ट हाऊस आणि सर्किट हाऊस हे शब्द आपण सरसकट एकाच अर्थाने वापरतो हे काही खरं नाही हे पत्रकारितेत आल्यावर उमजलं. रेस्ट हाऊस म्हणजे केवळ काही तासांसाठीचा मुक्काम असलेलं तर गेस्ट हाऊस म्हणजे जिथे एक-दोन दिवस वास्तव्य करायचं आणि सर्किट हाऊस म्हणजे अतिमहत्त्वाच्या व्यक्तींच्या निवासासाठी असलेलं तात्पुरतं निवासस्थान. गेस्ट हाऊस म्हणजे मध्यमवर्गीयांचा फर्निश्ड वन-बेडरुम फ्लॅट, रेस्ट हाऊस म्हणजे मध्यम मध्यमवर्गीयांचा जरा सजवलेला-एखाद्या बेडरुमला एसी असणारा टू-थ्री बेडरुम फ्लॅट तर सर्किटहाऊस म्हणजे कलात्मकतेनं सजवलेलं उच्चवर्गीयांचं आलिशान घर अशी ही उतरंड आहे. गेस्ट हाऊस, रेस्ट हाऊस आणि सर्किट हाऊस या तिघांना एका पंगतीत बसवणं हे विश्रामगृह संस्कृतीचं अवमूल्यन आहे; 'साराभाई वर्सेस साराभाई'च्या भाषेत सांगायचं तर, पोळीचा पिझ्झा किंवा चायनीज मसाला डोसा असं टिपिकल मिडलक्लास आहे ते!

सर्किटहाऊसचा दिमाख काही वेगळाच. सर्वसामान्य माणसाला सर्किटहाऊसमध्ये राहण्याचं भाग्य सहजासहजी मिळत नाही,

त्यासाठी मंत्री, खासदार, आमदार, आय.ए.एस., आय.पी.एस. अधिकारी किंवा यापैकी एकाचा वशिला लावावा लागतो. सर्किट हाऊसची एक खोली म्हणजे मध्यमवर्गीय माणसाचं अख्खं छोटेखानी घर कमी पडेल अशी असते. सुसज्ज बाथरुम आणि तीही अनेकदा १२ x १२ किंवा १५ x १५ फूट आकाराची म्हणजे, मध्यमवर्गीय पांढरपेशा माणसाच्या पूर्णपणे आवाक्याबाहेर असणारी. बसण्याची खोली स्वतंत्र आणि प्रशस्त, शिवाय एक आलिशान बेडरुम असा हा एक स्यूट असतो. बाथरुम वगळता सर्वत्र अगदी वॉल टू वॉल, पाय कमीतकमी बोटभर तरी आत शिरेल असं उंची कारपेट आणि संपूर्ण स्यूट फुल एअरकंडिशन्ड. स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्यानंतर सुरुवातीच्या काळात विश्रामगृह ही केवळ सार्वजनिक बांधकाम खात्याची मिरासदारी होती. नंतर त्यात वन, सिंचन या खात्यांसोबतच एमआयडीसी, एमएसईबी, ही मंडळेही शिरली.

गेस्ट हाऊस आणि रेस्ट हाऊस हे सर्किट हाऊसच्या तुलनेत एकदम कनिष्ठ, मेटाकुटीला आलेल्या मध्यमवर्गीय संसारासारखं! मुंबई, नागपूर, पुण्यात फर्निश्ड वन-टू बेडरुम, किचनची जी कन्सेप्ट आहे अगदी तस्सच. मात्र, एक ते दीड खोलीपुरता विस्तार असणारी गेस्ट हाऊसेस असतात मात्र सुसज्ज. गेस्ट हाऊस असो की रेस्टहाऊस की सर्किट हाऊस या सर्वांना एका धाग्यात बांधणारं समान सूत्र असतं ते तिथे मिळणारं अतिशय रुचकर जेवण. नाश्त्याला मिळणारे मिळणारे साधे पोहे असो किंवा टोस्ट बटर, भोजन शाकाहारी असो वा मांसाहारी; प्रत्येक रेस्ट हाऊसची एक स्वतःची अशी चव असते; त्या चवीचा परिमळ त्या परिसरातच नव्हे तर ती चव चाखलेल्या प्रत्येकाच्या बोलण्यातून दरवळत असतो. काही रेस्टहाऊसेसमधून जेवून बाहेर पडल्यावर तेथील मसाल्याचा बोटाला लागलेला सुगंध त्या अफलातून चवीच्या जायकेदार जेवणाची पुढचे आठ दिवस आठवण करून देत असतो.

रेस्ट हाऊस, गेस्ट हाऊस हे खरे तर इंग्रजांचे देणं. त्या काळात प्रवास जिकिरीचा होता. गावोगावी राहण्याची सोय नव्हती म्हणून इंग्रज अधिकाऱ्यांसाठी ठिकठिकाणी गेस्ट हाऊसेस बांधली गेली. ती कमी पडू लागल्यावर एतद्देशीय अधिकाऱ्यांसाठी रेस्ट हाऊसेस आली. प्रशासनातला आणि इंग्रज-इंडियनमधला भेद स्पष्ट झाल्यावर विश्रामगृहे आली. इंग्रज विश्रामगृहात आणि एतद्देशीय रेस्टहाऊस किंवा गेस्टहाऊसमधे अशी विभागणी झाली. स्वातंत्र्य मिळाल्यावर नंतरच्या १५-२० वर्षांनी अधिकारी आणि राजकारण्यांचा जो सुळसुळाट झाला त्यातून वैभवी सर्किट हाऊसेसची निर्मिती झाली.

सर्किट हाऊस, गेस्ट हाऊस किंवा रेस्ट हाऊस अशा कुठल्याही नावात न अडकणारं उत्तम ठिकाण म्हणजे अमरावती जिल्ह्यातील मेळघाटातील कोलखास येथील गेस्ट हाऊस. १९७१ किंवा त्याच्या आसपास भारताच्या तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्यासाठी हे गेस्टहाऊस जेमतेम १५-२० दिवसांत उभारण्यात आलं. इंदिरा गांधी यांनी या दीड खोल्यात चक्क तिथं दीड दिवस घालवला. मेळघाटात, उंच टेकडीवर ही साधीशी इमारत आहे. ऐश्वर्याच्या तशा कोणत्याही खुणा या इमारतीत आणि इमारतीवरही नाहीत, पण एकदा व्हरांड्यात येऊन बसलं आणि सभोवार नुसती नजर टाकली तरी निसर्गाची उधळण खिळवून ठेवते. खाली 'सिपना' नदीचा प्रवाह खळाळत असतो. एकटा माणूसही इथे काही न खाता-पिता, वाचता-ऐकता स्वतःला अनेक तास गुंगवून ठेवू शकतो. त्यात दिवस कलतीकडे झुकू लागला असेल तर आकाशातले रंगविभ्रम मोहून टाकतात. साथीला तलत किंवा बेगम अख्तर किंवा मेहंदी हसन यापैकी एखादाजण असेल तर आपण त्या संध्याकाळमध्ये केव्हा विरघळून जातो, हे लक्षातही येत नाही. जशी रात्र चढत जाते तसं वातावरण इतकं निःशब्द होत जातं की, पानांची सळसळही डिजिटल आवाजापेक्षा मोठी होऊन अंगावर काटा उभा करते. त्यातच आपण जर पुरेसे सुदैवी असू तर व्याघ्र दर्शन होण्याचाही योग जुळतो.

वेरुळच्या लेण्यांच्या डोक्यावरच्या डोंगरावर खुलदाबादचं सर्किट हाऊस आहे. हेही बहुधा इंग्रजांच्याच काळात बांधलं गेलं असावं आणि निझामाच्या राजवटीत त्याची देखभाल एखाद्या खानदानी वैभवासारखी केली गेली. सकाळी या रेस्ट हाऊसवर सामान टाकावं, डोंगरावरच्या पायवाटेने वेरुळची लेणी पाहण्यासाठी खाली थेट लेण्यांच्या मांडीवरच उतरावं, दुपारी कैलास हॉटेलमध्ये झकास जेवण घ्यावं, मग कैलास लेणं बघावं. दिवस उतरणीला लागला की पुन्हा डोंगर चढायला सुरुवात करावी आणि सूर्य अगदी मावळण्याच्या क्षणी खुलदाबादच्या रेस्ट हाऊसच्या व्हरांड्यात असलेल्या सोफ्यावर स्वतःला झोकून द्यावं. सूर्य पूर्ण मावळल्यावर दिवसभराच्या श्रमाचा शीण मंतरलेल्या पाण्यात विरघळवून टाकावा आणि मग अविस्मरणीय जायकेदार जेवणाचा यथेच्छ आस्वाद घ्यावा. याच सर्किट हाऊसच्या परिसरात २-३ मशिदी आहेत. त्यापैकी एक खुलदाबादच्या डोंगरावरच्या डोंगरावर आहे. सकाळी लवकर उठून तिथे ट्रेकिंगलाही जाता येतं. पहिला चहा घेऊन हा छोटा डोंगर टाकोटाक चढून लगेच उतरलं की नाश्त्यावर आडवा हात मारता येतो.

आम्ही कॉलेजात असताना याच खुलदाबाद सर्किट हाऊसच्या परिसरात 'पाकिजा' चित्रपटाचं शुटींग झालेलं आणि त्याच्या मराठवाडा दैनिकात प्रकाशित झालेल्या बातम्या वाचल्या गेलेल्या असल्यानं या परिसराविषयी एक इमोशनल असं नातं माझ्या पिढीला आहे. कुठेही भटकायला नाही गेलं आणि अंधार दाटायला सुरुवात झाल्यावर या परिसरात भरपूर फिरलं तर लक्षात येतं की, एखाद्या अतिप्राचीन दाढीधारी गंभीर वृद्धासारखा हा परिसर आहे. या सर्किट


हाऊसमधल्या वैभवातून अनेक वस्तू नंतरच्या काळात शासकीय अधिकाऱ्यांनीच पळवल्या तरीही काही शिल्लक आहेत. नीट वशिला लावला तर त्या आजही बघायला मिळतात. खुलदाबादचं रेस्ट हाऊस मात्र सुरुवातीपासून आज अखेर दारू पिणाऱ्यांचा एक अड्डा हेच बिरूद मिरवत उभं आहे. या दारुड्यांचे अनेक अवशेष सकाळी गेस्ट हाऊसमध्ये चक्कर मारतांना सहज नजरेला पडतात आणि माणसं मद्याचा 'आस्वाद' घेण्याऐवजी दारू का 'ढोस-ढोस-ढोसतात' असा प्रश्न पडतो!

वाशीम म्हणजे दंगल होणारं गाव अशी या गावाविषयी लहानपणापासून एक प्रतिमा तयार झालेली होती. आजी-आजोबा आणि मामांनी ती मनावर कोरली होती. विदर्भात पत्रकारितेच्या निमित्ताने आल्यावर सुमारे २० वर्षांपूर्वी या गावाला पहिली भेट दिली तेव्हा या गावाविषयी उत्सुकता निर्माण झाली. एखादा अनमोल ग्रंथ वाचकाविना पडून असावा असा या गावचा वैभवी इतिहास आहे. वाशीम गाव पूर्वी तालुका होतं, आता जिल्हा झालं आहे. इथलं सर्किट हाऊस १८९९ साली बांधल्याची दगडाची पट्टी या सर्किट हाऊसच्या दर्शनी भागावर कोरलेली आहे. दगडी बांधणीच्या भक्कम अशा या सर्किट हाऊसला केवळ दोन स्यूट आहेत. एखाद्या भक्कम चिरेबंदी वाड्यासारखं हे सर्किट हाऊस आहे. भिंती एवढ्या भक्कम आहेत की खिळा ठोकण्यासाठी ड्रिलिंग मशिनचीही दमछाक होते. सर्किट हाऊसचा लूक एकूणच पुराण पुरुषाचा आणि चिरेबंदी बांधणीचा आहे. लोकसत्ताच्या नागपूर आवृत्तीचा संपादक असताना काही वर्षांपूर्वी काही कामासाठी वाशीमला गेलो होतो; तेव्हा सप्टेंबरच्या महिन्यात एका सायंकाळी या सर्किट हाऊसच्या व्हरांड्यात बसलो असताना अचानक जोरदार वारं सुटलं, आभाळ भरून आलं आणि त्या सायंकाळच्या उतरणीला लागलेल्या उन्हात पाऊस धुवांधार सुरू झाल्यावर अद्भुत विलोभनीय रंगाचा मन तृप्त करणारा असा चमत्कार बघायला मिळाला की, वाशीमचं ते सर्किट हाऊस जिवाभावाचा सखा झालं. या सर्किट हाऊसला मिळणारं भोजन भल्या-भल्या अस्सल खवय्यांनाही आजही मोहात पाडतं.

एमआयडीसी- महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्याधिकारी म्हणून जयंत कावळे असताना एकदा असाच विश्रामगृहांचा विषय निघाला आणि त्यांनी ठाणे जिल्ह्यातल्या बारवी धरणावरच्या एमआयडीसीच्या विश्रामगृहाचं वर्णन केलं. एका ऑक्टोबरमधल्या रात्री उशिरा आम्ही, डॉ. रवींद्र जोशी, डॉ. मिलिंद देशपांडे अशी तीन कुटुंबे या विश्रामगृहावर जंगलातून जाताना काळ्याकुट्ट नि:शब्द काळोखाचं साम्राज्य पसरलेलं होचं. विश्रामगृहाची इमारत मात्र प्रकाशमान होती. रस्ता चुकल्यानं आम्हाला तिथं पोहोचायला अर्धी मध्यरात्र उलटून गेलेली होती, पण मुख्याधिकाऱ्यांसह आम्ही पाहुणे असल्यामुळे खानसामा चौकीदार वगैरे प्रतीक्षेत होते. रात्री दोनपर्यंत जागूनही वातारणाचा काहीच अंदाज येत नव्हता आणि इथं येण्यात चूक झाली की काय असंच एकूण किर्र वातावरण होतं. सकाळी उठल्यावर बेडरूममधूनच बारवी डॅम आणि परिसराचं जे काही दर्शन झालं ते डोळ्यांचं पारणं फेडणारं होतं. भर दुपारीही धरणाच्या कामावर येणाऱ्या वाहनांशिवाय अन्य काही आवाज नव्हता, मोबाईलची रेंज नव्हती आणि साथीला नजर पोहोचेल तिथपर्यंत जंगल मनसोक्त पसरलेलं होतं. हिरव्या रंगाच्या इतक्या अगणित छटा अन्य कुठल्याही जंगलात यापूर्वी पाहायला मिळालेल्या नव्हत्या. एमआयडीसीचं विश्रामगृहही सौंदर्याची जाण ठेवून बांधलेलं. दोन दिवस तिथं अतिशय चविष्ट खाण्या-पिण्यात कसे गेले ते कळलंच नाहीत.

२८-३० वर्षांपूर्वी घन ओथंबून आलेल्या एका ओल्यागच्च संध्याकाळी वेंगुर्ल्याच्या विश्रामगृहावर पोहोचलो. मिन्नतवारी करून जागा मिळवली. रात्रभर कधी मंद, कधी मध्यम तर कधी द्रुत गतीत पडणारा पाऊस आणि समुद्राची अंगावर काटा आणणारी गाज अनुभवत, तलत मेहमूदची जवळजवळ सर्व गाणी ऐकत आमचा ग्रुप जागत राहिला. त्या रात्री तलत जितका उमजला आणि मनात रुतला तेवढा कधीच नाही आणि तेवढाच आजही कायम आहे. सकाळी उठल्यावर बघितलं तर समुद्राच्या अगदी माथ्यावर हे विश्रामगृह होतं. जणू काही आपण समुद्रावरच राहत आहोत असं वाटत होतं. पाऊस थांबलेला होता, रात्री बरसलेलं आभाळही लख्ख होतं. उगवतीची किरणं समोरचा समुद्र पूर्ण चंदेरी करून गेलेली होती. नंतर कधीतरी पुन्हा एकदा या विश्रामगृहावर यायचं असं पक्क ठरवलं, पण ते आजवर तरी प्रत्यक्षात उतरलेलं नाही.

मेळघाटात शिरण्याआधी परतवाडा नावाचं गाव लागतं. मेळघाटात जर मुक्काम करायचा असेल तर खाण्यापिण्याचा सर्व बंदोबस्त पूर्वी याच गावातून करून घ्यावा लागत असे. अलीकडच्या १५-२० वर्षांत मात्र दिवस बरेच बदललेत. चिखलदऱ्यात राहण्याची खूप चांगली सोय झालेली आहे, सर्व सोयीही तिथे आहेत. हे दिवस यायचे असताना एकदा रात्री उशिरा परतवाड्याला पोहोचलो. जाणकारांनी इतक्या उशिरा चिखलदऱ्याला न जाण्याचा सल्ला दिला आणि राहण्याच्या जागेसाठी शोध सुरू झाला. तो गावाच्या बाहेर दोन एक किलोमीटरवर सर्किट हाऊसपाशी संपला. सागाच्या वनात लपलेलं हे सर्किट हाऊस १९११ साली बांधलेलं आहे. ऐसपैस व्हरांडा, भल्या मोठ्या खोल्या आणि त्याला साजेशा प्रशस्त बाथरुम्स शिवाय उत्तम अशा सोयी तिथे होत्या. माणसापासून काहीसं फटकून राहणारं असं त्याचं दर्शन मनाला लुभावणारं होतं. जेवणही उत्तम. सकाळी उठल्यावर गावापासून दूरही नाही आणि जवळही नाही; अलिप्त असं असणारं हे सर्किट हाऊस आणि तिथला परिसर मनावर एक गहरी छाया उमटवून गेला,



आहे. औरंगजेबाची कबर असलेल्या आणि आता निद्रिस्त अवस्थेत असलेल्या मारुतीच्या मूर्तीमुळेही (भद्रा मारुती म्हणून हा ओळखला जातो.) चर्चेत असलेल्या खुलदाबादला वळसा घालून हा रस्ता अजिंठ्याला जातो. याच रस्त्यावर १०-१२ किमी. वर डोंगराची रांग आहे. प्रत्येक डोंगर सुटा, ताटात सुटे-सुटे मोदक ठेवल्यासारखे हे चार-पाच डोंगर आहेत. घाट चढून डोंगरावर पोहोचलं की विस्तीर्ण पठार नजरेला पडतं. जमिनीपासून हजार एक फूट उंचीवर हे पठार असावं. म्हैसमाळ नावानं हा परिसर ओळखला जातो. याच पठारावर सार्वजनिक बांधकाम खात्यासोबतच वन विभागाचंही विश्रामगृह आहे. संध्याकाळी सहा-साडेसहानंतर

आजही ती छाया कायम आहे. पुढचे दोन दिवस मग सर्किट हाऊसच्या त्या परिसरात आम्ही कवितांसोबत घालवले.

बुलढाणा हे तसं विदर्भातलं थंड हवेचं ठिकाण म्हणायला हरकत नाही. संपूर्ण विदर्भ ४५-४६ डिग्री सेल्सियस उन्हात होरपळत असला तरी बुलढाण्यात मात्र तापमान ३७-३८ सेल्सियस एवढंच असतं. बुलढाण्याला गेलं की नवीन सर्किट हाऊसमध्ये थांबण्याची सवय लागलेली होती. अशाच एका उन्हाळ्यात एका लेखकानं माझ्या नावावर असलेला स्यूट बळकावल्याने जुन्या सर्किट हाऊसकडे वळलो. तिथे जाण्याआधीच तिथला एअरकंडिशनर बंद आहे असं सांगण्यात आलं होतं, पण नाईलाज होता. स्यूट उघडला आणि एकदम मनातच भरला. भिंती चिरे आणि चुन्यांनी बांधलेल्या, १०-१२फूट उंचीचा दरवाजा आणि तशाच भव्य खिडक्या, २०-२२ फूट उंचीवर छत, हवा खेळती राहण्यासाठी छताखाली आयताकृती खिडक्या. एअरकंडिशनर तर लांबच, पंखा चालू नसूनही एकदम गारवा अंगावर आला. शेतातल्या विहिरीशेजारी असलेल्या चिंचेखाली ऐन उन्हाळ्यात असतो तसा तो अस्सल गारवा होता. एकूणच त्या स्यूटला एक खानदानी अशी अदब होती. बेडरुम, सिटींगरुम आणि बाथरुमही प्रशस्तपणे पण, अस्ताव्यस्त पसरलेले होते. दुसऱ्या दिवशी सकाळी चाफ्याच्या मंद अशा गंधाने जाग आली. दरवाजा उघडून बाहेर पडलो तर सर्किट हाऊसच्या पोर्चमध्ये चाफ्याच्या गंधानं कवेतच घेतलं. कोपऱ्यावरचं चाफ्याचं झाड मोठ्या ऐटीत गच्च फुललेलं होतं. मन एकदम प्रसन्न झालं. तेव्हापासून बुलढाण्याचा हा पुरातन स्यूट मनात वसला.

वेरुळहून अजिंठ्याला जायला एक लहान पण पक्का रस्ता

वनखात्याच्या या विश्रामगृहाच्या पायथ्याशी कन्नडपर्यंतचा परिसर न्याहाळत सूर्यास्त बघावा आणि मग खानसाम्यानं बनविलेल्या लज्जतदार खाण्याचा आस्वाद घ्यावा. 'दम की बिर्याणी', 'दम आलू' या इथल्या खास डिशेस. मात्र, जेवणाची ऑर्डर किमान चार तास आधी द्यावी लागते तरच जिभेवर पुढचे सात-आठ दिवस रेंगाळणाऱ्या या लज्जतदार खाण्याचा आस्वाद मिळू शकतो. उन्हाळा असेल तर बियर आणि हिवाळा असेल तर व्हिस्कीसोबत जेवण तयार होईपर्यंत तीन-चार तास घालवावेत; मग सट्ट जेवावं. सकाळी चिमण्यांच्या चिवचिवाटातच जाग येते. समोर उठून बघावं तर नजर जाईल तिथपर्यंत शेतांचे वेगवेगळ्या रंगाचे हिरवे पट्टे पसरलेले दिसतात. मात्र, हे विश्रामगृह मिळण्यासाठी बराच क्यू असतो. वशिला लावूनही उपयोग होत नाही.

वीस वर्षांपूर्वी विदर्भातलं एक अतिशय देखणं विश्रामगृह इटियाडोहच्या अगदी काठावर होतं. होतं म्हणायचं एवढ्यासाठी की, नक्षलवाद्यांच्या कारवाया वाढल्यापासून ते विश्रामगृह जवळजवळ बंदच झालं आहे. विश्रामगृहाची बांधणी तशी आधुनिक पद्धतीची असली तरी त्याला एक डौल आहे. इटियाडोह प्रकल्पाच्या पाण्यानं नुसती तर्जनी जरी लांब केली तरी या विश्रामगृहाला लागते. विश्रामगृहाच्या परिसरात गुलाबांच्या अगणित जातींच्या कलमांची लागवड केलेली आहे. तुम्ही मत्स्यप्रेमी असाल तर इथला खानसामा लगेच सिंचन प्रकल्पातूनच ताजे मासे आणून प्रेमाने खाऊ घालायचा. त्याच्या हातच्या साध्या वरणाची चवसुद्धा एखाद्या सुगरणीला लाजवणारी होती. एका चांगल्या पर्यटनस्थळाला नक्षलवाद्यांनी कायमचं बंद करून टाकल्यानं माझ्या पाहण्यातलं हे एकमेव

उदाहरण. अजूनही इटियाडोहचं विश्रामगृह आणि तेथील स्वाद आठवला की मन हळवं होतं.

औरंगाबादचं जुनं सुभेदारी विश्रामगृह निझामी थाटाचं आणि तेवढंच ऐश्वर्याचंही. एअरकंडिशनर वगैरे लावून आणि इलेक्ट्रीक वायरींग करून या खानदानी सौंदर्याला देण्यात आलेला आधुनिकतेचा टच 'बुढी घोडी, लाल लगाम'सारखा विजोड आणि मनाला सतत खटकत ठेवणारा आहे, पण विविध मांसाहारी पदार्थांची चव घेण्यासाठी या अशा बाबींकडे दुर्लक्ष करायला हवं. जर कुणी महत्त्वाचा किंवा अतिमहत्त्वाचा सरकारी/शासकीय पाहुणा नसेल आणि आपण एकटेच असू तर निझामकालीन प्लेट्स, चमचे-काटे, ग्लासेस अशा खास 'अय्याशी' जाम्यानिम्यात जेवणाची लज्जत चाखता येते. जेवणाआधी मद्याचा आस्वाद घ्यायचा असेल आणि खानसामा पुरेसा पटवला गेलेला असेल तर खास मद्य प्राशनासाठी वापरले जाणारे अगदी निझामकालीन चषकसुद्धा मिळू शकतात. अर्थात हे सगळं जुळून यायला तुम्ही खूपच भाग्यवान वगैरे असावं लागतं. हा संपूर्ण परिसर औरंगाबाद शहराच्या काहीसा माथ्यावर वसलेला आणि पाठीशी सलिमअली सरोवर, तर कवेत हिमायत बाग असणारा आहे. ज्यांना मद्याचा आस्वाद घ्यायचा नाही त्यांनी सलिम अली सरोवराभोवती फिरून यावं आणि मागच्या व्हरांड्यात बसून रात्रीच्या प्रकाशात चकाकणाऱ्या औरंगाबादचं रूप डोळ्यात साठवत जेवणाचा शांतपणे आस्वाद घ्यावा, असा हा सगळा सुंदर नजारा असतो.

कोल्हापूर ते सावंतवाडी रस्त्यावर गडहिंग्लजच्या जंगलात सिंचन विभागाचं एक विश्रामगृह. दाट वनराईत लपलेलं आहे. अविनाश गुप्ता, प्रकाश देशपांडेसह आम्ही एकदा गोव्याला जात असताना या विश्रामगृहाचा आसरा घेतला. अविनाशला कोणीतरी या विश्रामगृहाबद्दल सांगितलं होतं आणि ते शोधण्यात आम्ही या परिसरात अडीच -तीन तास फिरलो. त्यामुळे रात्र झाली. हा शोध प्रचंड वैतागजनक होता. चौकीदाराला पटवण्यातही भरपूर वेळ गेला, पण तिथलं मद्योत्तर जेवण खास कोल्हापुरी थाटाचं आणि झणझणीत चवीचं होतं. ती झणझणीत चव या विश्रामगृहाचं नाव जरी काढलं तर अजूनही व्याकूळ करते. ऐन रहदारीच्या रस्त्यावर असूनही इतक्या दाट झाडीत लपलेलं माझ्यातरी पाहण्यातलं हे एकमेव विश्रामगृह आणि बहुधा त्याच वैशिष्ट्यामुळे गेली अनेक वर्षे ते मनात रुतून बसलेलं असावं.

एक वेगळा आणि तोही सुरेल अनुभव जळगावला आला. पत्रकार परिषदेच्या कार्यक्रमासाठी जळगावला जाण्याची संधी मिळाली. सोबत लेक होती. रात्री खूप उशिरा रेल्वेनं जळगावला पोहोचलो. आयोजकांनी आम्हाला झोपेतच विश्रामगृहात नेऊन सोडलं. आम्हीही लगेच झोपलो. सकाळी पावणे-सातच्या सुमारास जाग आली ती लांबून आलेल्या 'आकाश पांघरुनी जग शांत झोपलेले, घेऊन एकतारी गातो कबीर दोहे' या अत्यंत सुरेल स्वरांनी. बाहेर आलो तर, थोडं लांब रस्त्यावरून ते सूर येत होते. त्याकडे ओढलाच गेलो. वातावरण मंत्रमुग्ध करणाऱ्या स्वरांचा धनी असलेला धुवट पांढरं धोतर-सदरा घातलेला, कपाळावर गंध कोरलेला एक माणूस हातात एक हार घेऊन गात जात होता. न कळत दोन्ही हात जोडून सुरेल स्वरांच्या त्या धन्याला नमस्कार केला. त्यानंही हात वर करून प्रतिसाद दिला आणि गानमग्नतेतून बाहेर न येता तो पुढे चालू लागला. हळूहळू तो माणूस, तो आवाज आणि त्यात मीही विरघळत गेलो. आजवर कोणतंही विश्रामगृह अशा सुरेलपणे मनात विसावलेलं नाहीये.

एकूणच विश्रामगृह ही एक जरा वेगळी संस्कृती आहे. बहुतेक विश्रामगृह आता गावात आलेली असली तरी ती गावाशी मात्र फटकूनच राहतात. विश्रामगृहाचा आनंद घ्यायचा झाला तर सर्व काही शांतपणे घ्यायची सवय करून घ्यावी लागते. साधा चहा जरी सांगितला तरी तातडीने मिळणार नाही अशी परिस्थिती पूर्वी होती आणि आजही आहे. गेल्या १५-२० वर्षांत मात्र 'विश्रामगृहांची संस्कृती' धोक्यात आलेली आहे. त्यातही विशेषतः सार्वजनिक बांधकाम खात्याच्या विश्रामगृहांची अवस्था देखभालीअभावी दिवसेंदिवस एखाद्या बकाल गावासारखी होत चाललेली आहे, कारण देखभालीसाठी सार्वजनिक बांधकाम खात्याकडे पैसाच राहिलेला नाही. त्यामुळे राज्यातली सार्वजनिक बांधकाम खात्याची बहुसंख्य विश्रामगृहे व्यसनाधीन झालेल्या वैभवशाली माणसाला त्याचं वैभव सोडून जावं अशा अवस्थेत आलेली आहेत, बहुसंख्य ठिकाणी तर सर्किट हाऊस वगळता विश्रामगृह ही गावातील टपोरी तसेच राजकारणात नव्यानेच काहीतरी सत्तेचं फळ प्राप्त झालेल्या नवश्रीमंतांची संध्याकाळची बसायची सोय म्हणूनच आता शिल्लक राहिलेली आहेत. जी काही विश्रामगृहं आजही अतिमहत्त्वाच्या व्यक्तींसाठी मेन्टेन केली गेलेली आहेत त्या विश्रामगृहांची अवस्था सुखसोयी म्हणून बरी आहे, पण दर्शन मात्र अगदी खरं सांगायचं तर बेंगरुळच झालेलं आहे. ७५-१०० वर्षांपूर्वीचा वास्तुशास्त्रीय आराखड्याचा उत्तम नमुना असलेल्या या इमारती वीज, ए.सी., बाथरुममधील अत्याधुनिक सोय करताना त्यांचं मूळ सौंदर्य हरवून बसलेल्या आहेत आणि त्याचं हे रुपडं अक्षरशः दयनीय झालेलं आहे. भर गर्दीत सर्वसामान्य माणूस जसा बिनचेहऱ्याचा असतो तसंच स्वरूप त्यांना प्राप्त झालेलं आहे.

(रेखाचित्र - हेमंत मानमोडे, नागपूर)

**- प्रवीण बर्दापूरकर**
भ्रमणध्वनी : ९११९८२२०५५७९९
praveen.bardapurkar@gmail.com

**साहित्य अकादेमी** प्रादेशिक कार्यालय, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय मार्ग, दादर (पूर्व), मुंबई 400014
फोन: 022-24135744, 24147650 E-mail: rs.rom@sahitya-akademi.gov.in

## मराठी प्रकाशने

### कविता

**दोन ओळींच्या दरम्यान** रु. 80/-
राजेश जोशी
अनु. बलवंत जेऊरकर

**आपण जे पाहतो** रु. 60/-
मंगलेश डबराल
अनु. बलवंत जेऊरकर

**स्वातंत्र्योत्तर मराठी कविता 1961-80** रु. 200/-
संपादक : सु.शं. कुळकर्णी

**पु.शि. रेगे यांची निवडक कविता** रु. 175/-
संपादक : प्रकाश देशपांडे

**गिलगमेश** रु.175/-
डेव्हीड फेरी
अनु. शरद नावरे

### भारतीय साहित्याचे निर्माते

**मामा वरेरकर** रु. 50/-
सदा कऱ्हाडे
अनु. राजा होळकुंदे

**साने गुरुजी** रु. 50/-
ग.प्र. प्रधान
अनु. दिलीप चव्हाण

**ज्ञानदेव** रु. 50/-
पु.य. देशपांडे
अनु. विलास साळुंखे

**बाबासाहेब आंबेडकर** रु. 50/-
के.राघवेन्द्र राव
अनु. मुक्ता जगन्नाथ महाजन

**गजानन माधव मुक्तिबोध** रु. 50/-
नंदकिशोर नवल
अनु. चंद्रकान्त पाटील

**श्रीधर व्यंकटेश केतकर** रु. 50/-
द.पं. जोशी
अनु. मैत्रेयी जोशी

**गजानन त्र्यंबक माडखोलकर** रु. 50/-
उषा देशमुख

**सावरकर** रु. 50/-
सुधाकर देशपांडे
अनु. शैलजा वाडीकर

**श्रीपाद कृष्ण कोल्हटकर** रु. 50/-
म.ल. वराडपांडे
अनु. विलास साळुंखे

**दिनकर केशव बेडेकर** रु. 50/-
रणधीर शिंदे

**विजय तेंडुलकर** रु. 50/-
दत्ता भगत

**भाऊ पाध्ये** रु. 50/-
राजन गवस

### अन्य

**मराठी संतकवयित्रींचा इतिहास** रु. 175/-
संपादक : विद्यासागर पाटंगणकर

**निवडक हरि नारायण आपटे** रु. 150/-
संपादक : विद्याधर पुंडलीक

**भाषावार प्रांतरचना आणि मराठी (काही परिप्रेक्ष्य)** रु.150/-
संपादक : रमेश नारायण वरखेडे

**विवेकानंदांचे चरित्र** रु. 75/-
रोमा रोलां
अनु. विमलाबाई देशपांडे

**स्त्रियांचे मराठीतील निबंधलेखन** रु. 350/-
संपादक: विद्युत भागवत

**श्री तुकारामाच्या अभंगांची चर्चा - खंड 1 व 2** रु. 300/-
वासुदेव बळवंत पटवर्धन
गणेश हरी केळकर

**नामदेवगाथा** रु. 90/-
संपादक : हरी श्रीधर शेणोलीकर

**एकनाथ वाङ्मयदर्शन** रु.110/-
संपादक : भगवंत देशमुख

**समर्थ रामदास : विवेकदर्शन** रु.150/-
संपादक : वि.रा. करन्दीकर

**तुकारामगाथा** रु.110/-
संपादक : भालचंद्र नेमाडे

**मराठी लोकगीते : संस्कृती अभ्यासाची साधने** रु. 110/-
संपादक : रमेश नारायण वरखेडे

**निवडक मराठी आत्मकथा** रु. 175/-
संपादक : राम शेवाळकर

**प्रेमचंद: लेखणीचा शिलेदार** रु. 375/-
अमृत राय
अनु. बलवंत जेऊरकर

**ठाकुरांची नाटके (भाग-1)** रु.300/-
रवीन्द्रनाथ टागोर
अनु. मामा वरेरकर

**निबंधमाला (खंड-1)** रु.700/-
रवीन्द्रनाथ ठाकुर
अनु. शंकर बाळाजी शास्त्री

**निबंधमाला (खंड-2)** रु.250/-
रवीन्द्रनाथ ठाकुर
अनु. मामा वरेरकर

**प्राचीन भारतीय लिपिमाला** रु.500/-
रायबहादुर पंडित गौरीशंकर हीराचंद ओझा
अनु. लक्ष्मीनारायण भारतीय

### कथा

**सात शिखरे** रु. 125/-
अख्तर मुहिउद्दीन
अनु. दत्ता भगत

**सात युगोस्लाव लघुकथा** रु. 80/-
अनु. गौरी देशपांडे

**भग्न मूर्तिंच्या सान्निध्यात** रु. 250/-
सलाम बिन रज्जाक
अनु. मनीषा पटवर्धन

### कादंबरी

**चार अध्याय** रु. 90/-
रवींद्रनाथ ठाकुर
अनु. नीलिमा भावे

**कार्मेलीन** रु. 185/-
दामोदर मावजो
अनु. नरेश कवडी

**अमृत आणि विष** रु. 250/-
अमृतलाल नागर
अनु. उर्मिला जावडेकर

**गहाण पडलेला रघ्घू** रु.185/-
काशिनाथ सिंह
अनु. कविता महाजन

**गोंडीचा महासागर** रु. 100/-
ताजीमा शिंजी
अनु. अजित महाजन

**Subscribe to :** *समकालीन भारतीय साहित्य* **Single Copy : Rs.25, 1 Year: Rs.125, 3 Years: Rs.350**
*Indian Literature* **Single Copy : Rs. 50, 1 Year: Rs. 250, 3 Years: Rs. 650**
**साहित्य अकादेमी 'बुक-क्लब' चे अवश्य सदस्य व्हा**

# रानपाटा

डॉ. प्रतिमा इंगोले

**अर्धा किलोमीटर चक्क अवघड चढ होता. बहुधा तो धबधबाच असावा. आता सुकला होता. काठाकाठाने कसेबसे चढलो तर समोर चक्क रानपाटा! त्याला रानपाटा का म्हणतात हे लगेच लक्षात आले. खाली चक्क कातीव सपाट दगड पसरला होता. चक्क एखाद्या मोठ्ठ्या खोलीसारखा! जणू खाली ठोकून-ठाकून बसवला होता.**

बघता बघता आई पंच्याहत्तर वर्षांची झाली. खरं तर आईचा अमृतमहोत्सवच करायचा होता, पण हाताशी कोणी नाही. जवळची मणसं दूर गेलेली. अशावेळी कायम जवळ असणाऱ्या निसर्गालाच साद घालावीशी वाटली. आईला म्हटलं, ''चल! तुझा अमृतमहोत्सव वेगळा साजरा करूयात.'' आईला माझ्याशिवाय चाराच नव्हता. बिचारी होच म्हणाली.

तशी तिलाही रक्तातून निसर्गाची ओढ होतीच कारण तिचं माहेर सातपुड्याच्या पायथ्याशीच होतं. त्यात वडील स्वातंत्र्यसैनिक व १९३०च्या जंगलसत्याग्रहात बाजूच्या जंगलात भूमिगत झालेले. त्याचवेळी आजीनं ह्या भूमिगतांना भाकरी पुरविण्याचाही वसा घेतलेला. आई त्यावेळी लहान होती. पण ह्या कहाण्या तर झिरपत येतातच. त्यामुळे बाजूला असणारं जंगल सारखं अवतीभोवती होतंच. जवळच्या किंवा घरातल्या माणसासारखंच! किंवा माहेरच्या माणसासारखंच! कधीही साद घातली की, पाठीशी उभं ठाकणारं! तिच्या उत्साहाला आतापर्यंत घरातच खीळ बसत होती, पण आता तिने त्यावर मात करण्याचे मार्ग शोधले होते. त्यामुळे कधीतरी मनासारखं काहीतरी करताही येत होतं. त्यातलंच हे असं ठरवलं, पण बाईला सोबत हवीच. रानातही आणि जनातही. मग तिनेही काही माणसं हुडकली, संगतीला घेतली.

पायी चालण्याचं वय निघून गेलं होतं. हरकत नाही. जसं आणि जेवढं पदरात पडलं तेवढं तर घेता येईल. हिवरखेडपर्यंत बसने गेलो. तिथून 'सुमो' केली. थेट 'झरी' मार्गे निघालो. रस्त्यात वाटले इतका जवळ असणारा हा जंगलाचा जीवनदायी तुकडा आपण आतापर्यंत पाहिलाच कसा नाही? तेव्हा लक्षात आले, ''अरे! आपण स्त्री आहोत म्हणून असे झाले. पुरुष असतो तर आभाळ कवेत घेता आले असते.'' मग वाटले, ''स्त्री असूनही आपल्यापुरते आभाळ निर्माण करून ते कवेत घेतले हे काय कमी झाले? संधी मिळाली तर तिचे सोने करूया. हा आनंद यथेच्छ उपभोगूया. तिने मनाला ताकीद दिली.''

जंगलाचं चेकपोस्ट पार केल्यावर आदिवासींचा 'तेल्यादेव' लागला. रस्त्याच्या बाजूला असलेल्या गोलाकार शिळेचाच देव केला होता. तसा कोणताही देव दगडाचाच तर असतो. फार तर संगमरवरी दगडाचा! तेल वाहून देव काळपट झाला होता. सोबत असलेल्या दोन्ही जंगलप्रेमींनी त्याचेही फोटो काढले. बाजूला (कुसुंब) कुसुंबवृक्ष लाल-हिरवी पानं लेवून रंगपंचमी खेळत होता. पुन्हा गाडीत बसलो. रस्ता नागमोडी होता. जंगलप्रेमी सोबत्याने आपल्या चिमुरडीलाही जंगलची ओढ लागावी म्हणून सोबत आणले होते. ती तशी छोटीच होती. रस्ता पाहून एकदम म्हणाली, ''सापाचा रस्ता! सापाचा रस्ता!''

तिला 'नागमोडी' शब्द कोठून सुचणार? ती तिच्या बालबुद्धीने उत्कटपणे सहजच बोलली होती. तिच्या अनुभूतीतून ते खरेही होते. तसेच आदिवासींच्या अनुभूतीतून त्यांचेही दगडात, जंगलात, वृक्षवेलीत देव शोधणे खरे होते. रस्ता मुरुमांचाच होता. त्यामुळे

गाडीला वेग वाढविता येतच नव्हता, पण ते आमच्या पथ्यावरच पडत होते. जंगल छान वाचता येत होते. कांचन, कुसुंब, तलई, सालई, मोह, धावडा, साग, टेंभुर्णी, चारोळी, बोर, आवळा, घोमणाचं फूल यासारखी झाडं त्यांच्या खऱ्या मस्तीत खडी होती. तर पळसवेल, सप्तवर्णीसारख्या वेली नैसर्गिक झुले तयार करीत लहरत होत्या. रायमुनिया, निरगुळ, तरोळसारखी झुडुपं-झाडंही बहरत होती. फुलझडी गवत, जोंधळी गवत आणि इतरही गवतांचे प्रकार सुखेनैव वाढत होते. जमिनीवर केणासदृश जंगली वनस्पती पसरलेली होती. त्यामुळे माती दिसतच नव्हती. चालतानाही हिरवाई तुडवतच जावे लागत होते, पण हिरवाईचा ओलसर स्पर्श अनोखी लहर अंगभर उठवीत होता. एक अद्‌भुत ओढ अंगभर दाटून होतीच. रस्त्यात 'बोरूखेडा' नावाचे आदिवासी खेडे लागले. गाव अगदी छोटेसेच होते, पण गावात हापशी होती आणि त्या हापशीवर दोन स्त्रिया पाणी भरण्याचा प्रयत्न करीत होत्या. गावाभवताल शेती होती. त्या शेतांतून गवताची मचाणं बांधली होती. दोन मजली स्वरूप असणारी ती मचाणं जंगली श्वापदांपासून संरक्षण व्हावे म्हणून दहाअकरा फुटांवर फळकूट असणारी होती. रस्त्यात जाताना एक वयस्कर आदिवासी स्त्री शेतातून घरी जाताना दिसली. विशिष्ट धाटणीची तिची डुलासारखी लोंबती नथ तिच्या आगळेपणाने लक्षात राहिली. लांब दांडीची मोत्याची नथ वेगळी तरीही आकर्षक होती.

मोहाचे, आंब्याचे डेरेदार वृक्ष घनगर्द सावली देत हिरव्याजर्द पानांनी गच्च भरलेले होते. त्यामुळे वयोवृद्ध माणसासारखे भारदस्त वाटत होते. सोमठाण्याचा एक तरुण हात दाखवून गाडीत बसला. त्याने कुठूनतरी पिशवीत भुईशेंगा आणल्या होत्या. डोंगरातील शेतीतील असल्यामुळे की काय त्या अगदीच लहानखुऱ्या, बुटक्या माणसांसारख्या होत्या. त्याने सगळ्यांना मूठ मूठ दिल्या, पण चवीला खूपच गुळचट होत्या. जवळचे दान दुसऱ्याला देणाऱ्या निसर्गाच्या कुशीत राहणाऱ्या त्या तरुणालाही निसर्गाचा हाच गुण लागला होता. जवळची वस्तू चोरून ठेवण्याच्या जमान्यात त्याचे मुक्त औदार्य सगळ्यांनाच तृप्ती देऊन गेले. त्यात कुसुंब वृक्षांची आरास थेट भरात होती. लाल, हिरव्या पानांची मिरासदारी रंग उधळीत होती. हिरव्या पार्श्वभूमीवर रंगाची ती कुसुंबी शिंपण खूपच लोभस वाटत होती. खळाळत वाहणारी वाणनदी आडवी आलीच. नशीब पाणी होते तिच्यात. नदीवर छान पूलही होता. मोठमोठे अर्जुनवृक्ष तिच्या तीरावर पाय नदीत सोडून ध्यानस्थ बसणाऱ्या नव्हे उभ्याने ध्यान करणाऱ्या साधूंसारखे खडे होते! अर्जुनवृक्षाची खोडंही तशीच होती. जणू प्रार्थनेला उभी असणारी शुभ्र कपड्यातील मुलेच!

पांढरीशुभ्र! धवल खोडांवर असणारा हिरवागच्च पर्णसंभार ही त्या वृक्षांची वेगळी श्रीमंती होती.



आम्हाला गुल्लरघाटपर्यंत जाऊन वाणनदीचा उगम बघायचा होता. वाढलेले कोकूटूचे जंगल अतिसंरक्षित असल्याचे कळले. त्या जंगलात कोणालाच प्रवेश नव्हता 'मे'मध्ये केव्हातरी प्राणिगणना करताना फक्त जाता येत होते. अतिशय घनदाट असे हे मेळघाटचे जंगल जिथे सूर्याच्या किरणालाही प्रवेश करता येत नाही आणि त्या मेळघाटातून खळाळत जाणाऱ्या नद्या म्हणजे अल्लड आदिवासी तरुणीच जणू! त्यातलीच एक नदी म्हणजे वाण! तीच आईच्या आजोळची नदी. तिची पणजी!

होय पणजीच! कारण आजोबांना आई नव्हती. आईची 'आजी' आजोबांच्या बालपणीच वारली होती. आजोबा पोहण्यात पटाईत. त्यामुळे दिवसभर नदीत पोहायचे. तिच्या अंगाखांद्यावर बागडायचे. पोहण्याच्या व्यायामामुळे त्यांचे शरीर पीळदार झाले होते. पोहण्यात तर ते इतके पटाईत झाले होते की, पद्मासन घालून पोहायचे. बराच काळ

पाण्याखाली राहू शकायचे. घरी आई नाही. वडील त्यापूर्वीच वारलेले. पोरक्या आजोबांना वाणनदीच आपली माय वाटायची. तिच्या स्पर्शातून ते आईचा स्पर्श अनुभवायचे. भाऊभावजयीच्या हाताखाली वाढलेले आजोबा मायेचा ओलावा शोधत नदीकाठी यायचे. तिच्या पाण्यात डुबकी मारायचे. त्यांचे पोरकेपण त्यातून धुतले जायचे. नदी त्यांना जवळ घ्यायची. कुरवाळायची. त्यांना डावपेच शिकवायची. त्यांचे कौतुक करायची. त्यांचे दु:ख मवाळ करायची. त्यांच्या अंगाखांद्यावरून मायेचा हात फिरवायची. त्यांना न्हाणायची. धुवायची. त्यांच्या देहभानाला गारवा द्यायची. आजोबा नदीजवळच मनातली गोष्ट सांगायचे. भाऊ-भावजय बोलले तर तिच्याजवळ येऊन दु:खभार हलका करायचे. आपले पोरकेपण हलके करायचे. त्यामुळे वाणनदी त्यांना साक्षात मायच वाटायला लागली.

पुढे आजोबांनी 'व्यायाम', 'मराठी' आणि 'गणित' या तिन्हींमध्ये खूपच प्रगती केली. ते बराच काळ मुख्याध्यापक राहिले. नंतर जनपदसभा आणि जिल्हा परिषदेमध्ये लोकप्रतिनिधी म्हणून निवडूनही आले. त्यांचे स्वत:चे असे पुरोगामी व्यक्तिमत्त्व तयार झाले. ते गांधीवादी विचारसरणीचे समाजसुधारक म्हणून प्रसिद्ध पावले. त्यांनी आपले राहते गढीवरील घर दलित मानसपुत्रास राहावयास दिले. आपली विहीर सर्व जातिधर्मीयांना खुली करून दिली. त्यांचे विचार इतके प्रखर होते की, आपले क्रियाकर्म करू नका म्हणून त्यांनी आग्रह धरला. त्यांचा दुसरा आग्रह होता, 'माझी राख गंगेत, गोदावरीत वा नर्मदेत नेऊ नका.' तर माझ्या वाणदीतच टाका. नदी लोकमाता असते पण वाणनदी माझी साक्षात माता आहे. तिच्या पाण्यावर मी वाढलो, बागडलो. तिचे पाणी पिऊनच माझा पिंड तयार झाला. तो तिलाच अर्पण करा. आम्ही अर्थातच आजोबांच्या इच्छेप्रमाणेच केले. त्यामुळे वाणनदी आमची पणजी झाली. आमच्या भावविश्वात स्थान मिळवून बसली.

आईला म्हटलं, ''चल तुझ्या आजीला व माझ्या पणजीला भेटूयात.'' मागेच वाणदीची परिक्रमा करायचे ठरविले होते. गुल्लरघाटपर्यंत गेलोही होतो, पण नदीचा उगम तेथून पाच किलोमीटर दूरवर तेही पहाडात असल्याचे कळले. पाच किलोमीटर पायी चालण्याची तेव्हा हिंमतच नव्हती. त्यामुळे कच खाल्ली. गुल्लरघाटलाही वाणनदीच वाहते. तिथे पाणी अडविल्यामुळे एक तळे तयार झाले आहे. उन्हाळ्यात जंगलातील पाणी संपलं की प्राणी याच तळ्यावर पाणी प्यायला येतात. तळ्याकाठी त्यांचे निरीक्षण करण्यासाठी मचाणही उपलब्ध आहे. हा भाग अतिसंरक्षित नसल्यामुळे खास उन्हाळ्याची वाट पाहावी लागत नाही. तर एरवीही जाता येते, पण प्राणी बहुधा उन्हाळ्यातच दृष्टीस पडत असावेत.

वाणनदीचा उगम 'सालेरा खोऱ्यात' आहे. 'तीन पत्थर'जवळ तिचे उगमस्थान आहे ही माहिती चौकशीत कळली. तळे पार केल्यावर 'हेलापाटा' लागतो. तिथे नदीचा छोटा धबधबा आहे. त्याच्या पलीकडे तीन पत्थरपासून नदी वाहते. नदीचा उगमच डोंगरातून तेही धबधब्यातून होतो. तिथपर्यंत जाणे कठीण आहे, पण आम्ही तर उगम बघायचाच असा चंग बांधला होता. 'ऋषीचे कूळ आणि नदीचे मूळ पाहू नये' म्हणतात, पण परिक्रमा करायची तर मुळापासूनच करायला हवी. त्यामुळे आम्ही इरेस पेटलो. जो तो आम्हाला जाण्यापासून परावृत्त करीत होता.

''आता तर अजिबात जाऊ नका. कारण हे जंगल अस्वलांचं जंगल आहे आणि सध्या 'रायमुनिया'ची फळं पिकल्यामुळे ती खायला अस्वलं येतात. शिवाय हा संपूर्ण रस्ता 'रायमुनिया'चाच आहे. त्यात बाईमाणसांवर तर अस्वलं आधी हल्ला करतात.'' मनात म्हटलं, ''जे होईल ते होईल. जीव गेला तरी बेहत्तर पण यावेळी नदीचा उगम सर करायचाच.''

पाय खेचणाऱ्यांना आम्ही अजिबात जुमानले नाही आणि कदम-कदम चालत का होईना पण तळे सर केले. मोठा जलाशय पाहून डोळ्यांना थंडावा मिळाला, पण मनालाही आल्हाद मिळाला. विशेष उपलब्धी म्हणजे त्या कृत्रिम तळ्यात एक चक्रवाक पक्ष्यांचे जोडपे होते. गुलाबीसर रंगाचे ते पक्षी डौलदारपणे फिरत होते. त्यांच्या जोडीला बगळेही होते. आमच्यासोबतचे काका म्हणाले, ''ह्या बगळ्यांना 'टी-टेल' बदक म्हणतात.'' अस्वलांच्या भितीमुळे आम्ही दोन आदिवासींना बरोबर घेतलेले होते. त्यांची नावे 'दारासिंग' आणि 'शाळिकराम' अशी होती. त्यांनीही अस्वलाच्या भितीपोटी सोबत कुऱ्हाडी घेतल्या होत्या. त्यापैकी दारासिंग म्हणाला, ''आम्ही त्या पाखरांना 'कुरगुंजे' म्हणतो. ते दिवसभर इथे थांबतात आणि रात्री 'वाण' धरणावर जातात.''

आईला 'राजहंसाचं लगीन' म्हणून एक लोकगीत मिळालं होतं. त्यात ह्या कुरगुंज्यांचा उल्लेख होता. ''कुरगुंज्यानं पंगत बसोली। सर्व पाखरं मिळुनि' ह्याचाच अर्थ मिळून मिसळून राहणं हा कुरगुंज्यांचा स्वभाव होता. 'एक डोंगर चढता, एक डोंगर उतरता' सारखीच रस्त्याची गत होती. नदीजवळची टेकडी चढलो. परत नदीच्या पात्रात उतरलो. पुढे नदी कोरडी होती. मोठेजात दगड तिच्या पात्रात सर्वत्र सामावले होते. काही दूर पात्रातूनच त्या दगडातून चालत गेलो. नदी जरी कोरडी होती तरी पात्रात सर्वच खेकड्यांची बिळं होती. काही खेकडेही दिसत होते. एक-दीड किलोमीटर चालल्यावर परत टेकडी चढलो. आता मात्र दाट जंगल लागले होते. चालण्यापुरतीच पाऊलवाट होती. नदीपात्रातून जमिनीवर चालताना दलदलसदृश माती होती. त्यात प्राण्यांच्या पावलांचे ठसे उमटले होते. वाघांचे, रानगव्यांचे, अस्वलांचे आणि सांबरांचे ठसे ओळखू आले. पायवाटेवरही गवत पसरले होतेच, पण इतर गवतापेक्षा उंची कमी होती इतकेच. वर सर्वत्र काळे ठिपक्यांचे विषारी कोळी घर करून

होते. कोळ्यांची घरे चांगली मोठीजात चार-पाच फूट घेर असणारी होती. रायमुनियांच्या जाळ्या पसरल्या होत्या. तर सागाची, आवळ्याची, धावड्याची आणि इतरही मोठीजात झाडं सर्वत्र ठाण मांडून होती.

आम्ही नदीकाठानेच जात असल्यामुळे अर्जुनाचे पांढऱ्या खोडांचे प्रचंड वृक्ष जागोजागी होते आणि त्यावर अस्वलांनी आपल्या नखांची नक्षी काढलेली होती. पळसवेलींचे झुले तर जागोजागी होते. जमिनीवर वाघांचे आणि अस्वलांचे नखोरे जागोजागी आढळत होते. एकप्रकारचा विशिष्ट ओलावा हवेत होता. शिवाय रायमुनियांचा उग्र दर्प त्या आर्द्रतेत मिसळला होता. त्यामुळे हवेलाही स्वाद जाणवत होता. नदीच्या पात्रातील चुकार गवत आपल्या मस्तीत वाढून लहरत होते. तर नदीकाठी कोंबड्याच्या गवताने आपले बस्तान मांडले होते. आपण बालपणी बागडलेल्या नदीचा पूर्वप्रवास इतका निसर्गरम्य असेल ह्याची मला चुकूनही कल्पना आली नाही. निसर्गाच्या श्रीमंत मांडीवर बागडणारी ती नदी मला खूपच भाग्यशाली वाटू लागली. मी वेगळ्या नावीन्याने आणि थोड्याशा असूयेने तिच्याकडे पाहत पुढचा प्रवास करू लागले.

जसजसे उगमाकडे जात होतो, तसतसा परिसर अधिकच लोभसवाणा दिसत होता. किर्र जंगल तर पसरले होतेच पण झाडं अणि वेली आपल्याच मस्तीत वाढल्यामुळे त्यांचे रानवट सौंदर्य निसर्गावर मात करीत होते. हाताच्या कवट्यात मावणार नाहीत एवढ्या बुंध्याचे वृक्ष जागोजाग होते. तर रानवेलीच्या ओंजळीत मावणार नाहीत एवढ्या जाडीचे झुले जागोजागी लोंबकळत होते. आम्ही रस्त्याच्या शोधात नदीकाठाने जात होतो. त्यामुळे रस्ता दिसला नाही की, नदीत उतरावे लागत होते. तेव्हा तिच्यातील खडकांना चुकवीत जावे लागत होते. शिवाय खडकाच्या खाली पाय जाऊ नये म्हणून दक्षता घ्यावी लागत होती कारण विंचू चावायची भीती होती. आतापर्यंत बहुतेक छोट्यामोठ्या प्राण्यांनी, जलचरांनी, सरपटणाऱ्या प्राण्यांनी दर्शन देऊन झाले होते. त्यामुळे सावधगिरी बाळगणे गरजेचे होते. तरीही जंगल उतरून नदीत आलो की सुटल्यासारखे वाटायचे. कितीही झाले तरी नदी माय होती. त्यामुळे मायच्या पदराखाली दडल्यागत जाणवायचे. आता उन्हाळा असल्यामुळे ती कोरडी होती. पण खालची जमीन ओलावा प्यायली असल्यामुळे थंडावा जाणवत होता. शिवाय कुठेकुठे अद्याप खळ्यातून पाणी साचून होते, तर कुठे बारीक धार वाहत होती, पण एकदा नदीपात्रात उतरल्यावरही तिने रस्ता अडवला कारण काठावरील मोठ्ठेजात झाड उन्मळून पडले होते. त्यामुळे क्षणभर असे वाटले, 'आमच्या कळवळ्यापोटी नदी पुढे जाऊ नका म्हणते की काय? पण आता मागे फिरणे नकोच होते. आम्ही चक्क आधी आडव्या झाडावर एकीकडून चढलो. खोडावर बसलो आणि पलीकडे उतरलो. परत चालायला लागलो. कुठे-कुठे नदी डोंगरकपारीतून वाहत होती. तेव्हा डोंगर फोडल्यागत जाणवत होते. कातीव दगडांचा कडा असल्यामुळे तिथे झाडं नव्हती, पण नवल म्हणजे ह्या दगडांच्या फटीतून छोटी-छोटी रानकेळी उगवलेली होती. काही ठिकाणी तर चक्क त्यांना केळीही लागली होती. काका म्हणाले, ''हा माकडांचा खाऊ''. हे मात्र खरे होते कारण एवढ्या सरळसोट कातीव व गुळगुळीत भिंतीसारख्या कऱ्हाडीवर माकडांशिवाय कोण चढू शकणार होते? निसर्गाला सर्वांची काळजी असते हेच खरे! पुढे नदी एकदम उतरती हेती आणि तिच्यात मोठे-मोठे अणकुचीदार खडक होते. पुन्हा चढाव चढून जंगली वाटेला लागलो कारण त्या खडकातून रस्ता तर नव्हताच पण वर चढणे वा चालणे अवघड होते.

जंगलवाटेवर असुरक्षित वाटायचे. एकंदर रस्ता असा नव्हताच पण जागोजागी रायमुनियाच्या जाळ्या होत्या. त्यामुळे भीती वाटायची, असं वाटायचं एखादं अस्वल जर त्या जाळीत दबा धरून बसलेलं असलं आणि अचानक समोर आलं तर करायचं काय? ना धावायला रस्ता ना पळायला वाट! आमच्यासमोर एक आदिवासी कुऱ्हाड घेऊन चालत होता तर मागे दुसरा! पण ते आमच्यापर्यंत पोहचेपर्यंत अस्वलांनी ओरबाडले तर करता काय? अर्जुनाच्या झाडावरील त्यांच्या नखोऱ्यांचे तर आम्ही फोटोच घेतले होते, त्यात जंगलवाटेवर कसला-कसला उग्र दर्प यायचा आणि जीव शहारायचा, पण आम्हाला वाणनदीचा उगम सर करायचा होता. त्यामुळे आमची दौड पुढेच होती.

एका ठिकाणी झुळझुळणारे पाणी दिसले परंतु नदीपात्रात उतरलो. खडकांवर टेकलो. हातपाय धुतले. पाणी प्यायलो. तरतरी आली. पात्रावर दाट सावली होती. त्यामुळे थंडगार वाटत होते. त्यात वाराही झुळझुळ वाहत होता, पण काका म्हणाले, ''चला इथे जास्त बसणे बरे नाही कारण आजूबाजूला कुठेच पाणी नाही आणि ही वेळ भर दुपारची. प्राणी पाणी प्यायला यायचे. तेव्हा त्यांच्या जागेवर थांबणे बरे नाही.'' इच्छा नव्हती तरी उठलो. प्राण्यांचे नाव काढताच अंगावर शहारे आले. पाणी जरी खडकातून वाहत असले तरी दूरवर पावलांचे ठसे दिसतच होते. उठलो आणि वेगातच पुढे चालायला लागलो. पात्रातूनच थोडे दूर गेल्यावर परत जंगलवाट पकडली. आता धाकधूक अधिक वाढली होती. आवाज न करता दबकत चालत होतो. तरी चालण्याचा आवाज होतच होता. झपाझप पुढे गेलो तेव्हा बरे वाटले. आता जंगलवाट परत नदीपात्रात उतरत होती, पण ह्या पात्रात दगड होते. पाणी कुठेच नव्हते. नदी चक्क आडवी झाल्यामुळे तिच्यातून जाण्याशिवाय पर्याय नव्हता. परत उतरलो.

थोडे दूर पात्रातच चालायला लागलो. तर चक्क दोन वेलींचे झुले समोर आले. ध्येय विसरून चक्क त्यावर झुललो. म्हटलं हीही माकडांची सोय दिसते. माकडांना पुराच्या वेळी या झुल्यामुळे थेट पाण्यापर्यंत येऊन स्वच्छ पणी पिता येते. पाण्यातून वाहणारे

काहीबाही पकडून खाताही येते पण मग वाटले, ती काठावरूनच पाणी पिऊ शकतात मग कशाला जीव धोक्यात घालतील? आमचे पथदर्शक आदिवासी म्हणाले, आता पात्रातूनच पुढे जाऊयात कारण नदीकाठावरूनच चढ आहे आणि तो चढणे बाईंना व बुढेबाला कठीण आहे, पण पात्रातही मोठे-मोठे दगड असल्यामुळे चालणे अवघड होते. दगडांवरून पाय सटकायचे. तेव्हा चक्क बांबू तोडून हातात घेतला आणि त्याची काठी आधाराला घेत चालू लागले, पण हाताला घाम येऊन तीही निसटायची. तेव्हा चक्क हातातील रूमालात काठी पकडून चालायला लागले. पात्राचे सुखही लवकरच मावळले कारण आता पात्रातही चढ लागला. त्यात मोठे मोठे दगड आणि अणकुचीदार खडक पाहून पुढे जायची हिंमत खचली, पण आदिवासी तरुण म्हणाले, ''हिंगे सम्मोरच हाये रानपाटा. अर्धाएक किलोमीटर चढावे लागेल.''

परत हिंमत गोळा केल. खडक कातीव होते. तर दगड गुळगुळीत. तरी एकमेकांना धरत धरत काठी टेकत चालायला लागलो. अर्धा किलोमीटर तर केव्हाच संपले पण रानपाटा काही येईना. दीड किलोमीटर चालल्यावर कुठे तो दिसायला लागला. म्हटलं ह्या अवघड वाटेवर जर एखादा प्राणी आला तर त्याला आयतीच शिकार गवसेल, पण आता प्राण्याने येतोच म्हटले तर मरगट्टीशिवाय इलाज नव्हता.

अर्धा किलोमीटर चक्क अवघड चढ होता. बहुधा तो धबधबाच असावा. आता सुकला होता. काठाकाठाने कसेबसे चढलो तर समोर चक्क रानपाटा! त्याला रानपाटा का म्हणतात हे लगेच लक्षात आले. खाली चक्क कातीव सपाट दगड पसरला होता. चक्क एखाद्या मोठ्या खोलीसारखा! जणू खाली ठोकून-ठाकून बसवला होता. आजूबाजूच्या किर्र जंगलात एवढा मोठ्ठाजात दगड पाहून नवल वाटत होते. भवताली जंगलाची भिंत होती. म्हणजे डोंगरकडेच होते पण त्यावर झाडी असल्यामुळे हिरवी भिंतच वाटत होती, पण ह्या कातीव दगडावर काही उगवू शकत नव्हते वा शेवाळही धरू शकत नव्हते. नजर अफाट होऊन ते दगडीवैभव न्याहाळू लागली. त्या पथदर्शक आदिवासी पुत्रांना विचारले, ''हाच वाणनदीचा उगम आहे का?' तर म्हणाले,

''नाय. नदीचा उगम डोंगरावर हाय. तीन पत्थरजवळ! ते काय इथून डोंगर दिसते. ह्या डोंगरापलीकडे सालेरा खोरा हाय. तिथे नदी उगम पावते आन् डोंगरावरून धावत धबधबा इथं हेलापाट्यावर येते.''

''पण नदी वाहती असली तर इथे पाणीच राहत असेल.''

''नायी. पूर असला तवा नायी. तं पाणी पडलं तवाच राहते पानी. नायी तं ह्या खडक तसाच रायते कोळला.'

''मंग याले हेलापाटा काऊन म्हनतेत?'' काका म्हणाले.

''आमी यथी नदीले भग देतो नाजी.'

''म्हणजे?''

''कोनी कोनी बोली बोललं का यथी कोंबडं नायी तं बळी कापतेत.''

''म्हणजे बळी देण्याची जागा?''

वाटले आपली वाण नदीही अशी कोणाकोणाच्या मनात कशी कशी रूतली आहे तर! आज तिचा उगम पाहायचा म्हणून आम्ही पहाटे चारलाच घरातून बाहेर पडलो होतो आणि दिवस उगवता रस्त्याला लागलो होतो, पण तरीही उगम गाठताच आला नव्हता कारण डोंगरावर तिचा उगम होता आणि डोंगर सरळसोट कडा असल्यागत उभा होता. आमची चालण्याची क्षमता ओळखलेल्या आदिवासींनी ठामपणे सांगितले बाई वर चढू शकत नाहीत. भरल्यापोटी चालणे होणार नाही म्हणून थोडेफार खाऊन निघालेल्या आम्हाला आता भूक लागली होती. भर दुपार झाली होती. सोबत ओझे होईल म्हणून फार काही आणले नव्हते. काकांनी उपरण्यात कागदात काही पुऱ्या बांधून आणल्या होत्या. त्या सोडताच त्यांचा वास दरवळला. त्याचीही भीती वाटली. ह्या अनोळखी वासाने परत मागावर एखादे जनावर येते की काय अशी दहशत वाटली. दोन-दोन पुऱ्या सगळ्यांनी खाऊन संपवल्या. वास थांबताच बरे वाटले. शेवटी हा सगळा वाघांचा राखीव प्रदेश होता.

वाणनदी आपली पणजी म्हणून तिची ओटी भरायला म्हणून मी सामान आणले होते. ह्या कातीव पृष्ठभागावर मध्येच खंदक खोदल्यागत खड्डा होता. काकांना म्हटले इथेच नदीची ओटी भरते. काका म्हणाले, ''कशाला ते सर्व वाया घालवला बाई! आपण उभे आहोत तेही नदीचेच पात्र आहे. इथे बाजूलाच ओटी भरा. प्राणी, पक्षी धान्य खातील. कापड वगैरे कोणी घेऊन जाईल.'' तिथेच ओटी भरली. नारळ ठेवले. काका म्हणाले, ''फोडू ते.'' मग त्याच दगडावर फोडले. छान निघाले. सगळ्यांना प्रसाद दिला. काही तिथे ठेवला. आदिवासी म्हणाले, ''चला आता. आपण संध्याकाळच्या आत पोहोचलो पाहिजे.'' तितक्यात वरच्या झाडांतून सूर्याची तिरीफ आली आणि खंदकासारख्या पाण्यात पडली. सगळे पाणी उजळून निघाले. सूर्याला व त्या उजळलेल्या पाण्याला हात जोडून आम्ही माघारी फिरलो.

''काळोख उजळण्यासाठी
जळतात जिवाने सगळे
जो वीज खुपसतो पोटी
तो एकच जलधर उजळे''

**- डॉ. प्रतिमा इंगोले**
भ्रमणध्वनी : ९८५०११७९६९


# ‘विराटभाऊ, आम्हाला गरुडमाचीचा रस्ता सांग ना!’

**वसंत वसंत लिमये**

**एक नक्की की भारतीय टीम पराभवाची मरगळ झटकून, गरुडमाचीच्या आल्हाददायक निसर्गात नवचैतन्याचा अनुभव घेऊन, विजयश्री खेचून आणण्याचा नवा उत्साह घेऊन परत निघाली होती. आम्हा साऱ्यांसाठीच हा एक आगळावेगळा अनुभव होता.**



‘कॅमल बॅक शिखर’



पुन्हा ‘कॅमल बॅक शिखर’























१. दुसऱ्या दिवशीच्या नियोजनाबद्दल चर्चा
२. सुरेंद्र आणि विराट ट्रेकला निघताना
३. सुरक्षा व्यवस्था
४. अवघड चढाईला सुरुवात
५. एकमेकां साहाय्य करू...
६. तिरंगा आणि भगवा फडकला
७. सारे शिखरावर पोचले


लाखात एक
माझा फौजी
SANTOOR
प्रस्तुत
लगिरं
झालं जी
Co-powered by
Good knight
FAST CARD
सोम-शनि
संध्या. 7 वा.
झी मराठी HD वरही पहा
Z
मराठी


शुभ दीपावली
लक्ष दिव्यांनी उजळली दिशा, घेवून नवी उमेद, नवी आशा
ही दिवाळी तुम्हास जावो सुखाची ही सदिच्छा !
दिवाळीच्या प्रकाशमय शुभेच्छा !!
NKGSB Bank
NKGSB Co-op. Bank Ltd.
Multi-State Scheduled Bank
100 YEARS
www.nkgsb-bank.com | Customer care : 022 28602000

२५ फेब्रुवारी २०१७, शनिवार संध्याकाळ, ७:५३ अशी वेळ. माझा सेलफोन वाजला. फोन माझ्या स्नेह्याचा होता. हा स्नेही म्हणजे प्रकाश वाकणकर, कॉर्पोरेट जगतातील एक मान्यवर नाव आणि त्यांची खासियत म्हणजे ते ABC आणि BBCचे क्रिकेट कॉमेंट्रेटर देखील आहेत. ''वसंत, उद्या/परवा गरुडमाची उपलब्ध आहे का?'' भारत विरुद्ध ऑस्ट्रेलिया असा सामना पुण्यात चालू आहे आणि आपली वाताहात होऊन आपण कधीही हरू शकतो इतपत मी ऐकलेलं होतं. प्रकाशच्या विचारण्याचा संदर्भ माझ्या लगेच लक्षात आला.

त्या वेळेस मी गरुडमाचीला एक मॅनेजमेंट प्रोग्रॅम करत होतो. दिवसभर मी त्यातच व्यस्त असल्यानं मला मॅचची खबर नव्हती, पण मला एकंदर अंदाज आला होता. मी पाचच मिनिटात गरुडमाची उपलब्ध असल्याची खात्री करून प्रकाशला फोन लावला.

''वसंत, आज आपण वाईट हरलो हे तुला ठाऊक असेलच! आपली टीम प्रचंड डाऊन आहे. आम्ही भारतीय क्रिकेट टीम गरुडमाचीला घेऊन यायचा विचार करतो आहोत.'' प्रकाश सांगत होता.

''तुम्ही कधी येणार आहात?''

''उद्या किंवा परवा. सकाळी येऊन संध्याकाळी परत यायचा आमचा बेत आहे.''

''तुम्ही का येताय, याची मला कल्पना आहे. तुमचा उद्देश साध्य होण्यासाठी, तुम्ही गरुडमाचीला एक रात्र तरी काढावी, असं मला वाटतं.'' मी म्हणालो.

''वसंत तू असं कर, अनिलशीच बोल.'' असं म्हणून प्रकाशने भारतीय क्रिकेट टीमचा कोच, अनिल कुंबळेकडे फोन दिला. हे अनपेक्षित असल्यानं मी जरा सावरून बसलो.

''गुड इव्हनिंग सर!'' – मी.

"Vasant, I know your organization. You know, we want to cheer-up the team. I will take your advice. We have only two conditions - No spicy, oily food and this trip needs to remain completely Incognito!" अनिल कुंबळेनी सोप्या शब्दात एक मोठी जबाबदारी आमच्यावर टाकली होती.

दुसऱ्याच दिवशी सकाळी पुण्यातील हिंजेवाडी येथे 'गेटवे' हॉटेलमधे 'हाय प्लेसेस'तर्फे, आमच्यापैकी कुणीतरी या एक दिवसीय कार्यक्रमाच्या नियोजनासाठी मीटिंगला जाणं गरजेचं होतं. अनिल कुंबळेसह या मीटिंगला प्रकाश आणि सुप्रसिद्ध क्रिकेट पत्रकार सुनंदन लेले हजर असणार होते. हा साराच प्रकार अनपेक्षित होता. भारतीय क्रिकेट टीमसाठी, टीमचा उत्साह वाढवण्यासाठी – हा एक वेगळ्या प्रकारचा मॅनेजमेंट डेव्हलपमेंट प्रोग्राम होता. ऑस्ट्रेलियाबरोबरच्या सिरीजमधील पहिल्याच पाच दिवसीय सामन्यात, तिसऱ्याच दिवशी भारतीय संघाच्या पदरी दारुण पराभवाची नामुष्की आली होती. आपल्या संघाचं मनोबल वाढवण्यासाठी असा कार्यक्रम करण्याची आमच्यावर आलेली जबाबदारी अभिमानास्पद होती, पण त्याचबरोबर प्रचंड जबाबदारीचं ओझं होतं.

दुसऱ्या महायुद्धाच्या सुरुवातीस शारीरिक कणखरपणा आणि व्यवस्थापन कौशल्य विकास यासाठी साहस आणि निसर्ग यांचा एक माध्यम म्हणून सर्व प्रथम वापर करण्यात आला. 'हाय प्लेसेस' ही संस्था १९८९ सालापासून कॉर्पोरेट जगतातील व्यवस्थापक आणि कर्मचाऱ्यांसाठी या माध्यमाचा वापर करून, Team Building आणि Leadership Development Ago OMDP (Outdoor Managemant Developement Programme) आयोजित करते आहे. हाय प्लेसेस तर्फे, वर्षात दोन-तीन कार्यक्रम अशी सुरुवात करून आजकाल सातशेहून अधिक कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. पुण्याच्या पश्चिमेला मुळशी तालुक्यात, ताम्हिणी घाटाच्या माथ्यावर, 'हाय प्लेसेस'चं 'गरुडमाची' हे प्रशिक्षण केंद्र २००४ सालापासून कार्यरत आहे. एका वेळेस दोनशे प्रशिक्षार्थी राहू शकतील, अशी व्यवस्था या केंद्रात आहे.

रात्रीचे ९ वाजून गेले होते. मी तातडीनं माझा ज्येष्ठ सहकारी मिलिंद कीर्तने याला फोन लावला. मिलिंद आणि सुरेंद्र अहमदाबाद रोडवरील वाडा येथे प्रशिक्षण कार्यक्रम आटोपून पुण्याकडे निघाले होते. कुठेही वाच्यता न करण्याची अट घालून मी थोडक्यात मिलिंदला 'क्रिकेट टीम प्रोग्राम'बद्दल सांगितलं. ''वाटेत कुठेही वेळ न दवडता तातडीनं पुणं गाठा!'' अशी सक्त ताकीदही दिली. पुढील पाऊण तास सेलफोनला क्षणभराचीही उसंत मिळाली नाही. कॉर्पोरेट जगतातील अनेक मान्यवर वरिष्ठ अधिकारी यापूर्वी अशा कार्यक्रमांना येऊन गेलेले असल्यानं अशा कार्यक्रमाची आम्हाला सवय होती. परंतु क्रिकेट टीम आणि गुप्तता हे नवीनच आव्हान होतं. दुसऱ्या दिवशी सकाळी मिलिंद आणि पहिला मराठी एव्हरेस्टवीर सुरेंद्र चव्हाण यांनी मीटिंगला जावं, असं ठरलं. सुरेंद्र या कार्यक्रमाचं सूत्रसंचालन करणार होता, तर मिलिंद इतर सर्व व्यवस्थांचं आयोजन करणार असंही ठरलं.

रविवारी सकाळी बरोब्बर ८ वाजता, सोबत प्रेझेन्टेशन घेऊन मिलिंद आणि सुरेंद्र हिंजेवाडी येथे 'गेटवे' हॉटेलमध्ये पोचले. विराट कोहली, अनिल कुंबळे यांच्यासह प्रकाश वाकणकर आणि सुनंदन लेले हेदेखील उपस्थित होते. सुनंदन आणि प्रकाशनं 'हाय

प्लेसेस'च्या विश्वासार्हतेबद्दल ग्वाही दिल्याकारणानं आमचं काम सुकर झालं होतं. कार्यक्रमाची रूपरेषा, खाण्यापिण्याची व्यवस्था याबद्दल सविस्तर चर्चा झाली. सुरक्षा आणि कुठलाही शारीरिक अपाय न होण्याबद्दल अनिल कुंबळे यांचा विशेष कटाक्ष होता. संपूर्ण क्रिकेट टीम, दोघा खेळाडूंच्या बायका आणि इतर सर्व सपोर्ट टीम असे सारे मिळून २६ जण त्या दुपारी तीन वाजता निघणार असं ठरलं. ९ वाजता माझा फोन वाजला. ''प्रोग्राम सेट आहे. टीम पाच वाजेपर्यंत पोहोचेल.'' मिलिंदनं त्रोटक शब्दात सांगितलं. सारेच आता एखाद्या मिलिटरी ऑपरेशनप्रमाणे कामाला लागले होते. साऱ्या वातावरणात उत्साह भरला होता. It was Electric!

आदल्या रात्रीपासून 'हाय प्लेसेस'मधे मोजक्याच मंडळींना 'क्रिकेट टीम' येतेय हे ठाऊक होतं. या कार्यक्रमासाठी लागणाऱ्या आउटडोअर एक्स्पर्ट्सना VVIP प्रोग्राम आहे एवढंच कळलं होतं. सोबत मिलिंद किंवा अमोल पेंडसेचा निरोप होता, ''फोन मिळताच गरुडमाचीला दोन तासात पोहोचा!'' गरुडमाचीवर एव्हाना उत्सुकता भलतीच ताणली गेली होती. 'मोदी येणार आहेत', अशी अफवादेखील पसरली होती. गरुडमाचीला एकीकडे माझा स्वतंत्र ट्रेनिंग प्रोग्राम सुरू होता. तो सांभाळून, मी तिथला व्यवस्थापक - संतोष शहासने, सिक्युरीटी हेड - प्रवीण सावंत आणि इतर महत्त्वाचे चौघं अशांची मिटिंग बोलवली. कार्यक्रमाचं महत्त्व आणि गांभीर्य समजावून सांगितलं. मग एकेकाच्या हाताखालील कर्मचाऱ्यांचे गट दोन-दोन मिनिटांसाठी भेटून गेले. बिनचूक काम, कुठेही पुढे-पुढे न करता तत्पर सेवा आणि कटाक्षानं पाळायची गुप्तता असे मुद्दे अतिशय गांभीर्यानं साऱ्यांचाच मनावर ठसवले. कार्यक्रम यशस्वी होण्यात आणि 'हाय प्लेसेस'च्या सन्मानाला गालबोट न लागण्यात, प्रत्येकाचा महत्त्वाचा सहभाग असणार आहे असं भावनिक आवाहनदेखील केलं. मागे वळून पाहताना या छोट्या गोष्टीदेखील खूप मोलाच्या असतात, हे लक्षात येतं.

दुपारी दोन वाजता राहुल पातुरकर क्रिकेट टीमला रिसीव्ह करण्यासाठी निघाला. राहुलनं हॉटेलच्या परिसरात तीन-चार किलोमीटर फेरफटका मारून, मोठ्या कोचला वाटेत कुठेही अडथळा न येता कसं जाता येईल, याची पाहणी केली. त्या दिवशी गावातील स्थानिक बाजार कसा चुकवता येईल, याचीही त्यानं खात्री केली. 'गेटवे' हॉटेलला पोचताच त्यानं टीमचा सिक्युरिटी हेड - जयराज याच्याशी संपर्क साधला. ठरल्या वेळेआधी बरोबर पाच मिनिटं असताना सारी टीम हॉटेलच्या लॉबीत हजर होती. अनिल कुंबळे आणि विराट कोहली राहुलला भेटले. उत्साही, आगाऊ चाहत्यांचा ससेमिरा चुकवण्यासाठी कोचसोबत पोलीस एस्कॉर्ट मुद्दाम घेतला नव्हता. कोचच्या मागे मिलिंद आमच्या बोलेरो' गाडीत एस्कॉर्ट म्हणून येत होता. असं असूनही पिरंगुटच्या घाटात, 'यड्या, विराट दिसतोय!' असं म्हणत एक बुलेटस्वार चाहता कोचच्या मागे लागला होता. सेलेब्रिटी पाहताच अनेक जणं वेडेपिसे होतात. त्यांनाही खाजगी आयुष्य असतं, याचा विसर पडून सेलेब्रिटींच्या मागं लागणं सहजपणे घडतं. ही एक विचित्र विकृती आहे, हे सहसा लक्षातही येत नाही. राहुलला आदल्या रात्री दहा वाजता अमोलचा फोन आला होता. थक्क होणे, इतके सेलेब्रिटीज एकत्र भेटणे, त्यांच्याबरोबर पूर्ण दिवस कार्यक्रमात सहभागी होता येणे; अशा सर्व गोष्टींनी भांबावून गेलेल्या राहुलची, क्रिकेट टीमचं नीटपणानं स्वागत करून सुखरूप गरुडमाचीला घेऊन येणे यात त्या दिवशी कसोटी लागणार होती.

वाटेत वळणा-वळणाच्या रस्त्यामुळे रविचन्द्रन अश्विनला थोडा त्रास झाला. त्यामुळे त्याला 'बोलेरो'त घेऊन मिलिंद संध्याकाळी पाचच्या सुमारास माचीला पोचला. गाडीतून बाहेर पडून आळोखे-पिळोखे देत अश्विन म्हणाला, "Oh, what a place!"

आमची सारी मंडळी तयारीतच होती. मागोमाग बाकी सारी क्रिकेट टीम गरुडमाचीला पोचली. संतोष आणि मी पुढे झालो. अनिल, विराट अशा सर्वांचं यथासांग स्वागत केलं. लगेच सर्वांना आपापल्या रूम्स दाखवण्यात आल्या. खेळीमेळीच्या वातावरणात सारे सेटल झाले. आमच्या साऱ्याच मंडळींना टीममधील प्रत्येकजण 'सर' म्हणून आदबशीरपणे संबोधत होता. आम्हा साऱ्यांनाच हे नवीन होतं. सहसा माचीला येणारा पाहुणा व्यवस्थेतील माणसांना गृहीत धरून चालतो, त्यांच्याकडे त्याचं बऱ्याचदा लक्षही जात नाही. क्रिकेट टीमने मात्र नमनालाच आमच्या मंडळींचं मन जिंकून घेतलं होतं.

सारं आवरून अर्ध्या तासात सारी टीम डायनिंग हॉलमध्ये हजर होती. सुरेन्द्रने मग सूत्रं हातात घेतली. सर्व प्रथम इतर सहकाऱ्यांच्या मदतीनं सुरेन्द्रने साऱ्या २६ जणांना Orienteering म्हणजेच 'दिशाशोध-दिशावेध' हे तंत्र शिकवलं. नकाशा आणि होकायंत्राच्या सहाय्यानं अनोळखी असमंतातही अचूकपणे खुणेच्या जागा कशा शोधायच्या' हे सांगणारं हे तंत्र! नवीन काही शिकतांना साऱ्याच टीमचा उत्साह, चौकसपणा आणि आज्ञाधारकपणा वाखाणण्यासारखा होता. हे आटोपताच सारेजण 'वॉर्म अप' ग्राउंडकडे सूर्यास्त पाहण्यासाठी निघाले. गरुडमाची दक्षिणोत्तर पसरलेली आहे. पश्चिमेकडे पसरलेल्या दरीच्या माथ्यावर असलेल्या पठाराचं नाव - 'वॉर्म अप ग्राउंड'. इथून कोकणाचं विहंगम दर्शन आणि देखणा सूर्यास्त दिसतो. सूर्यास्ताच्या पार्श्वभूमीवर हास्यविनोद, गरमागरम सामोसे आणि वाफाळता चहा अशी धमाल होती. सातच्या सुमारास अंधारून येऊ लागलं. सारी टीम डायनिंग हॉलमधे परतली. तिथे सुरेन्द्रने गंभीर आवाजात 'ट्रेझर हंट'ची रूपरेषा सांगितली. सारे शांतपणे मोठ्या उत्कंठेनं ऐकत होते. आता रात्रीच्या अंधारात एका साहसी उपक्रमाची सुरवात होणार होती.

नेहमीप्रमाणे ही 'ट्रेझर हंट' स्पर्धात्मक नसून २६ जणांच्या चार टीम्स करण्यात आल्या. प्रत्येक टीमला अनोळखी प्रदेशात, रात्रीच्या अंधारात होकायंत्राच्या सहाय्याने पाच खुणेच्या जागांवरील

छोट्या प्लॅस्टीकच्या पिशव्यातील माहिती गोळा करायची होती. सर्वात महत्त्वाचं म्हणजे चारी टीमना एकत्र येऊन, रहस्याचा उलगडा करून खजिना मिळवायचा होता. रात्री साडेआठच्या सुमारास प्रचंड उत्साहात टॉर्चेस, काठ्या आणि होकायंत्रं घेऊन चारी टीम दोन किमी अंतरावरील जंगलात शिरल्या. आर्थात आमचा एकेक आउटडोअर एक्स्पर्ट प्रत्येक टीम बरोबर होता. चारपैकी एका टीममध्ये विराट आणि उमेश यादव होते. शोधाशोध करतांना अचानक उमेश यादवच्या बुटात बाभळीचा काटा रुतला. 'ओय!' म्हणत उमेश खाली बसला. आमचा आउटडोअर एक्स्पर्ट सूरज मानकर पटकन पुढे होऊन त्याला मदत करू लागला. त्याचा बूट काढून काटा काढण्याची खटपट सुरु झाली. विराट बऱ्याच अंतरावर पुढे होता. मागे काहीतरी गडबड झाली हे लक्षात येताच विराट धावत उमेशपाशी आला. विराटनं पटकन बुटात हात घालून काटा सैल केला. सूरजचे दुसरीकडून प्रयत्न चालूच होते, अखेर त्यानं काटा उपटून बाहेर काढला. लगेच 'चलो, चलो!' असं म्हणत विराटनं टीमला प्रोत्साहित केलं. आपल्या सदस्यासाठी मदतीसाठी तत्परतेनं धावून येणं, हे चांगल्या नेतृत्वाचं लक्षण आहे आणि म्हणूनच मग टीम तुमच्यासाठी जीव टाकते!



के. एल. राहुल, विराट आणि 'हाय प्लेसेस' टीम

संतोष 'ट्रेझर हंट' व्यवस्थित चालली आहे याची खात्री करण्यासाठी चौफेर फिरत चारही टीमवर लक्ष ठेवून होता. मधेच एक टीम एकाच ठिकाणी खोळंबल्यासारखी दिसली. एखाद्या घारीप्रमाणे संतोष तेथे पोचला. त्या टीमची तिसरी प्लास्टिकची पिशवी सापडत नव्हती. त्या टीमसोबत आउटडोअर एक्स्पर्ट म्हणून पंचम होता. त्याच्याकडे चौकशी केल्यावर लक्षात आलं की जागा योग्य होती, पण पिशवी गायब झाली होती. संतोषनं टीमला विचारलं, तुमच्या मते करेक्ट जागा कुठली? टीमने योग्य जागा दाखवताच, पिशवी गायब झाल्याचं सांगून पुढील पिशवीच्या खुणा टीमच्या हवाली केल्या आणि त्यांचा पुढील शोध सुरु झाला. कितीही तयारी, व्यवस्था केली तरी निसर्गात एक अनिश्चितता अटळ असते. अशा वेळेस भांबावून न जाता निर्णय घेणे गरजेचे असते. खोळंबा, चिडचिड न होता संतोषच्या निर्णयक्षमतेमुळे पुढील मार्ग सुकर झाला होता. अमावास्येच्या रात्री असंख्य तारकांनी लखलखणारं आकाश, एकीकडे उत्साहाने होणारा शोध तर दुसरीकडे अवखळपणा, अशी धमाल करत सारे भारतीय क्रिकेटवीर लहान मुलांप्रमाणे 'ट्रेझर हंट'मधे रमले होते. निरभ्र आकाशाखाली पराभवाचं मळभ दूर झाल्यासारखं भासलं. साडेनऊपर्यंत साऱ्या पिशव्या सापडल्या होत्या, रहस्याचा उलगडा झाला होता. खजिना म्हणजेच साऱ्यांसाठी 'हाय प्लेसेस'चे टी-शर्ट मिळाले! पहिला दिवस बिनबोभाट पार पडला होता.

साऱ्यांसाठी तरण-तलावाशेजारी जेवणाची व्यवस्था केली होती. दुसऱ्या दिवशी मोठी आव्हानकारक ट्रेकिंग मोहीम असणार होती! सुरेंद्र साऱ्यांना ट्रेकची माहिती देत होता. एक गंमत झाली! कॉर्पोरेट मंडळींची सवय असल्याने, इतर माहिती देता-देता सुरेंद्र म्हणाला, ''सुबह जल्दी निकलना होगा, ट्रेक मुश्कील है। देर हुई तो धूपसे बडी मुश्कील होगी!'' दिवस-दिवस उन्हात खेळणाऱ्या क्रिकेटपटूंना हसू आवरलं नाही. 'सॉरी' असं म्हणत सुरेंद्रनी हसतहसत सावरून घेतलं. चेष्टा मस्करी करत, डम्ब शेराज-पत्ते यांसारखे खेळ खेळत, ११ वाजेपर्यंत सारे शहाण्या मुलांप्रमाणे झोपायला निघून गेले.

सोमवार सकाळ, नाश्ता करून बरोब्बर साडेसातला निघण्याचा बेत होता. बहुतेक सदस्य साडेपाचलाच उठून, आपापले व्यायाम करून सात पंचवीसला तयार होते. साऱ्याच टीमची शिस्तप्रियता लक्षणीय होती. गरुडमाचीच्या उत्तरेस 'कॅमल बॅक' नावाचा, बसलेल्या उंटागत दिसणारा १००० फूट उंचीचा सुळका आहे. सुरुवातीची जंगलातील सोपी वाट सुमारे ४०० फुटावरील खिंडीत पोचते. इथूनच उत्तरेकडे चढत जाणाऱ्या धारेवर, तीन टप्पे पार केल्यावर आपण शिखरावर पोचतो. वाट चिंचोळी आणि त्यात दोन्हीकडे खोल खाई आहे. पहाटेच राहुल, अनिश आणि ऋषी अशा आउटडोअर एक्स्पर्ट्सनी खिंडीपासून शिखरापर्यंत दोर लावला होता. दर १०० फुटांवर ठोकलेल्या मेखांच्या मदतीनं हे दोर लावण्यात आले होते. २६ जणांच्या टीममध्ये अजिंक्य आणि उमेश हे सपत्नीक आले होते. त्या दोघीही ट्रेकला जाण्यास आढेवेढे घेत होत्या. लगेच विराट, जडेजा आणि आमची मंडळी पुढे सरसावली. ''कुछ नही होगा, हम है ना!'' असं म्हणत त्या दोघींनाही तयार केलं आणि दोघी निघाल्यादेखील!

सगळीजणं अर्ध्या तासातच खिंडीत पोचली. तिथे प्रत्येकाला हार्नेस घालण्यात आली. सुरक्षिततेसाठी प्रत्येकाच्या हार्नेसला लावलेल्या स्लिंगमधील कडी चढाईपूर्वी फिक्स रोपमध्ये अडकवण्याची सक्ती करण्यात आली होती. सारेच टीम मेंबर्स अत्यंत फिट होते. त्या दिवशी अनिल कुंबळे विशेष काळजीत होते. उत्साहाच्या भरात कुणाचा पाय जरी मुरगळला तरी पंचाईत झाली असती. कुंबळे यांनी दोन-तीनदा तसं बोलूनही दाखवलं. विराट मोठ्या उत्साहात टणाटण चढून जात होता. आमचा राहुल त्याच्या सोबत होता. दोघंही एका ठोकलेल्या मेखेपाशी पोचले. इथे मागील दोरातून कडी काढून, पुढील दोर हातात घेऊन त्यात कडी अडकवायची अशी पद्धत असते. पुढील चढाकडे पाहात खट्याळपणे विराट म्हणाला, ''अरे यार, अब तो आसान है! मुझे नही चाहिये यह रोप!'' राहुल पटकन पुढे होऊन म्हणाला, ''नहीं सर, सेफ्टी के लिए यह करना पडेगा!'' ''छोडो यार'', असं म्हणत विराट पुढे जाण्यासाठी सरसावला. राहुलने बाजीप्रभूच्या आवेशात विराटची वाट अडवली. धीर एकवटून राहुल म्हणाला, ''नही सर, मै आपको आगे नही जाने दूंगा!'' वाद न घालता विराट कडी रोपमध्ये अडकवून, ''ठीक है यार'' असं म्हणत, हसत पुढे निघाला. थोड्याच अंतरावर १५ फूट उंचीची खडकावरील चढाई होती. हिमालयातील आयबेक्स (Ibex) या बकरीप्रमाणे विराट लीलया चढून वर पोचला. त्याच्या मागेच अजिंक्यची पत्नी राधिका चढून येत होती. तिला चढाई अवघड जात असल्याचं लक्षात येताच, पुढे गेलेला विराट मागे येऊन तिला मदत करू लागला. तारुण्यातील सळसळता उत्साह आणि जबाबदारी यांचा ऊन-पावसाचा खेळ मोठा मजेशीर होता.

साडेनऊपर्यंत सारे 'कॅमल बॅक' शिखरावर पोचले होते. तिरंगा आणि भगवा फडकला. ट्रेक छोटा असला तरी धारेवरील खड्या चढाईमुळे अवघड होता. थंडगार वारा आणि चोहोबाजूस पसरलेल्या सह्याद्रीच्या रांगांचं विहंगम दृश्य मोठं रमणीय होतं. विजयाचा आनंद साऱ्यांच्याच चेहेऱ्यावर होता. सफरचंद आणि सरबताचा आस्वाद घेता घेता मुरली विजय सहजच म्हणाला, ''विदाउट टेन्शन बहुत मजा आ रहा है!''

सुमारे अर्धा तास शिखरावर काढून हसत-खेळत सारे खाली परत निघाले. उतरतानादेखील आउटडोअर एक्स्पर्ट विशेष काळजी घेत होते. अशा वेळेसच अपघात होतात म्हणून ही खबरदारी घेणं, हा त्यांच्या ट्रेनिंग आणि अनुभवाचा भाग होता. साडेदहा वाजेपर्यंत सारी टीम सुखरूपपणे गरुडमाचीस पोचली. मनातल्या मनात एक मोठ्ठी जबाबदारी संपल्याचा राहुलनं निश्वास टाकला!

थोडा वेळ आराम, मग जेवण आणि आवाराआवर करून क्रिकेट टीम दुपारी दोन पर्यंत निघण्यासाठी तयार झाली. साऱ्या दिवसभरात येताजाता सेल्फी/फोटो काढायचे नाहीत असा अलिखित करार सगळ्यांनीच पाळला होता. विराटनं एक फोटो सोशल मिडियावर टाकला आणि त्यावर अनेक प्रतिक्रिया उमटल्या. प्रसार माध्यमातील काही कावळ्यांनी 'ऑस्ट्रेलियाचे खेळाडू सराव करताहेत तर भारतीय टीम सह्याद्रीत मजा मारतेय' अशी करकरही केली. एक नक्की की भारतीय टीम पराभवाची मरगळ झटकून, गरुडमाचीच्या आल्हाददायक निसर्गात नवचैतन्याचा अनुभव घेऊन, विजयश्री खेचून आणण्याचा नवा उत्साह घेऊन परत निघाली होती. आम्हा साऱ्यांसाठीच हा एक आगळावेगळा अनुभव होता.

सिनेमा, प्रसारमाध्यमं यांमुळे 'सेलेब्रिटी क्रिकेटपटू' याबद्दल एक विचित्र प्रतिमा मनात होती. बढाईखोर, लहरी, माजुर्डे आणि स्वतःतच मशगुल अशी विशेषणं समोर होती. केवळ चोवीस तासांच्या अनुभवानंतर एक संपूर्ण वेगळी प्रतिमा आमच्या मनावर ठसली होती. होकायंत्राबद्दल राहुलला अनेक प्रश्न विचारणारा अश्विन, गरुडमाचीतील सर्वांना 'सर' म्हणून संबोधणारे क्रिकेटपटू, शिस्तप्रिय आदबशीर वागणूक, आपल्याच टीममेंबरच्या मदतीसाठी धावून जाण्याची तत्परता, 'इथे कॉलेजचे मस्त दिवस आठवले!' म्हणणारा विराट, हसतखेळत एकमेकांची थट्टामस्करी करणारे खेळाडू - अशी क्षणचित्रे खूप मोहक वाटतात. लहान वयात भरपूर पैसा, प्रसिद्धी लाभलेल्या या तरुण खेळाडूंना क्रिकेट सोडून इतर कशातही रस घेण्याचं स्वातंत्र्य लाभत नाही. तसं पाहिलं तर, हे वलयांकित आयुष्य काही वर्षांसाठीच, मर्यादित काळासाठी असणार आहे हे समजण्याची परिपक्वता फारच थोड्यांकडे असते, परंतु धुंदी आणणारं हे वलय डोक्यात जाऊ शकतं. हे सारं असूनही आम्हाला भेटलेली 'भारतीय क्रिकेट टीम' अपवादात्मकरित्या खूप वेगळी होती.

या एक दिवसीय कार्यक्रमात सुरेंद्र, मिलिंद, संतोष, राहुल आणि आमचे 'हाय प्लेसेस'मधील सारेच सहकारी यांनी अतोनात मेहनत केली होती. अतिशय थोडक्या वेळात केलेलं नियोजन, चोवीस तासांतील सर्व व्यवस्था आणि तपशिलांचं बिनचूक नियोजन, कसोशीनं पाळलेली गुप्तता, कटाक्षानं राखलेली सुरक्षितता आणि यथासांग यशस्वीपणे पार पडलेला उपक्रम आम्हा सर्वांनाच खूप काही शिकवून गेला. सीमेवरील युद्ध, क्रिकेट सामना आपल्या राष्ट्रप्रेमाला नकळत साद घालतो. पुण्यातील पराभवानंतर, एक ड्रॉ आणि दोन विजय यांसह क्रिकेट टीमने 'गावस्कर-बोर्डर चषक' जिंकून आणला. या यशातील आमचा खारीचा वाटा निश्चितच अभिमानास्पद आहे. या पलीकडे जाऊन आम्हाला एक निखळ आनंद दिल्याबद्दल आम्ही 'भारतीय क्रिकेट टीम'चे नेहमीच ऋणी राहू.

मंगळवार, २८ फेब्रुवारी २०१७. त्या संध्याकाळी सोशल मिडियावर एक गंमतीशीर मेसेज व्हायरल झाला होता - 'विराटभाऊ, आम्हाला गरुडमाचीचा रस्ता सांगा ना!'

**- वसंत वसंत लिमये**
भ्रमणध्वनी : ९८२२१९०६४४
vasantlimaye@gmail.com

# रूपजीविनी

स्मिता भागवत

**मुजफ्फर नगरातील या स्त्रियांनी छेडलेले आंदोलन यशस्वी झाले. या आंदोलनाच्या यशाचे कौतुक करावे की देशास स्वातंत्र्य मिळून इतकी वर्षे लोटली तरी पुरुषांच्या स्वैराचारावर अंकुश लादणे जमलेले नाही याची शरम बाळगावी हा प्रश्न यक्षप्रश्नाहून जटिल!**

---

निवडणूक जवळ आली की शिक्षकांना जनगणनेचे काम सोपवतात नि त्यासाठी तयार केलेल्या फॉर्मवर नागरिकाचे नाव, वय, जात, व्यवसाय, इत्यादी माहिती भरण्याचे कॉलम असतात हे सारेच जाणतात! शलाका बिहारला शिक्षिकेचे काम करत असे. तिला मुजफ्फर नगरात जनगणनेचे काम देण्यात आले. ही केवळ स्त्रियांची वस्ती! शलाकास पाहून बऱ्याच स्त्रिया तिच्या भोवती जमल्या. पहिल्या खोलीत राहणाऱ्या बीनापासून तिने फॉर्म भरण्यास सुरुवात केली. नाव, वय, जात आणि पत्ता नमूद करून तिने बीनास व्यवसाय विचारला. बीनाने सांगितलेला व्यवसाय फॉर्मवर नव्हता. शलाकाने पुन्हा व्यवसायाचे सदर तपासले. त्यात भिकारी शब्द होता. विषय संपवण्यासाठी तिने बीनाच्या नावापुढे 'भिकारी' लिहिलेले पाहून उपस्थित स्त्रियांच्या नजरेत ठिणगी चेतली. बीना करवादली, ''हममेंसे किसीने न कभी भीख मांगी है, ना मांगनेकी सोचेंगे। हम नेकीसे हमारा काम करते है। फिरभी गर हमारे हुस्नके तलबगार हमे भिखारी कहे, तो हम ये जास्ती नहीं सहेंगे!'' माहिती लिहिणारा हात थबकला. झाले असे की....

मुजफ्फरनगर बिहारचा रेड लाईट एरिया असल्याने शिक्षकाऐवजी तो शिक्षिकेस सोपवलेला! तिथल्या तवायफ नि वेश्यांनी आपण भिकारी नाही, हे ठणकावून सांगून आंदोलनाचे आव्हान दिले. वास्तविक शलाका गेली तेव्हा रात्रभर 'काम' करून साऱ्या थकल्या होत्या. तरी तिला हेलपाटा पडू नये, यासाठी त्यांनी तिला काम करण्यास होकार देऊन सहकारच दिला होता, पण तिने व्यवसायाच्या सदरात भिकारी लिहिताच त्या संतापल्या. रागाने लाल झालेली देखणी पिंकी, (यांची नावे खरी नसतात) छद्मी स्वरात म्हणाली, ''ये जरूर कोई संगदिलकी फितरत है। उनके चेहेरे रातके अंधेरेमें दिनके उजालेसे अलग होते है। अंधेरेमें हमसे हुस्नकी भीख मांगकर कदमबोसी करनेवाले कंबख्त, दिनके उजालेमें ऐसे पेश आते है, जैसे हमे पहलीबार देखा हो।''

दचकलेल्या शलाकाने पिंकीकडे बघितले. दुःख दडवण्याच्या प्रयत्नात तिने मान फिरवली होती. शलाकास अश्रू दिसले नसूनही तिच्या काळजात वेदना दाटली. वर्तनात सहानुभूतीही! या संवेदनशील स्त्रियांनी ती डोळस नजरेने टिपली. नकळत त्या बोलू लागल्या....

''हम नहीं जाते उन्हे बुलाने! वही हमारी दहलीजपर सुकूनकी भीख मांगने आते है। हमारे सीनेमेंभी माँ, बहन और बेटीका दिल है! हम इन जरुरतमंद बेचैन लोगोंपर ममता लुटाते है। हम सुकून देनेवाले दाता है। भिखारी नहीं।'' रीना उसळली.

मुजफ्फर नगरातील स्त्रियांना 'गुडिया' म्हणतात. मन रिझवणारी बाहुली हा परिचय पसंत नसूनही त्यांनी परिस्थितीशी तडजोड करून तो स्वीकारला आहे, पण या बाहुल्यांना भिकारी म्हणवणे मंजूर नसल्याने त्यांच्या मनातले दडपलेले कढ उतू जाऊ लागले. त्यात या सर्व स्त्रियांची कॅटॅगरीही एक नसल्याचे कळलेली शलाका शहारली. तोवर तिला तवायफ नि वेश्या सामनार्थी शब्द


वाटत. इथे कळले की तवायफ नाच-गाण्यावर पोट भरते पण देहविक्रय करत नाही. देहविक्रयाचे काम करतात त्या वेश्या, पण त्या साऱ्यांनी एकमुखाने 'भिकारी' शब्दाला विरोध केला. हा व्यवसाय कुणी स्वखुशीने पत्करलेला नाही, असे त्या कळवळून म्हणाल्या. बंडाचे निशाण रोवणाऱ्या सर्व स्त्रियांना शलाकाची संवेदनशीलता जाणवली म्हणून जिवाभावाच्या सखीजवळ मोकळे व्हावे तशी त्यांनी व्यथा-वेदनेस वाचा फोडली.

''श्रीमंत नसलो तरी सुखी होतो आम्ही! माझं नाव शलाका! एका शलाकानं मला भिकारी ठरवणं नाही सहन झालं मला!''... देखण्या पिंकीच्या ओठी दुर्दैवाचे दशावतार अवतरले.

''मी एकुलती एक! वडिलांना माझ्या सौंदर्याचं कौतुक! ते पांढऱ्या घोड्यावरून येणाऱ्या राजकुमाराची कथा सांगत. मलाही राजकुमार येईल नि तो मला राणी करील, असे वाटे. तारुण्यात पदार्पण करत असताना मला पुढच्या वर्गात शिकणारा गोरागोमटा मुलगा स्वप्नीचा राजकुमार वाटू लागला. बारावीची परीक्षा झाली नि माझ्यासाठी वरसंशोधन सुरू झाले. मी लाजत माझी निवड सांगितली. लगेच वडिलांनी तपास सुरू केला. धनवंत कुटुंबातील हा मुलगा आदल्या वर्षी बारावी पास झाला होता. त्यांचा प्रशस्त बंगला! आहुजा ब्रदर्स नावाच्या रेडीमेड गारमेंट्सच्या आलिशान दुकानाचे ते मालक! मुलाने दुकानात काका आणि पित्याच्या मार्गदर्शनाखाली काम सुरू केले होते. काकांचा मुलगा मेडिकलला. भविष्यात दुकानाचा वाटेकरी होणार नसलेला! मुलीचा सुखी संसार! मोठे लोक दाबून हुंडा मागण्याच्या भयप्रद शक्यतेसोबत, लेकीचे देखणेपण जमेस धरून ते अती लोभ न धरण्याची शक्यताही पित्यास जाणवली नि ते मुलाच्या घरी गेले. त्यांचा अंदाज खरा ठरला. आमची 'झट मंगनी नि पट शादी' झाली. खर्च फार झाला तरी वडिलांच्या नोकरीची बरीच वर्षे बाकी होती. मनात लेक स्वप्नीच्या राजकुमारास अर्पण केल्याचे समाधान होते! पण...

पहिल्या रात्री नवऱ्याने त्याचे परजातीच्या मुलीवर प्रेम असल्याचे सांगितले. तरी पत्नीस देहासकट काहीही कमी पडू देणार नाही, असेही तो म्हणाला. दोघींना राजी ठेवण्याची खात्री देताना त्याने द्विभार्या प्रतिबंधक कायदा येण्यापूर्वीच्या काळाकडे बोट दाखवले. धक्का अनपेक्षित असला तरी मी 'आप भला तो जग भला', या उक्तीवर विश्वासून होते. माझे प्रेम त्यास जाणवेल, या श्रद्धेनिशी मी संसार करू लागले. सासू-सासरे, आल्यागेल्यांचे नीट करणारी लाडकी सून झाले. नवऱ्याच्या वागण्यात बोट ठेवायला जागी नव्हती. तो गृहस्थधर्म पाळतो, यात मी समाधान मानत असे.

पुढे मला मुलगी झाली. देखणी! सारे तिचे नि माझे कौतुक करत. नवराही! पहिल्या रात्रीचे त्याचे कथन दुःस्वप्न ठरवून मी नांदत होते. सासरी-माहेरी त्याच्या लफड्याचा वास येऊ न देता! अचानक साप चावल्याचे निमित्त होऊन माझे वडील गेले. लग्नाचे कर्ज फिटले नव्हते. निवृत्ती दूर होती. त्यामुळे कर्ज कापून हाती आलेला फंड फार कमी होता. आईस खूप काटकसर करावी लागणार होती. मला आईस मदत करण्याची इच्छा झाली. सासऱ्यांस ती पटली, पण



नवऱ्याने मिठाची गुळणी धरली. अनायासे आईस जावयाची मदत घेणे प्रशस्त वाटेना. तरी लेकीच्या भावनेची कदर करत ती 'मरणपथारी तुझ्याच दारी पडेल गं', असे म्हणाली. पित्यापाठोपाठ सहा महिन्यात न्यूमोनिया होऊन सासरे निवर्तले.

पित्याचा वचक न उरल्याने नवऱ्याने आई नि पत्नीचा विचार करणे सोडले. त्याचे दुकानात जाणे अनियमित झाले. तो व्यसनाधीन झाल्याचा काकांना संशय आला. त्यांनी तपास केला. त्यात सगळे उघड झाले. काकांनी त्याचा कान धरला. विरोधात त्याने दुकानात काम करणे बंद केले. तो रात्रीही घरी येईनासा झाला. काकांवर पाळत ठेवून ते नसताना दुकानात जाऊन त्याने बेहिशेबी उचल करणे सुरू केले. कामाचा सारा बोजा काकांवर! आहुजा ब्रदर्स सचोटीसाठी प्रसिद्ध! आधी दोन भावात मग पुतण्यातही नफ्याची योग्य विभागणी होई. आता भाऊ नव्हता नि पुतण्या काम करीना. काका-पुतण्यांनी समान नफा घेणे योग्य होते, पण पुतण्या काम न करता काकाच्या मेहनतीचा पैसा छचोर बाईवर उधळत होता. काकांना ते पटेना. सासूबाई, मी नि माझी मुलगी यांच्यावर अन्याय होऊ नये, असे त्यांना वाटे. वडिलकीच्या नात्याने ते पुतण्यास समजावण्यास घरी आले. पुतण्या घरी नव्हता. निर्णायक कृतीची तीव्र गरज जाणवून ते वहिनीशी बोलले. लेकाचे पराक्रम ऐकून माउलीचे रक्त गोठले. मी थोडे जाणून होते. पण तो कामातही हाताबाहेर गेल्याचे ठाऊक नव्हते.

टेकीस आलेले काका, दुकानाचे तीन भाग करायचे म्हणाले. भावाचा हिस्सा ते वहिनीस देणार होते. पुतण्याने केलेली उचल वजा करून ते त्याचा भाग सुपूर्द करणार होते. पुतण्याने वेळोवेळी उचललेल्या रकमेचा हिशेब मांडलेला होता. त्यांनी सुचवलेला मार्ग योग्य होता. वहिनीचा होकार मिळताच त्यांनी तातडीने कायदेशीर कारवाई करून भावाचा हिस्सा वहिनीस दिला, पण आईवर हात उचलून त्याने सारे हस्तगत केले. पुत्राचे विकृत रूप पाहून आईने डोळे विस्फारले. मानसिक धक्का सहन न झालेली अगतिक स्त्री विस्फारल्या डोळ्यांनीच कोसळली. उघड्या डोळ्यांनी प्राण सोडलेल्या आईकडे बघत नवऱ्याने पश्चात्तापाचे नाटक केले, पण काकांवर परिणाम झाला नाही.

छोटा स्वतंत्र धंदा सुरू करू, असे म्हणत तो घरी राहू लागला. मला वाटले तो सुधारतो आहे. काही दिवसांनी धंद्याच्या कामासाठी दोन दिवस दिल्लीस एका बुजुर्ग दांपत्यास भेटायचे असून, त्यांनी पत्नीसही आणा अशी गळ घातल्याचे, तो म्हणाला. आम्ही कधी एकत्र प्रवास केला नव्हता. तिघांनी दिल्लीस जाण्याचा विचार मला भावला, पण त्या दांपत्यास मूल नव्हते. मुलीस नेणे त्यांना हिणवणे ठरेल, असे म्हणत नवरा एकटा दिल्लीस जाण्यास तयार झाला. तो आता गंभीर विचार करू लागला आहे या भ्रमात, मी मुलगी आईस सोपली. आनंदाने दिल्लीच्या प्रवासास निघाले. पण....

पुढच्या वाटेवर असंख्य फत्तर विखुरलेले होते. मला यजमान दांपत्याकडे पोचवून तो काही काम संपवून येतोच, असे म्हणत बाहेर पडला. त्या दांपत्याकडून मला वस्तुस्थिती कळली. नवऱ्याने त्यांच्याकडून विसाराचे पैसे घेऊन माझे गर्भाशय भाड्याने दिले होते. आता मी तिथेच राहायचे होते. गर्भधारणा झाली की बाकी रकम नवऱ्यास मिळणार होती. माझे मत त्याने कधीच विचारले नव्हते. तरी हे ऐकून मला भोवळ आली. त्याने या दांपत्यास सांगितले होते की आईच्या आजारपणात कफल्लक झाल्याने आम्हा दोघांना हा मार्ग पसंत करावा लागला. वस्तुस्थिती कळल्यावर त्यांनी समंजसपणा दाखवला. नवे नाते लगेच सुरू करण्याचा आग्रह धरला नाही. मला सावरण्यास चार-सहा दिवसांची उसंत मिळावी यासाठी वेगळ्या खोलीत एकांत दिला. माझ्या मनात विचारांचे वादळ घोंघावत होते. वारंवार नवऱ्याने आईशी केलेले क्रूर वर्तन नि या दांपत्यासमक्ष मांडलेले परिस्थितीचे करूण वर्णन स्मरत होते. होणारे मूल या दांपत्यास दिले की माझे काय, ते कळत नव्हते. नवऱ्यावर विश्वास उरला नव्हता.

तिसऱ्या दिवशी मी बाथरूमला जाण्यास खोलीबाहेर आले तेव्हा मला नवरा खालच्या स्वरात कुजबुजत असल्याचा संशय आला. चाहूल लागू न देता मी कान टवकारले. त्या दांपत्याने त्यास मला अंधारात ठेवण्याबद्दल झापले असावे. तो 'माझी पत्नी (मी) सज्जन असून नवऱ्याचा शब्द खाली पडू देणार नाही', अशी खात्री देत होता. लग्नानंतर मला लवकरच दिवस राहिल्याचे सांगून माझ्या जननक्षमतेची तारीफ करत होता. माझा खर्च फार काळ करावा लागणार नाही, अशी हमी देत होता! भडवा वेश्येचे वर्णन करतो त्याहून खालच्या प्रतीचे लांगुलचालन ऐकून मला शिसारी आली. दिवस नसूनही भडाभडा उलटी झाली. शक्तिपात झाल्यागत मी बिछान्यात कोसळले. कितीतरी वेळ हमसाहमशी रडत होते. तो केव्हा गेला ते मला कळले नाही. केसांवर मृदू स्पर्श जाणवला तेव्हा मी दचकून बघितले. घरच्या प्रौढेच्या नजरेत मला कणव दिसली. नवऱ्याने त्याच्या जन्मदात्रीशी केलेले क्रूर वर्तन जाणत असूनही त्या प्रौढेने सांगितले ते ऐकून मी बधिर झाले. देहाने आई होण्यास सक्षम नसलेली ती स्त्री हळवी होती. ती माझ्यासाठी कासावीस झाली होती. नवे मूल जन्मताच ते या दांपत्यास देऊन तो मला विकणार होता. मूल होण्यास लागणारा काळ माझ्यासाठी गिऱ्हाईक शोधण्यास वापरणार होता. तिने विसाराच्या रकमेवर पाणी सोडण्याची तयारी दाखवून मला पळ काढण्याचा सल्ला दिला.

मी दिल्लीत नवखी! मुलगी गरीब आईकडे! तिच्यात माझा जीव! पण ना आर्थिक बळ की शिक्षणाची ऊब! स्वप्नीच्या राजकुमाराच्या वेशात आलेल्या राक्षसापासून सुटका कशी होणार, ते कळेना. ती कनवाळू स्त्री भिजल्या स्वरात म्हणाली, ''पोरी, तुझा नीच नवरा तुला विकून प्रियेचे लाड करील. झीज तुझी नि फळ त्या सटवीला!

तुला खूप मदत करण्याची माझी कुवत नाही. तुझ्या आईचा पत्ता दिलास तर मी तुमच्यात सेतू होऊ शकेन. तुझ्या आईनं त्वरित गाव सोडायला हवं. हा नराधम तुझ्या मुलीची वाट लावायला कमी करणार नाही. तो मुलीला स्वतः वाढवायचं म्हणाला आहे. आईस मरणाच्या वाटेवर नेणारा स्वार्थासाठी काहीही करील. तुझ्या आईनं विरोध केला तर तो तिचा जीव घेऊन देखण्या मुलीस मिळवील. ती तरुण होताच तिला विकण्यास कमी करणार नाही.''

आम्ही सुख-दुःखाच्या गोष्टी केल्या. तिने मला कुवतीबाहेर मदत केली. माझ्याजवळ तिचा पत्ता असण्याकडे तिनेच लक्ष वेधले. तिच्याकडून मुलीची खुशाली कळण्याची शक्यता मला आवडली. मी आईस सविस्तर माहिती कळवणारे पत्र पाठवले. ते पत्र वेळेवर आईस मिळाले नसते तर गहजब झाला असता कारण त्याच दिवशी त्याने माझा अपघाती मृत्यू झाल्याचे कळवून माझे दिवस झाले की मुलीस न्यायला येईन, असे आईस कळवले होते. मी पत्रात सांगितल्याप्रमाणे आई लगेच बाबांचे पैसे नि माझ्या मुलीस घेऊन दिल्लीस आली. आम्ही भेटून सारे ठरवल्यावर आई नातीसह मामाकडे गेली. तिथे माझा दुष्ट नवरा पोहोचण्याची भयप्रद शक्यता असल्याने मामाने बाबांच्या पैशात स्वस्तात खोली मिळवली. जम बसला की मी पैसे पाठवणार होते. पण...

त्या कनवाळू दांपत्याने मला एका अनाथ स्त्रियांच्या संस्थेचा पत्ता दिला. ती संस्था नाडलेल्या स्त्रियांना त्यांच्या लायक काम मिळवून देत असे. मला मुलं सांभाळण्याचे काम मिळाले. मी आईस तसे कळवलेही, पण घरच्या पुरुषाने संधी साधून मला नासवण्याचा प्रयत्न केल्यामुळे काम सुटले. काम सुटण्याच्या कारणाचा गवगवा झाला. सौंदर्याने माझ्याशी उभा दावा मांडला. मला काम मिळेना. कामाच्या शोधात तीन दिवस उन्हा-तान्हात भटकत होते. पोटात अन्नाचा कण नव्हता. तरी मी भीक मागितली नाही. अशक्तपणामुळे मी रस्त्यावर कोसळले. शुद्धीवर आले तेव्हा पोलिसठाण्यात होते. जबानीत पोलीसदादास माझे दुर्दैव सांगत असताना मोठ्या पोलिसाचा हप्ता देण्यास मुजफ्फर नगराची अनभिषिक्त सम्राज्ञी आली. ती देखण्या मुलींना नाच-गाण्यात तरबेज करत असे. ती स्पष्ट म्हणाली, ''तुझी धुणी-भांडी करण्याची तयारी असली तरी तुला काम देण्याचे धाडस कुणी करणार नाही. तुझ्या रुपाचा नवऱ्यास मोह पडेल, याचे गृहिणींना भय वाटेल. त्यापेक्षा स्वतःस ओळख नि स्वावलंबी हो...!''

इथे येण्यास पर्याय नव्हता. मुली तिला मॅडम म्हणत. ती मायाळू असल्याचा हवाला देत. मला नृत्य-गायनात तरबेज करून तिने विख्यात तवायफ केले. मुजऱ्यासाठी मला वीस-पंचवीस हजार सहज मिळतात. मॅडममार्फत मी आईला पैसे पाठवते. माझी छाया लेकीवर पडू देत नाही. मॅडमच्या मदतीने मी आईस भेटले. माझी स्थिती पाहून आईस वाईट वाटले. तरी पापी मी नसून परिस्थिती पापी असल्याचे मॅडमने तिला पटवले. या साऱ्या पोरींवर आई माया करते. कधी-मधी मला लेकीचे फोटो पाठवते. मुलीची शिक्षणातील प्रगती कळवते, पण समाज माझ्या लेकीस आई नसलेली पोरकी पोर समजतो. धो-धो बोलणारी पिंकी गळ्यात आवंढा अडकल्याने थबकली.

शलाकास साहिर लुधियानवी यांची रचना आठवली, 'औरतने जनम दिया मर्दोंको, मर्दोंने उसे बाजार किया, जब जी चाहा मचला-कुचला, जब जी चाहा धुत्कार दिया...।' पुढच्या विरोधाभासात टोकाचे करूण्य! शब्दातून जणू वेदना ठिबकते.. 'अवतार पयंबर जनती है, फिरभी शैतानकी बेटी है...।' विचारांत गुंतण्यास तिला सवड मिळाली नाही कारण पिंकीच्या वेदनेने रीना, बीना, मीना, शेफाली.... सर्वांच्या मनाच्या जखमांवरील खपली काढली होती. त्यांच्याही जखमा भळभळू लागल्या. तिने आत्मीयतेने साऱ्यांच्या वेदना ऐकल्या. प्रत्येकीची वेगळी कहाणी! यात मॅडमचाही समावेश. साऱ्यांच्या कहाण्यात एकच साम्य... नाईलाज!

मॅडम सोल्जरची पत्नी! सासऱ्याने नाईलाजाने बाजारात पोहोचवलेली. पाकिस्तान युद्धात त्यांचा हात कलम झालेला. मॅडमच्या नवऱ्याने काश्मीरमध्ये देह ठेवला. चार दिवस वृत्तपत्रात कौतुक झाले. फोटो आले, पण वृत्तपत्रांना सतत हवी नवी बातमी! त्यांच्यासाठी वीरोचित मरण दुःखद प्रसंग नसून एक इव्हेंट! कौतुक करून ते निघून गेले नि जीवनसंघर्ष उभा ठाकला. मॅडमच्या घरात आंधळी सासू, अपूर्ण देहाचे सासरे, धाकटा दीर नि मॅडमचा मुलगा. साऱ्यांचे पोट भरण्यास सासरे असमर्थ! मॅडम तळतळून बोलत होत्या, ''कसली देशभक्ती नि कसलं काय? त्यापेक्षा सासरा नि नवरा कारकून वा कचेरीत शिपाई असते तरी पूर्ण देहाने वावरले असते. त्यांनी कुटुंबाचे पालनपोषण केले असते, पण त्यांना देशसेवा करण्याची अवदसा आठवल्यानं मला मिळालं मुजफ्फर नगर! सासरे असेतो तुटपुंजी पेन्शन मिळेल. कारकुनाला खूश केल्यावर पेन्शन हाती येते. त्याला भिकारी म्हणत नाही कुणी? त्यात म्हणे मंत्र्यांपासून साऱ्यांचा हिस्सा असतो. कोट्यावधी रुपये हडप करणारे मंत्री भिकारी नाहीत? देशासाठी देह ठेवणाऱ्या वीराच्या पत्नीस मिळणारी रक्कमही लुबाडण्याची निर्लज्ज कृती करणारे सफेद भिकारी वीरांगनेस वारांगना करतात! निवडणुकांच्या फॉर्ममध्ये आमचा योग्य उल्लेख होईतो मुजफ्फर नगरातून जनगणनेचे काम पुढे सरकू देणार नाही. आम्ही आंदोलनाचे आव्हान दिले, असे समजा.''

मॅडम आवेशाने म्हणाल्या, ''मी अगतिक स्त्रियांना धंद्याला लावते. ते पाप नाहीय. स्त्रीस देवतेचे स्थान देत संस्काराच्या बढाया मारत भारतीय ढोंगी पुरुषांनी नागवलेल्या स्त्रियांचे हाल संपवण्याचे पुण्यकर्म करते मी.'' मॅडमच्या स्वरांत वीर पतीच्या पत्नीस शोभेसा रणचंडीचा आवेश होता.

मीना लखनौची खानदानी तवायफ! तिची आई, आजी नि तीही नाच-गाण्यात तरबेज, पण लाजरी असल्याने लाजवंती! झुकल्या नजरेने नृत्य करून आत पळणारी. एकदा कोठ्यावर आला शायर! ही लाजवंती त्याच्या काळजात घुसली. त्याने तिच्याशी लग्न केले, तेव्हा संपूर्ण रेडलाईट एरिया दुल्हन बनला. तिच्या आईने हौशीने दागदागिने देऊन लेकीस बिदा केले. इतर मैत्रिणींनीही अहेरात सुरेख अलंकार दिले. लाजवंती पतीसंगे मुंबईस गेली, पण तिथे तिच्या गृहप्रवेशास विरोध झाला. शायराने तडफदारपणे लहान गाळ्यात वेगळा संसार थाटला, पण तो विकाऊ नव्हता. त्यामुळे पैसे नव्हते. दागिन्यांच्या बळावर संसार सुरू झाला. सोने-नाणे संपल्याने प्रश्न विक्राळ बनला. त्याने पत्नी मित्राकडे सोपवून पळ काढला.

मीना तिरस्काराने म्हणाली, ''या लग्नाने तवायफ लाजवंतीस वेश्या केले. त्या मित्राच्या घरातून पळून स्टेशनवर आले तिथे मॅडम भेटल्या. आईकडे फुले वेचत होते तिथे गोवऱ्या वेचणे नको वाटले. मॅडमच्या सहकाराने लाजवंती कधी तवायफ तर कधी वेश्येची भूमिका करणारी मीना झाली, पण भीक मागण्याची आस आमच्या कुणाच्याही मनात नव्हती नि नसेल! कडवे संपले की पालुपद यावे तसे प्रत्येकीच्या आत्मकथनाचे भरतवाक्य, 'भिकारी शब्दाला विरोध!'

बीना गावात शिकणारी अत्यंत हुशार विद्यार्थिनी. तरुण शिक्षकाने लग्नाचे वचन देऊन भुलवलेली! कदाचित त्याच्या घरच्यांना बीना पसंत नसेल वा त्याला तिचा कंटाळा आला असेल. तो गाव सोडून कुठे निघून गेला, याचा कुणाला पत्ता नसताना बीनास पोटात गर्भ रुजल्याचे जाणवले. हे कळले तर घरच्यांकडून लाथांचा प्रसाद मिळणार म्हणून तिला आत्महत्या करणे बरे वाटले. ती लगेच रेल्वेरूळांकडे वळली पण भगव्या वस्त्रातील साधुपुरुषाने ममतेचे नाटक करून आश्रमात भरती करण्याचे वचन देऊन मरू दिले नाही. वास्तवात त्याने कामाठीपुरा दाखवला. एकाने वचन देऊन लैंगिक आनंद घेऊन पळ काढला. दुसऱ्याने भगव्या वस्त्राआड साधुत्वाचे ढोंग करून कोठ्यावर नेले, हे तिला सहन होईना. बलात्काराचे दुःख काय असते ते एका पुरुषास तरी दाखवावेच, या विचाराने तिचा कब्जा घेतला. साधुपुरूष म्हणवणाऱ्या महाभागावर झाडप घालून ती ओरडली, ''मेल्या तुझे ब्रह्मचर्य संपवून आज तुझी द्रौपदी करणार मी. संधीसाधूला वाचवायला कृष्ण धावून आला तर त्याचेही वाभाडे काढणार मी! तिचा आवेश पाहून साधुपुरुष धोतर सांभाळत सैरावैरा पळू लागला, पण बीनात दहा हत्तींचे बळ प्रगटले. तिने इप्सित पूर्ण केलेच, पण तरी तिला सूडाचे समाधान लाभले नाही कारण ते ओंजळीत तोंड लपवून हमसाहमशी रडू लागले. तिला कामाठीपुऱ्यात नेणारी व्यक्ती ना साधू होती ना पुरुष! सावत्र आईच्या जाचाने ही अवस्था केल्याचे कळले नि संताप शमून बीनाच्या मनात कणव दाटली. पुढे त्याने बीनाचे बाळंतपण केले. मुलगा नीट वाढवण्याचे नि कुणाही मुलीस कामाठीपुऱ्यात न नेण्याचे वचन देऊन त्याने बीनास निरोप दिला.

दिवसभर शलाका वीस-पंचवीस अगतिक स्त्रियांच्या दाहक नि करूण कहाण्या ऐकत होती. काही तवायफांच्या बापाचे नावही थक्क करणारे असल्याचे कळले. अर्थात दिवसाउजेडी हे महापुरुष ते कबूल करणार नव्हते, ते अलाहिदा! मुजफ्फर नगरात शलाकाच्या हस्ते जनगणनेचा एकही फॉर्म भरला गेला नाही. सकाळी तिथे गेलेली नि सायंकाळी बाहेर पडलेली शलाका या जणू भिन्न व्यक्ती होत्या. तवायफ, वेश्या, मॅडमच नव्हे तर त्यांना मुली पुरवणारेही अगतिक असल्याची जाणीव तिला सैरभैर करत होती. अत्यंत अपरिचित जीवनाचा परिचय तिला पचेना. खरोखर ही भिकाऱ्यांची वस्ती नव्हती. नाईलाजाचे भांडवल करूनही त्या भीक मागत नाहीत, हे पक्के ठसल्यामुळे तिने नोकरी सांभाळून त्यांना मदत करण्याचा वसा घेतला. दुसऱ्या दिवशी ती पुन्हा त्यांना भेटायला गेली. घेतला वसा न उतता मातता तिने पेलला. तिचे नाव जाहीर न करण्यात या समाजानेही तिला सहकार दिला.

मुजफ्फर नगरातील या स्त्रियांनी छेडलेले आंदोलन यशस्वी झाले. या आंदोलनाच्या यशाचे कौतुक करावे की देशास स्वातंत्र्य मिळून इतकी वर्षे लोटली तरी पुरुषांच्या स्वैराचारावर अंकुश लादणे जमलेले नाही याची शरम बाळगावी हा प्रश्न यक्षप्रश्नाहून जटिल! स्त्रियांना हा व्यवसाय का करावा लागतो, या प्रश्नाइतकाच का कुणाची गत ना साधू ना पुरुष अशी होते, हाही निरुत्तर करणारा प्रश्न आहे. पांढरपेशा समाजात सुरक्षित नि शांत जीवन जगणाऱ्या तरी स्वतःस जागरुक नागरिक म्हणवणाऱ्यांनी ते आपले क्षेत्र नाही असे म्हणून चामडी बचावणेही लाजिरवाणे वाटले शलाकाला! अशावेळी मला दोन golden thoughts स्मरतात. Most of the people get credit of not doing bad things. वाईट वागत नसल्याच्या तुताऱ्या वाजवत ते चांगले करत नसल्याचे वास्तव दडपतात. हेच व्यक्त करताना स्वामी विवेकानंद म्हणतात, Society does not go down because of the activities of criminals but because of the in-activities of good people.

मुजफ्फर नगरच्या स्त्रियांचा समर्थ रामदासांशी परिचय नाही तरी त्यांच्या अनोख्या आंदोलनाने समर्थांचे 'केल्याने होत आहे रे' हे वचन सार्थ केले. निवडणुकीच्या फॉर्मवर व्यवसायाच्या यादीत रुपजीविनी (सेक्स शॉपर्स) या व्यवसायाचा समावेश झाला.

**– स्मिता भागवत**
Phone 1 289 752 8885
smitacap@gmail.com

# परिसंवाद

## समकालीन मराठी विश्व : स्थिती आणि स्थित्यंतरे

स्मरणरंजनात रमणे हे मराठी समाजाचे व्यवच्छेदक वैशिष्ट्य. मग ती कला असो, साहित्य असो, राजकारण असो वा समाजकारण भूतकाळात रमण्याकडे मराठी समाजाचा ओढा अधिक. त्यात वावगेही काही नाही. मानवी स्वभावाचा तो एक भाग आहेच; मात्र अशाने 'आज' व 'उद्या'कडे डोळसपणे पाहण्याची आपल्याला तशी फारशी गरज वाटत नाही. हे मात्र नक्कीच काळजी करण्याजोगे. ती काळजी का आणि कशाची करावी, हे सांगणारा हा परिसंवाद...

अव्वल इंग्रजी काळापासून मराठी समाजात आधुनिकतेची प्रक्रिया सुरू झाली. इथल्या साहित्य, माध्यमे आणि वैचारिक जगताने ही प्रक्रिया गतिमान केली. त्यामुळे स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात आधुनिक समाज म्हणून मराठी समाजाला काही एक आकार प्राप्त होत गेला. साहित्य, कला, राजकारण, समाजकारण अशा जीवनाच्या विविध क्षेत्रांत निरनिराळे प्रवाह निर्माण झाले आणि त्यांनी मराठीला समृद्ध करून टाकले. पुढे जागतिकीकरणाचे बरे-वाईट अनुभव पाहून-पचवून आपण आज पुढल्या टप्प्यावर येऊन पोहोचलो. हा टप्पा तसा अगदी अलीकडचा. म्हणजे गेल्या दशकभराचा. या काळात झपाट्याने बदललेल्या तंत्रज्ञानाने जगाचा तोंडवळा आमूलाग्र बदलला आहे. त्याच जगाचा एक भाग असलेला मराठी समाजही याला अपवाद नाही. तेव्हा या बदलाच्या... संक्रमणाच्या काळातील मराठी समाज नक्की कुठे चालला आहे, हे पाहणे त्यामुळेच आवश्यक ठरते. या पार्श्वभूमीवर साहित्य, माध्यमे आणि सामाजिक-सांस्कृतिक-वैचारिक-चळवळी अशा क्षेत्रांचे - ज्यांनी मराठीत आधुनिकता रुजवली- वर्तमान जाणून घेणे, हा या परिसंवादाच्या हेतू. त्यातून आजच्या मराठी समाजाची स्थितिगती समजून घेण्यास मदत होईल.

परिसंवादात एकूण चार लेख समाविष्ट करण्यात आले आहेत. पहिला लेख राज्यशास्त्राचे ज्येष्ठ अभ्यासक डॉ. अशोक चौसाळकर यांचा. त्यात त्यांनी मराठीतील विचारधारानिष्ठ चळवळींचा आढावा घेत या चळवळींचा व मराठी वैचारिक विश्वाच्या आजच्या अवस्थेचा वेध घेतला आहे. दुसऱ्या लेखात माध्यमचिकित्सक डॉ. जयदेव डोळे यांनी सध्याच्या 'पोस्टट्रुथ' जगाचा आणि त्याच्या मराठी माध्यमांवरील प्रभावाचा परखड परामर्श घेतला आहे. तर परिसंवादातील तिसरा लेख हा आजचे आघाडीचे कादंबरीकार प्रवीण बांदेकर यांनी लिहिला असून त्यात समकालीन मराठी साहित्याचा आलेख आला आहे. चौथा 'आहे संदर्भहीन तरीही' हा लेख दिनकर गांगल यांनी लिहिला आहे. तो मराठी विश्वाशी निगडित गेल्या पन्नास-साठ वर्षांतील विविध सदर्भांची प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे चर्चा करतो. जुन्या जमान्यातील मूल्यव्यवस्था हरवत जाणे आणि काळाच्या नव्या टप्प्यावर नव्या संकेतांचा शोध सुरू असणे अशा स्थित्यंतर प्रक्रियेविषयीच्या या नोंदी महत्त्वाच्या आहेत.

---

**परिसंवाद संयोजन : प्रसाद हावळे**

▼


# आजचे मराठी वैचारिक विश्व आणि चळवळी

डॉ. अशोक चौसाळकर

**आजचे मराठी चर्चाविश्व अशा टप्प्यावर उभे आहे, की त्याला नव्या प्रबोधनाची, नव्या सर्जनाची प्रतीक्षा आहे. जागतिकीकरणामुळे झपाट्याने बदलत जाणाऱ्या मराठी समाजापुढील समस्यांचा त्यास वेध घ्यावा लागणार आहे...**

महाराष्ट्राला वैचारिक वाङ्मयाची दीर्घ आणि समृद्ध परंपरा आहे. एकोणिसाव्या आणि विसाव्या शतकात महात्मा फुले, न्या. रानडे, चिपळूणकर, आगरकर, टिळक, सावरकर, विनोबा, आंबेडकर, कॉ. डांगे, प्रा. दि. के. बेडेकर, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, प्रा. मे. पुं. रेगे आणि वसंत पळशीकर या लेखकांनी मराठीतील विचारविश्व अनेक अंगांनी समृद्ध केलेले आपणास दिसते. या विचारवंतांनी भारतीय विचारविश्वसुद्धा समृद्ध केलेले होते. मागच्या शतकामध्ये मार्क्सवाद, लोकशाही समाजवाद, उदारमतवाद, गांधीवाद, रॉयवाद, हिंदू राष्ट्रवाद आणि फुले-आंबेडकरवाद या विचारसरणी प्रभावी ठरल्या. या विचारसरणींच्या मांडणीमध्येही महाराष्ट्रातील विचारवंतांनी महत्त्वाची भूमिका बजावली. थोडक्यात या काळातील मराठी विचारविश्व हे समृद्ध होते आणि महाराष्ट्रातील व देशातील सामाजिक आणि राजकीय चळवळींना सकस वैचारिक अधिष्ठान देण्याचे काम वरील विचारवंतांनी केले.

सामाजिक चळवळी आणि सामाजिक विचार यांच्यात जवळचे संबंध असतात. किंबहुना आपणास असे म्हणता येईल, की सामाजिक चळवळींना स्थिती आणि गती प्रदान करण्याचे कार्य हे विचार करत असतात. आपल्या चळवळीचे उद्दिष्ट काय आहे, हे



उद्दिष्ट साध्य करण्यासाठी कोणत्या साधनांचा आपण वापर करणार आहोत, त्या उद्दिष्टानुसार कशाप्रकारची सामाजिक आणि राजकीय व्यवस्था आपण स्थापन करणार आहोत आणि या परिवर्तनाची दिशा काय राहणार आहे, याचे विवेचन चळवळीचे विचारवंत करत असतात; म्हणून प्रख्यात इटालियन मार्क्सवादी विचारवंत अंतोनिओ ग्रामसी असे म्हणतो की, ''विचारवंत विचारांच्या साहाय्याने चळवळींना संघटित करतात. स्पष्ट विचार नसले तर चळवळ विस्कटून जाते.''

जागतिक पातळीवर गेल्या २५ वर्षांपासून अनेक मूलगामी बदल होत आहेत. त्यातील सर्वांत मोठा बदल म्हणजे १९९१ साली सोव्हिएत संघाचे झालेले विघटन. १९१७ साली कम्युनिस्ट क्रांती झाल्यानंतर नवसमाज निर्मितीचा म्हणजेच स्वातंत्र्य व समता या आधारावर नवे जग उभारण्याचा हा प्रकल्प होता. सुरुवातीच्या काळामध्ये या प्रकल्पाला चांगले यश मिळाले. सोव्हिएत संघ व पूर्व युरोपातील देशांत नवे प्रयोग करण्यात आले त्यामुळे सर्व जगभर या प्रयोगांचे आकर्षण होते. पण १९९१ साली प्रथम पूर्व युरोपातील देशात आणि नंतर सोव्हिएत संघाच्या १५ गणराज्यांत कम्युनिस्टविरोधी उठाव झाले आणि पत्त्याच्या बंगल्यासारखा हा डोलारा कोसळला. जगातील सर्वच प्रागतिक विचारवंतांसाठी हा मोठा धक्का होता. दुसरा बदल म्हणजे, 'कल्याणकारी राज्यांच्या संकल्पनेचा झालेला ऱ्हास.'

सोव्हिएत मार्क्सवादाच्या लोकप्रियतेला आळा घालण्यासाठी विशेषत: पश्चिम युरोपातील प्रागतिक कामगार चळवळींना रोखण्यासाठी लोकशाही समाजवादाचा विचार मांडणाऱ्या पक्षांनी कल्याणकारी राज्याची कल्पना दुसऱ्या महायुद्धानंतर राबवायला सुरुवात केली. यामध्ये राज्यसंस्थेने सार्वजनिक उपक्रमांच्याद्वारा उत्पादनाच्या क्षेत्रात प्रवेश करणे आणि सरकारने काही महत्त्वाच्या धोरणाच्या आधारे संपत्तीचे समाजात पुनर्वितरण करणे अभिप्रेत होते. समाजातील खालच्या थरातील लोकांना शासनातर्फे मूलभूत सेवा व सुविधा उपलब्ध करून दिल्या जात होत्या. पण १९९०च्या सुमारास कल्याणकारी राज्याचे प्रतिमानही ढासळले. त्यातून तिसरा बदल जो झाला तो म्हणजे, नवे आर्थिक धोरण. जागतिकीकरण, उदारीकरण आणि खाजगीकरण ही नव्या आर्थिक धोरणांची त्रिसूत्री. यामध्ये आर्थिक व्यवहारामध्ये बाजारपेठेला आणि व्यक्तीच्या खाजगी उपक्रमशीलतेला जास्त महत्त्व देण्यात आलेले आहे. या तीन बदलांमुळे जगातील सर्वच देशांत मोठ्या प्रमाणात परिवर्तन झाले आणि भारतही त्यास अपवाद नव्हता.

१९९० च्या दशकानंतर भारतीय समाजामध्ये अनेक नव्या चळवळी आणि विचारप्रवाह निर्माण झाले. त्यांनी स्वातंत्र्य चळवळीपासून आणि पं. नेहरूंच्या प्रेरणेने निर्माण झालेल्या विचारांना मागे रेटले. हे चार प्रवाह खालीलप्रमाणे होते-

(१) १९९१ साली भारत सरकारने नव्या आर्थिक धोरणांचा पुरस्कार केला आणि भारतीय अर्थव्यवस्था खुली केली. भारतीय समाजावर त्याचे मोठे परिणाम झाले. विकासाचा दर वाढला. मध्यमवर्गाच्या संख्येमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली. उत्पादन क्षेत्रामध्ये बदल झाले.

शेतीमध्ये अनेक पेचप्रसंग निर्माण झाले. जागतिकीकरणाचा शेतीला फायदा झाला नाही. उलट सरकारच्या धोरणामुळे व्यापारशर्ती शेतकऱ्यांच्या विरुद्ध गेल्या आणि देशभर आक्रमक अशा शेतकरी चळवळी उभ्या राहिल्या.

नेहरूंच्या उदारमतवादी व धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाची जागा धोरणांच्या राजकारणाने घेतली. धर्म आणि जातीचे राजकारण मोठ्या प्रमाणात सुरू झाले. रामजन्मभूमीच्या प्रश्नावर लोकांना संघटित करत हिंसक राजकीय चळवळ हिंदुत्ववाद्यांनी उभी केली आणि तिचा प्रभाव वाढत गेला.

(२) सर्वसमावेशक व सामाजिक न्याय देणारा विचार मागे पडून जातीय अस्मितांना जास्त प्रखर करणारा विचार या काळात पुढे आला. १९९० साली मंडल आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी केल्यानंतर जातीच्या राजकारणाचा व्याप वाढला. जनतादलाचे जातीनिहाय तुकडे पडले आणि एकूण चर्चाविश्वामध्ये-सुद्धा जातीचा प्रश्न वेगवेगळ्या अंगांनी चर्चिला जाऊ लागला. थोडक्यात, स्वातंत्र्यानंतरच्या पहिल्या ५० वर्षांत निर्माण झालेली वैचारिक सहमती नष्ट झाली आणि भारतीय विचारविश्व एकप्रकारे विखंडित झाले.

पं. नेहरूंनी लोकशाही समाजवादाचा जो विचार मांडला होता, त्याच्या विरोधामध्ये नवे आर्थिक धोरण सर्वच सरकारांनी कमी-जास्त प्रमाणात अमलात आणले. कारण जागतिक अर्थकारणाचा खोल असा प्रभाव त्यावर पडला होता. महत्त्वाची गोष्ट म्हणजे, हे आर्थिक धोरण यशस्वी ठरले आणि देशाची अर्थव्यवस्था प्रतिवर्षी शेकडा ७ टक्के या दराने वाढू लागली. देशामध्ये मध्यमवर्गातल्या संख्येमध्ये वाढ झाली आणि दारिद्र्यरेषेखाली राहणाऱ्या लोकांची संख्या निम्म्यावर आली. वैचारिक क्षेत्रात डाव्या विचारांचा मोठा प्रभाव असल्यामुळे विचारवंतांच्या पातळीवर नव्या आर्थिक धोरणाचा विरोध कायम राहिला. त्या प्रमाणात नव्या आर्थिक धोरणांचा समर्थपणे पुरस्कार करणारे उदारमतवादी अर्थशास्त्रज्ञ आणि राज्यशास्त्रज्ञ महाराष्ट्रात निर्माण झाले नाहीत. मध्यंतरी शेतकरी संघटनेचे नेते शरद जोशी यांनी खुल्या अर्थव्यवस्थेचा पुरस्कार केला, हा एक अपवाद म्हणावा लागेल.

१९८० नंतर शेतीचा धंदा किफायतशीर राहिला नाही. या व्यवसायात घटती गुंतवणूक, वारसाहक्कामुळे जमिनीचे झालेले

तुकडे, कमी उत्पादकता, बेभरवशाची बाजारपेठ व हवामान आणि शेतमालाच्या भावाबद्दल अनिश्चितता यामुळे हा धंदा धोक्यात आला. नाराज शेतकऱ्यांनी शेतकरी संघटनेची स्थापना करून शरद जोशी यांच्या नेतृत्वाखाली आक्रमक असे आंदोलन सुरू केले. जोशी हे केवळ लढवय्ये शेतकरी नेतेच नव्हते, तर स्वतंत्र बुद्धीचे विचारवंतही होते. संघटनेची भूमिका मांडताना त्यांनी खालील पाच मुद्यांवर भर दिला.

(१) भारतात शेतीचा धंदा किफायतशीर नाही कारण तेथे शेतमालाला रास्त बाजारभाव मिळत नाही.

(२) सरकारची आयात-निर्यात धोरणे शेतकऱ्यांच्या विरोधी आहेत आणि ज्यावेळी शेतमालाला रास्त बाजारभाव मिळण्याची शक्यता असते, त्यावेळी सरकार मोठ्या प्रमाणात धान्य आयात करून शेतमालाचे भाव पाडते.

(३) शासनसंस्था भांडवलदारीच्या विकासासाठी शेतीमधून मोठ्या प्रमाणात भांडवलसंचय करते. शेतीत मिळवलेल्या पैशाची गुंतवणूक शेतीत होत नाही.

(४) महाराष्ट्रातील सर्वच लहानमोठ्या शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती दयनीय आहे. कारण त्यांच्या श्रमाला व उत्पादनाला योग्य भाव मिळत नाही. त्यामुळे त्यांचे राहणीमान खालच्या स्तरातील सरकारी कर्मचाऱ्यापेक्षा कमी दर्जाचे असते.

(५) ही परिस्थिती बदलावयाची असेल तर शेतकऱ्यांनी संघटित होऊन सरकारवर दबाव आणला पाहिजे आणि सरकारची जी चुकीची धोरणे आहेत. ती बदलण्यासाठी आंदोलन केले पाहिजे. शेतकऱ्यांनी संघटित होऊन आपला दबावगट निर्माण केला पाहिजे. ३०-३५ वर्षे जोशींनी अनेक आंदोलने केली. त्यांना काही प्रमाणातच यश मिळाले. पण विकासाच्या मार्गातील अडथळे दूर करून स्वतंत्र आणि स्वावलंबी शेतीव्यवस्था निर्माण करणे, जी उद्योगधंद्यांना पाठिंबा देईल, शहरी आणि ग्रामीण भागातील विषमता दूर करेल आणि शेतकरी व कामगार यांना एकत्र आणेल अशी त्यांची ध्येयदृष्टी होती. आपल्या 'चांदवडची शिदोरी' या पुस्तकामध्ये त्यांनी स्त्री-स्वातंत्र्याचा पुरस्कार केला आणि असे मत मांडले, की ग्रामीण भागाचा खरा विकास झाल्याशिवाय स्त्रीमुक्ती शक्य नाही. स्त्रिया घरकामाच्या रूपाने राष्ट्रीय संपत्तीत मोठे योगदान देतात, परंतु मार्क्सवाद्यांसह सर्वांनी स्त्रियांचे मूल्य हिशोबात घेतले नाही.

महाराष्ट्रातील शेतकरी चळवळीचे तत्त्वज्ञान अशाप्रकारे शरद जोशी यांनी मांडले. आजही वेगवेगळ्या शेतकरी चळवळींत काम करणारे कार्यकर्ते जोशींच्या विचारांच्या आधारेच शेतीप्रश्नांची मांडणी करताना आपल्याला दिसतात. जोशींनी चळवळ चालवण्याची जी पद्धत विकसित केली होती, तीच बहुतेकवेळा आजही वापरली जाते.

१९९० नंतर हिंदुत्ववादी विचारांचा प्रभाव रामजन्मभूमी चळवळीच्या माध्यमातून वाढू लागला आणि १९९६ साली अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली भाजपचे सरकार सत्तेवर आले. १९८० साली भाजपने गांधीवादी समाजवादाचा पुरस्कार केला होता. प्रत्यक्षात त्यांचा या दोन्हीही विचारांवर विश्वास नव्हता. पुढे त्यांनी त्याचा त्याग केला आणि दीनदयाळ उपाध्याय यांच्या 'एकात्म मानवतावादा'चा पुरस्कार केला. या नव्या हिंदुत्ववादी अवतारामध्ये भाजपने मुख्यत: ५ महत्त्वाचे मुद्दे मांडले होते-

(१) पं. नेहरूंचा धर्मनिरपेक्ष राष्ट्रवाद हा चुकीच्या गृहितकावर आधारलेला होता. भाजपचा राष्ट्रवाद हा सांस्कृतिक राष्ट्रवाद असून गेली हजारो वर्षं विकसित होणारी हिंदू संस्कृती हा त्याचा पाया आहे.

(२) काँग्रेसची धर्मनिरपेक्षता नकली असून तिचा उद्देश मुसलमानांची व्होट बँक तयार करणे हा आहे. भाजपचा सकारात्मक धर्मनिरपेक्षतेवर विश्वास आहे. ज्यामध्ये कोणत्याही अल्पसंख्याक घटकांचा समावेश केला जाणार नाही.

(३) बाबरी मशिदीच्या जागी भव्य असे राममंदिर उभे करणे भाजपचे धोरण आहे. कारण त्यात इतिहासात झालेली चूक दुरुस्त करावयाची आहे.

(४) भाजप नव्या आर्थिक धोरणाचा पुरस्कार करते.

(५) भारतामध्ये एकात्म राष्ट्रीय समाज हिंदू संस्कृतीतील उदात्त मूल्यांच्या आधारावर निर्माण करणे, हे भाजपचे उद्दिष्ट आहे. त्या आधारे भाषा, वेश, प्रदेश आणि जात यांच्या आधारावर होणारे भेद नष्ट केले जातील.

आज हिंदुत्ववादी विचारांचा महाराष्ट्रामध्ये मोठा प्रभाव आहे आणि लोकसभा, विधानसभा व नगरपालिकांच्या निवडणुकांतही भाजप आणि शिवसेना या दोन पक्षांनी बाजी मारली आहे. वीस-बावीस वर्षांपूर्वी प्रा. स. ह. देशपांडे, प्रा. शेषराव मोरे, प्रा. श्रीनिवास दीक्षित वगैरे विचारवंतांनी नवहिंदुत्ववादी विचारांची मांडणी केलेली होती. देशपांडे आणि मोरे यांच्या विचारांचा भर सावरकरांच्या विज्ञानवादी आणि सुधारणावादी विचारांच्या आधारावर हिंदुत्वाची फेरमांडणी करण्यावर होता, पण विज्ञाननिष्ठा, बुद्धिवाद आणि समाजसुधारणा यांबद्दल संघपरिवारामध्ये फारशी उत्सुकता नसल्यामुळे हे विचार पुढे गेले नाहीत. आज हिंदुत्ववाद्यांकडे सत्ता आहे. 'रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी'सारखी संस्था आहे पण आपल्या विचारांचे समर्थ प्रतिपादन करणारे विचारवंत नाहीत. हिंदुत्व विचारांची ही बाजू कमजोर राहिल्यामुळे विरोधीविचार मांडणाऱ्यांवर उथळ टीका केली जाते. असत्य मजूकर सत्य म्हणून मांडला जातो. त्यातूनच 'सनातन संस्थे'सारख्या संस्था आपले वेगळे विचार

मांडताना दिसतात. मुस्लिम विरोधातून वैचारिक असहिष्णुता निर्माण होते.

मंडल आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी केल्यानंतर मराठी चर्चाविश्वात जातीचा प्रश्न मोठ्या प्रमाणात चर्चिला गेला. आधीच महाराष्ट्राला जातीचे वेड, आता त्याला सामाजिक न्यायाचा मुलामा लावण्यात आला. यातील मुख्य मारा कम्युनिस्ट पक्षावर होता. उच्चजातीय कम्युनिस्ट पुढाऱ्यांनी जातीच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करून वर्गाचा मुद्दा पुढे रेटला. यामुळे मागास जातीतील आत्मोद्धाराच्या चळवळी कम्युनिस्ट चळवळीपासून दूर गेल्या, असा टीकेचा रोख होता. ज्येष्ठ कम्युनिस्ट कार्यकर्ते शरद पाटील यांनी पक्षाचा त्याग केला आणि स्वत:चा सत्यशोधक कम्युनिस्ट पक्ष स्थापन केला. आपल्या प्राच्यविद्येच्या अभ्यासाच्या मदतीने त्यांनी मार्क्स-फुले-आंबेडकरवाद प्रतिवादी करून जातीच्या चर्चाविश्वावर आपला दबदबा निर्माण केला. अनेक तरुण संशोधक त्यांच्या विचाराने प्रभावित झाले. पाटील यांनी मुख्यत: तीन मुद्दे मांडले-

१) वसाहतपूर्व काळातील भारतातील उत्पादनपद्धती जातिव्यवस्थेवर आधारलेली होती. जात हा शोषण शासनाचा मुख्य घटक होता. वासाहतिक काळामध्ये भारतात वर्ग तयार झाले आणि वर्ग व जात हे शासन-शोषणाचे घटक बनले.

२) स्त्रियांच्या मुक्तीचा प्रश्न डाव्या चळवळीने अग्रक्रमाने घेतला नाही. जाती आणि स्त्रियांची गुलामगिरी यांचा जवळचा संबंध आहे. त्यामुळे स्त्रीदास्यमुक्तीशिवाय जातिनिर्मूलन शक्य नाही.

३) कम्युनिस्ट पक्षांनी वर्ग व जात लढे एकसाथ लढवले पाहिजेत. पाटील यांनी धुळे जिल्ह्यात आदिवासी भागांत आपली चळवळ सुरू केली आणि काही काळ त्यांची शरद जोशींच्या शेतकरी संघटनेबरोबरसुद्धा आघाडी होती.

१९९० नंतर नव्या सामाजिक चळवळींचे पर्व सुरू झाले. या चळवळींमध्ये पर्यावरणवाद, स्त्रीवाद, स्थलांतरितांचे अधिकार आणि नागरी अधिकार महत्त्वाचे होते. महाराष्ट्रात पर्यावरणवादाची मांडणी वेगवेगळ्या अंगांनी करण्यात आली. 'नर्मदा बचाव आंदोलना'च्या नेत्या मेधा पाटकर यांनी नर्मदेवरील सरदार सरोवरचा महाकाय प्रकल्पामुळे पर्यावरणाची कशी हानी होत आहे, जंगले कशी तोडली जात आहेत आणि जंगलात राहणारा आदिवासी समूह कशाप्रकारे विस्थापित होत आहे याचे विवेचन केले. त्यांनी व संजय संगवई यांनी पर्यावरणवादी पर्यायी विकासनितीची मांडणी केली. ख्यातनाम विचारवंत वसंत पळशीकर यांनी गांधीवादी दृष्टिकोनातून पर्यावरणवादी विचारांची मांडणी करत असताना सत्तेचे आणि उत्पादनाचे विकेंद्रीकरण, नैसर्गिक साधनांचे संरक्षण व गरजांना मर्यादित करणे या गोष्टींवर भर दिला. प्रा. सु. श्री. पांढरीपांडे आणि प्रा. राम बापट यांनीही या विषयावर आपली तत्त्वे मांडली. पर्यावरणाचं नुकसान करणाऱ्या प्रकल्पांविरुद्ध अनेक ठिकाणी चळवळी उभ्या राहिल्या. 'नर्मदा बचाव' ही त्यातली सर्वात मोठी लक्षवेधी चळवळ होती.

महाराष्ट्रामध्ये स्त्रीवादी विचारांची दीर्घ परंपरा आहे. स्त्रीवादाची मांडणी करत असताना एका बाजूला पाश्चात्त्य स्त्रीवादी विचार मांडले गेले, तर दुसऱ्या बाजूला भारतीय दृष्टिकोनातून विशेषत: गांधीवादी दृष्टिकोनातून विचार मांडण्यात आले. वसंत पळशीकर यांनी गांधीवादी दृष्टिकोनातून स्त्रीस्वातंत्र्याचा काय अर्थ असू शकतो याची मांडणी केली. शरद जोशी, शरद पाटील, छाया दातार, विद्युत भागवत यांनी या विषयावरच्या वेगवेगळ्या पैलूंची चर्चा केली.

नागरी हक्क कशा प्रकारे विकसित आणि विस्तारित करता येतील याचीही चर्चा महाराष्ट्रात झाली. नर्मदा बचाव आंदोलनाने विस्थापितांचे अधिकार आणि त्यांचे पुनर्वसन या मुद्यावर मोठ्या प्रमाणात आंदोलन छेडले. स्त्रियांचे अधिकार, आदिवासींचे अधिकार, बालकांचे अधिकार, एलजीटीजी (लेसिबयन, गे आणि ट्रान्सजेंडर) यांचे अधिकार आणि स्थलांतरितांचे अधिकार याबाबतही काही प्रमाणात चर्चा झाली, परंतु फारशी सैद्धांतिक मांडणी झाली नाही.

समकालीन मराठी समाजावर हिंदुत्वाच्या विचारांचा पगडा असला तरी या विचारांना मराठी चर्चाविश्वावर आपले प्रभुत्व लादता आलेले नाही. समकालीन मराठी वैचारिक विश्वामध्ये गेल्या १५-२० वर्षांत महाराष्ट्रामध्ये ज्या चळवळी झाल्या आणि जे विचारमंथन झाले, त्याचाच प्रभाव मोठ्या प्रमाणात शिल्लक राहिलेला आपल्याला दिसतो. मार्क्सवाद, आंबेडकरवाद आणि रॉयवाद यांचा विचार केला तर या क्षेत्रात फारसे नवे लिखाण झालेले नाही. डॉ. आंबेडकरांच्या विचारांचा गेल्या १५ वर्षांमध्ये सर्वदूर असा प्रभाव पडलेला दिसून येतो. जगभर त्यांच्या विचारांना आता मान्यता प्राप्त होत आहे. पण मराठीमध्ये आंबेडकरवादावर किंवा फुले-आंबेडकरवादावर सर्जनशील अशी चर्चा झालेली नाही. एकेकाळी प्रभावी असणारा रॉयवादी विचार प्रभावशून्य झाला आहे. थोडक्यात सांगावयाचे झाले, तर मराठी चर्चाविश्व अशा टप्प्यावर उभे आहे, की त्याला नव्या प्रबोधनाची, नव्या सर्जनाची प्रतीक्षा आहे. जागतिकीकरणामुळे झपाट्याने बदलत जाणाऱ्या मराठी समाजापुढील समस्यांचा त्यास वेध घ्यावा लागणार आहे.

**- डॉ. अशोक चौसाळकर**
भ्रमणध्वनी : ९४२११७२८६८


# कसले सत्य अन् कशाचे वास्तव!

जयदेव डोळे

**गतवर्षापासून 'पोस्टट्रुथ' हा शब्द प्रचंड गाजतो आहे. जगातल्या साऱ्या भाषांत तो पोहोचला आहे. अमेरिकेची अध्यक्षीय निवडणूक आणि युरोपचे राजकारण जगातल्या साऱ्या माध्यमांनी चर्चिले आणि त्यासोबत हा शब्दही रुजला. इतक्या प्रचंड गाजलेल्या शब्दाचा अर्थ काय? मराठी माध्यमविश्वाशी त्याचा संबंध काय? या प्रश्नांचा वेध घेणारा हा लेख...**

**आ**ता झाली का पंचाईत! 'पोस्ट' या शब्दानंतर 'ऑफिस' येते आणि सध्या तर त्या ऑफिसात जाण्याचीही वेळ येत नाही. मग हे पोस्ट लागलेले ट्रुथ कोणते? सत्याचेही प्रकार सुरू झाले की काय? आजकाल 'ट्रुथ' हा शब्दही फार क्वचित समोर येतो. जे चाललं आहे टीव्हीत अन् पेपरांत ते सारे खरेच असते असे समजून चाललाय अवघा महाराष्ट्र. खरे नसते तर दाखवले असते का त्यांनी? छापले असते का ते? नाही ना? मग हे सत्य आहे किंवा हे सत्यापार आहे असे कसे होईल? उगाच काहीतरी चिवडीत बसायची सवयच जडलीय या टीव्हीवाल्यांना अन् पेपरवाल्यांना...

काय करणार, महाराष्ट्र असा नव्या वैचारिक, सैद्धांतिक वादात मागे पडू लागलाय. त्यामुळे त्याला 'पोस्ट' हा प्रत्यय लागून, गाजून निवृत्तही झालेले काही जागतिक वाद माहितही नाहीत. पोस्टमॉडर्निझम, पोस्टस्ट्रक्चरॅलिझम, पोस्टइंडस्ट्रियालिझम... या संज्ञा मराठीत अगदी मोजक्या अशा विचारकांपुरत्या फिरल्या, जिरल्या अन् विरल्या. विद्यापीठांतले मूठभर प्राध्यापक, त्यांचे लेखन आणि त्यांचे वाचक (म्हणजे तेच स्वतः) यांतच हे पोस्टवाले वाद झडायचे आणि झडून जायचे. ना लोकांचा संबंध, ना जनतेला काही देणेघेणे.



अशाच पोस्टवाल्या वादांपैकी पोस्टट्रुथ हा एक. अगदी पक्का वैचारिक वा गणिती टप्प्यांसारखा तो वाद नाही. समाजाची एक वृत्ती म्हणा, वळण म्हणा किंवा लागलेली एक सवय म्हणा, ती अधिक प्रकटू लागली. ती एकाच्या लक्षात आली. त्याने त्याबद्दल एक पद्धतशीर मांडणी केली. झाला एक विचार तयार. २००४ साली राल्फ कीज नामक एका अमेरिकन प्राध्यापक लेखकाचे 'द पोस्टट्रुथ एरा-डिसऑनेस्टी अॅण्ड डिसेप्शन इन कंटेम्परारी लाइफ' असे एक पुस्तक प्रसिद्ध झाले. तेव्हापासून एक अनुभव सैद्धांतिक होऊन बसला. त्याचे म्हणणे असे होते की, एके काळी आपल्यापाशी सत्य आणि असत्य असे. आता आपल्याकडे सत्य, असत्य आणि सत्य नसलेली विधाने असतात, मात्र ती खोटी आहेत असे ठरवण्याइतपत आपण उदार नसतो. मग मिथ्या गौरव वाढत जातो. आपण 'सत्याबाबत काटकसरी' होऊन जातो. आपण 'सत्य मधुर' करून टाकतो किंवा एक 'सुधारित सत्य' सांगायला लागतो. फसवणूक या शब्दाला आडवळणाने वापरू लागतो. 'बोलताना चुकलो' असे आपण म्हणू लागतो किंवा 'समजुतीत घोटाळा झाला' असे कबूल करतो. त्याचवेळी आपण इतरांना ते खोटारडे ठरवण्याचे टाळतो. आपण असे म्हणतो की, ''ते निषेध व्यक्त करीत आहेत. खोटे बोलणारी व्यक्ती 'नैतिकदृष्ट्या शबल' आहे असे आपण म्हणू लागतो. एखाद्याला 'सत्य तात्पुरत्या काळासाठी सापडत नाही' असे ठरवून टाकतो. हा काळ म्हणजे 'पोस्टट्रुथ'. या काळात सत्य व खोटेपणा यांमधील सीमा पुसट होतात. प्रामाणिकपणा व लबाडी यांतले अंतर मिटते. इतरांना फसवणे एक आव्हान बनत जाते आणि अखेरीस याची सवय होऊन जाते. तो खेळही बनतो.''

विकिपीडियाचा एक वेगळाच अर्थ आहे. त्यात म्हटले आहे, की पोस्टट्रुथ म्हणजे वस्तुस्थिती काहीही असो, भावनांना साद घालणारे वादविवादच खरे असे जिथे ठरते ते म्हणजे पोस्टट्रुथ राजकारण. म्हणजे तर्क, विवेक, पुरावे, आधार यांचा संबंध झुगारायचा. आणि भावनांना जे योग्य वाटते तेच खरे मानायचे हे झाले पोस्टट्रुथ! सत्यापार अथवा सत्योत्तर वागणे, मानणे! २०१६ साली ऑक्सफर्ड शब्दकोशाचा 'वर्ड ऑफ द इयर' म्हणून पोस्टट्रुथने बाजी मारली होती. अमेरिकन अध्यक्षीय निवडणूक व ब्रेग्झिटचे जनमत यांत या शब्दाचा, प्रवृत्तीचा इतका अनुभव आला की तो त्या वर्षीचा सर्वोत्कृष्ट शब्द ठरला. या बाबतीत राल्फ कीज म्हणतो की, 'आपण खोटे बोलतो आणि त्याची लाजही वाटून घेत नाही, काहीही कारण नसताना आपण खोटे बोलत राहतो... यालाच मी पोस्टट्रुथ युग म्हणतो.'

कीजचे पुस्तक २००४ साली प्रसिद्ध झाले, तेव्हा त्याचा फार गाजावाजा झाला नाही. २०१६ मध्ये मात्र त्याचा शब्द प्रचंड गाजला. जगातल्या साऱ्या भाषांत तो पोहोचला. अमेरिकेची निवडणूक आणि युरोपचे राजकारण जगातल्या साऱ्या माध्यमांनी चर्चिले आणि त्यासोबत हा शब्दही रुजला, पण कीजने खोटे बोलण्याचा मानवी स्वभाव ठसवून काही उदाहरणे देत आणि ती समाजाने सहन करीत जगण्यात एक तत्त्वज्ञान शोधले. विकत घेतलेल्या पदव्या व सन्मान गुणवत्तेवर मिळाल्याचे सांगणे, प्रतिष्ठित संस्थांत शिकल्याचे खोटे नोंदणे, शिक्षण झालेच नसताना ते झाल्याचे नोंदवणे, सहभाग नसतानाही तो असल्याचे सांगणे, जात लपवणे व भलतीच सांगणे, विधान केल्यावरही ते विपर्यस्त छापून आल्याचे बजावणे, पत्रकारांनी वेडेवाकडे प्रसिद्ध केल्याची बतावणी करणे असे कित्येक नमुने माध्यमांमधूनच समाजासमोर येत-जात असतात. बढाया मारणे आणि बतावणी करणे हा मनुष्याचा स्वभाव असल्याचे कीज मानतो. परंतु तो नुकसानकारक असतो म्हणून तो अनुचित असल्याचेही तो मान्य करतो.

आता आपण आपल्या विषयाकडे जाऊ. माध्यमांना पोस्टट्रुथची लागण होणे जितके स्वाभाविक आहे तितका त्याचा भासही. कारण पत्रकारिता स्वत:ला सत्यवादी, सत्यनिष्ठ आणि सत्योपासक मानते. तसे सारे व्यवसाय सत्य-विश्वास-निष्ठा यांवरच तगतात, पण पत्रकारितेची जबाबदारी सामाजिक व सार्वजनिक इतरांपेक्षा अधिक असते म्हणून तिने सत्यधर्म पाळलाच पाहिजे, असा समाजाचा, देशाचा आग्रह असतो. तरीही सत्य नावाची अद्भुत गोष्ट आपल्यालाच प्राप्त झाल्याचा दावा कोणी करू नये, असा पत्रकारितेचा प्रघात आहे. एक तर पत्रकारिता घाईचा, धांदलीचा अन् वेगाने माहिती देण्याघेण्याचा व्यवसाय आहे. त्यामुळे सत्यापेक्षा वास्तव आणि वास्तवही तुकड्यातुकड्याने गोळा होत असल्याने पूर्ण किंवा अंतिम सत्य कोणीही मिळवू शकत नाही. दुसरे, शब्द-जागा-वेळ अशा मर्यादेत पत्रकारिता वावरते, म्हणून कथनावरही खूप निर्बंध येत असतात.

नोबेलविजेत्या दोन अर्थशास्त्रज्ञांनी माहितीची शुद्धता आणि अचूकता यांचा खूप आग्रह धरला आहे. अमर्त्य सेन आणि जोसेफ स्टिग्लित्झ हे ते दोघे विद्वान. सेन म्हणतात, की माहिती विनाअडथळा आणि अचूक दिली तर तीवर योग्य निर्णय घेणे सोपे जाते. शिवाय ज्या देशात माहितीची देवाणघेवाण सुरळीत चालते त्या देशाची लोकशाही निरोगी आणि बळकट राहते. स्टिग्लित्झ म्हणतात, की नागरिकांना मतदार म्हणून योग्य माहिती मिळाल्यास ते सुबुद्ध निर्णयन करू शकतात. माध्यमे पक्षपाती असली, की मात्र त्यांना संतुलित माहिती मिळू शकणार नाही. समजा, माध्यमे तटस्थ असली तरी सरकारकडून जी माहिती माध्यमांपाशी जाते ती तितकी विश्वासार्ह नसते, असेही नागरिक मानतात. स्टिग्लित्झ जॉन मेनार्ड केन्सचा आधार घेऊन म्हणतात, की माध्यमांची भरपूर संख्या असून चालत नाही. त्यांच्यावर नियंत्रण मोजक्यांचेच असेल तर त्या वैविध्याचा काय

उपयोग? त्यामुळे मालकीचेही वैविध्य टिकवायला पाहिजे.

पोस्टट्रुथचा तसा थेट संबंध मालकी, नियंत्रण आणि वाचकवर्ग यांच्याशी येत नाही. कीज यांनी व अलीकडच्या अनुभवांनी तो एक सामाजिक विकार असल्याचे सांगितले आहे. विकार म्हटला की ती प्रतिकारक्षमता घटल्यानेही उद्भवतो आणि प्रतिकार मोडून काढण्यासाठीही जन्मतो. डोनाल्ड ट्रम्प, नरेंद्र मोदी यांचे राजकारण या मार्गाने चालते. मराठी माध्यमे अजून तरी पोस्टट्रुथच्या विळख्यात सापडलेली दिसत नाहीत. हां, काही व्यक्ती, पक्ष, संघटना, जाती, धर्म, उद्योगपती, संस्था यांना ती हातही लावत नाहीत. मात्र त्यांनी दिलेल्या हकिकती, निवेदने, घटना नि:शंकपणे प्रसिद्ध करतात. कसलीही पडताळणी, शहानिशा न करता एखाद्याचे माहात्म्य वाढवण्याचाच हा प्रकार. संपादन कशाला म्हणतात हो? नुसते चूक-बरोबर तपासण्याला नाही, तर खरेपणा आणि अचूकता शोधण्याला म्हणतात. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शाखा इतक्या वाढल्या आणि स्वयंसेवकांची संख्या इतकी पोचली अशा बातम्या अक्षरश: भटजीच्या आदेशानुसार यज्ञात आहुती टाकावी त्याप्रमाणे छापल्या जातात. ना त्याची चिकित्सा, ना खातरजमा. मराठा जातीचे मोर्चे अमक्या आकडेवारीचेच छापा असा दबाव पत्रकारांवर आला आणि त्यांनी तो मानलासुद्धा. लाखालाखांचे आकडे कसलीही शोधाशोध न करता प्रत्येकाने प्रसिद्ध केले. हा खरा पोस्टट्रुथचा नमुना. प्रश्न भावनांचा होता. बलात्कार, खून, आत्महत्या, शिक्षण, बेकारी, दारिद्र्य, आरक्षण अशा मुद्द्यांचा सारा मामला. झाले! मराठा म्हटले की, वृत्तपत्रे वाकली आणि टीव्ही टुकटुक करीत राहिला. त्याला मराठा जातीचा वा सामाजिक मागासलेपणाचा कसलाही संबंध नाही, पण आरक्षण द्या असे एक बलाढ्य, पराक्रमी, कर्तृत्ववान, पुढारी जात म्हणू लागली आणि माध्यमे पोस्टट्रुथची प्रात्यक्षिके दाखवत बसली.

शेतकऱ्यांच्या आत्महत्या हाही पोस्टट्रुथचा एक आविष्कार! भावनांचा आधार घेऊनच जर चर्चा झडू लागल्या तर एकमत कसे व कशावर होणार आणि उपाय कोण, कसा सूचवणार? मुळात आत्महत्या हा भावनिक परिणाम. तिथेच तर्क, विवेक लुळे पडतात. त्यावरच्या चर्चा मग चांगल्याच भावनाशील होऊन जातात. धोरणे, निर्णय, राजकारण, अर्थकारण विचारात न घेता शेतकऱ्यांच्या आत्महत्यांची समस्या मराठी माध्यमे करीत राहतात. सोबतीला भावनिक राजकारणावरच सत्ता मिळवणारे पक्ष व नेते असतील तर मग संपलेच सारे. आता एकाएकी पोस्टट्रुथ म्हणजे सत्योत्तर घडामोडींची चर्चा होऊ लागली. कारण रा. स्व. संघ, भाजप, मजलिस-ए-इत्तेहादूल मुस्लिमिन, शिवसेना, मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड, ब्राह्मण महासंघ, विश्व हिंदू परिषद, बौद्ध महासभा, इ. संघटना कोठे ना कोठे सत्तेत बसू लागल्या. सत्ता आणि सत्य यांचे वैर जगजाहीर आहे. सत्तेपुढे शहाणपण चालत नाही, अशी म्हणच मराठीत आहे. राष्ट्रवाद व राष्ट्रद्रोह, धर्मनिरपेक्ष व सश्रद्ध, डावे व उजवे, उदारमतवादी व कट्टर अशा दुरंगी व दुहेरी वादांत सारी माध्यमे अडकून गेली. सत्य काहीही असो, भावनिक धक्का व छळ असा काही फणा उगारून बसू लागला की त्यापुढे न्यायालयेसुद्धा गांगरली. 'नीट' परीक्षेला आव्हान देणाऱ्या विद्यार्थिनीने आत्महत्या केल्यानंतर तमिळनाडूत जी आंदोलने झाली ती थांबवा असा आदेश सरकारला सर्वोच्च न्यायालयाकडून मिळाला, पण त्यात चार दिवस गेले. कोणी ऐकायच्या तयारीत नव्हते. सारे वातावरण भावुक बनलेले. सर्वोच्च न्यायालयात मग आव्हान का द्यायचे? एकदा त्याचा निर्णय मिळाला, की तो पाळलाच पाहिजे. जीव देऊन तो बदलेल कसा?

मराठी माध्यमांनी राष्ट्रवाद्यांवर इतका भरोसा ठेवला, की त्यांच्याकडून होणारे हल्ले, हत्या आणि हिणकस वर्तन मुळात जाऊन तपासलेच नाही. प्रत्येक पत्रकार त्याच्या खिशातल्या व्हॉटस्ॲप क्लिपवर व फेसबुकवरच्या बरळण्यावर भाळला आणि बनला की प्रचारक आणि स्वयंसेवक! पत्रकार म्हणून केवळ प्रतिमा, प्रतिमांकन, प्रतिबिंबे, प्रतिनिधित्व यांवर विश्वास ठेवायचा नसतो. वरवरच्या गोष्टीत बातमी असते, मात्र वास्तव नसते; ते वेगळेही असते असा पत्रकाराचा विचारच पूर्णपणे बारगळला. पत्रकार मराठा झाला, हिंदू म्हणून जागा झाला, राष्ट्रवादी म्हणून जन्मास आला आणि नोटबंदीची वाहवा करीत सुटला. मोबाईल मीडिया संपूर्णपणे व्यक्तिगत, व्यक्तिकेंद्री आणि समाजसुटा असल्याचे मराठी पत्रकार साफ विसरला. संपादनाची प्रक्रियाच जिथे अदृश्य तिथून येणारी माहिती खरी असण्याचा प्रश्नच नसतो. ही प्राथमिक सावधगिरी पत्रकार पाळेनासे झाले. मोबाईल मीडिया शंभर टक्के असत्य, धादांत खोटे, सपशेल लबाडीचे अन् संपूर्ण बनावट असे काहीही देऊ शकतो, ही साधी बाब पत्रकाराने नजरेआड कशी काय केली? एक राजकीय पक्ष सत्तासंपादनासाठी या पर्यायी माध्यमाचा वापर करतो काय, अन् विजयी होतो काय, पत्रकारासारखा संशयी, शंकेखोर माणूस पाघळतो कसा? या ई-माध्यमातून सत्य झरत नसते हे काय पत्रकार जाणत नव्हता?

थोडे मागे जाऊ. मायस्पेस, फेसबुक, यू-ट्यूब यांचा काळ फार जुना नाही झाला. त्याहीआधी इंटरनेट, ईमेल यांनी खरी ओळख लपवून वागण्या-बोलण्याची मुभा साऱ्यांना नव्हती का दिली? इंटरनेट जन्मले आणि अचूकता, विश्वासार्हता, सत्य, वस्तुस्थिती या साऱ्यांना शंकेचा डंख लागला. अवघे विषाक्त झाले. माहिती-प्रचार-जाहिरात-वास्तव-कथा-खबर साऱ्यांची भेसळ होत चालली. वेबमार्फत जे जे मिळू लागले त्यातले थोडेच नि:शंक मनाने स्वीकारणे सुरू झाले. इंटरनेटने पत्रकारितेतल्या चाळण्या, तपासण्या सारे धुडकावून

लावले. पत्रकारांना तर या असत्याचा परिचय होताच. 'वेब २.०' अशी ओळख मिरवणाऱ्या माहिती-तंत्रज्ञानाचे 'सत्य' असे उघडकीस येत होते. तेव्हा संपादनमुक्त यू-ट्युबवर अज्ञात, निनावी अथवा फसगत होईल अशी नावे टाकून व्हिडीओ अपलोड केले जायचे. आजही मोडतोड केलेले, विपर्यस्त, दिशाभूल करणारे चित्रीकरण प्रक्षेपित केले जाते आणि ते सत्य मानून दंगल, हिंसा, खून असे सारे घडत जातेही. प्रस्थापित माध्यमांत बदनामी, चारित्र्यहनन, मानहानी या गोष्टींसदर्भात कायदे आहेत. त्यांचा फायदाही लोक घेत असतात. परंतु वेब माध्यमांत बेगुमान, निर्लज्ज आणि निनावी माहिती टाकण्याची सोय असते. त्याचा लाभ भांडवलदार, राजकारणी, गुन्हेगार किंवा गंमत म्हणून सामान्य माणूसही घेत असतो. सनसनाटी आणि थरारक असे प्रसारण मग संबंधितांना उद्ध्वस्त करीत जाताना लोकशाही व्यवस्थेतला परस्पर विश्वासही नष्ट होत जातो. समाज अस्थिर, साशंक होऊन जातो. राष्ट्र, श्रद्धा, प्रेम, सेवा, उपकार, शेजारधर्म, मैत्री, नैतिकता, निष्ठा अशा असंख्य मानवी व्यवहारांवरचा त्याचा विश्वास उडून जातो. हीच वेळ कोणत्याही हुकूमशहाच्या स्वागताची असते. मी सारे ठीकठाक करीन, अच्छे दिन आणून देईन, मी देश पुन्हा महान करीन, चोरांना तुरुंगात टाकीन, भ्रष्टाचार निर्मूलन करीन... अशा बतावण्या करीत हुकूमशहा देशाचा ताबा घेत असतो.

बाजारही या अपप्रचारात हात धुवून घेतो. नफ्यासाठी, खप वाढावा म्हणून आणि आपली मक्तेदारी राहावी यासाठी बहुतेक कंपन्या 'पब्लिक रिलेशन्स' नामक फसव्या शब्दाआडून अनेक खोट्या गोष्टी समाजाला सांगत राहतात. खरेपणाचा आव आणत स्वत:स जेवढे फायद्याचे तेवढे मोजकेच कंपन्या बाजारात शिरवतात. आपली उत्पादने आणि सेवा मानवी भावभावनांना जोडून टाकण्याची हुशारी व कौशल्य त्यांनीच स्थापन केलेल्या जाहिरात कंपन्यांत असते. कसले सत्य अन् कशाचे वास्तव! जाहिरातींच्या सुंदर, भावविभोर, भावोत्पादक वातावरणात समाज वाहून जातो. रामदेव बाबा सध्या राष्ट्रवाद, स्वदेशी आणि आत्मविकास या तीन भावनिक मुद्द्यांवर मक्तेदार व्हायला निघालेले दिसतात. पण त्यांची बारा उत्पादने विविध प्रयोगशाळांनी फडतूस ठरवल्याचे सत्य कोणी सांगत नाही. सर्वात मोठे सत्योत्तर कथन म्हणजे भगवे कापड लपेटून सत्ता, प्रतिष्ठा, संपत्ती, मालमत्ता, प्रसिद्धी बिनदिक्कत मिळवणे सुरू झाले आहे. दाढी, जटा आणि आश्रम यांची धूळफेक करून बलात्कार करणारा एक बाबा नुकताच गजाआड गेला. या बाबाचे सत्य उघडकीस आणणारा पत्रकार सत्योत्तरवाल्यांनी संपवून टाकला, हे या भावनाशील, भावना नाजूक झाली सांगणाऱ्यांचे भयंकर वास्तव आहे. गौरी लंकेश यांची झालेली हत्या हेही त्याचेच उदाहरण म्हणता येईल.

मराठी माध्यमे इमोशनल बनवणे सुरू आहे का? बातम्या रूक्ष, कोरड्या व तर्कनिष्ठ असतात. अवघा अंक वा अवघे बातमीपत्र वाळवंटी होऊ नये म्हणून काही भावोत्कट प्रसंग, घटना यांना आवर्जून जागा दिली जाते. त्यात काही वावगेही नाही. पण माध्यमांनी इव्हेंट मॅनेजमेंटच्या निमित्ताने नेमके हिंदू सणवार-उत्सव-यात्रा-वाऱ्या-जत्रा-समारंभ आयोजित करून वा त्यांना भरपूर प्रसिद्धी देऊन विद्यमान सत्ताधाऱ्यांच्या खटाटोपांना मदतीचा हात देणे सुरू केले आहे. श्रावण, चातुर्मास, रमजान, नवरात्र, गणेशोत्सव, दिवाळी आदींचा उत्सव जरा जादाच होत चालला आहे, पण नकळत परंपरा, प्रथा, रितीरिवाज, कुलधर्म, कर्मकांडे या गोष्टींनाही बळकटी मिळते आहे. पुण्याच्या सोवळ्याने स्वयंपाकाच्या वादात दोन्ही स्त्रिया उच्चजातीय होत्या म्हणून चर्चा सामोपचाराची झाली. त्यातली स्वयंपाकी महिला दलित असती तर? काम सांगणारी महिला ओबीसी असती तर? सारे काही बाजूला पडून श्रद्धा, व्यक्तिस्वातंत्र्य, धर्माधिकार यांचा केवळ गहजब केला असता माध्यमांनीच.

राजस्थानातल्या शालेय अभ्यासक्रमात इतिहास आता राणाप्रताप अकबराविरुद्ध जिंकला असा शिकवला जाणार आहे. महाराष्ट्रात मराठी माध्यमात शिकणाऱ्यांना मुघलांचा इतिहास घटवून मराठ्यांचा जास्त शिकविला जाणार आहे. याला काही तर्क वा बैठक आहे का? नाही. मात्र भावनांवर सत्ता जिंकणारे असेच वागणार. बरे, मराठे आणि मुघल यांच्यात कमी-जास्त कसे करायचे? इतिहास असा 'सिलेक्टिव्ह' कसा शिकवायचा? पोस्टट्रुथ वातावरणात असे मोजका इतिहास शिकविणे मराठी माध्यमांना नक्कीच चालते. त्यांचे काम एका तासाची चर्चा घडवली अन् लेख-अग्रलेख लिहिले की झाले. चला, पुढच्या विषयाकडे! 'ब्रह्मं सत्य, जगन्मिथ्या' असे तत्त्व सांगणारा आपला देश सत्यापार विचार करणारा केवढा प्राचीन देश आहे पाहा! तोच विचार आजच्या राज्यकर्त्यांचा. त्यामुळे सत्य कोणते हे तेच सांगणार आणि मिथ्या काय हेही तेच बजावणार. माध्यमे बिचारी इतका तत्त्वनिष्ठ विचार कसा करू जाणतील? तरीही आपल्या काही पूर्वजांचा पगडा अन् पगड्या डोक्यावर असल्याने त्यांना बहकणे जमत नाही. ठीक आहे. संपादक अन् बातमीदार एकेक करून आपलेसे करवण्यात सध्याचे राज्यकर्ते तरबेज आहेत. तोवर बरे चाललेय असे म्हणू या!

**- जयदेव डोळे**
भ्रमणध्वनी : ९४२२३१६९८८
djaidev1957@gmail.com

# समकालीन लेखन आजच्या जगण्याला भिडू पाहते आहे...

**प्रवीण दशरथ बांदेकर**

**प्रत्येक पिढी आपापल्या माध्यमांतून आपापल्या काळाला साजेशी शैली घडवीत आपला आविष्कार करीत असते. आजच्या पिढीच्या साहित्याकडे पाहता, हे खरे असल्याचे दिसून येईल. इतकेच नव्हे, तर आजच्या गुंतागुंतीच्या वास्तवाचे संदर्भ लेखनातून व्यक्त करतानाही त्यातील कलात्मक-सांस्कृतिक मूल्य हरवले जाणार नाही, याचे भानही नवी पिढी दाखवत आहे...**

ज्युझे सारामागो नावाचा नोबेल पुरस्कार विजेता पोर्तुगीज लेखक आहे. 'ब्लाइंडनेस' ही त्याची अतिशय गाजलेली कादंबरी. या कादंबरीत एक विचित्र घटना घडताना दाखवली आहे. गावातली माणसं एकामागून एक संसर्ग होत जात आंधळी होत जातात. सर्वत्र अंदाधुंदी माजते. एका टप्प्यावर या कादंबरीतील एक पात्र म्हणते : हवा-पाणी-अन्न झपाट्यानं नष्ट होत चाललं आहे, आपल्या वाट्याचा काळ संपत आला आहे, आपलं जगणं संपत चाललं आहे... मानवजातीचा शेवट जवळ आला आहे.

मला हे खरं तर आजच्या काळावरचं अस्वस्थ करणारं भाष्य वाटतं. स्थिर वातावरणात अचानक काही बदल होऊ लागले, की त्याची जाणीव सर्वप्रथम काही पक्षी आणि प्राण्यांना होते. बहुधा त्यांना काही विशिष्ट संकेत मिळू लागतात, नि ते मग इतरांना सावध करण्यासाठी ओरडू लागतात. मला वाटतं, लेखक-कवी-कलावंतांचंही असंच काहीसं असतं. इतरांना न दिसणारं, न जाणवणारं असं काहीतरी त्यांना दिसत असतं. जणू त्यांचं सहावं इंद्रिय (Sixth



Sense) किंवा त्यांचा अदृश्य तिसरा डोळा त्यांना या काही इतरांना न जाणवणाऱ्या गोष्टींचा अनुभव देत असतो. झपाट्यानं बदलत चाललेल्या भोवतालच्या वास्तवाविषयी लेखक-कवींना सगळ्यात आधी जाणीव होऊ लागते, नि इतरांना सावध करण्यासाठी आपल्याला गवसलेलं जगण्यातलं सत्य आणि सत्त्व ते शब्दांतून मांडू पाहतात. म्हणूनच आज जागतिकीकरण आणि त्याच्या जोडीनं मूलतत्त्ववादी विचारांचा विळखा आपल्या भाषा, धर्म, संस्कृती, रूढीपरंपरा, सणवार अशा सगळ्या सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि राजकीय जीवनव्यवहारांना लगडून राहिलेला असताना त्याची जाणीव सर्वात आधी समकालीन लेखक-कवींना न होती तरच नवल होतं. आजचं साहित्य हे कालच्या पिढीच्या खांद्यावर उभं असलं तरीसुद्धा ते परंपरेतील सत्त्व घेऊन आपली स्वतंत्र वाट चोखाळताना दिसत आहे. या पिढीला सापडलेली ही स्वतंत्र वाट आजच्या संक्रमणाच्या आणि पडझडीच्या काळाचा ठसा असलेली आहे. या काळाचे आणि काळाने उभ्या केलेल्या नैतिक प्रश्नांचे ज्या लेखक-कवींना भान आहे, त्यांनाच खऱ्या अर्थाने आजच्या काळाचे लेखक म्हणता येईल. असे लेखक, कवी कोणते आहेत? कितीसे आहेत? लिहिण्यावाचण्याचा सुकाळ खेड्यापाड्यांपर्यंत पोचल्यावर शब्दांचं हे हत्यार जबाबदारीनं वापरून आपल्या समकालीन जगण्यातील ताणतणाव, व्यवस्थेने निर्माण केलेले पेच, मानवी मूल्यांची पडझड आणि या सगळ्याच्या अनुषंगानं शाश्वत सत्याचा शोध घेणारे लिहिते हात नेमके कोणते आहेत? या प्रश्नांचा शोध घेतानाही समकालीन जगण्याचा वेध घेणारे किंवा काळासोबत जाणारे या संकल्पनांबाबतच भल्याभल्यांच्या मनात गोंधळ असल्याचं दिसून येत आहे. अलीकडेच आलेला एका चर्चासत्रातील एक अनुभव या निमित्तानं सांगावासा वाटतो...

काही दिवसांमागे एका महाविद्यालयाने आयोजित केलेल्या चर्चासत्राला उपस्थित राहण्याची संधी मिळाली होती. चर्चासत्राचा विषय होता-ह'गेल्या पंचवीस वर्षांतील मराठी साहित्य.' याचा अर्थ, सहभागी वक्ते वा निबंधवाचकांना एकेका वाङ्मयप्रकाराच्या अनुषंगाने गेल्या जवळपास पंचविसेक वर्षांत, म्हणजे साधारणतः नव्वदच्या दशकात स्वीकारलेल्या जागतिकीकरणानंतरच्या कालखंडात मराठीत काय नवं घडतं आहे, त्याला नव्या कवी-लेखकांचा कसा प्रतिसाद मिळतो आहे, याविषयीची आपली निरीक्षणं नोंदवणं अभिप्रेत होतं. मात्र तरीही अनेक जण मराठी साहित्याचा गेल्या शंभरेक वर्षांच्या इतिहासाचा आढावा घेण्यातच अडकून पडलेले दिसत होते. मराठीच्या प्राध्यापकांचे दोन अतिशय आवडते शब्द आहेत- प्राचीन साहित्य आणि अर्वाचीन साहित्य. 'प्राचीन साहित्य' म्हणताना प्रामुख्याने संत साहित्य आणि 'अर्वाचीन साहित्य' म्हणताना मर्ढेकर-करंदीकर-नेमाडे-चित्रे-कोलटकर-सुर्वे-ढसाळ यांच्या पलीकडे चर्चेची मांडणी जात नाही. गेल्या पंचविसेक वर्षांपासून जागतिकीकरणोत्तर कालखंडात मराठी साहित्यात किती मूलगामी परिणाम परिवर्तन घडू लागले आहे, एकूणच मानवी आयुष्यात घडणाऱ्या परिवर्तनाला ते कसे समांतर जाते आहे, लिहिणारी नवी मंडळी काळाची दुखरी नस पकडण्यासाठी कशी धडपड करीत आहेत, हे या प्राचीन-अर्वाचीनमध्येच पीन अडकलेल्या प्राध्यापक-समीक्षकांच्या गावीही नसते. किंवा फार फार तर एखाद्या विशिष्ट कालखंडाची मांडणी करणे म्हणजे त्या कालखंडातील लेखक, कवी व त्यांची पुस्तके यांचा आढावा घेणे इतपत त्यांचे पाऊल पुढे पडत असते. पण त्या कालखंडातील मूल्यपरिवर्तन, ते परिवर्तन घडवून आणायला कारणीभूत ठरलेल्या राजकीय-सांस्कृतिक-आर्थिक घडामोडी, लेखक-कवींची बदलत्या काळानुसार बदललेली भाषा, शैली, रचनाबंध वगैरेंचा विचार फार क्वचितच होताना दिसतो. या चर्चासत्रात एका प्राध्यापक-समीक्षकांनी कथेवरील निबंध वाचला होता. गेल्या पंचवीस वर्षांतील कथेवर बोलताना या निबंधवाचक समीक्षकाने समकालीन महत्त्वाच्या कथाकारांवर बोलणे, कोणत्या मूल्यांच्या निकषावर हे कथाकार समकालीन ठरतायत याची चर्चा करणे अपेक्षित होते. पण यांच्या निबंधाची वेळ आणि शब्दमर्यादा संपली तरी त्यांच्या आढाव्याची गाडी श्याम मनोहर आणि विलास सारंग यांच्या पुढे सरकलीच नाही. या निबंधावरच्या चर्चेत अर्थातच मग जयंत पवार, आसाराम लोमटे यांच्यासारखे या पिढीतील कथेसाठी साहित्य अकादमी पुरस्कार मिळालेले कथाकार किंवा किरण गुरव, प्रणव सखदेव यांच्यासारखे नव्या पिढीतील लक्षणीय कथाकार यांचा साधा उल्लेखही का केला नाही, यावर प्रश्न उपस्थित केले गेले. यावर त्या निबंधवाचक प्राध्यापक-समीक्षकाचे म्हणणे होते, की हे लेखक आजच्या काळात लिहीत असले तरी त्यांच्या लेखनात श्याम मनोहर, विलास सारंग यांच्याप्रमाणे आजच्या विस्कटलेल्या काळाचे चित्र आणि काळामुळे मोडतोड झालेली भाषा दिसत नाही. त्यामुळे या नव्या लोकांपेक्षा आधीचेच आजच्या काळाचे लेखक ठरतायत वगैरे... हा त्याचा खुलासा म्हटला तर धक्कादायक, म्हटला तर हास्यास्पद होता. जयंत पवार, आसाराम लोमटे यांच्या कथा या प्राध्यापक महाशयांनी नक्की वाचल्यायत का, त्यातील समकालीन आशयसूत्रे, भाषाशैली, रचनेचे प्रयोग हे सगळं यांना कळलं नाहीये का, अशी शंका यावी इतपत हा खुलासा बालीश होता. कदाचित सारंग-मनोहर लिहीत असलेले सत्यकथानिष्ठ संवेदनांचे निव्वळ रूपवादी साहित्य म्हणजेच नव्या काळाचे साहित्य असा काहीतरी या प्राध्यापकांचा समज असावा. काहीही असो, पण या निमित्ताने आजच्या काळाचे साहित्य म्हणजे नेमके कोणते साहित्य या विषयी अभ्यासकांमध्ये असलेला गोंधळ आणि या विषयाचा गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे, हे मात्र जाणवून आले.

गेल्या दोनेक दशकभरातील मराठी साहित्य अभ्यासताना या साहित्याचे स्वरूप आजवरच्या मराठी साहित्यापेक्षा कितीतरी बदलले असल्याचे लक्षात येते. हा बदल प्रामुख्याने या साहित्यातील आशय आणि तंत्रांच्या अंगाने आहे, हेही सहज जाणवते. प्रामुख्याने नव्वदच्या दशकापासूनच साहित्यातील या बदलांना प्रारंभ झालेला दिसतो. त्यामुळे हे साहित्य 'नव्वदोत्तरी साहित्य' म्हणूनही संबोधले जाऊ लागले आहे. 'नव्वदोत्तर साहित्य' ही संकल्पना आपणाला विशिष्ट कालदर्शक अर्थाने जशी विचारात घ्यावी लागते, तशीच ती विशिष्ट मूल्यव्यूहदर्शक अर्थानेही विचारात घ्यावी लागते. आधुनिक महाराष्ट्राच्या सांस्कृतिक व वाङ्मयीन जीवनावर दूरगामी परिणाम करणारा कालखंड म्हणूनही नव्वदचे दशक महत्त्वाचे ठरलेले दिसून येते. नव्वदचे दशक हे आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या क्रांतिकारक असेच दशक आहे. याच दशकात आपल्याकडे खुल्या आर्थिक धोरणाच्या स्वीकारानंतर एका नव्या आर्थिक क्रांतीला प्रारंभ झालेला दिसतो. जागतिकीकरणाच्या अपरिहार्य परिणामांमुळे महानगर व खेडे यांच्या जीवनशैलीमध्ये झपाट्याने बदल होऊ लागले होते. महानगरीय संवेदनांची खेड्यापाड्यांतील पारंपरिक मूल्य-संवेदनांशी सरमिसळ होऊ लागली होती. जागतिकीकरणाच्या जोडीला मंडलवाद, अयोध्या-बाबरी मशिदकांड, बॉम्बस्फोट, जातीय व धार्मिक दंगली, गोध्राकांड, दहशतवादी कारवाया यांसारख्या घटनाही सर्वसामान्यांचे जगणे अस्थिर, असुरक्षित बनवीत होत्या. आधुनिक महाराष्ट्राच्या सांस्कृतिक व वाङ्मयीन जीवनावरही या साऱ्याचा दूरगामी परिणाम दिसू लागला होता. किंबहुना याच काळात जागतिक स्तरावरील व्यापार-अर्थकारण-संस्कृती-राजकारण-दहशतवाद यांसारख्या घटकांशी सर्वसामान्य माणसाचे रोजचे जगणे-मरणे, विचार करणे वा बथ्थड होणे, प्रतिक्रिया देणे वा काहीच न करता निष्क्रिय होणे किंवा एकूणच आपले सगळे अस्तित्व अधिक तीव्रपणे जोडले गेल्यामुळे या कालखंडाचा प्रभाव जीवनाच्या सर्वच क्षेत्रांवर पडलेला जाणवतो.

या काळाचे भान राखून आजच्या या गोंधळाच्या, विस्कळीत झालेल्या नव्या वास्तवाची मांडणी करणारे, बदलत्या काळाला प्रतिसाद देणारे साहित्य नव्या पिढीकडून आज लिहिले जाणे अपेक्षित होते. या अपेक्षांना आजच्या पिढीचे लेखन बऱ्यापैकी खरे ठरते आहे, असे म्हणता येईल. या साहित्याचे आजच्या काळाला साजेसे संमिश्र स्वरूप लक्षात घेता, आधीच्या पिढ्यांप्रमाणे महानगरी, ग्रामीण, दलित, स्त्रीवादी, देशीवादी असे रूढ पद्धतीचे वर्गीकरण न करणे चुकीचेच ठरेल. त्याऐवजी आजचे हे लेखक-कवी जागतिकीकरणाची संवेदना मांडणारे 'बहुजनवादी आवाजा'चे साहित्यिक आहेत, असे म्हणणे अधिक सयुक्तिक ठरेल. या बहुजनवादी आवाजात भुजंग मेश्राम, अरुण काळे, प्रज्ञा पवार, महेंद्र भवरे, अविनाश गायकवाड, जी. के. ऐनापुरे, राकेश वानखेडे यांसारखे आंबेडकरी विचारव्यूह लेखनाच्या केंद्रस्थानी मानणारे साहित्यिक; श्रीधर तिळवे, हेमंत दिवटे, वर्जेश सोळंकी, सलील वाघ, मंगेश काळे, इग्नेशियस डायस, महेशलीलापंडित यांसारखे 'एंड ऑफ आयडियालॉजी' म्हणत कोणतीही एक ठरावीक विचारसरणी न अनुसरणारे व चिन्हसंस्कृतीला प्राधान्य देणारे महानगरीय कवी; इंद्रजीत भालेराव, सदानंद देशमुख, रमेश इंगळे-उत्रादकर, आसाराम लोमटे, महेंद्र कदम, कृष्णात खोत, किरण गुरव, सीताराम सावंत, श्रीकांत देशमुख, संतोष पवार, पी. विठ्ठल, रवी कोरडे, ऐश्वर्य पाटेकर, कल्पना दुधाळ यांसारखे ग्रामीण कृषिजीवनातील सांस्कृतिक व सामाजिक बदलांचा वेध घेणारे लेखक-कवी; जयंत पवार, गणेश विसपुते, वीरधवल परब, आनंद विंगकर, बबन मिंडे, राहुल कोसंबी, सुशीलकुमार शिंदे यांसारखे विशिष्ट राजकीय, सामाजिक भूमिका मानणारे लेखक-कवी; कविता महाजन, मेघना पेठे, मकरंद साठे, नीरजा, प्रशांत बागड, प्रणव सखदेव, महेश लोंढे, संजय भास्कर जोशी, अवधुत डोंगरे, गणेश मतकरी, ऋषिकेश गुप्ते यांसारखे महानगरीय जीवनसंघर्षाच्या पार्श्वभूमीवर आधुनिक जगण्यातील ताणतणाव, कोलाहल मांडणारे लेखक-कवी किंवा दासू वैद्य, अजीम नवाझ राही, श्रीधर नांदेडकर, अजय कांडर, रफिक सूरज, वीरा राठोड, फेलिक्स डिसोजा, मेनका धुमाळे, सुचिता खल्लाळ अशा जात-प्रदेश-लिंग-व्यवसाय-दृष्टिकोनभिन्नत्व असलेल्या तरीही समवृत्तीच्या साहित्यिकांचा समावेश होऊ शकतो. या सर्वच साहित्यिकांमध्ये समान असलेली एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे आपापल्या अनुभवक्षेत्रांशी प्रामाणिक आहेत. स्वतःच्या जगण्याच्या अनुषंगाने आपल्या काळाविषयी, काळाने उभ्या केलेल्या विविध प्रश्नांविषयी, सामान्य माणसाचं अस्तित्व ओरबाडणाऱ्या नव्या व्यवस्थेविषयी हे सर्वजण बोलत आहेत. ते ज्या भाषेत बोलत आहेत ती आजच्या वर्तमान व्यवस्थेचीच भाषा आहे. लिहिणे ही एकाच वेळी आत्मशोधाच्या वर्तमानाला दिलेली प्रतिक्रिया आणि एक सामाजिक कृती आहे, अशी भूमिका घेऊन लिहिणारे लोक मोठ्या संख्येने या काळात दिसत आहेत.

कालपरवापर्यंतचे बव्हंशी मराठी साहित्य हे प्रामुख्याने पाश्चात्य सौंदर्यकल्पनांच्या उसनवारीवर आधारलेले आणि परपुष्ट असेच होते. भारतीय मातीतल्या प्रश्नांना भिडण्याचे, भारतीय समाजमनाचा शोध घेण्याचे प्रयत्न अपवादानेच आढळतात. पण चक्रधर-तुकाराम-बहिणाबाई-साने गुरुजी यांची अस्सल देशीय परंपरा मानणाऱ्या कवी-लेखकांची एक सशक्त परंपरा साठच्या दशकात निर्माण झाली. या परंपरेला पाश्चात्य आणि सनातनी मूल्ये मानणाऱ्या अभिजनांच्या विरोधात बंड करून उठलेल्या लघुअनियतकालिकांच्या चळवळीने आणि फुले-आंबेडकरी विचारव्यूह मानणाऱ्या कवी-लेखकांनी पाठबळ

पुरवले. तोच विचारवारसा घेऊन आजच्या जागतिकीकरणाच्या काळाचे प्रश्न सजगपणे आणि धिटाईने आजची पिढी मांडू पाहाते आहे. या नव्या कवी-लेखकांमध्ये पुण्या-मुंबईसारख्या महानगरांप्रमाणे महानगराबाहेरील छोट्या छोट्या शहरांतील, खेड्यापाड्यांतील अनेकांचा समावेश करावा लागेल. विशिष्ट राजकीय मूल्यधारा मानणारी, डोळसपणे सांस्कृतिक व्यवहाराची चिकित्सा करणारी आणि सर्वसामान्य माणसाला आस्थेच्या केंद्रस्थानी ठेवून लेखनव्यवहार करणारी ही पिढी आहे. रंजकतेपेक्षाही वाचकाच्या जाणिवा विकसित करण्यावर, विचारप्रवण बनवण्यावर भर देणारे हे नवे साहित्य आहे.

फेसबुक, इंटरनेटवरील ब्लॉग्ज वगैरे आधुनिक माध्यमांमधूनही अनेक प्रकारचे लेखन आपल्या समोर येते आहे. त्यामध्येही आजच्या काळाचे भान असलेले लेखन मोठ्या प्रमाणावर सापडते आहे. श्रीरंजन आवटे, बालाजी सुतार, अनिल साबळे, राहुल बनसोडे, जुई कुलकर्णी, योजना यादव, शर्मिष्ठा भोसले यांच्यासारखे लिहिते या माध्यामातून आपल्यासमोर येत आहेत. याखेरीज आजच्या काळाला जोखणाऱ्या या नव्या साहित्याचा अचूक लेखाजोखा मांडून डोळस मूल्यमापन करू पाहणारी अभ्यासू समीक्षकांची एक नवी पिढीही आज पुढे येत आहे. यामध्ये रणधीर शिंदे, नीतीन रिंढे, सचिन केतकर, रामचंद्र काळुंखे, नंदकुमार मोरे, उदय रोटे, शीतल पावसकर, दत्ता घोलप ही काही नावे महत्त्वाची आहेत. अनुवादाच्या क्षेत्रातही कविता महाजन, गणेश विसपुते, बलवंत जेऊरकर, पृथ्वीराज तौर, सुनिता डागा, प्रणव सखदेव अशी काही मंडळी गंभीरपणे काम करताना दिसत आहेत.

प्रत्येक पिढी आपापल्या माध्यमांतून आपापल्या काळाला साजेशी शैली घडवीत आपला आविष्कार करीत असते. आजच्या पिढीच्या साहित्याबाबत विचार करतानाही हे खरे असल्याचे दिसून येईल. त्यातही कथा, कादंबरी, नाटक या अन्य साहित्यप्रकारांपेक्षाही कवितेच्या बाबतीत हे जास्तच ठळकपणे जाणवून येते. आजच्या पिढीचे लेखन वाचत असताना अनेकदा या साहित्याला केवळ पारंपरिक रूप व आशयाशी परिचित असलेले अनेक जण नाके मुरडताना दिसतील. मात्र हे आजच्या जागतिकीकरणाच्या काळात वावरणाऱ्या पिढीचे लेखन आहे; या पिढीची भाषा, शैलीतंत्रे, अनुभव घेण्याची आणि तो व्यक्त करण्याची पद्धत हे सारेच आज बदलून गेलेले आहे, याचे भान बऱ्याचदा विसरले जाते. त्यामुळेच हे लेखन अनेकदा सर्वसामान्य रसिकांना आकलनाला कठीण, गद्यप्राय आणि रूक्ष वाटू शकते. तरीही आजचा गुंतागुंतीचा काळ समजून घेण्याची आस असलेल्या साक्षर आणि डोळस वाचकांना आजच्या पिढीचे हे साहित्य समजून घ्यायला अडचणी येतील असे वाटत नाही.

एकूणच असे म्हणता येते, की आधुनिक काळातील गुंतागुंतीच्या अस्वस्थ वास्तवाचे संदर्भ लेखनाच्या माध्यमातून व्यक्त करतानाही तिचे कलात्मक सांस्कृतिक मूल्य हरवले जाणार नाही, याचे भानही नव्या पिढीने दाखवले आहे. शेवटी, साहित्य ही आपल्यासहित भवतालच्या जगण्याला कवेत घेऊन काळाबरोबर पुढे जाणारी अद्‌भुत गोष्ट आहे; लेखनातून आपल्या व्यक्तिमत्त्वाचा लोप होऊ न देताही आपले सामाजिक चरित्र मांडता येते, हे ज्या ज्या लेखक - कवींनी ओळखले ते सारेच मराठी साहित्याच्या या विस्तारलेल्या अवकाशात आपापली मुद्रा उमटवण्यात यशस्वी होत आहेत, असेच म्हणावे लागेल.


**- प्रवीण दशरथ बांदेकर**

भ्रमणध्वनी : ९४२२४३६१००

samwadpravin@gmail.com



**ग्रंथाली**



## 'ग्रंथाली'चे मानाचे पान

**प्रस्तावना : डॉ. रघुनाथ माशेलकर**

"Maharashtra has an important role in India's history and its current development. Maharashtrian Diasporas have been visible in many countries and endeavours throughout the world. I am happy to see these contributions being recognized in his volume of Garje Marathi"

**- Padma Vibhushan Dr. Avinash Dixit.**

**गर्जे मराठी (इंग्रजी)**
**आनंद गानू / सुनिता गानू**
**मूल्य : १२५०/- रुपये । सवलतीत ८००/- रुपये**


**पाने ३६० (आकार रॉयल डेमी)**
**संपूर्ण रंगीत, हार्ड बाउंड**

# आहे संदर्भहीन तरीही...

दिनकर गांगल

**मला भीती वाटते, मी माझ्या पिढीपर्यंत आलेला वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोचवू शकलो असे जाणवत नाही त्याची. ना मी त्यापासून काही धडा पुढील पिढ्यांना देऊ शकलो, त्याची. आमच्या पिढीने ज्या कर्मकांडाला कडाडून विरोध केला, सतत ब्रेन स्टॉर्मिंगची कांक्षा बाळगली, आम्ही जिज्ञासा वाढावी हा ध्यास बाळगला, जीवनात आनंद असावा याकरता संस्कृतिकारण हा फंडा सुचवला, पण ते बाजूला पडून त्या जागी नवी कर्मकांडे आणून ठेवली जात आहेत का?**

'प्रभात चित्रमंडळा'च्या कार्यकारिणीची मीटिंग, मंडळाला पन्नास वर्षे होत आहेत म्हणून राजकमल स्टुडिओमधील किरण शांताराम यांच्या ऑफिसात चालू होती. सेक्रेटरी संतोष पाठारे याने 'मंडळा'चा सुवर्ण महोत्सव साजरा करण्याच्या विविध योजना सांगितल्या. हिंदी चित्रपट दिग्दर्शक श्याम बेनेगल यांच्या अध्यक्षतेखाली मान्यवर सल्लागारांची समिती नेमण्यात आली. तोपर्यंत मीटिंगमध्ये चहा-बिस्किटे आली होती. संतोषने आम्हा ज्येष्ठांना औपचारिकता म्हणून विचारले, ''तुम्हीही काही कार्यक्रम सुचवा ना!'' आम्ही तिघेच ज्येष्ठ होतो - सुधीर नांदगावकर, जयंत धर्माधिकारी आणि मी. किरण शांताराम हे जरी सत्तरीपार असले तरी त्यांचे व्यक्तिमत्त्व सदाबहार, हसतमुख; व्यवहाराची मार्मिक दृष्टी असलेले. आम्ही तिघे औपचारिकपणे काही बोललो, पण तरी आमच्या बोलण्यात म्हणून पाच-सात मिनिटे गेली होती. मला तो काळ एकाएकी भीषण वाटू लागला. मला आत गलबलून आले. मला सुचेना. मी गप्पांत हसून-खेळून सहभागी होतो, पण आत अस्वस्थतेने गडबडून गेलो होतो. वाटले, पूर्वी बरे होते, माणसांचे आयुष्य कमी होते. संस्थांचे रौप्य महोत्सव-सुवर्ण महोत्सव, माणसांचे जन्मशताब्दी समारोह संस्थापकांच्या पश्चात साजरे होत. नवीन लोक जे त्यांच्या जागी येत ते त्यांच्या पद्धतीने, संस्थापकांचे फोटो लावून वगैरे समारंभ साजरे करत! येथे आमची कर्तबगारी जोखण्याची वेळ आमच्यावर येऊन पडणार होती.



खरे तर, मीटिंग उत्तम चालू होती. संतोषने वर्षभराचा जो कार्यक्रम रचला होता, तो दर महिन्याला काही वैशिष्ट्ये प्रदर्शित करणारा होता. संतोषने मला तो प्रश्न विचारीपर्यंत मीटिंगमध्ये वावगे

काही माझ्या मनात आलेही नव्हते.

आम्ही 'प्रभात चित्रमंडळा'ची स्थापना १९६८ साली केली. मराठी चित्रपट प्रेक्षकांची अभिरुची संवर्धित व्हावी हा मूळ हेतू. त्याला अनुषंगिक असे अनेक उपक्रम वर्षानुगणिक गठित होत गेले. माणसे जमा होत गेली. रसिकजनांना नवनवे व देशोदेशींचे उत्तमोत्तम, आशयसंपन्न चित्रपट पाहण्यास मिळू लागले. ती एक झिंग होती. त्यातच माझ्यापुरता वेगळा फाटा फुटला, तो 'ग्रंथाली'चा. तिकडे साहित्य, वाचन असा बाज होता; सामाजिक डूब जास्त होती. 'प्रभात चित्रमंडळा'मध्ये सिनेमा पाहण्याची, कलेची समृद्धी खूप मोठी होती. चित्रपट माध्यमात कला आणि विज्ञान एकात्म होऊन समोर पडद्यावर साकारतात. ती भाषाच गेल्या शतकात वेगळी विकसित होत गेली आहे. कॅमेऱ्याची भाषा! ती चित्रभाषा शब्दाक्षरांपुढे जाते. आदिमानवाला निसर्ग व सभोवताल समोर आला आणि जितक्या स्वाभाविकपणे कळत गेला असेल, तितक्या सहजस्वाभाविकपणे मानवी डोळे आधुनिक काळात चित्रपट माध्यमात सारे जग पडद्यावर टिपत असतात. त्या दृश्यांची संगती लावताना माणसाची बुद्धिभावनाही तशीच नैसर्गिकपणे उपयोगात येत असते. माणसाला चित्रे वा चित्रपट पाहण्यासाठी, वाचन करण्याकरता जशी अक्षरभाषा शिकावी लागते तसे कोणतेही कौशल्य कमावावे लागत नाही. आदिमानव प्रथम चित्रभाषेतून बोलू लागला. ते मध्यप्रदेशातील भीमबेटका येथील चित्रे व कोकणातील कातळशिल्पे आणि जगभर सापडत असलेल्या प्राचीनतम वास्तू व कला यांमधून दिसून येते. माणसाची रुची तेथे चित्रे-चित्रपट पाहत पाहत घडत जाते; तो प्रगल्भावस्थेला पोचू शकतो. त्यामुळे फिल्म सोसायट्यांचे रसिक प्रेक्षक घडवण्याचे कार्य सद्यकाळात अनन्य महत्त्वाचे ठरते.

माणसाला चित्रपटतंत्राची किमया अक्षरभाषेचा शोध लागल्यानंतर दोन-पाच सहस्त्र वर्षांनी, गेल्या शतकात गवसली! दादासाहेब फाळके ती भारतदेशात घेऊन आले. ते तंत्र भाषा म्हणून गेल्या शतकभरात विकसित झाले. आम्ही 'प्रभात'च्या माध्यमातून त्या प्रक्रियेशी जोडले गेलो होतो. आम्ही प्रेक्षक म्हणून बिंदुरूपाने, अगदी दुरून का होईना पण अभिरुची संवर्धनाचे कारण घेऊन त्यात अजाणता सामील झालो होतो! 'प्रभात'ची स्थापना १९६८ ची. 'ग्रंथाली वाचक चळवळ' अनौपचारिक रीत्या सुरू झाली १९७४-७५ साली. ते दोन्ही अनुभव एकमेकांना पूरक होते. सहभागी कित्येक माणसेदेखील दोन्हींकडे तीच होती. त्या वेळी वातावरण कसे होते? स्वातंत्र्योत्तर पंधरा-वीस वर्षांनी समाजात मोठे बदल सुरू झाले. लोकांच्या आशा-अपेक्षा वाढू लागल्या. 'ग्रंथाली'मध्ये त्यांचे स्थानिक दर्शन होई. 'प्रभात'मध्ये त्यांचे राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय परिणाम कळून येत. तो काळ मोठा मौजेचा होता. जुने जाऊद्या मरणालागूनी, जाळूनी किंवा पुरूनी टाका' असे नवे काही रोज आकळत असल्याची जाणीव होती – अनेकविध माणसांच्या संपर्कातून आणि समोर जे स्थानिक व राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय प्रकट होत होते, त्यातून. लोकांच्या गाठीभेटी-बैठका-सभा 'प्रभात'च्या तुलनेत 'ग्रंथाली'मध्ये कितीतरी जास्त होत! बरोबरीच्या कार्यकर्त्यांची मने बैठकांमध्ये कळत. ज्येष्ठांचे विचारचिंतन डोक्यात सभांमध्ये घुसे. त्यामधून टीव्हीच्या जशा अनेक वाहिन्या असतात, तशा मनमेंदूच्या अनेकानेक वाहिन्या सतत सुरू असत/अजूनही असतात.

या पार्श्वभूमीवर, संतोषने मीटिंगमध्ये सहज म्हणून प्रश्न विचारला आणि मी धास्तावून गेलो, कारण माझ्या नजरेसमोर गेल्या पन्नास वर्षांतील घडामोडींचा चित्रपट सरसर सरकत गेला. त्यात तंत्राची नवलाई होती. जुनी मूल्ये अस्तंगत होऊन नव्या मूल्यांचा स्वीकार नव्या माध्यमांतून आणि चळवळी-आंदोलनांतून बिंबवला गेला होता. मनात आले, माझ्यावरच 'प्रभात'च्या सुवर्ण महोत्सवी कार्यक्रमाची जबाबदारी आली असती तर मी काय सुचवले असते? पाच वर्षांचा सुद्धा भविष्यवेध घेता येणे शक्य नाही अशा अस्थिर काळात मी स्थायी स्वरूपाच्या 'सौंदर्यशोध तत्त्वा'चे 'सेलिब्रेशन' करू शकलो असतो का? पुढील पन्नास वर्षांसाठी झेप घेण्याचा विचार तरी माझ्या मनात येऊ शकला असता का? मला एकाएकी संदर्भहीन वाटू लागले. माझ्या नजरेसमोर गेली पन्नास वर्षे प्रेतवत् पडली गेलेली दिसू लागली. सतीश आळेकरचे 'महानिर्वाण' नाटक आठवले. त्यामध्ये 'भाऊराव' हे प्रमुख पात्र, पडदा उघडत असताना प्रेत म्हणून पुढे पडलेले असते. भाऊरावाचा मुलगा नाना याच्यापुढील प्रश्न त्या प्रेताचा अंत्यविधी कसा करावा हा असतो... आणि मग खेळ सुरू होतो तो एक प्रेत आणि एक जिवंत माणूस यांच्यातील संभाषणाचा. तेच ते नाटक आहे. ब्लॅक कॉमेडी! चंद्रकांत काळे आणि स्वत: सतीश आळेकर यांनी रंगमंचावर मांडलेल्या आट्यापाट्या अजून अंगावर काटा उभा करतात. एक जमाना संपला आहे. त्यामधील मूल्यव्यवस्था हरवत आहे आणि नव्या जमान्याकडून नव्या संकेतांचा शोध चालू आहे, हे ते नाटक. आळेकरांनी ते नाटक लिहिले तो काळ परिस्थितीने अभावाचा होता – दूध कार्डावर मिळत होते, रॉकेल काळ्या बाजारात असे; पण मनात आशा होती, नवे शतक उगवायचे आहे!

लोक त्या काळात नवतेच्या, आधुनिकतेच्या शोधात वेगवेगळ्या क्षेत्रांत मुसंडी मारत होते. तरुण निर्मितीशील व संवेदनाक्षम असतात; ते सारे नव्या कशाच्या तरी शोधात होते. 'मराठी विज्ञान परिषद', 'स्त्रीमुक्ती संघटना', 'अंधश्रद्धा निर्मूलन समिती' यांच्या मोहिमांचे उद्दिष्ट स्पष्ट होते. त्यांना जांभेकर ते आंबेडकर या प्रबोधनकाळातून विचारसूत्र लाभले होते. त्यांना समाजातील अज्ञानांधकार दूर करायचा होता, पण बदलते जग समजावून घेण्यास उत्सुक आम्ही 'ग्रंथाली', 'प्रभात चित्रमंडळ', 'थिएटर ॲकॅडमी', आविष्कार' आणि तशा अनेक लहानमोठ्या संस्था, उपक्रम यांमध्ये एकत्र होत होतो. आम्हाला येथील माणसांची

मने कशी घडतात/घडवता येऊ शकतात का याचे कुतूहल होते. आम्हाला नाटकांतील नवे प्रयोग, साहित्यातील बंडखोरी, चित्रपटांतील नवी लाट या गोष्टी लुभावत. तेवढेच कशाला? त्यावेळच्या, (इडियट बॉक्स समजल्या जाणाऱ्या टीव्ही) दूरदर्शनवरील 'गजरा'पासून 'प्रतिभा आणि प्रतिमा'सारखे करमणूकप्रधान, उद्बोधक कार्यक्रमदेखील मोहात पाडत. 'माणूस', 'मटा' ही आमची नियतकालिके होती. विजय तेंडुलकर हे आमचे अग्रदूत होते. त्यांच्या पाठोपाठ आलेला अरुण साधू आम्हाला आमच्या पिढीचा कादंबरीकार जाणवत होता. जब्बार पटेल नाटक-सिनेमांच्या दृश्य रूपातील नवा आशय सुचवत होता. पण सतीश आळेकर हा जुन्यानव्याचा, पुणेरी संस्कृतीतच तयार झालेला अर्क होता. महेश एलकुंचवारसारखे 'नवोदित' नागपूरला डबके ठरवून मुंबई-पुण्याकडे त्याच नवतेच्या डोहात सामील होण्याच्या अपेक्षेने पाहत होते. डहाके-गणोरकर अमरावतीचे 'कॅक्टस' सोडून वरळी-चर्चगेटला राहण्यास येऊन मोठी स्वप्ने पाहू लागले होते. वातावरण सांस्कृतिक दृष्ट्या धगधगते होते. ते प्रक्षोभक होते, निर्मितीशीलदेखील होते. आम्ही 'प्रभात'मधून फिल्म सोसायटीच्या कार्याची त्यामधील भूमिका लोकांच्या मनावर ठसवू पाहत होतो. आम्हाला चित्रपटाच्या नव्या माध्यमाचे 'एक्सपोजर' होते हा आमचा अधिकचा मुद्दा होता.

सतीश आळेकरची 'महापूर', 'महानिर्वाण', 'बेगम बर्वे' ही नाटके म्हणजे आमच्या चर्चांना उदंड खाद्य असे. त्या कधी संपतच नसत. आळेकर असा डोक्यात भिनलेला असतानाच, योगायोगाने, 'थिएटर ॲकॅडमी'च्या 'घाशीराम कोतवाल' या नाटकाला परदेशात प्रयोग करण्याचे निमंत्रण आले. शिवसेनेने व विद्याधर गोखले यांच्यासारख्या नाटककारांनी त्याच्या परदेशगमनास विरोध केला. गोखले 'लोकसत्ते'चे संपादकही होते. त्यांनी विरोधी लेख-अग्रलेख यांची आघाडीच उघडली. रस्त्यावर शिवसेना होती. त्यांनी तेंडुलकरांच्या घरासमोर राडा सुरू केला. त्यांचे म्हणणे त्या नाटकामुळे नाना फडणवीसांची अप्रतिष्ठा होते! आंदोलनकर्त्यांचा तो सारा निखालस बनाव होता. त्यामध्ये तेंडुलकर मानवी जीवनाची जी नवी मांडणी करत होते व त्यांना प्रतिसाद मिळत होता, ते ज्या कलाकृती निर्माण करत होते आणि त्यांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय यश लाभत होते; त्याबद्दलचा दुस्वास, हेवा, जलन, तिरस्कार असे सारे काही होते. त्या नव्याच्या विरोधकांनी 'सखाराम', 'घाशीराम' यांचे प्रयोग बंद पाडलेच, परंतु त्यांनी 'घाशीराम'ची नाटकमंडळी परदेशी जाण्यासाठी मुंबई विमानतळावर पोचूच शकणार नाहीत असे धमकावले. सांस्कृतिक क्षेत्रातील नव्या जाणिवांचा स्फोट सेन्सॉरविरूद्धच्या लढ्यामधून होत होता. सेन्सॉर बोर्डाची चित्रपटांवरील कात्री, राज्याच्या नाट्यपरिनिरीक्षण मंडळाची संहितांमधील अन्याय्य काटछाट व त्या पलीकडे शिवसेनेसारख्या प्रतिगामी संस्थांची व व्यक्तींची झुंडशाही... सर्वत्र तणाव होता. वातावरण भयग्रस्त होते. 'थिएटर ॲकॅडमी'ची मंडळी पुण्यात लपूनछपून वावरत होती. अशा वेळी दिल्लीहून इंदिरा गांधी यांनी 'थिएटर ॲकॅडमी'च्या मंडळींना परदेशी जाण्यासाठी हिरवा कंदिल दाखवला. तरीदेखील वातावरणातील दहशत कमी झाली नाही. म्हणून 'ग्रंथाली'च्या आम्हा तरुण मंडळींना 'थिएटर ॲकॅडमी'च्या अडचणीत आलेल्या नाटक मंडळींच्या प्रती भ्रातृभाव दाखवून धीर द्यावासा वाटला. आम्ही 'ग्रंथाली'त आयडिया काढली, की 'थिएटर ॲकॅडमी'चे पुढील नाटक 'महानिर्वाण' याबद्दल पुस्तिका लिहून व ती प्रकाशित करून, त्या मंडळींसाठी घाईघाईने निरोप समारंभ योजावा. आमच्याकडे कुमार केतकरसारखा प्रगल्भ बुद्धीचा तरुण होता. त्याप्रमाणे कुमार केतकरने ती पुस्तिका लिहिली. आम्ही ती प्रसिद्ध केली आणि 'फर्ग्युसन कॉलेज'च्या 'ॲम्फी थिएटर'मध्ये नाटक मंडळींना निरोप समारंभ योजला. किती गुपचूपपणे तो सारा प्रकार घडवला गेला! आम्ही सारे नकळतपणे 'नव्या'ला होणारा विरोध हाणून पाडण्याच्या चळवळीत उतरलो होतो. आमच्या कार्याचा आशय स्पष्ट होत होता.

कुमार केतकरने त्या पुस्तिकेचा समारोप 'विसाव्या शतकाचे महानिर्वाण' अशाच स्वरूपाचा केला आहे. त्याने केशवसुतांच्या 'जुने जाऊद्या मरणालागूनी, जाळूनी किंवा पुरूनी टाका' या ओळी उद्धृत करताना त्यापुढील 'सडत न एक्या ठायी ठाका। सावध ऐका पुढल्या हाका।' या दोन ओळी मुद्दाम नमूद केल्या आहेत. त्यात सतर्कता, सावधानता अभिप्रेत असली तरी 'सुबह कभी तो आयेगी'ची आशा गच्च भरलेली आहे. कुमारने पुढे म्हटले आहे, की 'प्रचंड प्रलयी घटनांनी, संपन्न अशा या शतकात सर्वच मूल्ये, विचार, सिद्धांत कसोटीला लागले होते. काही कसोटीला उतरले तर काहींचे तीन तेरा वाजले. येणाऱ्या वीस वर्षांत घटना अधिक अद्भुत घडणार आहेत. त्यांचा आपल्या जीवनावर विलक्षण खोल परिणाम होणार आहे. हा गतीचा कायदा पाळताना जो थांबेल तो संपणार आहे.'

'ग्रंथाली', 'थिएटर ॲकॅडमी' यांच्यातील सख्य पुण्यापुरते मर्यादित राहिले नाही. इकडे मुंबईमध्ये 'प्रभात चित्र मंडळा'ने अमोल पालेकरची साथ देऊन त्याच्या 'वासनाकांड' (लेखन-महेश एलकुंचवार) या नाट्यनिर्मितीवर आलेली बंधने झिडकारून टाकली. ते नाटक 'प्रभात'च्या वतीने 'रवींद्र'मध्ये सादर करण्यात आले. सांस्कृतिक संस्थांचा भ्रातृभाव व्यापक होत गेला. तो जसा संघर्षात्मक तसा विधायक रीत्याही व्यक्त होऊ लागला. त्यामुळे 'प्रभात' व 'ग्रंथाली' यांचेही संयुक्त कार्यक्रम होत. त्यामागे आविष्कार स्वातंत्र्यावर येणारे निर्बंध हटवण्याची भूमिका होती; स्वातंत्र्याचे आवाहन होते. आमच्या कार्याला अशा तऱ्हेने मूल्यभाव लाभला होता. त्यामधून सामाजिक जाण प्रकट होत होती. सौंदर्यदृष्टीचे संवर्धन होत होते आणि व्यक्तिस्वातंत्र्यास पोषक भूमिका दृढ बनत होती.

मी 'प्रभात'मध्ये १९९० नंतर क्रियाशील फार राहिलो नाही. 'ग्रंथाली'चे व्याप वाढले होते. 'मटा'तील नोकरी सोडली असल्यामुळे पोटापाण्यासाठी 'कन्सल्टिंग'सारखे नाना उद्योग करावे लागत होते. 'प्रभात'मध्ये सिनेमा पाहणे हेसुद्धा अत्यावश्यक तेवढेच होई. मात्र मी मंडळाचा ट्रेझरर म्हणून त्यानंतरही पाच-सहा वर्षे हिशोबाच्या कागदांवर सह्या करत राहिलो. 'प्रभात'ने मध्येच एक घटना दुरुस्ती केली आणि 'विश्वस्त' या नावाचे पद तेथे तयार झाले. मला ट्रेझररशीप सोडल्यानंतर विश्वस्तपदी नियुक्त करण्यात आले. मी मंडळाचे अध्यक्ष किरण शांताराम आणि नांदगावकर यांना, 'मला वास्तवात मी घेणार नसलेल्या त्या जबाबदारीतून मुक्त करा' असे अधूनमधून सांगत होतो, पण ते दोघे माझे म्हणणे हसण्यावारी नेत. मी पण ज्येष्ठ-ज्येष्ठ होत होतो. माझे डोंबिवलीचे एक परिचित वय वाढत असलेल्या नव्या मनुष्य समुदायाची विभागणी नववृद्ध (साठीपार), मध्यमवृद्ध (सत्तरीपार) आणि अतिवृद्ध (ऐंशीपार) अशी करत. त्यानुसार त्या-त्या वयाचे म्हणून भावना-विचार, आग्रह-दुराग्रह, सत्याग्रह असतात. प्रत्येक व्यक्ती स्वत:च्या कलाने ते निभावते. माझा कल परिस्थिती टोकाला नेण्याकडे नाही. आम्ही सिनियर ट्रस्टींनी 'ग्रंथाली'मधून निवृत्ती घेतली होती. मी 'प्रभात'बाबतही मनाने तसाच हल्लक होत चाललो होतो, मला त्यापुढील जनमाध्यमाचे-इंटरनेटचे वेध लागले होते आणि माझे 'प्रभात'मधून निवृत्तीचे प्रकरण तडीला लावावे असे वाटे वाटेपर्यंत सुवर्ण महोत्सव येऊन ठेपला होता!

आम्ही सिनेमा पाहू लागलो ती परिस्थिती वेगळी होती. आम्ही सिनेमा पाहत पाहत क्लासिक सिनेमापर्यंत पोचलो होतो. वेगवेगळ्या देशांचे चित्रपट महोत्सव, आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव यांची तिकिटे मिळवावी म्हणून आमची मारामार चाले. आम्ही सर्व तऱ्हेच्या गैरसोयी सहन करत ताराबाई हॉलला सिनेमे पाहिले. ते माध्यम आमच्या समोर विकसित होत गेले व शास्त्रीयतेच्या पातळीवर पोचले. सिनेमाबद्दलची पाश्चात्य प्रगत देशांतील समज थक्क करून टाके. त्यांची 'साईट अँड साउंड'सारखी मासिके मिळवण्याकरता यातायात करावी लागे. मात्र जगातील सर्वांत जास्त सिनेमा बनवणाऱ्या भारतासारख्या देशातील समज फारच अपरिपक्व जाणवे. तसे मुद्दे आमच्या चर्चेत पुन:पुन्हा निर्माण होत. तेच घेऊन तर आम्ही १९७० च्या दशकात महाराष्ट्राच्या रसिकांचे मेळावे घेतले. निमित्ता-निमित्ताने वेळोवेळी चर्चा घडवल्या, शहराशहरांत 'प्रभात'सारख्या फिल्म सोसायट्या स्थापन व्हाव्या म्हणून धडपडत राहिलो. मला ते सगळे त्या पद्धतीने करत राहणे आता, ग्लोबलायझेशनच्या तडाख्यात बिनगरजेचे झालेले दिसत होते. आम्ही ते केले याचे कौतुकदेखील मनी राहिले नव्हते, पण त्याच बरोबर नवी दृष्टीही लाभत नव्हती.

ती मला नव्या मुलांकडून हवी होती, पण येथे तर गाडी त्याच यार्डात अडकून पडत होती. संतोषची नवी टीम सक्षम आहे. तीमधील गणेश मतकरी त्याच्या समीक्षात्मक लेखनातून, कथांतूनसुद्धा स्थानिक व आंतरराष्ट्रीय ताणेबाणे तपासत असतो. दुसरा श्रीकांत बोजेवार स्वत: यशस्वी पटकथाकार आहे. तो परिस्थितीचे विच्छेदन करणारे व्यंगात्म लेखन वेधक व बोचरे करत असतो. तिसरा अभिजित देशपांडे मराठी भाषेचा लेखक-प्राध्यापक. त्याला 'नव्वदी'नंतरची भाषा यथार्थ कळते आणि चौथा अमित चव्हाण हा कार्याची बैठक असलेला. तोही चित्रपटासंबंधात संयोजनाची कामे करत असतो. ही टीम नवनवे कार्यक्रम उत्साहाने करत असते. त्यांनी चित्रपट रसास्वादाचे वार्षिक वर्ग सुरू केले. तो उपक्रम प्रशंसनीय आहे. अभिजितच्या संपादनाखाली 'रूपवाणी' नव्या रूपात सादर करण्याचा प्रयत्न चालू आहे. ते चित्रपट प्रदर्शन वेगवेगळ्या ठिकाणी करण्यासाठी अन्य संस्थांशी सहयोग साधत असतात. त्यांनी सुवर्णमहोत्सवी वर्षाचा आरंभही हृद्यतेने व एक सुरेख चित्रपट दाखवून साजरा केला. यापुढे वर्षभर काही-काही घडत राहील. तरीही सुवर्ण महोत्सव साजरा करण्याची कल्पना मांडली गेली तर मी अस्वस्थ का?

मी 'प्रभात'मधील बैठकांत व गप्पांत गेली दोन दशके वारंवार सांगत आलो आहे, की 'फिल्म सोसायटी'चे चित्रपट प्रदर्शनाचे काम गरजेचे राहिलेले नाही कारण घरोघरी, दारोदारी आणि मोबाईलसह सर्व साधनांवर जगातील वाटेल तो चित्रपट पाहता येतो. अशा वेळी थिएटरमध्ये माणसे एकत्र जमवून चित्रपट दाखवण्याचे कर्मकांड कशाला चालू ठेवायला हवे? ते यथाक्रम नष्ट होण्याऐवजी जाणीवपूर्वक बंद करू आणि त्याऐवजी 'फिल्म सोसायटी' म्हणून चित्रपटांचे अत्याधुनिक विषय व चित्रपटांची निर्मिती, त्यामधील नवनवीन शक्यता यांबद्दलच्या अभ्यासचर्चा योजू. त्यासाठी ऑनलाईन प्रयत्नदेखील करता येतील. त्यातून 'फिल्म सोसायटी'चा मुख्य उद्देश, जो अभिरुची संवर्धनाचा, तो साधला जाईल. समानधर्मा चित्रपटप्रेमी व्यक्तींचे नेटवर्क तयार होईल. रसिकता जपणाऱ्या अन्य संस्थांशी संगनमत करता येईल- आणखीही बुद्धिगम्य गोष्टी सुचू शकतील. त्यासाठी ब्रेन स्टॉर्मिंग करू. मला फिल्म सोसायट्यां-समोरील आव्हानाचा मुद्दा बदललेल्या परिस्थितीचा, उपलब्ध नवनव्या तंत्रज्ञानाचा आणि प्रेक्षकांच्या समजुतीचा वाटे. बदललेल्या परिस्थितीत 'प्रभात'सारख्या स्थानिक प्रयत्नांना किती स्थान आहे? नव्या तंत्रज्ञानात जवळ-जवळ प्रत्येक दिवशी नवी शक्यता तयार होत आहे व ती सगळ्या जगाला जोडून घेत आहे. अशा वेळी स्थानिक गोष्टी हरवून जात आहेत, जागतिक गोष्टी हाती लागतातच असे नाही. व्यक्तिस्वातंत्र्य प्रबळ होत चाललेल्या जगात व्यक्तीची समजदेखील सूक्ष्मतरल होत चालली आहे. कवितेपासूनच्या प्रत्येक कलाकृतीला व्यक्तिगत पत्राचे मोल येत आहे. अशा वेळी अभिरुचीचे दंडक निश्चित करणे, त्यांतील जागतिक व स्थानिक परिमाण जोखणे हे महत्त्वाचे ठरते. मी माझे ते म्हणणे मांडण्याचा शक्य असेल तेव्हा

प्रयत्न करत असे.

आमच्या पिढीने संयुक्त कुटुंबे बरखास्त केली. छोट्या कुटुंबातही स्त्री-पुरुष समानतेचा आग्रह धरला. मुलांचे संगोपन काळजी घेऊन केले. त्यांचे हक्क जपण्याकडे कल ठेवला. हे सर्व संस्कृतीला पोषक घटक होते. अशा गोष्टी नव्या समाजव्यवस्थेच्या निदर्शक होत्या. त्यामधून समाजाची नवी घडी बसेल असा विश्वास होता परंतु झंझावात यावा तशी समाजव्यवस्था, संगणकाच्या आगमनानंतर बदलून गेली. आठ-दहा वर्षे जुन्या-नव्याच्या संघर्षात मागे पडली खरी, परंतु समाजाने नवे ते नावापुरते घेतले. त्या पाठीमागील सूत्र जाणले नाही. त्यामुळे आधीच्या पिढ्यांनी सामाजिक-सांस्कृतिक म्हणून आखलेल्या कार्यक्रमाचेदेखील कर्मकांड होऊन बसले. त्यामुळे मी अस्वस्थ झालो का? मला भीती कसली वाटते? मी वृद्ध झालो त्याची?

मी रस्त्या-रस्त्यांवर प्रौढ मंडळी वाढत चाललेली बघतो. 'सिनियर सिटिझन्स ग्रूप्स'समोर जाऊन भाषणे करतो. मी माझे काही सहकारी गेल्या दशकात गमावलेदेखील आहेत. मला माझे म्हातारपण वा या भूमीवरील संभाव्य निर्गमन बिचकावत नाही. मला भीती वाटते, मी माझ्या पिढीपर्यंत आलेला वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोचवू शकलो असे जाणवत नाही त्याची. ना मी त्यापासून काही धडा पुढील पिढ्यांना देऊ शकलो, त्याची. आमच्या पिढीने ज्या कर्मकांडाला कडाडून विरोध केला, सतत ब्रेन स्टॉर्मिंगची कांक्षा बाळगली, आम्ही जिज्ञासा वाढावी हा ध्यास बाळगला, जीवनात आनंद असावा याकरता संस्कृतिकारण हा फंडा सुचवला, पण ते बाजूला पडून त्या जागी नवी कर्मकांडे आणून ठेवली जात आहेत का? विचारचर्चेच्या वाटा नवनव्या तंत्रांच्या सहाय्याने अधिक रुंद होऊन चर्चा विशाल पातळीवर जाण्याऐवजी ती संकुचित होत आहे का? सामाजिक-सांस्कृतिक संस्था आणि त्यांचे कार्यकर्ते समाजाला वेगवेगळ्या शक्यता व वळणे दाखवण्यासाठी कार्यप्रवृत्त होत असतात ना! त्यांनी तो वेध सतत घेत राहिले पाहिजे, तशी ध्येयधोरणे आखली पाहिजेत. त्यालाच 'लष्करच्या भाकऱ्या' असे म्हणतात. सामाजिक-सांस्कृतिक जीवन समृद्ध होत जावे यासाठी संस्था कार्यरत असतात. 'प्रभात'चा तसा प्रभाव पन्नासाव्या वर्षी समाजजीवनावर आहे का? उलट, आमच्या काळी 'प्रभात' ही संस्था जेवढी चळवळी होती, तेवढी ती आता राहिलेली जाणवत नाही. ती व्यापक समाजजीवनात कोठेतरी १९९० नंतर हरवत गेलेली भासते. पण 'प्रभात'चाच दाखला, माझा व्यक्तिगत घनिष्ट संबंध असल्यामुळे का द्यावा?

गेल्या पन्नास वर्षांच्या काळात वैज्ञानिक जाणिवेचा जागर झाला. अंधश्रद्धेविरूद्ध लढा पुकारला गेला. 'मराठी विज्ञान परिषद' आणि 'लोकविज्ञान चळवळ' यांचे तारे चमकू लागले. 'ग्राहक चळवळ' संघटित होत गेली. कामगारांना न्याय्य हक्क हवेत म्हणून सत्याग्रह-संप झाले. तळच्या वर्गांना त्यांच्या मनुष्यत्वाची ओळख पटली. साहित्याला नवे धुमारे फुटले. 'मराठी साहित्य महामंडळ' पाच-सात संस्थांचे मिळून घडले. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे अर्धे आकाश प्रकाशमान झाले - स्त्रीस्वातंत्र्य फळाफुला आले! ठिकठिकाणी स्त्रीमुक्ती गट निर्माण झाले. 'मुलगी झाली हो' या नाटकाने सर्व रेकॉर्ड्स तोडली. ते उच्चभ्रू स्त्री-पुरुषांपासून कामगार व शेतकरी स्त्रीपुरुषांपर्यंत सर्वांना त्यांचेच जीवन असल्यासारखे वाटून गेले. तो चमत्कार होता. त्या साऱ्या आधुनिक म्हणून गेल्या पन्नास वर्षांत जोपासल्या गेलेल्या जाणिवा नव्या तंत्रप्रधान वातावरणात संदर्भहीन झालेल्या जाणवत आहेत. त्या सर्वच सांस्कृतिक घटकांना नव्या संदर्भात नव्या तऱ्हेने त्यांच्या कार्यक्रमाकडे पाहण्याची गरज आहे. हा नवा संदर्भ ग्लोबलायझेशनचा आहे. त्याचे फायदे अधिक - तोटे कमी, पण तोटेच प्रबळपणे पुढे येत आहेत. कारण आव्हान स्वीकारलेच जात नाही.

ग्लोबलायझेशनने कलाजगतासमोर, एकूणच सांस्कृतिक जीवनासमोर नवे प्रश्न निर्माण केले आहेत. कलेपुरते बोलायचे तर कलेचे बाजारमूल्य प्रभावी झाले आहे. त्यामुळे त्यातील सनातनत्व, चिरंतनत्व या मूल्यांचे काय झाले? अभिजातता कशाला म्हणावे? ते सारे निकष कालबाह्य होत आहेत, परंतु चित्रपट हे असे नवमाध्यम आहे, की जे त्या सर्व कलांना कवेत घेतेच, त्याबरोबर व्यवसायाचाही अंगभूत विचार करते. चित्रपट माध्यमाने विचारचर्चेच्या अशा अनेक शक्यता तयार केल्या आहेत. साहित्यक्षेत्रात शंभर वर्षांत संमेलनांची परंपरा तयार झाली. संमेलनासंबंधात वादविवाद असले तरी राज्याचा म्हणून एक महोत्सव होऊन जातो व त्यानिमित्ताने सांस्कृतिकतेचे संस्कार होतात. साहित्यविषयक काही मुद्दे समाजासमोर मांडले जातात. तसा चित्रपट कलेचा विचार होऊ शकतो का? त्यामधून वेगळ्या वाटा दिसू शकतील का? नांदगावकर व मी मिळून ठाण्याच्या साहित्यसंमेलनात चित्रपटविषयक एक दिवस साजरादेखील करवून घेतला. त्यावेळी वार्षिक मराठी चित्रपट संमेलने घेण्याचे संकल्प सुटले. अशी अनेक आवाहने व आव्हाने डोळ्यांसमोर उमटली-उभी राहिली. मी त्यांपैकी करू काही शकणार नव्हतो, म्हणून मी अस्वस्थ झालो होतो का?

आपण एकविसाव्या शतकात अपेक्षा ठेवून आलो खरे, परंतु या शतकाने बदलांचे आव्हान अधिकच गहिरे केले आहे. दिशा स्पष्ट होण्याऐवजी अंधुक होत गेल्या आहेत. 'इंटरनॅशनल इंटरनेट कौन्सिल'च्या अध्यक्षांचे १९९६च्या सुमाराचे भाषण अजून कानात घुमत आहे. त्यांनी म्हटले होते, की हे इंटरनेट आपल्याला कोठे घेऊन जाणार आहे याचा पत्ता नाही! त्याला वीस वर्षे झाली. अजून त्याची दिशा स्पष्ट नाही. सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजीतील आमचा मित्र अतुल तुळशीबागवाले गतवर्षी म्हणाला, ''संगणक घडला कसा? त्यामागचे तंत्रज्ञान काय? हे आम्हाला सांगता येते, परंतु आम्हाला तो पुढे कोठे जाणार आहे, त्याची पूर्णावस्था काय आहे याचा पत्ता नाही. तंत्रज्ञान संगणकाधिष्ठितच राहणार की आणखी नवे रूप घेऊन

येणार? हेदेखील सांगता येणार नाही.''

त्याचे पुढील बोलणे सूचक होते - विज्ञान या जगाचे नेतृत्व करील, जगाची नवी मांडणी करील असे आतापर्यंत वाटत होते. ती शक्यता आता जाणवत नाही. तंत्रज्ञान एवढे 'ओव्हर पॉवरिंग' होऊ पाहत आहे व म्हणूनच साहित्यिक-सामाजिक-सांस्कृतिक संस्थांची जबाबदारी वाढली आहे. हा काळ अनिश्चिततेचा, संभ्रमाचा आहे. त्यात निराशा नाही, परंतु पुढे काय घडणार याबद्दल एक चिंता आहे. कोणताही सिद्धांत, विचारपद्धत स्थिर व टिकाऊ नाही. गाडी बोगद्यात शिरली असावी तशी काहीशी मनस्थिती जगभर आहे. गाडी बाहेर पडणार हे नक्की; परंतु ती कशी, केव्हा? आणि गाडी बाहेर पडेल तेव्हा प्रकाश दिसेल तो कशा प्रकारचा? अशा अनेक शंकाकुशंका आहेत. अशा वेळी ज्यांनी गेल्या पन्नास वर्षांतील घडामोडी, आंदोलने, चळवळी, जागृतीच्या मोहिमा जवळून निरखल्या आहेत, आस्थेने-संवेदनेने मनी जागवल्या आहेत, त्यांना गेल्या पन्नास वर्षांचे 'सेलिब्रेशन' करावे असे सहज कसे वाटेल? त्यांना वाटेल, अधिक झडझडून कामाला लागायला हवे.


'प्रभात'च्या पाठोपाठ महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या क्षेत्रांतील सामाजिक-सांस्कृतिक काही संस्था येत्या दशकभरात सुवर्णमहोत्सव साजरे करत जातील. 'मराठी विज्ञान परिषदे'चा सुवर्ण महोत्सव चालूच आहे. त्या संस्थांनी त्यांचे कार्य जेव्हा पंचेचाळीस-पन्नास वर्षांपूर्वी सुरू केले तेव्हा चित्र स्पष्ट होते. अन्यायाचे स्वरूप माहीत होते - सर्व तऱ्हेच्या शोषणावर हल्ला हा हुकमी इलाज न्याय प्रस्थापित करण्यासाठी होता. त्याच्या पाच-पंधरा वर्षे आधी तिसऱ्या जगातील अनेक देश नवस्वतंत्र होत गेले. त्यामुळे स्वातंत्र्य आणि लोकशाही हा मंत्र विलक्षण सामर्थ्याचा वाटला. लोकांना त्यांच्या स्वातंत्र्याची जाणीव झाली आणि त्यांना तेच त्यांचे भविष्य घडवू शकतात असे कळले. लोकशाही राजवटीचा मार्ग सोपा होत जाईल अशी त्यांची समजूत होती, परंतु लोकशाही राजकारणातही टोळी राज्य आले आणि प्रत्येक गट त्याचे-त्याचे मागणे पुढे ढकलून, त्यासाठी दडपण आणून ते मिळवू लागला. त्यामुळे लोक लोकशाहीला झुंडशाही असेही म्हणू लागले. म. गांधींनी ब्रिटिश पार्लमेंटला उद्देशून १९०९ साली 'बटिक, वेश्या' असे उद्गार काढले होते. तो अनुभव सर्व राष्ट्रे घेत आहेत. त्याचे मुख्य कारण सांस्कृतिक संस्था राजकारणाश्रयी व अर्थकारणाश्रयी झाल्या आणि त्यांनी त्यांचे समाजातील स्वतंत्र, स्वायत्त स्थान व महत्त्व, दोन्ही गमावले, हे आहे का?

प्रभात चित्रमंडळाच्या मीटिंगमधील एका विचारणेमधून गेली पन्नास वर्षे आणि त्यामधील सामाजिक-सांस्कृतिक घटनांची संदर्भहीनता माझ्या नजरेसमोर उभी राहिली, ती तुमच्यासमोर मांडली आहे. माझा शंभर टक्के विश्वास आहे, की ज्या तंत्रज्ञानाने मानवी जग उलटेपालटे करून टाकले आहे आणि आजची संभ्रमावस्था निर्माण केली आहे ते तंत्रज्ञानच मानवाला तारक ठरणार आहे कारण तंत्रज्ञानाइतकी लोकशाहीवादी गोष्ट दुसरी नाही. तंत्रज्ञानच माणसाला लोकशाही अधिकार मिळवून देऊ शकणार आहे व मानवी जीवनाची नवी घडी स्थापित करणार आहे कारण मानव जातीचा गेल्या २०१७ वर्षांचा इतिहास नक्की माहीत आहे, त्या काळात माणसाने प्रगती बरीच केली - भौतिक व सांस्कृतिक. तो त्याच क्रमाने पुढे जाईल, जर हत्यार वा तंत्रज्ञान त्याच्या हाती राहिले तर... त्याची पकड त्यावरून सुटली तर? तशा धोक्यापासून माणसाला त्याची बुद्धी व संस्कृतीच तारू शकेल!

(या लेखाचा कंटेण्ट ताडून पाहण्यात आणि लेखाची रचना करण्यात महेश खरे व किरण क्षीरसागर या तरुण मित्रांची मोलाची मदत झाली)

- दिनकर गांगल
भ्रमणध्वनी : ९८६७११८५१७
dinkargangal39@gmail.com

॥ग्रंथाली॥




**पर्यायी मातृत्व** - डॉ. संदीप माने

डॉ. संदीप माने यांनी 'सरोगसी' हे पुस्तक अत्यंत उत्तमरित्या लिहून सरोगसी हा गुंतागुंतीचा विषय सोप्या पद्धतीने सगळ्यांसमोर मांडला आहे. त्यामुळे हे पुस्तक अमूल्य आहे. आपण या पुस्तकाचा प्रसार मोठ्या प्रमाणावर केला पाहिजे जेणेकरून समाजाचे प्रबोधन होईल. मी डॉ. संदीप माने यांचे त्यांनी लिहिलेल्या या पुस्तकाबद्दल अभिनंदन करतो.

- कुमार केतकर

मूल्य १८० रुपये सवलतीत ११० रुपये




तीन वर्षांत इंकिंग इनोव्हेशन्सतर्फे रसिक वाचकांसाठी ३६हून अधिक पुस्तके प्रकाशित

**रुचीच्या वाचकांसाठी खास सवलतीच्या दरात**

आपल्या रोजच्या वापरातील आणि आजूबाजूस आढळणाऱ्या अनेक औषधींचा **'औषधी विश्वकोश'** या पुस्तकात खूप विस्तृत अभ्यास केला आहे. वैद्यकशास्त्रातील सगळ्याच पॅथींनी प्रत्येक औषधीचा मर्यादित अभ्यास केल्यामुळे औषधींचा उपयोग त्या त्या पॅथीमध्ये तेवढाच मर्यादित स्वरूपात होतो. या पुस्तकात मांडलेली ही संकल्पना मुळातच नावीन्यपूर्ण आहे.

सर्वपरिचित सोन्याचा विचार केला तर असे आढळते की, मध्यकालीन युरोपमध्ये सोन्याचा वर्ख दिलेल्या गोळ्या व सोन्याचे पाणी चढविलेली औषधी ही सोन्यातील जंतुनाशक गुणधर्मामुळे संसर्गजन्य आजारांत वापरली जायची.

निसर्गावर प्रेम करणाऱ्या आणि या नैसर्गिक गोष्टींची शास्त्रीय माहिती जाणून घेणाऱ्या वाचकांसाठी आणि प्रत्येक वैद्यकीय शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी संग्राह्य विश्वकोश.

**इंकिंग इनोव्हेशन्स, मुंबई**

इंडिया प्रिंटिंग हाऊस, तळ मजला, 42, ग. द. आंबेकर मार्ग,
वडाळा, मुंबई - 400 031 • फोन +91 22 2412 2755 / 24122756
Email : anand@ipworks.in • Website : www.inkinginnovations.com





लेखक: डॉ. मंदार रा. जोशी
किंमत: रुपये 800 पृष्ठे: 200
साईज: 8.25"× 11.75"(A4)
संपूर्ण रंगीत छपाई
बाईंडिंग: हार्डबाऊंड

# लॉरी बेकर वास्तुरचनाकारांमधील गांधी

अरुण मळेकर

**ऐन तारुण्यात मिशनऱ्यांचा सेवादीप हाती घेऊन लॉरी बेकर १९४५ साली भारतात आला आणि व्रतस्थपणे आपल्या कल्पनेतील इमारती बांधण्यात त्याने पुढील साठ वर्षांचा काळ घालवला. त्या काळात भारतात आलेल्या ब्रिटिश अंमलदारांमध्ये अंगाखांद्यावर, अधिकारासह युनियन जॅक मिरवण्याची मिजास होती, पण हे शक्य असूनही लॉरी बेकर या पलटणीत कधीच सामील झाला नाही.**





२० व्या शतकाच्या पूर्वार्धात भारतभूमीवर महात्मा गांधी या गूढ युगपुरुषाचे प्रचंड गारुड होते व आजही आहेच. सर्वात तळागाळातील, सर्वसामान्य माणसाचा अग्रक्रमाने विचार करून तशी कृती करणाऱ्या या युगपुरुषाने सुरुवातीलाच रुसो, डेव्हिड थोरो, टॉलस्टॉय या निसर्गालाच परमेश्वर मानणाऱ्या माणसांना गुरुस्थानी मानलं होतं. जोडीला अहिंसा, सत्याग्रह या अनोख्या शस्त्रांनी नि:शस्त्रपणे लढण्याचं बळ त्यांच्या ठायी होतं. या गुणवत्तेने प्रभावित होऊन असंख्य भारतीयांना सामाजिक बांधिलकीने काम करण्याची प्रेरणा मिळाली. तशीच वसाहतवादाची लालसा असलेले काही ब्रिटिश विचारवंत भारतभूमीकडे आकर्षित झाले. त्यापैकी लॉरी बेकर हा संवेदनशील वास्तुविशारद १९४५ साली भारतात मिशनरी कार्यकर्ता म्हणून आला आणि आयुष्याच्या अखेरपर्यंत तो या भारत देशात एकनिष्ठपणे काम करत राहिला. स्वातंत्र्यचळवळीच्या रणधुमाळीत त्याची महात्मा गांधींशी झालेली भेट म्हणजे लॉरी बेकर यांच्या एकाकी काम करण्याच्या प्रवासाला कलाटणी होती. महात्म्याचाच तो परिसस्पर्श होता.

''तुमच्या क्षेत्रात जे नियोजित काम करणार आहात त्याचा समाजातील अगदी खालच्या वर्गाला कसा फायदा होईल याची दक्षता घ्या'' – या गांधींच्या आज्ञावजा आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देण्याचा निश्चय झाल्यावर लॉरी बेकर यांनी निसर्गाचे अनेक बदलते चेहरे दाखवणाऱ्या हिमालयात प्रारंभीची पंधरा वर्षे एकाकीपणे घालवली. त्यापाठीमागे ध्यास एकच होता. वैचित्र्यपूर्ण भारतदेशाचा निसर्ग मनमुराद अनुभवायचा आणि त्या परिसरातील समाजजीवन डोळे भरून पाहता–पाहता समजून घ्यायचे. निसर्ग ज्याच्यावर फिदा आहे अशी देवभूमी केरळ ही आता यापुढे आपली कर्मभूमी हे त्यांनी निश्चित करून टाकले.

विचारांची तार जुळलेल्या समविचारी अशा केरळमधल्या एलिझाबेथशी त्यांनी विवाहाची गाठ बांधली.

निराधार, अनाथ मुलांबद्दल कणव असलेल्या या मिशनरी अवलियाने तीन अनाथ मुलांना दत्तक घेऊन त्यांच्या आयुष्याला मार्गदर्शक दिशा दिली. खरंतर स्वत:च्या दोन मुली आणि एक मुलगा यांची जबाबदारी होतीच. स्वत:च्या मुलाचे नाव टिळक असे ठेवून आपण या देशाशी कसे जोडले गेलोत हेच त्यांनी दाखवले.

अन्न–वस्त्र–निवारा या मूलभूत मानवी गरजा आहेत. त्यातील निवारा म्हणजे माणसाला सुख–समाधानाबरोबर स्थैर्य देणाऱ्या घटकासाठी त्याच्या आयुष्यातील बरीच शारीरिक व आर्थिक शक्ती खर्च पडते. आपल्या स्वप्नातील शांत, निवांत व सुरक्षित घर प्राप्त करण्यासाठी त्याला काय–काय यातना सहन कराव्या लागतात. निसर्गाशी जवळीक साधणारे, प्रदूषणमुक्त, मुबलक हवा, पाणी आणि प्रकाश असलेलं घर ही प्रत्येकाचीच गरज असते. थोडक्यात या वास्तूत निसर्गराजाचा वरदहस्त राहून आपले आरोग्य कसे व्यवस्थित राहील यासाठी प्रत्येकजण उरस्फोड करत असतो. जोडीला त्याच्या आयुष्याची पुंजीही खर्ची पडते.

महात्मा गांधींच्या आज्ञेप्रमाणे देशातील सामान्य, दरिद्रीनारायणाची ही गरज भागवण्यासाठी अभ्यासाबरोबर कल्पकता असलेल्या लॉरी बेकर यांनी नंतर वास्तू उभारताना परिक्षेत्रातील निसर्गनिर्मित साधनसामुग्रीचा कौशल्याने उपयोग करून घेतला. आजच्या व्यापारी व ओरबाडून फायदा उपटण्याच्या जमान्यात वास्तूरचनाकार व इमारत बांधकाम कंत्राटदार असह्य, गरजू ग्राहकांना घरं बांधून देताना या वास्तू उभारणीतून मला किती आर्थिक फायदा होईल हे धोरण प्रामुख्याने सांभाळत असतो.

गांधींचा शागीर्द बनलेल्या लॉरी बेकरची तऱ्हाच वेगळी होती. भरभरून देणाऱ्या निसर्गसंपत्तीचा चाणाक्षपणे उपयोग करून त्यांनी सर्वसामान्यांना परवडणाऱ्या घरांच्या निर्मितीचे अनेक प्रकल्प केरळ प्रदेशाव्यतिरिक्त देशात अनेक ठिकाणी उभारताना हवा–प्रकाश आणि पाणीपुरवठ्याला प्राधान्य दिलंय आणि हे गृहप्रकल्प उभारताना हातातील नकाशाची भलीमोठी भेंडोळी बाजूला ठेवून इमारतीच्या दगड–विटांना योग्य जागी बसवण्यात त्यांना कमीपणा वाटला नाही. त्यांच्या वास्तुरचनांना आकार देताना सभोवतालच्या भौगोलिक स्थितीचा त्यांनी केलेला अभ्यास हे त्यांच्या दुर्मिळ दूरदृष्टीचे वैशिष्ट्य जाणवते. जोडीला हाती घेतलेले काम हे एक 'मिशन' असल्याने त्यात 'कमिशन'चा सवालच नव्हता आणि गांधी या बाप माणसाची आपल्यावर करडी नजर आहे याची जाणीव सदोदित होतीच.

''मी उभारत असलेली वास्तू सभोवतालच्या निसर्गाशी आणि भौगोलिक स्थितीशी सुसंगत असायलाच हवी'' ही धारणा केंद्रस्थानी ठेवूनच लॉरी बेकरने वास्तुरचनाकार म्हणून आपल्या प्रवासात गृहबांधणीतील कमीत–कमी खर्चाचे गणित झकास सांभाळले. ही कामगिरी निष्ठापूर्वक करताना, 'कला म्हणजे सौंदर्याची निर्मिती' याची जाणीव त्यांच्या ठायी उपजतच होती.

भारतीय वास्तुशैलीबद्दल लॉरी बेकर यांचा अभ्यास एखाद्या इतिहासकारासारखा होता, हे त्यांच्या विचारातून स्पष्ट होते. भौगोलिक–सामाजिक दृष्ट्या विविध धर्मांच्या भारताची एकच ठरावीक वास्तुशैली आहे असे लॉरी बेकर यांना वाटत नाही कारण भारतभूमीवर भौगोलिक परिस्थितीनुसार धार्मिक अधिष्ठान असलेल्या प्रादेशिक वास्तुशैली निर्माण झाल्या. उदा. – राजस्थान, दक्षिणेकडील द्रविड तथा हेमाडपंथीय शैलीतील विविध प्रकारच्या वास्तू, काळानुरूप बांधकामात ग्रॅनाईट, मार्बल, जोडीला वातानुकूलित

यंत्रणा, उद्वाहन यांचा अतिरिक्त वापर करून उभारलेल्या इमारती म्हणजे बांधकामातील विकास हे लॉरी बेकरना मान्य नाही. उपरोक्त आधुनिक साधनांचा वारेमाप वापर केल्याने प्राचीन, पारंपरिक आणि पर्यावरणाचा समतोल सांभाळणाऱ्या सहजसुंदर वास्तुशैलीची पिछेहाट झाली, हे विषद करताना ते म्हणतात, ''प्राचीन बांधकामातून आपली पुरातन वास्तुशैली फक्त काही पर्यटन स्थळदर्शनातूनच अभावाने आढळते.'' बेकरसाहेबांच्या या विचारांना पुस्ती जोडण्यासाठी एक उदाहरण पाहू. सध्या कोकण प्रदेशातील प्राचीन मंदिरांचे आधुनिक साधनयुक्त पुनरुज्जीवन झाले आहे त्यातून प्रादेशिक, पूर्वापारचा बाज आणि काष्ठशिल्पाकृतींचे दर्शनच होत नाही. याचं कारण म्हणजे नैसर्गिक विकासातून सुधारणा अपेक्षित आहे हे ध्यानी येत नाही.

सध्याच्या वास्तुशैलीतील 'सहोल' काँक्रीटचा प्रभाव लॉरी बेकरना मान्य आहे, पण त्यातील लोखंडामुळे आकारमानात विविधता आणून नियोजित वास्तू अधिक कशी चित्ताकर्षक होईल, याकडे लक्ष नसल्याने वास्तूउभारणीत ठोकळेबाजपणा जाणवतो, असे त्यांना वाटत असे. त्याचबरोबर बांधकाम करताना ऊर्जेचा गांभीर्याने विचारच केला जात नाही. 'ऊर्जेची बचत म्हणजे ऊर्जेची निर्मिती' हे सूत्र लॉरी बेकर यांना अभिप्रेत होते. हे साध्य करण्यासाठी उपलब्ध साधनसामुग्री वापरतानाही ऊर्जा बचतीच्या मुद्याकडे डोळेझाक करून दूर अंतरावरून साधनसामुग्री आणण्यासाठी वाहतूक खर्च आणि पर्यायाने पर्यावरणाचा ऱ्हास हे आपण ध्यानी घेत नाही. तसेच बांधकामासाठी सभोवतालच्या उपलब्ध साधनांचा उपयोग होत नसेल तर तो विकासकामातील अडथळा आहे हे लॉरी बेकर यांचं मत होतं.

मर्यादित जागेत जास्तीत जास्त खेळती हवा सूर्यप्रकाश आणि पाणीपुरवठा या बाबींना त्यांच्या बांधकामात प्राधान्य आहे. भूकंपासारख्या नैसर्गिक आपत्तीतही घरांची सुरक्षा टिकवणे आवश्यक आहे. त्यासाठी भलेभक्कम दगडांची सांधेजोड करून घरउभारणी केल्यास संभाव्य आपत्तीची तीव्रता कमी जाणवते पण हे ज्ञात नसलेल्या अकुशल कारागिरांनी उभारलेल्या घरांचे मात्र नुकसान संभवते.

लॉरी बेकर यांच्या मते भूमितीशास्त्रानुसार चौकोन आणि आयात कोन हे तसे कमजोर आहेत. याकडे दुर्लक्ष केल्याने त्याचे परिणाम भोगावे लागतात. मात्र केरळवासीयांनी याची दखल घेऊन निसर्गसान्निध्याबरोबर पारंपरिक वास्तुशास्त्राची कास धरल्याने त्यांच्या इमारती बांधण्यात सुरक्षेबरोबर पर्यावरणसंतुलन सांभाळले गेले, हे लॉरी बेकर यांनी उभारलेल्या वास्तूमधून दाखवून दिले.

या ब्रिटिश अवलियाचं मूळ नाव लॉरेन्स विल्फ्रेड बेकर. २ मार्च १९१६ ते १ एप्रिल २००७ असं प्रदीर्घ आयुष्य लाभलेला हा माणूस इंग्लंडच्या बंकिंगहॅम परगण्यात जन्माला आला. नोकरदार कुटुंबाची पार्श्वभूमी असलेल्या परिवारात वाढताना लहानपणीच धर्मासह काही प्रश्नांचं गूढ त्याला अंतर्मुख करीत होते. पहिल्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर युरोपमधील राजकीय अस्थिरतेच्या कालखंडात ठरवल्याप्रमाणे बंकिंगहॅममधूनच वास्तुरचनाकाराची पदवी त्याने संपादन केली. चीन-जपानमधील वास्तव्यातून अनुभव गाठीशी घेऊन तो पुनःश्च मायदेशी परतला.

दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर १९४५ मध्ये सेवाव्रती धर्मोपदेशक म्हणून भारतात आला त्यापाठीमागे गांधींचं आकर्षण होतच. सामान्य माणूस आणि सभोवतालचा निसर्ग केंद्रस्थानी ठेवून काम करण्यासाठी गांधींची आज्ञा होतीच. त्यानुसार एक-एक इमारती उभारता-उभारता बेकर 'वास्तुरचनाकारांमधला गांधी' म्हणून ओळखला जाऊ लागला.

आपल्या प्रकृतीला, स्वधर्माला मानवेल, पचेल, रुचेल अशा केरळमधील भिरुवअनंतपुरम (त्रिवेंद्रम) येथे साठच्या दशकात तो मुक्कामाला आला आणि आयुष्याच्या अखेरपर्यंत तेथेच वास्तव्य करून राहिला. येथील वास्तव्यात कमी खर्चिक गृहनिर्माणाचा वसा घेतलेल्या ग्रामीण विकासशास्त्र आणि तंत्रज्ञान संस्थेचा संचालकही झाला.

केरळ प्रदेशाप्रमाणे शेजारच्या तामिळनाडू राज्यातही आपल्या अलौकिक कामाची नाममुद्रा त्याने उमटवली आहे. त्याची यादीच खूप मोठी आहे परंतु वानगीदाखल सलीम अली सेंटर, चित्रलेखा फिल्म स्टुडिओ, कॉफी हाऊस, दक्षिणचित्र, पर्यटनकेंद्र या अजोड इमारतींची अलौकिक रचनाच लॉरी बेकर यांच्या कर्तृत्वाची साक्ष द्यायला पुरेशा आहेत.

त्यांच्या असामान्य कामाची दखल घेऊनच इ.स. १९८१ ते २००६ या पंचवीस वर्षाच्या काळात युनोसह, नेदरलँड तसेच ब्रिटिश राजघराण्यासहित भारतातील अनेक राष्ट्रीय पातळीवरील पुरस्कारांचे ते मानकरी ठरले आहेत. त्यात ऑर्डर ऑफ ब्रिटिश एंपायर, पद्मश्री, केरळ विद्यापीठाची डी.लिट. या प्रमुख पुरस्कारांचा समावेश आहे.

ऐन जवानीत मिशनऱ्यांचा सेवादीप हाती घेऊन लॉरी बेकर भारतात आला आणि एकाकी-व्रतस्थपणे आपल्या कल्पनेतील इमारती बांधण्यात त्याने पुढील साठ वर्षांचा काळ घालवला. त्या काळात भारतात आलेल्या ब्रिटिश अंमलदारांमध्ये अंगाखांद्यावर अधिकारासह युनियन जॅक निशाण मिरवण्याची मिजास होती, पण हे शक्य असूनही लॉरी बेकर या पलटणीत कधीच सामील झाला नाही.

वयोमानापरत्वे वयाच्या ९०व्या वर्षी हा इंग्रजांचा भारतीय माणूस ख्रिस्तवासी झाला. तो दिवस होता १ एप्रिल २००७. 'आपल्या देशातील ब्रिटिश प्रशासकांनी येथील स्थानिकांवर जो अन्याय केलाय तो दूर करण्याचा मी माझ्या परीने प्रयत्न करतोय' असे वारंवार बोलून दाखवणाऱ्या या निष्कलंक माणसाची जन्मशताब्दी गतवर्षी संपली. प्रसारमाध्यमांनी तशी त्याची फारशी दखल घेतली नाही.

**- अरुण मळेकर**
दूरध्वनी : (०२२) २५४३३१४७
arun.malekar10@gmail.com

# क्रांतिकारक पुरुष नसबंदीचा संशोधक डॉ. सुजय गुहा

डॉ. अनंत पां. लाभसेटवार





गुहांनी पुरुषामध्ये पहिलीच रिव्हसिबल संतति-नियमनाची पद्धती शोधून काढून क्रांती केली. शासकीय सुस्तीमुळे ती यशस्वी असूनही अजून बाजारात आली नाही. अंतिम चाचण्या संपल्यावर लवकरच ती उपलब्ध होईल पण तिला स्पर्धा असणार. सरकारनं सुस्ती दाखवली नसती तर असं कधीच झालं नसतं.

जगाची लोकसंख्या झपाट्यानं वाढत आहे. ती आज ७.५ अब्जांवर येऊन ठेपली. पहिल्या वर्गातल्या देशात ती घटत असली तरी तिसऱ्या किंवा चौथ्या वर्गातील राष्ट्रांमध्ये तिचा प्रस्फोट होत आहे. यात पहिला नंबर लागतो तो भारताचा. २०११च्या जनगणनेत त्या पूर्वीच्या दशकात १८ कोटी लोकांची भर पडली. म्हणजे दर महिन्याला १५ लक्ष जिवांना आपण जन्म घातला. याचं गणित केलं तर आपण दर मिनिटाला ३५ जीव पैदा करतो असं आढळून येईल. ही वाढ प्रामुख्यानं समाजाच्या खालच्या स्तरात व मुस्लिम धर्मीयांमध्ये सापडते. म्हणून ही एक चिंताजनक बाब आहे.

स्वातंत्र्य मिळाल्यावर नेहरूंनी देशाला भेडसावणारा हा प्रश्न ओळखला. त्यांनी भारतात जगातली पहिली संततीनियमनाची योजना आखली, पण देशातल्या असंख्य इतर प्रकल्पांप्रमाणे ती फसली. प्रयत्नांपेक्षा आपल्या नेत्यांनी घोषणा जास्त केल्या. आज (२०१७) आपल्या देशाची लोकसंख्या १३० कोटी झाली आहे. पुढील पाच वर्षात आपण चीनला लोकसंख्येच्या सिंहासनावरून पदच्युत करू असं राष्ट्रसंघाच्या एका समितीनं नुकतंच जाहीर केलं.

राजीव गांधीच्या जमान्यात संततिनियमनाची बळजबरी केल्यामुळे असंतुष्ट झालेल्या जनतेनं १९७७च्या निवडणुकीत काँग्रेसला पाडून सत्ताकर्त्यांना धडा शिकवला. आता कुठलेच सूज्ञ राजकारणी कुटुंबनियोजनाच्या प्रश्नाला हात लावत नाही. ते आत्महित ओळखून वादनिरपेक्ष उत्तर देतात. देशाचं राहणीमान जसजसं वाढतं तशी लोकसंख्या आपोआप घटते हा मुद्दा मांडून ते मोकळे होतात. पण यातली गोम ते कधी सांगत नाहीत. ती म्हणजे उंचावलेल्या राहणीमानाचा लोकसंख्येवर परिणाम होण्यास अनेक पिढ्या लागतात. त्या काळात दर मिनिटाला जन्म घेणाऱ्या ३५ जीवांचं काय करायचं हा प्रश्न अनुत्तरितच राहतो.

अतिलोकसंख्येचे दुष्परिणाम आपल्या देशात ठिकठिकाणी दिसतात. स्थानिक रेल्वेत बसायला जागा मिळणं लॉटरी जिंकण्याएवढं कठीण. बिचारी गंगामाता केव्हाच मरणप्राय झाली आहे. तिच्या पाण्यात पुण्यापेक्षा गाळच जास्त आढळतो. जगातील सर्वाधिक प्रदूषित शहरं म्हणून आता दिल्लीची व मुंबईची ओळख झाली आहे. वाढत्या लोकसंख्येचा संसाधनावर बोजा पडून पर्यावरण प्रदूषण वाढतं याविषयी वाद नाही. भारताला स्वातंत्र्य मिळालं तेव्हा देशाची लोकसंख्या ३७.५ कोटी होती. ती आता १३० कोटींवर गेली आहे, पण देशातल्या पाण्याचं प्रमाण तेवढंच आहे. परमेश्वरानं पावसाचं प्रमाण वाढवलं नाही म्हणून संतती आटोक्यात ठेवण्याची आपल्याला आत्यंतिक गरज आहे. त्यासाठी अनेक प्रकारची साधनं बाजारात उपलब्ध आहेत. आपलं सरकार जनतेला ते मोफत किंवा कमी किंमतीला पुरवतं. तरीही देशातल्या ४० टक्के प्रजननक्षम स्त्रिया कुठलंच साधन वापरत नाही हे दुर्दैव. ज्या वापरतात, त्यातल्या ३९ टक्के महिला बीजवाहिनींचं खंडन (Tubectomy) ही कायमस्वरूपी पद्धती अंमलात आणतात. अमेरिकेतल्या स्त्रिया प्राधान्यानं गोळ्यांचा उपयोग करतात. त्यांचा वापर आपल्या देशात अत्यल्प असून इतर पद्धती (निरोध, IUDS वगैरे) अल्प प्रमाणात प्रचलित आहेत.

पुरुषांच्या संततिनियमनात एवढं वैविध्य सापडत नाही. त्याकरता स्थूलपणे एकच पद्धत उपलब्ध आहे. शुक्राणूवाहिनींचा विच्छेद (Vasectomy). या शल्यक्रियेमुळे कायमचं वंध्यत्व येते. प्रजननक्षमता पुनर्प्रस्थापित करण्यासाठी दुसरी एक शल्यक्रिया आहे, पण ती बाब खर्चिक व फार कमी यशस्वी असल्यामुळे त्या फंदात फार कमी लोक पडतात. नाही म्हणायला काही वर्षांपूर्वी जागतिक आरोग्य संघटनेनं (WHO) संतति-नियमनासाठी पुरुष ग्रंथीद्रव्याच्या (Male hormone) गोळ्यांना संमती दिली, पण त्या लोकप्रिय ठरल्या नाहीत. त्यामुळे औषध कंपन्यांनी त्या विकणं बंद केले.

याप्रमाणे सध्या संततिनियमनाचा बोजा प्रामुख्यानं स्त्रियांवर पडतो. संस्कृती सातत्याबरोबरच कुटुंबनियोजनाची जबाबदारी त्यांच्या खांद्यावर पडली आहे. मुलाच्या पाळण्याच्या दोरीबरोबरच तो कमी हलवण्याचं परस्पर विसंगत काम तिला करावं लागत आहे. पुरुषांना यात हातभार लावण्यास त्याची मानसिकता आडवी येते.

हे चित्र डॉ. सुजॉय गुहांच्या संशोधनामुळे जगभर बदलेल असं वाटतं. या शास्त्रज्ञानं जगातली पहिली प्रजननक्षमता पुनर्प्रस्थापित करणारी पुरुष नसबंदी (Reversible) शोधून भारताची पताका जागतिक क्षितिजावर फडफडवली. त्यामुळे पुरुषांच्या संततिनियमनात क्रांती घडली आहे. यशाची ही देवता प्रसन्न होण्यास त्यांना ३५ हून अधिक वर्ष अविरत कष्ट करावे लागले व नाना प्रकारच्या अडचणींना तोंड द्यावं लागलं, पण या प्रदीर्घ लढ्यात त्यांनी माघार घेतली नाही की आपलं मन खचू दिलं नाही.

डॉ. गुहा मुळचे अभियांत्रिकीचं शिक्षण घेतलेले पण देशासमोरचा लोकसंख्येचा भस्मासूर बघून त्यांनी जैवशास्त्रात शिरून पुरुषांमध्ये नवीन संततिनियमनाची पद्धती शोधून काढण्याचं ठरवलं. असं करताना त्यांनी अभियांत्रिकी व जैवशास्त्र यांत जी अलिखित पण अनुल्लंघनीय लक्ष्मणरेषा आहे ती ओलांडली आणि अनेक विघ्न त्यांच्यासमोर उभी ठाकली. भारतामध्ये या दोन विज्ञानशाखा तेल आणि पाणी यांसारख्या समजण्यात येतात. त्या कधी एकमेकांत मिसळत नाहीत, पण गुहांनी ते आव्हान स्वीकारून १९७८ मध्ये एक

संश्लेषित रसायन शोधून काढलं. प्रयोगशाळेतील प्राण्यांच्या शुक्राणूवाहिनीत त्या रसायनाच्या बारीक गोळीचं रोपण केल्यावर वंध्यत्व येतं हा क्रांतिकारक शोध लावला. त्याचं महत्त्व असं की गोळी बाहेर काढल्यावर अल्प काळात प्रजननशक्ती पुनर्प्रस्थापित झाली. याउलट व्हॅसेक्टामीमुळे तसं करणं कठीण. एक दुसरं द्रव्य शुक्राणूवाहिनीत ढोसलं की ती गोळी वितळून बाहेर पडते असं गुहांना आढळून आलं. त्यासाठी दुसरी शल्यक्रिया करण्याची जरुरी नव्हती. पण प्रायोगिक प्राण्यातला शोध मानवात काम करेलच याची शाश्वती नसते. त्यासाठी मानवाच्या पूर्वजांमध्ये प्रयोग करावे लागतात व ती पद्धती माकडांना हानिकारक नाही हे सिद्ध करावं लागतं, पण गुहा शिक्षणानं अभियंते असल्यामुळे जैवशास्त्रात शिरणं म्हणजे तेव्हा हरिजनानं देवळात प्रवेश केल्यासारखं होतं. जातीप्रमाणे हा पक्षपातही भारतात त्यावेळी म्हणजे १९८०च्या दशकात बोकाळला होता.

अमेरिकेत हा शास्त्रभेद सापडत नाही. ते अभियंते असूनही त्यांना शरीरक्रियाशास्त्रात (Physiology) आचार्यांच्या पदवीचा अभ्यास करण्यासाठी शिष्यवृत्ती मिळाली. ती पदरात पडल्यावर ते मायदेशी परतले व दिल्लीच्या आय.आय.टी. या प्रख्यात तंत्रज्ञान संस्थेत रुजू झाले. तिथे त्यांनी संशोधन करून त्या गोळीचा शोध लावला. तिचं शास्त्रोक्त नाव 'रिसुग' (Reversible Inhibition of Sperm Under Guidance, RISUG) असं आहे. प्राथमिक चाचणी करण्यासाठी गुहांना भारतीय वैद्यकीय संशोधन परिषदेचे (Indian Council For Medical Research, ICMR) पाय धरावे लागले. तिच्या आशीर्वादाशिवाय मानवावर प्रयोग करता येत नाही. तो मिळवणं परमेश्वराकडून वर मिळवण्यापेक्षा कठीण कारण तिथे भारतीय नोकरशाहीशी टक्कर होते. या चकमकीत यश मिळवणारा अर्जदार विरळाच हे गुहांनी लगेच अनुभवलं. त्यांना ज्या यातना भोगाव्या लागल्या त्या बघून कुणालाही पिसं लागलं असतं. इथे विज्ञानापेक्षा राजकारण महत्त्वाचं ठरतं. पाषाणीकरण झालेले नियम आड्वे आले. डॉ. गुहांना अमेरिकेतली जैवशास्त्रातली आचार्याची पदवी असली तरी ते डॉक्टर नव्हते. म्हणजे त्यांनी एम.बी.बी.एस.चा अभ्यासक्रम यशस्वीपणे पूर्ण केला नव्हता. वैद्यकीय पदवी हाती असल्याशिवाय ICMR चा बुरुज छेदणं शक्य नव्हतं. म्हणून गुहांनी काय केलं? माघार घेतली नाही. त्यांनी एम.बी.बी.एस.ची पदवी प्राप्त करण्याचं ठरवलं. दिल्ली विद्यापीठाच्या वैद्यकीय महाविद्यालयातून ते एम.बी.बी.एस. झाले. अशावेळी सर्वसाधारण मनुष्य खाजगी प्रॅक्टिस करून खोऱ्यानं पैसे कमावेल, पण अर्थार्जन करणे हा त्यांचा हेतू नव्हता. त्यांना रिसुग विकसित करून मानवी दुःख कमी करायचं होतं.

डॉक्टर होताच रुग्णसेवा करून श्रीमंत होण्याऐवजी डॉ. गुहांनी ICMR नं रिसुगची मानवी चाचणी करण्यात यावी म्हणून अर्ज केला, पण त्यांनी केलेल्या कष्टांचा, त्यागाचा व वेळेच्या व्ययाचा त्या वैद्यकीय संस्थेने मुळीच आदर केला नाही. तिनं त्यासाठी तथाकथित तज्ज्ञांची समिती नेमली. हे 'तज्ज्ञ' म्हणजे प्रजननशास्त्राचा गंध नसलेले पण इतर शास्त्रात काम करून निवृत्त झालेले ICMR ला धार्जिणे असलेले प्राध्यापक. ते आपापल्या शास्त्रात जरी पारंगत असले तरी प्रजननशास्त्रातलं त्यांचं अज्ञान लक्षणीय होतं. त्यांच्या बालबुद्धीचा एक आविष्कार लगेच कळला. डॉ. गुहांनी दोन वेगवेगळे रेणू संश्लेषित करून रिसुगला जन्म दिला. त्याचे दोन घटक रसायनं म्हणजे स्टायरीन (Styrene) व मॅलिक अनहायड्राईड (Maleic Anhydride). हे दोन्ही रेणू कर्करोगजन्य आहेत म्हणून त्यापासून निर्माण झालेलं संश्लिष्ट रसायन तसंच रोगकारक कशावरून नसेल हा प्रश्न तज्ज्ञांना उद्‌भवला. त्यांच्या बालबुद्धीला कळेल असं एक उदाहरण गुहांनी दिलं. सोडियम व क्लोराईड ही रसायनं घातक असतात, पण त्यापासून निर्माण झालेला सोडियम क्लोराईड आपण नेहमीच सेवन करतो. या मिठाशिवाय जेवण चविष्ट होत नाही, पण गुहांचं हे तर्कशुद्ध स्पष्टीकरण समितीला पुरेसं पटलं नाही. तिनं माकडांमध्ये प्राथमिक चाचणी करण्याची परवानगी कशीबशी दिली.

ती यशस्वी ठरली. अपेक्षेप्रमाणे 'रिसुग' या प्राण्यातही वंध्यत्व निर्माण करण्यात क्रियाशील आहे असं आढळून आलं. ती गोळी वितळून बाहेर काढल्यावर काही आठवड्यातच प्रजननक्षमता पुनर्प्रस्थापित झाली. 'रिसुग'चे शरीरावर कुठलेच दुष्परिणाम दिसले नाहीत. या रसायनाचा कामवासनेवरही परिणाम झाला नाही. वीर्यातील शुक्राणूंची गती मंदावली होती. त्यांची संख्या कमी होऊन रचना विस्कळीत झाली होती एवढंच. सर्व आशादायी दिसत होतं म्हणून गुहांनी पुढची पायरी चढली. ती म्हणजे या रसायनाच्या मोठ्या मात्रा प्रायोगिक प्राण्यांना (मूषक, ससे, गिनी पिग्स वगैरे) देऊन ते सुरक्षित आहे हे ठरवणं. त्यासाठी सर्व पेशीजाळ्यांची (Tissue) सूक्ष्मदर्शकाखाली (Microscope) परीक्षा करण्यात येते. रसायनाचे विषारी परिणाम तपासण्यात येतात. या विषारीशास्त्राच्या (Toxicology) अहवालानं 'रिसुग' सुरक्षित असल्याचा निर्वाळा दिल्यावरच मानवी चाचणी करण्यास ICMR परवानगी देते.

हे सर्व प्रयोग शंभर वर्षांहून अधिक जुन्या व जागतिक प्रतिष्ठा पावलेल्या केंद्रीय औषध संशोधनसंस्थेत (Central Drug Research Institute) लखनौ येथे करण्यात आले. त्याचा अहवाल ICMR च्या तज्ज्ञांपुढे मांडण्यात आला. त्यात रिसुग मानवासाठी सुरक्षित आहे असा निष्कर्ष काढण्यात आला होता पण या सूज्ञ तज्ज्ञांनी तो अविश्वासार्ह म्हणून फेटाळून दिला. सर्व परीक्षणं लंडनमध्ये करण्यात यावी असं सुचवलं. त्यामुळे कुणाचंही मन दडपून गेलं असतं, पण गुहांनी धीर सोडला नाही. अशा अनपेक्षित वळणांची त्यांना सवय झाली होती. लंडनची संशोधनशाळा भारतीय संस्थेपेक्षा जास्त विश्वासार्ह असेलही, पण शंभराहून अधिक वर्षांचा इतिहास

असलेल्या देशांतर्गत संस्थेच्या अहवालाला कचऱ्याच्या टोपलीत फेकणं देशद्रोही कृत्य नव्हतं का? ही बौद्धिक गुलामगिरी स्वातंत्र्योत्तर काळातही कायम असावी याला काय म्हणावं?

गुहांनी समितीला चुचकारलं व अहवालात चुका नाहीत असं पटवून दिलं. लंडनमध्ये काम करण्यास अमाप खर्च तर आला असताच पण वेळेचा विनाकारण व्यय झाला असता त्याचं काय? नोकरशाहीच्या घोड्यावर स्वार कसं व्हावं हे जाणून घेण्यासाठी गुहा तत्कालीन राष्ट्राध्यक्ष अब्दुल कलाम यांना २००२ मध्ये भेटण्यास गेले. तेही एकेकाळचे शास्त्रज्ञच म्हणून ते आपले अश्रू पुसतील असं गुहांना वाटलं. पण त्याऐवजी त्यांनीच क्षेपणास्त्राचा विकास करण्यास आपल्याला किती अडचणींना तोंड द्यावं लागलं याचं गाऱ्हाणं गाईलं. त्यामुळे अध्यक्षांचं मन हलकं झालं पण त्याचा गुहांना काही एक फायदा झाला नाही.

या काळोखातही एक प्रकाश ज्योत दिसली. सरकारनं त्यांची आय.आय.टी. दिल्ली येथे संचालक म्हणून बढती केली. हे सत्तेचं व प्रतिष्ठेचं पद होतं, पण त्यांनी ते नाकारलं. हे शासकीय पद म्हणजे फायली पुढे ढकलणं, विद्यार्थ्यांची भांडणं मिटवणं व राजकारण्यांची हुजरेगिरी करणं. आपला पिंड प्रशासकाचा नसून वैज्ञानिकाचा आहे याची गुहांना जाण होती म्हणून या पदोन्नतीमुळे ते मुळीच हुरळून गेले नाहीत. आपलं मंदिर म्हणजे प्रयोगशाळा व आद्यकर्तव्य म्हणजे 'रिसुग'ला विकसित करून उपयोगात आणणे हे ते विसरले नव्हते. त्यांना या निर्णयाचा कधीही पश्चात्ताप वाटला नाही.

हा समाधानाचा सुस्कारा सोडला न सोडला तोच त्यांना नवीन संकटाला तोंड द्यावं लागलं. ते त्यांना वर्मी झोंबलं. आपल्या संशोधनावर भाषण देण्यास परदेशात गेले असताना ICMR च्या तज्ज्ञांची बैठक झाली. 'रिसुग'नं गाशा गुंडाळून त्याऐवजी भारतानं चीनमधून त्यावेळी प्रायोगिक अवस्थेत असलेलं एक रसायन आयात करावं असा समितीनं निर्णय घेतला. ते मानवात कितपत कार्यरत आहे हे देखील जगाला ठाऊक नव्हतं. त्या निर्णयाला राजकारणाचे व द्वेषाचे रंग लागले होते हे कुणीही कबूल करेल. यातून पुन्हा गुलाम प्रवृत्ती प्रकट झाली. आयुष्यातलं सर्व काम समितीनं निरर्थक ठरवलं होतं. त्याचा त्यांच्या आत्मसन्मानाला धक्का बसला पण गुहा आपल्या ध्येयापासून विचलित झाले नाहीत. नैराश्याच्या खाईत पिचून न जाता त्यांनी दुप्पट जोमानं मृतप्राय रिसुगला जिवंत करण्याचा प्रयत्न केला. ही संजीवनी सत्ताधाऱ्यांच्या हातात आहे हे त्यांना ठाऊक होते. ती तज्ज्ञांची समिती फक्त नावापुरती होती म्हणून त्यांनी आरोग्य मंत्रालयात जाऊन योग्य कळा दाबल्या आणि त्यांच्या प्रयत्नांना यश आले. गाडी रुळावर आली. लखनौमधील प्रयोगशाळेचा अहवाल मान्य करण्यात आला व शेवटी 'रिसुग'ची मानवात चाचणी करण्यास हिरवा कंदिल मिळाला. गाडी इथपर्यंत येण्यास पंधराहून अधिक वर्षं लोटली तरीही गंतव्यस्थान अजून दूर होतं. गाडी तिथे कधीच न पोचण्याची शक्यता होती. प्राथमिक चाचणीत काहीही उणं सापडलं तर सर्व खेळ बंद होऊन आयुष्यभर केलेल्या कष्टांवर पाणी फिरलं असतं म्हणून 'रिसुग'ची पुढील यात्रा वादळी व धोक्याची असणं नाकारता येत नव्हतं आणि तसं खरोखरीच झालं.

एकदा चाचणी एकदम ठप्प झाली कारण 'रिसुग'धारकांच्या लघवीत आल्बुमिन (Albumin) नावाच्या प्रथिनाचं प्रमाण नेहमीपेक्षा जास्त आहे असं आढळून आलं. याचा अर्थ मूत्रपिंड बाधित होतो असा निष्कर्ष ICMR च्या तज्ज्ञांनी काढला. पुन्हा गुहांना समितीचे कान उघडावे लागले. भारतात नेहमीच जलदुर्भिक्ष्य असल्यामुळे व स्वच्छतागृहांची वानवा असल्यामुळे लोक पाणी फार कमी पितात. त्यामुळे हा प्रथिनस्त्राव होतो असं गुहांचं म्हणणं पडलं. त्याचा रिसुगशी काहीएक संबंध नव्हता कारण रिसुग न वापरणाऱ्यामध्येही या प्रथिनाचं प्रमाण तेवढंच होतं. तरीही समिती का कू करू लागली.

वैतागून गुहांनी सरकारला कोर्टात खेचलं. यासाठी त्यांना सिद्धार्थ शंकर नावाचा चांगला वकील मिळाला. ते पश्चिम बंगालचे एकेकाळी मुख्यमंत्री होते. त्यामुळे त्यांच्या शब्दांना मान होता, पण त्याचा काही फायदा झाला नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांनी पाच मिनिटातच न्याय दिला. आम्ही अशा क्लिष्ट व गुंतागुंतीच्या प्रश्नावर निर्णय देण्यास असमर्थ आहोत हे त्यांनी प्रांजळपणे कबूल केलं, पण सगळंच वाया गेलं नाही. गुहांची झेप बघून ICMR सुस्तीतून बाहेर पडलं आणि एकदम चाचण्या सुरू झाल्या.

आज 'रिसुग'चा शोध लागून ३५ वर्षं लोटल्यावर ते रसायन शेवटच्या टप्प्यात आहे. शेकडो लोकांवर त्याची चाचणी झाली असून ते ९८ टक्के परिणामकारक आहे असं आढळून आलं. महत्त्वाचं म्हणजे ते सर्व दृष्टीनं सुरक्षित आहे. ही पद्धती व्हॅजेक्टॉमीपेक्षा कितीतरी सरस आहे. एक म्हणजे ही रिव्हर्सिबल आहे. तसं व्हॅजेक्टॉमीविषयी म्हणता येणार नाही. दुसरं म्हणजे अशी शल्यक्रिया करून घेतलेल्यांमध्ये पुर:स्थ ग्रंथीच्या (Prostate) कर्करोगाचं प्रमाण थोडंसं वाढतं असं संशोधनांती आढळून आलं. आतापर्यंत तरी हा दुष्परिणाम गुहांच्या पद्धतीत सापडला नाही.

'रिसुग'चा उपयोग करण्यासाठी सर्वांग भूल देण्याची जरुरी नसते. स्थानिक भूल पुरे असते. सर्व प्रक्रिया १५ मिनिटात आटोपते. त्यानंतर अर्ध्या तासाच्या निरीक्षणानंतर मनुष्य घरी नव्हे तर कामांवर रुजू होऊ शकतो. हे गोरगरिबांच्या बाबतीत महत्त्वाचं. त्यांना उत्पन्नापासून वंचित राहण्याची जरुरी नसते. याउलट व्हॅजेक्टॉमीसाठी दोन दिवस सुटी घ्यावी लागते. सर्वांग भूल द्यावी लागत असल्यामुळे घरी विश्रांती घेणे आवश्यक असतं. भारताच्या बाबतीत सर्वात महत्त्वाचं म्हणजे 'रिसुग' फार कमी किंमतीला बाजारात विकत मिळेल. व्हॅजेक्टॉमीसाठी शेकडो रुपयांचा वैद्यकीय खर्च सोसावा लागतो. याप्रमाणे सर्व दृष्टीनं 'रिसुग'च उत्कृष्ट ठरते.

त्यामुळे परदेशात गुहांच्या पद्धतीचा गवगवा सुरू झाला. ते गोऱ्या माणसातही तेवढंच परिणामकारक आहे असं आढळून आलं.

'रिसुग'चे परदेशी हक्क अमेरिकेतील पार्सिमस (Parsemus) नावाच्या एका धर्मादाय प्रतिष्ठानाला फक्त १ लाख डॉलरला विकण्यात आले. ही किंमत माफक नसून मोफतच समजावी लागेल. गुहांची पद्धती स्वस्त व सुलभ असल्यामुळे त्यापासून खाजगी औषधकंपन्या फारसा फायदा मिळवू शकणार नाहीत. त्यामुळे त्याचं परदेशात विपणन करण्यात कुठल्याच परदेशी कंपनीनं रस दाखवला नाही. उलट ती पद्धती प्रचलित होऊन आपल्या पोटावर पाय येऊ नये म्हणून अशा कंपन्यांनी 'रिसुग'ला मान्यता मिळू नये म्हणून प्रयत्न केले असं गुहा म्हणतात. भारतीय सरकारच्या नकारात्मक, असहकारी व सुस्त भूमिकेमुळे 'रिसुग' मान्यताप्राप्त होण्यासाठी बरीच वर्ष लोटलीत हे खरं असलं तरी परदेशी कंपन्या स्वहितासाठी त्यावर बहिष्कार घालण्यास अमेरिकेतील औषधी नियामक मंडळावर (FDA) दबाव आणत आहेत हेही तेवढंच खरं आहे.

सरकारी कारभार गोगलगाईच्या गतीनं पुढे सरकतो असं म्हटलं तर त्या बिचाऱ्या बहुपदी प्राण्याचा अपमान होईल. या दिरंगाईचे दोन परिणाम झाले. एक म्हणजे बौद्धिक हक्कांची मुदत (Patent) केव्हाच संपली. त्यामुळे आपल्या सरकारला किंवा डॉ. गुहांना त्यापासून कुठलंच मानधन मिळणार नाही. आपण हे काम जनहितासाठी केलं असं गुहा म्हणतात. त्यामुळे आर्थिक हानीचं त्यांना वाईट वाटत नाही, पण पेटंट गेल्यामुळे खाजगी औषधकंपन्या या संततिनियमन पद्धतीचं वितरण करू शकणार नाहीत. त्यासाठी त्यांना बरीच भांडवली गुंतवणूक करावी लागेल. त्यावर परतावा मिळण्याची शक्यता कमी असल्यामुळे ही जबाबदारी शेवटी सरकारवरच पडेल. त्याची अकुशलता, अनभिज्ञता व अकार्यक्षमता लक्षात घेता हे चिन्ह चांगलं नाही असंच म्हणावं लागेल.

सध्या 'रिसुग'चे परदेशी हक्क गुहांनी अमेरिकेतल्या ज्या धर्मादाय प्रतिष्ठानला नाममात्र किंमतीला विकले त्यांच्याजवळ भांडवल नाही. ते उभं करण्यासाठी त्या फाउंडेशनने जनतेला पत्र लिहून विनवणी केली. त्याचं एक पत्र मला परवाच आलं.

सरकारची सुस्ती काही 'रिसुग'एवढीच मर्यादित नाही. ती सर्व क्षेत्रात सापडते. आपण संरक्षण साहित्य अब्जावधी डॉलर खर्च करून आयात करतो, पण देशांतर्गत शोधांकडे दुर्लक्ष करतो. नारायण मूर्ती हे 'इंफोसिस'चे सहसंस्थापक व भारतीय संगणक विद्येचे पितामह. ते म्हणतात, ''स्वातंत्र्योत्तर काळात भारतानं जागतिक स्तरावर प्रभाव पडेल व मानवी जीवन बदलेल असा एकही शोध लावला नाही.'' रघुनाथ माशेलकरांच्या मते याचं कारण सोपं आहे, ते म्हणजे भारतीय शास्त्रज्ञांना चाकोरीबाहेर जाऊन विचार करण्याची सवय नाही, पण गुहांनी तसं केलं. पुरुषांमध्ये जगातली पहिली रिव्हर्सिबल संततीनियमनाची पद्धती शोधून काढली. तिला जागतिक पातळीवर मान्यता मिळाली. तरीही ती अजून बाजारात उपलब्ध झालेली नाही याला काय म्हणावं? शास्त्रज्ञांबरोबर नियामक मंडळांनीही चाकोरीबाहेरचा विचार करण्याची आवश्यकता आहे हे उघड आहे. या मूलभूत प्रश्नाचा आपण पुरेशा गांभीर्यानं विचार केलेला नाही.

आज गुहांचं वय ७७ वर्षांचं आहे. त्यांची संशोधक बुद्धी व जिज्ञासा अबाधित आहे. ते अजूनही आय.आय.टी. खरगपूर येथे प्रोफेसर इमेरिटसचं काम करतात. ते ५-६ विद्यार्थ्यांना आचार्याच्या पदवीसाठी मार्गदर्शन करतात. त्यांच्या संशोधनाचा स्त्रीरोगशास्त्राशी जवळचा संबंध असल्यामुळे डॉ. सौ. लता लाभसेटवार या विद्यार्थ्यांशी या जानेवारीमध्ये दिल्लीत भरलेल्या एका अधिवेशनाच्या वेळी विस्तारानं बोलल्या व त्यांचा गुणात्मक दर्जा बघून चकित झाल्या.

माझी व डॉ. गुहांची प्रथम भेट १७ वर्षांपूर्वी मुंबईत झाली. तेव्हा त्यांचं वय ६० वर्षं असलं तरी त्यांच्या अंगातली ऊर्जा व उत्साह तरुणाईला लाजवण्यासारखा होता. त्यावेळी दोन योगायोग घडले. त्या दिवशीच्या इंडियन एक्सप्रेसमध्ये 'रिसुग'विषयी बरंच लिहून आलं होतं. दुसरा योगायोग असा की त्या वर्षी आम्ही लाभसेटवार फाउंडेशनची स्थापना केली होती. या प्रतिष्ठानचं एक उद्दिष्ट म्हणजे संततिनियमन क्षेत्रात जो कुणी सर्वोत्कृष्ट संशोधन करीत असेल त्याला १ लाख रुपयांचा पुरस्कार देऊन सन्मानित करणे. राष्ट्रीय पातळीवर देण्यात येणारं हे पहिलं पारितोषिक असून ते गेल्या १७ वर्षांपासून सातत्यानं देण्यात आलं आहे. त्या दिवशी आम्हाला पहिला मानकरी मिळाला हे सांगणे नकोच. त्यानंतर आमच्या अनेकदा भेटी झाल्या व त्यांच्या 'रिसुग'ची प्रगती जवळून बघण्याची संधी मिळाली. जानेवारी २०१७ मध्ये 'लाभसेटवार प्रतिष्ठान पुरस्कार' देताना ते माझ्याबरोबर अध्यक्षपदी बसले होते.

एकदा खरगपूरला पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसमोर भाषण देण्यास गेलो असता गुहांनी मला नेहमीच मानधन दिलं. ते मी स्वीकारलं नाही म्हणून ते पेचात पडले. म्हणाले की सरकारला पैसे परत करण्यास खंडीभर कागद व आकृतिबंध भरावे लागतात. त्यांची ती अडचण बघून मी त्यांना एक मार्ग सुचवला. ते पैसे विद्यार्थ्यांच्या चहापाण्यासाठी उपयोगी आणावेत. तो पर्याय त्यांना आवडला.

गुहा अगदी सौम्य आवाजात बोलतात. कुठला प्रश्न विचारला तर काही सेकंद थांबतात व मग हसून उत्तर देतात. त्यांचा स्वभाव गाईपेक्षा गरीब. ते नेहमी घाईत असतात व लगबगीनं चालतात. कृश अंगकाठी असल्यामुळे त्यांना वेगानं चालण्यात मुळीच अडचण पडत नाही. त्यांच्या डोक्यात नेह्मी नवीन कल्पना व संकल्पना खदखदत असतात. त्या सर्वच जैवशास्त्रातल्या नसतात. त्यांची प्रतिभा अनिरुद्धपणे अनेक वैज्ञानिक क्षेत्रात विहार करीत असते. त्यांनी दृष्टीहीन लोकांसाठी एक टंकफलक शोधून काढून विक्रम केला.

त्यांना दोन मुलं असून दोघेही अमेरिकेत स्थायिक झालेले आहेत. आपल्याप्रमाणे त्यांना भारतीय नोकरशाहीची झळ बसू नये

म्हणून त्यांनी ही दक्षता घेतली असावी. त्यांची पत्नी रिता उत्तम गृहिणी असून त्यांनी पतीची प्रतिभा फुलवण्यास हातभार लावला.

कुठलाही थोर कलाकार किंवा शास्त्रज्ञ काहीसा विक्षिप्त असतो. डॉ. गुहा त्याला अपवाद नाहीत. ते रोज सूर्य डोक्यावर आल्यावर उठतात. अकरा वाजता त्यांच्या दिनक्रमाला सुरुवात होते. वर्तमानपत्राचे वाचन झाल्यावर ते विज्ञानाचं व सुरू असलेल्या प्रयोगांचं चिंतन व मनन करतात. मग इतरांची दिवसपाळी संपल्यावर गुहा कामावर जातात. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतात. त्यांच्याकडून कामे करून घेतात. आवाज सौम्य व स्वभाव गरीब म्हणून ते कामाच्या बाबतीत लेचेपेचे असे समजण्याची चूक कुणी करू नये. वास्तवात ते चिकाटीचे, ध्येयनिष्ठ व कधीही माघार न घेणारे. मध्यरात्रीला सर्व जग निद्रिस्त झाल्यावर ते खरगपूर आय.आय.टी.च्या जंगलमय परिसरात धावायला जातात. त्यावेळी भटकी कुत्री त्यांचा पाठलाग करतात. त्यांचा उपद्रव नको म्हणून ते हातात कातड्याचा पट्टा (belt) पकडतात. त्याला भिऊन ते प्राणी पळून जातात.

गुहांनी पुरुषामध्ये पहिलीच रिव्हसिबल संतति-नियमनाची पद्धती शोधून काढून क्रांती केली. शासकीय सुस्तीमुळे ती यशस्वी असूनही अजून बाजारात आली नाही. अंतिम चाचण्या संपल्यावर लवकरच उपलब्ध होईल पण तिला स्पर्धा असणार. सरकारनं सुस्ती दाखवली नसती तर असं कधीच झालं नसतं. अमेरिकेतल्या एका आयसनफ्रॅटस (Eisenfrats) नावाच्या २४ वर्षीय तरुणानं 'रिसुग'सारखा जेल (gel) शोधून काढला. त्याची दोन वैशिष्ट्ये महत्त्वाची आहेत. एक म्हणजे या जेलचं शुक्राणूवाहिनीत रोपण करण्यासाठी १५ मिनिटांच्या प्रक्रियेची जरुरी नाही. तो जेल अल्ट्रासाउंड (Ultra Sound) च्या मदतीनं शुक्राणूवाहिनीत बसवता येतो. त्यानंतर तो टणक (Solid) होऊन शुक्राणूंना अडवतो पण नैसर्गिक द्रव्यांना रोखत नाही.

दुसरं वैशिष्ट्य म्हणजे या जेलमध्ये कुठलंच रसायन नाही. त्यामुळे अमेरिकेतील औषधी नियामक मंडळाच्या (FDA) व्याख्येनुसार ते उपकरण (device) समजण्यात येतं. याचा फायदा असा की त्याला मान्यताप्राप्ती मिळवण्यासाठी मानवात जास्त चाचण्या कराव्या लागत नाही. त्याला मंजुरी मिळण्याची शक्यता जास्त. हे 'उपकरण' सोयीस्कर व सोपं असलं तरी त्याची अजून मानवात मोठ्या प्रमाणावर चाचणी झालेली नाही. त्यामुळे त्याच्या परिणामकारकतेविषयी किंवा दुष्परिणामांविषयी आकडेवारी उपलब्ध नाही. याबाबतीत गुहांची 'रिसुग' पद्धती कित्तीतरी पुढे आहे हे विवाद्य.

३७ वर्ष अव्याहत राबल्यानंतर, अनेक अडचणींना तोंड दिल्यावर व नोकरशाहीजन्य यातना भोगल्यावर डॉ. गुहांच्या कष्टांना फळ लागलेलं आहे. या लढ्यात त्यांनी कधीही माघार घेतली नाही की धीर सोडला नाही हे महत्त्वाचं.


'रिसुग'चं यश हेच त्यांच्या जीवनाचं साफल्य आहे.

**- डॉ. अनंत पां. लाभसेटवार (Ph.D.)**

latalabh@aol.com

(लेखक फर्स्ट नॅशनल बँक आणि ट्रस्ट कंपनी, कॅन्सास अमेरिका या वित्तसंस्थेचे १४ वर्षं चेअरमन ऑफ दी बोर्ड होते. त्यापूर्वी त्यांनी १० वर्षं प्रजननशास्त्रात संशोधन करून १०० हून अधिक शोधनिबंध आंतरराष्ट्रीय शास्त्रोक्त नियतकालिकात प्रसिद्ध केले.)

**॥ग्रंथाली॥**





## अमेरिका : दशा व दिशा - डॉ. अनंत पां. लाभसेटवार

अमेरिकेत राहण्याचं भाग्य लाभलं की त्याला पहिली ठेच बसते. अतिस्पर्धेच्या युगात त्याला रात्रंदिवस काम करावं लागतं, कुटुंबाची हेळसाड होते आणि भौतिक ऐश्वर्य लाभलं तरी मानसिक शांतता आकाशातल्या चंद्राप्रमाणे दूरच राहते. आंतरराष्ट्रीय स्पर्धेमुळे कंपन्या सारख्या कार्यक्षमता व उत्पादनशक्ती वाढवण्यासाठी आकाशपाताळ एक करतात. त्यांना सारखी पुनर्रचना करावी लागते. यात अनेकदा नोकरी भरडली जाते आणि नवीन शोधावी लागते. जीवनातल्या अस्थैर्यामुळे तो या स्वप्नवत देशाकडे जरा करड्या नजरेनं बघू लागतो. त्यानंतर तो ठिकठिकाणी चिकित्सक दृष्टी वापरतो. चकाकणारं सर्वच सोनं नसतं याची त्याला खात्री होते. इतर देशांप्रमाणे या देशातही खाचखळगे, चढउतार, अन्याय व भ्रष्टाचार आहे याची त्याला जाणीव होते आणि मानसिक उत्क्रांतीची शेवटची पायरी तो चढतो. तिथून त्याला दिसतं ते सर्वच जादुई नसतं. आता तो अमेरिकेविषयी प्रगल्भ झालेला असतो.

**मूल्य ३५० रुपये**
**सवलतीत २१० रुपये**

## तर्कसंग्रही ग्रंथांचा अभ्यास करा : डॉ. कुलकर्णी




प्रकाशित पुस्तकांमध्ये आजच्या आधुनिक युगातील प्रशासन, राज्य, उद्योग जगतातील आचार-विचार यासंदर्भात अमूल्य मार्गदर्शन करण्यात आले आहे. तसेच अर्थनिर्णय आदी विषयांच्या दृष्टीने तर्कसंग्रहादी ग्रंथांचा अभ्यास करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन मराठी साहित्यिक व संशोधक तसेच पदव्युत्तर मराठी विभागाचे माजी विभागप्रमुख डॉ. मदन कुळकर्णी यांनी केले.

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ येथे शिक्षक दिनानिमित्त चार पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले. हिंदी मोरभवन येथे हा कार्यक्रम झाला. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाला विशेष अतिथी म्हणून भारतीय शिक्षण मंडळाचे संघटन मंत्री मुकुल उपस्थित होते. विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. उमा वैद्य कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होत्या. कुलसचिव डॉ. अरविंद जोशी व्यासपीठावर उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या चारित्र्यनिर्माणासाठी अभ्यासपूर्ण ग्रंथांची निर्मिती होणे आवश्यक आहे. तैत्तरीय उपनिषदामध्ये दिलेल्या स्वाध्याय आणि प्रवचानापासून ढळू नये या सूत्राचे स्मरण करून शिक्षकांनी अभ्यासपूर्ण ग्रंथांची रचना करावी, असे आवाहन कानिटकर यांनी केले. डॉ. वैद्य यांनी अध्यक्षीय भाषण केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्रंथपाल, प्रकाशन अधिकारी व कार्यक्रम समन्वयक डॉ. दीपक कापडे यांनी केले. संस्कृत विद्यापीठाची ग्रंथनिर्मिती आणि ग्रंथप्रकाशनाच्या समृद्ध परंपरेचा त्यांनी आढावा घेतला. यावेळी कुलगुरू डॉ. उमा वैद्य यांचे योगवासिष्ठ, संस्कृत भाषा तथा साहित्य विभागाच्या अधिष्ठाता डॉ. नंदा पुरी संपादित संस्कृत वाग्विलास, महाराष्ट्र राज्य प्रशासकीय सेवेतील माणिक गुट्टे यांचे तर्कसंग्रह आणि शिक्षणशास्त्र विभागाच्या अधिष्ठात डॉ. ललिता चंद्रात्रे यांचे 'संस्कृत शिक्षणम्' या चार पुस्तकांचे प्रकाशन देवेश्वर आर्वीकर यांनी म्हटलेल्या वेदमंत्रोच्चार पठणात करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. पराग जोशी यांनी केले. पुस्तकांचा परिचय डॉ. रेणुका बोकारे यांनी करून दिला तर कुलसचिव डॉ. अरविंद जोशी यांनी आभार मानले. या कार्यक्रमाला महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागाचे उपसचिव माणिक गुट्टे तसेच विद्यापीठाचे अधिकारी उपस्थित होते.

## रामचंद्र पु. कुलकर्णी यांच्या आठ पुस्तकांचे प्रकाशन






रामचंद्र पु. कुलकर्णी यांच्या आठ पुस्तकांच्या प्रकाशनसमयी डावीकडून रितू चव्हाण, जयश्री दाते, मंगला फाटक, नीला उपाध्ये, लेखक रामचंद्र कुलकर्णी, डॉ. प्रा. विद्यागौरी लेले, वैजयंती कुलकर्णी-आपटे आणि धनश्री धारप. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन - अस्मिता पांडे

मेहता पब्लिशिंग हाऊस

# ग्रंथपान




**वादळफूल : जपानी राजकुमारीची अविश्वसनीय जीवनकहाणी**

कोणत्याही काळामध्ये स्त्रीचं जगणं हा नेहमीच एक चर्चेचा विषय असतो. कोणत्याही समाजात जेव्हा एखादी स्त्री चालीरीतींच्या विरोधात जाते किंवा समाजविपरीत वर्तन करते, तेव्हा ती चर्चेचा विषय बनते. अशाच चर्चेचा विषय बनलेल्या आयसिन गिओरो अर्थात योशिको कावाशिमाची जीवनकहाणी वाचायला मिळते 'वादळफूल' या कादंबरीतून. रेई किमुरा लिखित मूळ इंग्रजी कादंबरी 'जॅपनीज पिओनी – द प्रिन्सेस अ‍ॅन्ड द स्पाय'चा मराठीत अनुवाद केला आहे वासंती घोसपूरकर यांनी.

मंचुरियाची 'आयसिन गिओरो' अर्थात 'योशिको कावाशिमा' हिची ही जीवनकहाणी आहे. आयसिन ही मंचुरियाचा राजकुमार स्यू याची मुलगी. राजकुमार स्यू हा एक कामांध पुरुष असतो. कामासक्त आणि मानसिक–दृष्ट्या दूषित वातावरणात वाढणाऱ्या आयसिनच्या मनात कामांधता, खोटेपणा, विश्वासघात अशा नकारात्मक भावनांची बीजं लहानपणीच पेरली जातात.

आपल्या बालपणाविषयी आणि वडिलांकडून मिळणाऱ्या वागणुकीविषयी आयसिन सांगते, ''माझे वडील राजकुमार स्यू मला नेहमीच एक 'निरुपयोगी मुलगी' अशी हाक मारत.'' वडिलांकडून मिळणाऱ्या वागणुकीमुळे तिच्या मनात टोकाची नकारात्मकता कशी बळावत गेली याविषयी ती सांगते, ''तरीही माझ्यामध्ये एक विचित्र असा जोश होता, जो माझ्या वडिलांच्या विरोधात सतत शस्त्र ठेवून उभा राही. 'निरुपयोगी मुलगी' अशी जी एक रेषा माझ्या वडिलांनी माझ्यासमोर ओढली होती, ती पुसून टाकण्यासाठी माझ्यातला ड्रॅगन मला लढण्याची प्रेरणा देई. मी पुन्हा त्यांना त्रास देण्यासाठी एक नवीन पण विक्षिप्त साहस करीत असे.''

आयसिनवर तिच्या आईचं जिवापाड प्रेम असतं आणि आयसिनचंही आईवर असतं; पण एके दिवशी आयसिनच्या वागण्याला कंटाळून स्यू तिला त्याचा दत्तक भाऊ नानीवा कावाशिमाकडे जपानला पाठवण्याचं ठरवतो आणि त्याची अंमलबजावणीही करतो. त्यामुळे आठ वर्षांची असतानाच आयसिनची आणि तिच्या आईची ताटातूट होते. जपानला जाताना तिच्याबरोबर तिची दाई जेड असते.

जपानला आल्यावर आयसिन गिओरोची योशिको कावाशिमा होते. नानीवा आणि त्याची बायको नाटुस्कोही योशिकोवर प्रेम करत नाहीत. नानीवाही स्त्रीलंपट असतो. योशिकोचा बंडखोरपणा वाढतच जातो. ती पुरुषी पेहरावात वावरायला लागते. जेड तिला वाईट वागण्यापासून परावृत्त करू पाहते; पण योशिकोमध्ये फरक पडत नाही; मात्र जेडवर तिचं मनापासून प्रेम असतं.

जपानला असताना यमागा नावाच्या लष्करी अधिकाऱ्याच्या ती प्रेमात पडते. यमागाशी सुरुवातीला तिची फक्त शारीरिक जवळीक असते; पण नंतर मात्र ती यमागावर मनापासून प्रेम करायला लागते. स्त्रीच्या नाजूक भावना तिच्या ठायी निर्माण होतात. यमागाला ती तिच्याशी लग्न करण्याविषयी विचारते; पण तो तिला लाथाडतो. तो तिला म्हणतो, ''तू त्या लायकीची स्त्री नाहीस की, माझे कुटुंब तुझा माझी पत्नी म्हणून स्वीकार करील! तुझ्या बाबतीत लोक तू चारित्र्यहीन आहे असे म्हणतात; तुलाही ती गोष्ट पूर्णपणे माहीत आहे योशिको. तू प्रत्येक माणसाच्या वासना चाळवतेस. योशिको, अगदी तुझ्या सावत्र वडिलांना आणि भावांनाही तू सोडले नाहीस. मी तुझ्यासारख्या बाईशी कधीच लग्न करू शकणार नाही योशिको!'' यमागाच्या या वागण्याने योशिकोच्या मनात निर्माण झालेला नाजूक बंध तुटतो आणि ती परत एकदा बेदरकारपणाच्या प्रवाहात स्वत:ला झोकून देते. पुरुषांविषयीची चीड आणि संताप तिच्या मनात नव्याने उफाळून येतो.

वैजरजॅब नावाच्या मंगोलियन राजकुमाराशी लग्न होऊन ती मंगोलियाला जाते. मायी ही वैजरजॅबची रखेली असते; पण ती योशिकोवर खूप प्रेम करते. योशिकोलाही ती आवडते; पण बंडखोर योशिकोला मंगोलियातील वातावरण रुचत नाही आणि ती तिथून पलायन करते. मंगोलियातून जपानला जातानाच्या प्रवासात तिची भेट तामुरा नावाच्या उत्साही आणि स्वतंत्र वृत्तीच्या स्त्रीशी होते. तामुरा योशिकोला तिच्या स्वभावानुसार एक व्यवसाय सुरू करून देते आणि त्यामुळे योशिको आर्थिकदृष्ट्या स्थिरस्थावर होते.

पुढे तनाका नावाच्या जपानी लष्करी अधिकाऱ्याशी तिची ओळख होते. तो गुप्तहेर असतो. त्याच्या सांगण्यावरून ती जपानच्या गुप्तहेर खात्यात दाखल होते आणि चीनच्या विरोधात काम करायला लागते. तनाका आणि ती एकत्र राहायला लागतात. तो तिची खूप काळजी घेत असतो. त्यानंतर जपानसाठी गुप्तहेर म्हणून ती बरंच काम करते; पण शेवटी चीन तिला जेरबंद करून कोठडीत टाकतो आणि कोणत्याही क्षणी तिला मृत्यूच्या खाईत लोटलं जाण्याची शक्यता असते; पण योशिको तिथूनही पलायन करते. त्यानंतरचं तिचं ३९ वर्षांचं जीवन अज्ञातवासात जातं.

योशिकोचं हे जीवन विविध नाट्यमय वळणांनी भरलेलं आहे. योशिको ही व्यक्तिरेखा अतिशय व्यामिश्रतेने साकारली गेली आहे. वडिलांचं कामांध जीवन आणि त्यांच्याकडून मिळालेली नकारात्मक वागणूक, तिच्या आईची अगतिकता या सगळ्यामुळे तिचं स्त्रीत्व लहानपणीच करपून जातं आणि ती नकारात्मक वृत्तीची बनते. कावाशिमा कुटुंबाकडूनही तिला प्रेम मिळत नाही. तिच्या जीवनात आलेला पहिला पुरुष यमागाही तिला लाथाडतो आणि ती अधिकाधिक बंडखोर होत जाते. तिच्यावर मनापासून प्रेम करणारे पुरुषही नंतर तिला भेटतात; पण ती कायमची त्यांची होऊ शकत नाही. काही वेळा तिच्यातील सद्सद्विवेक जागा होऊ पाहतो; पण तिच्यातील नकारात्मकता त्यावर मात करते. तिच्या आईपासून तिची झालेली ताटातूट डोळ्यांत पाणी आणते. जेड, मायी, तनाका यांच्या रूपाने तिच्या जीवनात हिरवळ येते; पण ती क्षणभंगुर ठरते.

नाट्यमय वळणांनी पुढे सरकणारी योशिकोची ही जीवनकहाणी म्हणजे तिच्या भावभावनांच्या आंदोलनाचा उत्कट प्रवास आहे.

**– अंजली पटवर्धन**

मेहता पब्लिशिंग हाऊस
**वादळफूल**
मूळ लेखक – रेई किमुरा, अनुवाद – वासंती घोसपूरकर
पाने –३५६, किंमत –३००
**'ग्रंथाली येथे सभासदांना सवलतीत रुपये**




# ग्रंथपान

चांगदेव काळे

संपर्क : ९८६९२०७४०३

## ज्वालामुखीच्या तोंडावर

कुमार केतकर




''मी एका धगधगत्या ज्वालामुखीच्या टोकावर बसलेली आहे. कोणत्याही क्षणी हा ज्वालामुखी उफाळून स्फोट होईल अन् मी लाव्हारसात फेकली जाईन, याची मला जाणीव आहे.'' हे आहेत इंदिरा गांधी यांचे उद्गार. त्यांच्या या उद्गारातील वास्तवाची सत्यता पडताळून पाहण्यासाठी मोठी प्रयोगशाळा आहे ती म्हणजे 'तो काळ'. या प्रयोगशाळेतील राजकारण देशकेंद्री किती होते, व्यक्तिकेंद्री किती होते, त्यातून निघालेले निष्कर्ष आणि अनुमान काय होते, यांचा घेतलेला वेध म्हणजे 'ज्वालामुखीच्या तोंडावर' हे पुस्तक होय.

इंदिरा गांधी यांनी पंतप्रधानपदाची शपथ घेतली ती १९६६साली. तिथपासून त्यांचा झालेला प्रवास हा राजकारणाला स्वतंत्र दिशा देणारा आणि त्याचवेळी राजकारणात स्वतःला केंद्रीभूत ठेवणारा होता, असा हा प्रवास. व्यक्ती म्हणून इंदिरा गांधी या नेहरू घराण्याचा वारसा सांगतात, परंतु त्यांची कारकीर्द त्या वारशाला पुढे नेणारी होती. स्वातंत्र्य चळवळीत सगळ्यांच्या अपेक्षांची पूर्ती करू शकेल असा विश्वास वाटणारा काँग्रेस पक्ष इंदिरा गांधींच्या कालखंडात वृद्धिंगत झाला, नेहरू, शास्त्री यांची भारतवर्षाची स्वप्ने इंदिरा गांधींनी मूर्त स्वरुपात आणली. देशातील स्थिरता आणि शांततेचा पाया समृद्धी आणि सहिष्णुतेच्या मार्गाने खोदला जातो. असे खोदकाम झाले वा खोदकाम करताना जमीन खडकाची लागली, या व अशा अनेक अपेक्षा प्रश्नचिन्हांच्या रांगोळीत स्वतःचे स्थान बळकट करतात, तेव्हा त्यांच्याविषयी निर्माण होते ते कुतूहल. वास्तवाची शिवण उसवून पाहण्याचे कुतूहल. इंदिरा गांधी या व्यक्तिमत्त्वाभोवती विणलेले हे ते कुतूहल अनेक चरित्रकारांना आव्हान वाटावे आणि लेखनासाठी आवाहन करणारे वाटावे, यात आश्चर्य नाही. आश्चर्य आहे ते त्यांनी पार केलेल्या आव्हानाचे. ते आश्चर्य वाटत राहते ते 'ज्वालामुखीच्या तोंडावर' हे पुस्तक वाचत असताना आणि वाचून झाल्यावरही.

१९६६ ते १९८४ हा त्यांचा कालखंड, म्हाजे अवघा १८ वर्षांचा. या कालखंडाने पाहिलेले चढउतार हे राजकीय, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक अशा सर्वच स्तरावरील आहेत. यात एक व्यक्ती म्हणून, देशाची एक पंतप्रधान म्हणून, पक्षाची सदस्य म्हणून इंदिरा गांधींचे व्यक्तिमत्त्व का उठून दिसते, त्याचा शोध कुमार केतकर यांनी या पुस्तकात घेतलेला आहे. तोही अतिशय स्पष्ट, निरपेक्ष, कुठलाही एक पक्ष न घेता. ते स्वतःच लिहितात,''स्वतःशी कोणत्याही प्रकारची प्रतारणा न करता हा शोध करायचा, असे मी ठरवले. शोध घेताना उत्तर नसतेच. असते फक्त जिज्ञासा, कुतूहल आणि ज्याचा आपण शोध घेणार, याबाबत उत्कट आकर्षण.''

खरे तर हा एक इतिहास आहे, एका कालखंडाचा. राष्ट्रपती व्ही.व्ही गिरी यांच्या निवडीत झालेले राजकारण, सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांची परंपरा मोडून केलेल्या नियुक्त्या, भांडवलशाहीचा पुरस्कार करणाऱ्या बँकांचे राष्ट्रीयीकरण, संस्थानिकांचे तनखे बंद, रेल्वेच्या कामगारांचे जाळे हाताशी धरून आव्हान देणारे जॉर्ज फर्नांडीस, संन्यासीवृत्तीत गेलेल्या जयप्रकाश नारायण यांचे पुन्हा उदयाला आलेले नेतृत्व, गुजरातमधील राजकारण, बिहारमधील विद्यार्थी आंदोलन, पंजाबातील राजकारण, कामगारांचे संप, जमीनदारांचा जुलूम, दुष्काळामुळे अन्नधान्याची टंचाई, बेकारी, गरिबी हटाव, बांगला देशाचे निर्वासित व त्यातून युद्ध, यावेळी आंतरराष्ट्रीय स्तरावरील राजकारण, चीन-अमेरिका-पाकिस्तान यांचे अडथळे, रशिया-भारत करार, सिमला करार, अलाहाबाद उच्च न्यायालयाचा विरोधी निकाल, घटनादुरुस्ती, अराजकसदृश परिस्थिती, आणीबाणी, जनता दलाची स्थापना, अल्पावधीची सरकारे, धर्माच्या नावाखाली चाललेले व्यवहार, ब्ल्यू स्टार ऑपरेशन, या व अशा अनेक घटनांचे तपशील, त्यामागील राजकारण व इतिहास आणि सगळ्या हिंस्त्र पशूसमान जबडे वासून हल्ला करणाऱ्या वातावरणात केंद्रस्थानी आहेत इंदिरा गांधी. यावेळी ज्या तऱ्हेने सामोऱ्या गेल्या, खंबीरपणे उभ्या राहिल्या, सडेतोडपणे आंतरराष्ट्रीय नेतृत्वाला जबाब देऊ लागल्या. निर्भयपणे युद्धात उभ्या राहिल्या. आपल्या नेतृत्वावर, राजकारणावर, ठाम राहिल्या. न डगमगता प्रत्येक आव्हानाचा सामना केला, पराभवातही खचून न जाता स्वतःचे मार्ग शोधत राहिल्या. जनतेशी असलेले नाते कायम राखले. या सगळ्या प्रसंगांची यादी अराजक माजविण्यास पूरक ठरली वा त्यातून तसे वातावरण तयार झाले परंतु यात इंदिरा गांधी आपल्या जागी अविचल राहिल्या.

पुस्तकाचे वैशिष्ट्य असे की सर्व प्रसंगांचे सन दिलेले आहेत. त्यामुळे प्रसंग आणि काळ यांच्यात विसंगती न येता संदर्भाचे सातत्य कायम राहिले आहे.

कुमार पत्रकार आहेत, त्यांचा अभ्यासाचा, वाचनाचा, लेखनाचा व्यासंग मोठा आहे. देशात घडत असलेल्या घटनांची नोंद ते तीक्ष्ण आणि चिकित्सकपणे घेत असतात, त्याचा प्रत्यय हे पुस्तक वाचताना पदोपदी येत राहतो. सदर पुस्तकाच्या शेवटी संदर्भसूची दिलेली आहे. एखाद्या व्यक्तिमत्त्वाचा वेध घेण्यासाठी किती परिश्रम घ्यावे लागतात याचा अंदाज या सूचीवरून येतो. त्यांचे लेखन अस्सल पुरावे आणि संदर्भ यांची मेजवानी असते. तिला स्वतःची धारदार अशी लय आहे. सामाजिक जाणिवा, राजकीय विश्लेषण, डाव्या-उजव्याची तुलनात्मक पातळी, विचारांची पक्की बैठक, यामुळे लेखन बंदीश बांधल्यासारखे घट्ट विणीचे झाले आहे. उदा. - 'एका माणसाच्या अश्रू ढाळण्याला रडणं म्हणतात, लाखो लोक रडू लागले की ते आक्रंदन असते. आक्रंदनात क्रांतीचे सामर्थ्य असते, रडण्यात हतबलता.'

मुखपृष्ठ सतीश भावसारांनी सजवलेले आहे. उत्सर्जित होत असलेला ज्वालामुखी, त्यासमोर शक्तिस्थळाची शिळा आणि तिच्यातून दृश्यमान झालेली प्रसन्न, निश्चयाचा महामेरू असलेल्या इंदिरा गांधी यांची प्रतिमा, हा संगम शीर्षकाची सार्थकता तर दाखवतोच परंतु प्रसन्न प्रारंभापासून प्रस्थानापर्यंतच्या प्रवासाचे प्रतीक म्हणूनही समोर येतो.


**मूल्य ३०० रु. • सवलतीत १८० रु.**

ग्रंथयात्री

# ग्रंथपान

## गुलाबराव पारनेकर

सचिन जगदाळे




'गुलाबराव पारनेकर' हे सचिन जगदाळे यांचे पुस्तक वाचताना 'संभूसांच्या चाळीत' या नाटकाची आठवण झाली. चाळ आणि तिचे रहिवासी हे दोन्हीही घटक एका परिघात आपली ओळख निर्माण करतात. त्यांचे आपसातले संबंध, तिथल्या अडीअडचणींवर कसे मात करतात, टोकाचा विरोध आणि तितकाच घनिष्टपणा, प्रत्येकाची तऱ्हा वेगळी तरी प्रसंगी हातात हात गुंफून गुण्यागोविंदाने एकत्र येणे, प्रेम-विरोध, हेवे-दावे, तुलना-मत्सर, ऊन-सावली, काळा-पांढरा, लहान-थोर तरीही आम्ही एक, अशी विविधता अनुभवास देणारे एकमेव ठिकाण म्हणजे चाळ. 'गुलाबराव पारनेकर' हे पुस्तक त्या पठडीतले म्हणता येईल.

चाळ या संस्कृतीशी नाळ जुळलेली असल्याने त्या संस्कृतीच्या अनुभवांनी झोळी शिगोशिग भरलेली, स्वतःचा पत्रकारितेच्या क्षेत्रातला वावर, त्यामुळे चित्रातले वि-चित्र शोधण्याची कलाही साधलेली, अशा समृद्धीच्या वाटेवर असलेल्यांचा प्रवास सुसाट न झाला तरच नवल. गुलाबराव पारनेरकरांची जन्मकथा लेखकाने त्यांच्या मनोगतात सांगितली आहे, तीही भन्नाटच म्हणायला हवी. असे प्रयोग करण्यासाठी केवळ पत्रकार वा चाळकरी असून चालत नाही, स्वतःकडे प्रतिभाही असावी लागते. आपल्याला जे सांगायचे आहे, त्याचे नेमके भान असावे लागते, तरच गुलाबरावांसारखी व्यक्तिरेखा साकार होऊ शकते. तिच्या भोवतीचे वातावरण साकारले जाऊ शकते. लेखकाकडे प्रतिभा आहे तसे भानही आहे, त्यामुळे गुलाबराव पारनेरकरांची व्यक्तिरेखा साकार झाली आहे.

गुलाबराव पारनेरकर हे चाळीत राहणारे, मिलमध्ये काम करणारे, साधेसरळ आयुष्य जगणारे, पोटाचा मोठा घेर असलेले, सत्तरीतील एक गृहस्थ. झोपेत चालण्याची सवय असलेले. स्वच्छतेची, सहलीची, फिरायला जायची आवड असलेले. आनंदी, परोपकारी, शेजारधर्म पाळणारे. मदतीसाठी धावणारे, मैत्री जपणारे. त्यांची पत्नी सौ. पारनेरकर आणि ते असे दोघेच. मुलगा निधन पावलेला. लहान जागेत संसार नेकीने आणि काटकसरीने करणारे. ते या कथानकातील मध्यवर्ती व्यक्तिमत्त्व. झोपेत चालण्याची सवय त्यामुळे उडणारे गोंधळ, सिनेमात कलाकार म्हणून काम करण्याचे स्वप्न आणि त्यासाठी करायची तयारी, निवडणुकीसाठी उभ्या असलेल्या आमदाराची मुलाखत घेण्याची कल्पना, वजन कमी करणे, स्वच्छतेची कल्पना आणि त्यासाठीचे प्रयत्न, गिरणी संप, लग्नाची जबाबदारी, गोव्याची सहल, हनुमंतरावांची मैत्री आणि प्रेमाचा दिवस, अशा मोजक्याच कथानकाची गुंफण केलेले हे लेखन आहे. या लेखनात केवळ विनोद नाही, तर मार्मिकपणे सामाजिक उणिवांवर बोट ठेवलेले दिसून येते. गिरणी संपाचा हेतू कितीही उदात्त असो, सामान्य माणूस कामापासून दूर राहिला तर त्याच्या होणाऱ्या परवडीचे काय? स्वच्छता केवळ घोषणांनी अंमलात येत नाही, त्यासाठी स्वतः पुढाकार घ्यावा लागतो. घराचे लहानपण, मर्यादित सोयीसुविधा यात आनंद, सुख, मानावे लागते, परंतु त्याचवेळी उतारवयात आईबापाने मुलासाठी ही जागा सोडून गावी जायचा निर्णय घ्यावा लागतो. सामान्य माणसाला ऐहिक सुखाशी जशी तडजोड करावी लागते, तशी प्रेमाशीही करावी लागते. आपले काही संस्कार आहेत, लग्नकार्याच्या परंपरा आहेत. थोडीशी मिळाली संधी तर तिच्यात मनापासून रममाण होण्याची वृत्ती आहे. चोरून प्रेम करण्याच्या सवयीसोबत स्वतःकडे कमीपणा घेणे आहे, परंतु त्याचवेळी भावनिक गहिवर सुद्धा आहे. प्रेमाचा दिवस, हनुमंतरावांची मैत्री, लग्नाला पन्नास वर्षे झाली, त्यातून आलेले प्रसंग हे भावनेलाच थेट हात घालतात. वय, परकेपण सारे विसरून प्रेम देता येते, आपलेपणा जपता येतो, हेही या लेखनातून प्रत्ययास येते. उपहास, उणीव, प्रेम, मैत्री, गहिवर असा वेगवेगळा अनुभव विनोदाच्या हातात हात घालून आल्याने लेखनाला वेगळे वैभव प्राप्त झाले आहे. गुलाबरावांच्या सोबत हनुमंतराव, प्रशांत, ठोंबरे, हेलपाटे, पाष्टे, बनसोडे, शिंतोडे, पावडे, पांचाळ, थोरात, या व्यक्तिरेखा आहेत. या वैभवात यांचा वाटा गुलाबरावांइतकाच मोठा आहे.

विनोद हा प्रसंगनिष्ठ, शब्दनिष्ठ आणि व्यक्तिनिष्ठ असा तीन प्रकारात विभागलेला असतो. लेखकाने गुलाबराव साकारताना या तीनही प्रकारांचा उपयोग केलेला असला तरी प्रसंगनिष्ठ विनोदावर अधिक भर दिलेला आहे. त्यामुळे त्यातील सहजता आपोआप लक्षात येते. संवादांच्या माध्यमातून येणारे विनोद त्या-त्या व्यक्तिरेखांच्या स्वभावांचा परिचय करून देतात. रात्री सगुणाबाईचा तमाशा पाहण्यामुळे सकाळी शाळेत झोप येणे स्वाभाविक होते. त्या झोपेवरून झालेल्या तमाशाचे वर्णन लेखक करतात, 'शाळेचे हेडमास्तर गुलाबरावांना हातात तुणतुणं देऊन बोर्डावर उभे करायचे बाकी राहिले होते.' मित्र पाटकराच्या अंत्ययात्रेचा प्रसंग- 'जोशी वडेवाल्याच्या हॉटेलवर गुलाबराव आणि पाटकर दोन-चार वडाप्लेट विभागून खायचे इथंपर्यंत ठीक होतं, पण पाटकरांच्या तिरडीवर पडणारी फुलंही विभागून आपल्या डोक्यावर पडत असलेली पाहून गुलाबराव थोडे घाबरलेच.' किंवा 'थोडी सर्दी होती. तुमच्या चिरंजीवांकडून औषधे घेतली होती. मला जरी बरे वाटले नसले तरी ती औषधे चुकून उंदरांनी खाल्ल्याने उंदीर मात्र मेले हो. सांगा तुमच्या डॉक्टरांना.'

अशा प्रकारे एकूणच हे लेखन निखळ आनंद देत, प्रसन्नपणे वाचकाला सोबत घेते. पुस्तकरूपाने हा पहिलाच प्रयत्न असूनही यात कुठे नवखेपण जाणवत नाही. विनोदाला एक प्रवाहीपणाचा वेग असावा लागतो, तोही उत्तमपणे सांभाळलेला आहे.

लेखकाने वर्णन केल्याप्रमाणे अगदी हुबेहूब गुलाबराव मुखपृष्ठावर साकारलेले दिसतात. त्यांची टोपी, धोतर, सदरा, पुढे आलेला पोटाचा मोठा घेर, पायात चपला, हाताला अडकवलेली छत्री. आणि एक निरागस प्रसन्न मुद्रा, बेरकीपणाच्या जवळ जाणारी. शिवाय आत रेखाचित्रेही दिलेली आहेत, जी अर्कचित्रे वाटावीत इतकी उत्तम साधली आहेत. नवरदेवाच्या डोक्यावरची पगडी आणि कपाळावरचे बाशिंग घोड्याच्या डोक्यावर आलेले पाहताना, सगळा प्रसंगच नजरेसमोर उभा राहतो. प्रत्येक रेखाचित्राची खासियत तशीच आहे. महत्त्वाचे म्हणजे सगळ्या चित्रांमध्ये गुलाबराव असून त्यांच्या भावमुद्रा वेगवेगळ्या आहेत, परंतु घेर असलेले टम्म पोट कायम एकसारखेच आहे. निलेश जाधव यांची ही सजावट उत्तमच!


**मूल्य १०० रु. • सवलतीत ६० रु.**




# ग्रंथपान

## दुःखाची स्वगते

डॉ. संजय कळमकर




लेखक आणि त्याचे लेखन हे नेहमीच कुतूहलाचे विषय ठरलेले आहेत. लेखक आणि त्याचे लेखन यांचा परस्पर संबंध किती? लेखन हे लेखकाचा अविष्कार आहे, तसे ते त्याचे स्वतःचे अनुभव आहेत का? प्रतिभेच्या जोरावर कल्पिलेले साहित्य असेल तर ते त्याला सुचते कसे? कथाबीज आणि त्यातील व्यक्तिरेखा यांचा उगम कसा, त्यांची लेखकाशी भेट कुठे व कशी झाली, कशी सुचली, असे अनेक प्रश्न साहित्यकृती वाचून झाली की उपस्थित होतात. त्यांच्या जोडीला उपस्थित होते ते लेखकाविषयीचे व्यक्तिगत पातळीवरील कुतूहल. हे कुतूहल शांत होण्याचा उत्तम मार्ग म्हणजे त्या लेखकाचे चरित्र वा आत्मचरित्र, विशेषांक किंवा त्याचा घेतलेला शोध. अशाच शोधाचे पुस्तक म्हणजे डॉ. संजय कळमकर यांनी लिहिलेले 'दुःखाची स्वगते' हे होय. यात जयवंत दळवी यांच्या कादंबऱ्यांचा अभ्यास हा मुख्य विषय आहे.

जयवंत दळवी यांनी लिहिलेल्या चौफेर साहित्याची यादी मोठी आहे. त्यांची संख्या पाहता कथासंग्रह पंधरा, कादंबऱ्या बावीस, नाटके सतरा, विनोदी पुस्तके आठ, प्रवासवर्णन एक, एकांकिका संग्रह एक, संकीर्ण सहा अशी ही यादी आहे. यातील प्रत्येक साहित्याचा स्वतंत्रपणे अभ्यास होऊ शकतो. लेखकाने दळवींची 'कादंबरी' हा विषय शोधासाठी निवडलेला आहे. चिकित्सकपणे शोध घ्यायचा तर त्यासाठी काही काटेकोर निकषांची आवश्यकता असते. लेखकाने त्यादृष्टीने केलेला प्रवास नक्कीच कौतुकास्पद आहे. कादंबरी साहित्यप्रकारात कथानक, व्यक्तिरेखा, वातावरणनिर्मिती, निवेदन पद्धती, संवाद, भाषाशैली, हे महत्त्वाचे घटक समजले जातात. या घटकांवर लेखक म्हणून जयवंत दळवी यांच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव किती आहे, त्यांची जडणघडण, त्यांचे निसर्गरम्य कोकणातील वास्तव्य, एकत्र कुटुंब पद्धती, संस्कार, पुरुष-स्त्री संबंध, मानसिकता, आदींचे त्यांच्या साहित्यात उमटलेले प्रतिबिंब, याचा शोध घेणे अपरिहार्य ठरते.

या पुस्तकाच्या दुसऱ्या प्रकरणात 'जयवंत दळवी : व्यक्तिमत्त्व जडणघडण आणि वाङ्मयदर्शन' हा शोध दिलेला आहे. यात स्वतः दळवी यांनी स्वतःविषयी व्यक्त केलेली मते, समीक्षकांनी व्यक्त केलेली मते यांचा समावेश आहे. घरात लेखनाची कुठलीही परंपरा नसलेल्या दळवींनी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या मूलस्थानी असणाऱ्या अंगभूत प्रतिभाशक्तीने आपल्या वाटा शोधल्या आहेत, असे अभ्यासातून लेखकाच्या लक्षात येते.

तिसऱ्या प्रकरणात जयवंत दळवी यांच्या कादंबऱ्यांचे आशयरूप व आशयसूत्रे यांचा शोध घेतलेला आहे. दळवींची पहिली १९६१ साली प्रकाशित झालेली कादंबरी 'चक्र', त्यानंतर प्रकाशित झालेल्या कादंबऱ्या- 'सारे प्रवासी घडीचे', ' स्वागत', ' महानंदा', 'अथांग', वेडगळ', 'सावल्या', 'प्रवाह', 'धर्मानंद', 'आल्बम', 'अंधांतरी', 'श्रीमंगलमूर्ती आणि कंपनी', 'ऋणानुबंद', 'कहाणी', 'अंधाराच्या पारंब्या', 'कवडसे', 'प्रदक्षिणा', ' अभिनेता', 'सूर्यास्त', 'चक्रव्यूह', 'बाजार', 'कारभाऱ्याच्या शोधात' या होत. पैकी पुस्तक रूपाने प्रकाशित झालेल्या सतरा कादंबऱ्यांचा या शोधासाठी समावेश आहे. मानवी संबंधातील विविधता, निसर्ग, विजोड संसार, वेडेपणा, विफल प्रेम, आजार, लैंगिकता, दारिद्र्य, वैफल्य, नैराश्य, या आशयसूत्रांशी ही कथानके गुंफलेली प्रामुख्याने दिसतात.

चौथ्या प्रकरणात, व्यक्तिचित्रणाचा शोध आहे. दळवींच्या कादंबऱ्या या बहुतेक व्यक्तिप्रधान आहेत. त्यांची तीन प्रकारात विभागणी केलेली आहे. त्यांचा अंतर्मुख व बहिर्मुख अशा दोन अंगांनी शोध घेतलेला आहे. शिवा ओटवणे, दिगंबर, धर्मानंद, लुका, अप्पाजी, मंजुनाथ, बेन्वा, प्रकाश, कल्याणी, शिवनाथची आई, जनाई, अपर्णा या सगळ्यांचे वैशिष्ट्ये, परस्परसंबंध, त्यांची मानसिकता, यांचा शोध वरील निकषांनुसार घेतलेला आहे. नातेसंबंध आणि देहधर्म, व्यक्तिरेखांचा मनोविश्लेषणावादी भूमिकेतून विचार, कादंबऱ्यांची भाषा, यासाठी स्वतंत्र प्रकरणे दिलेली आहेत. विशेष म्हणजे या प्रत्येक कादंबरीमध्ये आलेले वाक्प्रचार, सुभाषिते, उपमा, परभाषिक शब्द, हिंदी शब्द, कोकणी शब्द, शिव्या, ध्वनिमयता यांचीही नोंद लेखकाने घेतलेली आहे. शेवटच्या प्रकरणात लेखकाने 'जयवंत दळवी यांच्या कादंबऱ्यांचा विवेचक अभ्यास' याविषयी आपली निरीक्षणे नोंदविलेली आहेत.

डॉ. संजय कळमकर यांनी घेतलेला व्यापक पट आणि त्यासाठी केलेला अभ्यास, याचे कौतुक वाटते. प्रत्येक प्रकरणाच्या शेवटी त्यांनी दिलेली संदर्भग्रंथांची सूची पाहिली तरी त्यांच्या अभ्यासाची व्यापकता लक्षात यावी, परंतु तितकेच नाही, त्यांनी केलेली प्रत्येक प्रकरणाची मांडणी आणि त्यानुसार केलेले विवेचन, यातून अनुमानापर्यंत जाणारा प्रवास, हा त्यांच्या चिकित्सक चिंतनाचा अनुभव देणारा अभ्यास आहे, याची खात्री पटते. विषय प्रबंधाचा आहे, तरी तो स्वकेंद्री नाही. कुणाही वाचकाला, अभ्यासकाला तो सहज आकलन होणारा, आपला वाटावा, वाचून झाल्यानंतर समाधानाची तृप्त भावना मनावर रेंगाळत ठेवणारा, असा एक सुंदर प्रवास आहे. एखाद्या लेखकाच्या साहित्याचा शोध घेण्याचा राजमार्ग कसा असतो, याचे उत्तम उदाहरण म्हणून या प्रबंधाचा प्रामुख्याने उल्लेख करता येईल. त्यातून जयवंत दळवी यांच्यासारख्या बहुआयामी सिद्धहस्त लेखकाचे मूल्यमापन करणे म्हणजे समुद्राच्या तळाचा शोध घेण्यासारखे महत्प्रयासाचे प्रयत्न म्हणावे लागतील. डॉ. कळमकर यांनी या तळाला गवसणी घातली आहे. त्यामुळे जयवंत दळवी यांच्या साहित्याचा शोध घेऊ पाहणाऱ्या अभ्यासकांसाठी ते या सागरावरील दीपस्तंभ आहेत.


मुखपृष्ठासाठी जयवंत दळवींची चिंतनगर्भमुद्रा निवडलेली आहे आणि उरलेले अवकाश व्यापले आहे ते त्यांच्या साहित्यकृतींच्या नामावलीने. शीर्षक आणि आशय यांचे प्रतिबिंब वाटावा असा सुरेख समन्वय राजेंद्र ठाणगे यांनी साकारला आहे.

**मूल्य ४०० रु. • सवलतीत २२० रु.**

# ग्रंथपान

**शहरातला प्रत्येक**

सुजाता महाजन



सुजाता महाजन यांचे 'शहरातला प्रत्येक' या नावाचे 'ग्रंथाली'ने प्रकाशित केलेले हे पुस्तक आहे. या पुस्तकाला कथासंग्रह म्हणायचे की कादंबरी, असा प्रश्न पुस्तक वाचत असताना उपस्थित झाला. कथासंग्रह म्हटला तर त्यातील प्रत्येक कथा स्वतंत्र अनुभवाचे अस्तित्व घेऊन आलेली असते. कादंबरी म्हटली तर तिचा एक आकृतिबंध असतो. तिच्यातील व्यक्तिरेखा एका सूत्राशी बांधलेल्या असतात. ही आपली ढोबळ कल्पना. परंतु अलीकडे लेखनाचे तंत्र, आशय, आकृतीबंध यासारख्या पारंपरिक सूत्रांना छेद देत नवनवे प्रयोग करीत साहित्य वाचकांच्या समोर येत आहे. त्यामुळे चाकोरीबद्ध सूत्राशी नाते सांगणाऱ्या वाचकांवर अशा स्वरूपाच्या प्रश्नांना सामोरं जाण्याचा प्रसंग येतो. प्रस्तुत पुस्तकाने तो प्रसंग आणला हे खरे.

कारखाने, कार्यालये, उद्योग, शाळा, महाविद्यालये, इमारती, न्यायालय, दवाखाने, वाहने, बागा, रस्ते, अशा अनेक घटकांना आपल्या कवेत घेऊन विस्तारत गेलेल्या शहराचे रूप 'अफाट' या शब्दाशी विराम पावते. त्याचे स्वतःचे कायदे, नियम, शिस्त, अपेक्षा आहेत, ज्या त्याच्या व्यवहाराशी निगडित असतात. त्यांचे पालन करण्याची जबाबदारी असते ती माणसावर. त्यामुळे या सगळ्यांच्या मुळाशी असतो तो माणूस. ज्याला हे शहर आपल्या तालावर खेळवत असते, असे म्हटले तर वावगे ठरू नये. गरीब-श्रीमंत, स्त्री-पुरुष, उच्च-नीच, जातपात, हे मानवाने कल्पिलेले वर्ग शहराच्या दृष्टीने बेदखल असतात कारण इथे अंमल असतो तो शहराचा. या शहरातला प्रत्येक हा वेगवेगळा असूनही तो शहराचाच एक भाग असल्याने त्याचे वेगळेपण स्वतःचे न राहता ते या शहराचे होते. त्यामुळे या शहरातील माणसांच्या कथा जरी या माणसांच्या कथा आहेत असे म्हटले, तरी त्यांचा नायक आहे ते शहर. या शहराने या सगळ्यांना आपल्या सूत्राशी जोडून घेतले आहे. त्यामुळे ही माणसांची कथा न म्हणता ही शहराची कथा आहे. परंतु तिचा पट आणि आवाका पाहता तिला कथा म्हणणे अन्यायकारक ठरेल. ही आहे शहराची कादंबरी.

'शहरातला प्रत्येक' हा ठळकपणे नजरेत भरावा असा 'प्रत्येक' आहे. यात आलेल्या व्यक्तिरेखांना स्वतःचे व्यक्तिमत्त्व आहे. स्वतःचे गुणधर्म आहेत. त्यांच्यात विविधता आहे. त्यांचे वागणे, बोलणे, त्यांचे व्यवहार हे सगळे शहराचा गुणधर्म सांगणारे आहेत. प्रमोशन आणि स्टेटस यांची गल्लत करून चालत नाही, याचे उदाहरण म्हणजे तुंगा आणि सुरेश. बायकोने हुशारी दाखवून नवऱ्यापेक्षा वरचे प्रमोशन मिळवणे म्हणजे नवऱ्याचा अपमान. म्हणून तिने मुद्दाम नापास व्हायचे, नवऱ्याचा अपमान टाळण्यासाठी. आपुलकी-आत्मीयता जपणारे नाते असूनही ते व्यक्त करण्याचे नियम आहेत. त्यापलीकडे गेले की भुवया उंचावतात आणि प्रश्न निर्माण होतो, 'मग?' नात्याच्या नसलेल्या तारामावशीच्या निधनामुळे क्षिप्राला शोक अनावर झाला, तेव्हा नाते नसलेली ही बाई इतकी का शोक करतेय, असा प्रश्न विचारला जातो. स्वतःची जमीन, स्वतःची इमारत, तिच्यात राहणारे भाडेकरू कसेही वागले तरी त्यांना पाठीशी घालणारा मालक हा तर मोठाच विषय. अशा इमारतींमध्ये घरकाम करणाऱ्या गोदू, यम्नी, गंगी यांचे स्वतःचे मनस्वीपण. आपली चूक असतानाही तिच्यातून सहीसलामत बाहेर पडण्यासाठी ठामपणे बतावणी करणारी तापी, प्रवास आणि पार्टी यात व्यस्त असलेला नवरा आणि त्याच्या तालावर नाचण्यासाठी तारेवरची कसरत करणारी बायको, महाविद्यालयीन मुले आणि मुली यांच्या प्रेम व मैत्रीबद्दलच्या असलेल्या कल्पना, त्यांच्या तोंडी असलेल्या भन्नाट वाक्यांची सहजता दाखविणारी कावेरी आणि त्यांनी धसका घेतलेले तिचे आईवडील, पदोपदी आढळणारी फसवणूक, भोंदूगिरी, लबाडी यांचा ठणकावून पर्दाफाश करणारी इंद्रायणी; बायको कितीही गुणी असू देत, तिला काय कळतं- अशी वृत्ती असलेला नवरा, मारामाऱ्या, दहशत, व्यसने यांनी भारलेल्या वातावरणात सुगावा लागू न देता हिंस्त्रपणे वावरणारी माणसं, सेल्समन म्हणून दारावर येणारे तरुण, कॉलनी-सोसायटीत होणारी भांडणे व उपद्रव, असा अनेक व्यक्तिरेखांच्या द्वारे शहराचा विशाल पट या पुस्तकातून आपल्यासमोर उलगडत जातो. जणू शहरातील वेगवेगळ्या भागांतून लेखिकेने वास्तव्य केलेले असून त्या सगळ्या व्यक्तिरेखांशी त्यांचा परिचय आहे. यात जशी उच्चभ्रू सोसायटी येते, मध्यमवर्गीयांची कॉलनी येते, तशी गरिबांची झोपडपट्टीही येते. प्रत्येक स्तरावरील व्यक्तिरेखा त्या त्या प्रसंगी कशी वागेल, बोलेल, प्रतिक्रिया व्यक्त करील, याचे सूक्ष्म अवलोकन केलेले दिसून येते. त्यामुळे त्यात कुठे कृत्रिमता न येता सहजता जाणवते. यातले आणखी एक वैशिष्ट्य असे की, यातील प्रत्येक व्यक्तिरेखेला दिलेले नाव हे नदीचे आहे. गंगा, यमुना, कावेरी, इंद्रायणी, तापी, विपाशा, कालिंदी, पवना...

लेखिकेच्या लिखाणातील सहजता जशी भावणारी आहे तसा आरंभाशी जुळणारा कथेचा शेवट, आपल्याला जे सांगायचे आहे त्या तत्त्वाला जोडणारा. त्यामुळे प्रत्येक अनुभवाची पातळी स्वतंत्रपणे परिणाम करणारी जाणवते. घर आणि घरातील व्यवहार, परस्परसंबंध यांचा गोफ सुरेखपणे विणलेला आहे. 'सगळे खाली उतरले तेव्हा चंद्राची चपराक आपल्यालाच बसली असावी असं ओशाळेपण नीट न घासलेल्या भाड्यांना खरकटं राहून जावं तसं प्रत्येकाच्या मनाला चिकटून राहिलं होतं.' 'हे असं एकदम काय होतं? क्षणापूर्वी नदीवरून येणाऱ्या झुळकांनी सुखावलेले जीव घसा सुकून वाळवंटातल्या बिनसावल्यांच्या जगात तडफडायला लागतात.' अशा वाक्यांतून तो व्यक्त झाला आहे.

अफाट असे जग असलेल्या शहरातला प्रत्येक जण स्वतःचे अस्तित्व घेऊन वावरत असतो. या अफाट जगाचा तो एक अभिन्न असा घटक असतो, तरीही त्याचे अस्तित्व हे शहराच्या दृष्टीने पुसट झालेले असते. त्याचे वावरणे हा केवळ असतो भास, अंधारातील सावलीसारखा. अशा असंख्य सावल्या या शहराच्या अस्तित्वात आपले हरवलेले अस्तित्व शोधताना दिसतात. तीच यथार्थ कल्पना सुप्रिया वडगावकर यांनी पुस्तकाच्या मुखपृष्ठावर कल्पकतेने साकारलेली आहे.

**मूल्य २५० रु. • सवलतीत १५० रु.**



## खर्चिक हृदयरोग शस्त्रक्रिया करण्याची वेळ येईपर्यंत का थांबा?
## वेळीच अचूक निदान आणि उपचार करुन घ्या!

हृदयरोग, अँजिओप्लास्टी, बायपास वगैरे शब्द ऐकले तरी मनात धडकी भरते. पण ती वेळ येईपर्यंत थांबायचंच कशाला? माधवबाग क्लिनिकमध्ये आजच कार्डिओ असिस्ट हार्ट चेकअप करुन घ्या. या तपासणीचा तुमचा रिपोर्ट हृदयरोगतज्ज्ञांनी दिलेला असतो. आजच माधवबाग क्लिनिकला भेट देऊन स्ट्रेस टेस्ट करुन घ्या. म्हणजेच अत्याधुनिक तपासणी आणि अचुक निदान!

**कार्डीॲक रिस्क असेसमेंट**

तपासणी अंतर्गत:
इ सी जी, ब्लडप्रेशर,
आर बी एस (रँडम ब्लड शुगर)
एस पी ओ 2, बी एम आय

~~₹450~~ फक्त ₹150*

**कार्डीओ असिस्ट असेसमेंट**

तपासणी अंतर्गत:
कॉम्प्युटराईज्ड स्ट्रेस टेस्ट, इ सी जी,
ब्लडप्रेशर, आर बी एस (रँडम ब्लड शुगर),
एस पी ओ 2, बी एम आय

~~₹2400~~ फक्त ₹750*

सोबत एक्सपर्ट डॉक्टर्सचे कन्सल्टेशन आणि डाएट चार्ट

• मुंबई • पुणे • पश्चिम महाराष्ट्र • गोवा • विदर्भ • मराठवाडा • बेळगाव येथील सर्व माधवबाग क्लिनिक्स्‌मध्ये ही टेस्ट उपलब्ध


अपॉइंटमेंटसाठी आजच मिस कॉल द्या:
**022-33494950**
किंवा लॉग-इन करा www.madhavbaug.org

माधवबाग™
व्हॉटएव्हर इट टेक्स

**'हृदयस्पर्शी माधवबाग' हे पुस्तक माधवबागच्या सर्व क्लिनिक्समध्ये उपलब्ध त्यासाठी आजच पैसे भरुन नोंदणी करा. मिस्डकॉल नं. 022-67715442**

RNI No. MAHMAR/2013/50137
Published on 10th of Every Month.

Postal Registration No. MCW/310/2016 -2018
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001 on 10th & 11th of Every Month.




मुद्रक, प्रकाशक, संपादक : सुदेश राजाराम हिंगलासपूरकर यांनी ग्रंथाली विश्वस्त संस्थेच्या वतीने, 'शब्द रुची' हे मासिक इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ येथे छापून ग्रंथाली विश्वस्त संस्थाच्या वतीने, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, जे. के. सावंत मार्ग, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.